
इतिहास

हिंदुस्थानातील शिक्षण



प्रस्तावना

नामदार सावनामे इग्रजसरकारच्या सवसुजदार अलि निजाम, ग
वाडे शिंदे होळकरादि जे विमान सामेतचक्र आहे त्याच्या पूर्वजांनी
ध्या जाहागिरी वैगरे मुलुख कसा मिळवला, राज्ये कशी स्थापिली, को
ध्या कृपांनीं काय काय पराक्रम केले, आणि हाल्लींच्या सुधारणेच्या व
काळांत त्यांच्या देशाची स्थिति कशी आहे, हे समजण्यास त्यांच
इतिहास पाहिजे व तो त्यांच्या सर्व देशबंधूस अवगत असला पाहिजे. अ
ग्रंथ त्यामच्या लोकांनीं स्वभाषेत लिहिलेले असावे परंतु त्यांचा अगदीं अभा
व आहे त्या सारखा आहे. कारण आमचें दुर्दैव! यामुळें ज्यांस ते लिहिण्या
स लागणारी सामुग्री मिळण्याचा संभव, मिळविण्याची शक्ति, व लिहिण्या
ची लागला आहे त्यांस ती बुद्धि होत नाहीं. असो, ती होईपर्यंत दुसऱ्यां
नीं तरी नाकानें भागविली पाहिजे, असें मनांत आणून हा ग्रंथ इंग्रजीवरून
न्यांत केला आहे. आमच्या देशाच्या इतिहासाचे अनेक भाग आहेत, त्यां
पैकी अनेकांवर अनेक इंग्रजगृहस्थांनीं, ज्यांचा जो आवडला तो घेऊन, ग्रं
थ केर अनेक ग्रंथ लिहिले आहेत त्यांच्या सहायानें व इतर कागदपत्रां
च्या माहितीनें कर्नल मोलसन यांणीं सारभूत असा प्रस्तुतचा ग्रंथ लिहिला.
तो सन १८७५ मध्यें छापून प्रसिद्ध झाला, तेथपर्यंतचा इतिहास त्यांत आ
ला. त्याच्या साहेबांस राजेरजवाड्यांत वागण्यास सांपडल्यानें पुष्कळ माहिती
मिळाली, तिचा त्यांणीं असा सदुपयोग केला. आमच्या महाराष्ट्रबंधूंनी
या इंग्रजी यत नसेल त्यांस त्याचा लाभ स्वभाषेच्या द्वारानें व्हावा
म्हणून हा ग्रंथ तयार केला आहे.

इतिहास म्हणजे गतगोष्टींचें कथन. अशी सामान्यतः व्याख्या करा
वी, परंतु ही फार व्यापक आहे. ती प्रमाणें हिंदुस्थानचा इतिहास लिहि
ण्याचा झाला तर त्यांत कोण कोणत्या गोष्टी आल्या पाहिजेत ते कै० वि
ष्णुशास्त्री चिपळूणकर यांणीं आपल्या निबंधमालेंत उत्कृष्ट रीतीनें सांगितलें
आहे. त्याप्रमाणें लिहिलेल्या साऱ्या देशाच्या इतिहासाचें नांव स्वप्नीं
देखील घ्यावयास नको; इतकेच नव्हे, तसा एकाद्या संस्थानाचा देखील लिहि
ण्यास दुर्घट. परंतु आपल्या लोकांत प्राचीन कालापासून इतिहा
साची चाल अगदींच नव्हती असें नाहीं खरे उत्कृष्ट इति
हासाचा प्रचार फार प्राचीन ग्रीक लोकांत सुद्धा होता

(पू०)वास नेऊन पोहोंचविली. त्यांच्या मागून रोमन लोकांनीं ही आणि विद्यमान युरोपियन राष्ट्रांपैकींकांहींत तर ती फारच ही आहे. तसा प्रकार आमच्या इकडे झींच झाला नाहीं. हें परंतु इंग्रजांचा आमचा संबंध होऊन इकीं वर्षें लोटलीं, त्यांच्या चा अभ्यास करूं लागून त्यांच्या ग्रंथामृताचें आम्ही आकंठ प्राशन आहों, इतिहासाची योग्यता केवढी हें त्यांचे पा विषयावरील अनेक भिन्न ग्रंथकारांचे निबंध वाचून आम्हास कळूं लागलें, ग्रीक व रोमन चे सगद्बंध इतिहासग्रंथ त्यांणीं स्वभाषेंत उतरून घेतले आहेत ते व लिहिले आहेत ते वाचून आम्ही माना डोलवूं लागलों, त्यांणीं स्वदेशा इतिहास लिहिला आहे त्याचें आमच्या पाठशाळांतून अध्ययन चाल च, जर्मन, रशियन अमेरिकन, अशा परराष्ट्रां इतिहास वाचावे अशी आम्हास उत्कंठा होते, इतका ह्या विषयाचा आम्हास ध्यास आहे, य असेल तें असो, त्याप्रमाणें स्वदेशाचा इतिहास तयार करावा अ आम्हांस इच्छा होत नाहीं. हें ही असो, इंग्रजांच्या येथें पाऊल पडल्यापासून ते आम्हांविषयीं एकएक गोष्ट समजून घेण्यास से झटत आहेत व आम्हां- स जिंकून जातां तर सार्वभौमत्व पावले आहेत, पण हिंदु म्हणजे केव आ- फ्रिकेंतले निग्रो नव्हत, आर्यकुलोत्पन्न आहेत. अलीकडल्या ज्ञानसंपन्न व्या- वीं कितीं काल हे ज्ञाननिधि होऊन बसले होते यांचे वेद नामक नुपम ग्रंथ कोणत्याकाळीं उत्पन्न झाले याचा निश्चय करतां येणें अशक्य आहे. शी जेव्हां त्यांची खात्री होत चालली, भोजाविक्रमादि महाप्रतापी रा चा णक्यासारखे राजनीतिविशारद मंत्री, ज्यांच्या मध्ये उत्पन्न झाले त्यांच्या बुद्धि प्रभाव आणि शस्त्रप्रभाव शिवाजी , संगराणा , धाजी , तोडरमल्ल, जी- राव , मादण्णा , महादजीशिंदा , पूर्ण्या , नाना डणीस , अहल्याई , लक्ष्मीबाई , अशा विभूतींच्या ठायीं त्यांस प्रत्यक्ष पावयास सांपडले तेव्हां थक्क होऊन गेले आणि म्यांटडफ्फ, एल्फिन्स्टन, टॉड, मालकम के , या महात्म्यांनीं आमचे जे यथार्थ गुण गाइले ते ते आम्हांस वाचाची होत नाहीं तेव्हां आमच्या स्वाभिमानशून्यत्वास काय म्हणावें !

हिंदुस्थानदेश म्हणजे कांहीं लहानसान नाही रशिया शिवाय करून खंड तेवढा त्याचा विस्तार, त्यांत अठरा क्रोड प्रजा व- सते, अनेक भाषा, अनेक प्रकारचे आचार विचार व पेहेरावगणि

सुवर्ण भूमि असा तिच्या संपत्तीचा डंका वाजलेला. विद्या कलां वगैरे ल्याचं माहेरघर हेंच; मनुष्य जातीच्या सुधारणेस आरंभ प्रथम येथेंच झाला असें मानणें म्हणजे केवळ कुतर्क असें म्हणतां येण्यासारखा नाहीं. अशा ह्या आर्य भूमीचे पुत्र प्रथम अंगास रंग लाऊन व कातडीं पांघरून, किंवा येथील ऊन उष्ण असल्या मुळें त्याची ही फारशी जरूर न बाळगतां राख फांसून, कंद मूल फळें भक्षण करीत रानोमाळ फिरत असतील ; परंतु ती स्थिति जाऊन त्यांस थोडें बहुत ज्ञान प्राप्त होऊं लागलें असेल तेव्हां पासून चार वेद, सहा शास्त्रें, अठरा पुराणें, चौदा विद्या, चौसष्ट कला, पूर्णावस्थेस येतपर्यंत जो काळ गेला असेल त्याचा इतिहास लिहितां येण्यासारखी सामुग्री मिळेल असें स्वप्नीं देखील मनांत आणावयास नको. ह्मणून तो यत्न कोणी न केला तर दोष ठेवण्यास जागा नाहीं. परंतु सूर्यवंशी सोमवंशी ह्मणविणारे मोठमोठे पराक्रमी राजे झाले त्यांचे वंश अद्याप चालत आहेत. त्यांणीं स्थापलेल्या राज्यां इतकीं प्राचीन राज्यें एशिया युरोपांत, किंबहुना साऱ्या पृथिवींत, सांपडणें नाहींत. तर अशा सार्वभौमांची स्थिति हजार बारशें वर्षां पूर्वी कशी होती, ती कधीं पासून पालटूं लागली आणि होतां होतां इतक्याच कालापूर्वी जे अंगाला रंग लाऊन, कातडीं पांघरून, वनचर जलचर प्राण्यांवर उदर निर्वाह करीत होते ते येथें येऊन शें सवाशें वर्षांत सार्वभौमपदास चढून, त्यांच्यापुढें हात जोडून रहाण्याची वेळ कितीकांनां कशी कशी आली तें कथन करण्याचीं साधनें थोड्या बहुत श्रमानें साध्य होण्यासारखीं असतील तर तेवढ्यांचा यथामति यथाशक्ति उपयोग न केला तर दोष येणार नाहीं काय ? परंतु असें आमच्यांतल्या थोर थोर विद्वानांस कधीं वाटेल ?

कोणत्याही देशच्या लोकांस झालें तरी स्वदेशाचा इतिहास अवगत असणें किती अवश्य आहे हें सांगावयास नको. त्यांतून आमच्या सध्याच्या अवस्थेंत तर तो जाणण्याची केवढी अवश्यकता ह्मणून सांगावी ! आम्ही होतों कसे आणि झालों कसे याचा विचार करूं लागलें, किंवा कोणी हा प्रश्न केला, म्हणजे त्याचा उलगडा करण्यास सारा इतिहास डोळ्यांपुढें उभा राहिला पाहिजे. राजकारभारांत मन घालणाऱ्या पुरुषांस तर इतिहासासारखें दुसरें विचारसाधन नाहींच. हिंदुस्थानाच्या इतिहासाचे ढोबळ मानानें मुख्यत्वें करून चार भाग करतां येतील. पहिला मुसलमानी

ग्या होऊं लागून त्यांचा अम्मल बसूं लागला त्यापूर्वीचा काल. हा
ष्कळच मोठा असावा आणि यांत शांतता ही बरीच असावी. तेव्हां सारें
राष्ट्र हिंदु होतें ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. तर त्यावेळीं राजरीति क-
शी होती, धर्म कसा चालत होता, विद्याकलादिकांचा उत्कर्ष कसा झाला,
संपत्तीचें मान कसें होतें, व्यापार धंदे कसे चालत होते हें निश्चयात्मक स-
मजण्याचें साधन जरी नाहीं आणि त्यावेळीं सुधारणा पुष्कळ झाली असावी
असें जरी मानलें, तरी त्यांचें बल आणि शौर्य कमी झालें असावें किंवा वा-
यव्येकडून त्यांजवर जें परचक्र आलें त्याचा पराक्रम त्यांच्याहून वरचढ अ-
सावा व त्यामुळेंच मुसलमानांपुढें त्यांचा निभाव लागला नाहीं असें मानणें
भाग पडतें. इसवी सनाच्या अकराव्या शतकाच्या आरंभीं महमूद गिझनवी
याणें स्वारी केली तेथून दुसरा भाग सुरू होतो. तेथून दोनशें वर्षं मुसल-
मान स्वाऱ्या करीतच होते, परंतु त्यांचा अम्मल सन १२०६ पासून खरा
सुरू झाला म्हणावयाचा. त्या वर्षीं कुतबुद्दीनानें दिल्लीस गादी स्थापिली. ते
थून पांचशें वर्षांनीं सन १७०७ मध्यें औरंगजेब मेला आणि त्यांचा ह्ह
सकाल गुरा आला. असा पांचशें वर्षं परकीयांचा अम्मल दुसऱ्या देशावर
चालल्याचें इतिहासांत दुसरें उदाहरण नाहीं. हीं पांच शतकें हिंदुनीं क-
शीं काढलीं, अल्लाउद्दीन, महंमद तघलख, औरंगजेब, अशा महातामसी
बादशहांच्या हातून वेदशास्त्रें कशीं जगलीं आणि रघुवंशीय म्हणविणारे क्ष-
त्रिय कसे काय निभले, त्या कालाच्या युरोपांतल्या मोठमोठ्या श्रीमान क्ष-
णविणाऱ्या राजांचें वैभव आणि डामडौल ज्यांच्या थाटमाटापुढें निस्तेज दि
सत होते अशा आग्रादिल्लीच्या दरबारीं राजविलासांत जो संपत्तीचा चूर होत
होता आणि सोन्याचा धूर निघत होता त्यापासून जमीन नांगरणारा कुणबी
आणि इकडचा माल तिकडे व तिकडचा इकडे ने आण करणारा वाणी यां
च्या स्थितींत काय फेरबदल होत होता या गोष्टी फार विचार करण्या सा-
रख्या आहेत. मोगलवंशांत अकबर नामक जो अलौकिक पुरुष होऊन गे-
ला त्याणें हिंदुंचीं मनें कशीं आकर्षून घेतलीं, राजस्थानांतील रजपूत राजे
ज्या वेळीं आतां पेक्षां कसे संपन्न व वजनदार होते, सती जाण्याची चाल
णें, विधवांचा पुनर्विवाह सुरू करणें, रजोदर्शनापूर्वी विवाह होऊं
आदि गोष्टींचा त्याणें उपक्रम कसा केला आणि त्यापासून फुल
लें त्याचा विचार न करतां औरंगजेब त्याचा कित्ता गिरवण्याचा

डून अगदीं त्याच्या उलट वर्तन करूं लागला, त्याच्या मरणा बराबर हा दुसरा भाग संपला आणि तिसरा सुरू झाला. ही मराठ्यांची कारकीर्द अकराव्या शतकांत मुसलमान अटक उतरून आलीकडे आले, तेव्हां पासून त्यांचें प्राबल्य वाढत वाढत सारा देश त्यांणीं व्यापला. कोणी हिंदु राजा स्वतंत्र असा नांव घेण्यासारखा उरलाच नाहीं. अशा समयीं दक्षिण देशास पुनः हिंदूंनीं डोकें वर काढलें, आणि अल्पकाळांत अशी धामधूम उडवून दिली कीं धर्मवेडा औरंगजेब राज्यलोभानें अंध होऊन आपल्या जातभाईंच्या दोन बादशाह्या बुडवून महाप्रतापी शिवाजी महाराजांनीं नुकत्या स्थापलेल्या हिंदुपद बादशाहीचा ही समाचार घेऊन त्यांच्या पुत्राचा शिरच्छेद करून नातवास अटकेंत ठेऊन ' मुला तूं साव पण तुझा आजा चोर होता ' असें म्हणून विनोद करीत होता, परंतु तो सह्याद्रीच्या जंगलांतला वाघ दिल्लीस आपल्या तक्तापुढें किंचित काल उभा राहिला होता, तेव्हां कसा गरम झाला होता, आणि आपली गाळण कशी उडाली होती, तें त्याचें अंतर्याम स्मरत होतें, आणि ज्याला तो डोंगरांतला उंदीर म्हणत होता, त्याच्या दुसऱ्या बच्चासभोंता जो परिवार जमला तो भगवा झेंडा कसा थयथय नाचवीत होता, धनाजी मुसलमानांच्या घोड्यांनां सुद्धां कसा पाण्यांत दिसूं लागला, आणि खासा स्वारीनें जेमतेम अहमदनगर कसें गांठलें आणि मराठ्यांनीं लगट करून आपल्याला कैद केलें नाहीं ही अल्लानें मोठी खैर केली, म्हणून केवढे उपकार मानले तें मनांत आणून त्याणें पुढें दिल्लीला परत जाण्याचें नांव सोडून दिलें. एकवीस वर्षां पूर्वी त्याणें नगरास ज्या ठिकाणीं छावणी दिली होती, आणि दाक्षिण दिग्विजय करण्याचे जे एक एक बेत चालविले होते, ते कसकसे पार पडले आणि त्याच जागीं पुनः छावणीस येतांना किती प्रयास पडले, राज्य वाढत चाललें तों तों कसें बेबंद आणि बलहीन होऊं लागलें, घरच्या घरांत कलहाचें किती बीज पसरलेलें होतें, आणि मराठे कसे जोरावत चालले होते, या गोष्टींचा विचार करतांना त्याची छाती फुटून गेली आणि आतां मोगल बादशाही बुडते असें बिनचूक भविष्य करून वर्षभरानें त्याणें प्राण सोडला. नेथून मराठ्यांची भरभराट अधिकाधिक होत चालली. पंचवीस तीस वर्षां मुसलमानांच्या हृदयांत चिंताग्नीचा भडका उडवून देऊन खुद्द दिल्ली शहरें शींत गर्दी करून त्यांणीं बादशहास जें जें म्हटलें तें तें कबूल करावयास

लाविलें. असें त्यांच्या प्रतापदिनकराचें तेज पसरत चाललें असतां पानपतच्या घोर प्रसंगानें त्यास जबर ग्रहण लागलें. परंतु त्यांतून मुक्त झाल्या वर तो फार प्रखर झाला. गंगथडीचे घोडे पुनः गंगेस जाऊन न्हाले. मोगल बादशाही निस्तेज झाली. शिंदे, होळकरांचें प्रस्थ फार वाढलें. श्रीमंतांनीं हैदर नाइक्कास आणि निजामास चांगला हात दाखविला. शाक्कान्नभोजी शांतिरस्तु तुष्टिरस्तु करणारे ब्राह्मण पुष्ट होऊन मोठे कारस्थानी आणि रणधुरंधर झणून गाजले. परंतु असा स्वराज्यसुखाचा अनुभव फार काळ घडला नाहीं, तोंच चालू शतकारंभीं त्याची परिसमाप्ति झाली. यवनांनीं परदेशांतून येऊन हाणामार, लुटालूट जुलूम, जबरी करून तळतळविलें होतें, तें उसनें फेडून मराठ्यांनीं त्यांच्या हांतून जन्मभूमीस सोडवून स्वातंत्र्य दिल्याचें श्रेय संपादिलें; अल्पकाळांतच सारा देश हालवून सोडून दिल्लीचें तक्त डळमळविलें, बादशहास हवेंतसें मुठींत बागविलें; शंभर सवाशें वर्षें त्यांचा देशभर दरारा होता; साऱ्यांकडून ते खंडण्या घेत होते. हें सारें खरें, परंतु एकंदरींत पाहिलें तर त्यांच्या राज्यास स्थिरता आणि कायमपणा आला नव्हता. दिल्लीची मोगलबादशाही हें नांव जसें अन्वर्थक होतें तसें सातारची किंवा पुण्याची गादी हिंदुपदबादशाही हें अभिधान घेण्यास पात्र झाली नाहीं.

शिवाजी महाराज जन्मास येण्यापूर्वीच युरोपियन लोकांनीं व्यापाराकरितां इकडे येऊन ठिकठिकाणीं वखारी घातल्या होत्या, आणि कांहीं कालानें राजकारस्थानें ही आरंभिलीं. परंतु त्यांत शिरल्यापासून फ्रेंच आणि इंग्रज यांची चढाओढ आणि वैमनस्य फारच वाढलें. होतां होतां अखेर फ्रेंचांस कोठें थारा नाहींसा करून इंग्रज पुष्कळच प्रबळ झाले. अठराव्या शतकाच्या अखेर त्यांची सत्ता पुष्कळ मोठ्या मुलखावर चालूं लागली, आणि त्यांचें वजन जेथें तेथें फार पडूं लागलें खरें, परंतु एकोणिसाव्याच्या आरंभीं वसईचा तह होऊन बाजीराव त्यांच्या ओंजळीनें पाणी पिऊं लागला, शिंदे, होळकरांबरोबर घोर संग्राम झाले, आणि अखेर सन १८१७ मध्यें पेशवाई बुडून साऱ्या मराठेशाईचा धनी झणण्यास कोणी राहिला नाहीं, तेथून [illegible] सार्वभौमत्व येऊं लागलें म्हणावयाचें. तें ४० वर्षांनीं पुरें येऊन [illegible]ापण आपल्या सामंतचक्राशीं व प्रजेशीं कसे वागणार तें जाहिरनामा काढून तो सारा मुखुखभर वाचून दाखवून जगजा-

हीर केलें, आणि २० वर्षें पर्यंत निर्वेध राजकारभार चालून सारा देशभर अग्निरथानें संचार आणि विद्युद्वाहिन्यांनीं वार्ताहरण होऊं लागल्यानें हिमाचलाघरून राज्यसूत्रें हवीं तशीं चाळवितां येऊं लागलीं, कोठें जरा हूं कीं चूं होण्याची धास्ती उरली नाहीं, आणि झालें तर तत्काळ शासन होण्यास नड नाहीं, अशी मनाची खात्री झाली, तेव्हां महाराणी साहेबांस सार्वभौम राज्याभिषेक व्हावयाचा राहिला होता, तो उरकण्याचा त्यांच्या मुख्य प्रधानजीनीं निश्चय करून पार्लमेंटांत विल्ह काढून तें पास करून घेऊन आपला हेतु सिद्धीस नेला. मग त्यांच्या आज्ञेवरून इकडे मोगल बादशहांच्या प्राचीन राजधानींत समारंभ करण्याचें ठरून तमाम राजेरजवाड्यांस तेथें येण्याविषयीं आज्ञापत्रें गेलीं. पूर्वीच्या आपल्या तहनाम्यावरून पहातां आपलें स्नेह्याचें नातें व सन १८५७ च्या विकट प्रसंगीं आपण जें वर्तन केलें त्यावरून पाहिलें तर तो संबंध अधीक दृढ व्हावा, परंतु तो. सर्व विचार बाजूस ठेऊन इंग्रज सरकार आतां आपल्यास उघड उघड ताबेदार ठरवणार असें मनांत येऊन किती एकांस विषाद वाटला असेल परंतु आज्ञापत्रें शिरसा वंद्य करून नेमल्या ठिकाणीं नेमल्यावेळीं मुकाट्यांनीं सारे हजर झाले. मग महाराणी साहेबांचे प्रतिनिधीनीं मोठ्या थाटानें दरबार भरविला, आणि उच्चस्थानीं भव्य सिंहासनीं विराजमान होऊन श्रीमती–व्हिक्टोरिया–चक्रवर्तिनी-यशोवर्णन करून आज त्यांणीं कैसर-ई हिंद ही पदवी धारण केली; असें एकछत्री साम्राज्य या देशावर कधीं युगांतरीं झालें असेल तर नकळे परंतु उपलब्ध इतिहास पहातां हा योग प्रथम आतांच आला आहे असें दिसतें; आतां यांचा तुमचा सेव्यसेवक–संबंध झाला आहे, हा चिरकाल असाच चालो, आणि उभयतांस ही सुखप्रद होवो; असें ह्मणून किती एकांस लांबलचक किताब दिले आणि महाराज्ञीच्या नांवाचा जयघोष केला त्या बराबर १०१ तोफांची सरबत्ती उडाली. हा या इतिहासाचा चौथा भाग.

आतां येथपर्यंत जे हे चार भाग सांगितले त्यांतील राजांच्या राज्यरीतीची परस्पर तुलना करूं लागलें, आणि त्यांतील कोणतीपासून देशाचें किंतपत हिताहित झालें, सभ्यांची रीति उत्तम आहे कीं काय, इत्यादि गोष्टींचा-विचार करूं लागलें तर प्रथमतः विद्यमान राजेरजवाडे डोळ्यांपुढें उभे राहतात. उदेपूर, जोधपूर, जयपूरवाले इत्यादि प्राचीन, व निजाम

शिंदे, होळकर, गायकवाड इत्यादि अर्वाचीन राजांचीं घर काश्मीरापासून खालीं त्राव्हणकोरापर्यंत जीं लहान थोर संस्थानें व राज्यें देशभर पसरलीं होतीं, तीं स्थापन झालीं कशीं, त्यांतून बुडालीं किती व कशानें, आतां जीं उरलीं आहेत, त्यांची राज्यरीति कशी आहे, तींत फेरफार झाला पाहिजे कीं काय, ती निरंतर चालणें इंग्रज सरकारास व एकंदर देशास इष्ट कीं अनिष्ठ आहे, त्यांच्याशीं इंग्रज सरकारचें म्हणजे आधीं त्यांच्या दरबारीं काय काय चाललें आहे, हें बारीक नजरेनें पहात असणाऱ्या व "दोस्त सरकारचा सल्हा" म्हणून हुकूम फर्माविण्यास बसलेल्या रेसिडेंट, पोलिटिकल एजंट, इत्यादि नांवाच्या निकटसंबंधी अम्मलदारांचें, आणि मग कांहीं कमजास्त असल्यास त्यांच्या रिपोर्टावरून निकाल करणाऱ्या वरिष्ट अधिकाऱ्यांचें, वर्तन कसें असतें इत्यादि अनेक गोष्टी विद्वानांनीं फार मनन करण्यासारख्या आहेत.

आपला प्राचीन ग्रंथसमूह पर्वतप्राय आहे परंतु त्यांत इतिहासग्रंथ फार थोडे, त्यांचा बहुतेक अभाव असल्यानें मागील काळाची माहिती हवी तशी मिळत नाहीं. इसवी सनापूर्वी शिकंदर बादशहानें पंजाबांत प्रवेश केला त्यानंतर बारा तेराशें वर्षांनीं महंमद गिझनवी येईपर्यंत व त्यानंतर ही शें दोनशें वर्षें देशभर स्वराज्य चालत होतें. तेथून मुसलमानांचा अम्मल जारी चालूं लागून पांच सहाशें वर्षें त्यांच्या बादशाह्या गाजल्या. त्यानंतर पुनः हिंदु प्रबळ होऊन शंभर सवाशें वर्षांत त्यांणीं बहुतेक देश त्यांच्या हातून सोडविला. परंतु उभयतांची राज्य चालविण्याची तऱ्हा पाहिली तर अगदीं एक, त्यामुळें पुढें परीणाम ही सारखेच घडलेले दिसतात. सन १२०६ मध्यें कुतुबादिनानें दिल्लींत गादी स्थापिली तेव्हांपासून चालू एकूणिसाव्या शतकांत ती बुडेपर्यंत सहाशें वर्षांचा इतिहास, दक्षिणेंत दौलताबादेस ब्राह्मणीवंशाचें राज्य चाललें होतें त्याचा इतिहास आणि तें मोडून त्याचीं विजापूर गोवळकोंडें वगैरे पांच राज्यें झालीं त्यांचा इतिहास पाहिला तर असें दिसतें कीं तीं केवळ तलवारीच्या जोरावर चालत होतीं आणि ती तलवार तरी आपली आपण गाजवणारा जो बादशहा असे तो गादीवर टिके आणि जो नसे तो तिला मुके; त्यामुळेंच एका घराण्यांत गादी कायम राहिली नाहीं. औरंगजेबाच्या मरणानंतर तर ही गोष्ट चांगलीच प्रत्ययास आली. दुसरें (Politics, Political science.) असें ज्यास म्हणतात

याचा उदय युरोपांत झाला आणि आजपर्यंत त्यांत झपाट्यानें अभ्यास चालला आहे त्या म्हणजे राज्यनीति किंवा राज्यशासनकला याचा, राजा आणि प्रजा यांतून एकाचे ही मनांत कधीं विचार आला नाहीं, त्या मुळें अंतीं उभयतांचें ही नुकसान झालें. मुसलमानांचें इकेडे पाऊल पडण्यापूर्वी अनेक हिंदु-राज्यें होतीं तीं आणि अल्पकालांत येवढीं थोरली चढलेली हिंदुपद बादशाही अकस्मात बुडण्याचीं कारणें शोधूं लागले तर मूळ हेंच असावेंसें दिसतें राजा म्हणजे ईश्वरांश अशी हिंदुंची भावना, त्यामुळें तो किती ही जुलमी असला तरी त्याच्यावर शस्त्र धरण्यास ते सहसा प्रवृत्त होत नाहींत. पावसानें भिजवलें आणि राजानें मारलें तर त्याला काय उपाय असें म्हणूनच ते स्वस्थ बसतात; त्याला आपला मायबाप म्हणतात आणि तो जर खराच आपल्या मुलांप्रमाणें त्यांचें संरक्षण करणारा, कृपालु असला तर त्याला ईश्वराचा अवतार मानतात. त्यामुळें राजसत्तेशिवाय दुसरा कोणताही राज्यशासनप्रकार त्यांनां माहीत नाहीं. राजा म्हणजे प्रजेचा चाकर, त्याणें त्यांच्या विचारानें राज्य चालवावें, त्यांनां हवे असतील तसले कायदे करावे, त्यांज कडून करभार खूषीनें जें द्रव्य घ्यावयाचें तें ते खुषीनें देतील तेवढेंच घ्यावें आणि कसें खरचलें त्याचा हिशेब द्यावा, असल्या कल्पना त्यांच्या स्वप्नांत ही कधीं आल्या नाहींत. हिंदुस्थान हें साऱ्या देशाचें नांव खरें, सारें राष्ट्र हिंदु खरें, परंतु देशीं फार अफाट आणि लोक भिन्न भिन्न भाषा बोलणारे, व त्यांचे आचार ही भिन्न, त्यामुळें एका भागाचा दुसऱ्याशीं संबंध नसल्या सारखें असे आणि जागोजाग निरनिराळे राजे उत्पन्न होत. त्यांत आपण सर्वांत श्रेष्ठ असावें ही इच्छा आणि राज्यलोभ मनुष्यास साहजिकच असल्यामुळें त्यांचीं आपसांत युद्धें चालत; त्यांत ज्याचें बुद्धिबल आणि पराक्रम विशेष वरचढ होई तो बाकीच्यांस जिंकून करभार घेई आणि त्यांस आपले मांडलिक ठरवून आपण सार्वभौम किंवा छत्रपति बने, परंतु त्यांचा समुळ उच्छेद करीत नसे, त्यामुळें कांहीं काळ तसा किंचित पराधीनतेंत गेला तरी ते पुनः संधी साधून स्वतंत्र होत; तसे न झाले तरी खंडणी तेवढी दिली म्हणजे झालें, आपल्या मुलखांत ते पूर्ण अधिकारीच असत. दुसरें, हे सार्वभौम, छत्रपति, किंवा प्रबळ राजे, आपल्या पदरीं जें सैन्य बाळगीत त्यास व त्यावर नेमलेल्या सरदारांस महिनेमहा रोजमुरा कधींच मोजीत नसत; खर्चाच्या मानानें तिनक्या उत्पन्नाचा मुलुख नेमून देत व त्यांत पाहिजे

सा अम्मल चालविण्यास ते मुक्त्यार असत. ते सरदार ही त्याच प्रमाणें करीत. प्रत्येक शिपायास कुटुंबाच्या निर्वाहाकरितां जमीन नेमून देत आ- णि त्याजकडून चाकरी घेत. हिंदुस्थानांत मुसलमान आले ते परके, परंतु त्यांची तऱ्हा हीच होती. त्यांणीं हिंदूराजांस पादाक्रांत केलें, त्यांजकडून खं- डण्या घेतल्या, त्यांस चाकरी करावयास लाविलें, परंतु त्यांचीं राज्यें अजी- बाद बुडविलीं अशीं थोडीं. इतकेंच नव्हे, त्यांणी पुष्कळ हिंदु सरदारांस नवीन जहागिरी करून दिल्या, राव, राजे, असे किताब देऊन योग्यतेस चढविलें. बादशाही सैन्यांत पांच पांच सात सात हजार स्वारांचे मनसब- दार हिंदु होते; स्वतंत्र मोहिमांवर त्यांच्या नेमणूका होत असत. माळवा, गु जराथ, दक्षिण, अशा मोठमोठ्या सुभ्यांवर त्यांच्या योजना होत; बादशहा मोठमोठ्या कामांत त्यांच्या सल्लामसलती घेत, त्यांस आपली वकिली करा वयास पाठवीत, विश्वासाचीं कामें सांगत; कारकुनीपासून वजिरीपर्यंत रा- जकारभारांतली अमूक जागा त्यांस मिळणार नाहीं असें नव्हतें. त्यामुळें बिरबल, तोडरमल्ल, शहाजी, मादण्णा, पूर्णय्या, हीं हिंदु नावें मुसलमानां च्या इतिहासांत अजरामर होऊन झळकत राहिलीं आहेत. अशी अंत:स्थि- ति असल्यामुळें जरी देशभर मुसलमानी अम्मल पसरला होता तरी हिंदूचा बुद्धिप्रभाव समूळ नष्ट झाला नाहीं. त्यांस आपलीं राज्यें, जाहागिरी, संस्था- नें राखतां आलीं आणि नवीन स्थापतां ही आलीं. मुसलमान या देशांत आले ते कायम होऊन राहिले, हिंदूंशीं अनेक व्यवहारांत मिसळूं लागले आणि त्यांच्या धर्माचा तर अतिशय छळ करूं लागले, त्यामुळें वैर फार वा ढत चाललें. अशा समयीं शिवाजी महाराजांचा उदय होऊन त्यांणीं स्वरा- ज्य स्थापण्याचा निश्चय केला आणि घोंगड्ये, लंगोट्ये, दऱ्या खोऱ्यांत हिंडु- णारे, मावळे हेटकरी जमवून त्यांच्या आंगांत वारें भरलें तें पाहून साऱ्या म हाराष्ट्रांत वीरश्री संचरली. स्वाहा स्वधादिक षट् कर्मे करीत वसणारे सत्व वृत्ति ब्राह्मण दर्भमुष्टि फेंकून देऊन भाला बर्ची घेऊन उठले. असें सारें मराठेमंडळ स्फुरण पाऊन हरहर महादेव म्हणत यवनांचा संहार करीत सु- टलें तेव्हां मग तर जाहागिरी आणि संस्थानें स्थापण्याचा झपाटा चालला. जो मुलुख आपल्या अमलांत नाहीं, मुसलमानांकडून जिंकून घ्यावयाचा, त्या ची छत्रपतींनीं सनद करून द्यावी, ती घेणारानें ढाल तलवार वांधून नि- घावें, [illegible] साथेल तितका मुलूख घ्यावा, त्यांत टाणें घालावें आणि जय

जयकार करावा, असा ही प्रकार झाला. हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांची उत्पत्ति पाहिला तर [illegible] प्रकारची आहे.

इंग्रज [illegible] शतकांत राज्य संपादूं लागले ते वाढतां वाढतां टिपू-वरची लढाई संपली तेव्हां पुष्कळच प्रबळ झाले. मग त्यांच्याशीं युद्ध करण्यास समर्थ मराठ्यांवांचून कोणी उरले नाहीं. परंतु नाना फडणीस पेशवाईच्या [illegible] लून एकवट करणारा कोणी उरला नाहीं. उलटें असें झालें कीं बाजीरावानें साऱ्या मोठमोठ्यां सरदारांशीं द्वेष मांडला त्या मुळें फुटाफूट फार जलद होऊन खुद्द याला पुण्यांतून पळावें लागलें; आणि तो जाऊन इंग्रजांच्या आर्जवास लागल्यानें त्यांचा हेतु अनायासें सिद्धीस गेला. त्यांचीं पलटणें त्याच्या पैशावर निर्वाह करून खुद्द पुण्यांत गोळी बार भरून तयार राहूं लागलीं. शिंदे, होळकर, भोसले, दुसमान ठरून त्यांच्याशीं लढाई सुरू झाली, आणि कांहीं काल असा धुमाकूळ उडाला कीं न भूतो न भविष्यति. अखेर परिणाम इसापनीतींतल्या चार बैलांच्या आणि सिंहाच्या गोष्टी प्रमाणें होऊन पाटिलबावांच्या आणि फडणिसांच्या कारकीर्दींतील स्थिति स्वप्नप्राय भासूं लागली. हिंदुपद बादशहा एका किल्ल्यांत अटकेंत, त्यांजकडून प्रधानपदाचीं वस्त्रें घेणारे साऱ्या मराठेशाईचे यजमान ह्मणविणारे प्रधान पुरुष आणि तिचे चार आधार स्तंभ यांचा अर्थाअर्थीं संबंध नसल्या सारखा झाला. इंग्रजांनीं साऱ्या हिंदुस्थानातींल एकंदर लहान थोर राजेरजवाड्यांशीं जितके तहनामे, करारमद [illegible], तितक्यांत मुख्य कलमें दोन : एक त्यांणीं एकमेकांशीं कांहीं संबंध ठेऊं नये, आपल्या मार्फत काय तें बोलावें आणि दुसरें कोणा युरोपियनास अगर अमेरिकनास चाकरीस ठेऊं नये. तीं कबूल करून ते जागच्या जागीं बसले, तीच मराठेशाईची परिसमाप्ति. आमच्या चतुर्विध उपायां पैकीं तिसरा भेद, तो इंग्रजांच्या हिंदुस्थानांतल्या राज्यनीतिशास्त्राचें आद्यसूत्र, Divide and Rule, तें लागू करावयास संधी सांपडतांच त्यांणीं मराठी राज्याची इमारत हां हां ह्मणतां ढांसळून पाडली. बाजीराव स्वपरबळाबळ न पहातां मूर्खपणानें लढाई आरंभून सर्वस्वास मुकले, आणि नेमणूक घेऊन गंगातीरीं दिनपर्ण करीत गेले. इकडे त्यांचे तावेदार ह्मणविणारे होते तितके सारे इंग्रजांचे मांडलिक बनले.

टिपूवरावरची लढाई संपून म्हैसूर हातीं आलें, तेव्हां तेथच्या पहिल्या राजाच्या मुलास गादीवर बसवून इंग्रजांनीं त्यास मांडलिक करून ठेविलें ; निजामाच्या दरबारांत प्रवेश करून प्रथम त्याजकडून कांहीं महाल मक्त्यानें घेतले, आणि मग त्याचे सावकार बनून, आपलीं पलटणें त्याच्या चाकरीस ठेऊन देऊन, त्याणें फ्रेंच अम्मलदार ठेऊन तयार केलेलीं पलटणें मोडून टाकून, त्यांनां हांकून लाऊन, पलटणाच्या खर्चा करितां म्हणून त्याजकडून पुष्कळ मुलुख घेऊन, त्याला अगदीं बलहीन करून मुठींत आणून ठेविलें; दक्षिणेकडे त्राव्हणकोर कोचीन वगैरे राजांच्या चाकरीस पलटणें ठेऊन त्यांजकडून मुलुख घेऊन त्यांस आपल्या जिवावर खुशाल रहावयास सांगितलें ; छत्रपतीस पेशव्याच्या हातून सोडवून आणून गादी दिली ; कोल्हापूरकर महाराज, वाडीकर सरदेसाई वगैरे लहानसान असामी केव्हां गडबड करीत त्यांचा बंदोबस्त करून हात जोडावयास लाविलें या प्रमाणें साऱ्यांचा बंदोबस्त होऊन मांडलिक राजमंडळ पुष्कळ वाढलें, राज्याचा विस्तार मोठा झाला, तेव्हां आतां येवढ्याचा नीट बंदोबस्त राखून स्वस्थ रहावें, आणखी आणखी वाढवूं नये, असें गव्हरनर जनरलाचे मनांत आलें; म्हणून राजपुतान्यांतील राजे आम्हाला कृपा करून आपल्या छायेस घ्या, अशी विनवणी करीत होते, तरी त्यांणीं ती मान्य केली नाहीं. तशीं कांहीं वर्षें गेलीं, त्यांत त्यांचे आपसांतले कलह विलक्षण माजून लढाया होऊन ते अगदीं निस्त्राण होऊन धुळीस मिळाले. पुढें दुसरे गव्हरनर जनरल आले, त्यांनां आपल्या सरहद्दीवर असे अनर्थ चालूं देणें बरें वाटलें नाहीं, म्हणून त्यांणीं जे सरकारचा आश्रय मागतील त्यांस नाहीं म्हणावयाचे नाहीं, असें ठरवून भराभर तहनामे करण्यास सुरवात केली ; त्या बराबर अल्पकाळांत सारा राजपुताना मांडलिक झाला. त्याच प्रमाणें काठेवाडांतील व सतलज नदीच्या उभयतीरचे राजेरजवाडे इंग्रजांचा आश्रय जोडून मांडलिक झाले. या प्रमाणें पेशवाई बुडाल्यापासून थोड्याच वर्षांत साऱ्या हिंदुस्थानभर कंपनी सरकारचें साम्राज्य होऊन निजाम, शिंदे, होळकरापासून तों यःकश्चित जाहागीरदारापर्यंत झाडून सारे मांडलिक होऊन बसले. येवढें थोरलें सामंतचक्र अगदीं हुकमांत बागवणें म्हणजें मोठें कठीण काम होतें खरें, परंतु जागोजाग रेसिडेंट व पोलिटिकल एजंट नेमून आणि Divide and rule हें सूत्र सारखें लागूं ठेऊन कोणी जाहागीरदार माऊ

बंद भांडूं लागून वांटणी पाहिजे ह्मणूं लागले तर ती देवघून त्यांनां तिनके सहज हलके करून ठेऊन इंग्रजांनीं मोठ्या दक्षतेनें सर्वांचा बंदोबस्त करून त्यांस जागच्या जागीं खिळून टाकलें होतें.

या प्रमाणें साऱ्या हिंदुस्थानांत इंग्रजांचें साम्राज्य झालें, परंतु त्यांस कांहीं चैन पडेना. जे राजे थोड्या वर्षांपूर्वी आपल्या बरावर मोठमोठ्या लढाया मारण्यास उभे राहिले, त्यांस जिंकून आमच्या हुकमाबांचून त्यांणीं इकडे तिकडे हालूं नये, असें आम्ही करून टाकलें आहे, कोणाच्या चाकरीस आपलीं पलटणें ठेऊन त्यांस दोस्त ह्मणून त्यांच्या राज्यांचें संरक्षण करण्याचा पत्कर घेतला आहे, मिळून कोणाला हातांत शस्त्र धरण्याचें कारणच ठेविलें नाहीं, आणि त्यांच्यावर सारखा पाहारा करतों आहों खरा, परंतु हे इतके पिंजऱ्यांत कोंडलेल्या सिंहव्याघ्रासारखे आहेत ; गत वैभवाचें, बाप आजांच्या पराक्रमाचें आणि आपल्या पराधीनतेचें स्मरण होऊन हे केव्हांना केव्हां चवताळल्या शिवाय रहाणार नाहींत,- आणि सर्व काळ तो एकच ध्यास लागला तर न जाणो, सर्वच समदुःखी ह्मणून हर प्रयत्नानें मोठ्या सावधगिरीनें, गुप्तपणें एकमेकांशीं संधान बांधून एकदम दहा पांच विथरून उठले तर आपल्याला जड जाईल, असें वाटून त्यांनां काळजी पडली असावी ; किंवा विशेष लोभ उत्पन्न होऊन राज्य आणखी वाढविण्याची इच्छा झाली असावी. काय झालें असेल तें असो. परंतु आतां कोणी जिंकावयाचा राहिला नाहीं, आणि जिंकलेल्यांशीं जे तहनामे झालेले होते त्याप्रमाणें तें वर्तत असे तोंपर्यंत कोणावर न्यायानें हात टाकण्यास सवड राहिली नाहीं, ह्मणून कांहीं तरी निमित्त उकरून काढून एक एक राज्य, संस्थान, जाहागीर, साधेल तसतसें त्यांणीं कमी करण्याचें मनांत आणलें असावें. परंतु हें काम कांहीं सामान्य नव्हतें. तें अंगावर घेण्यास तसाच बुद्धिमान, कल्पक आणि धीराचा पुरुष पाहिजे होता, तो लार्ड डलहौसी नामक लौकरच मिळाला. त्याची गव्हरनर जनरलाचे जागेवर नेमणूक होऊन काम पाहूं लागतांच त्याणें एक एक राज्य सबंदच्या सबंद विन लढाईनें घेण्यास सुरवात केली. त्याला निमित्त कोणा राजाला राज्य नीट करतां येत नाहीं, त्याची प्रजा सुखी नाहीं, ती आपल्या अमलाखालीं आली असतां संतुष्ट होईल असें लाविलें ; आणि कोणाला औरस संतति नसली तर तो मरतांच त्याच्या घराण्याचा सर्व हक्क संपला, मग वलिष्ट इंग्रज स-

रकारच्च मालक असें टरविलें. या प्रमाणें पंजाब, अयोध्या, नागपूर, सातारा. हीं मोठमोठीं राज्यें, कितीएक जाहागिरी व संस्थानें त्याच्या कारकीर्दीत भराभर खालसा झालीं आणि राजमंडळ पातळ होत चाललें. तोच क्रम पुढें चालू रहाता तर हळु हळु आणखी पुष्कळ बुडालीं असतीं. परंतु तो सुरू झाल्यापासून हिंदु, मुसलमान सारेच खवळले. हिंदु धर्मांत औरस संततीच्या अभावीं दत्तक घेण्यास धर्मशास्त्रानें सांगितलें आहे. पुत्रावांचून परलोकगति नाहीं; मृताचें और्ध्वदेहिक कृत्य करण्यास मुख्य अधिकारी पुत्र, तो औरस नसेल तर दत्तक घेऊन अधिकारी करून ठेवावा; तसा न घेतांच कोणी पुरुष मेला तरी पश्चात त्याच्या स्त्रीस घेण्यास तसाच अधिकार न तो तिनें त्याच्या साठींच घ्यावयाचा ; असा दत्तक घेतलेला औरस पुत्राप्रमाणें सर्व प्रकारें पूर्ण अधिकारी होतो, व आपली वंशपरंपरा चालणें अत्यंत अवश्य, असा साऱ्या हिंदूंचा समज आणि या प्रमाणें फार प्राचीन काळापासून त्यांच्यांत वहिवाट चालत आलेली, असें असतां डलहौसीच्या एका टांकानें तें सर्व धर्मशास्त्र लोपलें, व प्राचीन वहिवाट खाडकार रद्द ठरली, आणि मोठमोठीं राजकुलें बुडालीं. मृताच्या बायका. भाईबंद, मानकरी, आश्रित, नोकर, एकाएकीं अनाथ होऊन बसले. त्याच्या लाखों रूपयांच्या मालमत्तेचा लेलावानें विकरी होऊन पैसा इंग्रजांच्या तिजोरीस चालला, व आज जी एकाची दशा तीच उद्यां दुसऱ्याची होणार असें स्पष्ठ दिसूं लागलें, तेव्हां हिंदुमात्रास मोठी दहशत उत्पन्न झाली ; मुसलमानांची ही तीच अवस्था झाली, आणि सारा देश क्षुब्ध झाला. अशा समयीं काडतूसप्रकरणावरून इंग्रजांचीं पलटणें बिथरलीं आणि मग जो प्रलय झाला तो जगद्विश्रुतच आहे. त्या सन १८५७ इसवीच्या घोर प्रसंगीं अग्वेर थावराथावर करण्यास Clemency Canning कृपामूर्ति क्यानिंग साहेब डलहौसीच्या जागेवर होते, म्हणून बरें झालें नाहीं तर आणखीं किती अनर्थ झाला असतां त्याचा अदमास करतां येत नाहीं. त्या थोर पुरुषानें नीट विचार करून तो खवळेलला जनसमूह शांत करण्याचा योग्य उपाय जाणला, आणि विलायत सरकारास त्या प्रमाणें सांगून इतउत्तर औरस संतति नाहीं, म्हणून कोणाची दौलत किंवा सरंजाम खालसा करावयाचा नाहीं असें ठरविलें, आणि त्या प्रमाणें महाराणी सरकारचा जाहिरनामा प्रसिद्ध करून शिल्लक राहिलेल्या राजे रजवाड्यांस आश्वासन दिलें, आणि

यांचा दत्तक घेण्याचा हक्क मान्य करून तो चालविण्याच्या अधिकाराबद्दल सनदा करून दिल्या.

या प्रमाणें हिंदुस्थानांतील प्राचीन व अर्वाचीन एकंदर राजकुलांचें स्थित्यंतर होत होत सन १८५८ च्या जाहिरनाम्यावरून ज्यांस शाश्वती आली, आणि सन १८७७ च्या दिल्लीदरबारच्या तारखेपासून मांडलिक पणा अगदीं पुरा आला, त्यांचा हा पंचवीस तीस वर्षांचा इतिहास मागच्या पेक्षां अगदीं निराळा आहे. औरस संततीच्या अभावामुळें दत्तक घेण्याचा कोणास प्रसंग आला तर सनदेप्रमाणें विन हरकत घेतां येतो, आणि त्या जकडे दौलत चालते अशीं कांहीं उदाहरणें दिसून सर्वांची खात्री झाली, तेव्हां सरकाराबद्दल कोणाच्या मनांत बेभरंवसा राहिला नाहीं, आणि कोणाच्या दौलतीचा अपहार करण्याची अभिलाषबुद्धि धरण्यास सरकारास पूर्वीची सवड राहिली नाहीं, तेव्हां आतां जेणेकरून त्यांच्या मुलखांत आबादानी होऊन लोक संतुष्ट राहतील अशा प्रकारें राज्य चालविण्यास त्यांस सल्ला मसलत द्यावी, असें विशेष वाटूं लागलें. मग अर्थातच सुधारणा पुष्कळ होऊं लागली. देशांत जिकडे तिकडे शांतता होऊन पाश्चिमात्य विद्येचा प्रसार होऊं लागला आणि रस्ते, कालवे, आगगाड्या, तारायंत्र, यांचा विस्तार होऊन व्यापारास तेजी येऊं लागली, तसतसें खालसा अमलांतील मुलखांत आणि मांडलिक राजांच्या अमलांतील मुलखांत अंतर अधिकाधिक दिसूं लागलें. राज्यकारभार नीट चालवितां येण्यास राजास आपलें कर्तव्य काय तें आधीं कळलें पाहिजे ; तें कळण्यास उपाय विद्याध्ययन. तें करण्याचा काळ बाळपण ; म्हणून तरुण राजपुत्रांकडून विद्या संपादन करविण्याकडे सरकार चांगलें लक्ष देऊं लागलें. त्याचें फळ भावनगर, बडोदें, त्राव्हणकोर, म्हैसूर, ह्या राज्यांत आजमितीस चांगलेंच दिसूं लागलें आहे, आणि उत्तरोत्तर दुसऱ्यांत ही दिसूं लागेल, असा संभव आहे.

इतिहास लटला म्हणजे तो सप्रमाण व अत्यंत निःपक्षपातानें लिहिला पाहिजे. तसा लिहिणें हें काम किती विद्वत्तेचें, श्रमाचें, कालाचें, आणि खर्चाचें आहे, त्यास साधनें कशीं पाहिजेत, सहाय केवढें पाहिजे, आणि इतकें ही सर्व अनुकूल होऊन पुस्तक तयार झालें, तरी अखेर त्याची चीज होण्यास तो वाचण्याची लोकांस हौस केवढी पाहिजे हें कांहीं सांगुन

पुरवणार नाहीं. याजकारितां तिच्या अभावीं स्थिति काय होईल याचें अनुमान करण्यास मराठ्यांचा उत्कृष्ट इतिहास लिहिणारा विचारा ग्र्याँट डफ् साहेब जिवापाड श्रम करून अखेर सत्रा अठरा हजार रुपयांस बुडाला हें ध्यानांत आणावें, म्हणजे पुरे आहे इतकें सांगतों एतद्देशीय राज्यें, संस्थानें, जाहागिरीं, जीं विद्यमान आहेत त्यांचा सांगत इतिहास लिहावयाचा म्हटलें तर ग्र्याँट डफ्च्या कितीपट काम होईल त्याचें अनुमान बडोद्यांच्या मल्हारराव गायकवाडाच्या येवढ्याशा कारकीर्दीचा खरा इतिहास हें पुस्तक हातीं घेतलें म्हणजे त्यावरून करतां येईल. त्यांत खालसा दौलतींच्या इतिहासाची भर घालावयाची म्हटलें तर आणखी तितका, किंबहुना त्याहून अधिक विस्तार होईल. हें काम मोठें दिसतें खरें, परंतु योग्य वाटेनें गेलें तर अशक्य नाहीं. आमच्यांतल्या विद्वान मंडळीस तशी आस्था उत्पन्न होऊन ते हातीं घेतील तर सर्व कांहीं पार पडणार आहे. इंग्रज लोकांस विद्येची अभिरुची फार म्हणून तें जीं कामें करतात तीं उत्तम होतात ; त्या प्रमाणें आमच्या हातून न होऊत, परंतु त्यांणीं दाखविलेल्या मार्गानें तरी आपण गेलें पाहिजे. साऱ्या हिंदुस्थान देशाचा किंवा त्यांतील कोणत्याही एकाद्या लहानशा संस्थानाचा इतिहास त्यांणीं किती ही निःपक्षपातानें लिहिला तरी तो एकतर्फी, अपुराच होणार व त्यावद्दल त्यांजवर दोष ठेवतां येणार नाहीं. कारण आमच्या घरची माहिती आम्हांस मिळण्याचा जसा संभव तसा त्यांस मिळण्याचा नाहीं ; याजकरितां हें काम आमचें आम्हीच केलें पाहिजे. तें आम्हीं करूं लागलों तर कोणत्या प्रकारें होईल याचे कांहीं मासले सांगतों. सन १८५७ च्या बंडाचा इतिहास के साहेबानें लिहिला आहे, तो उत्तम अशी प्रशंसा आहे. परंतु हाच जर कोणी के सारखा उद्योगी विद्वान हिंदु लिहील तर अगदीं निराळा होईल. यास प्रमाणें—— नाना साहेब पेशव्याचें नांव त्या इतिहासानें अजरामर करून टाकलें आहे. इंग्रज लोकांत त्याच्या अत्यंत क्रूरत्वाबद्दल इतका कांहीं तिटकारा आहे, कीं तसा क्रूर साऱ्या जगांत दुसरा कोणी झालाच नसेल असें त्यांस वाटतें. त्यांणीं त्याचें नांव The inhuman Nana (क्रूरकर्मा नाना) असें ठेविलें आहे. त्याच्या अंगीं वीरश्री संचरली आणि आपल्या सारखे अनेक नाना उत्पन्न करून त्यांणें इंग्रजांस असें घायरें करून सोडलें, कीं तो त्यांनां स्वप्नांत दिसत होता, आणि केव्हां कोठें अकस्मात येऊन

न उभा राहील याचा नियम नाहीं, असें वाटत होतें. नानाच्या नांवावर त्यांणीं कितीं एक असामी धरून तोफेच्या तोंडीं दिले, फांसावर चढवले, तरी खरा नाना आपणास सांपडला किंवा नाहीं, हा त्यांचा भ्रम कांहीं गेला नाहीं, असें आमचे लोक म्हणतात. सन १८७४ मध्यें शिंद्यांनीं एक मनुष्य धरून तो नाना अशा संज्ञेनें त्यास सरकारच्या स्वाधीन केलें, त्या बराबर त्याची चौकशी सुरू झालीच. त्याचे फोटो येथपर्यंत आले, कोल्हापूरच्या पोलिटिकल एजंटामार्फत ते त्याच्या मेहुण्यास दाखवून ओळख पटते कीं काय याचा निर्णय झाला. अखेर शिंद्यांनीं त्यास नानाच ह्मणून फांशीं दिलें. परंतु नानाची एक बहीण अद्याप हयात आहे. नाना ब्रम्हवर्तांहून निघाल्यापासून अखेर पर्यंत ती त्याच्या बराबर होती. तिच्या तोंडून थोडक्या महिन्यांपूर्वी जी हकीकत ऐकावयास मिळाली ती वरून त्याच्या अंगी क्रूरत्व, शूरत्व, धीरत्व, किती होतें, आणि त्याणें खरें काय काय केलें व त्याचें देहावसान कोठें कसें झालें तें आम्हांस कळलें, व त्यावरून शत्रूंच्या निंदेंत आणि मित्रांच्या स्तुतींत ग्राह्यांश किती याचें अनुमान काढतां येतें. तसेंच त्याच कालचें दुसरें उदाहरण झांशीच्या राणीचें. ह्या बाईची सर ह्यु रोज साहेबानें स्तुति केलेली अगदीं यथार्थ आहे. परंतु झांशींत बंडाच्या आरंभापासून अखेरपर्यंत खरा काय काय प्रकार झाला, तो प्रसिद्ध असलेल्या इतिहास पुस्तकांत कोठें लिहिलेला नाहीं. त्या बाई जवळ एक आश्रित भिक्षुक होता, त्याणें पाहिलेल्या सर्व गोष्टी एका गृहस्थास ऐकावयास मिळाल्या, तेव्हां त्यांची इतिहासदृष्ट्या योग्यता जाणून त्याणें त्याजकडून त्या यथास्थित लिहविल्या आहेत. हे गृहस्थ चांगल्या विद्वानां पैकीं, संपन्न, सत्याभिमानी, सुधारणाप्रिय व देशाभिमानी आहेत ; त्यांच्या मनांत त्या गोष्टी झांकून ठेवाव्या असें नाहीं, परंतु त्यांचें आमचें जें बोलणें झालें त्यावरून त्या पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध होतील असें तूर्त तरी दिसत नाहीं, मग पुढें कधीं योग येईल तो येवो.

मराठे मंडळांत ब्राह्मण सरदारांत पेशव्यांच्या विस्तृत राज्यांतील दक्षिणदिक्पाल पटवर्धन यांचें कुल मोठें व त्यांतील पुरुषांनीं पराक्रम ही बहुत केले. हैदरनायका बराबरच्या युद्धांत त्यांतले कितीएक कामास आले. पुढें टिपूबराबर इंग्रजांनीं युद्ध केलें तेव्हां पेशव्यांकडून त्यांस जी मदत झाली तींत परशुराम भाऊकडे जें काम नेमलें होतें ते त्यांणीं. इतकें उ

त्तम केलें कीं त्यावद्दल त्यांची सर्वतोमुखी वाहवा झाली आणि गव्हरन्नर जनरलांनीं त्यांचे उपकार फेडण्याकरितां त्यांस पंचवीस लक्षांची जाहागीर व रहाण्यास कर्नाटकांत ते मागतील तो किल्ला देण्याचें ठरवून त्याप्रमाणें पत्र लिहिलें. परंतु त्या प्रमाणें अमलांत आलें नाहीं. त्या बद्दल उल्लेख ग्र्याँटड फ साहेबानें कोठें केलेला नाहीं. पटवर्धनांचा इतिहास, भाऊंचें चरित्र वगैरे ग्रंथात ही ही गोष्ट कोठें आलेली नाहीं. परंतु ही अगदीं खरी आहे. त्या पत्राची नक्कल हाल्लीं पटवर्धनांपाशीं आहे. ती असलेली माहीत नव्हतें ; कांहीं वर्षां खालीं मागील कागदपत्र पहातां पहातां त्यांत सांपडली. पुढें त पासांत असें कळलें कीं अस्सल पत्र तासगांवकरांकडून सरकारानें परत घेत लें. कां तें मात्र कळत नाहीं. बाजीराव साहेबाची पटवर्धनांवर अतिशय वक्र दृष्टि होती. त्यांच्या जाहागिरी काढून घ्याव्या अशी त्याची इच्छा होती, परंतु तें करण्याची छाती नव्हती, ह्मणून तो त्यांस अनेक प्रकारांनीं त्रास देऊं लागला तेव्हां इंग्रज मध्यें पडले आणि पंढरपूर मुक्कामीं एल्फिन्स्टन सा हेबांमार्फत उभयतांचे दरम्यान तहनामा होऊन त्यांस धक्का लागूं नये असें झालें, तरी ते आपला सेवकधर्म विसरले नाहींत. ह्या कुलांतील पुरुषांच्या आणि बायकांच्या ही अंगांत स्वामिनिष्ठा , कुलाभिमान आणि कीर्तिप्रीति सदा जागृत असे. परशुराम भाऊंचा पुतण्या पालखी मागूं लागला, तेव्हां त्यांणीं त्याला सांगितलें पराक्रम करून दाखव ह्मणजे श्रीमंत देतील तेव्हां वैस. भास्कर हरीला सरदारी नव्हती ह्मणून त्याच्या मुलांस वाईट वाटे आणि ते कशाही संकटांत उडी घालण्यास मागें पुढें पहात नसत. हैदरनायकाबराबर मोती तलवावर लढाई झाली तींत पुष्कळ खासे पडले. पार्वतीबाई घोड्यावर बसणारी पटाईत, तिला आपला मुलगा (विद्यमान गणपतराव हरिहर कुरुंदवाडकर) मेण्यांत बसलेलें आवडत नसे, ती त्याला बोलून लाजवून घोड्यावर बसवी. पेशवाई बुडाल्या नंतर पटवर्धनींतला कोणी नोकर बाहेर दुसऱ्याच्या दारीं जाऊं नये अशी आपासाहेबांची इच्छा होती आणि संस्थानांत पैशाची फार तूट असे तरी 'गणपतीच्या येथें कमी काय' असें ह्मणून जो येई त्यास ते सांगलीस ठेऊन घेत. संस्थानच्या कागदोपत्रीं पटवर्धन निसबत श्रीमंत पंत प्रधान असें लिहिण्याची वहिवाट असे तें इंग्रजांस पुरवेना ; आतां तुम्ही आमचे नोकर सबब पेशव्यांचें नांव लावतां नाहीं कामां अशा मुसत्या सांगण्यानें ते ऐकतना तेव्हां सरकारानें सक्तीनें तीं

अक्षरें त्यांजकडून गाळविलीं. बाजीरावसाहेब पुणें सोडून पळत सुटले तेव्हां पटवर्धन त्यांजबराबर होते. परंतु आतां यांजबराबर रहाणें व्यर्थ आहे असें उघड दिसूं लागलें तेव्हां एक एक सरदार मागें फिरूं लागला तसे केशवराव बाबा कुरुंदवाडकर घरीं आले. त्यावेळीं त्यांचे वृद्ध वडील आपासाहेब घरीं होते त्यांस अतिशय वाईट वाटलें ; त्यांणीं चिरंजीवांस गांवांत येऊं दिलें नाहीं, बाहेर उतरावयास सांगितलें आणि असा निरोप पाठविला कीं अशा प्रसंगीं धन्याला सोडून येणाराचें आम्हाला दर्शन नको ; आल्या पावलीं माघारे जा. बाबासाहेब पहाटेसच कूच करून चालते झाले. त्यांच्या मातुश्रीस व कुटुंबास ही त्यांची भेट घेण्यास वृद्धांची परवानगी मिळाली नाहीं. पुढें महिन्यानें आपासाहेबें निवर्तले. पुण्याचा बंदोबस्त झाल्यावर इंग्रजसरकारच्या पटवर्धन वगैरे सरदारांस थैल्या आल्या त्यांत असें लिहिले होतें कीं पेशव्यांचीं निशाणें आतां रणांगणीं कांहीं दिवस तरी टिकाव धरतील असा संभव नाहीं, तर तुम्ही त्यांजबरावर खराब होऊं नये, आपआपल्या ठिकाणाला जावें हें बरें. ती हिताची गोष्ट ऐकून बहुतेक सरदार परतले. चिंतामणराव आपा साहेब सांगलीकर घरीं आले. तें त्यांच्या पत्नीस अगदीं आवडलें नाही. ती त्यांस म्हणाली श्रीमंतांबराबर रहातेत आणि तुह्मांवर घराबाईट प्रसंग गुदरता तर हरकत नव्हती ; मागें *मुलगा नांव चलवता. पण आतां लोक काय कीर्ति गातील ! ! हर हर ! अशा कुलाभिमानी स्त्रीपुरुषांच्या गोष्टी देखील लिहिलेल्या नसाव्या काय ! स्वकुलांतल्या पुरुषांची अशी एकएक गोष्ट ऐकलेली असली तर तीपासून जें कार्य होईल तें परकीयांविषयीं शेंकडों गोष्टी पाठकरून तरी होईल काय ? केशरीया करून मारीन किंवा मरेन असा संकल्प करून तलवार उचलणाऱ्या रजपूत वीरांच्या कथा सांगणारे, वंशपरंपरेनें तेंच काम करणारे, भाट सर्व राजस्थानांत आहेत तसे महाराष्ट्रांत नाहींत त्यामुळें मराठे वीरांच्या, वीरमातांच्या आणि वीरपत्नींच्या चरित्रांतील अशा किती गोष्टी विस्मृतिपथास गेल्या असतील याचें अनुमान ही करतां येत नाहीं ! !

आमचेच लोक आपला इतिहास लिहूं लागले तर सध्या आपण तो इंग्रजी पुस्तकांतून वाचतों त्यापेक्षां त्याला किती भिन्न रूप येईल याचें अ-

---

*विद्यमान तात्यासाहेब होण्यापूर्वी हा वारला

नुसान वरील गोष्टींवरून करतां येईल. ह्या आमच्या म्हणण्यावरून प्रस्तुत पुस्तक असावें तसें नाहीं. असें आम्हास वाटत असल्याचें सिद्ध होतें व असें असून हें आम्ही प्रसिद्ध करीत आहों हें मोठें धाष्टर्य असें कोणी म्हटलें तर गैर नाहीं. परंतु येवढें साहस समजून उमजून करण्यास आम्ही कसे व कां प्रवृत्त झालों तें सांगतों, म्हणजे ह्या दोषास कितपत पात्र आहों तें उघड होईल. आमच्या विद्याखात्याची स्थिति पाहिली तर आमच्या घरांत सर्व व्यवहारोपयोगीं वस्तु जशा विलायती भरल्या आहेत तशाच शाळांत चालणाऱ्या सर्व पुस्तकांत विलायती गोष्टी भरल्या आहेत. तुकारामा सारख्याच्या कवितेंतले वेंचे त्यांत येतात त्यांस देखील विलायती रूप येतें. स्वदेशाच्या इतिहासाची मुळांस थोडी बहुत माहिती होऊन गोडी लागणें व तो अधिकाधिक वाचावासें वाटणें दूरच. विश्वविद्यालयांत बि. ए. एम. ए. च्या परीक्षांस येणाऱ्या उमेद्वारांस जें इतिहासाचें अध्ययन करावयाचें असतें त्यांत स्वदेशाच्या इतिहासाचा भाग कितीसा असतो तो पाहिला म्हणजे मोठें आश्चर्य आणि खेद वाटतो. ही मोठमोठ्या विद्वानांची गोष्ट, तेव्हां आमच्या सारख्या सामान्य मनुष्यास मुळींच कांहीं माहिती नसली ह्मणून आश्चर्य नाहीं. सन १८७७ मध्यें दिल्लीस दरबार झाला, तेव्हां राजे रजवाड्यांस किताब मिळाले ती सर्व हकीगत वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली. पुढें इंदूरच्या राजकुमार कालेजाचे प्रिन्सिपाल म्याके साहेब यांणीं एक लहानसें पुस्तक छापलें त्यांत त्या वर्षापर्यंतची राजे रजवाड्यां विषयीं चांगली माहिती दिली. तें वाचून असें वाटलें कीं आपल्या लोकांस स्वभाषेंतून असे इतिहास वाचावयास मिळतील तर चांगलें. आमचे मित्र रा० रा० वा० प्र० मोडक यांस आमचा हेतु बरा वाटून त्यांणीं म्यालेसनच्या पुस्तकाचें भाषांतर करण्यास सांगितलें. तें पुस्तक आणून वाचलें तें आम्हांस फार चांगलें वाटलें. मग त्यांची परवानगी घेऊन त्या उद्योगास लागलों. कांहीं कालानें भाषांतर पुरें झालें. तें रा० ब० म० गो० रानडे यांस दाखविलें, त्यांणीं पाहून बरें आहे, ह्मणून आपल्या एका विद्वान मित्राकडे दिलें. त्यांणीं लेखी अभिप्राय दिला. एका राजाच्या दिवाणासंबंधानें मजकूर पाहून त्यांणीं असें लिहिलें आहे.— " यानें रेसिडेंटाशीं संगनमत करून आपल्या स्वामीचा किती छळ केला होता, हें या ग्रंथकारास कांहीं देखील माहीत नाहीं. तेव्हां अशा पक्षपाती ग्रंथाचें भाषांतर केल्यानें आपल्या देशां-

तील संस्थानिकांच्यां इतिहासाचें आपल्या देशांतील लोकांस यथार्थ ज्ञान करून दिल्याचें श्रय कांहीं या ग्रंथकारास प्राप्त होणार नाहीं. " हा शेरा मारून पुढें इतिहास कसा असावा, या विषयीं थोडें लिहून अखेर ह्या ग्रंथास उपोद्घात अगर उपसंहाररूपानें एक निबंध जोडून त्यांत काय काय गोष्टींचा विचार केला पाहिजे तें सांगितलें आहे, व " या ग्रंथकारास वर सांगितलेल्या गोष्टींचा विचार करण्याची शक्ती असून त्यानें जर तसें केलें नाहीं, तर योग्य स्थळीं प्रधान विषयाचा लोप केला, असें होऊन त्याच्या ग्रंथास सर्व लोक मान्यता प्राप्त होणार नाहीं. " असें म्हटलें आहे. ह अभिप्राय सन १८८४ च्या एप्रिलमध्यें मिळाला. तो वाचून असा पक्षपाती इतिहास ग्रंथ प्रसिद्ध करण्या पेक्षां नाहींसा करून टाकलेला बरा, असें वाटून खर्डे चांधून ठेवले, आणि खरी माहिती पाहिजे, तशी मिळवून एकाद्या संस्थानाचा तरी इतिहास आपल्या हातून तयार होईल काय असा विचार करूं लागलों. तें काम खरोखरच मोठें कठीण दिसूं लागलें, पुष्कळ काळ लोटला तरी कांहींच झालें नाहीं, तेव्हां दुसऱ्या लोकांचें तरी मत काय आहे तें पहावें असें मनांत आलें. दुसरें, सरदारच्या गृहस्थांनी सारा ग्रंथ वाचूनच अभिप्राय दिला असेल, परंतु तो पक्षपाती ठरविण्यास ते ज्या संस्थानांत लहानपणापासून होते त्यांतल्या दिवाणाची बरची गोष्ट शिवाय करून आसपासच्या संस्थानांतील दुसरी एकादी त्यांनी दाखविली नाहीं. या वरून न ती खोटी असें म्हणणें नाहीं, परंतु साऱ्या ठिकाणच्या अशा खऱ्या गोष्टी कळण्यास पुस्तक बरें वाईट असेल तसें पुष्कळ लोकांच्या नजरेस पडलें पाहिजे म्हणजे त्यांच्या सारखे चुका दाखविणारे कोणी तरी भेटतील, असें वाटून उमेद आली. मग शुद्धाशुद्ध पाहून, तपासून पुनः नवी प्रत लिहून ती १८९० च्या आक्टोबर मध्यें दक्षिणा प्राईज कमिटीकडे पाठविली. चिटणिसांनीं बरेंच गौरव करून तीन साडेतीनशें रुपये बक्षीस द्यावें अशी शिफारस केली, ती मेंबरांस पसंत पडली. त्यांणीं ही अभिप्राय चांग ले दिले. ३५० रुपये श्रमाच्या मानानें फार नाहींत; यांत कमी देऊं नये; असें रा०ब० रानडे. डॉक्टर रा०गो० भांडारकर व रा० रा० गो०ग० आगरकर यांणीं लिहिलें. तेव्हां हें आहे ह्या रूपानें देशबांधवांपुढें टाकून त्यांस विनंती करणें ती करावी असें योजलें.

विद्वज्जन हो, मला आपल्यास वारंवार विनंती करणें आहे. परंतु ती

माझी ही वेंडी वांकडी कृति कशी तरी मानून घ्या आणि उदार आश्रय द्या अशी मात्र नव्हे. स्वदेशाचा इतिहास आवगत असणें किती अवश्य आहे व तो स्वभाषेंत आपल्या मुलाबाळांस वाचण्यास मिळेल आणि लहानपणापासून त्यांच्या मनांत ठसेल तर त्यापासून किती लाभ होतील हें मनांत आणा. आतां महाराष्ट्रीयांचा प्रवेश हिंदुस्थानांत अमुक ठिकाणीं नाहीं किंवा आज नसेल तेथें उद्यां होणार नाहीं असें नाहीं. तर त्या त्या ठिकाणची माहिती ज्यास जितकी मिळेल तितकी त्याणें मिळवावी आणि ह्या पुस्तकांत ज्या चुका असतील त्या दाखवाव्या ह्मणजे दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग आल्यास त्यांची मोठ्या संतोषानें दुरुस्ती करीन. तसेंच ज्यांस तशीं साधनें मिळतील त्यांणीं मल्हारराव्याच्या कारकीर्दीचा खरा इतिहास ह्मणून देवांनीं जें पुस्तक केलें आहे तसें एकेका संस्थानाचें. निदान त्यांतील एकेका कारकीर्दीचें तरी लिहावें ह्मणजे ग्र्याँटडफ् सारखे परिश्रम किंवा नुकसान एकासच सोसावें न लागतां साऱ्या देशावर मोठे उपकार होतील. डफसाहेबांनीं मराठ्यांचा इतिहास लिहिण्यास जे ओझींच्या ओझीं कागदपत्र मिळवले ते गेले तरी काव्येतिहासकारांनीं राहिलेले मिळवण्याचा उद्योग सुरू केला तेव्हां त्यांस किती मिळाले व अद्याप लोकांजवळ किती असतील, वृद्ध मनुष्यांच्या तोंडच्या अद्याप किती गोष्टी ऐकावयास मिळतील तें मनांत आणलें तर असे पृथक पृथक इतिहास तयार होणें कांहीं अशक्य नाहीं. डफ्साहेबास पानपतच्या प्रसंगांत जाऊन आलेल्या एकातरी मनुष्याच्या तोंडून कांहीं गोष्टी ऐकावयास मिळाल्या तशा आम्हाला आज बापू गोखल्याच्या स्वारींत असलेला त्याची एकादी गोष्ट सांगणारा कोणी मिळणार नाहीं हें खरें. परंतु १८५७ च्या बंडाचें आज तसें नाहीं, पणं आणखी दहा पंधरा वर्षांनीं तसेंच होईल. याजकारितां देशबांधवांनीं आमची ही विनंती मान्य करून जी जी माहिती मिळण्या सारखी असेल ती मिळवून तिचा उपयोग त्वरित करावा.

आतां हिंदुस्थानांत जे राजेरजवाडे आहेत त्यांच्या सरकारानें प्रती लावल्या आहेत. त्या अशा—प्रथम श्रेष्ठ राजे ह्मांनां Sovereign princes असें ह्मणतात. महाराणे, महाराज, राजाधिराज, राजे, राव, नबाब, वगैरेजीं काय त्यांचीं पहिलीं पदें आहेत त्यांच्या मागें His Highness ही सरसकट एक इंग्रजी नवी पदवी लागत असते आणि ९ पासून २१

पर्यंत त्याच्या योग्यते प्रमाणें कमी जास्त तोफांची त्यांस सलामी मिळत असते. तींत प्रकार दोन:एक गादीची सलामी. ह्मणजे संस्थानच्या गादीवर कोणीही पुरुष असला तरी त्यास ती मिळावयाची ; दुसरी जातीची, ह्मणजे स्वत:च्या योग्यते वरून मिळालेली; ही जीवमान असे पर्यंत चालावयाची. कोणीं सरकारची मर्जी किंवा इतराजी संपादील त्याप्रमाणें ह्या दोहींत कमी जास्ती होत असतें. .दुसरी प्रत प्राचीन राजवरण्यांतल्या थोर पुरुषांची. यांनां राज्य, अधिकार, वगैरे जरी कांहीं एक नाहीं तरी **हिज हायनेस** हा किताब आणिं ९ पासून २१ पर्यंत तोफांची सलामी मिळते. तिसरी प्रत वाकी राहिलेले राजे, सरदार, जाहागीदार, संस्थानिक वगैरे यांची. यांस राजां, राणा, नवाब, ठाकूर, राव, वगैरे जीं पहिलीं पदें आहेत तीं चालतात, परंतु हिज हायनेस ही पदवी व तोफांची सलामी नाहीं. चौथी प्रत हीच, राजा नवाब वगैरे पदवी पहिली नसतां आलीकडे सरकारानें जीवमान असे पर्यंत दिलेल्यांची. साऱ्या संस्थानिकांस राज्याधिकार आहेत, परंतु ते सारखे नाहींत. कोणास कोणत्याही प्रकारच्या अपराध्याची चौकशी करण्याचा व कोणतीही शिक्षा देण्याचा अधिकार आहे व कोणास नाहीं. कोणास फक्त आपल्याच प्रजांची चौकशी करतां येते व नियमित शिक्षा मात्र देतां येते. अशा अधिकार संबंधानें आणखी प्रती आहेत. पोलिटिकल एजंट, रेसिडेंट, गव्हरनर वगैरे कोणी अधिकारी जेव्हां दरबार भरतात तेव्हां त्यांत वर खालीं कोणी कोठें बसावयाचें, त्यांच्या भेटी परत भेटी कशा क्रमानें व्हावयाच्या, कोणास सामोरें जावयाचें, कोणास नुसतें उत्थापन द्यावयाचें, कोणाकडून केव्हां किती नजराणा घ्यावयाचा, त्या बदला पोषाक किती किमतीचा द्यावयाचा तें सारें अगदीं ठरलेलें आहे त्याप्रमाणें विनचूक व्हावें लागतें. त्यांत तक्रार आली तर कसा प्रसंग गुंदरतो तें लॉर्ड मेओच्या दरबार प्रसंगीं सर्वांस चांगलें कळलेंच आहे. जो मान गादीवर असणाऱ्या पुरुषास मिळतो तो तो जिवंत असेपर्यंत त्याच्या मुलास मिळत नाहीं. तोफांच्या सलामीचे पहिल्या प्रतीचे राजे १०० बर आहेत. विनसलामीचे दुसऱ्या प्रतीचे २७५ आहेत व विन अधिकारी २५ आहेत. माजी राज्यांत सरदार चनण्यास तरवार गाजवावी लागत असे व सरदारी बरावर इतमामखर्च चालण्यास मुलुख मिळत असे. इंग्रजी झाल्यापासून तें सारें बंद* झालें; तरी

* १८५७ च्या बंडामध्यें सरकारावर मोठा प्रसंग गुदरला होता,

सरकारानें आजपर्यंत सरदार पुष्कळ बनवले व अद्याप बनवीत आहे. परंतु मागच्यांत व ह्या नव्यांत भेद ठेविला आहे. पहिल्यांचीं नावें काळ्या शाईनें लिहिलेलीं आहेत ; त्यांनां प्रिव्हिलेड्ज क्लास Privileged class ह्मणजे विशेष हक्क असलेले असें म्हणतात.* दुसऱ्यांचीं नावें तांबड्या शाईनें लिहिलेलीं असतात, व त्यांस Honorary class ह्मणजे सन्मानार्थ पदवी दिलेल्या वर्गांतले असे म्हणतात. ह्यांत पहिली, दुसरी, तिसरी अशा तीन प्रती आहेत; त्यांपैकीं एकादींत शिरकाव होण्यास अंगीं अमुक गुण असावा लागतो किंवा अमुकच कृत्य करावें लागतें असे कांहीं नियम नाहींत. एक लहानसा इनामदार आमच्या परिचयाचा आहे ; त्याणें हायस्कुलाचें तोंड पाहिलेलें नाहीं, मराठी, कानडी, फारसी, संस्कृत वगैरे शाळेंत ही कोठें अध्ययन केलेलें नाहीं, अंगीं कवित्व, वक्तृत्व, दातृत्व, किंवा देशसेवातत्परता यांतला ही गुण दिसत नाहीं, गर्भश्रीमंत, लक्षाधीश, ह्मणावा तर तसाही नाहीं. परंतु तीन चार वर्षांखालीं एक दिवस लोकांनीं अकस्मात ऐकिलें कीं हा तिसऱ्या प्रतीचा सरदार बनला. एकादी म्युनासिपालिटी, लोकलबोर्ड किंवा सभा वगैरेंत ही कोठें याचें नांव नसतां हा अकस्मात योग ये ण्याला सरकाराला त्याचा काय विशेष गुण दिसला कोण जाणे ! असो. या प्रमाणें मिळणाऱ्या सरदारी शिवाय स्टार ऑफ इंडिया ही सरकारानें सन १८६१ मध्यें एक नवीन पदवी काढलेली आहे. तींत ही पहिली, दुसरी, तिसरी अशा प्रती आहेत. आपल्याला त्यांतली एकादी मिळावी अशी पुष्कळ राजे लोकांची इच्छा असते व कितीएकांस त्या मिळालेल्या आहेत.

ह्या ग्रंथाचे दोन भाग केले आहेत ; पैकीं ह्या पूर्वार्धांत मोठमोठ्या राज्यांचा वृत्तांत आला. हा अगदीं चालू सालापर्यंत द्यावा असें आमचे मनांत होतें, परंतु माहिती मिळणें कठीण पडलें सबब देतां आला नाहीं. उत्तरार्धांत बाकी राहिलेल्या राज्यांचा वृत्तांत, एकंदर संस्थानें वगैरेचीं नांवें क्षेत्रफळें, उत्पन्नें, लोकसंख्या, गादीवर असणाऱ्या पुरुषाचें नांव, वय, जात, पदवी, त्यास किती तोफांची सलामी मिळते, कोणास किती खंडणी

त्यावेळीं जे राजे रजवाडे उपयोगीं पडले त्यांस सरकारानें कांहीं मुलुख वर्क्षीस दिला. व कोणाकोणास सलामीच्या तोफा वाढवून दिल्या.

धावी लागते, कोणाजवळ किती तोफा व फौज आहे, कोणास अधिकार किती आहे, इंग्रज सरकाराशीं संबंध कधीं व कसा जडला इत्यादि मिळेल तितकी माहिती, कांहीं वंशावळी, माजी दिल्लीचे मोगल बादशाच्या व पुण्याच्या पेशव्यांच्या वंशांतील पुरुषांची हकीगत, त्यांस नेमणूक किती मिळते वगैरे मिळेल तेवढी माहिती देण्याचा विचार आहे. ती मिळण्यास आमच्या ठिकाठिकाणच्या वाचकांनीं मदत करावी अशी त्यांस विनंती करतों.

दिल्ली दरबार सन १८७७ मध्यें झाला, त्यावेळीं ठिकठिकाणीं गादीवर असलेल्या राजपुरुषांचीं नांवें, वयें, वगैरे सर्व माहिती एका पुस्तकांत आहे. परंतु तेथून आज १९ वर्षांत सृष्टिक्रमानुसार त्यांतले कितीएक पुरुष कालवश होऊन परलोकांस गेले व त्यांचे जागीं दुसरे आले त्यांचा नामनिर्देश तरी करणें अवश्य होतें, परंतु तेवढी ही माहिती आम्हास मिळाली नाहीं, याजबद्दल खेद वाटतो.

स्वदेशाचा इतिहास परभाषेंतून स्वभाषेंत आणण्यांत अनेक अडी येतात, परंतु त्या सर्वांत विशेष नामांच्या लेखना इतकी जबर दुसरी कोणतीच नसेल. मुंबई, भडोज, मथुरा, पुणें, भायखळा, बडोदें, हे शब्द ज्या अक्षरांनीं इंग्रजींत लिहितात त्यांचा सरळ उच्चार करूं लागलें झणजे बाँबे, ब्रोच, मुत्रा, पुना, वायकुला, वरोडा, असा प्रकार होतो, हें सर्व विश्रुतच आहे. ड, र, ल, श, स, इत्यादि वर्णांची अस्ताव्यस्तता, ख, फ, छ, ठ, प, क्ष, ढ, ध, वगैरे वर्णांचा बहुतेक अभाव, याच्या योगानें स्थलविशेषांचीं व पुरुषविशेषांचीं जीं इंग्रजींत नांवें आहेत, तींच मराठींत जशींच्या तशीं उतरून दिलीं तर वाचकांस त्यांची खरोखर व्यवहारांत चालू असणाऱ्या नांवांशीं सांगड कशी घालतां येईल याचा आम्हास विचार पडला. आपल्या मतें आम्हीं विचार करून शुद्ध नांवें लिहिलीं, तरी एक मौज झाली ती अशी — बुंदीच्या इतिसांत अकबरानें एक किल्ला घेतल्याचा मजकूर आला आहे. त्या किल्ल्याचें नांव रिंठणबोर असें इंग्रजी अक्षरांवरून आम्ही लिहून चुकलों. पुढें याच ग्रंथकारानें लिहिलेलें अकबरचरित्र छापून आलेलें वाचलें, त्यांतील अक्षरांच्या उच्चार करतांनां ' रिंठणबोर ' ही चूक वाटूं लागली ; मग आणखी तपास करतांना दोन्ही चुका. आणि खरे नांव रतनबोर आहे असें कळलें तेव्हां अशा चुका आणखी किती झाल्या असतील याचा अदमासच लागत नाहीं ; तर वाचकांनीं कृपा करून अ—

शा जितक्या त्यांस दिसतील तितक्या काढून शुद्ध नांवें आम्हांस तावडतोब कळविलीं तर मोठे उपकार होतील.

कुरुंदवाड

तारीख ३१ अगष्ट सन १८९२ इसवी.

कृ० ब० गोडबोले.

श्रीगजानन.

हिंदुस्थानांतील विद्यमान राज्यें व संस्थानें ह्यांचा इतिहास.

पूर्वार्ध.

खंड पहिला---राजपुताना.

भाग १

उदेपूर उर्फ मेवाड.

परराष्ट्रीय लोकांनीं हल्ले करकरून हिंदूराजांस पादाक्रांत केलें असतां, स्वपराक्रमानें देश काबीज करून पूर्वजांनीं जें एकदां ठाणें घातलें तें आज अठराशें वर्षांवर अव्याहत कायम आहे, असें जसलमीर शिवाय करून, ह्या एका उदेपूर घराण्यांत. राजस्थानाच्या वायव्येस अनेक राजे राज्य करीत आहेत, परंतु त्यांतील कोणी पूर्ववैभव नष्ट होऊन स्वस्थानभ्रष्ट झालेल्यांचे वंशज, व कोणी पूर्वीचे अप्रसिद्ध कुलांतील पराक्रमी पुरुषांनीं आपल्या तलवारीच्या जोरावर कीर्ति मिळवून स्थापन केलेलीं राज्यें कुलपरंपरेनें उपभोगणारे, असे आहेत. हें राजघराणे तशांतलें नव्हे. गिझनीचा महंमद अटक नदी उतरून हिंदुस्थान जिंकण्याकरितां आला तेव्हां जितका मुलुख या घराण्याकडे चालत होता तितका बहुतेक विद्यमान राण्याच्या ताब्यांत आहे.

उदेपूरचे राणे आपल्यास सूर्यवंशी, वडील घराणेवाले असें म्हणवितात. सूर्यवंशाच्या जितक्या शाखा आहेत, तितक्यांचा आदिपुरुष म्हटला म्हणजे मनु परंतु त्या वंशांत पुढें रघुराजा महापराक्रमी झाला, तेव्हां पासून त्याचें नांव लूं लागलें, त्यास अनुसरून ह्या घराण्यास रघुवंशीय असें दुसरें ही नांव पडलेलें आहे. रघुवंशांत श्रीरामचंद्राचा अवतार, रामरायाचा कीर्ति दिगंत व अजरामर, त्याचें नांव मुक्तिप्रद, अशा अनेक कारणांनीं रामनामाची प्रौढी विशेष असल्यानें रघुकुलोत्पन्न पुरुष आपल्यास रामवंशीय असें ही म्हणवूं लागले

कुलाच्या शाखा अनेक आहेत व श्रेष्ठत्वाविषयीं नरी त्यांचे आपसांत वाद
हेत तरी उदेपूर घराणें खरें रामवंशीय, हें सर्व हिंदूंनां संमत आहे व ह्या
यास ते "हिंदुसूरज" ह्मणजे हिंदूंतला सूर्य असें ह्मणतात व रजपुतांत जीं
६ राजकुलें आहेत त्यांत अग्रेसरत्व यासच देतात; याच्या श्रेष्ठत्वाबद्दल क
ां कोणी शंका घेतलेली नाहीं.

ह्या घराण्याच्या पूर्ववृत्तांताविषयीं दंतकथा अशी आहे--मेवाडच्या सू-
र्यवंशी राजाचा कोणी दुष्टानें विश्वासघातानें खून केला. त्या वेळीं त्याची स्त्री
गरोदर असून यात्रेस गेलेली होती. यात्रा करून परत आल्यावर पतीच्या दु-
र्मरणाचें वर्तमान ऐकून ती भयानें पळाली आणि मलयगिरीवर जाऊन एका
गुहेंत पुत्र प्रसवली. (ही गोष्ट ख्रिस्ती शकाच्या दुसऱ्या शतकांत घडली अ-
सावी.) मग तो पुत्र कमलावती नामक एका ब्राह्मणाच्या स्वाधीन करून ति
नें अग्निप्रवेश केला. कमलावतीनें त्याचें संरक्षण केलें; परंतु तो जसजसा मोठा
होत गेला तसतसा त्याच्या त्या उपमातापितरांनां त्याजपासून त्रास होऊं ला-
गला. तो भिल्लबालकांची संगति करून प्रथम पांखरें आणि मग वन्य पशु मा-
रूं लागला. असें होतां होतां त्याला अकरावें वर्ष लागलें तेव्हां तर तो अगदीं
च अनावर झाला. कारण "तें सूर्यतेजच पडलें, तें थंड कसें राहील?" या
प्रमाणें तो बालक मृगयेंत प्रवीण होऊन आपल्या समवयस्क मित्रमंडळींत हर
एक कामांत प्रमुखत्वानें वागूं लागला त्यावेळीं शेजारच्या ईडर संस्थानच्या गा-
दीवर एक भिल्लच होता, त्याच्या परिवार मंडळीस ही तो प्रिय झाला. एक
दिवस सर्व मुलें मिळून खेळत असतां ह्या मुलाच्या हातून इतरांपेक्षां विशेष
धाडसाचें असें कांहीं कृत्य झालें; तेव्हां त्याच्या त्या परिवार बालमंडळीस आ-
नंद होऊन त्यांणीं त्याला राजा करण्याचें ठरविलें. एकानें तत्काल आपलें ए
क बोट कापून त्याच्या ललाटीं रक्ताचा* तिलक लाविला. याप्रमाणें बाल
राज्याभिषेक होऊन सर्व मुलें परत आल्यावर तें वर्तमान वृद्ध भिल्लनायकाला
कळलें, तेव्हां तो जरी मुलांचा सहज खेळ जाहला होता तरी त्याणें ती गोष्ट

---

* हा अपूर्व राज्याभिषेकविधि अद्याप चालू आहे. जेव्हां नवा राणा
गादीवर बसतो तेव्हां एक भिल्ल आपलें बोट कापून रक्ताचा तिलक त्याच्या
कपाळीं लावतो. आणखी एक गोष्ट सांगतात, तिच्या खरेपणाविषयीं कांहीं
शंका नाहीं. ती अशी कीं जेव्हां ह्मणून उदेपूरचा राणा महीनदी उलटून प-

क्षुल्लक मानली नाहीं; तिला आपलें ही अनुमोदन देऊन त्याला खरोखर राज पदारूढ केलें. पुढे या राजश्रींनीं कृतघ्न होऊन त्या आपल्या उपकारकर्त्यास मारलें अशी दंतकथा आहे; परंतु त्या दुष्कृत्यास निमित्त काय झालें तें कळत नाहीं. या राजापासून पुढें आठवा पुरुष नागादित्य नामक झाला. परंतु आपल्यावर आतां परकीय राजाचा अम्मल नसावा असें भिल्लांनां वाटूं लागून त्यांणीं त्याचा शिरच्छेद केला. त्यावेळीं त्याचा पुत्र अगदीं अल्पवयस्क होता; त्याचें संगोपन त्या कमलावती ब्राह्मणीच्या वंशजानींच केलें. तो पराक्रमी निपजून बापूरावळ या नांवानें पुढें चांगलाच प्रसिद्धीस आला. (हा श्रीरामचंद्रापासून ८० वा पुरुष असें कित्येक वंशावळींत लिहिलेलें आहे.) त्याणें माळव्याच्या राजघराण्याशीं शरीरसंबंध केला. आपल्या पूर्वजांचा जो मुलुख शत्रूनीं घेतला होता तो सर्व सोडवून घेऊन त्यांस हांकलून लाविलें, आणि चितूर येथें आपली गादी स्थापून साऱ्या राजपुतान्यावर आपला अम्मल बसविला. त्याणे मेवाडमध्यें सन ७२८ मध्यें गेहलोटनामें राजघराणें स्थापिलें. बापूपासून पुढें ६० हून अधिक राजांनीं चितूर मध्ये राज्य केलें. ते सर्व औरस संतति होते. बापूरावळ पूर्णायुषी झणजे शंभर वर्षांचा होऊन* वारला.

बापूपासून तेविसावा पुरुष समारसी नामक राजा बाराव्या शतकांत राज्य करीत होता. हा शूर, शांत, युद्धकुशल, वक्ता, शहाणा व दूरदृष्टि असून सर्व प्रसंगीं धार्मिक असे; तो आपल्या पदरच्या व चव्हाण कुलांतील सरदारांस ही प्रिय असे, असें भाटांनीं यांचें वर्णन केलें आहे. जेव्हां तार्तर लोकांनीं हिंदुस्थानावर स्वारी केली तेव्हां आपला मेहुणा दिल्लीचा राजा पृथ्वीराज याजला समागमें घेऊन समारसी त्यांजवर चालून गेला, आणि तीन दिवसपर्यंत निकरानें युद्ध करून शेवटीं आपल्या सर्व सैनिकांसह रणांगणी पडला. (सन

लीकडे जाई तेव्हां चव्हाणरजपूत कुलापैकीं, भिल्लस्त्रीपासून झालेला, मनुष्य पाहून त्याचा बलि देत; त्याचा कंठच्छेद करून धड नदींत टाकीत. ही वहिवाट ४० वर्षांपूर्वीपर्यंत चालत आली होती.— हिस्टॉरिकल स्केच ऑफ धी प्रिन्सेस ऑफ इंडिया सन १८३३.

* आणखी अशी दंतकथा आहे कीं बापू वृद्ध होऊन आपला देश व मुलें बाळें टाकून खुरासनमध्यें गेला आणि तेथें तज्जातीय स्त्रीशीं विवाह करून राहिला. तेथें त्याला पुष्कळ संतती ही झाली.

११९१ इसवी.)

समारसीनंतर त्याचा पुत्र कर्ण गादीवर बसला. परंतु तो लौकरच वा रला तेव्हा समारसीचा पुतण्या राहप तत्स्थानापन्न झाला. त्याणें सन १२०१ मध्यें आपल्या कुलाचें गहलोट हेंनांव पालटून शिसोदे* असें ठेविलें व रानळ हे पद पालटून राणा हें स्वीकारलें तें अद्याप चालत आहे. याच वर्षीं त्याणें चितूर घेतलें.

राणा राहप वारल्यापासून पुढील पन्नास वर्षांत नऊ राणे चितूरच्या गादीवर बसले. त्यांपैकीं सहा समरांगणीं पडून मेले. हा सर्वकाळ बहुतकरून कांहीं घरच्या व कांहीं बाहेरच्या कलहांत व तंग्यांत गेला; सबब तो सोडून पुढें जाऊं.

नंतर सन १२७९ मध्यें राणा लक्ष्मणसिंग गादीवर बसला. मुसलमानांनीं चितूरावर प्रथम हल्ला याच्या कारकीर्दीत केला. त्यावेळीं हा राणा अल्पवयस्क असल्यामुळें याचा चुलता भीमसिंग पालनकर्ता ह्मणून सर्व अधिकार चालवीत होता. त्याणें दिल्लीचा पठाण बादशहा अल्लाउद्दीन चाल करून आला होता त्याच्याशीं संग्राम करून त्याला हांकून लाविलें. अल्लाउद्दीनानें ही स्वारी मुलखाच्या किंवा कीर्तीच्या लोभानें केली नव्हती. भीमसिंगाची अतिरूपवती भार्या पद्मिनी आपल्यास प्राप्त व्हावी हा कायतो त्याचा हेतु होता. तो तर सिद्धीस गेला नाहींच; परंतु ती त्याच्या दृष्टीस देखील पडेना. तेव्हां त्याच्या अत्याग्रहावरून आरशांत तिचें प्रतिबिंब दाखवावें असें ठरावांत येऊन तो राण्यावर पूर्ण विश्वास ठेऊन अगदींच थोड्या लोकांनिशीं किल्ल्यावर गेला आणि तेवढें नयनसुख घेऊन खालीं उतरला; तेव्हां भीमसिंग त्याजवर तसाच विश्वास टाकून त्यास किल्ल्याखालीं पोहोंचवावयास गेला असतां त्याला त्याणें दग्यानें कैद केलें, आणि पद्मिनी माझ्या स्वाधीन होईल तरच भीमसिंग सुटेल असा किल्ल्यांत निरोप पाठविला. तेव्हां तिचा भाऊ व चु-

---

* हें नांव धारण करण्याचें कारण एका क्षुल्लक गोष्टीवरून घडलें असें ह्मणतात. तो एकदां शिकार करीत असतां त्याच्या पुढून एक ससा पळाला, परंतु त्याची लगट करून मोठ्या श्रमानें त्याणें तो शेवटीं मारला व त्या जागीं शहर वसाविलें. ह्या शशनाशापासून आपला उदयकाल आला ह्मणून तो आपल्यास शशोदीय ह्मणवूं लागला;त्याचा अपभ्रंश शिसोदे.

लता यांणीं मसलत करून तिची रवानगी करून देतों असें उलट सांगून पाठविले आणि रात्रौ बुरख्याच्या पुष्कळ पालख्या तयार करून आंत हत्यारबंद शिपाई बसविले व त्यां उचलावयास भोई म्हणून तसेच हत्यारबंद शिपाईच लाविले. या प्रमाणे बरेंच सैन्य अल्लाउद्दीनाच्या गोटांत शिरलें. तो कामांध होऊन पद्मिनी मिळाली असें समजून आनंद मानीत होता इतक्यांत आलेल्या सर्व शिपायांनीं समशेर उपसलीं. त्याणें आपलें सैन्य तयार ठेवलेंच होतें, तें तों "दगारे दगा" असें ओरडतांच घुसलें. मग सारखी कत्तल सुरू झाली, तींत गोटांत शिरले होते तितके ठार झाले, परंतु त्यांचें कार्य झालें. त्या गडबडींत भीमसिंग निसटून पार झाला. मग किल्यांतून आणखी सैन्य आलें, त्याणें निकरानें युद्ध केलें. त्यांत अल्लाउद्दीनाचा फार नाश झाला तेव्हां तो रडत माघारा गेला.

इसवी सन १३०३ मध्यें अल्लाउद्दीनानें चांगली तयारी करून चितूरावर पुनः स्वारी केली. तेव्हां या खेपेस आपल्याला जय येणें कठीण असे दिसूं लागतांना त्याणें जोहर करून पद्मिनी आदिकरून शेकडों बायकांच्या अग्नींत आहुति दिल्या आणि आपला वंश पुढें चालावा म्हणून एका पुत्राला तज्ञविज्ञेनें सुस्थळीं पाठवून बाकीच्या अनेक पुत्रांसह शत्रूवर पुनः पुनः हल्ला करून मोठा पराक्रम केला. या प्रमाणें सर्व रजपूत पडले तेव्हां चितूर अल्लाउद्दीनाच्या हातीं लागलें; परंतु तो आंत जाऊन पाहतो तर सर्व ओसाड आणि भयाण होऊन गेलें आहे.

या प्रमाणें राजघराण्यांतील सर्व पुरुषांचा संहार उडाला तरी भीमसिंगाचा जो एकच पुत्र अवशिष्ट राहिला होता त्याणें धीर सोडला नाहीं. पुढें त्याच्या वडील बंधूचा पुत्र प्रख्यात हमीर हा येऊन त्याला मिळाला. तेव्हां त्याचें शौर्य आणि कर्तृत्व पाहून राण्यानें त्याला आनंदानें गादीवर बसविले. आपल्या कुलाचें वैभव नष्ट झालें आहे, परंतु तें हमीर पुनः लौकरच संपादील असा राण्याला जो अजमास दिसला तो त्याणें खरा करून दाखविला. अल्लाउद्दीनाची पिच्छा पुरविणें या शिवाय दुसरें काम त्याला सुचेचना. अल्पकाळांतच सर्व मुलुखभर त्याणें असा धुमाकुळ उडवून दिला कीं अल्लाउद्दीनाला दे माय धरणी ठाय असें होऊन गेलें. तेव्हां त्याणे झालोरचा मालदेव म्हणून रजपूत सरदार होता त्यास चितूर संभाळावयास सांगून आपण दिल्लीचा मार्ग धरला. हा मालदेव त्याचा मांडलिक झाला होता. हमीरानें थोडक्याच काळांत म्हणजे

सन १३१३ मध्यें तें आपल्या पूर्वजांच्या गादीचें स्थान काबीज केलें. आणखी असें ही सांगतात कीं अल्लाउद्दीना मागून जो राजा गादीवर बसला तो चितूर पुनः घ्यावें म्हणून चालून आला. तेव्हां हमीरानें त्याच्याशीं युद्ध करून त्याला कैद केलें आणि पूर्वी गेलेले चार परगणे, रोख एक लाख रुपये व शंभर हत्ती, इतकी खंडणी घेतली तेव्हां त्याची सुटका केली. त्यानें स्वपराक्रमाने राजपुतान्याचें गेलेलें वैभव पुनःआणलें. त्या काळीं हिंदूमध्यें तोच बलाढ्य राजा होता. सर्व प्राचीन राजघराणीं हतवीर्य होऊन गेलीं होतीं. हिंदूच्या अंगांतील पराक्रम कांहीं नष्ट झाला नाहीं, जागृत आहे, अशी मुसलमानांची खात्री करून देऊन त्यानें पुनः स्वराज्य स्थापन केलें म्हणून आनंद मानून जोधपूर, जयपूर, व आणखी पुष्कळ ठिकाणचे राजे त्याला करभार देऊन त्याच्या आज्ञेत वागूं लागले, आणि आपलीं राज्यें सुखानें अनुभवित झाले.

हमीर आपल्या प्रजेचें पुत्रवत् पालन करीत असे. त्याच्या कारकीर्दीत लोक चांगले संपन्न झाले असें सांगतात. तो वृद्ध होऊन सन १३६५ मध्यें वारला. मेवाडच्या राजघराण्यांत हा मोठा शहाणा व शूर पुरुष होऊन गेला अशी त्याची अद्याप कीर्ति गातात. त्याच्या मरणकालीं राज्य पुष्कळ मोठें आणि त्यांत अम्मल चांगला बसलेला, असें होतें.

हमीरा मागून क्षेतक्षराणा गादीवर बसला. तो त्या वीराला योग्य पुत्र होता. त्यानें पुष्कळ मुलुख जिंकून आपल्या राज्यांत सामील केला. त्यानें बक्रोल येथे खुद्द हुमायून बादशहाचा पराभव केला. तो आपल्या पदरच्या बुनौद्याच्या सरदाराची कन्या वरणार होता, परंतु त्याच्याशीं कांहीं तंटा होऊन त्यांत त्याला मृयु आला.

क्षेतक्षा नतर सन १३८३ मध्यें लखराणा गादीवर बसला. तो बुद्धिमान, पराक्रमी, शूर आणि कलाकौशल्यास उत्तेजन देणारा होता. त्यानें पूर्वजां प्रमाणें राज्य तर वाढविलेंच व कित्येक गोष्टी त्यांहून अधिक केल्या. त्यानें आपल्या राज्याची सरहद्द ठरविली, जावडा प्रांतांत रूप्याच्या खाणी शोधून काढल्या आणि सुरू केल्या. त्यानें दिल्लीचा बादशहा महमदशहा लोदी याजबराबर लढाई करून त्याचा अगदीं पराभव केला, परंतु पुढें गयेहून बादशाही फौजेस हांकून लावीत असतां तो पडला. हा स्वदेशाचे कल्याण कर्ता आणि कलोत्तेजक होता अशी त्याची अद्याप कीर्ति आहे.

लखराणा समरांगणीं पडला तेव्हां त्याचा अल्पवयस्क पुत्र मोकलजी

गादीवर बसला आणि वडील पुत्र चंद हा त्याचा पालनकर्ता झणून सर्व राजकारभार पाहूं लागला. खरा तोच राणा व्हावयाचा परंतु त्याणें आपला हक्क पूर्वीच सोडला* होता. पुढें मोकलजी वयांत आला तेव्हां पूर्वजांचे सद्गुण

* चंदानें गादीचा हक्क सोडण्यास मोठें चमत्कारिक कारण झालें. कर्नल टॉड यांणीं असें लिहिलें आहे—लखराणा अगदीं वयातीत झाला. त्याचे मुलगे, नातू, योग्यतेनुरूप जमीन जुमले घेऊन राहिले; असे सर्व यथास्थित चालले असतां मारवाडचा राणा रणमल्ल याणें आपली कन्या उदेपूरचा युवराज चंद यास द्यावी अशा मनांत आणून राता प्रमाण नारळ पाठविला. त्या वेळीं चंद कोठें बाहेर गेला होता. राणा दरबारांत सिंहासनावर बसलेला असून जवळ पदरचे मानकरी वगैरे मंडळी होती. त्यानें त्या मारवाडच्या मंडळीस योग्य आदरानें बसवून घेतलें. नंतर भाषण सुरू झालें. बोलतां बोलतां राणा मिशीवर ताव देऊन झणला " माझ्या सारख्या पांढऱ्या केसांच्या झाताऱ्याला कन्या द्यावी अशा हेतूनें राण्यानें हा नारळ पाठविला नसेलच; आतां चंद लौकरच परत येईल आणि नारळ घेईल. " ह्या विनोदपर भाषणाची मंडळीनें अर्थातच स्तुति केली आणि झटलें " आपण झणता तसेंच " परतु जेव्हां चंद परत आला आणि त्याला हें वर्तमान कळलें तेव्हां तो संतापला. कारण त्याला असें वाटलें कीं हा केवळ सहज विनोद झालेला नसावा; राण्याच्या मनांत नारळ आपल्या करितां आलेला असावा इतकें तरी खचित आलें असावें. त्याणें नारळ घेण्याचें नाकारलें. राण्यानें पुष्कळ समजून सांगितलें, तरी तो ऐकेना. आतां नारळ परत पाठवावा तर रणमल्लाचा अपमान होतो, झणून राणा ही संतापला आणि झणाला " कांहीं हरकत नाहीं, मीच नारळ घेतों. परंतु या संबंधापासून मला पुत्र झाला असतां तो राज्याला अधिकारी. आपण गादीवर हक्क सांगणार नाहीं, त्याच्या पदरीं जे ठाकूर असतील त्यांत मात्र श्रेष्ठ झणून राहीन अशी चंदानें शपथ घ्यावी. " त्याणें तें कबूल करून बापाच्या इच्छे प्रमाणें वागण्याची शपथ घेतली.

चंद आपल्या बोलण्या प्रमाणें वागला. परंतु राण्यानें त्याचा हक्क अजीबाद उडवून दिला ही गोष्ट फार वाईट झाली कारण या योगानें वडील घराणेंवाले मोठेच बलाढ्य सरदार झाल्यानें व प्रसंगविशेषीं ते गादीवर हक्क चालविणारेच पडल्यानें राज्यास जितका अपाय झाला तितका मराठ्यांच्या व मुसलमानांच्या उपद्रवानें ही झाला नाहीं.

त्याच्या अंगांत दिसूं लागले. समरांगणीं ही त्याणें कीर्ति कमी मिळविली नाही; परंतु तो या प्रमाणें विजयश्रीचा उपभोग घेत असतां त्याच्याहातून नकळत कांहीं अपराध घडल्यामुळें त्याच्या आजाच्या लेकवळ्यांनीं मदारिया येथें त्याचा प्राण घेतला.

मोकलजी नंतर सन १४१९ मध्यें कुंभराणा गादीवर बसला. तेव्हां पर्यंत सिंहासनाला खरें भूषण असे जे राणे झाले त्यांतच त्याची गणना आहे. तो हमीर राण्यासारखा हिम्मतवान आणि लव राण्यासारखा हौशी असून त्या उभयतां प्रमाणें त्याची बुद्धि विशाळ होती आणि त्यांच्यापेक्षां त्याला दैव अधिक अनुकूल होतें. त्याच्या समकालीन हिंदुराजांत त्याच्याहून मोठा योद्धा कोणी नव्हता. इसवी सन १४४० मध्यें माळवा आणि गुजराथ येथील उभयतां मुसलमान राजे एक विचार करून त्याच्याशीं लढाई करण्यास उभे राहिले. त्याणें त्यांचा अगदीं पराभव करून सैन्य अतिशय मारलें आणि माळव्याच्या राजास कैद केलें; परंतु त्याजकडून खंडणी वगैरे कांहीं न घेतां उलट त्यास वस्त्रालंकार देऊन परत पाठविलें, अशी त्याजवर कृपाच केली. त्यानंतर त्याणें दिल्लीच्या पादशहाच्या फौजेचा पराजय केला; आपल्या राज्याच्या संरक्षणाकरितां ३२ किल्ले बांधले आणि डोंगरांतील खिंडींचा बंदोबस्त केला. तो विद्येचा भोक्ता असून स्वतः कवि होता. त्या कालच्या राजकन्यांत जी अत्यंत रूपवती होती ती त्याणें वरिली होती.

याप्रमाणें कुंभराण्यानें राज्यश्रीचा उपभोग पन्नास वर्षें केला, आणि आणखी ही करता, परंतु सन १४४६ मध्यें त्याच्या पुत्रानें त्याचा प्राण घेतला. या दुष्कृत्याला इतर कांहीं कारण नव्हतें; बाप आणखी कित्येक दिवस जगणार, म्हणजे तों पर्यंत आपलें तारुण्य निघून जाणार, त्यानंतर आपण लक्ष्मी केव्हां भोगावी, असा दुष्ट विचार मनांत येऊन त्याणें हा सुलभ उपाय योजला.

ह्या पितृघ्नाचें नांव उदेसिंग असें होतें परंतु तो या महापातकामुळें इतिहासांत हत्याराव या नांवानें प्रसिद्ध आहे. त्याच्या इच्छे प्रमाणे त्याला गादी मिळाली, परंतु तिचा उपभोग सारा चार वर्षें घडला. परंतु तितक्या अल्पकालांत त्याणे आपल्या कुलाची कीर्ति आणि देशाचें वैभव गमावलें. तेव्हां त्याचा भाऊ रायमल्ल यानें त्याला राज्यांतून हांकून लाविलें. तो दिल्लीकडे पळत चालला असतां वाटेंत वीज पडून मेला.

रायमल्ल सन १४७४ मध्यें गादीवर बसला. नंतर लागलाच त्याला लढाईचा प्रसंग आला. दिल्लीचा पादशहा त्याच्या पुतण्यांचा पक्ष स्वीकारून चालून आला परंतु त्याने त्याचा पराभव केला. तेव्हां पुतण्ये शरण आले; त्यांस त्याणें क्षमा केली. पुढें ते त्याच्याशीं इमानानें वागू लागले व त्यांणीं कित्येक शूरत्वाचीं कामें केलीं. पुढें माळव्याच्या मुसलमान राजाबराबर लढाइ झाल्या त्यांत ही त्याला जय आला. या प्रमाणें त्याणें कीर्ति संपादिली; परंतु गृहप्रपंचांत त्याला सुख नव्हतें. त्याचे पुत्र आपसांत कलह करीत, ती हकीकत फार चित्तवेधक आणि उपदेश घेण्यासारखी आहे; परंतु ती येथे देण्यास अवकाश नाहीं.

रायमल्ल सन १५०९ मध्यें वारला. त्याची कारकीर्द चांगली भरभराटीची झाली. त्यानंतर त्याचा पुत्र संगराणा गादीवर बसला. कर्नल टॉड ह्मणतात संगराण्याच्या वेळीं मेवाडची भरभराट शिखरास पोहोचली. मेवाडचे लोक असे ह्मणतात कीं उदेपूरच्या राण्यांनीं जें कीर्तिमंदिर बांधिलें त्यावर संगानें कळस चढविला आणि तेव्हांपासून त्या घराण्याच्या वैभवास उतरती कळा लागली. पुढील ऱ्हासकाळांत जरी मध्यंतरीं कांहीं कांहीं वर्णनीय गोष्टी झाल्या तरी निबिड अंधःकारांत वीज चमकली ह्मणजे क्षणमात्र आसमंतांतल्या वस्तु दिसतात आणि पुनः सारें शून्यवत् भासूं लागतें तशीच एकंदरींत ती स्थिति खरी.

संगराण्याचें वैभव कितो असेल याचें अनुमान पुढील एका गोष्टीवरून करतां येईल —तें लढाईस निघाला ह्मणजे सात मोठ मोठे राजे, नऊ राव, एकशेंचार रावळ व रावत आणि पांचशें लढाऊ हत्ती त्याच्या बराबर निघत. मारवाड आणि अंबर येथील राणे त्याला करभार देत होते; व ग्वाल्हेर, अजमीर, शिखरी, रायसेन, कालपी, चंदेरी, बुंदी, गोग्राज, रामपुरा व अबू येथील राव हे सारे त्याचे मांडलिक होते.

संगराणा चांगला राज्यकर्ता होता. गादीवर बसल्या बराबर आधीं त्याणें आपल्या घराण्यांत आपसांतील कलहामुळें जी अव्यवस्था झाली होती ती प्रथम मोडून टाकिली; नंतर आपल्या साऱ्या फौजेची व्यवस्था लाविली आणि दिल्लीहून व माळव्यांतून जे मुसलमान हल्ले करीत त्यांचा बंदोबस्त करण्याचें योजलें. अठरा लढायांत त्याणें त्यांचा पराजय केला; पैकीं बाकोल व घाटोली ह्या दोहोंत तर दिल्लीचा बादशहा इब्राइमखान लोदी स्वतः हजर

होता, परंतु पुढें प्रख्यात कीर्तिमान बाबर याणें स्वारी केली तेव्हां हिंदुस्था_ नांत हिंदूंचें वर्चस्व राहणार कीं तें मुसलमानांच्या भक्ष्यस्थांनीं पडणार तो नि काल होण्याचीच वेळ आली. प्रथम प्रथम तर जयश्री राण्यास सोडून जात नाहीं, असेंच दिसत होतें. इसवी सन १५२७ मध्यें फेब्रुआरी महिन्याच्या ११ व्या तारखेस शिखरी नजीक कनुवा येथें उभय सैन्यांच्या अघाडीस अ सलेल्या लोकांची गांठ पडून युद्ध सुरू झालें तेव्हां मुसलमानांच्या मुख्यसैन्यां तून त्यांस जरी मदत येऊन पोहोंचली तरी हिंदूंनीं मोठ्या निकरानें लढून त्यांचा पुष्कळच नाश केला, त्या मुळें ते मागें हटलेच. तो जर तशीच लग-ट करीत होता तर मोठेंच कार्य होत होतें. परंतु ती सोन्यासारखी संधी त्या णें फुकट घालविली. संग तितकाच थांबून छावणीस गेला, त्या मुळें बाब-राला पुष्कळ वेळ सांपडून चांगली जागा पाहून तेथें छावणीकरून सभोंतीं तटबंदी करावयास सांपडली. त्या योगानें मग त्यावर हल्ला करणें कठी ण झालें.

पुढें मार्चच्या १६ व्या तारखेस शेवटची लढाई झाली. बाबर आ-पली सारी फौज घेऊन निघाला आणि संगराणा बियाना येथें छावणी करून होता, त्याजवर जाऊन पडला. पुष्कळ वेळ पर्यंत युद्ध मोठ्या निकराचे, अगदीं भयंकर चाललें; तरी अमक्यासच जय येईल असें म्हणण्यास मोठी शं-काच वाटते होती. अशा समयीं संगाचा विनिवाला सिलैदी, रेसीन येथील सरदार शत्रुस सामील झाला. त्याच्या विश्वासघातामुळें राण्यास हटावें लाग-लें. ह्या लढाईंत त्याचें नुकसान ही बरेंच झालें. खुद त्याला नखम लागली आणि त्याच्या सरदारांतील पुष्कळ मोहोरे मोहोरे पडले. असें पराजित हो-ऊन चितूरांत कोण्या तोंडाने जावें, जयश्री मिळवीन तरच शहरांत पाऊल घालीन, असा निश्चय करून त्याणें मेवाडच्या डोंगराची वाट धरली. त्या ला जर आणखी थोडें आयुष्य असतें तर त्याणें ती प्रतिज्ञा खरी केल्या शि-वाय ठेविलीच नसती, परंतु भगवादिच्छे पुढे काय इलाज! त्याला त्याच वर्षी मृत्यूनें गांठलें. मेवाडच्या सरहद्दीवर बासवा येथें तो मेला. त्याला विष प्रयो-ग झाला असावा असा संशय आहे.

संगराणा इतर थोर पुरुषां पैकींच एक होता असें नाहीं. आज हिं-दुस्थानांत जीं राजघराणीं आहेत त्या सर्वांत फार प्राचीन, अशा श्रेष्ठ कुलां-त त्याचें जन्म असून तो स्वतः केवढा पराक्रमी महावीर होता हें वरील वृत्तां-

ता[illegible] दिसत आहे. यो कारणं त्याच्या देहाचें आणि गुणांचें जें हृदयंगम वर्णन आहे तें ही येथें दिलें असतां अप्रासंगिक होणार नाहीं असें समजून देत[illegible] टॉड म्हणतात, संगराणा शरीरानें मध्यमसर बांध्याचाच होता परंतु त्याच्या अंगांत शक्ति फार होती. त्याचा वर्ण गौर आणि डोळे फारच मोठे होते- विशाल [illegible] लक्षण तर त्यांच्या वंशजांस ही लागू आहे— त्या वीराचा देह जखमांनीं अगदीं छिन्न भिन्न होऊन गेलेला होता. एक डोळा भावा बराबरच्या तंटयांत गेला, एक हात दिल्लीच्या इब्राईमखान लोदी पादशहाबराबर लढतांना गेला होता, दुसऱ्या एका लढाईंत तोफेचा गोळा लागून एक पाय लंगडा झाला होता. कांहीं तलवारीचे वार आणि कांहीं भाल्याचे घाव मिळून ऐशीं जखमा लागल्याच्या खुणा अंगावर दिसतच होत्या. असा हा रणशूर पुरुष साहसी ही तसाच होता. त्याणें माळव्याचा मुजफर यास कैद केलें तेव्हां केवढ्या संकटांत उडी घातली होती तें सर्व प्रसिद्धच आहे. रिंठणबोर किल्ला म्हणजे अत्यंत दुर्गम असून बादशहाचा सेनापति अल्ली त्याचें रक्षण करीत असतां जो त्याणें हल्लाकरून आपला विजयध्वज नेऊन त्या वर उभारला त्या योगानें त्याची कीर्ति दिगंत झाली. कनुआ ही मेवाडची उत्तर सरहद्द करावी असा विचार ठरवून त्याणें तेथें एक लहानसा राजवाडा बांधून ठाणें घातलें. त्याच्या मागून गादीवर बसलेला त्याचा पुत्र त्याच्याच सारखा दूरदृष्टि आणि बुद्धिमान असता तर हिंदुस्थानांत बाबराच्या वंशाची सत्ता राहिलीच नसती.

संगराणा इसवी सन १५३० मध्यें वारला. तेव्हां त्याच्या अवशिष्ट पुत्रांतला वडील जो राणा रतन तो गादीवर बसला. त्याणें पांचच वर्षें राज्य केलें परंतु तितक्यांत बापाच्या वेळचा मुलुख कांहीं कमी न होतां बाबर निघून गेलेलें ही त्याला मरणापूर्वी आनंदानें पहावयास सांपडलें.

रतनराण्या नंतर त्याचा पुतण्या विक्रमाजित सन १५३५ यध्यें गादीवर बसला. हा पुरुष मोठा साहसी, अगदीं उलट या काळजाचा होता; परंतु त्याला अक्कल मुळीं नव्हती. गुजराथचा नबाब बहादूरशहा याणें त्याचा पराभव करून चितूराला वेढा घालून त्याला आंत कोंडलें. तेव्हां त्या राजधानीच्या संरक्षणा करितां लोक जिवावर उठून अतिशय निकरानें लढले, तरी शेवटीं शत्रूंनीं शहर घेऊन लुटलें. पुढें बहादूरशहास हुमायुना बराबर लढाईस जावें लागलें, तेव्हां विक्रमाजित राण्यानें चितूर तोडवून घेतलें. त्याबद्दल

येवढा मोठा प्रसंग येऊन गेला तरी त्याला नवीन ज्ञान कांहीं आलें नाहीं. आणि त्यांचें पहिलें तें कांहीं सुटलें नाहीं. त्याच्या उद्धटपणास त्रासून पदरच्या सरदारांनीं बंड केलें, त्याला पदच्युत करून ठार मारलें आणि बनवीर म्हणून संगराण्याच्या भावाचा अनौरस पुत्र होता त्याला राज्याधिकार चालवावयास सांगितलें. परंतु बनवीराला राज्योपभोग फार दिवस घडला नाहीं. संगराणा वारला तेव्हां त्याची एक राणी गरोदर होती तिला झालेला उदयसिंग हा णून पुत्र होता, तो मोठा झाला तेव्हां सन १५४१ । ४२ मध्यें आपला हक्क शाबीत करून सिंहासनावर बसला. हा राणा अगदीं मेषपात्र, दुसऱ्याच्या तंत्रानें वागणारा होता. असलीं कळसूत्री बाहुलीं नाचविण्यास निःशंक, साहसी मनुष्य तेव्हांच जमतात, या प्रमाणें उदयसिंगा सभोंते ही सूत्रधार मिळाले. त्याच्या कारकीर्दीत सन १५६८ मध्यें अकबर बादशाहानें चित्तूर घेण्याकरितां स्वारी केली. तेव्हां देखील ती राजधानी संभाळण्या करितां लोकांनीं जिवाकडे न पहातां पूर्वी प्रमाणें आपल्या शौर्याची कमाल केली, परंतु त्यांस यश आलें नाहीं. शहर गेलें तेव्हां राणा पळून राजपिपळ्याच्या रानांत शिरला आणि चार वर्षांनीं तिकडेच मेला. याची कारकीर्द दुःखाची आणि अपकीर्तीची झाली.

याचा पुत्र राणा प्रतापसिंग गादीचा अधिकारी होऊन आपल्या पूर्वजांचे मान पान, हक्क, राजचिन्हें वगैरे सर्व अनुभवूं लागला, परंतु त्याची विपत्ति काय सांगावी! त्याला महाराणा हें थोरलें नांव मात्र होतें, परंतु रहाण्याला राजधानी शहर नाहीं, खर्चास पैसा नाहीं, जवळ मनुष्य नाहीं; आप्त, इष्ट, बंधुवर्ग, सारे शत्रूच्या त्रासाने उदासीन आणि हतवीर्य होऊन गेलेले. तथापि त्याच्या अंगांत आजोबाचे पुष्कळ गुण होते, ते पाहून त्याच्या पदरच्या सर्व रजपुतांस स्फुरण आलें. त्याणें मोठी हिम्मत धरून पदरचे लहान थोर सरदार, मानकरी, एकत्र जमविले व ते मनापासून झटून मदत करूं लागले. त्याणें कोमळमेरांत राहून आपल्या मुलखाची पुनःनीट व्यवस्था लाविली आणि नंतर शत्रूवरावर पुष्कळ दिवस लढतां येई अशी तयारी चालविली. राजपुतान्यांतील इतर थोर थोर राजांनीं दिल्लीच्या मोगलबादशहाशीं शरीरसंबंध केला आणि आपलें हित साधून घेतलें. जोधपूरच्या राण्याला फक्त व्याहीपणामुळें सोळालक्ष वसुलाचे चारप्रांत मिळाले. अशी जरी राजेलोक सहज संपत्ति मिळवीत होते आणि प्रतापसिंगाला चरितार्थ चालण्याची पंचाईत पड-

त होती तरी त्याणें आपला अभिमान सोडला नाहीं. तो म्हणें संपत्ति आणि सुख यांच्या लोभानें मी आपल्या थोर कुलाला कलंक लावणार नाहीं. ह्या सद्वर्तनाचें फळ त्याला कधींच आलें नाहीं असें कसें होईल? अकबराच्या पुत्राची आणि त्याची इसवी सन १५७६ मध्यें हळदी घांटच्या मैदानांत मोठीच लढाई होऊन त्याचा फार नाश झाला, व पुढें आणखी ही पुष्कळ झटापटी झाल्या, त्यांत ही दुर्दैवानें त्याला सोडलेंच नाहीं. तेव्हां त्रासून अगदीं निराश होऊन, त्रायकामुळें आणि जे चार जिवास जीव देणारे इष्टमित्र अजून ही अनुकूल होते त्यांनां समागमें घेऊन मेवाडदेश सोडून जावें आणि अटकनदीच्या तीरीं नवीन राज्य स्थापावें असा संकल्प करून तो निघाला देखील. परंतु अशा प्रसंगीं त्याच्या एकनिष्ठ प्रधानानें आपली अपूर्व स्वामिभक्ति प्रकट करून शत्रूशीं उत्साहानें लढण्याचें साधन त्याच्या हातीं आणून दिलें. त्याबराबर शत्रूवर उलटून त्यांच्या पिछाडीस त्याणें लांडगेतोड चालविली; आणि सन १५८६ मध्यें एका लहानशा मोहिमेंतच चितूर, अजमीर, आणि मंडळगड शिवाय करून सारें मेवाड पुनः काबीज केलें. चितूर मिळण्याची निराशा झाली तेव्हां त्याणें उदेपूर ही नवीन राजधानी केली. पुढें त्या शहाराच्या नांवावरून साऱ्या राज्याला तेंच नांव पडलें. हा प्रतापसिंगराणा सन १५९७ मध्यें वारला. तो मोठा शूर, त्याचें धैर्य कधीं न ढळणारें, त्यामुळे पराक्रम अधिकच उज्वलित दिसे. तो मोठा दृढनिश्चयी होता अशी त्याची अद्याप कीर्ति आहे.

प्रतापसिंगा नतर त्याचा वडील पुत्र राणा अमरसिंग उदेपूरच्या सिंहासनावर बसला. परंतु तो सारा दिवस सुखोपभोगांत घालवी आणि आपल्याच आढचतेंत असे. ह्या गुणांचें आणि वीरश्रीचें अगदीं वैर. तरी त्याच्या हातून कांहीं महत्कृत्यें घडलीं. सन १६०८ मध्यें देवैर येथें त्याणें बादशाही फौजेचा पराभव केला. जहानगिरानें तो द्वेष मनांत राखून त्याचा सूड उगवण्या करितां चितूर शहर सगर राण्याच्या स्वाधीन केलें. सगरसिंग राण्याचा चुलता, परंतु फितूर होऊन तिकडे गेलेला होता. पण बादशहाचा तो डाव नीटला साधला नाहीं. कारण सगरसिंगानें चितूरांत जरी आठवर्षे अम्मल केला तरी तो एकांतवासी असल्या सारखा होता. त्याला कोणी एक देखील सरदार अनुकूल झाला नाहीं. मग त्याचें मनच त्याला खाऊं लागून तो मुकाटयानें चितूर अमरसिंगाच्या स्वाधीन करून निघून गेला. चितूर ब-

रावर मेवाडांतील दुसरे ८० किल्ले राण्याच्या हातीं आले.

येथपर्यंत राण्याच्या सुदैवानें बरेंच चालले, परंतु पुढें त्याच्यावर मोठेंच संकट आलें, त्यांत त्याचा निभाव लागेना. जहानगिराचा पुत्र शहाजादा करीम अपार सैन्य घेऊन त्याच्यावर चालून आला. तेव्हां त्याणें ही तयारी चालवून मिळाली तितकी फौज मिळविली. त्याचे शिपाई या डोंगरी मुलखांतले चांगले निवडक होते, परंतु मोंगलांच्या त्या अफाट फौजेपुढें त्याचा टिकाव लागेना. आपलीं शहरें गेलीं, किल्ले गेले, मुलुख ओसाड पडला, असें पाहून राण्यानें तहाचें बोलणें लाविलें. तें मान्य होऊन पुढे जो प्रकार झाला तो खुद्द जहानगीर बादशहानें असा लिहून ठेविला आहे. "तारीख २६ रविवार रोजीं आमच्या इतर मांडलिक राजां प्रमाणें अदबीने, दरबारच्या रीती प्रमाणे अमरसिंग राण्यानें माझ्या पुत्राच्या भेटीस येऊन नजर नजराणा दिला. त्यांत त्याच्या घराण्यांत असलेलें थोरलें, प्रसिद्ध माणीक*, वर सोन्याचें काम केलेलीं पुष्कळ तऱ्हेतऱ्हेचीं हत्यारें, त्याच्या जवळचे सारे लढाईत जाऊन शेष राहिलेले सात बहुमोल हत्ती आणि नऊ घोडे आले. माझ्या मुलानें त्याची भेट चांगली सन्मानानें घेतली. तेव्हां राणा त्याच्या पायां पडून म्हणाला आतां क्षमाकरा. त्याणें त्याला वर उठवून अभय दिलें आणि सर्व प्रकारें रक्षण करण्याचें वचन देऊन उलट एक हत्ती, घोडे, तलवार व पोषाक देऊन निरोप दिला.

शहाजहानानें त्याच्याशीं पुढील वर्तन ही मोठ्या उदारपणाचें ठेविलें. अकबराच्या वेळेपासून जितका मुलुख जिंकून घेतलेला होता तितका सारा त्याला परत देऊन त्याचा पुत्र कर्ण यास आपल्या पदरच्या जाहागीरदारांत मोठ्या पदवीस चढविलें.

या प्रमाणें अमरसिंग राण्याच्या कारकीर्दीत उदेपूर राजघराण्याच्या स्वातंत्र्याचा क्षय होऊन सर्वस्वीं मानहानि झाली, म्हणून त्याचें मन अगदीं उद्विग्न होऊन गेलें. तो शोकसमुद्रांत बुडाल्यासारखा होऊन लौकरच सर्वस्व

---

* हें माणीक मोठ्या खारके येवढें, लाखों रुपये किंमतीचें आहे. तें ज्या ज्या राजकुलांत गेलें त्याचा त्याचा वैभवनाश झाला असें अपयशी आहे असा या विषयीं लोकप्रवाद आहे. थोड्या वर्षांपूर्वी एक व्यापारी हें खरे दी घेऊन अफगाणिस्थानांत गेला.

पुत्राच्या स्वाधीन करून उदेपूर शहरा बाहेर दूर अर्ध कोसावर एक वाडा होता त्यांत जो एकदां शिरला तो आमरण उंबरठ्या बाहेर आलाच नाहीं. खरेच आहे.

सतां माने म्लाने मरणमथवा दूरगमनम्

कर्णराजाला सन १६२१ मध्यें पितृपद प्राप्त झालें. पुढें शहाजादा करीम (शहाजहान) याणें बापाशीं विघडून बंड केलें तेव्हां कर्णानें त्याचा पक्ष घरून उदेपुरांत त्याला आश्रय दिला; परंतु जहानगीर बादशहानें त्या बद्दल रोष मानला नाहीं. कारण आपल्या बापावर पूर्वी करीमानें जो उपकार केला होता तो स्मरून कर्ण त्याच्या उपयोगीं पडला हें त्याणें रास्तच केलें. कर्णराजा सुखानें राज्य करून सन १६२८ मध्यें वारला.

कर्णानंतर त्याचा पुत्र जगत्सिंग गादीवर बसला. हा राणा अल्पवय स्क बारा वर्षांचा बाळ असतां बादशहाच्या भेटीस प्रथमच गेला तेव्हां त्याच्या विषयीं जहानगीर बादशहानें बखरींत असें लिहून ठेविलेलें आहे– "हा मुलगा सत्कुलोत्पन्न असावा असें त्याच्या मुखचर्ये वरूनच सहज मनांत येतें" जगतसिंगराण्याच्या कारकीर्दीचीं २६ वर्षें आरंभा पासून अखेर पर्यंत अव्याहत शांततेंत गेलीं. उदेपुरांत त्याच्या नांवानें प्रसिद्ध अशीं जीं मोठमोठीं कामें आहेत तीं ह्या कालांत तयार झालीं. त्यांचें सविस्तर वर्णन कर्नल टॉड यांणीं आपल्या राजस्थानाच्या इतिहासांत केलें आहे कर्नल म्यालीसन ह्मणतात मीं तीं कामें पाहिलीं तेव्हां तें वर्णन अक्षरशः खरें आहे अशी माझी खात्री झाली.

जगतसिंगाचा पुत्र राणा राजसिंग हा सन १६५४ मध्यें गादीवर बसला. त्याच्या अंगांतील स्वकुलोचित अभिमान आणि शौर्य तेव्हांच दिसून आलीं. जोधपूरच्या राण्याची कन्या वरण्याचें मनांत आणून औरंगजेब बादशहानें मागणी घातली, तेव्हां बापाचा रुकार पडणार असे दिसलें आणि त्या मुळें त्या मानिनीला फार दुःख वाटलें. त्या संकटांतून पार पडण्याचा दुसरा कांहीं उपाय दिसेना, तेव्हां तिणें राजसिंगराण्याला असा निरोप पाठविला "हंसी बगळ्यानें न्यावी हें उचित काय? आपल्या सारखे शस्त्रपाणि, क्षत्री यवीर असतां मज सारख्या सत्कुलोत्पन्न अबलेला या माकडतोंड्या मुसलमानाच्या पदरीं पडण्याचा प्रसंग यावाना?" या प्रमाणें स्फुरण आणणारी दीनवाणी कानीं पडतांच राणा तयारी करून तसाच निघाला आणि बादशहानें

नवरीला आणण्या करितां ह्मणून जी हुजरात पाठविली होती तिच्यावर हल्ला करून, तिची दाणादाण उडवून देऊन, त्या स्वयंवरेला तोषवीत तिजसह आनंदानें गृहप्रवेश करिता झाला.

ह्या गोष्टीनें औरंगजेबाशीं सहजच वैर उत्पन्न झालें, आणि पुढें कांहीं दिवसांनीं त्याणें एक अगदींच गैर वाजवी गोष्ट केली, तीं वरून प्रकरण निकरावर आलें. तो प्रकार असा—इसवी सन १६७६ मध्यें या धर्मवेड्या बादशहानें जेझीया नांवाचा कर पुनः सुरू केला. परंतु ही डोईपट्टी मुसलमान शिवाय करून इतर धर्माच्या लोकांवर मात्र बसविली. ह्या त्याच्या धर्मकृत्यानें सर्व हिंदु लोकांनां मोठी चिरड आली आणि त्यांच्यांत प्रमुख,सर्वांत श्रेष्ठ, जो उदेपूरचा राणा तो तर फारच चिढला. अशा स्थितींत मनुष्याच्या मनाची वृत्ति शांत रहाणें कठोण, तरी त्याणें तीं क्षुब्ध होऊं न देतां औरंगजेबाला एक उत्कृष्ट पत्र लिहिलें. परंतु तो खळ त्याचा विचार न करितां विलक्षण संतप्त मात्र झाला. औरंगजेबाचा स्वभाव खुनशी आणि हट्टी, त्यामुळें तो आपलेंच ह्मणणें धरून बसला, आणि आपल्या साऱ्या पुत्रांनां व सरदारांनां साऱ्या सुभ्यांतून फौजांनिशीं बोलाऊन आणून उदेपुरावर चालून गेला. असा प्रसंग बेतला, परंतु त्याचे सरदार,शिपाई, वगैरे सारे घटलेले हो ते ह्मणून राजसिंग डगमगला नाहीं. औरंगजेबाची विनी येऊन दाखल होतांच मागें हटत हटत तो त्याला बिकट जागेंत घेऊन गेला आणि मग तेथून उलटून त्याच्या वर तुटून पडला; तेव्हां मुसलमानांचा मोड झाला. असे त्याणें आणखी पुष्कळ मोठ मोठाले जय मिळवून औरंगजेबाला आपल्या मुलखांतून हांकून लाविलें आणि पुढें त्याच्याच राज्यांत लढाई मांडली. या प्रमाणे औरंगजेबाची खोड बरीच मोडली तेव्हां तह झाला. त्यांत इतक्या तंट्याला मूळकारण जेझीया ह्मणून जी डोईपट्टी ती बसविण्यास आपल्याला अधिकार नाहीं असें औरंगजेबानें कबूल केलें. आपण केलेल्या श्रमाचें सार्थक होऊन आलेलें फळ उपभोगण्यास आधार हा तह झाला याचा आनंद मानून पुढें सन १६८१ मध्यें राणा राजसिंग मरण पावला. युद्धाचा उत्साह, कलाकौशल्याची हौस वगैरे मनुष्याला भूषण देणारे गुण त्याच्या अंगीं होते असें ह्मणतात.

मेवाडांत सन १६६१ मध्यें दुष्काळ पडला होता तेव्हां लोकांनां काम मास लाऊन राजसिंगानें कंकराळीचा सुंदर तलाव संगमवरी दगडाचा बांध

घालून बांधला. त्याचा परिघ १२ मैल असून तो बांधण्यास ९६ लक्ष रुपये लागले.

राजसिंगा नंतर त्याचा पुत्र जयसिंगराणा गादीवर बसला. वर सांगितलेला औरंगजेबा बराबरचा तहनामा याच्या सहीचा होता. हा जयसिंग लहानपणीं चांगला बुद्धिमान दिसत होता; परंतु मोठा झाला तसा आळशी आणि स्त्रीलंपट बनला. त्याची बहुतेक कारकीर्द फक्त घरगुती भांडणांत आणि तंटयांत गेली. जयसमंद ऊर्फ देवर ह्मणून साऱ्या हिंदुस्थानांत मोठा तलाव आहे तो ह्या जयसिंगानें बांधला. त्याचा परिघ ३० मैल आहे. तो सन १७०० मध्यें वारला तेव्हां त्याचा पुत्र अमरसिंग गादीवर बसला. हा जयसिंगाशीं बिथरून बेबनावानें होता.

हा दुसरा अमरसिंग राणा १६ वर्षें गादीवर होता. त्याच्या कारकीर्दीत मुख्य गोष्ट ह्मटली तर मुसलमानां पासून आपलें संरक्षण करावें ह्मणून रजपूत राजांनीं आपसांत ऐक्य असावें असा ठराव केला. परंतु हें ऐक्य जमून येण्यास परस्पर ज्या अटी ठरल्या त्या वरकांति दिसण्यांत जरी चांगल्या होत्या तरी त्यांत पुढें आपसांत विशेषच कलह उत्पन्न व्हावे असेंच बीज होतें. तें त्यावेळीं कोणाच्या लक्षांतच आलें नाहीं किंवा काय झालें तें कळत नाहीं. अमरसिंग हयात असे पर्यंत त्या ठरावा* प्रमाणें सर्व कांहीं सुसूत्र च

---

* हा ठराव जयपूर व जोधपूरवाले उभयतां महाराज एका पक्षास आणि उदेपूरवाले दुसऱ्या पक्षास, असा त्रिवर्गांमध्यें झाला. त्यांत मुख्य कलमें अशीं होतीं—मोगल बादशहाशीं घरगुती किंवा राजकीय प्रकरणीं कोणता ही संबंध कोणी ही ठेऊं नये. अकबराच्या वेळे पासून उभयतां महाराजांशीं राणे शरीर संबंध करीनासे झाले होते, परंतु आतां त्यांणीं ती अट सोडावी. उदेपूर घराण्यांतील मुली या दोन घराण्यांत दिल्या असतां पहिले कुटुंबापासून झालेले पुत्र असले तरी त्यांस बाजूस ठेऊन त्यांच्याच पुत्रांस गादीस वारस करावे; व मुली झाल्या असतां त्यांनां मोगलांच्या घरीं देऊन अपमान करणें असली गोष्ट कधीं ही करूं नये. या प्रमाणें ऐक्य होण्या करितां जो उपाय योजला त्यापासून पहिल्या पेक्षां अधिकच विघाड मात्र होऊं लागला. कारण ह्या ठरावानें कित्येक वडील पुत्रांचा गादीवर बसण्याचा हक्क नाहींसा होऊन घरांत तंटे माजले. तेव्हां कोठें मध्यस्थ ह्मणून व कोठें सा

लले होतें, परंतु तो सन १७१६ मध्यें वारला त्या बराबर त्या वीजास अंकुर आले. मग कलह्याचें पीक येऊन तंट्यांत जो हरेल किंवा निर्बल होईल त्याणें तिसऱ्या एकाद्या बलाढ्य राजास आपल्या मदतीस बोलवावें आणि दोघांच्या भांडणांत तिसऱ्यास लाभ व्हावा असें होतां होतां उदेपूर घराण्यांचें केवढें नुकसान झालें तें पुढें दिसेल.

अमरसिंगाचा पुत्र राणा संग्रामसिंग याणें इसवी सन १७३४ पर्यंत राज्य केलें. मेवाड पैकीं पूर्वी गेलेला बराच मुलुख ह्याच्या कारकीर्दीत परत येऊन उदेपूरची प्रतिष्टा चांगली राहिली. हा राणा आपल्या प्रजेला मुला प्रमाणें मानणारा, शहाणा, न्यायी, मनाचा निग्रही, सारखा झटून काम करणारा आणि जमाबंदीच्या कामांत उत्तम होता. त्याच्या सुदैवानें बहिरीदास पंचोली झणून त्याला जो प्रधान मिळाला होता तो ही उत्तम होता.

संग्रामसिंगा नंतर त्याचा पुत्र दुसरा जगत्सिंग राणा झाला. अमरसिंग राण्यानें इतर रजपूत राजां बराबर पूर्वी स्वसंरक्षणार्थ तह केला होता तसा ह्यानें केला. हा ख्यालीं खुशालीचा फार भोक्ता होता; मग राज्यकारभार करण्याचें कोठून आठवणार! हातांत शस्त्र घेऊन रणभूमीवर उभें राहून शत्रूशीं सामना करण्या पेक्षां दूरून हत्तीची लढाई पहाण्याची याला विलक्षण हौस होती असें झणतात. त्यामुळें अर्थातच मेवाडच्या राज्यश्रीला फार जबर क्षय लागला. राजस्थानांतिल लहान थोर राजे एकमेकांवर चढाओढ करूं लागले त्या मुळें रजपुतांत ऐक्य नाहींसें होत चाललें. त्या फेऱ्यांत हा प्रथम सांपडला. नंतर मराठ्यांची सत्ता वाढत जाऊन त्यांनां अधिकाधिक धाष्टर्य येऊं लागलें तस तसा त्यांचा उपद्रव जास्त होऊं लागला. आणखी एक गोष्ट झाली, ती ह्या सर्वांवरची आपल्या पूर्वजां प्रमाणें रजपूत शिपायांच्या शौर्यावर भरंवसा ठेवण्याचें सोडून जगतसिंग जेव्हां तेव्हां मल्हरराव होळकराला आपल्या साठीं लढण्याला बोलाऊं लागला. ह्या कारणांनीं राजस्थानांत मराठ्यांचा अम्मल बसत चालला, आणि सन १७५२ इसवींत जगतसिंग राणा मेला तेव्हां तर त्याणीं पुरें ग्रासले

त्या नंतर दुसरा प्रतापसिंग नामक राणा गादीवर बसला. त्याची का-

हाय्य कर्ते झणून असा मराठ्यांचा पाय शिरकला. एकदां प्रवेश झाला झणजे सारे व्यापून कसें बसावें हें त्यांनां तर कोणी सांगायाला नकोच होतें.

रकीर्द सारी तीन वर्षांची, परंतु ती देखील अपकीर्तीची झाली. त्याच्या अमलांत सठवोजी, जनकोजी, व रघुनाथराव ह्यांनीं स्वारीवर स्वारी करून उदेपुराला सारखा उपद्रव दिला. नंतर सन १७९९ मध्यें त्याचा पुत्र दुसरा राजसिंग नामक राणा झाला. त्याणें सात वर्षें राज्य केलें. तितक्या कालांत मराठयांच्या लढायां मुळें व त्यांणीं खंडण्या बसविल्या मुळें राज्य इतकें ओढघस्तीस आलें कीं राणा राहटोर राजकन्येशीं लग्न करणार होता तें खर्चास पैसा नाहीं ह्मणून नडलें; तेव्हां खंडणीचा पैसा वसूल करण्या करितां जो ब्राह्मण राहिला होता त्या जवळ तोंड पसरून कृपा करून कार्यास हात लावा असें ह्मणावें लागलें. मेवाडची या पेक्षां आणखी निकृष्टावस्था ती काय व्हावी!

रामसिंगा मागून त्याचा चुलता अरसीसिंग हा सन १७६२ मध्यें गादीवर बसला. ह्या राण्याचा स्वभाव अनावर आणि पदरच्या थोरथोर सरदारांशीं देखील वर्तन उद्दामपणाचें असल्या मुळें तें राज्याचें मूर्तिमंत दुर्दैवच उभें राहिल्या सारखें झालें. गादीवर खरा हक्क माझा आहे असें ह्मणून एक तो तया उभा राहिला. त्याला सामील होऊन सरदारांनीं बंड केलें. असा आपसांत कलह माजलेला पाहून शिंदे, होळकर, व जोधपूरवाले यांणीं त्या पासून आपलें हित करून घेतलें. अरसीसिंगानें दहा वर्षें राज्य केलें, तितक्यांत मेवाडपैकीं उत्कृष्ट असे सहा प्रांत लढाईंत गमावले; शिवाय खंडणी बद्दल फार पैसा द्यावा लागला. अमरचंद ह्मणून एक मोठा सावकार होता, त्याच्या प्रामाणिकपणानें व धाडसाच्या कृत्यामुळें त्या तोतयाचा पराभव होऊन अरसीसिंगास जय मिळाला. परंतु त्याणें आपल्या क्रूरपणानें आणि उद्धटपणानें लोकांनां जो त्रास आणला होता त्याचें फळ त्यास भोगावें लागलें. सन १७७२ मध्यें एका असामीनें भाला मारून त्याचा प्राण घेतला.

अरसीसिंगाचा पुत्र राणा हमीर हा त्याच्याच सारखा हतभाग्य होता. त्याच्या कारकीर्दीत मेवाडचा खरावा फारच झाला. रणभूमि रक्तमय झाली आणि यःकश्चित मनुष्यांनीं स्वाऱ्या करून मुलुख लुटून उद्ध्वस्त करून सोडला. परकीयांच्या स्वाऱ्या आणि स्वकीयांचें बंड, असा स्वचक्रपरचक्राचा फेरा एककालीं सारखा चालला होता. तरी अमरचंद जिवंत असे पर्यंत तो दोहींचा ही बंदोबस्त करीत होता. परंतु तो मेल्यावर स्थिति फारच बिघडली आणि कोणीच आवरता नाहींसा होऊन आणखी सहा प्रांत गेले. त्या-

ची गोष्ट काय सांगावी ! राण्याची गादी हें नांव मात्र, 'एकंदर' हुकूम काय-तो अमरचंद कारभाऱ्याचा. अशी जरी स्थिति होती तरी तो किती निर्लिप्त-पणानें वागत होता याचें अनुमान पुढील एका गोष्टी वरून करतां येतें—तो वारला तेव्हां दहनाला पुरेसा पैसा कांहीं त्याच्या जवळ निघाला नाहीं.

हमीर राण्या नंतर त्याचा भाऊ राणा भीमसिंग गादीवर बसला [स-न १७७८] यानें गादीचा उपभोग फार काळ पर्यंत, पुरीं पन्नास वर्षें के-ला. लोकांचें म्हणणें असें आहे कीं, भीमसिंगानें आपल्या कारकीर्दींत जित-क्या उलाढाली आणि दुर्दैवाचे फेरे पाहिले तितके त्या थोर राजकुलांतील अन्य कोणत्याच पुरुषानें पाहिले नसतील. ही गोष्ट अगदीं खरी आहे. तो गादीवर बसल्या पासून इंग्लिशांच्या मराठ्यांच्या युद्धाचा अखेर निकाल ला-गे पर्यंत त्याच्या मुलखाला पूर्वी भावाच्या आणि बापाच्या कारकीर्दींत जसा उपद्रव होत होता तसाच होत होता, त्यांत कांहीं कमी पडलें नाहीं. मध्यतरीं त्याला बरे दिवस आलेच नाहींत असें नाहीं, परंतु ते अगदीं थोडे आणि केव्हां तरी येत. लॉर्ड लेक आणि वेलेस्ली यांणीं शिंदेहोळकरांचा, गिच्छा पुरवला तेव्हां भीमसिंगाला चार दिवस विश्रांति मिळाली असेल असें कोणा-च्या मनांत येईल तर तो अगदीं भ्रम आहे. ज्याशीं आपला संबंध नाहीं त्या च्या कामांत उगाच ढवळाढवळ करावयाची नाहीं अशी त्या वेळची लार्ड का र्नवालीस यांची राजनीति असल्यामुळें राजस्थानांत शिंदे, होळकर, अमीरखान पठाण आणि नंतर पेंढारी यांणीं धुमाकुळ मांडला होता. त्या योगानें शेव-टीं भीमसिंग राणा, जो साऱ्या हिंदुस्थानांत श्रेष्ठ कुलोत्पन्न, तो इतक्या विप-त्तीस येऊन पोहोंचला कीं त्याला खरोखर अन्नाची पंचाईत पडूं लागली. अ शा समयीं कोटयाच्या राज्याचा संरक्षक झालीमसिंग यानें त्याच्यावर कृपाक-रून चरितार्था पुरती महिना हजार रुपयांची नेमणुक करून दिली. इतक्या निकृष्टावस्थेस तो येऊन पोहोंचला तेव्हां त्याच्या पदरचे मानकरी,सरदार,जाहागी-रदार, हेच त्याची अवहेलना करूं लागले. त्यांत जे बलवान होते ते आप-आपल्या किल्यांत जाऊन आपल्या तेवढ्या मुलखाचा बंदोबस्त करूं लागले, परंतु त्याच्या राज्याची काळजी कोणीच करीना. इतकेंच नव्हे, त्यांतील सा धला तितका मुलुख त्यांणींच बळकावला.

ही शोचनीय स्थिति सन १८१७ मध्यें पेंढाऱ्यां बराबरची लढाई संपे पर्यंत अशीच चालली होती. या मोहिमेंत इंग्रजांचें सैन्य मेवाडांत शिरलें आ

ण पहातात तर जिकडे तिकडे शेतें ओसाड पडलेलीं, शहरें उद्वस्त झालेलीं, राण्याचा हुकूम कोणी जुमानीत नाहीं, लोकस्थिति नीट रहाण्याचीं सर्व साधनें बिघडलेलीं, आणि राज्यव्यवस्था उत्तरोत्तर कांहीं नाहीं अशी होत चाललेली. इंग्रजांनीं मेवाडची अशी दुर्दशा उडालेली पाहिली तेव्हां आतां स्थिति सुधारणें जरूर आहे असें वाटून त्यांणीं तें राज्य आपल्या संरक्षणाखालीं घेण्याचें योजलें. मग राण्याचें व त्यांचें बोलणें होतांच त्यांणीं त्याच्या पदरच्या सर्व सरदारांस एकत्र जमवून असें ठरविलें कीं त्यांणीं राण्याच्या मुलखा पैकीं जो भाग बळकाविला असेल तो सोडून द्यावा, व त्याणें त्यांचे हक्क पूर्वीं प्रमाणें चालवावे. राण्याचा इंग्रज सरकाराशीं ठराव असा झाला–त्याणें त्यांचें वर्चस्व कबूल करावें, राज्यप्रकरणीं दुसऱ्या कोणाशीं पत्रव्यवहार ठेऊं नये, जे तंटे असतील ते इंग्रज सरकारच्या मध्यस्थीनें संपवून घ्यावे आणि पांच वर्षें पर्यंत आपल्या वसुला पैकीं चौथाई व पुढें सतत सहा आणे खंडणी म्हणून प्रतिसाल द्यावे. हा तह तारीख १३ जानेवारी सन १८१७ रोजीं होतांच पुढच्या महिन्यांत मराठे, पेढारी, इतर लुटारू, चटसारे इंग्रजांनीं मेवाडांतून हांकून काढले.

इंग्रज सरकारांतून उदेपूरच्या दरबारीं एजंट म्हणून प्रथम कर्नल टॉड यांची नेमणूक झाली. मग मेवाडाला परशत्रूचें वारें लागेनासें झालें, परंतु राज्यव्यवस्था मुळापर्यंत सारी भलतीकडे बिघडून गेलेली असल्यामुळें एजंट साहेबांस सर्व सूत्रे आपल्या हातीं घ्यावीं लागलीं. मग त्यांणीं जी सुधारणा सुरू केली तिच्या योगानें तीन वर्षांत प्रजा सुखी होऊन जमाबंदी दुप्पट वाढली.

या प्रमाणें राज्यकारभार सुरळीत कसा चालवावा आणि त्या योगानें देशाचें हित किती होण्या सारखें आहे तें प्रत्यक्ष निदर्शनास आणून देऊन टॉड साहेबांनीं सरकारच्या हुकमानें पुनः सर्व मुखत्यारी उदेपूर दरबाराकडे सोंपविली परंतु त्यांनां तीं सूत्रें वागवितां आलीं नाहींत. पुढें दोन वर्षें लोटलीं नाहींत तों पुढचा ही वसूल आगाऊ घेऊन, तो खर्चून शिवाय भारी कर्ज होऊन बसलें. इंग्रज सरकारची वार्षिक खंडणी द्यावयाची तीं ही पोहोचली नाहीं. तेव्हां सरकारास पुनः कारभार आपल्या हातांत घ्यावा लागला. मग सर्व सुयंत्रचालूं लागलें. सारी व्यवस्था चांगली लागली तेव्हां सन १८२६ मध्यें सरकारानें पुनः कारभार पूर्वीं प्रमाणें दरबाराकडे सोंपविला. परंतु तेथें काय!

ये रे माइया मागल्या. मागच्या खेपेस दोन वर्षें तरी गेलीं होतीं, पण आतः थोडक्याच महिन्यांत सारी अव्यवस्था होऊन पूर्वास्थिति आली. जमाबंदींत तूट पडून सन १८१८ मध्यें टॉड साहेब कारभार पाहूं लागण्या पूर्वीं जितका वसूल होता तितका होऊं लागला. एटचिसन साहेबांनीं असें लिहिलें आहे कीं थोडक्याच महिन्यांत उधळपट्टी व जुलूम यथापूर्व सुरू झालीं. वाटसरास रस्त्यानें एकटें जाणें दुरापास्त झालें.

भीमसिंग राणा या नंतर लौकरच म्हणजे सन १८२८ मध्यें वारला. त्याला ९५ मुलें झालीं, त्यांत कृष्णाकुमारी नामक एक अनुपम लावण्यवती कन्या होती. तिला सन १८०६ मध्यें १६ वें वर्ष लागलें, तेव्हां ती आपल्यास मिळावी म्हणून जयपूर व जोधपूर येथील राजांनीं मागणी घातली. पुढें त्या तंटयांत शिंदा व अमीरखान पठाण पडले आणि लढाया होऊन शेवटीं कृष्णाकुमारी विषप्रयोगानें मेली तेव्हां तें प्रकरण संपलें. तो हृदयभेदक गोष्ट सुप्रसिद्धच आहे. त्या वेळीं बापूरावळाच्या वंशाचा क्षय होवो असा शाप झाला. त्या प्रमाणें अनुभव आला खरा. भीमसिंगाचीं इतकीं मुलें, पण तीन शिवाय करून बाकी सारीं त्याच्या देखत मेलीं. त्या तिहींत दोन मुली आणि एक मुलगा होता. तो निपुत्रिकच मेला. त्याच्या मागून जे राणे झाले ते अपुत्रिकच मेले.

भीमसिंगा नंतर त्याचा पुत्र जवानसिंग गादीवर बसला त्याच्या अंगांत गुण म्हणण्याला एक ही नव्हता ; दुर्गुण पुष्कळ, भरले होते, आणि हलकट पणाचे उद्योग करण्याची संवय पुष्कळ होती. अशा राण्याच्या कारकीर्दीत राज्याची भरभराट कितपत झाली असेल तें अनुमान सहज करतां येतें. थोड्याच वर्षांत इग्रज सरकारास खंडणी द्यावयाची रक्कम वेळोवेळीं न पोचल्यानें बाकी फार तुंबली; कर्जाचें ओझें मोठें झालें आणि दरसाल दोन लाखांची जमाबंदींत तूट पडूं लागली. या प्रमाणें राजकारभारांत फारच अव्यवस्था झाली तेव्हां राण्यास सरकारांतून ताकीद झाली कीं तहनाम्या प्रमाणें ठरलेली रक्कम आपल्या कडून वेळच्यावेळीं न पोहोंचेल तर तिच्या फेडी करितां तितक्या वसुलाचा मुलुख द्यावा लागेल किंवा दुसरें कांहीं योग्य तारण लाऊन द्यावें लागेल.

ही ताकीद झाली त्याच वर्षीं म्हणजे सन १८३८ मध्यें राणा जवानसिंग मरण पावला. त्याला औरस संतति नव्हती म्हणून त्याचा दत्तक पुत्र

राणा सरदारसिंग गादीवर बसला. तो निष्ठुर, उद्धट आणि आपल्या पदरच्या सरदारांस फारच अप्रिय होता. तो बापाच्या वेळच्या ऋणांतून मुक्त होण्यापूर्वीच सन १८४२ मध्यें निवर्तला.

सरदारसिंगा नंतर त्याचा धाकटा भाऊ राणा सरूपसिंग गादविर बसला. तो पैशाच्या पेंचांत होता; त्याची मुक्तता करावी ह्मणून सन १८४६ च्या जून महिन्यांत सरकारानें उदेपूरची खंडणी दोन लाख रूपये घेण्याचें ठरवून बाकी रक्कम माफ केली. सरूपसिंगानें नऊ वर्षें राज्य केलें. परंतु त्याची कारकीर्द पदरच्या सरदारांशीं लढण्या भांडण्यांतच गेली. हे बहुतेक सरदार पूर्वीच्या राण्यांचे वंशज असून त्यांचे कांहीं विशेष हक्क होते, ते हा राणा बुडवूं पहात होता. अखेर त्या तंटयांचा शेवट सन १८६१ मध्यें लागला.

त्याच वर्षीं सरूपसिंग मेला आणि त्याचा पुतण्या संभूसिंग गादीवर बसला. हा राणा अल्पवयस्क असल्या मुळें राज्यकारभार चालविण्या करितां कौन्सिल ऑफ रिजन्सी म्हणजे राजप्रतिनिधि मंडळ नेमण्यांत आलें व त्याणें पोलिटिकल एजंटाच्या सल्ल्यानें वागावें असा ठराव झाला. परंतु थोडक्याच दिवसांत हे प्रतिनिधि उद्दामपणानें, द्वेषभावानें, व गैर चालीनें वागूं लागल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. भयंकर गुन्हे झाले तरी शिक्षा होईनाशी झाली आणि पोलिटिकल एजंटा कडील कामांत हरएक प्रकारें अडथळा होऊं लागला. तेव्हां शेवटीं नवें कौन्सिल तरी नेमावें किंवा कोणी तरी एकच सरदार प्रतिनिधि नेमावा असें करणें भाग आलें. प्रतिनिधित्वाचें काम ह्मणजे हलकें आणि सुलभ नव्हे. तें संभाळण्याला मनुष्य हुशार पाहिजे. परंतु तेवढी जबाबदारी अंगावर घेण्यासारखा लायक सरदार एक ही मिळेना. तेव्हां दोन सभासद व तिसरे अध्यक्ष मिळून तीन सरदारांचें कौन्सिल नेमण्याचें ठरलें. परंतु या प्रमाणें नेमणुका होऊन जो सरदार अध्यक्ष झाला तो आपण करूं ती पूर्वदिशा असा आपला अधिकार अमर्याद व अप्रतिहत चालला पाहिजे असा आग्रह धरून बसला. त्यामुळें हें दुसरें कौन्सिल ही मोडावें लागलें. नंतर ब्रिटिश रेसिडेंटानीं दोन असामी मदतनीस घेऊन सर्व कारभार करावा असें ठरलें व त्या प्रमाणें काम चालूं लागलें. मग राणे साहेबांस पुढें आपला कारभार चालवितां आला पाहिजे सबब माहिती करून देण्या करितां काम करते वेळीं तुह्मी त्यांस आपल्या जवळ घ्यावें असा रेसिडेंट साहेबांस हुकूम आल्या वरून ते राण्यास घेऊन काम करूं लागले. ह्या शेवटच्या व्य

वस्थेनें राज्याची जमाबंदी पुष्कळ वाढली.

सन १८६९ मध्यें महाराणा संभूसिंग वयांत येऊन तारीख १७ नवंबर रोजीं मुकत्यारी मिळून राज्य चालवूं लागला. त्याच्या अंगांत आकलन शक्ति नव्हती असें नाहीं, तरी तो हुशार, चांगला राज्यकर्ता, असा लौकिकास आला नाहीं.

ह्या राण्याला राज्योपभोग फार दिवस घडला नाहीं. तो अगदीं अल्पवयस्क, सारा २७ वर्षांचा असतांच सन १८७४ मध्यें आक्टोबर महिन्याच्या ७ व्या तारखेस अप्रज वारला. त्याचे अगदीं जवळचे दायाद सक्तसिंग व सोहनसिंग असे दोघे चुलते होते; परंतु त्यांस बाजूस ठेऊन, दत्तक पुत्र घेण्याचा त्यास अधिकार होता म्हणून आतां आपण बरा होत नाहीं असें दिसतांच सूरजनसिंग नामक वडील चुलत्याचा १६ वर्षांचा मुलगा होता तो त्याणें दत्तक घेतला.

भाग २

जयपूर

जयपुराला रजपूतलोक अंबरचें अथवा धूंदरचें राज्य असें म्हणतात. हें इसवी सन ९५७ मध्यें धोलराय याणें स्थापलें. अयोध्यावासी कोसलपति जो श्रीराम, त्याचा द्वितीय पुत्र कुश, त्याचा वंशज राजानल याणें नरवाड शहर व तें राज्य स्थापिलें अशी आख्यायिका आहे. त्या नल राजा पासून हा धोलराय ३४ वा पुरुष. जयपूरच्या राजांनां कच्छवाहकुलोत्पन्न असें नांव फार प्राचीन काळा पासून चालत आलें आहे.

धोलरायाच्या पराक्रमाबद्दल तत्कालीन दंतकथा आहेत, परंतु इतकें खरें दिसतें कीं त्याच्या वंशाकडे जो मुलुख चालत आला तो प्रथम त्याणें जिंकला. राजपुतान्याचा तो भाग तेव्हां कांहीं रजपूत व कांहीं मीन सरदारांच्या ताब्यांत होता, व ते सर्व दिल्लीच्या हिंदूराजाचे सेवक होते. धोलरायानें क्रमाक्रमानें त्या सर्वांनां जिंकून अजमीरच्या राजकन्येशीं विवाह केला आणि आपलें राज्य चिरस्थायी केलें.

धोलराय युद्धांत पडून मेला. त्या वेळीं त्याची स्त्री अजमीरराजकन्या गरोदर होती; तिला पुत्र झाला. त्याचें नांव कंकल. त्याचा पुत्र मैदुलराव. हा शूर आणि विनयी होता. त्याच्या नंतर हूणदेव गादीवर बसला, आणि त्याच्या मागून कुंतल नामक राजा झाला. त्याणें मीन जातीं पैकीं जे कांहीं लोक जिंकावयाचे राहिले होते ते जिंकले.

कुंतलानंतर पुजून नामक राजा झाला. तो या कच्छवाह कुलांत प्रथमारंभीं ने फार कीर्तिमान राजे झाले त्यां पैकींच एक होता. त्याणें दिल्लीपति जो पृथिवीराज त्याच्या बहिणीशीं विवाह केला होता; आणि त्याच्या पदरीं सेनेच्या एका भागाचें आधिपत्य स्वीकारून तेव्हां ज्या मोठ मोठ्या लढाया झाल्या त्यांत आपलें शौर्य दाखविलें. उत्तरे कडून जे लोक हल्ला करीत त्यांचा दोन वेळ पराभव करून तो कीर्ति पावला; आणि सरहद्दीवर संरक्षणा करितां आपली फौज घेऊन राहिला असतां तिकडून शाबुदीन आला, तेव्हां त्याच्याशीं खबरघाटांत लढाई करून गिझनीकडे त्याचा पाठलाग करीत गेला. चंडैल लोकांचा मुलुख महो बहा मुख्यत्वे त्याच्या शौर्यानें काबीज झाला. पुढें हाच तेथचा सुभेदार होता. कनोजच्या राजाची कन्या दिल्लीच्या राजानें आपल्या पदरच्या ६४ सरदारांच्या व एका निवडक टोळीच्या साह्यानें हरण केली तेव्हां त्या ६४ त पुजून होताच, परंतु त्या प्रसंगीं त्याच्या प्राणावर वेळ गुदरली.

पुजून पासून पुढें पृथी राजाच्या कारकीर्दी पर्यंत सांगण्या सारखी मोठी गोष्ट कांहीं झाली नाहीं. पुजूनच्या मागून मालेसी, विजूल, राजदेव, किंतून, कोंतूल, जूंसी, उदयकर्ण, नरसिंग, बनवीर, उद्धरण, आणि चंद्रसेन हे राजे झाले.

पुढें पृथीराज गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दीत ह्या राजघराण्याच्या संबंधानें ध्यानांत ठेवण्या सारखी विशेष गोष्ट झाली. त्याला सत्रा पुत्र झाले, पैकीं बारा थोर झाले; त्यांनां त्याणें बारा महाल नेमून दिले आणि त्यांच्या वंशांकडे ही तेच चालावे असें ठरविलें व जयपूरच्या मुख्य गादीवर ह्या बारा घराण्यां पैकीं कोणाचा हक्क कसा पोंचावा तें ठरविलें. पृथी राजा विषयीं इतर माहिती फारशी नाहीं. तो यात्रे करितां सिंधूनदीवर गेला होता. त्याचा पुत्र भीमजी याणें त्याचा खून केला. ह्या भीमजीचें तोंड राक्षसा सारखें होतें असें बखरींत लिहिलेलें आहे.

पृथीराजानंतर बहारमल्ल गादीवर बसला. ह्याच्या कारकीर्दीत जयपूरचें स्वातंत्र्य नष्ट झालें. ह्याणें दिल्लीच्या बादशहास आपले प्रभु ह्मणून मुजरा केला. तो प्रथम बाबराची सेवा करूं लागला. नंतर त्याचा पुत्र हुमायून याची ही सेवा करून त्याला पठाणांनीं हांकून लाविलें त्या पूर्वी त्याच्या पासून अंबरचा राजा असें मोठें नांव पावला.

बहारमल्लाचा पुत्र भगवानदास ह्याणें मोंगल घराण्याशीं बापापेक्षां अधिक निकट संबंध केला. तो अकबराचा परम मित्र होता आणि त्याचा पुत्र शहाजादा सलीम (हा पुढें जहानगीर नांव पावला) यास आपली कन्या देऊन व्याही बनला. रजपुतानें आपली बेटी मुसलमानाला देऊन आपल्या निर्मल कुलाला कलंक लावल्याचें हें पहिलेंच* उदाहरण.

भगवानदास अपुत्रिक असल्यानें त्याच्या मागून त्याच्या कनिष्ठ बंधूचा पुत्र मानसिंग गादीवर बसला. अकबराच्या दरबारांत हा मोठा कीर्तिमान पुरुष झाला. याणें बादशाही फौजेचें सेनापतित्व स्वीकारून मोठमोठीं जिवावरचीं कामें केलीं आणि खोटेन पासून समुद्रापर्यंत प्रदेश जिंकला. शिवाय ओडिसा, आसाम, व काबूल हे प्रांत ही त्याच्याच शौर्यानें काबीज झाले. त्याणें अनुक्रमें बंगाल, बहार, दक्षिण व काबूल येथील सुभेदारी ही केली. परंतु पुढें आपला भाचा खुषरू, जहानगिराचा वडील पुत्र, ह्यास गादी मिळावी ह्मणून तो खटपट करूं लागला त्या मुळें संकटांत पडला. तरी त्याला उघडपणें शिक्षा करतां येईना, कारण तो तसाच बलाढ्य होता. तो बंगालचा सुभेदार असतां सन १६१५ मध्यें वारला.

मानसिंगा नंतर राव भावसिंग व त्यानंतर महासिंग हे दोन राजे झाले. त्यांच्या विषयीं सांगण्या सारखी कांहींच गोष्ट नाहीं.

महासिंग वारल्या नंतर मानसिंगाचा पुतण्या जयसिंग यास अंबरच्या गादीवर बसविण्याविषयीं जहानगिरा जवळ त्याची बायको जोधबाई—जयपूरची राजकन्या—हिणें रदबदली केल्यावरून त्याला राज्य मिळालें.

ही नेमणूक उत्तम झाली. जयसिंग लहान असतां मोठा शूर दिसत

---

* असें कर्नल टॉड ह्मणतात. एल्फिन्स्टनचें ह्मणणें असें आहे कीं ही गोष्ट पूर्वीच होऊन चुकली होती. बहारमल्लानें आपली कन्या अकबरास दिली होती.

होता, तसाच पराक्रमी निघाला. त्याणें आपल्या शौर्यानें कुलाची कीर्ति पुष्कळ वाढविली. इतिहासांत तो मिरझा राजा या नांवानें प्रसिद्ध आहे. औरंगजेबाच्या पदरीं राहून त्याणें मोठमोठालीं कामें केलीं ह्मणून त्याणें त्याला फार मोठया पदवीस चढविलें. छत्रपति शिवाजी महाराजांस दिल्लीस धरून आणण्याचे औरंगजेबाचे सारे उपाय थकले तेव्हां त्याणें त्या कामीं मिरझा राजाची योजना केली. त्याणें शिवाजीला अभयवचन देऊन दिल्लीस नेलें. परंतु तो औरंगजेब कपटी, त्याच्या मनांत विकल्प आला असें दिसतांच त्याणें शिवाजीस गुप्तपणें कसें पळाविलें तें प्रसिद्धच आहे. परंतु या प्रसंगीं त्याणें जसें आपलें वचन पाळून प्रामाणिकपणा राखला तसा पूर्वी ही राखला असता तर त्याची ख्याति विशेषच होती. आपल्यास गादी मिळावी ह्मणून औरंगजेबाचे सारे बंधु कलह करूं लागले तेव्हां प्रथम सर्वांत वडील, खरा हकदार जो दारा, त्याजकडे जयासिंग होता, परंतु अगदीं निकराच्या प्रसंगीं त्याला सोडून फितून प्रतिपक्षास मिळाला; त्यामुळें तो बिचारा सर्वस्वास मुकून त्याचा पुत्र सुलेमान जिवानिशीं गेला. शिवाजीला पळून जाण्यास मिरझाराजाचें अंग होतें असें समजल्यानें व पुढें तो फारच गर्विष्टपणानें वागूं लागला त्या मुळें औरंगजेबाचें मन त्यावरून उडालें आणि उलट त्याचा नाश करावा असें त्याच्या मनांत आलें. मिरझा राजा आपल्या दरबारांत बसला असतां जें गर्वाचें भाषण* करी तें औरंगजेबाचे कानीं गेल्यानें तर त्याचा हा संकल्प दृढच झाला. परंतु कांहीं काल पर्यंत त्याचा हेतु सिद्धीस नेण्यास कबूल व समर्थ असा मनुष्य मिळेना. तेव्हां युक्ति योजतां योजतां त्या दुष्कृत्यास योग्य असा उपाय त्याला सुचला. " लोभमूलानिपापानि " ही ह्मण किती खरी आहे आणि सर्वांत श्रेष्ठ जो राज्यलोभ तदधीन झालेला मनुष्य केवढें महापातक आणि घोर कर्म करण्यास प्रवृत्त होतो तें पहा. मिरझा राजाचा कनिष्ठ पुत्र किरातसिंग यास औरंगजेबानें असें सांगितलें कीं माझें येवढें

---

* जयसिंग आपल्या पदरचे २४ सरदार घेऊन दरबारास बसे आणि दोहों हातांत दोन आरसे घेऊन डाव्या हातांतील आरसा खाडकर जमिनीवर आपटून ह्मणे ही पहा साताऱ्याची दशा ! नंतर उजव्या हातांतील आरशाकडे पाहून ह्मणे ही दिल्ली; आतां ही माझ्या हातांत आहे परंतु माझ्या मनांत येण्याची फुरसत, कीं हिला साताऱ्याच्या भेटीस पाठवीन.

काम करशील तर तुझा वडील बंधु नो रामसिंग तो रीती प्रमाणें हटलें अ-
सतां गादीवर बसावा असें आहे तरी त्याला बाजूस ठेऊन तुला जयपूरचा रा-
जा करीन. त्या कर्मचांडालानें तें मान्य करून जयसिंगाच्या अफूंत विष घा-
लून ती गोळी त्या प्रमाणे त्याला खावयास दिली. या प्रमाणें पितृहत्या
करून कृतकृत्यता मानून तो वस्त्रें मागण्या करितां औरंगजेबाकडे गेला, ते-
व्हां त्याणें त्याला राज्या बदल काय तो सारा एक महाल दिला. येथून अं-
बरच्या राज्याला उतरती कळाच लागली.

जयसिंगा नंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र रामसिंग आणि त्याच्या मागून त्या-
चा पुत्र विशनसिंग हे दोन राजे झाले; परंतु त्यांच्यांत सांगण्या सारखा गु-
ण कांहीं नव्हता. त्यांच्या नंतर दुसरा जयसिंग गादीवर बसला. तो मात्र अ
द्वितीय पुरुष झाला. त्याला सवाई जयसिंग म्हणत. तो सन १६९९ मध्ये
म्हणजे औरंगजेब मरण्या पूर्वी आठ वर्षे, गादीवर बसला. त्याणें दक्षिण दे-
शीं चाकरी करून कीर्ति संपादिली. परंतु औरंगजेब वारला तेव्हां त्याचा ना
तु बेदरबक्त, शहाजादा अजीम याचा पुत्र, याणें जेव्हां तख्त बळकाऊन आ
पण बादशहा म्हणून द्वाही फिरविली, तेव्हां जयसिंग त्याकडे मिळाला. पुढें
सन १७०७ मध्ये ढोलपूरच्या लढाईंत तो नूतन बादशहा पराभव पाऊन प्रा
णास ही मुकला आणि त्याचा प्रतिस्पर्धी बाहादुरशहा सिंहासनारूढ झाला;
तेव्हां जयसिंग विरुद्धपक्षाकडे असल्यामुळें बहादूरशहानें त्याचें राज्य जप्तकरू
न त्यावर एक सुभेदार नेमला. परंतु जयसिंग अशाला भितो! तो तलवार
उपसून पाठोपाठच आला. बादशाही सैन्य आलें होतें तें त्याणें लागलेंच पि
टालून लाविलें, आणि उदेपूरच्या राण्याशीं व जोधपूरच्या राजाशीं तहें करू
न त्रिवर्गानीं परस्परांस मदत करून मुसलमानां पासून एकमेकांचें संरक्षण क
रावें असें ठरविलें.

ह्या सवाई जयसिंगा सारखा सुशिक्षित राजा साऱ्या हिंदुस्थानांत आ-
जपर्यंत झालाच नसेल. त्याला कलाकौशल्य व शास्त्र यांची फार हौस होती.
त्याणें ज्योतिषशास्त्राचें इतकें अध्ययन केलें होतें कीं त्या काळीं युरोपांत जे

---

* उदेपूरचा राणा दुसरा अमरसिंग याच्या वृत्तांतांत सांगितलेला तो
च हा तह. याच्या योगानें जयपूर व उदेपूर या दोहों वर ही मोठीं अरिष्टें
गुदरलीं.

मोठमोठे ज्योतिषी होते त्यांहून तो कांहीं कमी नव्हता. त्याणें स्वतः ग्रहांचीं कोष्टकें तयार केलीं त्यां वरून हाल्लीं गणित करून पंचांगें तयार करितात. युक्लिडचीं मूलतत्वें ह्मणून सरळ व गोलीय त्रिकोणमितिवर उत्तम ग्रंथ आहेत त्यांचें व नेपीयरच्या लागर्तमाचें त्याणें संस्कृतांत भाषांतर करविलें.

त्याणें आपल्या राजधानी करितां नवीन शहर वसवून तें संगमवरी दगडांच्या इमारतींनीं सुशोभित करून त्याला जयपूर असें नांव ठेविलें. एकाच मुन्यावर सारखें बांधलेलें असें साऱ्या हिंदुस्थानांत येवढें एकच-शहर आहे. त्याणें दिल्ली, जयपूर, काशी, आणि मथुरा, येथें मोठमोठ्या टोलेजंग वेधशाळा बांधून, स्वकल्पनेनें यंत्रें तयार करून तीं त्यांत ठेविलीं आणि वेध घेतले. त्या यंत्रांचे वेध इतके बरावर उतरत कीं ते पाहून मोठमोठे विद्वान ज्योतिषी आश्चर्यानें थक्क होऊन जात. शास्त्राभिवृद्धयर्थ जयासिंगानें पुष्कळच खटपट केली. वेधशाळा वगैरे बांधिल्या हा त्याच्या कृत्यांतला एक भाग झाला, पण हा शिवाय आणखी जीं कृत्यें त्याणें केलीं तीं अतिशयच मोठीं हो तीं त्याणें आपल्या राज्यांत पुष्कळ प्रांतांत, खुद्द आपल्या खर्चानें कारवानसराया ह्मणून प्रवाशांच्या सोई करितां धर्मशाळा बांधल्या. एकीकडे सारख्या लढाया चालल्या असतां, दरबारांत राजकारस्थानें वळाऊन स्वतः त्यांच्या सैपाऱ्यांत सांपडला असतां, त्याणें आपलें राज्य असल्या संकटांतून पार पाडलें इतकेंच नव्हे, तर शेजारच्या सर्व राज्यांत उच्चपदास पोहोंचविलें, तेव्हां त्याची योग्यता काय सांगावी ! औरंजेबा नंतर जे दुर्बल बादशहा गादीवर बसले ते आपली सत्ता राखावी ह्मणून जों पर्यंत झटत होते तों पर्यंत हा त्यांचा पाठराखा होताच. परंतु जेव्हां फरूकशीर गादीवर बसला आणि सर्वस्व हरण होण्याची वेळ आली असतां ही त्याला किती सांगितलें तरी हुरूप येणें अशक्य दिसलें, तेव्हां तो नाद सोडून जयासिंग घरीं बसला. मग त्याणें आपल्याला अत्यंत प्रिय जें ज्योतिःशास्त्र आणि इतिहास त्यांचा पुनः व्यासंगके लापुढे सन १७२० इसवींत महंमदशहा दिल्लीच्या तख्तावर बसला, तेव्हां त्याणें जयासिंगास पोथी गुंडाळून अनध्याय करावयास सांगितलें आणि प्रथम आग्ऱ्याची व मग माळव्याची सुभेदारी दिली. ह्या वेळीं ह्याला जी थोडी विश्रांति मिळाली तींत त्याणें वर सांगितलेलीं मोठमोठीं कामें* केलीं. हिंदुस्था

---

* जयासिंगानें निरनिराळ्या ठिकाणीं ज्या वेधशाळा बांधिल्या होत्या

नचा ह्या काळचा इतिहास पाहिला तर त्यांत चोहींकडे जो अज्ञानांधकार दिसतो त्यांत ज्ञानदीप येवढाच आढळतो. धर्मवेड्या औरंगजेबानें सर्व लोकांवर जेझिया नांवाची डोईपट्टी बसविली होती ती जयासिंगानें या वेळीं उठविली, आणि जाट लोक जे स्वाऱ्या करीत त्यांचा बंदोबस्त केला. सन १७२२ मध्यें माळव्याच्या सुभ्यावर पुनः त्याची नेमणूक झाली तेव्हां राज्यांत सारी अव्यवस्था झालेली पाहून त्याला असें वाटलें कीं अशा स्थितींत मराठ्यां बराबर लढून जय मिळणें दुरापास्त आहे. ह्मणून महंमदशहाचें अनुमोदन घेऊन त्याणें प्रख्यात कीर्तिमान् जो बाजीराव पेशवा त्याच्याशीं स्नेह केला आणि सन १७२४ मध्यें त्या बादशाचें मन वळवून माळव्याचा अम्मल बाजीरावाकडे देवविला. ही गोष्ट त्याणें मोठी शहाणपणाची केली. त्या योगानें त्याचें वजन पडून मराठ्यांस जरा स्थिराऊन धरतां आलें, त्यांची टोळधाड खुद्द दिल्लीवर जाऊन पडावयाची थोडिशी लांबली. पुढें नादिरशहा दिल्लीवर आला, तेव्हां त्याच्या बराबर लढाई करून बादशहाला जय येणें अगदीं अशक्य असें उघड दिसून आल्यावरून तो मुळींच बाजूस राहिला. नादिरशहानें दिल्ली घेऊन केवढी कत्तल आणि काय अनर्थ केला तें प्रसिद्धच आहे.

या प्रमाणें सवाई जयासिंग महाराज ४० वर्षें पर्यंत भरभराटीनें राज्य करून सन १७३४ मध्यें परलोकवासी झालें. ह्या चाळीस वर्षांत हिंदुस्थानांतील इतर राज्यांस व संस्थानांस बहुधा उतरती कळा लागली होती; परंतु जयपुराकडे पाहिलें तर तेथें लक्ष्मी आनंदानें वास करीत होती. जयसिंगानें देवती, व राजूर हे दोन प्रांत आपल्या राज्यांत मिळविले आणि मोठ्या शहाणपणानें राज्य चांगलें केलें. तो गर्विष्ट आणि दारूबाज होता असें ह्मणतात, परंतु त्या कालांत त्या देशांत तो मोठा विलक्षण पुरुष होऊन गेला अशी त्याची कीर्ति निःसंशय चिरकाल राहील. कर्नल टॉड ह्मणतात शास्त्र जयसिंगा बरोबर संपलें. त्याचा वडील पुत्र इसरीसिंग त्याच्या मागून गादीवर बसला, परंतु उदेपूरच्या राण्याबराबर जो ठराव झाला होता त्याप्रमाणे त्याचा धाकटा भाऊ माधवसिंग हा मेवाडच्या राज कन्येचा पुत्र अस-

---

आणि वेध घेतले होते ते एकत्र करून त्यां वरून त्याणें ग्रहांच्या सारण्या तयार केल्या—त्या सन १७२८ मध्यें पुऱ्या झाल्या.

ह्या मुळें गादीचा हक्क त्याला प्राप्त झाला होता. त्याणें राज्याचें पुष्कळ नुकसान करून घेऊन* होळकरास मदतीस आणलें आणि गादी मिळविली. पुढें त्याणें राज्य बरें केलें असतें परंतु त्याला जाट लोक उपद्रव देऊं लागले. हे नुकतेच उदयास येऊं लागले होते. त्यांच्या बराबर पुष्कळ लढाया होतां होतां अखेर एका लढाईंत त्यांचा पराभव झाला, आणि माधवसिंगास जय मिळाला खरा, परंतु जयपूरचें नुकसान फार झालें. कारण त्याच्या पदरचे सारे मोठमोठे सरदार खपले आणि चार दिवसांनीं स्वतः माधवसिंग ही वारला. जर तो आणखी कांहीं दिवस जगता तर जयपूरचा ऱ्हास खास होऊं देताना असें ह्मणतात. बापा प्रमाणें त्याच्या अंगीं कांहीं विद्वत्ता होती व तो शास्त्रज्ञ मंडळीचा सहवास करीत असे. त्याणें कांहीं शहरें वसविलीं. त्यात रिंठणथोर नामक प्रसिद्ध किल्ल्याजवळ मधुपूर नामक जें आपल्याच नांबचें बांधलें तें उत्तम आहे. राजस्थानांत जीं व्यापाराचीं शहरें आहेत त्या सर्वांत हें अतिशय सुरक्षित स्थान आहे.

मधुसिंगा नंतर दुसरा पृथीसिंग गादीवर बसला. हा अल्पवयस्क असल्या मुळें त्याची सापत्न माता पालन कर्त्री ह्मणून सर्व अधिकार पाहूं लागली. ती महत्वाकांक्षी आणि अगदीं निःशंक, हवें तें करणारी बायको होती. ती एका हलकट महाताला उपपति करून घेऊन अगदीं त्याच्या तंत्रानें वागत असे. या प्रमाणें नऊ वर्षें तिचा बदफैली अम्मल चालला असतां पृथीसिंग घोड्यावरून पडून मेला. त्याला विष प्रयोग झाला असावा असा ही संशय आहे. त्याच्या उभयतां राण्यांपैकीं एकीला मानसिंग नामक पुत्र होता. इकडे असा प्रसंग गुदरतानां त्याला त्याच्या आईच्या आप्त मंडळीनें पळवून प्रथम आजोळीं नेलें; नंतर तेथून काढून ग्वाल्हेरीस शिंद्याच्या स्वाधीन करून संरक्षण करावयास सांगितलें. इकडे पृथीसिंगाचा सावत्र बंधु, त्या स्वैरिणीचा पुत्र, प्रतापसिंग गादीवर बसला. त्याणें पंचवीस वर्षें राज्य केलें. तो लहान असतां जयपुरांत सारखे तंटे चालले होते. शेवटीं ती जारिणी राणी आणि तिचा प्रिय तो महात, या उभयतांस ही कोणी विषप्रयोग करून त्यांच्या त्रासांतून लोकांस सोडविलें तों मराठ्यांचे हल्ले सुरू झाले. त्याच्या

---

* रामपुरा, भावपुरा, व टोंकरामपुरा हे प्रांत व ८४००००० रूपये त्याणें होळकराला दिले.

लुटालुटीनें बेजारगत झाली. पुढें प्रतापसिंग राजा मोठा होतांच त्याणें प्रथम ह्या टोळांची झुंड हांकून लावण्याचें मनांत आणलें. आपल्या एकट्याच्या हातून हें होणेंच नाहीं असें पाहून त्याणें जोधपूरचा राजा विजयसिंग याच्याशीं सख्य केलें आणि मराठ्यांशीं लढाई सुरू केली. त्यांत पहिल्याच संग्रामांत तोंग येथें मराठ्यांचा पराभव झाला, (सन १७८७) परंतु हा बरा काळ फार वेळ टिकला नाहीं. सन १७९१ मध्यें पाटण व मैरत येथें त्याचा पराभव झाला, आणि जोधपुरा बराबर सख्य होतें तें बिघडलें. त्या बराबर मराठ्यांनां पुनः चांगलेंच फावलें. होळकरानें जवर वार्षिक खंडणी बसवून कांहीं दिवसांनीं ती अमीरखान पठाणाकडे लाऊन दिली. तेव्हां पासून सन १८०३ पर्यंत केव्हां शिंदा, केव्हां दुसरे कोणी लुटारू, मिळून लुटीवर लक्ष ठेऊन कोणी तरी बळी येऊन सारा मुलुख उद्वस्त करून सोडीत असे.

प्रतापसिंग कांहीं शूर कमी नव्हता, आणि शहाणा ही कमी नव्हता. परंतु असल्या महासंकटां पुढें त्याचें शौर्य, शहाणपण वगैरे कांहीं चालेना, तो सन १८०३ मध्यें वारला.

प्रतापसिंगा नंतर त्याचा पुत्र राजा जगत्सिंग गादीवर बसला. त्याणें ही आपलें नांव गाजविलें ! पण तें कसें तें ऐका. ह्याच्या सारखा दुर्व्यसनी राजा ह्या कुलांत कोणी झाला नाहीं, आणि विद्यमान कालीं ह्याच्या सारखा दुराचारी दुसरा कोणी नाहीं अशी याची दुष्कीर्ति होती. त्याच्या अंगांत नांव घेण्या सारखा बरा गुण तर एक देखील नव्हता; दुर्गुण मात्र अमुक नव्हता असें नाहीं; शिवाय भितरेपणा ही होता. व्यभिचार, उधळपट्टी इत्यादि निंद्य गुण अंगांत परिपूर्ण असून प्रतिष्ठा किंवा कांहीं तरी सद्गुण याचें बारें ही नव्हतें. उदेपूरच्या भीमसिंग राण्याची लावण्यवती कन्या कृष्णाकुमारी हिच्या रूपाची प्रशंसा ऐकून ती आपल्यात प्राप्त व्हावी असा हेतु धरून ती स्वपराक्रमानें मिळवणें होणेंच नाहीं म्हणून त्या बेमान, दुष्ट, लुटारू, अमीरखान पठाणास बोलाऊन आणून साऱ्या राजपुतान्याचा विध्वंस यानेंच उडवला. ह्याचें चरित्र वर्णन करणें म्हणजे अनेक निंद्य गोष्टी सांगितल्या पाहिजेत, त्यांचा वीट येतो याज करितां हें पूरें. हा सन १८१८ मध्यें दिसेंबरच्या २१ तारखेस वारला, तर कोणाला वाईट वाटलें नाहीं. फार काय केवळ त्याच्या योगानें जे वाढलें होते त्यांनां देखील दुःख झालें नाहीं.

परंतु ह्याच्या कारकीर्दीत जयपुराशीं इंग्लिशांचा संबंध जडला. सन

१८०३ मध्यें उभय सरकारांत तह होऊन त्याला साहाय्य करण्याचें ठरलें. परंतु जगत्सिंगानें ठरावा प्रमाणें वर्तन न केल्यानें व लॉर्डकार्नवालीस यांणीं ही तह करण्याची तऱ्हा मोडून टाकण्याचा निश्चय केल्यामुळें हा संबंध लौकरच तुटला आणि जयपुराला इंग्रजांचे संरक्षण नाहींसें झालें. पुढें सरजार्जबार्लो यांणीं तीच पद्धत चालविली. पूर्वी दिलेलें वचन मोडणे चांगलें नाहीं, व एकंदरींत व्यवहार दृष्ट्या ही असें करणें चांगलें नाहीं असें लॉर्डलेक यांचें मत होतें, परंतु तें त्यांणीं मानलें नाहीं.

हें हिंदुस्थान सरकारचें वर्तन विलायत सरकारास पसंत न पडून त्यांणीं सन १८१३ मध्यें असा हुकूम फर्माविला कीं, आतां पुनः संधि येतांच नयपुराबरोबर पूर्ववत तह करावा. मग नेपाळा बरोबर लढाई सुरू झाल्यामुळें ह्या गोष्टीस अवकाश सांपडला नाहीं. याजकरितां पुढें पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करण्या करितां सर्वां बरोबरच तह करण्याचें ठरलें तेथ पर्यंत ही गोष्ट अशीच राहिली. सन १८१७ मध्यें तहाचें बोलणें सुरू झालें, तेव्हां पूर्वी एकवार तह-करून तो रद्द केल्यानें जयपूर दरबारास भरंसा वाटत नाहीं, म्हणून आतां तह करण्यास तें नाखुष आहे असें दिसून आलें. परंतु कांहीं दिवसांनीं शेजारच्या राजांनीं तह केला, हें पाहून, राज्याला एक एक अडचण अधिकच येऊं लागल्या मुळें, व आपण आतां नाहीं ह्मणून पुढें आश्रय मागूं लागलों तर इंग्रजसरकार नाहीं ह्मणेल ह्या भीतीनें, व अमीरखान पठाणाचा सतत उपद्रव चालू असल्यामुळें, व जयपूरच्या ताब्यांतील पोट संस्थानांशीं स्वतंत्र ठराव करण्याची इंग्रज सरकारची तयारी चाललेली दिसली,तेव्हां राजा तहास कबूल झाला. हा तह सन १८१८ मध्यें एप्रिलच्या दुसऱ्या तारखेस झाला. त्यांत असें ठरलें कीं इंग्रज सरकारानें राज्याचें संरक्षण करावें, व त्या बद्दल राजानें सरकार मागेल तेव्हां फौज मदतीस द्यावी; राज्याचा वसूल चाळीस लाख रुपये होऊं लागे पर्यंत प्रतिसाल आठ लक्ष रुपये खंडणी द्यावी आणि चाळीस लाखांवर वसूल येऊं लागला ह्मणजे एकंदर उत्पन्ना पैकीं पांचआणे सदर खंडणी शिवाय वर्षास द्यावे उदेपूर प्रमाणें येथें ही पदरच्या सरदारांनीं राज्यांतील कांहीं मुलुख बळकाविला होता, तो परत घेऊन त्यांस त्यांच्या योग्यते प्रमाणें बागवावें असें मागून आणखी ठरलें; तेव्हां सर डेव्हिड ऑक्टरलोनी यांच्या मध्यस्थीनें उदेपूर प्रमाणें येथें ही ठ

राव झाला. सरदारांनीं बळकावलेल्यानमिनी सोडून दिल्या व त्यांजकडे पूर्वी चालत असल्या प्रमाणें जमिनी चालतील व त्यांचे सर्व खरे हक्क कायम राहतील अशा विषयीं इंग्रज सरकार हमीदार झालें.

ह्या नंतर कांहीं महिन्यांनीं जगत्सिंग राजा वारला. त्याला औरस अनौरस कोणतीच संतति नव्हती, आणि पुढें वारस कोणास करावें या विषयीं ही विचार झालेला नव्हता. त्यामुळें प्रेताला अग्नि देण्याला तरी कोणास सांगावें असा विचार पडून जयपूरचा राजा पहिला पृथीसिंग याजपासून चौदावा पुरुष मारवाडचा माजीराजा होता त्याचा पुत्र मोहनसिंग हा भाईबंद योग्य आहे, त्याला नेमावें असें सर्वानुमतें ठरलें आणि ती वेळ पार पडली. परंतु पुढें अशी तक्रार उत्पन्न झाली कीं दत्तविधान वगैरे यथाशास्त्र झालें नाहीं व मोहनसिंगा पेक्षां जवळचे भाईबंद आहेत, तेव्हां त्याचा हक्क बुडवतां येत नाहीं. असें झालें तेव्हां आतां हा गृहकलह माजतो असें भय उत्पन्न झालें. इतक्यांत, जगत्सिंगाच्या राण्यां पैकीं एक गरोदर आहे असें समजलें, त्यामुळें तें प्रकरण तितकेंच राहिलें.

मग तारीख पहिली माहे एप्रिल रोजीं बारांवर तीन वाजतां जगत्सिंगाच्या राण्या व त्याच्या पदरच्या साऱ्या थोर सरदारांच्या बायका मिळून एकंदर सोळा स्त्रियांची सभा जनानखान्यांत भरली. त्याच्याच बाहेरच्या बाजूस सारे सरदार, मानकरी, वगैरे थोर थोर असामी एकत्र जमून साऱ्या बायामंडळीचे विचारें काय ठरतें तें ऐकावें म्हणून बसले. राणी भाटियानी खचित गरोदर आहे असें त्या सर्वांच्या नजरेस आलें, म्हणून सातवाजे पर्यंत विचार करून नंतर आमची अशी खात्री होते व ह्या राणीसाहेबांस पुत्र झाल्यास त्या शिवाय दुसऱ्या कोणास आम्ही आपला धनी समजणार नाहीं. असा त्यांचा निरोप आला, तो ऐकून बाहेरच्या मंडळीस संतोष झाला.

नंतर तारीख २५ एप्रिल सन १८१९ रोजीं, जगतसिंग वारल्या पासून चार महिने चार दिवसांनीं राणी पूत्र प्रसवली. तेव्हां कच्छवाह कुलपतीचा हा औरसपुत्र राजा झाला म्हणून सर्वांस आनंद होऊन मोहनसिंग पुनः आपल्या पूर्वगृहीं गेला. त्याला चार महिने गादीचा टिकला लागला.

ह्या राजपुत्राचें नांव जयसिंग असें ठेऊन त्याच्या नांवानें मातुश्री

राज्यकारभार पाहुं लागल्या. परंतु तो तिच्या हातून कसचा नीट चालतो! सारी अव्यवस्था आणि बेदाद झाली. तेव्हां आपलें नुकसान होऊं नये व खंडणीचा पैसा वेळच्या वेळीं यावा म्हणून इंग्रज सरकारास एक कामदार नेमणे भाग पडलें. त्यानें जयपुरांत रहावें व राज्यकारभारांत हात घालावा असा सरकारानें ठराव केला.

सन १८३४ । ३५ मध्यें शैखावती प्रांताची व्यवस्था करण्याकारितां इंग्रजसरकारास आपली फौज तेथें पाठवावी लागली. तिच्या खर्चाचा पैसा आला पाहिजे म्हणून सांभर सरोवरांत जो जयपूरचा हिस्सा आहे तो सरकारानें तारण म्हणून आपल्या हातीं घेतला. तो हिशेब व शैखावती प्रांताच्या पुढील व्यवस्थे बद्दल ठराव चालले होते इतक्यांत राजा जयसिंग जयपूर येथें अकस्मात मरण पावला. मरणा बद्दलच्या एकंदर हकीगतीचा विचार करतांना संघी जोथराम दिवाण व रूपवुदारूण नामक वाड्यांतील एक कुणबीण या उभयतांनीं राजाचा जीव घेतला असावा असा जबर संशय येऊं लागला. ह्या दिवाणजींचें आणि राजमातेचें सूत्र जमून तिच्या कृपेनें तो इतका अधिकार चालवूं लागला कीं ब्रिटिश सरकारानें नेमलेल्या कारभाऱ्यास दूरकरून आपण त्या पदावर बसला. अशी स्थिति झाली तेव्हां चौकशी करण्या करितां व राज्यव्यवस्था सुधारण्याकरितां गव्हरनर जनरलांचे एजंट जयपुरास जाऊन दाखल झाले. जयसिंग वारला तेव्हां त्याला सत्रा महिन्यांचा मुलगा होता त्यास आपल्या स्वाधीन करून घेऊन त्याच्या संरक्षणाचा बंदोबस्त करून साहेबांनीं काम जारीनें सुरू केलें तेव्हां जोथराम यानें गुप्तपणें कट करून कर्नल आल्व्हिस एजंट यांचा प्राण घेण्याचा यत्न केला. तो साधला नाहीं परंतु त्यांचे असिस्टंट मिस्टर ब्लेक यांचा खून झाला. त्या खून करणारांस धरून त्यांचा शिरच्छेद करण्यांत आला, व जोथराम आणि त्यास सामिल असलेली मंडळी यांस धरून जन्मभर चुनारच्या किल्यांत कैदेंत ठेवण्यांत आलें. मग राज्यकारभार चालविण्या करितां राज्यांतील सरदारांपैकींच मुख्य मुख्य पांच असामी निवडून त्यांचें कौन्सिल नेमण्यांत आलें व त्याजवर एजंटाची देखरेख असावी असें ठरलें. महत्वाचीं सर्व कामें ह्या कौन्सिलमार्फत निकालांत येऊं लागलीं. पुढें सरकारानें राज्यांतील लष्कर कमी करून सर्व खात्यांत सुधारणा केली; आणि सती, गुलामगिरी, बालहत्या, यांची बंदी केली. स

रकारास जी वार्षिक खंडणी द्यावी लागे ती जमाबंदीचे मानानें पहातां फार जबर असल्यामुळें बाकी फार तुंबली होती. याचा विचार करून सरकारानें सन १८४२ मध्यें ४६ लक्ष रुपयांची सूट घातली व पुढें प्रतिसाल ४० लक्ष रुपये घेण्याचें ठरविलें.

ह्या नूतन महारावांचें नांव रामसिंग. हे बंडाच्या वेळीं, सरकारच्या फार उपयोगीं पडले ह्मणून सरकारानें त्यांस कोटकासीम प्रांत इनाम दिला. त्याबद्दल अट येवढीच ठेविली कीं इंग्रजसरकारचा अम्मल असतां जमिनीची प्रतबंदी ठरलेली होती तींत फेरफार करूं नये.

महाराज रामसिंग हे हिंदुस्थानांत जे उत्तम, ज्ञानवान राजे झाले त्यां पैकीं होत. आपला मुलुख आबाद राखावा ह्मणून त्यांचे परिश्रम सतत चालू होते. या उद्देशानें त्यांणीं रस्ते बांधले, आगगाडी सुरू केली व पुष्कळ शाळा घातल्या. सन १८६८ मध्ये राजपुतान्यांत दुष्काळ पडला होता, तेव्हां त्यांणीं आपल्या मुलखांत येणाऱ्या धान्यावरची जकात माफ केली, व दुष्काळ निवारणार्थ पुष्कळ स्तुत्य परिश्रम केले. हें मनांत आणून सरकारानें त्यांच्या सन्मानार्थ दोन तोफा जास्त सोडण्याचा ठराव केला. हे सन १८६९ पासून १८७५ पर्यंत हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौन्सिल मध्यें सभासद होते. त्यांणीं कित्येक गव्हरनर जनरलांचें व क्वर्तिनीचें चिरंजीव प्रिन्स ऑफ वेल्स यांचें जें मोठ्या थाटानें आगतस्वागत केलें त्याचें स्मरण सर्वकाल झाल्यावांचून रहाणार नाहीं.

भाग ३

मारवाड अथवा जोधपूर

मारवाडचे राजे राहटोर* कुलांतील आहेत. शिसोद्यां प्रमाणें आ-

---

* रामा पासून ५६ वा पुरुष मूळराज, तो आमचा कूटस्थ असें राहटोर ह्मणतात. न आपल्या कुलाला हें नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं मूळराज अपुत्रिक असल्यामुळें त्याणें राहटेश्वरी देवीचा आराध

म्ही ही सूर्यवंशी आहों व श्रीरामचंद्राचे वंशज आहों असें ते ह्मणतात. इसवी सन ४७० मध्यें गंगातीरीं कनोज नामक मोठें थोरलें राज्य स्थापणारा जो नयनपाळ त्यापर्यंत ह्या घराण्याची पूर्वपीठिका लागते. ह्या घराण्यानें कनोजचें राज्य ७०० वर्षांवर केलें. शेवटीं जयचंद नामक राजा राज्य करीत असतां सन ११९९ मध्यें शाबुद्दीन गोरीनें स्वारी केली. तेव्हां त्याजपासून पराभव पाऊन जयचंद पलायन करीत असतां गंगाप्रवाहांत बुडून मेला, तेव्हां कनोजचें राज्य बुडालें आणि भागीरथीतीरीं राहटोरांचें नांव ऐकूं येईनासें झालें.

त्यानंतर अठरा वर्षांनीं जयचंदाचे दोघे नातू शिवाजी व सैतराम आपलें जन्मस्थान सोडून दोनशें लोक बराबर घेऊन द्वारकेस जाण्या करितां ह्मणून निघालें. त्यांणीं यात्रेचें मिष मात्र केलें, त्यांचा खरा उद्देश देशांतरीं जाऊन नशीबाची परीक्षा पहावी असा होता. ते पश्चिमेकडे थोरल्या वालुका मैदानाकडे जात जात विद्यमान बिकानीर शहरा पासून २० मैलांवर कोलुमंद शहरीं गेले.

त्यावेळीं कोलूमंदच्या राजाचें शेजारच्या राजांशीं युद्ध चाललें होतें. ती संधी पाहून उभयतां बंधूनीं त्याची चाकरी धरली, आणि इतका पराक्रम केला कीं, कोलूमंदपाल्यास जो जय मिळाला तो फक्त त्यांच्या शौर्यानें. उभयतांनीं मिळून राजाला जयश्री प्राप्त करून दिली खरी परंतु तत्प्रीत्यर्थ सैतरामाला आपला प्राण खर्ची घालावा लागला. तेव्हां ते उपकार फेडण्या करितां राजानें शिवाजीला आपली बहीण देऊन वरदक्षिणा पुष्कळ देऊन विवाह समारंभ चांगला केला. नंतर शिवाजी पुढें जावयास निघाला. जातां जातां कोठें शूरत्वानें लढून, कोठें कपटानें वध करून, अशा नाना उपायांनीं लूनिनदीतिरच्या वालुकामय प्रदेशांत खेरवाडा येथें त्याणें आपलें निशाण रोविलें. पाली हें शहर व त्याच्या खालचा बराच मुलुख त्या वेळीं ब्राह्मणांकडे होतां, त्यांत त्याणें आपला अम्म-

---

ना करून तिला प्रसन्न करून घेतलें. त्याच्या उग्रतपानें संतुष्ट होऊन तुला पुत्र होईल असा देवीनें वर दिला. त्या प्रमाणें पुत्र झाला त्याचे नांव राहटवर असें त्यांनें ठेविलें. त्याचा अपभ्रंश होत होत राहटोर असा झाला.

ल बसविला.

शिवाजीला तीन पुत्र होते, त्यां पैकीं वडील अश्वत्थामा हा त्याच्या मागून गादविर बसला. त्याणें आसपासचे सरदार जिंकून बराच मुलुख काबीज केला, व आपल्या पाठचा भाऊ सोनिंग यास गुजराथच्या सरहद्दविर ईडर संस्थानचा राजा केलें, आणि धाकट्याला ओकमुंदाला संस्थान दिलें. अश्वत्थामाला आठ पुत्र होते, त्या सर्वांनीं निरनिराळीं राजघराणीं स्थापिलीं. त्यां पैकीं चार अद्यापि चालू आहेत. त्याचा पुत्र दूहर हा खेरधर येथें त्याच्या नंतर गादीवर बसला. त्याणें आपल्या पूर्वजांचें प्रसिद्धस्थान कनोज हें पुनः काबीज करून घ्यावें व मंदूर जिंकावें आणि आपलें नांव पूवकालच्या व उत्तरकालच्या इतिहासांत कायम राहीलें करावें असें मनांत आणलें होतें, परंतु त्याचे ते दोन ही बेत फसले.

पुढें मंदूर हें त्याच्या वंशजांनीं जिंकलें, तेथ पर्यंत जे राजे झाले त्यांचीं नांवें देतों. हे सर्व ज्येष्ठपुत्र, ज्येष्ठपौत्र, ज्येष्ठप्रपौत्र, ह्या अनुक्रमानें झाले. दूहरा नंतर रायपाळ, कन्हूळ, जल्हणचोंद, थीदो, सिल्को आणि विरणदेव असे झाले. त्या सर्वांनीं त्या प्रदेशांत युद्धें करून नांव मिळविलें व राज्य ही वाढविलें. ह्या विरणदेवाचा पुत्र चोंद याणें मरु ह्मणजे मारवाड देशाचें प्राचीन राजधानी शहर मंदूर सन १३८१ मध्यें जिंकून घेतलें, आणि तें राहटोरांची राजधानी केलें. पुढें त्याणें नागोर शहर व गोद्वरप्रांत जिंकला आणि मंदूरच्या पदभ्रष्ट केलेल्या परिहर रजपूत राजाची कन्या वरून तें आपल्याकडे निष्कंटक केलें. त्याला चौदा पूत्र होते, पैकीं चौघांचा वंश अद्याप चालला आहे.

राव चंद सन १४०२ मध्यें नागोर येथें मारला गेला, तेव्हां त्याचा पुत्र रणमल्ल गादीवर बसला.

रणमल्लानें मेवाडचा राणा लख यास युद्धामध्यें सहाय केलें. तो त्याच्या पदरच्या सर्व सरदारांत श्रेष्ठ ह्मणून वागत असें, परंतु लख राणा वारल्या नंतर तो मेवाडच्या राज्यकारभारांत ढवळा ढवळ करूं लागला त्या मुळें प्राणास मुकला आणि त्याच्या राज्यावर ही मोठें संकट आलें.

लख राण्याचा ज्येष्ठ पुत्र चोंद याणें उदेपूरच्या गादीवरील आपला हक्क सोडून आपला कनिष्ठ सापत्न बंधु मोकलजी, ह्या रणमल्लाचा दौहि-

स्र, यास गादीवर बसवून राज्याचा प्रतिपाळ आपण केला. ती कथा मागें मेवाडच्या इतिहासांत सांगितलीच आहे.

मोकलजी अल्पवयस्क असल्यामुळें चौंद कारभार करीत होता, त्याला रणमल्लानें अनेक विघ्नें आणलीं. कारण त्याची आप्त मंडळी मेवाडच्या सुपीक प्रदेशाला लुब्ध होऊन टोळांच्या झुंडी सारखी तेथें पडली, आणि खुद्द त्याच्या ही मनांत उदेपूरचें राज्य राहटोर कुलांत यावें असें होतें.

एकदां राज्यलोभ उत्पन्न झाला झणजे हवींतीं कर्में होऊं लागतात; त्या प्रमाणें येथें ही घडलें. रणमल्लानें आपला हेतु सिद्धीस नेण्याकरितां चौंदाच्या एका भावाचा खून करविला आणि त्या अल्पवयस्क राण्याचा, झणजे आपल्या नातवाचाच, प्राण घेण्याचा विचार केला. परंतु तें दुष्कर्म घडण्या पूर्वी बेळेवर चौंद अकस्मात् जो फौज घेऊन आला तो राहटोरांवर घुसला आणि त्यांची दाणादाण उडवून रणमल्लाचा प्राण घेऊन पार झाला. रणमल्लाचा ज्येष्ठ पुत्र राव जोध जीव घेऊन पळाला, परंतु तो इतका हतवीर्य आणि निर्बल होऊन गेला कीं आतां मंदूरचें काय होईल तें होवो, असें झणत त्याला निराश होऊन बसावें लागलें. आतां राहटोर सर्वस्वास मुकले असें दिसूं लागलें, परंतु जोधरावानें हिम्मत सोडली नाहीं. तो दमदार आणि बुद्धिमान होता. त्याणें आपली हालचाल शत्रूला अगदीं कळूं न देतां इकडे तिकडे फिरून स्वपक्षाचे लोक जमा केले आणि मंदुरावर एका एकीं घाला घालून चौंदाच्या एका पुत्रास तेथेंच ठार मारलें व दुसरा पळत सुटला होता त्याचा पाठलाग करून गोदूर प्रांताच्या हद्दीवर त्याचा ही जीव घेतला. परंतु येवढ्यानें झणजे राज्य हातीं येतेंच असें नाहीं हें समजून त्याणें शहाणपणानें तहाचें बोलणें लाविलें. चौंदाचा कनिष्ट पुत्र ज्या ठिकाणीं पडला होता त्या रेषेच्या पलीकडे मी येत नाहीं, त्याचा रक्त पात झाला तेथपर्यंतचा मुलुख तुह्मांकडे असूंद्या आणि हा तंटा मिटूंद्या, झणजे सारांश मी गोदूर प्रांत देण्यास कबूल आहें असें त्याचें बोलणें आलें; तें चोदानें मान्य करून तह केला.

जोधरावानें या प्रमाणें आपलें शौर्य तर दाखविलेंच; आणि मग राज्यप्राप्ति होतांच बुद्धि कौशल्य दाखविण्यास सुरवात केली. लोकां प्रमाणें उगाच लढाया करून कीर्ति मिळवणें आतां पुरे असें मनांत आणून

त्याणें आपल्या मुलखांचो व्यवस्था करण्यांत आणि प्रजेस सुख देण्यांत विशेष झटण्यास प्रारंभ केला. आपल्या मुलखांतील प्राचीन जे जमीनदार वगैरे होते त्यांस आणून त्यांच्या वंशपरंपरा चालत आलेल्या जमिनी त्यांजकडे चालविल्या. मग आपलें प्राचीन राजधानी शहर चांगलें नाहीं, सबब दुसरें वसवावें असें मनांत आणून सन १४५९ मध्ये नव्या शहराचा पाया घातला, आणि त्याला आपलेच नांव ठेविलें. पुढें त्या जोधपूर राजधानीवरून साऱ्या राज्याला ही तेंच नांव पडलें. जोधराव ६१ वर्षांचा होऊन सन १४८९ मध्यें वारला. त्याला चौदा पुत्र झाले. सर्वांत वडील तो पूर्वीच वारला असल्यामुळें द्वितीय सूरजमल्ल गादीवर बसला

ह्या रावानें २७ वर्षें राज्य केलें, इतकाच ह्या विषयीं लेख आहे. त्याच्या वेळीं ही वंश विस्तृत झाला. त्याला पांच पुत्र होते, त्यांत वडील रावगंग हा त्याच्या मागून गादीवर बसला. परंतु तो अल्पकालांतच मेला. त्याचा मुलगा त्याच नांवाचा होता, तो मग गादीवर बसला. त्याला राज्य मिळूं नये ह्मणून त्याचा चुलता साग याणें पुष्कळ हरकत केली, लोक जमवून लढाई मांडली, परंतु त्याचें कांहीं चाललें नाहीं. ह्या राव गंगाच्या कारकीर्दींत मारवाडावर मुसलमानांची पहिली स्वारी झाली. परंतु मेवाडच्या संगराण्याच्या आश्रयास जों पर्यंत राव होते तों पर्यंत त्यांस जय आले, तरी शेवटीं खियाना येथें रजपुतांचा जो पराभव झाला, त्यांत हे ही बाबराच्या पादाक्रांत झाले.

राव गंग सन १५३२ मध्यें वारला. त्या नंतर त्याचा पुत्र मालदेव गादीवर बसला. हा चांगला योद्धा आणि मुत्सद्दी ही होता, ह्मणून त्याची कीर्ति मोठी व दीर्घकाल राहणारी झाली. त्याणें अजमीर व नागोर हीं शहरें परत घेऊन शिवाय आपल्या राज्याच्या सरहद्दीवरील पुष्कळ मुलुख काबीज केला, जोधपूर शहरा सभोंता मोठा मजबूद तट बांधला, पुष्कळ किल्ले व गड्या बांधल्या व मुलखांत नाक्या नाक्यांनीं पुष्कळ ठिकणीं तटबंदी केली. शीरशहानें मारवाड घेण्याच्या उद्देशानें स्वारी केली, तेव्हां मालदेवानें ५०००० फौज बराबर घेऊन त्याच्याशीं लढाई केली, आणि त्याला पुष्कळ जेरीस आणलें. शीरशहाला हें संकट कसे टळतें असें होऊन पराक्रम चालेना तेव्हां चतुर्विध उपायां पैकीं शेवटचा जो भेद तो त्याणें योजला. आपल्या सरदारां पैकीं कोणी कोणी फितले

असा मालदेवाच्या मनांत संशय पुरा बिंबला, त्यामुळें त्याणें आपलें सैन्य हल्ला करावयास निघालेलें माघारें बोलाविलें; आणि ती जयप्राप्तीची उत्तम संधी आलेली घालविली. मग ज्या सरदारांचा संशय आलेला होता, त्यांणीं आपण निमकहराम नाहीं, खरे राजभक्त आहों अशी खात्री करून देऊन आपल्यावर आलेला आळ घालविण्या करितां आपलीं खासगीं पथकें घेऊन तेवढ्यांच निशीं शत्रूवर चाल केली. त्या प्रसंगीं त्यांणीं अगदीं बादशहाच्या डेऱ्या पर्यंत मजल पोहोंचवून लढाईची शिकस्त केली, परंतु बिचाऱ्यांची संख्यांच थोडी पडली, त्यामुळें शत्रूच्या अफाठ सैन्यापुढें त्यांचें कांहीं चालेना. तरी ते मागें हटले नाहींत. या प्रमाणें प्राण नाश फार झाल्यामुळें मालदेवास युद्ध बंद करण्या वांचून दुसरा उपाय राहिला नाहीं.

या नंतर एक गोष्ट घडली ती क्षुल्लक होती खरी, तरी परिणामीं मालदेवाला फार अहितकारक झाली. हुमायून शहाजादा असतां बापाशीं बिघडून पळत होता; तो मालदेवाकडे दीन होऊन आला असतां त्याणें त्याला आश्रय दिला नाहीं. पुढें तो गादीवर बसला, मेला, सारें झालें. त्याचा ग्रंथ आटोपला, परंतु मालदेवाच्या नशीबीं विपरीत काल पहावयाचा होता, तो त्याचा मुलगा अकबर याणें त्याला दाखविला. हा कीर्तिमान बादशहा गादीवर बसल्यावर सैन्य तयार करून त्याच्यावर चालून आला, आणि ज्या मुलखांत त्याणें शरणागतास आश्रय दिला नाहीं, त्यांत त्याणें ही अनाश्रित होऊन निघून जावें असें करूं लागला.

मारवाडावर ही अकबराची स्वारी सन १५६१ मध्यें झाली. त्या वेळीं त्याणें मालकोट व नागोर घेऊन रायसिंग म्हणून एक रजपूत राजा होता त्याला दिलीं. या पुढे अठरा वर्षें मालदेव लढतच होतां, परंतु कांहीं इलाज चालेना, तेव्हां त्याला तह करणें भाग पडलें. परंतु तो मानी, त्याला तें भाषण स्वमुखानें करवेना; म्हणून त्याणें आपला द्वितीय पुत्र चंद्रसेन ह्यात बोलण्यास पाठविलें. इकडे अकबर ही मानीच आणि विजयी झालेला, तेव्हां त्याला ही आपला यांत अपमान झाला असें वाटून क्रोध आला, आणि त्याबराबर त्याणें जोधपूर ही रायसिंगास दिलें. मग तो वृद्ध राव अगदीं निकराचर येऊन बसला. जोधपुराला वेढा पडला, तो उठवण्या करितां त्याणें आपली शिकस्त केली, परंतु जय न येतां शेवटीं

नें न करावें ह्मणून इतकें दुःख सोसलें तेंच करावें लागलें. त्यानें आपला पुत्र युवराज उदयासिंग ह्यास बादशहाला मुजरा करावयास पाठविलें. त्याचा बंधु चंद्रसेन हा बापा प्रमाणेंच मानी होता, त्याच्या मनाला हें प्रशस्त न वाटून सत्रा वर्षें पर्यंत भावांशीं आणि अकबराशीं असेंच वैमनस्यानें वागून शेवटीं तो रणांगणीं पडला.

मालदेव वृद्ध झालाच होता आणि तशांत असे प्रसंग गुदरल्यानें त्याला फार दुःख होऊन तो सन १५७३ मध्यें वारला. त्याला बारा पुत्र होते त्यां पैकीं तृतीय उदयासिंग* गादीवर बसला.

ह्या उदयासिंग राजाच्या कारकीर्दीत मारवाडचें स्वातंत्र्य नष्ट झालें. तो मोगलांचा नुसता ताबेदार होऊन राहिला नाहीं, त्यानें आपली बहीण जोधबाई इचा अकबराशीं विवाह लाऊन देऊन वरदक्षिणा देण्याबद्दला उलट कन्यामूल्यच घेतलें ह्मणण्यास हरकत नाहीं. अकबरानें अजमीर शिवाय करून मारवाड पैकीं जिंकलेला सारा मुलुख सोडून देऊन शिवाय माळव्या पैकीं कांहीं चांगले सुपीक महाल उदयासिंगास दिले. त्या मुळें त्याची जमाबंदी पहिल्या पेक्षां दुप्पट वाढली. मग उदयासिंगानें मेहुण्याची मदत घेऊन आपल्या पदरच्या सरदारांचें बळ मोडलें, व मोठ मोठ्या जमीनदाऱ्या मोडून हलक्या रयतांनां सुखी केलें. या प्रमाणें त्याने जी नूतन संपत्ति संपादिली तींत १४०० गांव जास्त आले. अकबरापासून इतका मुलुख मिळाला त्याच्या बदला त्याला लढाईच्या वेळीं तो आपले पुष्कळ स्वार व सैन्य पुरवी; तें उत्तम प्रकारचें, बादशाही सैन्या पेक्षां कोणत्याही प्रकारें न्यून नसे.

उदयासिंगाने मालदेवाच्या मागें तेतीस वर्षें राज्य केलें. त्याला औरस ३४ मुलें होतीं, त्यांतील पुत्र सूरसिंग गादीवर बसला.

हा सूरसिंग मोठा योद्धा होता. तो सन १५९१ । ९२ पासून लाहोर येथें बादशाही सैन्यांत सुभेदारी करीत होता तसाच असतां बापाच्या मरणाचें वर्तमान त्याला कळलें. त्याचें युद्धकौशल्य आणि पराक्रम पाहून अकबर त्याजवर फार खुष असे. ह्मणून तो स्वराज्यांत यावयास

---

* ज्येष्ठ पुत्र हद्दपार झालेला होता, व दुसरा बियाना येथें लढाईंत मेला ह्मणून हा तिसरा गादीवर बसला.

निघाला, तेव्हां अकबरानें शिरोहीच्या रावास जिंकण्याची कामगिरी त्याला सांगितली. कारण तो राव आपल्या डोंगराळ प्रदेशांत त्या दुर्गमस्थानीं राहून बादशहास जुमानीत नसे. परंतु सूरसिंगानें अकबराच्या मनाप्रमाणें त्याला पादाक्रांत करून पुढें गुजराथच्या राजावर स्वारी केली, आणि धंडूका येथें त्याच्याशीं लढाई करून गुजराथ प्रांत काबीज केला. अकबर वारल्यावर जाहानगीर गादीवर बसला. तेव्हां सूरसिंग आपला पुत्र युवराज गजसिंग यास बराबर घेऊन दरबारास गेला, तेव्हां झालूरच्या किल्ल्यावर चढतांना गजसिंगानें मोठें शौर्य प्रगट केलें होतें तत्स्मरणार्थ बादशहानें त्याला एक तलवार बक्षीस दिली.

सूरसिंगानें जोधपुरास विशेष शोभा आणली. त्याणें पुष्कळ कामें केलीं त्यां पैकीं कांहीं फार उपयोगीं आहेत. तीं सर्व त्याच्या नांवानें चालतात आहेत. दिल्लीपतीच्या दरमोहिमेंत त्याला जावें लागे याचें त्याला फार वाईट वाटे, आणि मरणापूर्वी एकस्तंभ तयार करवून त्यावर त्याणें असें खोदवून ठेविलें कीं इतउत्तर माझ्या वंशजां पैकीं कोणी ही एकदां देखील नर्मदा उतरून पलिकडे जाऊं नये, जो जाईल त्याला माझा शाप लागेल. सूरसिंग सन १६२० मध्यें वारला. त्याला सहा पुत्र आणि सात कन्या होत्या.

सूरसिंग वारला तेव्हां त्याचा ज्येष्ठ पुत्र गजसिंग तापीतीरीं बऱ्हाणपूर येथें बादशाही फौजेबराबर होता, तो ते वर्तमान समजतांच जोधपुरास जाऊन गादीवर बसला. तो ही दिल्ली दरबारीं मोठ्या योग्यतेस चढला. जहानगिराने त्याला पुष्कळ बक्षिसें दिलीं, आणि दक्षिणदेशाचा सुभेदार नेमिलें. तो बापा प्रमाणेंच पराक्रमी होता. त्याच्या युद्धकौशल्या बद्दून व धाडसा बद्दून " शत्रुरोधक " असें त्याला नांव पडलें होतें. शाहाजादा करीम (शहाजादान बादशहा) आपला बडिल बंधु शहाजादा खुषरू याजबराबर कलह करूं लागला, तेव्हां गजसिंग त्याला सामील होईना, म्हणून करीमानें त्याच्यावर रोष करून त्याच्या विश्वासू दिवाणाचा खून करविला, म्हणून त्याणे मनसबी सोडून घरची वाट धरली. पुढें थोड्याच दिवसांनीं खुषरू अकस्मात वारला, तेव्हां करीम आनंदमानून आतां बापाला कैद करून आपण गादीवर बसावें असा विचार करूं लागला. वें पाहून जहानगीर गडबडला, आणि ह्या पितृद्रोही पोरा पासू-

न आणि गृहकलहांतून मला कसें-तरी सोडवा असें ह्मणून रजपूत सरदारांचीं विनवणी करूं लागला. त्या प्रसंगीं गजसिंगानें, व जयपूर, बुंदी, व कोटा येथील राजांनीं उदारपणानें-त्याला अभय देऊन करीमाचें बड मोडलें. बनारस नजीक जो शेवटची लढाई झाली ती पूर्वी जहानगीर त्या सर्व रजपूत मित्रानां भेटला, तेव्हां गजसिंगाची आपल्या विषयीं आस्था पाहून त्याला जो आनंद झाला त्यांत तो नुसता त्याच्या-हातांत हात घालून राहिला नाहीं. तर त्याणें त्याचें चुंबन ही केलें. - ही गोष्ट वारंवार घडणारी नव्हे.

गजसिंग-सन १६३८ मध्यें-गुजराथेंत लुटारू लोकांबराबर लढाई करीत असतां-तींत पडून मेला. त्याणें आपला ज्येष्ठ पुत्र अमरसिंग हा स्वभावानें जुलमी आणि वर्तनानें उद्दाम आहे असें पाहून त्याणें गादीवर बसूं नये असें ठरविलें होतें, ह्मणून-त्याचा द्वितीय पुत्र जसवंतसिंग गादीवर बसला. अमरसिंगाचा पुढील वृत्तांत* हिंदुस्थानच्या इतिहासांत ज्या मोठ्या चित्तवेधक गोष्टी आहेत त्या पैकींच आहे.

आपल्या पितृपितामहां प्रमाणें जसवंतसिंग ही मोठा पराक्रमी राजा झाला. त्याणें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. रजपूत लोकांनां जों पर्यंत आपल्या देशबांधवांच्या व पराक्रमी पूर्वजांच्या उज्वलित कीर्तीची थोरवी वाटत असेल व त्यांच्या कृत्यांचें भूषण वाटत असेल तों पर्यंत ते त्याचे गुण गातीलच गातील. त्याचीं सर्व कृत्यें सन्मार्गास अनुसरून, निरपेक्ष बुद्धीनें होत असत असें नाहीं, त्याचें वर्तन स्वार्थावर दृष्टी ठेऊन असे हें खरें आहे, आणि ह्मणून " थोर " हें-विशेषण त्याला सर्वांशीं पूर्णपणें लागू होणार नाहीं, तरी मोठ्या सार्वभौम राजाला प्रौढी आणणारे व अधिकच शोभा देणारे असे गुण त्याच्या ठायीं वसत होते यांत कांहीं शंका नाहीं. तो खराशूर व उदार योद्धा होता, तसाच सेनापतित्व करण्यांत मोठा कुशल होता, राज्यकारभारांत निर्भय, दक्ष व मुत्सद्दी होता, तसाच स्वतः विद्वान असून विद्वानांचा आश्रयदाता आणि विद्येस उत्तेजन देणारा होता. त्याणें आपल्या अमलांतील सर्व प्रकारच्या लहान थोर लोकांची प्रीति लढाईच्या व शांततेच्या काळीं सारखी संपादिली. तो

---

* हा ढोंडच्या राजस्थानाच्या इतिहासांत पहावा.

केव्हां केव्हां धरलेला पक्ष सोडी आणि विश्वासघात करी, हा त्याचा दुर्गुण होता हें खरें आहे. परंतु असें करण्यांत त्याचा जो उद्देश होता तो स्तुत्यच होता. आपल्या जन्मभूमीचे आणि देशबंधूंचे शत्रु जे मुसलमान त्यांनां हांकून लावण्याला आपण समर्थ नाहीं, तर त्यांच्यांत भेद करून आपसांत कलह लाऊन देऊन आर्यभूमीला त्यांच्या हातून सोडवावें, एवढा त्याचा हेतु होता, ह्मणून तो त्यांच्याशीं तेवढा विश्वास घात करी. त्याचे सर्व गुणावगुण मनांत आणले असतां व त्या काल्च्या एकंदर लोकांचें वर्तन कितीसे सन्मार्गाचें होतें तें पाहिलें असतां, आमच्या मध्यें जसवंत फार थोर मनुष्य होऊन गेला, असें रजपुतांनीं अभिमानानें व डौलानें ह्मणून प्रतिष्ठा मानण्या सारखा तो होता खरा. त्याची कारकीर्द पुष्कळ दिवस, ४३ वर्षें झाली. त्याच्या पराक्रमांचें आणि सत्कृत्यांचें साद्यंत वर्णन ह्या पुस्तकांत करण्यास अवकाश नाहीं, ह्मणून वाईट वाटतें, असो. दोन तीन वेळ साऱ्या हिंदुस्थान देशाचें कल्याण अकल्याण करण्याचें त्याच्या हातीं आलें होतें. तसेंच औरंगजेब व त्याचा भाऊ दारा यांतून एकाला दिल्लीपति आणि दुसऱ्याला भिक्षापति करण्याचें ही केवळ त्याच्या इच्छेवर होतें. तो सन १६३८ मध्यें गादिवर बसला. तेव्हां पासून सन १६५८ पर्यंत ह्मणजे वीस वर्षें, औरंगजेबाबराबर मुख्यत्वे करून दक्षिणेतच कामगिरिवर होता. तेव्हां व इतर प्रसंगीं चांगल्या कामगिऱ्या बजाऊन तो पुष्कळ प्रसिद्धीस आला. सन १६३८ मध्यें शहाजान बादशहा फारच दुखणेकरी पडला आणि त्याचा वडील पुत्र दाराशेकू हा सर्व राज्यकारभार पाहूं लागला, तेव्हां त्याणें आधीं याला माळव्याचा सुभेदार नेमिलें. पुढें लौकरच औरंगजेबाचे कपटव्यापार सुरू झाले, तेव्हां त्याचा पराभव करण्या करितां दारानें जसवंतसिंगास सेनापति नेमून त्याच्याशीं युद्ध करण्यास पाठविलें. त्याणें जाऊन उज्जनीच्या दक्षिणेस सात आठ कोसांवर मोठी लढाई दिली, तींत औरंगजेबाची फत्ते झाली, ह्मणून त्याणें त्या स्थळाला फत्तेबाद असें नांव ठेविलें. जसवंतसिंगाचा तेथें जो पराभव झाला तो तरी केवळ त्याच्या विलक्षण साहसामुळेंच झाला. औरंगजेबाचा दुसरा भाऊ मुराद हाही सैन्य घेऊन येत आहे असें त्याला समजलें तेव्हां " कांहीं चिंता नाहीं, उभयतां बंधूंस एकदमच जिंकूं " असे ह्मणून औरंगजेबाशीं युद्ध न करतां मुराद येईपर्यंत तो तसाच स्वस्थ बस-

ला परंतु इतक्या अवकाशांत त्या कपटपटु औरंगजेबानें फिंतवा फितवी करून त्याच्या सैन्यांतील मुसलमानांस वश केलें, आणि त्यांणीं त्याला ऐन लढाईच्या वेळीं सोडलें. म्हणून त्याचा पराभव झाला तरी लढाई झाल्या वर उभय सैन्यें रणांगणीं होतीं तेथेंच राहिलीं आणि दुसरे दिवशीं सकाळीं जसवंतसिंग निर्भयपणें गेला. शत्रु त्याच्या वाटेस गेले नाहींत.

लढाईचा परिणाम असा झाला. आणि पुढें औरंगजेबानें खुद्द दाराबराबर दुसरी लढाई केली तींत ही त्यालाच जय येऊन तो दिल्लीस कारभार पाहूं लागला. या प्रमाणें थोडासा कृतकार्य होतांच त्याणें प्रथम जसवंतसिंगाकडे सांगून पाठविलें कीं मी तुला क्षमा करतों, तूं येऊन मला मीळ आणि आतां तिसरा बंधु सुजा याज बराबर युद्ध करावें लागेल त्या कामीं मदत कर. जसवंतसिंगाने त्याचें बोलणे मान्य केलें, परंतु त्याचा अंतस्थ हेतु औरंगजेबाचा सूड उगवण्याचा होता. पुढें उभयतां बंधूंच्या सैन्याची तयारी झाली, आणि अलाहाबाद व इटावा यांच्या दरम्यान कुजवा येथें लढाई जुंपावयाची, इतक्यांत जसवंतसिंग आपल्या फौजेनिशीं तेथें आलाच होता, त्याणें अकस्मात् औरंगजेबावर उलटून सैन्याच्या पिछाडीवर हल्ला केला. त्याणें असें करावें आणि सुजानें त्याला येऊन मिळावें असा उभयतांचा पूर्वीच संकेत ठरला होता. त्या प्रमाणें सुजानें जर हल्ला केली असती तर औरंगजेबाचा फडशा पडत होता, परंतु त्याच्या हातून तें झालें नाहीं. उजाडलें तरी सुजाचा ठिकाण नाहीं असे दिसलें, तेव्हां आतां आपण एकट्यानें युद्ध करून आपले लोक खराब करणें बरावर नाहीं असें वाटून जसवंतसिंगानें औरंगजेबाच्या छावणींत जी लूट मिळविली होती ती सर्व उंटांवर लादून आग्र्याची वाट धरली, आणि मागें उभयतां बंधु लढून खुशाल मरोत म्हटले. सुजा आला तेव्हां लढाई जुंपली आणि तींत त्याचा पराभव झाला. इकडे जसवंतसिंग जो गेला तो आग्र्याजवळच तळ देऊन वडील बंधु दाराशेकू याची वाट पहात बसला. कारण त्याला मदत करून गादी मिळवून द्यावयाची असा त्याणें निश्चय केला होता. दाराचा पराभव झाला, तेव्हां तो जो पळाला तो अटक नदीतीरी गेला होता. तिकडे कांहीं लोक जमवून गुजराथेंत शिरून तेथें फौज मिळवून आग्रा येथे जसवंतसिंगास जाऊन मिळावें म्हणून तो तयारीनें निघाला होता; परंतु दुर्दैवी पडला ! त्या मुळें त्याचें येणें लौकर हो-

ईना. जसवंतसिंगानें पुष्कळ वाट पाहिली आणि आतां आपला एकट्या-चा निभाव लागणें कठीण असें वाटलें, तेव्हां जोधपुरास जाण्याचें ठरविलें. तो घरीं जाऊन सुखरूप पोहोंचला, आणि आणलेली सारी संपत्ति तेथें ठेऊन मेडत येथें जाऊन दाराला भेटला, परंतु आतां उपयोग काय! पूर्वी सोन्या सारखी संधी आली होती, ती दाराच्या आळसानें फुकट गे-ली. औरंगजेब सुजाचा पराभव करून मोठ्या थोरल्या सैन्यासह त्यांच्या-वर चालून आला. परंतु असें झालें म्हणून जसवंतसिंग गडबडला नाहीं. औरंगजेबानें दक्षिणेंत असतां रजपुतांच्या अंगांत पाणी कसें असतें तें चां-गलें पाहिलें होतें, म्हणून आपण जय मिळवूंच असा त्याला भरंवसा वा-टेना. मनांत असा संदेह उत्पन्न झाला त्यापेक्षां जसवंतसिंगाशीं लढाईचा प्रसंग टाळावा हें बरें असें मनांत आणून त्याणें त्याजकडे असा निरोप पाठविला कीं, मी तुझा पूर्वीचा कोणताही अपराध मनांत ठेवीत नाहीं, तुला क्षमा करतों इतकेंच नव्हे, तूं ह्या आमच्या भाईबंदी तंट्यांतून आंग काढून बाजूस स्वस्थ राहशील तर तुला पुनः गुजराथची सुभेदारी सांग-तों. जसवंतसिंग त्या गोष्टीस मान्य झाला आणि शहाजादा मोअज्जीम शि-वाजी महाराजांवर स्वारी करण्या करितां निघाला होता त्याच्या हाता खा-लीं रहाण्याचें कबूल करून निघून गेला.

या प्रमाणे दारा एकटा पडतांच त्याला औरंगजेबाच्या स्वाधीन होणें भाग पडलें. परंतु जसवंतसिंगाच्या मनांत त्याच्याशीं इमानानें वाग-वें असें मुळींच नव्हतें. दक्षिणेंत जाऊन पोहोंचतो न पोहोंचतो इतक्यांत त्याणें शिवाजी बराबर पत्रव्यवहार सुरू करून शाइस्तेखानाला ठार मा-रण्याचा त्याच्या कडून बेत करविला, आणि त्या शहाजाद्याला बादशहा म्हणून त्याच्या नांवाने दौंडी पिटविण्याचें मनांत आणलें. हें सर्व कारस्था न झाल्याचें वर्तमान औरंगजेबाला कळलें, परंतु आपले सर्व प्रतिस्पर्धी पा-दाक्रांत होत पर्यंत त्याणें तें अगदीं आपल्या मनांत ठेविलें, कानीं आलें असें दिसूं देखील दिलें नाहीं, आणि मग जसवंतसिंगाला काढून जयपूर-चा राजा जयसिंग याची त्याचे जागीं योजना केली.

ह्या वेळापासून उभयतांच्या मनांत एक मेकांविषयीं अविश्वास हो-ऊन आतां उभयतां यैकीं कपटविद्येंत जो अधिक प्रवीण असेल त्याचा दु सऱ्यावर हात चढेल असें दिसूं लागलें. औरंगजेबानें जसवंत सिंगाला पू-

र्ण अधिकार देऊन पुनः दक्षिणदेशीं पाठविलें. तेव्हां त्याणें तिकडे जाऊन मोअजीमास फितवून पूर्ववत कारस्थान सूरू केलें. तें इतकें कीं औरंगजेबाला भय पडून आतां जसवंत सिंगाला परत बोलावलेंच पाहिजे, एवढ्या मोठ्या अधिकारावर ठेऊन उपयोगीं नाहीं, असें वाटू लागलें. मग गुजराथच्या सुभ्यावर तुमची नेमणूक केली आहे, तिकडे जावें असा त्याणें हुकूम पाठविला. तो मान्य करून जसवंतसिंग निघाला तो अमदाबादेस जाऊन पोहोंचला तेव्हां त्याला समजलें कीं आपल्याला अधिकारावरून दूर करण्या करितां बादशाहानें हें कपट केलें आहे. त्या बरोबर तो जोधपूरास निघून गेला.

जसवंतसिंग याप्रमाणें घरीं जाऊन बसला; तरी औरंगजेबाचें भय जाईना. तो बलाढ्य आहे, काय कारस्थान रचील नेम नाहीं असेंच त्याला वाटत होतें. ह्मणून त्याला आतां दूरदेशीं पाठवावे असें त्याणें मनांत आणलें, इतक्यांत त्याला पाहिजे होती तशी संधी आपोआप आली. काबुलांत अकस्मात् बंड उत्पन्न झालें; तें मोडण्या करितां जसवंतसिंगास तिकडे जाण्यास त्याणें हुकूम केला. तो आपला पुत्र पृथ्वीसिंग यास राज्यसंभाळावयास सांगून तिकडे निघून गेला.

जसवंतसिंग काबुलाला पोहोंचला असेल नसेल इतक्यांत मागें त्याच्या कुलाचा विध्वंस करण्याचा त्या महाकपटी दुष्टानें विचार चालविला. त्याणें पृथ्वीसिंगास आपल्या दरबारीं बोलाऊन नेलें, बाह्यात्कारी त्याजवर फार प्रीति दाखविली आणि कृपेचें चिन्ह ह्मणून त्यास पोषाक दिला. त्यांतला झगा त्याणें तेथेंच अंगांत घातला आणि प्रहर दहा घटका लोटल्या नाहींत तों तडफडून प्राण सोडला; कारण त्या झग्याला विष लाविलेलें होतें त्याणें अत्यंत वेदना झाल्या.

या प्रमाणें शत्रूनें पुत्राचा प्राण घेतल्याचें वर्तमान जसवंतसिंगाच्या कानीं जातांच त्याची कंबर मोडली. औरंगजेबानें अखेर असा क्रूरपणा करून सूड घेतला ह्मणून त्याच्या काळजांत विषाच्या पाण्याचा खंजीर खुपसल्या सारखें झालें. त्याच सुमारास त्याचे दुसरे दोघे पुत्र जगतसिंग व दलथमन हे काबूलच्या कडकथंडीनें मेले; तेव्हां तर त्याच्या दुःखाची पराकाष्ठा झाली. तो शोकाकुल होऊन सन १६७८ मध्यें वारला.

जसवंतसिंग वारला तेव्हां त्याची स्त्री सात महिन्यांची गरोदर हो-

ती. ती योग्य कालीं प्रसूत होऊन पुत्र झाला. त्याचें नांव अजितसिंग ठे ऊन पुढें थोड्या महिन्यांनीं प्रवास करण्यासारखी होतांच तिणें मारवाडची वाट धरली. परंतु औरंगजेब अतिदुष्ट ! राहटोर राजकुलाचा इतका नाश करून ही त्याची तृप्ति झाली नाहीं. तें खटलें दिल्लीस येऊन पोहोचलें तेव्हां तें तान्हें बाळ माझ्या स्वाधीन करा असें त्याणें सांगून पाठविलें. त्याच्या हुकमाला नाहीं म्हणून उलट जबाब देणें परम अशक्य होतें. परंतु त्या प्रसंगीं दुर्गादास म्हणून जसवंतसिंगाचा नोकर होता त्याणें आपली युक्ति लढविली आणि बळ नाहीं तर अक्कल लढवून काम करून घेतलें. त्याणें औरंगजेबाशीं हळूच गोडी गुलाबीचें भाषण लाऊन बराबरचीं बायका माणसें तेवढीं घरीं पाठविण्यास परवानगी घेतली. मग राणीला व तिच्या मुलाला इतर बायकांतून लाऊन देऊन तिच्या बदला एक बाई व तेवढेंच एक मूल तिच्या जागीं आणून ठेविलें. परंतु फार दिवस लोटले नाहींत तों औरंगजेबांला संशय येऊन त्या राणीला आणि मुलाला किल्ल्यांत आणून ठेवा असें त्याणें सांगून पाठविलें. तेव्हां त्या रजपुतांनीं उत्कृष्ट बतावणी करून आम्ही आपली विधवा राणी व तिचें मूल तुमच्या स्वाधीन करणार नाहीं म्हणून सांगितलें. तें ऐकून औरंगजेबाचा संशय कांहीं दिवस गेला होता; परंतु तो पुनः येऊन राणीस आतां स्वाधीन करा असा तो आग्रह धरून बसला. मंडळीनें पुनः पूर्ववत नाहीं म्हणून उत्तर दिलें, तेव्हां त्याणें स्वस्थ न बसतां सैन्य पाठविलें. त्यादेळीं रजपूत अगदीं जिवावर उदार होऊन लढले परंतु शेवटीं त्यांची कत्तल उडून दाणादाण झाली. मग औरंगजेबाच्या हातीं ती बायको आणि मुलगा लागलीं तेव्हां कायतें खरें वर्तमान त्याला कललें. परंतु तो कसला महाधूर्त ! खरी राणी आतां आपल्या हातीं लागणें *कठीण असें दिसतांच ती पळाल्याचें वर्तमान अगदीं खोटें

---

* हा मुलगा पळविल्या बद्दलची हकीगत कर्नल टॉड यांणीं निराळे तऱ्हेनें लिहिली आहे. ते म्हणतात–रानपुत्र मुसलमानाच्या हातीं जाण्यापेक्षां मरणें बेहेत्तर आहे असें समजून रजपुतांनीं आपल्या बायका तोफांच्या तोंडीं दिल्या आणि मग हातीं तलवार घेऊन दिल्लीच्या रस्त्यांत प्रलय उडविला. इकडे तें मूल एकापांटींत घालून वर मिठाई पसरून एकानें बाहेर नेलें. लोकांत दंतकथा तर अशी आहे. परंतु तिला चांगलासा

असे म्हणून त्याणें ती बायकोच राणी व तो मुलगाच खरा जोधपूरचा मालक असें म्हणून पुष्कळ वर्षें पर्यंत त्याला त्या मानानें वागविलें.

इकडे इतकें वर्तमान होतांच तो खरा इमानी दुर्गादास निघून जोधपुरास गेला आणि आतां औरंगजेबाची स्वारी होणार म्हणून तयारीस लागला. त्याणें भविष्य केल्या प्रमाणें हल्ला झालाच आणि पुढें पुष्कळ दिवस पर्यंत लढाई चालली; परंतु तो तपशील येथें देत बसण्याची जरूर नाहीं; तींत मोंगलच सदा विजयी होते येवढे सांगितलें म्हणजे पुरे आहे. त्यांणीं गांव जाळले, बायकापोरें धरून नेलीं आणि मुलुख उद्धवस्त करून सोडला, हा या प्रकरणाचा शेवट झाला. परंतु दुसरा परिणाम झाला तो-याहून विशेष महत्वाचा होता. तो हा—तेव्हां पर्यंत मुसलमानांचें आणि रजपुतांचें जें कांहीं सख्य होते तें बिघडून जें वैमनस्य पडलें तें अगदीं बऱ्हेपर्यंत होऊन बसलें.

औरंगजेब येवढा धूर्त आणि मतलबी खरा, परंतु दुर्गादास त्याला बरोबर भेटला आणि त्याचीच विद्या त्याला फळास आणून देऊं लागला. त्याणे औरंगजेबाचा पुत्र अकबर याच्यांशीं संधान लाऊन त्याला चेव आणून शेवटीं त्याच्या कडून मी बादशाहा अशी द्वाही फिरविली. हा गृहकलह सुरू झाला सर्व रजपुतांनां फावलें. औरंगजेबानें जरी लेकाचा पराभव करून बंदोबस्त केला तरी लढाई सुरू झाल्या पासून रजपुतांचा नफा होत गेला. मग त्यांणीं होऊन त्याला उपद्रव देण्याची सुरवात केली, आणि त्यांत जरी केव्हां त्यांचें थोडें बहुत नुकसान होत होतें तरी औरंगजेबाला मरे पर्यंत त्यांणीं चैन पडूं दिले नाहीं.

औरंगजेब सन १७०७ मध्यें वारला, त्या पूर्वीच अजितसिंग बयांत येऊन आपला राज्यकारभार पाहूं लागला होता; परंतु राजधानी शहर त्याच्या हातीं आलें नव्हतें. औरंगजेब मरण्या बरोबर त्याणें जोधपूर काबीज करून घेतलें आणि तें पुनः एकवार जरी त्याच्या हातून गेलें तरी पुनः घेऊन राज्यांत बहुतेक पूर्वी प्रमाणें आबादानी केली. मुसलमानांस आ

आधार नाहीं, व तसा संभव ही दिसत नाहीं.

* वज्र म्हणजे निवडुंग. याच्या चिकाचा लेप फारच चिकट होतो सामान्यत वज्रलेप म्हणजे भलतेंच समजतात, तें फार चुकीचें आहे.

पल्या मुली देऊं नयेत, व आंच्याशीं सतत लढून आपलें संरक्षण करावें, असा उदेपूर व जयपूरवाल्यांशीं ठराव करणारा अजितसिंग, तो हाच.

अजितसिंगाला पित्याचें शौर्य, धैर्य आणि उत्साह हीं उपजतच प्राप्त झालीं होतीं ; आणिं आपलें पितृसिंहासन हरण करणारां विषयीं वैरभाव इतका जबर उत्पन्न झाला होता कीं मुसलमानाचें नांव ऐकल्या बरोबर त्याच्या सर्वांगाची लाही होई. जन्मास येऊन कर्तव्य काय, तर मोगलांना हांकून लाऊन मारवाड परत घेणें; या वांचून दुसरें कांहीं त्याला दिसतच नव्हतें. त्याणें कित्येक तपें पर्यंत सतत परिश्रम करून, अतकर्य संकटें आलीं तीं न जुमानतां, बाईठ बऱ्या उपायांनीं त्यांतून ही पार पडून, शेवटीं स्वहेतु सिद्धीस नेला आणि जोधपुरांत सिंहासनावर बसून विश्रांति घेतली मुसलमानांनीं त्याला पुष्कळच त्रास दिला, बादशाही फौजा ही मोठाल्या होत्या, परंतु त्यांच्या हातून त्याचा पराभव झाला नाहीं. त्याणें स्वदेशाला पारतंत्र्यांतून मुक्त केलें. सुरसिंग, गजसिंग, जसवंतसिंग आणि अजितसिंग यांच्या सारखे, बापसे बेटा सवाई म्हणण्या लायक, खरे पराक्रमी, चार राजे अनुक्रमानें सिंहासनारूढ झालेले कोणत्याही राजकुलांत किंवा राष्ट्रांत सांपडणें कठीण.

अजितसिंगाचा शेवट मात्र फार दुःखकारक झाला. येवढा पराक्रमी शत्रु कोणत्याच तऱ्हेनें आटोपत नाहीं म्हणून दिल्लीपति तळमळत होते, व त्याला भीत ही होते. शेवटीं त्यांनां एक युक्ति सुचली आणि ती सिद्धीस ही गेली. अजितसिंगाचा पुत्र अभयसिंग हा दिल्लीस गेला होता, तेव्हां त्याला गुजराथची सुभेदारी देऊं करून त्यांणीं वश करून घेतलें आणि बापाचा खून करावयास सांगितलें. त्याणें तें कबूल करून आपला दुसरा बंधु बख्तसिंग याच्या हातून त्याचा प्राण घेवविला. या प्रमाणें उभयतां पोरांनीं द्रव्यलुब्ध होऊन पितृहत्येचें भयंकर पातक मस्तकीं घेतलें आणि राहटोर कुलाच्या कीर्तीला अक्षम्य कलंक लाऊन ठेविला.

अभयसिंग सन १७२१ मध्यें जोधपूरच्या गादीवर बसला , परंतु त्याची सारी कारकीर्द आपला पितृघ्न बंधु बख्तसिंग याजबराबर कलह करण्यांत गेली. तो स्वतः आळशी, क्रूर, अफीमबाज आणि स्वस्थ बसून राहणारा होता. गुजराथची सुभेदारी मिळाली तेव्हां त्या मुलखाची वांटणी करण्यास कबुल होऊन बनमहाल, सांभर आणि दुसरे कांहीं सुपीक प्रांत

आपल्या राज्यांत त्याणें सामील केले. " पितृहत्ये बद्दल हें जें बक्षीस मिळालें तेंच मारवाडच्या सर्व गृहकलहास आणि युद्धास कारण झालें " असें कर्नल टॉड ह्मणतात तें अगदीं खरें आहे.

अभयसिंग सन १७५० त गेला आणि त्याचा पुत्र रामसिंग गादीवर बसला. तो तरुण, सारा १९ वर्षांचा असून स्वभावानें फार उद्धट आणि जलाल होता. तो गादीवर बसला त्यावेळीं त्याचा चुलता, आपल्या बापाचा खून करणारा बखतसिंग, याणें त्याचा आपमान केला ह्मणून त्याला अतिशय राग येऊन त्याणें झालूर ह्मणून जो त्याच्या नेमणुकीस गांव होता तो जप्त करून ताब्यांत घेण्या करितां फौज पाठविली. परंतु त्यांत त्याचाच पराभव होऊन तो गादीस मुकला.

ह्या बखतसिंगाची मुद्रा गंभीर, शरीर धिप्पाड, मन उदार आणि निर्भय असून क्षात्रकुलोचित विद्येंत तो निपुण होता. तेवढें एक पितृहत्येचें महापातक त्याच्या हातून घडलें नसतें तर मारवाडच्या वीरांत त्याची गणना झाली असती. आपल्या देशाची नीति सुधारून स्वदेशाला परकी यांचा उपद्रव लागूं देऊं नये असें त्याणें देशबांधवांच्या मनांत बिंबवून दिलें. त्याची कारकीर्द अगदींच थोडी, सारी तीन वर्षें चालली. परंतु तितक्या काळांत त्याणें जोधपूरची तटबंदी पुरी करून मुलखाचें उत्पन्न ही पुष्कळ प्रकारांनी वाढविले. त्याणें आपला पुतण्या रामसिंग यास पदभ्रष्ट केलें होतें तो द्वेष मनांत धरून त्याच्या मावशीनें विषप्रयोग करून त्याचा जीव घेतला. बखतसिंगाचा पुत्र विजयसिंग गादीवर बसला, परंतु त्याला फार दिवस लोटले नाहींत इतक्यांत रामसिंग मराठ्यांच्या साह्यानें सैन्य तयार करून आपला हक्क शाबीत करण्यास आला. पुढें जी लढाई झाली तींत विजयसिंगाचा पराजय होऊन तो पळाला. परंतु ह्या जयापासून मारवाडचें मोठें नुकसान झालें. कारण मराठ्यांचें एकदां पाऊल शिरकलें तसे ते जड होऊन बसलें आणि पुढें त्यांचा सरदार जयाप्पा शिंदे याचा अकस्मात् खून झाला तेव्हां तेवढें निमित्त धरून तें दोस्तीचें नातें बाजूस ठेऊन रामसिंगाला हांकून लाऊन ते आपणच मालक होऊन बसले.

रामसिंग पळाला तो जयपूर येथें जाऊन राहिला होता, येथेंच सन १७७३ मध्यें वारला. त्याचा प्रतिस्पर्धी विजयसिंग नांवाचा राजा हो-

ता. कांहीं कालपर्यंत सर्व अधिकार मराठ्यांचाच चालला होता. विजयसिंगाच्या सर्व कारकीर्दींत मारवाडांत व बाहेर ही उलाढाली आणि लढाया चालल्या होत्या. राज्यांतील सरदार बळावत चालले होते त्यांचा मोड करून त्यांस शक्तिहीन करावें असें त्याणें प्रथम मनांत आणलें, परंतु त्यांच्या बराबर जें युद्ध झालें त्यांत पराजित होऊन त्याला आपला अधिकार पूर्वापेक्षां ही कमी करून द्यावा लागला. तो सूड उगवण्याचें मनांत ठेऊन बाह्यात्कारी तो त्यांच्याशीं प्रेमानें वागूं लागला. पुढें त्याचा कुलगुरू वारला तेव्हां त्याच्या और्ध्व दोहिका करितां त्याणें मारवाडांतले सारेथोर सरदार बोलाऊन आणून सरसकट सर्वांचें खून करविले. त्यां पैकीं एका सरदाराच्या मुलाने बंड केलें; परंतु तें त्याणें तेव्हांच मोडलें. ह्या त्याच्या घोर कर्मानें जे बाकीचे लहान सरदार राहिले त्यांनां अतिशय क्रोध आला. परंतु त्यांचें मन दुसरी कडे वळविण्या करितां त्याणें मरुस्थानांतील लुटारू लोकावर स्वारी करण्याचें योजलें. त्यांणीं त्याच्या बरावर जाऊन सिंध प्रांतांतून अटकनदीच्या खोऱ्यांत येण्याचें नाकें जें अमरकोट तें आधीं घेतलें; नंतर जसलमीर पैकीं वायव्य हद्दीवरील कांहीं मुलुख घेतला आणि तेथून उलटून पूर्वी गेलेला गोद्वरप्रांत मेवाड पासून घेतला. इतका मुलुख जिंकून आल्यावर मराठ्यांना हांकून लावावें ह्मणून विजयसिंगानें जयपूरच्या प्रतापासिंग राजाशीं सख्य केलें. सन १७८७ मध्यें तुंग्थेथें मराठ्यांचें व रजपुतांचें युद्ध झालें त्यांत मराठ्यांनां चिन्हेलिअर डी बॉइग्नी याच्या कवाईत शिकलेल्या पायदळाचें साहाय्य होतें तरी त्यांचा पराभव करून विजयसिंगानें अजमीर घेतलें. परंतु डी बाइग्नीच्या पराक्रमाला हा जो कलंक लागला तो सन १७९१ मध्यें तारीख २० जून रोजीं पाटण येथें व पुढें तारीख १२ सप्टंबर रोजीं मेडत येथें अशा दोन लढाया करून त्याणें घालविला. त्या दोन ही लढायांत रजपुतांचा अगदीं पराभव होऊन अजमीर जें पुनः त्यांचे हातून गेलें तें गेलेंच, आणि शिवाय त्यांनां मराठ्यांस ६० लक्ष रुपये खंडणी द्यावी लागली.

ह्या प्रमाणें नुकसान झाल्यावर विजयसिंग पुढें फारकाळ जगला नाहीं. तो शेवटीं कांहीं वर्षे आपल्या, रूपवती राखेच्या अगदीं अधीन वचनांत वागूं लागला होता. तिणें विजयसिंगाचा एक नातु आपल्या मांडीवर घेतला व त्याला गादीवर बसवावें असें ठरवून ठेविलें. तिचें वर्तन फा-

र उद्धट पणाचें असल्यामुळें त्याच्या पदरच्या सरदारांचें मन त्याच्या बद्दू न उडालें व शेवटीं त्याणीं तिचा प्राण घेतला.

विजयसिंग सन १७९३ मध्यें मेला. त्याला सात मुलगे होते, पैकीं एक त्याच्या पूर्वी वारला होता; बाकींच्या सहांचीं नांवें क्रमानें सांगतों.--जालीमसिंग, सावंतसिंग, शीरसिंग, भीमसिंग, गुमानसिंग, व सरदारसिंग. यांत वडील जालीमसिंग हा गादीला खरा वारस होता, परंतु विजयासिंगानें राडेच्या मर्जी प्रमाणें शीरसिंगाचा पुत्र मानसिंग यास दत्तक घेऊन गादी देण्याचें ठरविलें होतें. परंतु तो मरतांच त्याचा चौथा पुत्र जो भीमसिंग त्यानें गादी बळकाऊन वडील दादा जालीमसिंग याचा पराभव केला, आणि बाकीच्या चौघां बंधुंस व त्यांच्या पुत्रांस कोणास विष घालून व कोणास तलवारीनें तोडून मारून संहार उडवला. त्या तडाक्यांतून त्याचा पुतण्या मानसिंग, त्या राखेच्या मांडीवर बसलेला, तेवढा सुटला. तो पळून जाऊन झालूर येथें राहिला होता, परंतु भीमसिंग त्याचा पाठलाग करीत तेथें गेला. तें ठिकाण हल्लाकरून घेण्याची निराशा झाली तेव्हां तो देढा घालून नाकेबंदी करून बसला. परंतु हे वेढ्याचें काम चाललें असतां त्याणें आपल्या पदरच्या सरदारांस फार त्रास दिला, त्या मुळें त्यांचीं मनें बिटून ते आपआपल्या ठिकाणीं निघून गेले. तरी त्याणें तें काम तसेंच चालवून नाकेबंदी पहिल्या पेक्षां अधिकच केली. आंतील लोकांची अगदीं उपासमार होऊं लागली इतक्यांत सन १८०३ च्या नोव्हेंबर महिन्यांत भीमसिंग आपणच अकस्मात् मेला; तेव्हां अर्थांतच मानसिंग गादीवर बसला.

मानसिंगाला फारसे आयास न पडतां गादी प्राप्त झाली, पूर्वी ही विपत्ति भोगावी लागली नव्हती, आणि तारुण्यदशा होती, त्यामुळें त्या वयाचे कांहीं वेडेचार त्याच्या अंगांत होते. तो गादीवर बसला त्याच सुमारास इंग्रज शिंद्याचा पराभव करून होळकराला सारखा पळावयास लाऊन त्याच्या पाठीस लागले होते. त्यांच्या मनांत राजपुतान्यांत कायमची शांतता करावी असें होतें म्हणून त्यांणीं मानसिंगाकडे बोलणें लाविलें. तें तो मान्य करता तर त्याचा मुलुख कायम रहाता. तो तहास कबूल झाला, त्या प्रमाणें तहनामा तयार झाला, आणि मग त्यावर सही करीना, यांत फेरफार झाला पाहिजे म्हणून हट्ट धरून बसला. त्याचें नशीबच ओढवलें, त्या

पुढें तो तरी काय करतो ! म्हणून त्याला आणखी दुर्बुद्धि आठवली आणि त्याणें यशवंतराव होळकराला तेव्हांच मदत दिली. त्यामुळें इंग्लिशांसां राग येऊन त्यांणीं तो तहनामा रद्द केला आणि आतां मारवाडचें काय पाहिजे तें होऊ असें म्हणून आपलें आंग काढून घेतलें. मानसिंगानें अ-सा मूर्खपणा केल्यामुळें पुढें थोड्याच वर्षांनीं त्याच्या राज्यांत अमीरखान पठाणानें लुटालूट करून धुमाकुळ मांडला.

भीमसिंग अकस्मात् वारला तेव्हां त्याची स्त्री गरोदर होती, ती पळाली. ती यथाकालीं प्रसूत होऊन पुत्र झाला; त्याचें नांव ढोकलसिं-ग. पोकरवा येथील ठाकुराने त्याचें संरक्षण करून दुसऱ्या कित्येक ठाकु रांनां बोलाऊन आणून हा तुमचा यजमान पहा म्हणन सांगितलें. तेव्हां त्यां पैकीं बरेच त्याच्या पक्षाला मिळाले. मग त्याच्या प्राणाला कोणी क-दाचित् अपाय करील ह्या भीतीनें मरुस्थानांत शैलावती येथील ठाकुरांनीं त्याचें संरक्षण करावें असें ठरवून त्यांणीं त्याला तिकडे पाठवून दिलें.

मानसिंगाच्या मुर्खपणामुळें त्याचा सारा जन्म लढाईंत गेला. उदे-पूरच्या भीमसिंगराण्याची कन्या लावण्यखाणी कृष्ण कुमारी आपल्यास मि ळावी म्हणून त्याणें जयपूरच्या राजा बराबर लढाई आरंभून आपलें फार नुकसान करून घेतलें. उभयतांच्या कलहांत तिसऱ्यास लाभ ही म्हण किती खरी आहे तें अमीरखान पठाणानें चांगलेंच दाखविलें. तें स्त्रीरत्न तुह्मांस प्राप्त करून देतों अशें एकदां ह्याला व एकदां त्याला सांगून आ-पलें लुटारू सैन्य आणून त्याणे जयपूर, मेवाड व मारवाड, हीं तिन्ही रा-ज्यें कशीं उद्वस्त करून टाकिलीं आणि काय काय घोर कर्में केलीं तें ऐ-किलें म्हणजे अंगावर कांटाच उभा रहातो. जोधपूरची अशी दुर्दशा चा-ललली आहे इतक्यांत तो ढोकलसिंग सैन्य तयार करून, राज्य माझ्या स्वा-धीन करा नाहीं तर लढाईला उभेरहा, असें म्हणून रणांगणीं दाखल झा-ला. त्याला सरदार लोक पुष्कळ अनुकूल असें पाहून मानसिंगाला मोठा विचार पडला. त्या संकटांतून पार पाडण्याची दुसरी कांहीं युक्ति दिसे-चना तेव्हां त्याणें वेडयाचें सोंग घेतलें आणि आपला पुत्र चतरसिंग यास राज्य संभाळावयास सांगितलें.

हा तरुण राजपुत्र आपला कारभार पाहूं लागला असतां त्याच्या दुर्दैवानें इंग्रजांनीं अमीरखान पठाण्या बराबर पक्षभेदच तहाचे बोलणें ला-

विलें. त्या प्रमाणें उभयतांचें करारमदार ठरून तहनामा पुरा झाला आणि सारा राजपुताना त्या लुटारूंच्या धाकांतून मुक्त झाला. पुढें सन १८१८ मध्यें जानेवारी महिन्यांतच इंग्रजांनीं खुद्द चतरसिंगा बराबर तह केला. त्यांत त्याणीं जोधपुराला पराचा उपद्रव लागूं देऊं नये व राजानें त्यांचें वर्चस्व मान्य करावें असें ठरलें. परंतु अद्याप प्रजेचें भे.कतृत्व संपलें नव्हतें त्यामुळें त्याच सुमारास चतरसिंग वारला.

पुत्रमरणा नंतर थोडेच दिवसांत मानसिंगानें वेड टाकलें आणि रा ज्यकारभार आपल्या हातीं घेतला. आतां परशत्रूचा उपद्रव लागण्याचें कांहीं भय नाहीं असें पक्कें दिसलें तेव्हां आपलें खरें स्वरूप प्रकट करून तो षड्रिपूंच्या अगदीं स्वाधीन झाला. त्याणें वेड घेतल्या तागायत आजप यंत जे सरदार, मानकरी, वगैरे त्याच्याशीं मित्रत्वानें वागत नव्हते त्यांतो ल कित्येक त्याणें ठार मारले आणि कित्येक कैद करून ठेविले. त्याणें सुमार एक कोट रुपयांची लोकांची मालमत्ता हरण केली. जोधपूरांत "न्याय" हा शब्द नाहींसा झाला; विश्वासघात आणि अकारणिक क्रौ- र्य हीं अवतरलीं होतीं, आणि केवळ त्यांचेंच राज्य चाललें होतें.

असें होतां होतां शेवटीं गोष्ट निकरावर आली. दरबारांतील पु- ष्कळ उत्तम उत्तम सरदार जोधपूर सोडून जाऊन कोटा, मेवाड, बिका- नीर व जयपूर ह्या शेजारच्या राज्यांत राहिले आणि तेथून त्यांणीं ब्रिटिश अम्मलदारांनां सामोपचाराचीं पत्रें पाठविलीं. त्यांणीं तीं मनास आणून रा जास चार गोष्टी सांगून त्यांचीं समजूत करण्याविषयीं त्याचें मन वळविलें. तेव्हां त्याणें त्या स्वगृहत्याग करणारांस आणवून त्यांच्या वतनवाडचा त्यां- जकडे चालवितों ह्मणून कबूल केलें. ही गोष्ट सन १८२४ च्या फेब्रुआ- री महिन्यांत झाली. मानासिंग या प्रमाणें तोंडानें बोलला इतकेच, त्याच्या वर्तनांत कांहीं फेर पडला नाहीं. त्यामुळें सन १८२७ मध्यें त्या बेबनाव आलेल्या सरदारांनीं आपआपलें सैन्य जमाकरून भीमसिंगाचा पुत्र जो ढोकलसिंग त्याला आपला मुख्य करून जयपूरच्या मुलखांतून जोधपुरावर हल्ला करण्याची तयारी केली. आतां ही स्वारी खास होतें असें दिसलें तेव्हां मानासिंगानें इंग्रजसरकारास लिहिलें तुमच्या आमच्या तहनाम्यांत ठ- रल्या प्रमाणें माझी गादी कायम राखण्या करितां तुम्हीं या प्रसंगीं माझ्या मदतीस सैन्य पाठविलें पाहिजे; कारण हा जो हल्ला येत आहे हा माझ्या

मुलखांतील बंडखोरांचा मठ्ठे; हा जयपुरांतून येत आहे व. याला जयपूरवाले सामील आहेत. या त्याच्या म्हणण्यास सरकारानें अगदीं स्पष्ट आणि खरपूस उत्तर दिलें. तें असें——महाराज, आपल्या राज्यांतील सरदारांच्या व प्रजेच्या मनांतून आतां आपल्याला गादीवरून काढून टाकावें असें आहे, इतकें स्पष्ट दिसण्या सारखें मोठें, सार्वत्रिकच जर बंड उद्भवलें आहे, तर आम्ही आपल्याला मदत देणें बराबर नाहीं. कारण आपल्या अन्यायाच्या व जुलमी वर्तणुकीला त्रासून लोकच जर आपल्याला आश्रय देईनासे झाले आहेत, व प्रजाधर्म वाजूस ठेऊन त्यांणीं. मोठें बंड केलें आहे, तर अशा स्थितींत आम्ही आपल्याला मदत देऊन जोधपूरच्या गादीवर कायम राखावें असें उरलें नाहीं. आमच्या आश्रयानें असणाऱ्या राजेरजवाड्यांनीं आम्हांजवळ मदत मागणें अगदीं योग्य आहे, परंतु त्यांच्याच अन्यायाच्या वर्तनामुळें जुलमानें किंवा नालायकीमुळें सर्वच प्रजा जर बिथरून जाऊन बंड करील तर त्यांणीं आम्हाजवळ मदत मागणें बराबर नाहीं. आपल्या प्रजा हुकमांत वागविण्याचें सामर्थ्य राजांच्या अंगांत असलें पाहिजे, आणि तेच जर त्यांनां बंड करायाला लावतील तर परिणामीं येणारीं फळें त्यांणीं भोगलीं पाहिजेत.

आपल्या दोस्त सरकारांनीं तहनाम्यावरून मदत मागणें झालें तरी आधीं वर्तन कसें ठेविलें पाहिजे येविषयीं सन्मार्गाचा व हितकारक किंचा घालून दिल्या सारखा हा खलिता महाराजांकडे पाठवून देऊन सरकारानें इकडे त्यांनां निराश केलें, परंतु तिकडे जयपूरच्या महाराजानांही तशीच खरमरीत ताकीद दिली; आणि ढोकलसिंगाला सांगितले तूं जर अशी कांहीं गडबड करशील तर खबरदार; महाराजांशीं इतःपर कांहीं संबंध ठेवतां कामा नये.

या प्रमाणें इंग्रजसरकारच्या नुसत्या दबकावणीनें मानसिंगावर आलेलें संकट टळलें, तरी तें कालांतरावर गेलें इतकेंच. युरोपांतल्या व एशियेंतल्या राजांचीं चरित्रें पाहिलीं तर त्यांत एक गोष्ट लक्षांत ठेवण्या सारखी आढळत्ये, ती अशी——आपल्या तारुण्यांत व मध्यम वयांत जे मोठे आवेशी, गडबड्ये, क्रोधिष्ठ, घातकी आणि क्रूर, ते उत्तर वयांत बहुधा धर्मपरायण होऊन भटाभिक्षुकांच्या तंत्रानें वागूं लागतात. मानसिंगाची स्थिति या नियमा प्रमाणेंच झाली. परंतु तो जरी धर्माधिकारी वगैरे-

च्या तंत्रानें वागूं लागला तरी त्याच्या जुलमी स्वभावांत आणि क्रूरपणांत मात्र कांहीं अंतर पडलें नाहीं. उलट त्याचे दुष्ट मनोविकार इतके प्रबळ झाले कीं त्यामुळें शेवटीं इंग्रज सरकारास ती गोष्ट मनावर घेणें प्राप्त झालें.

सन १८३९ मध्यें पर्जन्यकाळ संपतांच कर्नल सदर्लंड यास जोधपुरांत शांतता करण्या करितां व साधेल तर राज्य व्यवस्था लाऊन देण्या करितां म्हणून सरकारानें फौज देऊन रवाना केलें. त्याणें पांच महिने पर्यंत जोधपुरांत तळ दिला होता. शेवटीं मानासिंगानें तहनामा करून मामुल देशारिवाजा प्रमाणें सरदारांचे हक्क ठरवून कायम राखण्याचें कबूल केलें, तसेंच आपल्या दरबारीं पोलिटिकल एजंट रहावा व राज्य कारभार चालविण्यास सरदारांचें कौन्सिल असावें; त्यास, कारभाऱ्यांस व आपल्यास त्याणें मदत करावी अशास ही तो कबूल झाला. त्याला सल्ला मसलत देणारांत दोन असामी फारच वाईट होते त्यांनां सरकारानें दूर करविलें, आणि त्याणें ज्या लोकांच्या जमिनी काढून घेतल्या होत्या त्या त्यांच्याशीं कांहीं ठराव करवून परत देवविल्या. सरकारास जी खंडणी द्यावयाची ठरली होती ती वेळेवर न पोहोचल्यानें बाकी तुंबली होती ती, व फौजेबद्दल खर्च यावा आणि पुढें पैसा नेमल्या वेळीं येत जावा म्हणून सरकारानें करार करून घेतला. जे सरदार बंडांत सामील झाले होते त्यांनां मागील सर्व अपराधां बद्दल राजानें क्षमा केली आणि मारवाडच्या खऱ्या हितास अपाय होण्यास जे कारण झाले होते त्यांनां ही क्षमा करण्यास इंग्रज सरकारानें अनुमोदन दिलें.

ह्या गोष्टी नंतर चार वर्षांच्या आंतच मान सिंगाचें देहावसान झालें. त्याला औरस किंवा दत्तक ही पुत्र नव्हता, म्हणून भीमसिंगाचा पुत्र ढोकलसिंग आपला वारसा सांगूं लागला; परंतु तो मान्य झाला नाहीं. ईडर व अहंमदनगर येथिल राजे हे जवळचे भाऊबंद होते, म्हणून त्यां पैकीं एकाला मानसिंगाच्या स्त्रियांनीं आपल्या पदरचे सरदार, मानकरी, व मोठमोठे कामदार, यांचे अनुमतानें नेमावें असे ठरलें. त्यांणीं अहमदनगरचा राजा तख्तसिंग यास पसंत करून त्याला आपला पुत्र जसवंतसिंग यासह जोधपुरास येण्यास सांगितलें. अहंमदनगर आपल्याच घराण्यांत रहावें असें तख्तसिंगाच्या मनांत असल्या मुळें वाटाघाट सुरू झाली. परंतु शे

वटीं तसें होऊंनये असें ठरून अहंमदनगर ईडरमध्यें सामील झालें; कारण तें त्या पैकींच असून सन १७८४ मध्यें पृथक झालेलें होतें.

या प्रमाणें सन १८४३ मध्यें तख्तसिंग महाराजांस जोधपूरची गादी प्राप्त झाली. हा अजितसिंगाचा पणतु, असा याचा मारवाडाशीं संबंध होतां. हा बुद्धिमान असावा व राज्यकारभार बरा चालवील अशी आशा होती. परंतु तो सर्व भ्रम लौकरच दूर झाला. त्याला गादी मिळून फार दिवस लोटले नाहींत तों राज्याची स्थिति जशी मानसिंगांच्या कारकीर्दींत होती तशीच बहुतेक अंशीं झाली. तख्तसिंग अती धनलोभी निघाला. त्याला कामकाजाची काळजी मुळींच नव्हती, आणि त्याची कोणाला ही भेट होणें म्हणजे मोठे दुर्घट झालें. मग साऱ्या मुलखाचा कारभार हातखालच्या लोकांच्या स्वाधीन झाला. हे लोक अर्थांतच स्वार्थपरायण असून आपला मतलब साधण्या करितां त्याला खुष ठेवण्यासाठीं अगदीं त्याच्या मर्जी प्रमाणें वागणारे होते.

असें होतां होतां सारीच अंदाधुंदी आणि झोटिंगबादशाही झाली; त्या मुळें सन १८६७ मध्यें सरदार लोक इतके त्रासून गेले कीं, त्यांना जर तेवढें इंग्रज सरकारचें भय नसतें तर ते खचित बंड करते. त्या वर्षीं राजानें लोभानें जें एक कृत्य केलें त्याणें तर ते अतिशयच संतापून गेले. ती गोष्ट अशी--घाणेराव येथील ठाकूर निपुत्रिक वारला; परंतु त्याला एक भाऊ होता. तो त्याचा योग्य वारस असतां त्याचा हक्क कांहीं नाहीं असें म्हणून मयताची मालमत्ता सरकारांत घेऊन ती आपल्या एका पुत्राला द्यावी असा बेत करून राजानें ती ताब्यांत घेण्या करितां फौज रवाना केली. ह्या पंथास गोष्ट आली तेव्हां सर्व ठाकुरांनीं एक विचारानें आपलीं दुःखें इंग्रज सरकारास कळविलीं. आपल्यावर किती जुलूम व जबरी होते, राजा आपल्याला कौन्सिलांत घेत नाहीं व आपली मालमत्ता दत्तक पुत्रास देऊं देत नाहीं, वगैरे गोष्टी कळवून त्यांणीं अन्यायाचीं कित्येक उदाहरणें दाखविलीं व मुख्यत्वें ही घाणेरावच्या खटल्याची हकीगत दिली.

सरकारानें त्या सरदारांचें बोलणें ऐकून घेऊन महाराजांस नीट री तीनें वागण्या विषयीं सांगितलें. त्या ताकिदी पासून अगदीं कांहींच उपयोग होणार नाहीं असें वाटत नव्हतें, परंतु सन १८७१ मध्यें राजपुता-

न्यांत जो दरबार झाला त्यावेळीं त्यांणीं जें उद्धटपणाचें वर्तन* केलें त्या वरून हे माजी मानासिंगा प्रमाणेंच कोडगे व निलाजरे आहेत असें स्पष्ट दिसून आलें.

---

* माजी व्हाइसरॉय लार्ड मेओ यांणीं सन १८७१ मध्यें अजमीर येथें दरबार भरविला; त्याला येण्याला उदेपूरच्या राण्यात व जोधपूरच्या महाराजांस निमंत्रण गेलें. त्या प्रमाणें उभयतां ही आले असतां या म्हाला उदेपूरच्या राण्याहून श्रेष्ठस्थानीं बसवावें असें महाराजांनीं बोलणें लाविलें. परंतु या गोष्टी बद्दल पूर्वीच वादविवाद होऊन सरकारांतून असा निकाल झाला होता कीं जेव्हां असा दरबारचा प्रसंग येऊन उभयतांस ही यावें लागेल तेव्हां प्राचीन वहीवाटी प्रमाणें राणे साहेबांसच वर बसवावें. परंतु जेव्हां हा निकाल महाराजांस कळविण्यांत आला, तेव्हां ते म्हणाले आम्ही दरबारास येणार नाहीं. त्यावर सरकारानें असें कळविलें कीं, या बाबतींत पूर्वी विचार होऊन एकवार निकाल झाला; त्याला पुष्कळ काळ ही झाला, आतां तुम्ही तक्रार करणें वाजवी नाहीं. परंतु ते आपला हट्ट सोडीतना. त्यांच्या चिरंजीवांनीं व पोलिटिकल एजंटांनीं पुष्कळ समजून सांगितलें, परंतु ते आपलाच हट्ट धरून बसले, राण्याच्या खालीं कधीं बसणार नाहीं म्हणाले. इकडे दरबारची वेळ झाली; ती टळावयाची नव्हे, तरी त्यांच्या साठीं एकतास वाट पाहून अखेर गव्हरनर जनरलांनीं दरबार भरविला, त्यांत महाराजांची खुर्ची मोकळी राहिली.

दरबार आटोपल्या नंतर लार्ड साहेबांनीं असें मनांत आणलें कीं आपण जो दरबार भरविला तो कांहीं आपल्या घरचा नव्हे. महाराणी साहेबांचे प्रतिनिधि आहों. असें असतां राजे साहेबांनीं जो आपला हुकूम अमान्य केला तो राणीसाहेबांचा अपमान केला, तर या बद्दल चांगला विचार केला पाहिजे. मग त्यांणीं महाराजांनां हुकूम पाठविला कीं तुम्हीं उद्यां सूर्योदय होण्या पूर्वीं डेरे, राहुट्या उटवून अजमिरांतून निघून जावें; तुमचें एक माणूस येथें दृष्टीस पडतां कामानये. त्या प्रमाणें त्यांणीं पोबारा केला. अशा दरबारच्या प्रसंगीं राजे रजवाडयांस तोफांची सलामी मिळत असते, ती या वेळीं त्यांस दिली नाहीं. व पुढें विचार करून त्यांस

मारवाड हें हिंदुस्थानांत जीं मोठमोठीं राज्यें आहेत त्या पैकींच आहे. त्याचा विस्तार ऐलंडा पेक्षां मोठा आहे; त्या पैकीं बहुतेक मुलुख निर्वृक्ष, अफाट, वालुकामय आहे. त्यावर कांटेरी झुडपें व गवत मात्र उगवतें; त्यावर गुरांचे मोठमोठे कळप व उंटांचे काफले निर्वाह करून पुष्ट असतात. इकडील राजेरजवाड्यांत मारवाडी घोड्यांची आवड व प्रतिष्ठा मोठी आहे.

या राज्याची जमाबंदी फक्त २५ लक्ष आहे, परंतु धर्मादाय देवस्थान वगैरे इनाम देणगी ५० लक्षांवर आहे.

शिप.यांच्या बंडाच्या वेळीं जोधपूरवाले सरकारच्या चांगले उपयोगीं पडले. त्यांनां दत्तक घेण्या बद्दल सनद मिळाली आहे.

भाग ४

बुंदी

बुंदी शहर राव देव याणें इसवी सन १३४२ मध्यें वसविलें. राजपुताऱ्यांतील इतर शहरां प्रमाणें या वरून ही साऱ्या राज्याला बुंदी हेंच नांव पडलें. *चव्हाण कुलाचा मूळ पुरुष जो अन्हल अथवा अग्निपाल, त्याचा वंशज राजदेव अशी दंतकथा आहे. हा अग्निपाल कोणत्या काळीं होऊन गेला याचा कांहीं ठिकाण लागत नाहीं. पुढें त्याच्या वंशजांस जेव्हां मुसलमानांचा उपद्रव होऊं लागला, तेव्हां ते असेर हें आपलें आ-

---

ताहयात १९ तोफांची सलामी ठरलेली होती. त्या पैकीं दोन कमी केल्या. महाराजांचे चिरंजीव त्यांच्या सारखे नव्हते, सबब त्यांची राजनिष्ठा मनास आणून लार्ड मेओ साहेबांनीं तो दरबार आटोपल्या नंतर त्यांची खासगी तऱ्हेनें भेट घेतली.

* आपल्या धर्माचा उच्छेद करणाऱ्या म्लेंछांचा संहार करण्या करितां ब्राह्मणांनीं जीं रानकुलें उत्पन्न केलीं त्यांतलें हें शेवटचें. फक्त त्याणें त्यांचा हेतु परिपूर्ण केला.

द्वस्थान सोडून मेवाडांत गेले. तेथून सन १३४२ मध्यें राव देव याणें बं द खोऱ्यावर हल्ला करून तें काबीज केलें आणि तेथील मूलचे रहिवासी जे मीन लोक त्यांस हांकून लाऊन बुंदी शहर वसविलें व त्या प्रदेशाचें नां हाडौवती* असें ठेविलें.

रावदेवानंतर या कुलांत दुसरा कीर्तिमान पुरुष राव सूरजन झणून झाला.तो सन १५३३मध्यें गादीवर बसला.तेथून कांही नवीनच प्रकार सु रू झाला. मध्यंतरीं जीं सुमार दोनशें वर्षें गेलीं, त्यांत येथील राजे नांवाला उदेपूरच्या राण्याचे मांडलिक होते, परंतु वस्तुतः स्वतंत्रच होते झणण्यास हरकत नाहीं. जेव्हां प्रसंग पडे तेव्हां राणा त्यांना कामगिरी सांगे व ती त्यांनां करावी लागे. त्याच्याशीं त्यांचा शरीरसंबंध होऊन आप्तपणा ही न डला होता, ते दोन्ही संबंध मनांत आणून राण्यांनीं त्यांनां देणग्या दि-ल्या होत्या.

सावंतसिंग झणून राव सूरजनसिंग याचा भाईबंद होता, त्याच्या द्वारानें त्याणें रिंठणथोर हा प्रसिद्ध किल्ला मिळविला होता, तो आपल्या ताब्यांत असावा असा अकबर बादशहाचा फारच हेतु होता. त्याणें रा-जपुतान्यांत आपला पराक्रम गाजविला, चितोड (चितुरचा) किल्ला इ-तका मजबूद, परंतु तोही घेतला, आणि रिंठणथोराला वेढा घातला, प-रंतु तेथें दाद लागेना तेव्हां त्याला मुकाम्यानें परत जावें लागलें. कि ल्ल्यावर तर अकबराचा हेतु गुंतला आणि तेथें तर पराक्रम कांहीं चाले ना; तेव्हां त्याणें युक्तीनें व आर्जवानें आपली कामना पूर्ण करून घेतली. अशी दंतकथा आहे कीं, जयपूरचा राजा मानसिंग यास त्या किल्ल्यांत जाण्याचा हक्क होता, झणून त्याच्याशीं मसलत करून चोपदाराचें वेषानें अकबर त्याच्या बराबर किल्ल्यांत शिरला. परंतु सूरजन रावाचा त्याजवर

---

* असें नांव ठेवण्याचें कारण रावदेवाचा पूर्वज अष्टपाल झणून सन १०२५ मध्यें होता, तो शस्त्राघातानें मृत होऊन पडला असतां त्या ची कुलस्वामीनी तेथें प्राप्त झाली आणि तिणें त्याचे छिन्न झालेले अवय-व एकत्र करून त्यांवर अमृतसिंचन करून त्यास सजीव केलें. हाडें ए-कत्र करून देवीनें स्वभक्ताला उठविलें त्यावरून देशाला हें नांव पडलें व त्या कुलाला हाडे असें झणू लागले.

नजर जाऊन त्याणें हा अकबर बादशहा असें ओळखिलें आणि त्याचा योग्य आदर सत्कार केला. तेव्हां अकबरानें त्याला आपला हेतु कळवून म्हटलें मला येवढा किल्ला द्याल तर इतक्या गोष्टी त्या बदला करीन—बुंदी राज घराण्यांतील मुलगी मोगल घराण्यांत द्या असें म्हणणार नाहीं, तुम्हांवर डोईपटी बसविणार नाहीं, तुम्हाला अटकनदीच्या पलीकडे जावयास सांगणार नाहीं, व तुम्हाला ज्या गोष्टी आपल्या योग्यतेला उणेपणा आणणाऱ्या वाटतील त्या करावयास सांगणार नाहीं. मी आपल्या दरबारांत कचेरीच्या वेळीं तुम्हाला हत्यारबंद होऊन येण्यास मनाई करणार नाहीं; तुमचीं जीं पुण्यस्थाने असतील त्यांनां उपसर्ग लावणार नाहीं, तुम्हाला दुसऱ्या हिंदु सैनिकाच्या हाताखालीं कधीं नेमणार नाहीं. तुमच्या घोड्यावर बादशाही निशाणीचा डाग देणार नाहीं. (हा डाग कपाळावर देत असत. त्यांत फुलाची आकृति निघे.) दिल्ली शहरच्या रस्त्यांतून लालदरवाज्या पर्यंत आपली डंका नौबत वाजवीत येण्यास तुम्हास मोकळीक देईन. दिल्ली मध्यें जसा मी वागतों तसें बुंदी मध्यें तुम्हांस वागूं देईन. व तुमचें पुण्यक्षेत्र जें वाराणसी शहर तेथें तुम्हांस राहण्यास स्थान देईन, व या क्षेत्रांत तुम्हांस कोणताही उपद्रव लागूंनये असा हक्क करून देईन.

अकबर इतकें देऊं करून शिवाय अजमेर वगैरे महालांची सुभेदारी सूरजनरावास देतों म्हणाला व त्या बदला याणें रीती प्रमाणें फौजनिशीं चाकरी मात्र करावी, महालचा जमाखर्च कांहीं विचारणार नाहीं म्हणाला.

सूरजनरावानें बादशहाचें बोलणें मान्य केलें आणि लागलाच तेथेंच उभयतांचा तहनामा झाला. सूरजनरावानें उदेपूरचा आपला मांडलिकपणाचा संबंध त्या दिवसापासून सोडला. तेव्हांपासून तो अकबराच्या पदरचा झाला आणि बुंदीचा रावराजा असें पद पावला. सूरजनरावाचा भाऊबंद सावंतसिंग याच्या मनास ती गोष्ट आली नाहीं. प्राण गेला तरी बेहेत्तर आहे, परंतु किल्ला अकबराला देणें नाहीं, असा आग्रह धरून तो बिचारा फुकट प्राणास मुकला.

अकबराच्या पदरीं राहिल्यावर सूरजनसिंगानें कामगिरी चांगली बजावली म्हणून बादशहानें त्याला बनारस व चुनार हे दोन प्रांत बक्षीस दिले. मग त्याणें त्या पुण्यक्षेत्रींच वास्तव्य केलें. त्याच्या बंदोबस्ता मुळें

एका त्या क्षेत्रासच नव्हे, परंतु सर्व मुलाला सुख झाले. त्याणें आपल्या राज्यभर शांतता करून जीवित आणि वित्त उत्तम प्रकारें सुरक्षित केलें; काशी शहराला पुष्कळ शोभा आणली, त्यांत निरनिराळ्या प्रकारच्या सा र्वजनिक उपयोगा करितां ८४ इमारती बांधल्या आणि गंगातीरीं बीस घा ट बांधले. त्याणें आपला देह अखेर ह्या मुक्तिपुरींतच ठेविला. नंतर त्या चा ज्येष्ठ पुत्र राव भोज गादीवर बसला. तो आपल्या पाठच्या भावाला बरोबर घेऊन अकबराबराबर गुजराथच्या मोहिमेत गेला होता, तेथें उभ यतांनीं चांगला पराक्रम केला. भोजानें तर एकदां स्वहस्तानें शत्रूकडील मुख्य सेनानायकास ठार मारलें. सन १६०५ मध्यें अकबर मरे पर्यंत तो बादशाही लष्करांत होता, नंतर स्वराज्यांत परत गेला. पुढें लौकरच तो बुंदी येथें मेला. त्याला रावरतन, हरदनारायण आणि केशवदास असे ती न पुत्र होते, पैकीं ज्येष्ठ गादीवर बसला.

राव रतन आपल्या बापाचा कित्ता उचलून बऱ्हाणपूर येथें बादशा हाच्या स्वारींत जाऊन दाखल झाला. त्याणें आपले पुत्र मधुसिंग आणि हरीसिंग या उभयतांस बराबर नेलें. ते वेळीं बादशहाचा पुत्र शहाजहान हा बंड करण्याच्या विचारांत होता. त्या प्रमाणें त्याचे बंड होऊन तो प राजित होऊन पळाला, परंतु त्या लढाईंत रतनरावाचे उभयतां पुत्र फार जखमी झाले. तेव्हां त्यांची व रतन रावाची कामगिरी पाहून बादशहा खुष झाला आणि त्यांच्या इमानीपणाबद्दल त्याणें रतन रावाला बऱ्हाणपूर- ची सुभेदारी सांगितली, व त्याचा द्वितीय पुत्र मधुसिंग यास कोटा व त्या खालील संस्थानें हीं दिलीं. ही देणगी देतांना जरी उदारपणानें व खुषी मनानें दिली असली तरी परिणामीं तिजपासून हाडोतीचें नुकसान झा- लें. कारण कोटा व त्या खालील ह्या जाहागिरी मूळच्या हाडोतीच्या रा- ज्या पैकींच असून मधुसिंगास व त्याच्या वंशजांस आतां ती बादशाही दे- णगी मानावी लागली व त्यांचा प्रत्यक्ष बादशहाशीं संबंध राहूं लागला, त्या मुळें हाडोतीचे सहज दोन विभाग होऊन बुंदीवाले व कोटावाले हे मूळ पुरुष जरी सख्खे बंधु होते तरी पुढील दर पिढीस तें प्रेम कमी हो- त जाऊन परकीपणा* वाटूं लागला.

---

* कर्नल टॉड ह्मणतात बादशहानें समजून उमजून कपटानेंच हें

राव रतन हा स्वभावतःच फार थोर पुरुष होता. त्याला सर्व लोक मोठा मान देत असत. त्याच्या कारकीर्दीत हिंदुलोकांच्या वस्तीच्या ठिकाणीं गोवध करण्याची मुसलमानांची प्राज्ञा नव्हती त्याणें आपल्या राज्यांत चोहींकडे शांतता केली, रतनपूर शहर वसविलें आणि आपल्या शेजारचें जें उदेपूरचें राज्य त्याच्याशीं स्नेहभावाचें चांगलें वर्तन ठेऊन आपल्या कुलाच्या पूर्वीच्या यजमानाची म्हणजे तेथील राण्याची कृपा संपादिली. राव रतना मागून त्याचा नातु छत्रसाल गादीवर बसला.

शहाजान बादशहानें छत्रसालाला खुद्द दिल्लीची सुभेदारी सांगितली होती, ती बहुतेक त्याचा जन्मभर त्याजकडेसच होती. तो औरंगजेबा बरोबर दक्षिणेंत ही गेला होता, आणि कलबुरग्याच्या किल्ल्याला शिडया लाऊन वर फौज चढाविण्याचें काम आपण पुढें होऊन त्याणेंच केलें. पुढें शहाजहान दुखणेकरी पडला असतां त्याचे चौघे मुलगे राज्या करितां आपसांत कलहास प्रवृत्त झाले, तेव्हां छत्रसाल औरंगजेबाच्या स्वारींतच होता. परंतु शहाजहानानें त्याला आपल्या जवळ येण्या विषयीं हुकूम पाठविला, तेव्हां त्याणें जाऊं नये म्हणून औरंगजेबानें पुष्कळच बंदोबस्त केला होता तरी त्याच्या हातावर तुरी देऊन त्याणें आपलें इमान गाजविलें. पुढें दाराशेकूची आणि औरंगजेबाची ढोलपूर येथें सन १६५८ च्या जून महिन्यांत लढाई लाहली तेव्हां छत्रसाल आपल्या सर्व भाईबंदांस बराबर घेऊन केशरी पोषाक करून अघाडीस उभा राहिला. युद्धांत जय मिळवून कीर्ति संपादूं किंवा मरून स्वर्ग तरी साधूं असा दृढनिश्चय दर्शक म्हणून रजपूतवीर हा केशरीया करीत असतात, आणि मग बोलण्या प्रमाणें करण्यास चुकत नाहींत. ते बिनीवर शौर्यानें लढत असतां छत्रसाल कपाळावर गोळा लागून पडला; तरी त्याचा पुत्र भरतसिंग शोकाकुल न होतां तसाच त्वेषानें लढत होता, परंतु त्याला जय आला नाहीं. तो

केलें होतें. त्याला असें वाटत होतें कीं येवढें मोठें राज्य ह्या पराक्रमी पुरुषांच्या हातांत संबंध राहील तर ते पुढें मागें आपल्यासच जड होऊन बसतील, याज करितां त्याचे विभाग करून त्यांच्यांत द्वैतभाव वाढविण्याचा बीजारोप करून ठेविला असला म्हणजे आपणासच त्यांस पाहिजे तसें वागवितां येईल.

आपल्या निवडक निवडक शूर भाऊबंदांसह पडून स्वर्गस्थ झाला. ह्या लढाईंत औरंगजेबाला जय येऊन राज्य प्राप्त झालें. छत्रसाल मेल्यामुळें त्याचा दुसरा मुलगा राव भाऊसिंग याला गादीवर बसावें लागलें; तेव्हां औरंगजेबानें त्याच्या बापाच्या व भावाच्या शूरत्वाबद्दल त्याच्यावर सूड काढण्याचें मनांत आणून शिवपूरचा राजा आत्माराम यास सांगितलें कीं हें हाडे रजपूतकुल मोठें उपद्रवी आणि असंतुष्ट आहे, तर याचा संहार करून बुंदीचें राज्य रिंठणथोर मध्यें सामील कर. आत्मारामानें तें मान्य करून मोठया डौलानें स्वारी करून मुलखांत धामधूम उडाविली, परंतु त्याच्या चेष्टा त्या पंचाननाचीं गांठ पडली नाहीं तों पर्यंतच काय त्या चालल्या. भाऊसिंगानें आपले जे अवाशिष्ट भाऊबंद होते ते जमवून त्याच्याशीं गांठ घातली मात्र, त्या बराबर त्याचा पराभव होऊन तो मुलुख सोडून पळाला. परंतु ते एकदां क्रुद्ध झाल्यावर ऐकतात ? त्यालां पिटून लाऊन ते जे पुढें सरले ते शिवपुराला वेढा देऊन नाकेबंदी करून बसले. मग औरंगजेबाला विचार पडला. तेव्हां त्यानें सामोपचार सुरू करून भाऊसिंगाला आपल्या दरबारीं बोलाऊन नेलें आणि औरंगाबादच्या सुभेदारीचीं वस्त्रें दिलीं. त्यानें औरंगाबादेत लोकांच्या उपयोगा करितां पुष्कळ इमारती बांधल्या व आपल्या शौर्यानें, औदार्यानें आणि धार्मिकपणानें मोठी कीर्ति मिळविली. तो सन १६८२ मध्यें अपुत्रिक वारला. तेव्हां त्याचा दुसरा बंधु भीमसिंग याचा नातू अनिरुद्धसिंग म्हणून होता तो गादीवर बसला. औरंगजेबानें त्याला कायम करून भाऊसिंगाला आपण किती मानीत होतों हें दाखविण्या करितां खुद्द आपल्या खासास्वारीच्या हत्ती वरून त्याला अधिकाराचीं वस्त्रें पाठवून दिलीं. औरंगजेबानें दक्षिणेंत स्वारी केली, तेव्हां अनिरुद्धसिंग त्याजबराबर होता. त्यानें एका प्रसंगीं चांगला पराक्रम करून बादशहाचा जनानखाना शत्रूच्या हातून सोडविला. तेव्हां त्याचें शौर्य पाहून औरंगजेब खुष होऊन म्हणाला तुला काय पाहिजे तें बक्षीस माग. तो त्या वेळीं जर एकदोन प्रांत मागता तर सहज मिळते. परंतु जो शूर, मानधान, तो नुसत्या धनाकडे पाहील काय ? त्यानें रजपूतवीराला योग्य असेंच मागणें मागितलें. तें कोणतें म्हणाल तर सर्वांपूर्वी शत्रूवर जाऊन पडण्याचा अधिकार. तो औरंगजेबाला म्हणाला आजपर्यंत माझी नेमणूक फौजेची पिछाडी संभाळण्याची आहे ती

काढून गला त्यिनांचें आधिपत्य द्यावें; एवढा हेतु आहे. पुढें विजापुराला वेढा घालून औरंगजेब नें तो किल्ला घेतला तेव्हां अनिरुद्धसिंगानें चांगला पराक्रम केला. नंतर औरंगजेब आपल्या राज्यांतील उत्तरेकडील प्रांतांचा बंदोबस्त करण्या करितां गेला तेव्हां पंजाबांत लढून त्याणें कीर्ति मिळविली, परंतु त्या स्वारींतच तो मेला.

अनिरुद्धसिंगा नंतर त्याचा पुत्र बुधसिंग गादीवर बसला. औरंगजेब मेल्या नंतर त्याच्या तख्ता बद्दल भांडण सुरू झालें, तेव्हां बुधसिंगानें खरा वारस जो बहादुरशहा त्याचा पक्ष स्वीकारला. नंतर सन १७०७ च्या जून महिन्यांत जजवा येथें भयंकर संग्राम होऊन त्या बादशहाला जो जय मिळाला तो बाहुतेक अंशीं ह्या बुधसिंगाच्या शौर्यामुळें. त्या दिवशीं त्याणें नी अद्वितीय कामागिरी बजाविली तिज बद्दल बक्षीस म्हणून बादशहानेंत्याला रावराजे ही पदवी दिली आणि आपला जिवलग मित्र म्हणावे लें. हा स्नेहभाव त्याच्या अंतकाळ पर्यंत अव्याहत चालला. पुढें महंमद शहा बादशहा झाल्यावर दिल्लीच्या गादी विषयीं पुनः कलह सुरू झाला तेव्हां सय्यद बंधूंचें प्राबल्य मोठें होतें, परंतु बुधसिंगानें आपल्या कुलाला उचित असेच वर्तन केलें. त्याणें बादशहाचा पक्ष स्वीकारून लढाया केल्या व त्यांत आपल्या सैन्याची खराबी ही करून घेतली. शेवटीं त्या सय्यदांनांच जय आला तेव्हां त्याणें आपल्या घराची वाट धरली.

बुधसिंग दिल्लीहून बुंदीस गेला. परंतु तेथें दुसरा एक शत्रु उभा च होता, त्याणें त्याला चैन पडूं दिलें नाहीं. जयपूरचा राजा जयसिंग हा त्याचा मेहुणा; त्याचा त्याणें कांहीं अपमान केला असल्यामुळें त्याणें द्वेष धरला होता, व राजपुतान्यांतील सारीं लहान संस्थानें आपल्या ताब्यांत असावीं असा त्याचा हेतु होता, म्हणून त्याणें बुधसिंग इकडे गुंतलेला पाहून कुरवर येथील दुलोलसिंगास बुंदीचें राज्य देऊन रावराजे असा किताब दिला. बुधसिंग परत आला तेव्हां त्याला फसवून धरण्याचा त्याणें बेत केला होता, परंतु तो त्याच्या व त्याच्या भाईबंदांच्या शूरत्वामूळें साधला नाहीं. मग बुधसिंग तेथून पळून बैगू येथें गेला आणि तेथून त्याणें आपलें पित्रार्जित राज्य मिळविण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केले, परंतु ते सर्व निष्फळ झाले. तितक्यांत त्याचा भाईबंद कोट्याचा राजा भीमसिंग याणें संधी साधून चंबलानदीच्या पूर्वे कडील वसुली मुलूख घेऊन तो आपल्या रा

ज्यांत सामील केला.

या प्रमाणें दुःख सोशित विचारा बुधसिंग परदेशांत मरण पावला. जयसिंग राजा त्याच्या राशीस सारखा लागला होता. त्याणें त्याच्या मुलांना तेथें थारा नाहींसा केला. परंतु तो सन १७४४ मध्यें वारतांच यां पैकीं थोरला मुलगा उमेदसिंग जरी तेव्हां सारा १३वर्षांचा होता तरी त्याणें फौज मिळवून बुंदीवर स्वारी केली आणि कांहीं चांगलीं चांगलीं ठाणीं बळका-विलीं. या कामगिरीस त्याचा भाऊबंद कोट्याचा नवा राजा दुर्जनसाल याणें मदत केली. कारण जयसिंग मेल्यानंतर जयपूरच्या गादीवर जो दुसरा राजा झाला, त्याणें बुंदी प्रमाणें कोट्याचीही वाट लावावी असें मनांत आणलें होतें. उमेदसिंगानें जें एकदां शस्त्र उचललें तें आपलें राज्य परत घेऊन आपल्याला बुंदीचे राव म्हणवलें तेव्हां खालीं ठेविलें (सन १७४९) बुधसिंगाच्या हातून बुंदी गेल्या पासून ती तो परत घेई पर्यंत चौदावर्षांत जयपूरवाल्यांशीं ज्या अनेक कटकटी झाल्या त्या स्थलसंकोचास्तव येथें सांगतां येत नाहींत.

उमेदसिंग या नंतर ५१ वर्षांनीं वारला, तेथपर्यंतचें त्याचें चरित्र विचित्र आहे. तो आपल्या पराक्रमानें गादीवर बसला तरी जयपूरवाल्यास जी खडणी द्यावी लागत असे तिजबद्दल त्याला वरच्यावर त्रास होई. तशांतच मराठे हल्ले करूं लागले. त्यांच्या हावरेपणामुळें त्यांना किती दिलें तरी पुरेसेच होईना, त्यामुळें तो बेजार होऊन गेला. त्याच्या पदरच्या एका मनुष्यानें कांहीं विश्वासघात केल्यामुळें त्याणें त्याला फसवून सूड उगवला होता, ते जरी अगदीं योग्य व जशास तसें झालें होतें तरी त्याच्या मनाला तो गोष्ट फार लागून राहिली. अशा अनेक कारणांनीं मन उद्विग्न होऊन सन १७७१ मध्यें राज्य पुत्राच्या स्वाधीन करून तो रिकामा झाला. मग श्रीजी असें आपलें नांव सांगत हिंदुस्थानांत जितकीं पुण्यक्षेत्रें, तीर्थें, विद्यापीठें अथवा अन्य कांहीं पहाण्या सारखीं स्थानें होतीं तितकीं पहात, यात्रा करीत, तो फिरत सुटला. त्याच्या अवलोकनांत पुष्कळ गोष्टी येत, त्यांचें स्मरण तो चांगलें राखी, त्या मुळें त्याला माहिती पुष्कळ झाली होती व ती आपल्या भाषणांत तो वारंवार आणी, त्या मुळें त्याच्याशीं बोलण्याची लोकांना मोठी हौस वाटे व ते त्याचे शब्द टिपून घेत, त्याला मोठा साधु समजत आणि तो जें सांगेल तें आपलें देवा

चेंच भाषण असें मानीत.

या प्रमाणें उमेदसिंग देशाटण करीत असतां त्याचें दुर्दैव त्याला त्यांत ही अव्याहत सुख होऊं देईना. त्याचा पुत्र मागें राज्य करीत होता तो वारला; त्या मुळें त्याला नातवाचा प्रतिपाळ करण्या करितां घरीं परत यावें लागलें. तो आला ह्मणून पुष्कळ लोकांस आनंद होऊन त्यांणीं त्याचा मोठा आदर केला. परंतु कित्येक खुशामती, आपमतलबी, लोकांनीं त्याच्या नातवाच्या मनांत भलभलतें भरून दिलें. पण त्याचें मन लौकरच शुद्ध झालें. उमेदसिंगानें आठ वर्षें पर्यंत नातवा कडून चांगला विद्याभ्यास करवून सन १८०४ मध्यें परलोक वास केला.

हाडे कुलाची ही शाखा पहिल्या पासून आपल्या वरिष्ट सरकारा-शीं फार इमानानें वागणारी असें वर अनेक प्रकारांनीं दिसून आलें आहे. तीच पूज्यबुद्धि उमेदसिंगाची ही असून मरण्या पूर्वी अगदीं थोडे दिवसां-खालीं ती व्यक्त करून दाखविण्याची त्याला सधी आली. त्या वेळीं लॉर्ड लेक हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या फौजेचे सेनापति होते. त्यांणीं तारीख १७ एप्रिल सन १८०४ रोजीं कर्नल मानसन यास यशवंतराव होळकरा-च्या पाळतीवर राहण्याकरितां पाठविलें. मानसन गुरो पर्यंत गेला, परंतु तेथून पुढें जाणें त्याला अगदीं अशक्य वाटूं लागलें, तेव्हां जुलईच्या ८ व्या तारखेस तो मागें परतला. त्या लाजिरवाण्या पळापळींतिल गोष्टी इतिहासप्रसिद्धच आहेत. ती फौज पळत असतां बुंदीच्या मुलखांतून चालली तेव्हां ती जरी पळत सुटलेली, आणि यशवंतराव होळकर ह्मणजे केवळ कृष्णसर्प तिच्या पाठीस लागलेला, आपण कांहीं थोडा आश्रय दिलेला कळला तर आपली दुर्दशा केल्या शिवाय राहणारच नाहीं असें उघड दिसत होतें तरी ही वरिष्ट सरकारची फौज आहे इतकें मनांत आणून उमेदसिंगानें आपल्या मुलखांत जितकी ह्मणून मदत देण्याची शक्ति होती तितकी दिली.

उमेदसिंगा नंतर त्याचा नातु बिसनसिंग गादीवर बसला. तो प्रामाणिक, मनाचा थोर आणि मोठा हिम्मतदार पुरुष होता. ज्या वांचून अडत नाहीं असले सुखोपभोग त्याला मुळींच नको होते. त्याला कायती एक शिकार आवडे. तिचा नाद इतका होता कीं तो कित्येक दिवस पर्यंत सारखा सिंहाच्या गुहेंत जाऊन त्याची पाळत राखीत बसे आणि शेवटीं त्याला मारी ते

व्हा स्वस्थ होई. तो म्हणे राजाला उचित अशी शिकार एक मृगराजाची च; गरीब सावजें मारण्यांत पुरुषार्थ काय! त्याची कृति बोलण्या प्रमाणें होती. त्याणें आपल्या हातानें सिंह शंभरांवर मारले होते, आणि वाघ व डुकर हे तर किती ठार केले त्याची मोजदादच राहिली नाहीं.

बिसनसिंग आजोबा प्रमाणेंच सार्वभौम सरकारशीं इमानानें वाग-णारा होता. इंग्रज सरकारानें पेंढाऱ्यांचा चांगला बंदोबस्त करण्याचें म-नांत आणून लढाई सुरू केली, तेव्हां सन १८१७ मध्यें त्यांची पळापळ बंद करून एका टोळीची दुसऱ्या टोळीशीं गांठच पडूं देऊं नये असें क रण्याला बुंदीचा मुलुख फारच सोईवार होईल असें दिसलें. तेव्हां बिसन-सिंगाने मनापासून पुष्कळ मदत देऊन स्वतः उत्तम कामगिरी बजाविली. सरकारानें त्याची मेहेनत मनांत बागवून होळकरानें पन्नास वर्षां पूर्वी जे त्याच्या राज्यांतील महाल बळकाविले होते ते बिन अटीनें खास बक्षीस म्हणून दिले, व शिंद्यानें जे घेतले होते ते कांहीं अटीवर दिले. असा लोकाच्या घरांत गेलेला मुलुख परत मिळाला, परंतु कोऱ्याच्या भाईबंदा नें जो मुलुख अगदीं अन्यायानें घेतला तो मात्र सुटला नाहीं.

बिसनसिंगा बराबर इंग्रज सरकारानें सन १८१८ मध्यें तहनामा करून बुंदीचें संरक्षण करण्याचें पत्करलें. तो सन १८२१ मध्यें मेच्या १४ व्या तारखेस वारला. त्याचा वडील पुत्र रामसिंग गादीवर बसला. तो तेव्हां सारा ११ वर्षांचा होता.

रामसिंग २० वर्षांचा होतो न होतो इतक्यांत एक गोष्ट घडली, ती करून बुंदी व जोधपूर यांजमध्यें चांगली लढाईच जुंपणार होती; प-रंतु इंग्रज सरकार मध्यें पडल्यामुळें तें प्रकरण मिटलें. जोधपूरच्या राजा-नें आपली कन्या रामसिंगाला दिली होती. तिचा तो फारच जांच कर-तो असें वर्तमान उठल्या मुळें बाह्यात्कारी तिचे हाल करूं नयेत असें बो-लणें लावण्या करितां म्हणून सन १८३० च्या मे महिन्यांत जोधपूरची कांहीं मंडळी तीनशें लोक बराबर घेऊन बुंदीस दाखल झाली. शहराचा-हेर एक चांगली मजबूद जागा होती तेथें ते उतरले आणि दोन दिवस स्वस्थ राहिले, तिसऱ्या दिवशीं त्यांच्या पैकीं एका असामीनें बुंदीचा मोठा बुद्धिमान आणि फार खरेपणानें उत्तम प्रकारानें वागणारा जो किसनराम*

* किसनरामानें सारा साडे सहा वर्षे कारभार केला, परंतु तितक्यां

ह्मणून मुख्य प्रधान होता त्याचा खून केला. एवढा मोठा गुन्हा परकीयांनीं के ला, तर या बद्दल योग्य शासन केल्या शिवाय सोडणार नाहीं असा तरुण रामासिंगानें निश्चय करून जोधपूरची मंडळी उतरल्या ठिकाणावर लागल्याच तोफा सुरू केल्या आणि तीन दिवस पर्यंत सारखा गोळा चालवला व त्यांनां पाणी मिळूं दिलें नाहीं. मग त्या मंडळी पैकीं दोन प्रमुख असामी, ज्यांनीं हा खून करविला असावा असा वहीम होता ते पळून जाण्याचा विचार करून बाहेर पडले होते ते सांपडले. तेव्हां रामराजानें हुकूम देऊन त्यांनां प्रसिद्धपणें फांशीं देवावेंलें. मग इतर लहान सहान मनुष्य होते ते हळूहळू आपण होऊनच स्वाधीन झाले. त्यांनां बुंदीच्या हद्दी बाहेर पार हांकून लावावें असा राजानें हुकुम केला. पुढें सहाव्या दिवशीं किसनरामाला ठार मारीन अशी ज्यानें शपथ केली होती ह्मणून समजलें होतें. तो बतुतासिंग ह्मणून जो जोधपूरचा मानकरी होता तोच ठार मेला तो एक आणि पूर्वीचे दोन असे प्रमुखच तीन असामी मेले, हा किसनरामा बदला बराच सूड उगवला असें समजून मग रामासिंगानें आणखी कोणास मारलें नाहीं.

पुढें जोधपुराबरोबर बहुत करून लढाई झाली असती, परंतु इंग्रजसरकारचा एजंट तेथें होता त्याणें सांगितलें असलें कांहीं कराल तर खबरदार मग तेवढ्यावरच तें संपलें.

सन १८५७ च्या बंडांत रामसिंग आपल्या कुलाची रीत सोडून सार्वभौम सरकाराशीं टंगळ मंगळपणानेंच वागला, त्यामुळें सन १८६०प र्यंत सरकार ही त्याच्याशीं स्नेहानें वागत नव्हतें.

बुंदीच्या राज्याचा बराच भाग अगदीं खडकळ व नापीक आहे. राजधानी शहर डोंगराच्या खिंडींत आहे. राजवाडा अगदीं डोंगरमाथ्यावर असून तेथपासून खालींइमारती माचीवर उतरत्या लागत गेल्या आहेत

त त्याणें राज्याचें सारें कर्ज फेडलें, जमाखर्चाची एक सारखी पद्धत ठेविली, वसूल पैनू पै तिजोरी कडे जमा होई असें केलें. वसूल तीन लाख होता तो वाढवून पांच लाख केला आणि दोन लाख रुपये शिल्लक टाकले. त्याणें साऱ्या खात्यांची व्यवस्था चांगली लाविली व फौजेचा पगार वेळच्या वेळीं दिला. त्याच्या मागें त्याचा मुलगा कारभारी झाला.

ती मोठी मौज दिसते.

हाल्लीं येथिल राजास महाराज हा किताब आहे आणि १७ तोफांची सलामी मिळते.

भाग ५

कोटा

कोटयाचे राजे बुंदीच्या राजाचे भांईबंद असें मागच्या भागांत सांगितलेंच आहे. जहानगीर बादशहाचा पुत्र शहाजहान यानें बंड करून लढाई सुरू केली तींत त्याचाच पराजय होऊन त्याला बऱ्हाणपुराहून अगदीं एकटें पळावें लागलें. या मोहिमेंत बुंदीचा राव रतन यानें व त्याच्या पुत्रांनीं फार शौर्य दाखविलें म्हणून जहानगिरानें राव रतनाचा द्वितीय पुत्र मधुसिंग* यास कोटा हा दोन लक्षांचा मुलुख सन १६२५ मध्यें निराळाच दिला. कोटयाखालीं ३६० गांव आहेत.

मधुसिंगानें राज्याचा उपभोग पुष्कळ वर्षें केला. त्यानें सभोंतालचे मुलुख आपल्या राज्यांत सामील करून त्याची हद्द एका बाजूस माळव्या पर्यंत व दुसरी कडे बुंदी पर्यंत नेऊन पोहोचविली. त्याचा ज्येष्टपुत्र मुकुंदसिंग सन १६५७ मध्यें गादीवर बसला. त्याच वर्षीं शहाजहान बादशहा दुखणेकरी पडला आणि त्याचे पुत्र राज्यासाठीं कलह करूं लागले, हें मागें सांगितलेंच आहे. मुकुंदासिंग आपल्या कुलाच्या किरया प्रमाणें श

---

* दुसऱ्या एका इंग्रज ग्रंथकाराचा लेख याहून थोडा निराळा आहे. तो म्हणतो राव रतन दक्षिणेंत कामगिरीवर गेला होता तेव्हां शहाजहान कैद असून त्याच्या ताब्यांत होता. त्या वेळीं मधुसिंगानें त्याच्या पुष्कळ उपयोगीं पडून त्याचें दुःख शमन केलें. ते उपकार स्मरून शहाजहानानें गादीवर बसल्यावर त्याला हें स्वतंत्र राज्य दिलें. परंतु हाच ग्रंथकार वंशावळींत मधुसिंग १६२० त गादीवर बसला असें लिहितो; त्या वरून ही देहेनगी जाहानगिराचीच असावी असें मानणें बरें दिसतें.

हाजहानाचा वडील पुत्र जो दारा, खरा वारस, त्याचा पक्ष धरून राहिला. पुढें सन १६५८ मध्यें उज्जनी येथें घोर संग्राम मांडला, तेव्हां तो आपल्या चतुर्वर्ग बंधुंसह केशरी वस्त्रें परिधान करून मस्तकीं बाशिंगें बांधून रणनवरा बनून विजयश्री किंवा मुक्ति यांतून एका वधूस वरण्याच्या निश्चयानें सेनावऱ्हाडणीस व आपल्या पदरच्या सर्व सरदार वऱ्हाड्यांस समागमें घेऊन रणांगणीं उभा राहिला. प्रतिपक्षाकडे जसवंतसिंग होता, तो ही महा पराक्रमी; त्याणें त्यांनां विजयश्री मिळूं दिली नाहीं. परंतु ते पंच भ्राते तुमुल युद्ध करून कीर्तिनवरीला वरून मग रणांत पडून स्वर्ग साधिते झाले. शेवटीं प्रेतांचे ढीग उलटतां उलटतां सर्वांत कनिष्ट जो किशोरसिंग तो सजीव सांपडला. त्याचें सर्वांग शस्त्रांच्या घायांनीं छिन्न भिन्न होऊन गेलेलें होतें; तरी तो बरा होऊन सिंहासनारूढ झाला. पुढें बादशाही सैन्य दक्षिणेंत गेलें, त्याचें आधिपत्य स्वीकारून त्याणें आणखी कीर्ति मिळविली.

मुकुंदसिंग पडला तेव्हां त्याचा पुत्र जगतसिंग गादीवर बसला. त्याणें बारा वर्षें राज्य केलें. परंतु त्याचा बहुतेक काळ बादशाही सैन्या बराबर दक्षिणेंतच गेला.

जगतसिंगानंतर त्याचा चुलत बंधु पैमसिंग गादीवर बसला. तो महामूर्ख होता. त्या मुळें सर्व सरदारांनीं सहा महिने वाट पाहून त्याला गादीवरून काढून आपल्या पहिल्या नेमणुकीच्या गांवीं हांकून लाविलें आणि किशोरसिंगाला गादीवर बसविलें. त्याणें मोगलसैन्याबराबर जाऊन आपलें युद्ध कौशल्य दाखविलें. औरंगजेबानें विजापुराला वेढा घातला तेव्हां तर त्याणें मोठा पराक्रम केला. पुढें अर्काटच्या किल्ल्यावर हल्ला करीत असतां तो मारला गेला.

किशोरसिंग दक्षिणेंत जावयास निघाला तेव्हां त्याचा वडील पुत्र त्याच्या बराबर जाईना म्हणून त्याणें त्याला गादी मिळूं नये असें ठरवून ठेविलें होतें. सबब तो मेल्यावर त्याचा द्वितीय पुत्र रामसिंग गादीवर बसला. औरंगजेब मेल्यावर त्याचे पुत्र गादीकारितां भांडूं लागले, तेव्हां रामसिंग शहाजादा अजीम याच्या पक्षास मिळून लढत असतां जेजवा येथील घोर संग्रामांत पडला. (१७०७ जून)

रामसिंगा नंतर भीमसिंग गादीवर बसला. सैय्यद बंधु आपल्या य-

जमानांस बाजूस ठेऊन आपणच बळी होऊन मोगल बादशाहचा उपभोग करूं पहात होते, त्यांस हा सामील झाला म्हणून त्यांणीं ह्याला मोठ्या पदवीस चढाविलें. बुंदीचा राव बुधसिंग, हा त्याचा भाऊबंद, वडील घराणेदार होता, त्याला पदभ्रष्ट करून बुंदींतून घालवून लावण्याचें जयपूरचा राजा जयसिंग याणें मनांत आणलें होतें; त्याला भीमसिंगानें चांगली मदत दिली, आणि त्याच्या राज्यापैकीं कांहीं मुलुख ही बळकाविला. त्याणें भिल्लांनां त्यांच्या किल्ल्यांतून हांकून लाऊन त्यांचे मुलुख घेतले. पुढें दक्षिणेचा प्रख्यात सुभेदार चिनकिलिचखान ऊर्फ असोफजा निजामउल्मुलुख याला रस्त्यांत गांठून धरावें असें मनांत आणून तो या उद्योगास लागला. परंतु तें साधलें नाहीं; फुकट मरावें मात्र लागलें. परंतु त्या पूर्वी त्याणें बुंदीच्या राजाशीं पुरी भाईबंदी साधून हाडेकुलाचें आधिपत्य आपल्याकडे घेतलें " पांच हजारी " हा किताब ह्या धाकट्या घराण्यांत प्रथम यासच मिळाला. तसेंच महाराव ही ही पदवी प्रथम याणेंच मिळविली. ती सर्व रजपुतांचा अधिपति जो उदेपूरचा राणा त्याणें दिली आणि बादशहानें कायम केला.

भीमसिंगाचा ज्येष्ठपुत्र अर्जुनसिंग हा चारच वर्षें राज्य करून अनपत्य मेला. तेव्हां गादीविषयीं आपसांत कलह उत्पन्न झाला. त्यांत कोट्याखालचे रामपुरा, भानपुरा व काळापेठ हे तीं नामी महाल गेले येवढा मात्र नफा झाला. मग अर्जुनसिंगाच्या पाठचा सियामसिंग मेला तेव्हां तंटा संपला आणि त्याच्या पाठचा तिसरा बंधु दुर्जनसाल निष्कंटक राज्य करूं लागला.

दुर्जनसाल सन १७२४ मध्यें गादीवर बसला. त्याला दिल्लीच्या महंमदशहा बादशहानें अधिकाराचीं वस्त्रें दिलीं आणि जेथें जेथें त्याच्या जातीचे लोक रहात होते तेथें तेथें गोवध बंद करण्याचा त्याला अधिकार दिला. दुर्जनसाल चांगला राज्यकर्ता निघाला त्याणें प्रख्यात कीर्तिमान बाजीराव पेशवे यांचा स्नेह जोडला. त्याणें केलेली कामगिरी मनास येऊन बाजीरावानें त्याला नहरगड किल्ला बक्षीस दिला. जयसिंगानें बुंदीच्या राज्याची दुर्दशा उडाविली, त्याला त्याचा बाप सहाय झाला होता, परंतु याला तें बरें वाटलें नाहीं म्हणून त्याणें उमेदसिंगाला राज्य परत घेण्याला मदत केली, आणि बुंदी प्रमाणें कोट्याची ही वाट लावण्याचें मनांत आणून

जेव्हां जयपूरचा राजा त्याच्याकडे वळला, तेव्हां त्याणें मोठया हिमतीनें आणि युक्तीनें कोट्याचें संरक्षण करून शत्रूचा अगदीं पराभव केला. परंतु मराठ्यां पुढें त्याचें कांहीं चालेना; त्यांचें वर्चस्व कबूल करून होळकराला खंडणी द्यावी लागली.

दुर्जनसाल अप्रज मेला ह्मणून अजितसिंग गादीवर बसला हा बिशनसिंगाचा वंशज. बिशनसिंग आपला बाप रामसिंग याजबराबर घर सोडून लढाईला जाईना ह्मणून रामसिंगानें त्याला गादीचा हक्कच ठेविला नव्हता. अजितसिंग अडीच वर्षें राज्य करून मेला. मग त्याचा पुत्र छत्रसाल गादिवर बसला. त्याचा प्रधान मोठा बुद्धिमान. जालीमसिंग ह्मणून होता, तो या वेळीं अगदीं तरुण होता. छत्रसालाच्या कारकीर्दीत जयपूरवाल्यांनीं पुनः कोट्यावर स्वारी केली; परंतु या वेळीं त्याला दैवपूर्ण अनुकूल होतें, ह्मणून त्यांचाच पराभव झाला. सन १७६१ मध्यें जयपूरची फौज टोळधाडी सारखी येऊन चंबळा नदीच्या उतारावर संरक्षण करण्याकरितां जी थोडी फौज ठेवलेली होती तीवर पडली आणि तेथून तटकबटवारो पर्यंत आली. तेथें हे हाडेरजपूत ५००० वीर होते. त्यांणीं त्यांचा मार्ग रोखला. हे येवढेसे, सारे पांच हजार, आमचें काय करनात, सहज तुडवून जाऊं; असें ह्मणून जयपूरवाले डौलानें चढून आले परंतु त्या बहादरांनीं एकदां नव्हे, दोनदां नव्हे, तीनदां त्यांना हटवून मागें फिरायाला लाविलें. शेवटीं चौथ्यानें ते अगदीं त्वेषास चढून आले, तेव्हां त्यांणीं ही निकर मांडला. असें बराच वेळ तुमुल युद्ध चाललें तरी अगत्यास जय येईल असें निश्चयानें अनुमान करणें कठीण दिसूं लागलें. इतक्यांत जालीमसिंग प्रधानानें आपली अक्कल लढवून यजमानास सहज जयप्राप्ति करून दिली. ती अशी——पानपत येथें गिलच्यांशीं घोर युद्ध होऊन मराठे पराजित झाले, तेव्हां मल्हारराव होळकर तेथून पळाला तो ह्या उभयतांची लढाई जुंपली होती तेथून जवळच तळ देऊन होता. उभयतांनीं ही पूर्वी त्याजकडे जाऊन साहाय्य मागितलें होतें, परंतु तो कोणाकडेच गेला नाहीं. आतां जेव्हां अगदीं निकरावर येऊन ठेपलें, तेव्हां तो जिकडे कृपादृष्टि करील तिकडची फत्ते होईल असें पाहून जालीमसिंगाला एक युक्ती सुचली ती त्याणें लागलीच करून पाहिली ती चांगली साधली. तो भरधांव घोडा टाकीत जाऊन मल्हाररावाला ह्मणाला जयपूरवाले आपला गोट अगदीं उ-

घडा टाकून गेले आहेत. तुम्हाला या वेळेस लुटण्याची संधी उत्तम आहे; फुकट कां घालवता ? होळकराला येवढें कळल्यावर दुसरें काय सुचणार ! त्याणें तत्क्षणीं निघण्याची तयारी केली. तें वर्तमान इकडे जयपूरवाल्यांनां समरांगणीं कळतांच ते युद्ध विसरले आणि भयभीत होऊन जे पळाले ते पुनः इकडे वळले देखील नाहींत.

ह्या जयानंतर छत्रसाल फार वर्षें जगला नाहीं. त्याच्या मागून त्याचा बंधु गुमानसिंग गादीवर बसला. हा भर जवानींत असून बुद्धिमान आणि हिम्मतदार होता. त्या मुळें राजपुतान्यावर जीं मोठमोठीं वादळें येत होतीं त्यांनां तो जुमानीत नव्हता. परंतु त्याला दैव प्रतिकूल होतें तेथें काय इलाज ! एकदां असें झालें कीं गुमानसिंगाचें आणि जालीमासिंगाचें मन एकाच स्त्रीवर गेलें. परंतु तिणें राजाला टाकून प्रधानाचाच स्वीकार केला. या प्रधानाच्या गुणाची लोकांत चहा किती होती तें या गोष्टीवरून उत्कृष्ट दिसून आलें, याज करितां राजानें त्याजबद्दल वैषम्य मानावयाचें नव्हतें, त्याला क्षमाच करावयाची होती. परंतु त्याच्या हातून तसें कांहीं झालें नाहीं. त्याणें त्याला अधिकारावरून दूर केलें. जालीमसिंग तत्क्षणीं कोट्याहून निघून तसाच उदेपूरच्या दरबारीं राणा अरसीसिंग याजकडे गेला. त्याच्या बुद्धिमत्तेची कीर्ति चोहींकडे पसरलेलीच होती, त्या मुळें तेथें त्याचें स्वागत चांगलेंच झालें. अरसीसिंग त्यावेळीं अगदीं पराधीन होता; त्याच्या पदरचा दइलवाड्याचा ठाकूर त्याला हवातसा वागवीत होता. त्याणें थोडयाच दिवसांत जालीमसिंगाला आपलें सर्व दुःख निवेदन करून यांतून माझी सुटका कर म्हटलें. त्याणें तें मान्य करून एक धाडसाचा बेत केला. त्यांत त्या ठाकुराचा जीव गेला आणि राणा मुक्त झाला. परंतु पुढें एक बंड झालें, तें मोडण्या करितां जालीमसिंगानें जी लढाई केली तींत तोच कैद झाला. प्रसिद्ध अंबाजी इंगळ्याचा बाप जो त्रिंबकराव त्याच्या हातीं तो सांपडला. पुढें उभयतांचा स्नेह जमला. मग हा मुक्त होऊन कोट्यास गेला, परंतु तेथें राजा त्याची भेट ही घेईना. तेव्हां तो एक दिवस चांगलीशीं संधी पाहून त्याच्या पुढें गेला असतां त्याणें त्याला क्षमा करून पुनः पूर्ववत प्रधान नेमलें.

गुमानसिंगाला जालीमसिंगाचा इतका तिटकारा असतां त्याणें एकदां येऊन गांठण्या बराबर राजानें त्याला पुनः लागलेंच पूर्वपदावर नेमलें

याचें कारण बहुधा असें असावें कीं या वेळीं कोट्याच्या राज्यांत मराठे शिरले होते व त्यांनां बाहेर कसें हांकन लावावें तें त्याला कांहीं सुचेनासें झालें असावें; किंवा त्याणें पूर्वी बटवारो येथें जी कामगिरी बजाविली होती ती त्याला स्मरली असावी. जालीमसिंगानें पूर्वी प्रमाणें आतां ही परशत्रूपासून कोट्याची मुक्तता केली. परंतु तेव्हां प्रमाणें ह्या वेळीं युक्ति आणि हिकमत मात्र चालली नाहीं. मराठ्यांनीं सहालक्ष रुपये घेतले तेव्हां पाऊल बाहेर टाकलें. ह्या प्रमाणें हें परचक्र टळतें आहे इतक्यांत गुमानसिंग मेला. परंतु त्याणें मरतांना जालीमसिंगाला आपल्या अल्पवयस्क पुत्राचा पालनकर्ता नेमून ठेविलें.

उमेदसिंग गादीवर बसून महाराव पद पावला, परंतु तो बाळ असल्या मुळें राज्याचा खरा मालक जालीमसिंगच झाला. हा प्रधान फार विलक्षण पुरुष होता. त्याला अधिकाराची मोठी हौस आणि तो मिळवण्या करितां काय पाहिजे तें करण्यास तो चुकणारा नव्हता हें खरें आहे. परंतु त्याची बुद्धि कुशाग्र आणि कोणतें कार्य कोणत्या उपायांनीं सिद्ध होईल हें त्याच्या लक्षांत उत्तम येत असे. तो धाडस, अनेक युक्ति प्रयुक्ति योजणारा आणि किती ही संकटें आलीं तरी न गडबडतां त्यांतून पार पडणारा होता. त्याणें ४९ वर्षें कारभार केला, तर तितका काळ मराठे, मुसलमान, रजपूत, ह्या सर्वांत कोट्याची मोठी मान्यता होती. राजपुतान्यांतील व मध्य हिंदुस्थानांतील इतर राज्यांत हाणामार, लुटालुट, आणि अंदाधुंदी, चालली होती, परंतु कोट्यांत तें कांहीं नव्हत. तेथें ऐश्वर्याची उत्तरोत्तर चढती कळा होती; शेजारच्या राज्यांची दुर्दशा होत होती त्यांतच जालीमसिंग ह्या राज्याचें हित साधून घेत होता. त्याणें बुंदीवाल्यांशीं भाईबंदी साधून इंद्रगड, बुलवण, व अंतरदेह, हे तीन मोठे सुपीक प्रांत बळकावले ते आज पर्यंत चालले आहेत. जालीमसिंगाला इतकी कीर्ति मिळण्याला व त्याचा कारभार उत्तम चालण्याला त्याचें सद्वर्तन, न्यायीपणा आणि प्रामाणिकपणा हींच बहुतेक अंशीं कारण होतीं. इमाना विषयीं तर त्याची अशी कीर्ति होती कीं त्याचें नुसतें वचन आणि इतरांच्या शपथा, लोक सारख्याच समजत असत. सन १८०९ पासून १८१७ पर्यंत बारा वर्षांत जितक्या मोठाल्या गोष्टी किंवा तहनामे राजपुतान्यांत झाले, तितक्यांत जालीमसिंगाचा झणजे विचार घेतलेला नाहीं असें बहुधा झालेलें नाहीं. ह्या वेळीं राजपु-

न्या संबंधीं कोणत्या ही गोष्टींत आपण हात घालावयाचा नाहीं असा निश्चय करून इंग्रज लोकांनीं आपलें अंग अगदीं काढलें होतें, हें लक्षांत आणलें म्हणजे तर जालीमसिंगाचा योग्यता चांगलीच दिसून येते.

सन १८१७ मध्यें इंग्रज सरकारानें पेंढाऱ्यांचें बंड मोडण्याचें मनांत आणलें, तेव्हां जालीमसिंग इतर सर्व राजे रजवाड्यांच्या आधीं त्यांना सामील झाला. त्याच्या मार्फत त्याच सालच्या डिसेंबर महिन्यांत कोट्याचा व इंग्रजसरकारचा तह होऊन त्यांणीं या राज्याचें संरक्षण करावें असें ठरलें, व त्याला महारावानें आपल्या शक्ती प्रमाणें, जरूर पडेल तेव्हां फौजेची कुमक करावी असें ही ठरलें. ह्या तहनाम्यांत पाठीमागून आणखी एक कलम घातलें त्यांत कोट्याची दिवाणगिरी जालीमसिंगाकडेच वंशपरंपरा चालावी असें लिहिलें व त्याच्या हिताचीं अशीं आणखी ही कांहीं कलमें वाढलीं. परंतु तो मनाचा खरा थोर व इमानी, त्याणें आपल्या पोळीवर तूप ओढलें नाहीं. अशा बद्दल ही पुढील गोष्ट लक्षांत ठेवण्या सारखी आहे. होळकरानें सोडलेले चार प्रांत तूं आपल्याला घे आणि आम्ही तुज बराबर स्वतंत्र तहनामा करतों असें इंग्रज सरकार त्याला म्हणूं लागलें, परंतु त्याणें तें मान्य केलें नाहीं; ते प्रांत कोट्याच्याच राज्यांत सामील केले पाहिजेत असा आग्रह धरला. महाराव उमेदसिंग केवळ नांवाचे राजे, जीवंत मनुष्य होते, ते सन १८२० मध्यें वारले आणि त्यांचे चिरंजीव किशोरसिंग गादीवर बसले. त्याचा व दिवाणाचा अगदीं थोडया दिवसांत बेबनाव येऊन राजा नांवाचा मालक म्हणून प्रधान आपल्या इछे प्रमाणें हवें तें करणार असें आतां चालणें कठीणसें दिसूं लागलें. घोडयावर बसणारा एक आणि लगाम दुसऱ्याच्या हातांत असें चालणेंच नाहीं, त्या प्रमाणें होऊन त्याच वर्षी डिसेंबर महिन्यांत किशोरसिंग आपले सरदार ठाकूर वगैरे बराबर घेऊन कोट्यातून बाहेर पडला, आणि आसपासच्या राजांची मदत घेऊन जालीमसिंगाला हांकून लावण्याच्या इराद्यानें ६००० फौजेनिशीं जयपुराहून निघून आपल्या मुलखांत शिरला. जालीमसिंगानें आपल्या मदतीस इंग्रजांजी फौज आणली आहे व ती आपला रस्ता अडवून बसली आहे असें त्याला कळलें होतें तरी न जुमानतां तो पुढें सरसावलाच. तेव्हां मंगरूळ येथें लढाई होऊन त्याचा पराभव झाला. त्याचा भाऊ पडला आणि त्या फौजेची दाणादाण झाली. (तारीख ३० सपटंबर १८२१ इसवी)

महाराव किशोरसिंग पराजित होऊन जो पळाला तो जोधपूर पैकीं नथवाडा येथें जाऊन बसला. परंतु तेथें तहाचें बोलणें होऊन तो तारीख ३१ डिसेंबर रोजीं स्वस्थानीं परत येऊन नामधारी राव होऊन राहिला. खुद्द त्याच्या व चाकरमाणसांच्या वगैरे खर्चा करितां सालिना १६४००० नेमणूक ठरली. शिवाय १०० स्वार व इतर २०० माणसें मिळून तीनशें त्याच्या हुकमांत असावीं व राजवाड्याच्या दरवाज्याच्या आंत एक त्याचा हुकूम असावा असें ही ठरलें. बाकी राज्याचा कारभार जालीमसिंगाकडे वंशपरंपरा असावा अशास तो कबूल झाला.

जालीमसिंगाला ह्या पूर्वी पुष्कळ दिवस राजराणा असा किताब मिळाला होता. तो सन १८२४ मध्यें जूनच्या १५ व्या तारखेस मरण पावला. नंतर त्याचा पुत्र मधुसिंग कोट्याचा कारभार पाहूं लागला. हा येवढ्या मोठ्या हुद्याच्या लायक मुळींच नाहीं असें अगदीं उघड दिसत होतें. परंतु तहनाम्यांतील कलम फार जोरदार पडलें,त्या मुळें त्याला अधिकार प्राप्त झाला.

सन १८२८ मध्यें किशोरसिंग महाराव मृत्यु पावले, आणि त्यांचें चिरंजीव रामसिंग गादीवर बसले. त्या नंतर थोड्याच काळांत मधुसिंग दिवाणजी वारले आणि त्यांचे चिरंजीव मदनसिंग कारभार करूं लागले. उभयतांच्या बाप आजां प्रमाणें यांचें ही जमलें नाहीं आणि सन १८३४ मध्यें जेव्हां वैमनस्य अतीच वाढलें, तेव्हां इंग्रज सरकाराला वाटलें कीं असे तंटे चालूं देणें चांगलें नव्हे ; कांहीं तरी नवी व्यवस्था करून हे मिटविले पाहिजेत. शेवटीं सन १८३८ मध्यें महारावांच्या संमतीनेंच असें ठरलें कीं सन १८१८ च्या तहनाम्यांत जालीमसिंगाकडे वंशपरंपरा दिवाणगिरी असावी असें जें कलम मागून घातलेलें आहे तें रद्द करावें आणि कोट्या पैकीच कांहीं मुलुख निराळा काढून त्याच्या वंशजांनां स्वतंत्र संस्थान करून द्यावें. ही गोष्ट लागलीच अमलांत येऊन कोट्या पैकीं १७ महाल मिळून १२ लक्ष रुपये वसुलाचें संस्थान मदनसिंगाच्या ताब्यांत झालें ; त्याचें नांव झालावर.

कोट्या पैकीं येवढा मुलुख गेल्या मुळें इंग्रज सरकाराला नवा तह करावा लागला. त्यांत असें ठरलें कीं महारावाचे खंडणींत ऐशीं हजार रुपये कमी करून तेवढी रक्कम प्रतिसाल झालावर संस्थानांतून द्यावी ; व म-

ह्यारावांनीं इंग्रज सरकारची फौज आपले चाकरीस ठेऊन तिंचे खर्चा बद्दल सालिना तीन लाख रुपये द्यावे.ती गोष्ट महारावांनीं मोठ्या नाखुषीनें पत्करली, परंतु पुढें तें कलम काढून टाकावें असें सारखें बोलणें लावलें. त्यामुळें सन १८४४ मध्यें सरकारानें असें ठरविलें कीं त्यांणीं दोन लाख रुपये द्यावे व तेवढ्यांत फौजेचा खर्च न भागेल तर जी रक्कम जास्त होईल ती कोट्याच्या खंडणींतून द्यावी. सरकारानें रावांनां आणखी अशी ताकीद दिली कीं हे २लाख व खंडणीचा पैसा ठरल्या प्रमाणें वेळेवर तुम्हांकडून न पोहोंचेल तर साऱ्या रकमेची फेड होई इतक्या वसुली बेरजेचा मुलुख तोडून घेऊं.

मदनसिंगास झालावर संस्थान पृथक तोडून दिल्यानें रावाचा व त्याचा तंटा अगदीं मिटला आणि उभयतांस सुख झालें.

सन १८५७ मध्यें वर सांगितलेल्या चाकरीस ठेवलेल्या फौजेनें बंड करून तेथील पोलिटिकल एजंट व त्याचे दोन मुलगे यांस ठार मारलें. त्या वेळीं रामसिंगानें तें बंड मोडण्याची किंवा एजंटास मदत देण्याची वगैरे कांहींच खटपट केली नाही म्हणून सरकारानें त्याजवर इतराजी करून त्याच्या सलामीच्या ४ तोफा कमी केल्या. पुढें मेहेरबानी करून दत्तकाच्या परवानगी बद्दल सनद दिली.

हे महाराव सन १८६६ मध्यें मार्चच्या २७ व्या तारखेस सायंकाळीं वारले. ते आतां जगत नाहींत असें दिसलें तेव्हां एक राणी मी सहगमन करणार असें म्हणूं लागल्याची बातमी उठून ती पोलिटिकल एजंटाच्या कानावर गेली. तेव्हां त्याणें वाडयांत जाऊन जनानखान्याला कुलपें ठोकलीं आणि बाहेर पहारा बसवून होतां होईल तेथपर्यंत राव मेल्याचें वर्तमान निकडे जाऊंच नये असा बंदोबस्त केला. त्या प्रमाणें चार तासपर्यंत तिकडे कांहीं बातमी कळेना तेव्हां एका राणीनें आक्रांत करून दरवाजा फोडला आणि बाहेर येऊन मी सती जाणार म्हणून सांगितलें. परंतु तिला जनानखान्याबाहेर पडतां येऊं नये असा, लागलाच बदोबस्त झाला ; आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं कांहीं दंगा धोपा न होतां प्रेताचें दहन झालें.

रामसिंगा नंतर त्याचा पुत्र महाराव चतरसिंग गादीवर बसला. ते वेळीं पुन. गव्हरनर जनरलांनीं त्याच्या बापाला बंडापूर्वी जशी सत्रा तोफांची सलामी मिळत होती तशी आतां ह्यालां ही मिळावी असें मेहेरबानीनें

ठरविलें.

कोटा हा मुलुख सुपीक व ह्यांत पाण्याची समृद्धि आहे. राजधानी शहर चांगल्या मजबूद ठिकाणीं, चंबळातीरानजीक आहे. जो प्रदेश डोंगराळ आहे त्यांत शिकारी करितां मोठें अरण्य राखलेलें आहे, व त्यांत शिकारीस येणाऱ्या आपल्या पाहुण्यांस महाराव पंचाननाची गांठ सहज घालून देतात.

भाग ६.

झालावर

ह्या संस्थानाची स्थापना कशी झाली तें कोटच्याच्या इतिहासांत सांगितलेंच आहे. येथील राजास महाराज राणा अशी पदवी आहे. ह्या राजघराण्याचा मूळपुरुष जालीमसिंग याचें चरित्र मागील भागांत दिलेंच आहे, परंतु त्याच्या कुलाचा पूर्ववृत्तांत सांगणें राहिला आहे, तो येथें देऊं. त्याचे पूर्वज कोठवाडांत झालावर प्रांतांत हलवड ह्मणून आहे येथील छोटेसे सरदार होते. त्या घराण्यांतला भाऊसिंग ह्मणून एक विराददार मुलगा थोडेसे लोक बराबर घेऊन घरांतून बाहेर पडला, आणि त्या वेळीं औरंगजेबाचे मुल्गे आपल्याला राज्य मिळावें ह्मणून मोठाल्या फौजा देशभर जमवुं लागले होते त्यांत आपलें नशीब काढावें ह्मणून शिरला. त्याचा मुलगा मधुसिंग प्रथम कोट्यास गेला. तेव्हां तेथील राजा भीमसिंग याच्या ऐश्वर्याचा अगदीं भर होता. मधुसिंगाबरावर सारें पंचवीस घोडें होतें, तरी भीमसिंगानें त्याचा योग्य आदरसत्कार करून त्यास ठेऊन घेतलें व त्याणें आपली बहीण राजपूत्र अर्जुनसिंग यास देण्याचा हेतु दर्शविला तो मान्य करून त्याच्याशीं आप्तपणा ही जोडला. त्या वरून त्याच्या कुलाची पूर्वीच चांगली मानमान्यता असावी असें उघड दिसतें. हा आप्तपणा झाल्यावर पुढें थोडयाच दिवसांनीं रावानें त्याला नंदना गांव व फौजदारी दिली. फौजदार ह्मणजे मोठा विश्वासू माणूस हवा लागतो ; कारण त्याचा अधिकार गुस्त्या फौजेवर नसतो ; रावाचें रहाण्याचें मुख्य ठिकाण जो किल्ला तो ही त्या

च्याच ताब्यांत असतो. मधुसिंगाला येवढा मोठा अधिकार मिळाला आणि त्याचा आप्तसंबंध होता त्या मुळें दरबारांत त्याचें वजन चांगलें राहून त्याला रात्रीं मुलें मामा म्हणत त्यावरून मामा साहेब असें नांव पडलें, तें त्याच्या वंशाला ही लागलें. तो मेल्यावर त्याचा मुलगा मदनसिंग फौजदार झाला आणि ती नोकरी वंशापरंपरेची होऊन बसली. मदनसिंगाचा पुत्र हिम्मतसिंग याणें कित्येक निकराच्या प्रसंगीं मोठें शौर्य आणि कौशल्य दाखविलें. मराठे व जयपूरवाले या उभयतांनीं एक होऊन जेव्हां कोट्यावर हल्ला केला, तेव्हां किल्ल्याच्या संरक्षणार्थ त्यानें मदत करून पुढें जेव्हां मराठयां बराबर तह करण्याचें ठरलें तेव्हां त्या तहाचें बोलणें बोलण्यास जाऊन तें काम इतक्या हुशारीनें चालविलें कीं तेणें करून मराठयांस खंडणी देण्याचें ठरून पूर्ववत राज्य कायम राहिलें. जालीमसिंग हा त्याचा पुत्र. त्याणें केवढी कीर्ति संपादिली तें मागें सांगितलेंच आहे. त्याचा नातू मदनसिंग हा झालावरचा पहिला महाराव राणा. तो सन १८४९ मध्यें वारला आणि त्याचा पुत्र पृथीसिंग गादीवर बसला. तो सन १८५७ च्या बंडाच्या वेळीं सरकारच्या फार उपयोगीं पंडला. त्याच्या मुलखांत जे युरोपियन आश्रयासाठीं शिरले त्यांस त्याणें सुरक्षित स्थळीं नेऊन ठेविलें.

भाग ७

टोंक

टोंक हें शहर राजपुतान्यांत बनास नदीच्यातीरीं दिल्लीच्या नैर्ऋत्येस २१८ मैलांवर आहे. त्या वरून साऱ्या संस्थानाला टोंक असेंच नांव पडलें आहे. तें स्थापणारा प्रख्यात लुटारू अमीरखान पठाण गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत रोहिलखंडांत अफगाण कुलांत जन्मलेला होता. तो वीस वर्षांचा होतांच आपल्या धाकट्या भावाला बराबर घेऊन वीस माणसांनिशीं घर सोडून निघाला आणि माळव्यांत जाऊन तेतील शिबंदींत नोकरीस राहिला. परंतु थोडक्याच दिवसांत तेथल्या पेक्षां अधिक मिळवतीचें दुसरीकडे संधान दिसतांच ती चाकरी सोडून निघाला. छदूखान मेल्यावर

भोपाळांत गादीं विषयीं तंटे सुरू होऊन उभय पक्षांचे लोक सैन्य जमवूं लागले, त्यांत नामधारी नबाब हयातखान याणें अमीरखानास त्याचे सहास्वार व ८ शिपाई यां सुद्धां नोकरीस ठेविलें. ती नोकरी सुमार वर्ष भर करून तो तेथून निघाला आणि रघुगडच्या पदभ्रष्ट झालेल्या रजपूत सरदारां जवळ जाऊन राहिला. शिंद्यानें त्यांचीं संस्थानें जिंकून घेऊन त्यांनां हांकून लाविलें होतें, ह्मणून ते कोटें तरी लुटालूट करून आपला व आपल्या पदरच्या मंडळीचा निर्वाह करीत असत.

अमीरखान त्यांच्या जवळ असतां चांगला धाडस व निर्भय नायक ह्मणून प्रसिद्धीस आला. परंतु त्यांपैकीं एका सरदाराचा व त्याचा तंटा होऊन तो तेथून ही निघाला, तो पुनः भोपाळांत गेला आणि बाळाराम इंग्ळ्या जवळ राहिला. हा मराठा सरदार भोपाळचा वजीर मुरीदमहंमद याणें मुलखांत शांतता करण्या करितां ठेवलेला होता. त्याणें अमीर खानाला फत्तेगडची किल्लेदारी दिली व नबाब गोसमहंमद यास ही त्याच्याच ताब्यांत दिलें. परंतु मुरीदमहंमद मेला आणि मराठे ही निघून गेले तेव्हां याची किल्लेदारी निघाली. तरी नवा वजीर वजीरखान याचीं आर्जवें करून तो त्याच्या पदरीं राहिला. परंतु तो सूक्ष्मदृष्टि पडला, त्याणें सहा महिने गेले नाहींत तों याचा स्वभाव खटपटी पाहून हांकून लाविलें.

ही गोष्ट सन १७९९ मध्यें झाली. त्या सुमारास साऱ्या मराठे सरदारांत यशवंतराव होळकराची पुष्कळ कीर्ति होऊन मोठी भरभराठ ही होती; त्याजकडे अमीरखान गेला. यशवंतरावानें मोठ्या आनंदानें सन्मान पूर्वक त्याची भेट घेऊन त्याला अगदीं बरोबरीच्या नात्यानें वागविलें. तेव्हां पासून सन १८०६ मध्यें होळकर हिंदुस्थानांतून परत येईपर्यंत ते उभयतां एक असल्या सारखे वागत होते. यशवंतराव होळकर राजा आणि साऱ्या सैन्याचा अधिपति, व अमीरखान त्याच्या पदरचा इतका कायतो भेद होता. परंतु तो आपल्या फौजेचा मुखत्यार होता, पाहिजे त्यास ठेवी, नको त्यास घालवी. तो इतक्या योग्यतेस चढला ह्मणून त्याला कांहीं सुख होतें का! छे: तें नांव नको. त्याला पैशाची नेहेमी चणचण, फौज पगारासाठीं सारखी ओरडत असे. शिपायांचीं तोंडें बंद करण्या करितां त्याला मुलखांत लुटालूट व जुलूम जबरी करावी लागे, तरी त्यांची पूर्तता होत नसे. त्यामुळें त्याणीं कित्येक वेळ त्याच्याशीं दांडगावा ही केला, तो त्याला सोसावा ला-

गला. परंतु प्रसंग पडला असतां तो जो पक्ष स्वीकारी तिकडेच राहून तो जो हुकूम करी त्या प्रमाणें वागून त्याचे लोक मरण्यास तयार असत, आ णि त्यांच्या निवावर तो पाहिजे तें करी. तरी एकंदरीत त्यांनां शिस्तवार शिपाई झणण्यापेक्षां लुटारूच झणणें शोभतें. अमीरखानाचें प्रस्थ माजत माजत इतकें वाढलें कीं सन १८०६ मध्यें त्या जवळ ३५००० फौज हो ती आणि लढाईच्या उपयोगीं अशा ११५ तोफा होत्या.

हा वर्षांपूर्वीच अमीरखानाला होळकरानें माळव्यांत व राजपुतान्यांत जाहा-गिरी नेमून दिल्या होत्या त्या मिळून हाल्लींचें टोंक संस्थान झालें. त्याणें जी थोरली अफाट फौज बाळगिली होती तिचा खर्च त्या जाहागिरीवर भा-गत नसे झणून ती राजपुताना, माळवा, बुंदेलखंड, वगैरे मुलुखभर उपद्रव करीत, लुटीत फिरत असे.

यशवंतराव होळकर भ्रमिष्ट झाला, तेव्हां अमीरखान आपला मेहु-णा गफूरखान यास आपल्या वतीनें इंदुरास ठेऊन सन १८०६।७ म-ध्यें जयपूरचा राजा जगतसिंग याजकडे गेला आणि कांहीं दिवस त्याच्या चाकरीस राहिला. उदेपूरच्या राण्याची कन्या लावण्यखाणी कृष्णाकुमारी आपल्यास मिळावी असा हेतु धरून जोधपूरचा राजा मानसिंग याणें ही मागणी घातली मानसिंगालाच कन्या द्यावी असा शिद्यानें आग्रह धरल्या मुळें भीमसिंग राण्यानें जगतसिंगास नकाराचे उत्तर दिलें. तो अपमान सहन न होऊन त्याणें मारवाडावर स्वारी करून मानसिंगास जिंकलें आणि जो-धपूर घेऊन लुटलें. तेव्हां मानसिंगाच्या पदरच्या ठाकुरांनीं त्याचा पक्ष सो-डून एक तोतया राजा उभा केला आणि त्याला जोधपूरच्या गादीवर बस-विण्याचा विचार चालविला. तेव्हां मानसिंगाला मोठी काळजी पडली. हें वर्तमान ऐकून अमीरखानाची स्वारी इकडे आली. तो किती उलट्या का-ळजाचा होता आणि एका द्रव्याच्या आशेनें त्याणें किती भयंकर कर्में केलीं तीं आतां ऐका. तोच होऊन मानसिंगाकडे जाऊन झणाला मला अमूक द्र-व्य दाल तर तुमचे सारे शत्रु नाहींसे करतों. मानसिंगानें तें मान्य केलें. तेव्हां त्याणें त्या तोतयाकडे जाऊन त्याची चाकरी धरली आणि त्याला वि-श्वास येण्या करितां एका मशिदींत जाऊन त्याशीं व त्याच्या ठाकुरांशीं पा-गोट्यांची* अदला बदल केली. मग त्यांच्याशीं अगदीं प्रेमानें वागून त्यां-

* रजपूत लोकांमध्यें परस्परांचा मुख्य संबंध जमला असतां तो स्प-

ला पुरा विश्वास बसला तेव्हां एक दिवस मेजवानीचा थाट होऊन तोतया च्या डेऱ्यांत गाणें बजावणें, नाच रंग चालला असतां, त्याणें डेऱ्याचे तणावे कापून अकस्मात् डेरे अंगावर पाडले आणि सारे लोक गुरफटून सांपडले असतां त्यावर तोफा सुरू केल्या आणि त्यांचे प्राण घेतले. तोतयाचें मध्यंतरीं आलेलें विघ्न या प्रमाणें टळतांच मानसिंग कृष्णाकुमारी मला मिळाली पाहिजे असें पुनः ह्मणूं लागला. तिकडे जगत्सिंग ही आपला आग्रह सोडीना. तेव्हां ह्या पाषाणहृदयी अपूर्वचांडाळकर्म्या पठाणानें कृष्णाकुमारीस विष देऊन तंड्याचें मूळच नाहींसें करावें अशी विचित्र युक्ति काढून भीमासिंगास तसें करावयास लाविलें. कृष्णाकुमारी तीनदां तीन पेले विष प्याली परंतु तें लागू झालें नाहीं ; तरी ह्या यमाला दया आली नाहीं. त्याणें चौथ्यानें कालकूटतुल्य विषाचा पेला तयार करवून अखेर तो देवविला आणि त्या उभयतां राजांस रडत बसविलें, तिच्या मातापितरांस शोकसागरांत बुडविलें, आणि विधातृसृष्टींतील अप्रतिम स्त्रीरत्न नाहींसें करून सर्व जगास हळहळविलें. पुढें त्याणें जयपूरची धुळधाण उडविली आणि नागोर लुटून फस्त केलें. जयपूरच्या व जोधपूरच्या राजांमध्यें इतकी स्पर्धा आणि वैमनस्य वाढण्यास कारण मानसिंग गादीवर येण्या पूर्वी सवाईसिंग ह्मणून जोधपूरचा दिवाण होता तो. अमीरखानानें सात लक्ष रुपये घेऊन सन १८१७ मध्यें सवाईसिंगाचा विश्वासघातानें खून केला.

अमीरखान एका राजपुतान्याला उपद्रव देऊन राहिला नाहीं. तो मुलुख उजाड करून सन १८०९ मध्यें स्वारी नागपुरावर वळली. भोंसल्यांनां तेथून हाकलून लाऊन ती गादी आपण बळकावावी असा त्याचा हेतु होता असें म्हणतात. तो ह्या स्वारींत गुंतला असतां इंग्रजांनीं त्याच्या सिरांज शहरावर चालून जाण्याची तयारी केली. तें ऐकतांच तो उलटला. पुढें लागलेंच त्याचा मेहुणा गफूरखान याणें त्याला इंदुरास येण्या विषयीं निकडीनें एकावर एक बोलावणीं पाठविलीं; तेव्हां सन १८१० मध्यें तो इंदुरास गेला. आपल्या मना प्रमाणें तेथील सर्व कामाचो नीट व्यवस्था ला-

---

ष्ट करून दाखविण्याची अशी एक चाल आहे कीं सर्वांनीं एकत्र बसून पगड्या काढाव्या आणि एकमेकांच्या बदलून घालाव्या. ह्यास पगडीभाईचारा करणें म्हणतात.

ऊन तो पुनः राजपुतान्यांत व माळव्यांत शिरला. त्या मुलखाला तो सारखा उपद्रव देत होता. त्या वेळीं इंग्रजलोक पेंढाऱ्यां बराबर लढण्यांत गुंतले होते त्यामुळें त्यांच्या मनांत जरी त्या प्रदेशांत शांतता करावयाची होती तरी कांहीं वर्षें पर्यंत त्यांचा ही हात चालला नाहीं.

सन १८१७ मध्यें इंग्रजांची फौज माळव्याकडे निघाली तेव्हां अमीरखान जयपूरपैकीं मधुराजापूर किल्ल्यास वेढा घालून बसला होता, त्यावेळीं त्याच्याशीं तह करण्याचें योजून त्यांणीं बोलणें लाविलें कीं तूं आपली कांहीं फौज ठेऊन घेऊन बाकीचीस फांटा दे, तुझा तोफखाना आह्मास विक्रत दे, तुझे कांहीं स्वार आम्ही आपल्या पदरीं नोकरीस ठेवितों; होळकरानें तुला जी प्रथम जाहागीर दिलेली आहे ती घेऊन स्वस्थ रहा, आम्ही तुझें संरक्षण करतों आणि तूं जो धामधूम करून मुलुख घेतलास तो सारा सोडून दे. अमीरखान इतर पेंढाऱ्यां पेक्षां बलाढ्य होता खरा, परंतु त्या वर्गांतलाच समजावयाचा. इंग्रजां बराबर लढून आपला निभाव लागलेच असें त्याला वाटेना, ह्मणून ते होऊन जर तह करूं म्हणतात आहेत आणि इतक्या सढळपणानें ठराव करण्यास कबूल आहेत, तर ही संधी घालवूं नये असा विचार करून तो मान्य झाला. त्या प्रमाणें तहनामा तयार झाला, परंतु नागपुरांत जी लढाई चालली होती तिचा शेवट कसा काय होतो हें पहात तो बसला. अखेर शिताबळदीची बातमी आली तेव्हां आतां मराठ्यांत कांहीं जीव उरला नाहीं असें समजून त्याणें तहनाम्यावर सही केली, आणि आज पासून शांतपेनें सुखांत राहून सभ्यतेनें वागावयाचें असा निश्चय केला.

ह्या तहनाम्यानें सिरोंज, पीरावा, गोगुल व नीमाहेरा हे चार प्रांत अमीरखानाकडे कायम राहिले. शिवाय इंग्रज सरकारानें टोंक रामपुरा हा प्रांत किल्ल्यासुद्धां त्याला अगदीं बक्षीस देऊन तीन लाख रुपये कर्जाऊ दिले व तेही पुढें बक्षीस केले आणि त्याच्या मुलाला पलवल प्रांत ताह्यात जाहागीर ह्मणून दिला. तो ताब्यांत देण्यास कांहीं अडचणी आल्यामुळें त्याच्या वसुला बद्दल महिना १२५०० रुपयांची नेमणूक करून दिली.

हा तहनामा झाल्या दिवसापासून अमीरखानानें लुटालुटीचा धंदा अगदीं सोडला आणि आपल्या जाहागिरींत स्वस्थता राखून सुधारणा चालविली व राजवाडे, धर्मशाळा, सराया वगैरे बांधण्यांत कालक्रमण केलें. ते-

वस्त्यानें संतुष्ठ न होतां त्याणें अपल्या विचित्र कृत्यांचें स्मरण रहाण्या करि तां स्वचरित्र लिहिलें.

अमीरखान जसजसा वृद्ध होत चालला तसतसा अधिकच सन्मार्गास लागला. ज्यानें साऱ्या राजपुतान्याला बहुतेक धुळीस मिळाविलें, जयपूर व जोधपूर यांची तर इतकी दुर्दशा उडाविली कीं तीं अगदीं टेंकीस येऊन सरासरी जीव धरून राहिलीं, तो मनुष्य मोठा धार्मिक आणि भक्तिपरायण होऊन सुखोपभोग आतां पुरे म्हणून उंची वस्त्रें टाकून गोणपाठ पांघरूं लागला, आणि मुल्लांची संगत् करून कुराण वाचीत बसूं लागला. त्याला बारा मुलें होतीं त्यां कडून विद्याध्ययन करविण्या विषयीं ही त्याणें पुष्कळं परिश्रम केले. सन १८३२ मध्यें तो अजमीर येथें गव्हरनर जनरल लॉर्ड उइलियम बेंटिंक यांस भेटावयास गेला, तेव्हां आपल्या मुलां पैकीं सहांस बराबर घेऊन गेला होता. त्यांतल्या पांचांनीं अंगांत सांखळ्यांचीं चिलखतें घातलेलीं होतीं. त्या भेटींत व्हाइसरायांच्या मनाचा त्याच्या विषयीं ग्रह चांगला झाला. त्याची चालरीत फार सरळ आणि संभावितपणाची होती. राजस्थानांतले खानदानीचे पिढीजादे राजेरजवाडे ही दरबारास आले होते, त्यांची मानमरातबा विषयीं आढ्यता आणि डौल यां पेक्षां याच्या साधेपणा अधिक मानवला.

अमीरखान सन १८३४ मध्यें वारला; आणि त्याचा मुलगा वजीरमहंमदखान गादीवर बसला. त्याणें बंडाच्यावेळीं चांगली मदत केली म्हणून औरससंततीच्या अभावीं महंमदीशाच्या प्रमाणें तुमच्या घराण्याकडेच राज्य चालेल अशी गव्हरनर जनरलांनीं त्याला सनद दिली. तो सन १८६४ मध्यें जूनच्या १८ व्या तारखेस मेला तेव्हां त्याचा मुलगा महंमदअल्लीखान गादीवर बसला.

या नबाबाच्या कारकीर्दींत एक मोठा तंटा झाला, त्या मुळें हा गादीस मुकला. ती गोष्ट अशी—महंमद अल्लीखानानें लावा येथील आपल्या पदरच्या ठाकुरा जवळ पैशाचें भलतसें मागणें केल्यामुळें त्याणें सन १८६५ च्या जुलई महिन्यांत इंग्रज सरकाराकडे अर्ज केला. तेव्हां गव्हरनर जनरलाच्या एजंटांनीं नबाबास सांगितलें कीं आपण विचार करून ठाकुराकडून वाजवी रकम घ्यावी. परंतु त्याणें त्याचें सांगणें अगदींच तुच्छ करून फौज जमवून लावावर हल्ला केला. तेथचा ठाकूर कांहीं भ्याला नाहीं. त्याणें सो

गन्यास उभें राहून नवाबास चांगला हात दाखवून रडत परत जावयास लो विलें. उभयपक्षी कडील माणसें जायां फार झालीं. इतक्यांत इंग्रज सरकारनें आपला एक अम्मलदार तेथेंच पाटविला. त्याणें दोघांच्या मना प्रमाणें तोड करून पुढें परस्परांचा संबंध कसा असावा तें ही ठरविलें. असें तें प्रकरण तेव्हां पुरतें मिटलें.

महंमद अल्लीखानाला या प्रमाणें हें प्रकरण संपवून घ्यावें लागलें ह्मणून मनांत फार त्वेष येऊन तो सूड घेण्यास केव्हां संधी सांपडेल अशी वाट पहात बसला. लावा येथील ठाकूर धीरतसिंग अगदीं तरुण, कामांत फारसा वहिवाटलेला नव्हता; परंतु तो सन १८६५ पासून आपल्या चुलत्याच्या विचारानें वागत असे. त्याचें नांव रेवतसिंग. तो शूर, शिपाई होता, व पूर्वी अलवार संस्थानांत स्वारांचा जमादार होता. धीरतसिंग आपल्या हक्का करितां जरी असा भांडत होता तरी १८६५ पासून १८६७ पर्यंत वरचेवर टोंक येथें नबाबाच्या दरबारीं आपल्या सेवकधर्मा प्रमाणें जात असे. हा स्वतः इतका हुशार किंवा वहिवाटलेला नाहीं, परंतु चुलता सांगेल तसा वागत असतो व हें सर्व त्याचें शिकवणें आहे, असें साऱ्या दरबाराला समजलें तेव्हां तो जिवंत असे पर्यंत त्याच्यावर आपला हात चालणें नाहीं असें जाणून नबाबानें रेवतसिंगाला मारण्याचा विचार मनांत आणला.

महंमद अल्लीखानानें पुरें कपट करून धीरतसिंगावर आतां आपली इतराजी नाहीं असें दाखवून सन १८६७ मध्यें त्याला टोंक येथें बोलाविलें आणि त्याला पोषाक देण्याचें ठरविलें; तेव्हां ते उभयतां चुलते पुतण्ये थोड्या लोकांनिशीं तेथें आले. नबाबाच्या दिवाणाची व ठाकुराची भेट होऊन बोलणें चालणें झालें. त्यांत त्याणें असें सांगितलें कीं नवाब साहेबांनीं तुमच्या ज्या जामिनी घेतल्या आहेत त्या सोडण्याचा विचार ठरतो आहे, तुम्ही कांहीं काळजी करूं नका. त्या विचाऱ्या भोळ्याला तें खरें वाटून तो आनंद मानीत बिऱ्हाडीं गेला. त्याच दिवशीं ह्मणजे तारीख १ अगष्ट रोजीं प्रहरगव्हीं दिवाणानें रेवतसिंगास असें सांगून पाठविलें कीं ठाकुरांस सकाळीं जो पोषाक द्यावयाचा तो तुम्हास दाखवून ठरवावयाचा आहे तर आमच्या घरापर्यंत येऊन चला. तो बिचारा तें खरें समजून आपला मुलगा, दोन कामदार व हुजऱ्ये शिपाई मिळून सारीं १४ माणसें बराबर घेऊन तसाच गेला. रेवतसिंग, त्याचा मुलगा व ते दोन कामदार असे जि

ना चढून वर जातांत इतक्यांत त्या सर्वांचे भराभर खून झाले. बाकीचे १४ असामी खालीं होते त्यांवर दिवाणाचे शिपायांनीं झडप घालून एकदम कत्तल उडविली. त्यांतल्या एका असामीचें पागोटें त्यांतल्या एका शिपायाच्या सारखेंच असल्यामुळें हा आपल्या पैकींच असें त्या धांदलींत त्यांनां वाटल्या मुळें तेवढा मात्र बचला. तो प्राण घेऊन ती बातमी सांगायाला पळाला. इकडे असें होतांच नवाबाच्या स्वारांनीं जाऊन धीरतसिंग होना त्या घराला गराडा घालून त्याला आंत कोंडलें. त्याणें भूक तहान न म्हणतां तीन दिवस पर्यंत आपला बचाव केला. त्या तीन दिवसांत अन्न किंवा पाणी कसें तें त्याच्या किंवा त्याच्या जवळच्या एकां ही मनुष्याच्या दृष्टीस खरेंच पडलें नाहीं. चौथ्या दिवशीं नवाबानें तीन असामी त्याच्याकडे पाठवून त्याला अगदीं अभयवचन देववून आपल्या भेटीस बोलाऊन नेलें. ठाकुरानें त्याची भेट होतांच न भितां तोंड सोडून त्याची खूप निर्भर्त्सना केली. त्यावर नवाबानें इतकेंच उत्तर केलें कीं जी गोष्ट होऊन चुकली ती आतां परत येत नाहीं ; तिज बद्दल बोलून उपयोग काय ? चुलत्याबराबर पुतण्या सांपडता तर त्याची ही तीच वाट होती. तें ऐकून घेऊन धीरतसिंग निघून गेला. तरी बिऱ्हाडा सभोंते स्वार पूर्ववत होतेच. तो आगष्टच्या ८ व्या तारखे पर्यंत तसा राहिला. त्या दिवशीं इंग्रज सरकारचा एक अम्मलदार तेथें आला आणि त्याणें त्याला आपल्या घरीं जाण्या विषयीं नवाबाची परवानगी आणली. परंतु तिकडे नवाबानें आधींच १००० शिपाई आणि ४० जेलाला लाव्यास पाठवून दिल्या होत्या, त्याणीं किल्ल्यावर गोळ्यांचा भडिमार सुरू केला होता.

नवाबानें येवढा मोठा धडधडीत जुलूम केला असतां वरिष्ट इंग्रजसरकार तिकडे लक्षच देणार नाहीं असें कसें होईल? त्याणीं लागलीच चौकशी सुरू केली. वर सांगितलेल्या साऱ्या गोष्टी शाबीत झाल्या तेव्हां सरकारनें असा हुकूम फर्मावला—नवाब महंमद अल्लीखान यास पदच्युत करावें व टोंक संस्थानच्या हद्दी बाहेर जाऊन रहावयास सांगावें, पुनः हद्दीच्या आंत येऊं देऊं नये. त्याचे दिवाण या मुकद्दम्यांतले अग्रेसर, त्यांनां राजकीय कैदी करून ठेवावें; व त्याच्या हाता खालीं जे शिपाई होते त्या सर्वांनां चाकरी वरून हांकून द्यावें. टोंकच्या गादीला १७ तोफांची सलामी होती ती ११ तोफांची करावी आणि लाव्याच्या संस्थानाशीं त्याचा इतःपर कांहीं सं

बंध ठेऊं नये; ठाकुरास अगदीं स्वतंत्र समजून इंग्रज सरकारचे आश्रया खा लीं घ्यावें. टोंकच्या गादीवर महंमद अल्लीखानाच्या मुलास बसवून तो व यांत येईपर्यंत त्याचा चुलता इबदुल्लाखान याजकडे कारभार सोंपवावा.

हा ठराव खुद्द नवाबास व्हाईसरायांनीं खलिता पाठवून कळविला व टोंक संस्थानांतील मानकरी, सरदार, व प्रजा यांस हिंदुस्थानं सरकारचा जा हिरनामा पाठवून प्रसिद्धपणें कळविला.

हा ठराव लागलाच अमलांत येऊन सन १८६८ च्या जानेवारी म हिन्यांत महंमद अल्लचे ज्येष्ठ चिरंजीव इब्राइम अल्लीखान गादीवर बसले. त्या वेळीं त्याचें वय २० वर्षांचें होतें परंतु स्वारी अगदीं अक्षरशत्रु आणि बेताल वागणारी होती. संस्थानाला १३ लक्ष रुपये कर्ज, तिजोरींत सुतीं शिल्लक नाहीं आणि शिपायांच्या चार चार सहासहा महिन्यांचा पगार देणें तुंबलेला. अशास्थितींत माझ्या हातून कारभार उरकणें कठीण असें इब्दु- ल्ला खानानें कळविलें ; तेव्हां सरकारानें चार असामी वजनदार सरदार स- भासद व आपला एक अम्मलदार अध्यक्ष, असे पांच मिळून कौन्सिल ने- मिलें व तरुण नवाब साहेबांनीं काम शिकण्या करितां कौन्सिल भरेल तेव्हां जात असावें असें ठरविलें.

पदच्युत नवाबास सरकारानें काशीवास करण्याची परवानगी दिली, आणि त्याणें आसपासच्या थोड्या प्रदेशांत गव्हरनर जनरलाचे एजंटाचे पर- वानगीनें कोठें शिकार करण्या करितां किंवा हवा पालटण्या करितां हवें तर जावें असें सांगितलें ; त्या शिवाय जातां नये. त्याला सालिना साठ हजार रु पयांची नेमणूक करून दिलेली आहे. त्याचा दिवाण हकीम सुरबरशहा या- स जवळच चुनारच्या किल्ल्यांत एका घरांत ठेऊन त्याच्या आधारा बाहेर ज्या ऊं जाऊं नये असा बंदोबस्त केलेला आहे. परंतु त्याला आपल्या पुरतीं चा- करमाणसें घेऊं दिलेलीं आहेत. व व्यायाम करण्याची वगैरे थोडी मोकळी- क मिळते.

साऱ्या राजपुतान्यांत मुसलमानी संस्थान कायतें टोंक येवढें एकच.

भाग ८
केरौली

हें लहानसें संस्थान भरतपूरच्या दक्षिणेस आहे. पूर्वेस धोलपूर व आग्नेयीस चंबळा नदी आहे; ती शिंद्याच्या मुलखाची व ह्या संस्थानची हद्द आहे, ती जयपूरच्या दरम्यानची सीमा आहे. वायव्येस ही जयपूरचाच मुलुख आहे.

जाधव घराण्यांतले पुरुष आम्ही यदुकुलोत्पन्न, श्रीकृष्णा पासून झालेले, असें म्हणतात. त्या सर्व सोमवंशीयां मध्यें केरौलीचा राजा मुख्य आहे. या प्रदेशास वृजदेश असें म्हणतात; मथुरा यांतच आहे. बियाना प्रदेश पूर्वी याच राज्या खालीं होता; तो सन १०५२ मध्यें मुसलमानांनीं घेतला.

राजा अर्जुन देव याणें सन १३४८ मध्यें हें केरौलीचें राज्य स्थापिलें तें पुढें सन १४५४ मध्यें माळव्याच्या राजानें जिंकून त्याजवर खंडणी बसविली.

राजा गोपाळदास याणें अकबर बादशहाच्या हुकुमा वरून आग्र्याच्या किल्ल्याचा पाया घातला असें म्हणतात. कारण जोशांनीं बादशहास असें सांगितलें होतें कीं श्रीकृष्णाच्या वंशांतील कोणा पुरुषाचा हात लागेल तर किल्ला चिरस्थायी होईल.

पुढें पेशव्यांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्या तेव्हां त्यांणीं केरौली वर दरसाल २५००० रुपये खंडणी बसविली.

सन १८१७ इसवींत जूनच्या तेराव्या तारखेस जो पुण्याचा तहनामा झाला त्यांतील १४ व्या कलमानें पेशव्यांनीं गुजराथ शिवाय करून नर्मदेच्या उत्तरेकडील साऱ्या मुलखा वरील आपले हक्क सोडले. तेव्हां केरौलीच्या राजाला इंग्रजांचा आश्रय जोडणें आलें. त्यांणीं त्याऱ्याशीं तह करून खंडणी न घेतां राज्य कायम राखण्याचें वचन दिलें. परंतु तेवढ्यानें त्याची तृप्ति होईना. चंबलेच्या दक्षिणेस पहिला त्याचा कांहीं मुलुख होता, तो तो मागूं लागला. परंतु तो मिळणार नाहीं असें सरकारानें सांगितल्यामुळें तो नाखुष होता आणि संधी साधेल तेव्हां मुलुख घ्यावा अशी वासना धरून बाट पहात बसला होता. पुढें सन १८२५ मध्यें इंग्रजांची आणि काम्हदे-

श्च्या राजाची लढाई सुरू झाली; इकडे भरतपूरच्या राजाचा चुलत भाऊ दुर्जनसाल याणें राजाशीं बिघडून बंड केलें; तेव्हां आतां ही वेळ बरी आहे असें ह्मणून केरौलीच्या राजानें त्या बंडखोराला मिळून हातून झाली तितकी खटपट करून त्याला मदत करण्या करितां फौज गोळा केली. परंतु इंग्रजांनीं त्याचा पराभव करून भरतपूरचा किल्ला घेतल्या बराबर ह्याचे हातपाय गळले आणि पायधरणीस आला ; तेव्हां सरकारानें क्षमा केली.

जयपूरच्या व केरौलीच्या मुलखाच्या हद्दी बद्दल कांहीं लढा उत्पन्न झाला होता, पण तो हरबक्षपाल राजानें इंग्रज सरकार मार्फत तोडून घेतला. त्या शिवाय आमरणांत त्यांचें दुसरें फारसें खटलें सरकारा पर्यंत आलें नाहीं. हा हरबक्षपाल सन १८५८ मध्यें अप्रज मेला. तेव्हां प्रतापपाल ह्मणून त्याच्या चुलतभावाचा मुलगा होता, त्याची गादीवर नेमणूक झाली. परंतु हरक्षाच्या एका राणीनें मी गरोदर आहें असें ह्मणून पुढें प्रसूत झाल्याचें ही उठविलें. प्रतापपाल ही सर्व गोष्ट अगदीं खोटी आहे असें ह्मणूं लागला ; तेव्हां सरकारानें चौकशी करितां कमिशन नेमिलें. प्रसूत झाल्याबद्दल वगैरे राणीच्या हातून योग्य पुरावा झाला नाहीं. तेव्हां गव्हरनर जनरलच्या एजंटानें ती गोष्ट खोटी ठरवून इंग्रज सरकारच्या वतीनें असें प्रसिद्ध केलें कीं प्रतापपाल यास गादीवर कायम केलें आहे या प्रमाणें सन १८३९ च्या अखेरीस मुकरर होऊन १८४० च्या अवेलीस प्रतापपाल जयजयकार करीत शहरांत आला. तेव्हां लोकांनां चिथवून लढाई लावावी ह्मणून राण्यांनीं खटपट केली, परंतु ती अगदीं निष्फळ झाली तेव्हां त्या तेथून लौकर निघून भरतपुरास चालत्या झाल्या. त्यांनां तेथेंच राहण्याची परवानगी मिळाली.

प्रतापपाल सन १८४८ मध्यें वारला. त्याच्या कारकीर्दीत खुद त्याच्या व दिवाणाच्या गैरवर्तनामुळें आरंभापासून अखेर पर्यंत अव्यवस्था होती. तिजोरींत पैसा नाहींसा झाला तेव्हां लोकांवर जुलूम होऊं लागला. त्यामुळें ते हुकूम मानीतनासे झाले आणि दंगे करूं लागले. तेव्हां सरकारानें मध्यस्थी करून व्यवस्था लावण्या करितां ह्मणून ४ वेळ आपला कामदार लाऊन दिला परंतु त्यांचें कांहीं न चालतां तितके वेळ त्याला परत जावें लागलें. शेवटीं प्रतापपाल मेला. त्याला अपत्य नव्हतें ह्मणून नरसिंग पाल नामक एक भाईबंद त्याच्या कुटुंबानें दत्तक घेतला. परंतु सरकारचें

कर्ज दीढलाखावर येणें होतें त्याचा पहिला हप्ता दिल्या शिवाय आम्ही दत्तक मंजूर करीत नाहीं असें सरकारानें सांगितलें. तेव्हां कांहीं दिवस गेल्यावर त्या नूतन दत्तक राजानें पहिला हप्ता मी देतों म्हटलें, परंतु त्याला तो एक अन्न सांगूं लागला, आणि तो पैसा देणारा सावकार दरबारांत आपल्याला काम असावें असा करार करून घेऊन रक्कम देत होता म्हणून सरकारानें तो घेतला नाहीं. तो दत्तक मुलगा अल्पवयस्क असल्या मुळें त्याचे पालक म्हणून आपली नेमणूक व्हावी अशा हेतूनें कांहीं असामी खटपट करीत होते, परंतु सरकार दत्तक मंजूर करीना तेव्हां त्यांच्या खटपटी अधिकच सुरू झाल्या ; सबब सरकारालां आपली अट अगदीं सोडणेंच बरें वाटून त्याणें ती सोडली आणि दत्तविधान कबूल केलें. परंतु राजाला असें कळविलें कीं कर्जाचा पैसा सारा द्यावा लागेल, कांहीं सुटणार नाहीं. सरकारानें त्याचवेळीं आणखी असें केलें कीं संस्थानांत निरनिराळे पक्ष होऊं नयेत व राजकारस्थानें मोडावीं म्हणून केरौली येथें एका एजंटाची नेमणूक केली आणि त्याला सर्व कारभार आपल्या हातांत घेण्याला हुकूम दिला.

नरसिंगपालराजा सन १८५२ इसवींत वारला. मरणाच्या पूर्व दिवशीं त्याणें भरतपाल म्हणून एक आपला दूरचा भाईबंद दत्तक घेतला. परंतु हिंदुस्थान सरकारानें त्याला मंजूर न करतां राज्य खालसा करण्याचें मनांत आणलें. इतक्यांत विलायतेंत हौस ऑफ कॉमन्स मध्यें ह्या गोष्टीचा विचार झाला पाहिजे म्हणून मी सूचना करणार असें एक मेंबर म्हणूं लागला; तेव्हां विलायत सरकारानें हिंदुस्थान सरकारास लिहिलें कीं असलें कांहीं करूं नका. त्या मुळें सरकारानें आपला बेत रहित करून भरतपाल केरौलीचा राजा असें एकदां म्हटलें आणि तो अल्पवयस्क असल्यामुळें सर्व राज्यकारभार पोलिटिकल एजंटास पहावयास सांगितलें. परंतु इतकें होईपर्यंत बराच कालगेला. त्यांत निरनिराळ्या पक्षाचे जे लोक खटपटी करीत होते त्याणीं असें काढलें कीं भरतपाल यथाशास्त्र दत्तक झालेला नाहीं; कारण दत्तक घेणारा नरसिंगपाल अल्पवयस्क असल्यामुळें त्याला दत्तक घेण्याचा अधिकार नव्हता व जें विधान झालें तें ही सशास्त्र झालें नाहीं; कारण त्यांत ज्या मुख्य गोष्टी अवश्यमेव झाल्या पाहिजेत त्या झाल्या नाहींत; याज करितां हा दत्तक रद्द व्हावा व मदनपाल म्हणून भरतपाला पेक्षां जवळचा भाऊबंद असल्या मुळें त्याचा हक्क अधिक आहे, त्यास गादी मिळावी असें बो-

लष्णें लाविलें. भरतपूर, ढोलपूर, अलवार, व जोधपूर, यैंथील राजे ही असेंच ह्मणूं लागले; तेव्हां या प्रकरणीं चौकशी सुरू झाली. तींत सदरीं सांगितलेल्या गोष्टी खाबीद झाल्या. राण्या, नऊ मोठ मोठे वजनदार ठाकूर व राज्यांतील छोटे सरदारांपैकीं चौथाई शिवाय करून बाकी सारे, हे मदनपालाला गादी मिळावी ह्मणूं लागले, आणि राज्यांतील लोकांचा ही हेतु तसाच दिसूं लागला, तेव्हां सरकारानें भरतपाळाला दूर करून मदनपाळाला गादीवर बसविलें. ही गोष्ट सन १८५४ मध्यें झाली. मग सरकारानें राज्याच्या कारभारांतून आपला प्रत्यक्ष संबंध काढून टाकला आणि पुढच्या वर्षीं एजंट ही काढला. परंतु मदनपाळाला असें बजाविलें कीं आमचें कर्ज आतां ९४३१२ रुपये उरलें आहे हें हप्तेबंदी ठरल्या प्रमाणें नर वेळच्या वेळीं फिटलें नाहीं तर साऱ्या रकमेची फेड होई पर्यंत एक दोन महाल आह्मी आपल्या ताब्यांत घेऊं.

सन १८५७ मध्यें राजा मदनपाळ सरकारच्या चांगला उपयोगीं पडला; त्याच्या हातून झाली तितकी त्याणें मदत दिली. हें लक्षांत घेऊन सरकारानें त्याला जें ल्या वेळीं ११७००० रुपये कर्ज झालें होतें तें सारें माफ केलें; त्याला पोषाक दिला, सलामीच्या तोफा १५ होत्या त्या १७ केल्या व पुढें नाइट ग्र्याँड कमांडर ऑफधिस्टार ऑफ इंडिया हा किताब दिला. सन १८५४ मध्यें महाराज पैशासाठीं फार पेंचांत आले तेव्हां कर्जाची फेड करण्याची तजवीज करण्यास मदत करण्या करितां सरकारानें पोलिटिकल एजंटास पाठविलें. परंतु ह्या एजंट साहेबांस अक्षी ताकीद होती कीं तुम्ही या कामीं आपला हुकूम चालवूं नये, महाराजांचे स्नेही व सल्हेगार अशा संबंधानें वागावें. हे एजट १८६१ मध्यें निघालें.

भाग ९

कृष्णगड

जोधपूरचा राजा उदेसिंग याचा नववा पुत्र किसनसिंग याणें सन १६१३ मध्यें हें संस्थान नवीनच स्थापिलें. त्याची हकीगत अशी—ह्या

हाजादा करीम (शहाजहान बादशहा) हा आपल्या बापाला पदच्युत करून आपण दिल्लीच्या गादीवर वसावें ह्मणून अनेक खटपटी करीत होता, त्यांत त्याणें जोधपूरच्या राजा गजसिंग याच्या द्वारें आपलें कार्य साधावें असें मनांत आणलें. परंतु तो वीर त्याला अनुकूल होईना, तेव्हां त्याचा दिवाण गोविंददास यास वश करावें असें त्याणें योजलें. हा गोविंददास भाटी कुलांतला असून मारवाडांत जे परदेशचे सरदार आलेले होते त्यां पैकीं होता. त्यावर गजसिंगाचा पूर्ण विश्वास असून तो कायतो त्याचा मसलतदार होता. तो पडला खरा इमानी, त्याणें मी आपल्या यजमाना शिवाय दुसऱ्या कोणास जाणत नाहीं आणि त्याच्या इछे वाहेर कांहीं करीत नाहीं असें साफ सांगितलें. ह्या त्याच्या एकनिष्ठेचा शाहाजाद्यास राग येऊन त्याणें जें नकाराचें उत्तर दिलें त्याजबद्दल त्याला प्रायश्चित देण्याचें त्याणें मनांत आणलें आणि गजसिंगाचा चुलता किसनसिंग यास वश करून घेऊन त्याच्या हातून गोविंददासाचा खून करविला. मग त्या हत्ये बद्दल तो बक्षीस मागूं लागला तेव्हां त्याला स्वतंत्र संस्थान स्थापण्याची परवानगी मिळाली. किसनसिंगानें मारवाडच्या हद्दी बाहेर एक स्थळ पाहून तेथें नवीन शहर वसविलें आणि त्याला आपलेंच नांव देऊन तें असे पर्यंत आपल्या दुष्कृत्याचें स्मरण राहीसें करून ठेविलें. तेथ पासून सन १७९० पर्यंत सांगण्या सारखी मोठीशी गोष्ट कांहीं घडली नाहीं. या राज्यांत वस्ती मुख्यत्वें करून जाट लोकांची व राजा थोर कुला पैकीं, परंतु त्याचा मुलुख अगदीं थोडा पडल्या मुळें अठराव्या शतकांत तिकडे ज्या थोर थोरल्या धामधुमी झाल्या त्यां त त्याला शिरतां येईना. एका अर्थी हा लहानपणा आणि जमिनीचा नापीकपणा हितावहच होता असें ही मानलें पाहिजे. कारण मोंगलांची व नंतर मराठ्यांची ही त्याकडे आसपासच्या राज्यां प्रमाणें जी नजर गेली नाहीं आणि खंडणी बसली नाहीं, तिला दुसरें कांहीं कारण असेल असें मानण्यास आधार नाहीं.

सन १७९० । ९१ मध्यें एक गोष्ट घडली, तिणें कृष्णगडचा राजा प्रसिद्धिस आला ; परंतु त्यांत त्याणें अल्पस्वार्थासाठीं देशाचें अकल्याण केलें असा लौकिक झाला. सन १७८७ मध्यें जोधपूरचे राहाटोर आणि जयपूरचे कच्छवाह यांणीं एकचित्त होऊन मराठ्यांचा आपल्यावर शक चालूं द्यावयाचा नाहीं असा निश्चय केला. त्या प्रमाणें त्यांणीं तुंग येथें संग्रा-

म करून मराठ्यांचा पराभव केला. त्यावर मराठ्यांनीं सन १७९० व १७९१ ह्या वर्षीं पाठण व मैरता येथें पराक्रम करून पुनः आपला यशो दुंदुभि वाजविला. परंतु या प्रसंगीं किसनगडचा राजा बहादूरसिंग जन्मभूमीचा वैरी होऊन शत्रूस सामील झाला नसता तर रजपुतांचा पराजय होतांना. बरें, तो तरी यांनां जय येणारच नाहीं, मग आपण यांच्या बरावर अपयशाचे वांटेकरी कां व्हा, असें समजून का तिकडे गेला होता! छेः त्या चा उद्देश फक्त आपला वरिष्ट कुलपति जो जोधपूरचा राजा त्याचा सूड उगवावा इतका होता. कारण बहादूरसिंग आपल्या भावाला जी बडिलोपार्जित मिळकत मिळाली होती तिचा हिस्सा मागत होता तो जोधपूरच्या राजानें त्याला मिळूं दिला नाहीं. परंतु मैरतच्या घोर संग्रामांत मराठ्यांनां जय येतांच एक जोधपूर नव्हे, सारा राजपुताना त्यांच्या पादाक्रांत झाला. एक हा घातकी बहादूरसिंग मात्र त्यांच्या कृपेनें सुटला.

बहादूरसिंगा नंतर कल्याणसिंग गादीवर बसला. त्याणें इंग्रजसरकारचा आश्रय जोडला. सन १८१८ मध्यें उभय सरकारांचा तह होऊन असें ठरलें कीं राजानें इंग्रजांचें वर्चस्व मान्य करून त्यांच्याशीं ऐक्य भावानें असावें; त्यांच्या परवानगी शिवाय दुसऱ्या कोणत्या ही संस्थानाशीं संबंध ठेऊं नये; कोणाशीं खटलें उपस्थित करूं नये; कोणाशीं तंटा असेल तर इंग्रजसरकारच्या मध्यस्थीनें त्याचा निकाल करून घ्यावा; व त्यांनां जरूर लागेल तेव्हां आपल्या शक्ती प्रमाणें मदतीस सैन्य द्यावें इंग्रजसरकारानें त्याचें संरक्षण करण्याचें वचन देऊन त्याच्या वंशजांस पाहिजे तसें राज्य चालवूं देण्याचें कबूल केलें व अम्ही आपली राज्यपद्धति तेथें सुरू करणार नाहीं असें वचनदिलें. या प्रमाणें तहनामा ठरून त्यावर सही झाली आणि पुढें फार दिवस लोटले नाहींत तों कल्याणसिंग महाराजांचें जें वर्तन सुरू झालें त्या वरून त्याला सदसद्विचार मुळींच नाहीं किंवा वेड लागलें असावें असें दिसूं लागलें. त्याच्या पदरच्या ठाकूरांनीं जी नोकरी करावयाची तिच्या एवजीं त्यांजकडून पैसा घेण्यास कांहीं हरकत नाहीं असें त्याला वाटूं लागलें. परंतु हे महाराज आतां या प्रमाणें पैसा घेऊन पुनः पूर्ववत चाकरी करा असें म्हणणार नाहींत हा काय नेम, अशी त्या ठाकुरांस सहजच शंका उत्पन्न होऊन त्यांणीं तो पैसा देण्याचें मान्य केलें नाहीं. एक ठाकूर तर मी अगदीं स्वतंत्र आहें असेंच म्हणूं लागला. तेव्हां राजानें त्या सर्वांस चांगलें

जेरीस आणण्याचा 'विचार मनांत आणला. परंतु त्याला अकस्मात जी लह-
र आली ती बराबर तो उठून दिल्लीस गेला. तेथें नामधारी मोगल बादशहा
तक्तावर होता त्याच्याकडे हे महाराज गाऱ्हाणें सांगण्या करितां ह्मणून आ-
ले आणि नजर नजराणे करून ख़ुदावंतांचे दरबारांत पायमोजे घालून जा-
ण्याचा आपल्यास अधिकार असावा असले शुष्क मानपान पदरचा पैसा ख-
र्चून संपादण्यांत गुंतून राहिले. परंतु मागें कृष्णगडांत त्याच्या पक्षाचे ह्मणून
जे लोक होते ते सुस्त बसले नाहींत. त्याणीं फौजेची तयारी चालवून बुंदी
वाल्यांची मदत मिळण्याची ही तजवीज केली. तें पाहून त्या ठाकूरांनीं सा
मन्यास उभें रहाण्यास हात पाय गाळले असें नाहीं; त्यांणीं ही आपली त-
यारी चालविली. या प्रमाणें उभय पक्षांची सिद्धता होऊन जे युद्ध प्रसंग
झाले त्यांत शेजारच्या इंग्रजी ताब्यांतील मुलखाची पुष्कळ नासाडी उडाली.
तेव्हां सरकारानें त्यास असें कळविलें कीं तुमच्या पदरच्या ठाकुरांच्या व तु-
मच्या फौजांनीं जो आमच्या मुलखास उपद्रव दिला त्या बद्दल आम्ही तुह्मां-
स जबाबदार समजतों. ही समज पोहोचतांच तो भ्याला असें दिसतें. का-
रण तो लागलाच दिल्ली सोडून निघाला आणि जसली मिळाली तसली फौ-
ज जमा करून कृष्णगडास पोहोंचतांच आपलें तेथील सैन्य घेऊन त्या बं-
डखोर ठाकुरांवर चालून निघाला. परंतु आपण त्यांवर शस्त्र धरण्यास ना-
खुष आहों असें लौकरच दाखवून त्याचे सरदार एका मागून एक असे भ-
राभर त्याला सोडून निघाले आणि अकस्मात सर्व एकत्र होऊन कृष्णगडा-
वर चालून गेले, व ह्या महाराजांस पदच्युत करून त्यांच्या अल्पवयस्क पु-
त्रास आह्मी गादीवर बसविणार असें ह्मणूं लागले. हा प्रकार पाहून कल्या
णसिंग पळाला तो अजमिरास गेला. तेथून त्याणें इंग्रज सरकाराशीं असें
बोलणें लाविलें कीं तुम्ही मला मदत करा आणि कांहीं तरी नियत रकम
देऊन माझें राज्य तुम्ही मक्त्यानें घ्या. इकडे त्या ठाकूरांनीं इंग्रज सरकारा-
स अशी विनंती केली कीं आपण मध्यस्थी करून आमचा व महाराजांचा
कलह मिटवा. तेव्हां सरकारानें राजाचें बोलणें अमान्य करून त्यास असें
सांगितलें कीं राज्यकारभार चालविण्या करितां प्रतिनिधि नेमून तुम्ही दि-
ल्लीस जाऊन स्वस्थ बसावें हें बरें. या प्रमाणें निराशा होतांना त्याणें त्या
ठाकुरांशींच बोलणें लाविलें, परंतु त्या पासून कांहीं फलनिष्पत्ति झाली ना
हीं. अगदीं शेवटचें उत्तर ह्मणून ठाकुरांनीं त्याला असें सांगितलें कीं, जो-

धपूरचे महाराज जसें सांगतील तसें आम्ही ऐकतों. परंतु तुम्ही तसे वागाल ह्मणण्या बद्दल इंग्रज सरकारची हमी पाहिजे. सरकार ही जोखिम घेण्यास कबूल होईना. तेव्हां प्रकरण निकरावर येऊन ठाकुरांनीं त्याच्या मुलाच्या नांवानें द्वाही फिरविली आणि कृष्णगडास वेढा घातला. आतां यांची फत्ते होते असें दिसतांना मग महाराज पोलिटिकल एजंट सांगतील तसा मी वागेन अशा कबुलीस आले. त्या प्रमाणें एजंट मार्फत कांहीं ठराव होऊन महाराजांचा कृष्णगडांत प्रवेश झाला. परंतु पुनः अल्पकाळांतच असें दिसूं लागलें कीं ठरावा प्रमाणें वागण्याचें राजश्रींच्या मनांत नाहीं, याज करितां हें ऐक्य निभणें कठीण. तेव्हां पुनः सर्व ठाकूर एकचित्त झालें. मग लौकरच राज्य पुत्राच्या स्वाधीन करून कल्याणसिंग कृष्णगडांतून निघून गेला. तो सन १८३९ मध्यें वारला. आणि पिरथीसिंगाचें नांव चालू झालें.

तेव्हां पासून सांगण्या सारखी गोष्ट कांहीं एक झाली नाहीं सन १८५७ च्या बंडांत महाराज इंग्रज सरकाराशीं प्रामाणीकपणानें वागलें व त्यांची राज्यव्यवस्था उत्तम आहे ह्मणून त्यांजवर सरकारची मर्जी सुप्रसन्न आहे.

भाग १०

ढोलपूर

ह्या लहानशा संस्थानाच्या उत्तरेस व ईशान्येस आग्रा प्रांत आहे, आग्नेयीस शिंद्याचा मुलुख आहे त्याच्या दरम्यान चंबळा नदी आहे, आणि पश्चिमेस करौली संस्थान आहे. ढोलपूरची स्वतंत्र संस्थान ह्मणून स्थापना जरी अगदीं अलीकडील, ह्मणजे सन १८०९ मधील आहे तरी ते भाग राजकुल प्राचीन असून इतिहास प्रसिद्ध होऊन राहिलेलें आहे. ह्या करितां ह्याचा तेव्हांपासूनचा वृत्तांत सांगितला पाहिजे.

ढोलपूरच्या राण्याचे पूर्वज प्रथम गोहदचे जमीनदार होते. गोहद ग्वाल्हेरच्या किल्ल्याच्या ईशान्येस २८ मैलांवर आहे. हें तेव्हां लहानसें खेडें

होतें. हे जमीनदार जाटकुलोत्पन्न असून उद्योगी व शूर शिपाई होते. ह्या नैसर्गिक गुणांच्या योगानें हें घराणें लौकरच उदयास आलें. त्यांचें जमीनदार हें सामान्य नांव जाऊन राणे असें प्रतिष्ठित पद प्राप्त झालें. त्यांणीं गोहदचें राज्य २७८ वर्षे केलें. तितक्या कालांत त्यांच्या वारा पिढ्या झाल्या, व मुलुख वाढत वाढत ५६ महाल यांच्या ताब्यांत येऊन त्यांचा वसूल ६६ लक्ष रुपये येऊं लागला.

सन १७२५ पासून १७४० पर्यंत या घराण्यांतील पुरुषांनीं जीं शिपायागिरीचीं कामें केलीं तीं पाहून बाजीराव पेशवे त्यांजवर खुष झाले. तो काल अस्वस्थतेचाच असल्यामुळें पेशव्यांनां नांवाला यजमान ह्मणून ते गोहदचे राणे सरासरी स्वतंत्रपणानेंच वागूं लागले. या प्रमाणें हें घराणें उदयास आणणारा मूळपुरुष सन १७५० च्या सुमारास वारला. परंतु त्याचा पुतण्या त्याच्याच सारखा बुद्धिमान पुरुष होता त्याणें ही आपली सत्ता वाढविली. मुसलमानांचें व ह्या राण्याचें पहिल्या पासूनच वैमनस्य होतें, व पुढें शिंदे प्रबल होऊन त्यांचा मुलुख बळकाऊं लागले, तेव्हां त्यांच्याशीं ही नित्य कटकटी होऊं लागल्या, त्या पांच पिढ्यापर्यंत सतत चालल्याच होत्या. पानपत येथें मराठयांचा व गिलच्यांचा जो दारुण संग्राम झाला त्यांत येथील राणा शिरला नाहीं. तो शहाणपणानें अगदीं अलग राहिला आणि अफगाण लोक निवून गेल्यावर सारें सामसूम झालें व मराठे हतवीर्य आणि शोकाकुल होऊन बसले तेव्हां ही संधी उत्तम आहे असें मनांत आणून त्याणें ग्वाल्हेरचा किल्ला बळकावला व गोहदचा राणा अर्शा द्वाहि फिरविली. या प्रमाणें स्वातंत्र्य संपादून त्याणें सहा वर्षे पर्यंत त्याचा अप्रतिहत उपभोग केला. परंतु इतक्या काळांत मराठे पुनः सावध झाले. पानपतच्या युद्धांत त्यांच्या कीर्तीस जो काळिमा आला होता तो घालविण्या करितां ते कांहींतरी विलक्षण कृत्य करतील असें दिसूं लागलें. सन १७६७ मध्यें रघुनाथरावदादा साहेब पेशवे हिंदुस्थानांत मोहिमेस गेले असतां राण्याच्या उद्दामपणाचें स्मरण होऊन त्यांच्या मनांत असें आलें कीं याला या प्रसंगीं स्मरण रहाण्या सारखें योग्य शासन केल्या वांचून पुढें जाऊं नये; ह्मणून त्यांणीं लागलेच गोहदकडे मोर्चे फिरवून शहरास वेढा दिला. राणा ही असा कांहीं तरी प्रसंग आल्या वांचून रहाणार नाहीं, असें आधींच समजून किल्ल्याचा चांगला बंदोबस्त करून फौज जमवून कडेकोट

तयारीनें होता. शिवाय तो जातीनें शूर, साहसी,.श्रमसहिष्णु असून पराजया पासून होणारा अपमान सहन करणारा नव्हता. त्याणें निकरानें युद्ध करून किल्ल्यांचा बचाव उत्तम प्रकारें चालविला. तेव्हां दादा साहेब जरी मोठे शूर होते तरी त्याचा पराक्रम पाहून विचारांत पडले आणि तहास कबूल झाले. मग बोलणें ठरावांत आलें तें असें--दादासाहेबांनीं तीन लाख रुपये घेऊन वेढा उठवावा व राणा लकिंदरसिंग याणें त्यांचें वर्चस्व कबूल करून स्वतंत्रपणानें वागावें.

ग्वाल्हेरचा किल्ला लकिंदरसिंगाच्या ताब्यांतून कोणत्या सालीं गेला हें पक्कें कळत नाहीं, परंतु तो याच सुमरास गेला असावा. तो शिंद्याच्या हातीं लागला.

राण्यानें पेशव्यांस खंडणी देण्याचें कबूल केलें होतें, परंतु तो ती विनतक्रार कधीं ही देत नसे. त्याचा हेतु आपण अगदीं स्वतंत्र रहावें असा होता, ह्मणून त्याणें सन १७७९ मध्यें इंग्रजां बराबर तह केला. त्यांत असा ठराव होता कीं त्याला स्वराज्याच्या संरक्षणा करितां किंवा मराठ्यांच्या ताब्यांतील मुलुख घेण्या करितां जी फौज लागेल ती त्यांणीं द्यावी आणि जो मुलुख कबीज होईल त्या पैकीं अर्धा त्याणें इंग्रजांस द्यावा; परंतु त्याच्या राज्या पैकींच जो भाग मराठ्यांनीं घेतलेला होता, त्यांतील कांहीं परत येईल तर त्यांत इंग्रजांनीं कांहीं मागूं नये. इंग्रजांनीं मराठ्यां बराबर तह केल्यास त्यांत राण्याच्या संरक्षणाचें कलम घालावें.

या ठरावा अन्वयें सन १७८० च्या फेब्रुआरी महिन्यांत गोहद प्रांतांतून मराठ्यांस हांकून लावण्या करितां व राण्यावराबर विचार करण्या करितां कर्नल पोपह्याम याची २४०० लोकांनिशीं रवानगी झाली. त्याणें मराठ्यांस हांकून लाविलें आणि लहरचा किल्ला हल्ला करून घेतला व पुढें अगष्टच्या चौथ्या तारखेस ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर अकस्मात हल्ला करून तो ही घेतला. हा किल्ला फार मजबूद व सर करण्यास अशक्य अशी हा वेळ पर्यंत त्याची कीर्ति होती. परंतु इंग्रजांनीं तो सहज घेऊन गोहदच्या राण्यास देऊन टाकला. पुढें सन १७८१ च्या आक्टोवर महिन्यांत, तारीख १३ रोजीं इंग्रजांचा व महादजी शिंद्यांचा तह ठरला त्यांत त्यांणीं असें एक कलम घातलें कीं गोहदचा व आमचा पूर्वी तहनामा झालेला आहे त्या प्रमाणें जों पर्यंत तो आम्हाशीं वागेल तो पर्यंत ग्वाल्हेरचा किल्ला व त्याचा

इतर मुलुख त्याजकडे अव्याहत चालावा. परंतु फार दिवस लोटले नाहींत तोंच तो तहनाम्याच्या उलट वर्तणूक करूं लागला. इतकेंच नाहीं, त्याच्या कित्येक कृत्यांवरून असें शाबीद झालें कीं सन १७८१ । ८२ मध्यें इंग्रजां विरुद्ध जो कट होत होता त्यांत तो सामील होता. म्हणून परस्परांस साहाय्य करण्याचा जो करार होता तो इंग्रजांनीं रद्द केला. पुढें इंग्रजांचा व शिंद्याचा जो सालबाईस तह झाला त्यांत पूर्वीच्या तहांतील कलम रद्द झालें आणि महादजीनें ग्वाल्हेरीवर व गोहदवर हल्ला करण्याचा विचार चालविला, तेव्हां इंग्रज आडवे आले नाहींत ; राण्यानें पाहिजे तसा आपला विचार पहावा म्हणाले. महादजी शिंद्यापुढें तो कसचा टिकतो ! ग्वाल्हेरीच्या किल्ल्यास वेढा पडला असतां त्याणें कांहीं दिवस टिकाव धरला, परंतु शेवटीं तो किल्ला व गोहदचें सारें राज्य सन १७८३ मध्यें महादजी शिंद्यानें घेऊन राणा छत्रपत यास कैद करून ठेविलें.

या प्रमाणें गोहदचें राज्य नष्टप्राय होऊन राण्याचा पुत्र किरातसिंग निराश्रित, निराधार असा १९ वर्षें फिरत होता. परंतु मग त्याची ग्रहदशा संपून त्याला राज्यलाभ घडला. तो प्रकार असा--सन १८०२ मध्यें इंग्रजांची व दौलतराव शिंद्याची लढाई सुरू झाली, तेव्हां इंग्रजांच्या मनांत असें आलें कीं ग्वाल्हेरचा किल्ला शिंद्याच्या हातून निघेल तर बरें. हा त्यांचा हेतु अंबाजी इंगळा म्हणून जो गोहदप्रांतावर शिंद्याचा सुभेदार होता त्यास कळला, तेव्हां निमकहरामपणा करून तो इंग्रजांस फितूर झाला, त्यांजपासून त्याणें असा करार करून घेतला कीं हा किल्ला व कांहीं महाल घेऊन बाकी मुलुख त्यांणीं त्याजकडे अव्याहत चालवावा व त्याजपाशीं खंडणी मागूं नये. या प्रमाणें करारनामा होऊन कबजा होतांच त्यांणीं ग्वाल्हेर शहर व किल्ला आपल्या ताब्यांत ठेऊन बाकी मुलुख तारीख १७ जानेवारी सन १८०४ रोजीं किरातसिंगा बराबर तहनामा ठरवून त्याच्या स्वाधीन केला.

या प्रमाणें राण्याची गोहदेंत पुनः संस्थापना झाली खरी, परंतु तेथून पुनः पुढच्याच वर्षी गादीचें उच्चाटण झालें. कारण शिंद्याची व इंग्लिशांची लढाई संपून जो सुरजीअंजण गांवास तहनामा झाला त्यांत एक कलम असें होतें कीं शिंद्याच्या पदरच्या ज्या संस्थानिकां बराबर इंग्रजांनीं पूर्वी तह केलेले आहेत त्यांवर शिंद्यांनीं आतां कोणत्या ही प्रकारचा आपला हक्क सांगूं नये. परंतु जयपूर व जोधपूरच्या राजांच्या व गोहदच्या राण्या

च्या मुलखाच्या दक्षिणेस जो शिंद्याचा मुलुख असेल व त्याचा वसूल ते किंवा त्यांचे अम्मलदार घेत असतील किंवा जो स्वारांचे सरंजामाबद्दल लाऊन दिलेला असेल, त्यावर त्यांचा हक्क आहेच असें समजावें. पुढें या कलमाच्या अर्थाबद्दल वाद पडला. शिंदे म्हणूं लागले कीं गोहदच्या राण्याचें राज्य नष्ट होऊन तो मुलुख तीस वर्षे आम्हांकडे चालत आला, याजकरितां त्याजवरचा हक्क आम्ही सोडणार नाहीं. इंग्रजसरकारास हें बोलणें मान्य करावें लागलें व त्यांणीं ग्वाल्हेर व गोहद शिंद्यास देण्याचें ठरविलें. परंतु यांत राण्याचें विनाकारण नुकसान होऊं लागलें. पहिल्या तहनाम्यांत अशा प्रकारचें कलम घालणें राहिलें तें ह्मणजे त्याच्या चुकीनें राहिलें असें नाहीं. ह्मणून इंग्रज सरकारानें ढोलपूर, वारा, व रामखेडा हे तीन परगणे त्याला देण्याचाच ठराव केला. या प्रमाणें गोहदचें राज्य नष्ट होऊन राण्याची स्थापना ढोलपुरांत झाली.

किरातसिंगानें हे बदला परगणे पत्करले ते कांहीं खरे मनापासून नव्हत. पूर्वीचा ठराव कायम रहाता तर तो फार खुष होता. शिंद्या विषयीं द्वेषभाव त्याच्या मनांतून मुळीं गेला नाहीं. सन १८३१ मध्यें बायजाबाई व तिचा भाऊ यांस ग्वाल्हेरींतून बाहेर काढून लावलें तेव्हां राण्यानें त्यांस आपले येथें नेऊन त्यांचें आदरातिथ्य उत्तम प्रकारें केलें. यावरून तो शिंद्याचा द्वेष कितपत करीत होता तें सहज दिसून येत होतें. किरातसिंग चांगला वृद्ध होऊन सन १८३५ मध्यें परलोकवासी झाला.

किरातसिंगा नंतर त्याचा पुत्र भगवंतसिंग गादीवर बसला. त्याला इंग्रज सरकारांतून सन १८३७ मध्यें अधिकाराचीं वस्त्रें मिळालीं. हा राणा बापा प्रमाणेंच शिंद्याचा द्वेष करीत होता; तो त्याणें सन १८४१ मध्यें एक हलकटपणाची गोष्ट करून अगदीं स्पष्ट करून दाखविला. त्याच्या मुलखांत एक जैनांचें पारसनाथाचें देवालय होतें, व ते जैन ग्वाल्हेरीशीं संबंध ठेवीत असत ह्मणून ती पारसनाथाची मूर्ति ढकलून देऊन तिच्या जागीं त्याणें आपल्या लोकांकडून महादेवाची स्थापना करविली. ही गोष्ट शिंदे महाराजांस कळली, तेव्हां राण्यानें ही आपली मोठी अप्रतिष्ठा केली असें मानून त्यांणीं इंग्रज सरकाराकडे गाऱ्हाणें नेलें. सरकारानें त्यांना असें समजून सांगितलें कीं राण्याचें कृत्य जरी सर्वथैव गैर असलें तरी ही गोष्ट सार्वभौम सरकारानें मनावर घेण्याची नव्हे, याज करितां हींत

आम्ही हात घालीतं नाहीं.

सन १८५७ मध्यें राणा भगवंतसिंग इंग्रज सरकारच्या चांगला उपयोगीं पडला. ग्वाल्हेरींतून जे लोक त्याजकडे पळून गेले त्यांनां त्याणें मदत केली. परंतु त्याचा दिवाण देवहंस याणें आग्राप्रांतापैकीं कांहीं गांव लुटले, ह्मणून तो सरकारच्या अवकृपेस पात्र झाला. पुढें सन १८६२ मध्यें त्याणें कांहीं कारस्थानें उपस्थित करून राण्याला गादीवरून काढण्याची खटपट चालविली, तेव्हां त्याला उचलून वनारस येथें नेऊन प्रतिबंधांत ठेवणें भाग पडलें.

भाग ११

भरतपूर

भरतपूरच्या राज्याच्या उत्तरेस गुरगावन प्रांत, ईशान्येस मथुरा, पूर्वेस आग्रा, दक्षिणेस व नैर्ऋत्येस केरौली व जयपूर व पश्चिमेस अलवार हे प्रदेश आहेत. हिंदुस्थानांत येवढें मोठें जाट राज्य दुसरें नाहीं. येथील राजा, सरदार, मानकरी, व बहुतेक प्रजा एकजातीय असल्यामुळें याला जाट राष्ट्र म्हटलें असतां शोभण्या सारखें आहे. हे जाट लोक सत्राव्या शतकांत मुलतान प्रांतांतून येऊन दोआबांत शेतकी करून राहिले असें ह्मणतात; परंतु इतिहासांत त्यांचें नांव पुष्कळ काळा पासून आढळतें. महमूद गिझनवी सोरटी सोमनाथावर स्वारी करून सन १०२६ मध्यें मुलतानाकडे फिरला, तेव्हां वाटेंत त्याला ज्यांनीं अतिशय उपद्रव दिला ते हे जाट लोकच. पुढें तैमुरलंग मुलतानांतून दिल्लीवर चाल करून आला तेव्हां सन १३९८ मध्यें त्याच्याशीं संग्राम करून संव्हार पावले ते जाटच; आणि शेवटीं सन १५२५ मध्यें बाबराची स्वारी पंजाबांतून चालली असतां त्याला जो अतिशय उपद्रव पोहोचला तो जाटांपासूनच. दोआबांत ते शेतीभाती अरून राहूं लागले, परंतु त्यांचा अंगस्वभाव झांकला नाहीं. त्यांच्या दंगेखोरपणामुळें शेवटीं बादशहाचा अनेक वेळ रोष होऊन त्याणें यथायोग्य शासन ही केलें. परंतु औरंगजेब बादशहा वारल्यावर जेव्हां राज्यभर बेबंदशाही झाली तेव्हां त्यांच्या

आंगचें शौर्य व धैर्य विकास पावण्यास ती संधी चांगली आली. औरंगजेबाचे पुत्र गादीसाठीं आपसांत लढूं लागले तेव्हां जाटांनीं आपआपल्या खेड्यांत लहान लहान किल्ले व गड्या बांधल्या आणि बाहेर मुलखांत लूट करण्याचा धंदा आरंभिला. त्यावरून त्यांनां कजाग असें नांव प्राप्त झालें. त्यांचा मुख्य सरदार चूरानम ह्मणून होता त्याणें खुद्द फरूकशीर बादशाहाच्या राहत्या वाड्यापर्यंत त्यांनां नेऊन कजागी केली. तेव्हां सय्यद बंधु सारा कारभार करीत होते, त्यांणीं जयपूरचा राजा जयसिंग याला त्यांच्या किल्ल्यांवर हल्ला करण्यास सांगितलें. जाट लोकांच्या उदयाला तेव्हां नुकता आरंभ होत होता तरी त्यांणीं आलीकडे आपल्या ऐन भरभराटीच्या वेळीं जसें युद्धकौशल्य दाखवून कीर्ति संपादिली तशाच कौशल्यानें त्या किल्ल्यांचें संरक्षण करून शत्रूचा पराभव केला. चूरानमानें आपला भाऊ बदनसिंग यास कैद करून ठेविलें होतें तो या नंतर थोड्याच दिवसांनीं कैदेंतून पळाला, आणि जयसिंगाकडे जाऊन मदत मागूं लागला. जयसिंगानें त्याची विनंती आनंदानें मान्य करून लढाईची तयारी केली. मग जें युद्ध झालें तें पहिल्या सारखें नव्हे; त्यांत उभय पक्षांतील योद्धे एकजातीय, परस्परांचीं मर्में कर्में जाणणारे असल्या मुळें युद्धाचा शेवट ही पहिल्या पेक्षां अगदीं निराळा झाला. चूरानम पराजित होऊन आपल्या मुलांसह पळाला. तेव्हां जयसिंगानें बदनसिंगाला जाटांचा राजा करून दीग किल्ल्यांत नेऊन गादीवर बसविलें. भरतपुरा प्रमाणें हाही किल्ला पुढें इतिहासांत प्रसिद्ध होऊन राहिला. तो वृत्तांत यथास्थळीं येईलच

बदनसिंगाला संतति पुष्कळ होती आणि त्याचे चार पुत्र मोठे कीर्तिमान निघाले. त्यांचीं नांवें सुरजमल्ल, सुभरम, प्रतापसिंग व वीरनारायण अशीं होतीं. बदनसिंगानें बादशाही अमलांतील कांहीं मुलुख हस्तगत करून घेतला. त्याणें शेवटीं कनिष्ट पुत्र प्रतापसिंग याची कांहीं तजवीज करून ठेऊन सर्व राज्य ज्येष्ठ पुत्र सुरजमल्ल याच्या हवालीं केलें. आपल्या पूर्वजांचे वेत सिद्धीस नेण्याला अवश्य लागणारी हिम्मत व चलाखी ही सुरजमल्लाचे अंगीं चांगली वसत होती. त्याणें गादीवर येतांच प्रथम कैम ह्मणून आपला एक भाईबंद होता त्याला जिंकून भरतपूरचा किल्ला काढून घेतला, आणि तेथें आपली गादी स्थापिली. सन १७५४ मध्यें वजीर गाजीउद्दीन, मराठे व जयपूरचा राजा, हे तिघे एकत्र होऊन त्याच्याशीं लढूं लागले,

तेव्हां त्याणें अखेरीस त्यांस सात लक्ष रुपये देऊन तह केला; परंतु प्रथम तर त्यांस अगदीं दाद दिली नाहीं पुढें सहा वर्षांनीं जेव्हां सदाशिवराव भाऊ पेशवे साऱ्या मराठेशाहींतील सरदार समागमें घेऊन हिंदुस्थानांतल्या थोरल्या मोहिमेवर चालले असतां दिल्लीवर मोर्चे फिरवून निघाले तेव्हां सुरजमल्ल ३०००० सैन्य घेऊन त्यांस मिळाला. परंतु पुढें भाऊसाहेबाचा गर्विष्टपणा व त्याच्या अंगीं सेनानायकत्व गुणाचा अभाव पाहून त्याला फार तिटकारा आला आणि तो लागलाच आपलें सैन्य घेऊन माघारा फिरला, त्या मुळें पानपतच्या समरभूमीवर त्याचें कांहीं नुकसान झालें नाहीं. इतकेंच नाहीं, मराठे पराजित होऊन किंचित्काल पर्यंत अगदीं निर्बळ पडले तेंव्हां जी चोहींकडे अव्यवस्था आणि गडबड झाली, त्या संधींत त्याणें आग्रा काबीज करून तेथें आपलें ठाणें घातलें. इतउत्तर त्याचें प्राबल्य विशेष होत जाऊन सन १७६३ मध्यें त्याणें दिल्लीवर स्वारी केली, आणि शहरा लगत तळ दिला. परंतु तेथून त्याची सद्दी संपली. तो शिकार खेळत खेळत गेला असतां कांहीं बलुची स्वारांच्या एका टोळीनें त्याला गांठून ठार केलें.

सुरजमल्लानंतर त्याचा पुत्र जवाहीरसिंग गादीवर बसला. तो जयपूरवर चालून जाऊन पराभव पावला आणि पुढें त्याचा खून झाला. नंतर त्याचा बंधु रतनसिंग त्या पदावर आला, परंतु त्याला ही दुर्मरण आलें. रतनसिंगाला किमयाचा नाद लागला, तेव्हां मथुरेच्या एका ब्राह्मणानें त्याला किमया शिकवण्याचें कबूल करून त्याज पासून पुष्कळ द्रव्य उपटलें. पुढें तांब्याचें सोनें करून दाखविण्या करितां त्याणें नेमलेला दिवस येऊन ठेपला आणि त्या ब्राह्मणाला, जर सोनें न झालें तर मला अमूक शिक्षा करा असें जें त्याणें म्हटलें होतें, त्या प्रमाणें शिक्षा होण्याचें चिन्ह दिसूं लागलें; तें प्राणसंकट टाळण्याचा कांहीं उपाय दिसेना तेव्हां त्याणें सुरी उसपून रतनसिंगाचा प्राण घेतला. नंतर त्याचा पुत्र गादीवर बसला; परंतु तो अगदीं अल्पवयस्क असल्यामुळें त्याचा चुलता नेवालसिंग सर्व अधिकार चालवूं लागला. हा नेवालसिंग चांगला बुद्धिमान् होता; परंतु कालगतीच विपरीत आली, ती पुढें करतो काय! रणांगणीं शत्रू पुढें कांहीं उपाय चालेनासा होऊन त्याला दीग किल्ल्यांत बसून रहावें लागलें. तेथेंच जलोदरानें सन १७७३ मध्यें त्याचा शेवट झाला.

नंतर सुरजमल्लाचा तिसरा पुत्र नेमलसिंग पुतण्यांचा पालक ह्मणून राज्याधिकार चालवूं लागला ; तेव्हां त्याचा धाकटा बंधु रणजितसिंग लोभाविष्ठ होऊन त्याजवर उठला, त्याणें आपण राजा व्हावें ह्मणून बंड केलें, आणि दिल्लीहून मिरझानजफखान यास मदतीस आणलें. नजफखानानें येऊन आग्रा घेतला. परंतु त्याला लागलेंच रोहिलखंडांत जावें लागलें. इतकी संधी सांपडतांच नेमलसिंगास उमेद येऊन त्याणें चांगली तयारी करून उलट दिल्लीवर हल्ला करण्याचें योजिलें आणि शिकंदराबाद तर घेतली परंतु तेथें उलट हल्ला होऊन त्याला मागें हटावें लागलें. तथापि त्यानें धीर सोडला नाहीं. त्याला सुमरूची कवायती फौज मदतीस मिळाली, त्यावरावर तो पुनः पुढें चालून निघाला. परंतु होदल ह्मणून दिल्लीच्या दक्षिणेस तीस कोसांवर शहर आहे तेथें जाऊन पोहोंचतो इतक्यांत रणजितसिंग मिरझानजफखानास घेऊन पुनः त्याच्या पाठीवर आला. नेमलसिंग व सुमरू उलटले ते प्रथम कोटवन येथें आणि शेवटीं दीगच्या किल्ल्यांत गेले. तो खान पाटलाग करीत आला, परंतु दीग किल्ला फार मजबूत, तेथें उपाय चालणार नाहीं असें पाहून तो शत्रूस हुलकावणी दाखवीत बनारसेस येऊन गेला आणि तेथें हल्ला करून त्याणें त्याचा अगदीं पराभव केला. दीग किल्ला बारा महिने लढत होता.

या प्रमाणें रणजितसिंगानें वृथा भांडून राज्य मोंगलांच्या घरांत घातलें. एक भरतपूर राहिलें तेवढें मात्र त्याला मिळालें. पुढें त्याच्या आईनें नजफखानाकडे जाऊन विनवणी करून नऊलक्षांचा मुलुख त्याला देवविला. परंतु सन १७८२ मध्यें तो खान मेला आणि चोहींकडे दंगा सुरू झाला तेव्हां शिंद्यानें स्वारी करून जाटांचा एकंदर मुलुख, भरतपूर सुद्धां घेतला. याही प्रसंगीं मातुश्रीनींच सिंद्याकडे जाऊन, पायधरणी करून, रणजितास दहा लक्षांचे अकरा महाल देवविले. पुढें रणजितसिंग जनरल पेरन ह्याच्या चांगला उपयोगीं पडला ह्मणून इंग्रजांनीं त्याला चार लाखांचे तीन महाल बक्षीस दिले. असे चांदा महाल मिळून भरतपूरचें विद्यमान राज्य आहे.

भरतपूरच्या गादीस खरे हकदार वारस होते ते सारे मरून शेवटीं रणजितसिंगाचा हेनु सिद्दीस गेला आतां सारें निष्कंटक झालें असें पाहून रणजितसिंगानें महाराज असें पद धारण केलें. त्याचे शूर पूर्वज आपल्यास

नुसतें ठाकूर म्हणवीत असत. रणजितसिंगाच्या येथपर्यंतच्या वर्तनामुळें त्याच्या राज्यास पीडाच पोंचली. परंतु त्याच्या कारकीर्दीत शूरत्वाची अशी एक गोष्ट घडून आली कीं हिंदुस्थानच्या साऱ्या इतिहासांत तशी दुसरी आढळणें नाहीं. तिच्या योगानें त्याचें व भरतपुराचें नांव इतिहासांत चिरकाल गाजत राहील.

हिंदुस्थानांतले इतर छोटे छोटे राजे रजवाडे इंग्लिशांशीं स्नेह संपादून सुरक्षित व्हावें असें मनांत आणून त्यांच्याशीं तह करण्यास उत्सुक झाले, तसा रणजितसिंगानें ही आपला मनोदय कळविल्या वरून मराठ्यां बरावर लढाई सुरू होण्यापूर्वी त्याच्या बराबर तह झाला. त्यांत असें ठरलें कीं त्याच्याकडे चालत असलेल्या मुलखाचा त्याणें स्वतंत्रपणें उपभोग घ्यावा, मराठ्यांस खंडणी मुळीं देऊं नये व आपल्याला परशत्रूचा उपद्रव झाला गेल हें भय अगदीं बाळगूं नये. पुढें दौलतराव शिंद्याबराबर लढाई सुरू झाली तेव्हां लार्ड लेक साहेबाचे मदतीस रणजितसिंगानें आपले स्वार पाठवून दिले. लासवारीच्या लढाईंत हें सैन्य चांगलें लढलें, आणि त्या मोहिमेचा शेवट होईपर्यंत इंग्रजी फौजे बराबरच होतें. या मदती बद्दल इंग्रज सरकारानें रणजितसिंगास सात लक्षांचे पांच परगणे बक्षीस दिले.

लासवारीची लढाई आटपून सन १८०३ च्या दिसेंबर महिन्यांत लार्डलेक साहेब परत येत असतां कनोबर येथें त्यांणीं रणजितसिंगाची भेट घेतली. त्या योगानें रणजितसिंगास हरएक प्रकारें आनंदच झाला असावा; कारण इंग्रजांशीं सख्य केल्या पासून त्याचें कांहीं नुकसान न होतां उलट नफाच झाला होता. शिवाय त्याला वाईट वाटण्या सारखें कांहीं झालें नाहीं. तरी यानंतर थोड्याच दिवसांनीं होळकराचें व त्याचें चांगलें एक्य झालें असावें यांत संशय नाहीं. होळकराचा व इंग्रजांचा वेबनाव असून लढाई वर येऊन बेतलें होतें.

पुढें होळकराबराबर खरोखर लढाई सुरू झाली, तेव्हां तुम्ही आपली फौज आमचे मदतीस पाठवा असें सरकारानें रणजितसिंगास सांगितलें; तेव्हां त्याणें प्रथम टाळाटाळ करून शेवटीं फौज पाठवीत नाहीं असें साफ सांगितलें. इतकेंच नाहीं. होळकराचा पक्ष धरून तो त्यांच्याशी लढलाच. सन १८०४ च्या नवंबर मध्यें होळकराच्या फौजेची दाणादाण करून इंग्रजी फौज तिच्या पाठीस लागली तेव्हां ती आश्रया करितां दीगच्या रक्षि-

ल्ला जवळ गेली; तिला आंत घेऊन किल्लेदारानें पाठलाग करणारांवर तोफांचा भडिमार सुरू करून त्यांची वाताहत केली.

रणजितसिंगानें या प्रमाणें उघड वैरभाव दाखविला तेव्हां इंग्रज सरकारानें ही त्याला शत्रु मानून त्याचे किल्ले घेण्या करितां फौज रवाना केली. तिणें तारीख २३ डिसेंबर रोजीं हल्ला करून दीग किल्ला घेतला आणि तारीख २७ जानेवारीस भरत पुराला वेढा घातला. आतां हा किल्लागे ला म्हणजे आपला सर्वस्व नाश होणार, हें पक्कें ओळखून रणजितसिंगानें त्याचें संरक्षण होईल त्या तऱ्हेनें करण्याचा निश्चय केला, व त्या कामीं त्या च्या लोकांनीं आणि फौजेनें मदत चांगलीच केली. तारीख ९ जानेवारी रोजीं, पुनः तारीख २१ रोजीं, पुनः २० फेब्रुआरी रोजीं आणि पुनः दुसऱ्याच दिवशीं म्हणजे तारीख २१ रोजीं, असा इंग्रजांनीं चारवेळ त्या किल्लयावर हल्ला केला. परंतु रणजितसिंगानें तितक्या ही वेळीं त्यांस हटवून ठार व जखमी मिळून ३२०३ शिपाई पाडले. दुसऱ्या कोणत्या ही किल्लयावर हल्ला करतांना इंग्रजांचें येवढें मोठें नुकसान झालें नसेल. इतकें होऊन ही किल्ला हातीं येईना. रणजितसिंगाच्या शिपायांनीं असें विलक्षण शौर्य दाखविलें; परंतु आपला शेवट पर्यंत असाच निभाव लागेलसें त्याला वाटेना. इतक्यांत मार्च महिन्यांत होळकर पुनः पळत सुटला. तेव्हां अस-ल्या भ्याड मित्राचा त्याला कंटाळा आला आणि लढाईचा विलक्षण खर्च सोसवेनासा झाला आणि आपण आणखी किती ही लढलों तरी इंग्रज पिच्छा पुरवतील, कधीं सोडणार नाहींत, असें त्यास वाटलें म्हणून पुढें कसें करावें ह्या विचारांत तो पडला असतां जनरल लेकसाहेबास लॉर्ड हा किताब मिळाल्याची बातमी आली. ती ऐकतांच ही संधी चांगली आहे असें पाहून साहेबांचा योग्य सन्मान झाल्याचें ऐकून मला संतोष वाटतो असा त्यानें लेक साहेबाकडे आनंद प्रदर्शक निरोप पाठविला व त्यांतच मी तह करण्यास इच्छितों असें सुचविलें. मी आपल्या छावणींत भेटीस येईन असें ही त्याणें सांगून पाठविलें तें लेक साहेबानें संतोषानें मान्य केलें. नंतर तहाचें बोलणें सुरू होऊन एप्रिलच्या १० व्या तारखेस तहनामा पुरा झाला. त्यांत असा ठराव झाला कीं रणजितसिंगानें लढाईच्या खर्चाबद्दल वीस लाख रुपये द्यावे. (ह्यां पैकीं सात लाख पुढें माफ झाले) व इंग्रजसरकाराशीं प्रथम तह झाला तेव्हां त्याजकडे जितका मुलुख होता तितका सरकारानें अ

व्याहत चालवावा. या करारा वरून सन १८०३ मध्यें इंग्रजां कडून मिळालेले परगणे त्यांस परत द्यावे लागले.

ह्या लढाई मुळें रणजितसिंगाचें नुकसान फार झालें, पैसा व मुलुख ही गेला, परंतु एक फायदा विलक्षण मोठा झाला. हिंदुस्थानभर त्याचा लौकिक झालाच, परंतु ही कीर्ति विलायतेस ही गेली. कारण साऱ्या हिंदुस्थानांत इंग्रज लोकांनां कोणत्याच किल्ल्यावर हल्ला करतांना शत्रूनीं असा आठवण रहाण्या सारखा हात दाखविला नव्हता. लहान मोठ्या सा ऱ्या राजे रजवाड्यांनां आणि लोकांनां रणजितसिंग विलक्षण शूर वाटला. तेथून वीस वर्षे पर्यंत ज्याच्या त्याच्या तोंडीं भरतपूर बसलें होतें. तें जें इंग्रजांनां लांछन झालें होतें तें जेव्हां पुनः लढाईचा प्रसंग येऊन सन १८२६ मध्यें त्यांणीं सुरुंग उडवून खिंडार पाडून किल्ला घेतला तेव्हां गेलें.

रणजितसिंगाचा असा चोहींकडे लौकिक पसरल्या नंतर लौकरच सुमार दोन वर्षांच्या आंत, तो मृत्यु पावला आणि त्याचा ज्येष्ठ पुत्र रणधीरसिंग गादीवर बसला. त्याची इंग्रज सरकाराशीं वागण्याची तऱ्हा अगदीं विलक्षण, सदा त्रास येण्या सारखी होती. तरी तह कायम राहून सन १८१७ मध्यें पेंढाऱ्यां बराबर लढाई सुरू झाली तेव्हां त्याणें आपली फौज मदतीस पाठविली. तो सन १८२३ मध्यें आक्टोबरच्या ७ व्या लारखेस अनपत्य वारला. तेव्हां त्याचा भाऊ बलदेवसिंग गादीवर बसला.

बलदेवसिंगानें राज्याचा उपभोग सारा १८ महिने घेतला. तो तारीख २६ फेब्रुआरी सन १८२५ इसवी रोजीं वारला. तेव्हां त्याचा पुत्र बलवंतसिंग सारा ६ वर्षांचा होता, परंतु इंग्रजसरकारानें त्याला गादीवर बसविलें. तें त्याचा चुलत भाऊ दुर्जनसाल याला बरें न वाटून त्याणें केरौलीचा राजा व आणखी कांहीं संस्थानिक यांची मदत घेऊन भरतपुरावर हल्ला केला, आणि बळवंतसिंगास कैद करून आपण गादी बळकाविली. हें वर्तमान दिल्लीचे रेसिडेंट सर डेव्हिड आक्टरलोनी यांस कळतांच त्यांणीं फौज जमवून बलदेवास पुनः गादीवर बसविण्याचें मनांत आणलें. त्याबेळीं भरतपूरचें ही काम हेच रेसिडेंट पहात होते. त्यांणीं योजल्या प्रमाणें जर तेव्हांच बार उडत होता तर पुढें जसें तें प्रकरण माजलें आणि मग तें मोडण्यास प्रयास पडले तसें झालें नसतें परंतु गव्हरनर जनरल लॉर्ड ऑम हर्स्ट ह्यांस आक्टरलोनीचा विचार अगदीं नापसंत वाटून त्यांणीं त्याची

लगलीच त्या जागे वरून बदली केली. हें घरगुती प्रकरण सामोपचारानें सहज मिटेल असें लॉर्ड साहेबांस वाटत होतें, परंतु तसें कांहीं न होतां शेवटीं आक्टरलोनीचाच उपाय योजावा लागला. आणि प्रथम जसें कार्य सहज झालें असतें तसें आतां होईना. दुर्जनसालाला जी फुरसत मिळाली तिचा त्याणें उपयोग चांगला केला. एकीकडे इंग्रजसरकाराशीं बोलणें लाऊन, माझ्या हक्काचा तुम्ही विचार करा, तुम्ही निकाल कराल तो मला मान्य, असें तो म्हणत असे; परंतु आंतून लढाईची तयारी जारीनें करीत होता. त्यानें किल्ल्याची दागदुजी केली, फौज ठेविली आणि मराठे व रजपूत राजांकडे संधानें बांधून मदती करितां गुप्तपणें बोलणें लाविलें. त्याची अशी सिद्धता आणि भरतपूरच्या किल्ल्या वरील मागच्या प्रसंगानें तो अगदीं अजिंक्य ठरलेला, त्या मुळें सर्व लोकांनां असें वाटलें कीं आतां दुर्जनसाला पुढें इंग्रजांचें काय चालतें! लोकांचीं मनें चोहींकडे जेव्हां अशीं खवळून गेलेंली, तेव्हां आतां कदाचित देशभर एकदम दंगा होईल असें सरकारास वाटून तो न व्हावा म्हणून दुर्जनसालाचें शासन करून बलदेवसिंगास गादीवर बसविण्याचा जो आक्टरलोनीचा पहिला विचार तोच त्यांणीं कायम केला, आणि कमॉडर इनचीफ लॉर्ड कॉंबरमीअर यांस २५००० फौज व तोफखाना वगैरे भरपूर सामान देऊन किल्ला सर करावा असा हुकूम केला. त्या प्रमाणें कमॉडर साहेबांनीं सन १८२५ च्या दिसेंबर मध्यें वेढा दिला; परंतु किल्ल्याचा तट फार उंच आणि रुंदता मातीचा असून ६० फूट रुंद व सभोंता खदक खोल असून पाण्यानें भरलेला होता, त्या मुळें तटावर चढणें अशक्य होतें म्हणून सुरुंग लाऊन खिंडार पाडावें असा बेत करून त्यांणीं तारिख २३ रोजीं सुरुंग खोदण्यास सुरवात केली. सुरुंग तारीख १७ जानेवारीस तयार झाले आणि ते उडवतांच आंत जातां येईल असें भगदाड पडलें, आणि दुसऱ्या दिवशीं साहेबांनीं हल्ला करून किला घेतला व दुर्जनसाल आंत सांपडला त्याला कैद करून अलहाबादेस पाठविलें. नंतर तारीख ५ फेब्रुआरी सन १८२६ रोजीं सरकारानें बळवंतसिंगास पुनः गादीवर बसवून बलदेवसिंगाची पट्टराणी मिरुतकुवर इजला त्याचें पालन करणारी नेमिलें, व राज्याची देखरेख करण्या करितां पोलिटिकल एजंट नेमिला. ह्या पालनकर्त्रीचा स्वभाव मोठा खटपटी होता. तसें न वागण्या विषयीं सांगिलेलें तिला रुचेना, आणि आतां आपला अधिकार रहात ना-

हीं असें दिसलें तेव्हां ती त्या तरुण बलवंतासिंगाला घेऊन वाड्यांत कांहीं दिवस पर्यंत अगदीं कोंडून घेऊन बसली व मला जर कोणी आडवा येईल किंवा या मुलाला मज जवळून हालवील तर मी प्राण देईन ह्मणूं लागली, तेव्हां तिला दूर करून राजाचें पालन करण्याचा अधिकार सरकारानें मित्र मंडळाकडे दिला व राज्यांतील सर्व खात्यांची मुकत्यारी त्याज कडेसच सोंपविली.

सन १८३० मध्यें भरतपूरचें एक मोठें नुकसान झालें. जवाहीर-लाल ह्मणून सन १८०५ पासून तेथल्या मुलकी खात्याचा मुख्य कामदार होता तो वारला. त्याच्या विषयीं असा लेख आहे कीं जमाबंदी प्रकरणी हरएक कामांत त्याला जशी माहिती होती तशी फार थोड्यांनां होती ; त्या च्याहून वरचढ कोणीच नव्हता ह्मटलें तरी चालेल. त्याच्या अंगीं अशी हुशारी आणि तो तसाच शांत, दमदार व क्षमाशील असल्यामुळें त्याच्या हातून त्या राज्याचें फार हित झालें. तो वारल्या बरोबर सारी अव्यवस्था होऊन खराबी होऊं लागली; ती अल्पकाळांतच जेव्हां उघड भासूं लागली तेव्हां १८३१ च्या जून महिन्यांत एजंट साहेबांनीं त्या कामावर भोलानाथाची नेमणूक करावी असें लिहिलें. ह्या गृहस्थाची शहरांत चांगली प्रतिष्ठा होती. तो काम पाहूं लागला तेव्हां स्थिति सुधारत चालली

सन १८३५ मध्यें बलवंतसिंग वयांत येऊन मुकत्यारीनें राज्यकार-भार पाहूं लागले तेव्हां सरकारानें तेथून पोलिटिकल एजंट काढला व तेथील बंदोबस्ता करितां ह्मणून जी थोडीशी फौज ठेविली होती ती ही काढिली आणि महाराजांस हवी तशी व्यवस्था करावयास मोकळीक दिली. ह्या स्वातंत्र्याचा महाराजांनीं योग्य उपयोग केला. सन १८४० पर्यंत भोलानाथ दिवाण होते त्या पांच वर्षांत तर काम इतकें उत्तम चाललें होतें कीं भरतपुरासारखी चांगली राज्यव्यवस्था कोणत्याही राजाची नव्हती. ह्या गोष्टीमुळें इंग्रज सरकार महाराजांवर इतकें खुष होतें कीं सन १८२५।२६ मध्यें जी लढाई झाली तिचा खर्च भरतपुरानें द्यावा असा ठराव झालेला होता ती रक्कम अद्याप फिटली नव्हती, कांहीं ऐना पैकीं व व्याज आकारा पैकीं मिळून २५४९००० रुपये देणें निघत होतें, परंतु सन १८३९ मध्यें तें सर्व सरकारानें माफ केलें.

हे बलवंतसिंग महाराज सन १८५३ मध्यें वारले तेव्हां त्यांचा पुत्र

जसवंतसिंग तीन वर्षांचा होता तो गादीवर बसला. तो वयांत येई पर्यंत राज्यकारभार चालविण्या करितां सरकारानें सात सरदारांचें कौन्सिल नेमलें होतें व त्यावर पोलिटिकल एजंटाची देखरेख असे.

ह्या भरतपूर प्रदेशाला वृज व येथील भाषेला ब्रिज भाषा असें म्हणतात. या प्रदेशांत दीग आणि बयन हीं दोन शहरें फार प्राचीन असून पूर्व कालिक पहाण्यासारख्या अनेक गोष्टींनीं भरलेलीं आहेत.

जसवंतसिंग वयांत आले तेव्हां त्यांस मुकत्यारी मिळाली. हे राजकीय कामांत मनाचे निग्रही व हिम्मतवान आहेत.

भाग १२

अलवार

अलवारच्या उत्तरेस इंग्रजसरकारच्या खालसा मुलखापैकीं गुरगावन प्रांत व संस्थानी कोटकासीन परगणा आहे; पूर्वेस मथुरा व भरतपूर आणि दक्षिणेस व पश्चिमेस जयपूरचा मुलुख आहे. हें राज्य मेवात म्हणजे मेवाती लोकांचा जो मुलुख त्यापैकीं आहे.

हे मेवाती लोक स्वभावानें क्रूर, रानटी आणि लुटारू, अशी यांची फार दिवसां पासून प्रसिद्धि आहे, आणि दिल्लीच्या पहिल्या पहिल्या बादशाहांच्या कारकीर्दीत तर त्यांणीं हे आपल्या जातीचे गुण बरेच दाखविले. कित्येक वेळांतर त्यांणीं अगदीं दिल्लीच्या वेशी पर्यंत जाऊन लूट केली. तेव्हां बादशाहास राग येऊन आतां यांची उपेक्षा करून उपयोग नाहीं असें वाटलें. प्रथम सन १२६६ मध्यें ग्यासुद्दीन बुलबुन याणें त्यांजवर स्वारी करून सुमार एक लाख मेवाती लोक ठार मारले आणि जें ठिकाण घ्यावें तेथें लागलेंच ठाणें घालून बंदोबस्त करावा असें करून व आणखी असेच दुसरे उपाय योजून त्यांचा अगदीं मोड केला. तेथून सुमारें १५० वर्षें पर्यंत हे मेवाती लोक अगदीं स्वस्थ राहिले होते, परंतु तघलख घराणें बुडून बादशाहींत जी अव्यवस्था आणि गडबड उडाली त्या संधींत त्यांणीं पुनः उचल केली. परंतु सय्यद मुबारीक याणें त्यांजवर लागलीच स्वारी

करून सन १४२९ मध्यें त्यांचा अगदींच मोड केला. तेव्हां पासून पुढें ३०० वर्षें पर्यंत त्यांणीं मोटी लूट करण्याचें सोडलें होतें; लहान सहान लुटी करून तेवढ्यांवरच तृप्त असत. त्यांचें बळ कमी पडल्यामुळें त्यांनां मोठी धुमाळी उडवतां येईनासें झालें होतें, आणि त्यांच्यांत कोणी मोठा प्रमुख सरदार नसल्यामुळें व्यवस्थाही नाहींशी झाली होती. परंतु त्यांचा उदयकाल लौकरच आला. औरंगजेब बादशहा मेल्या नंतर जेव्हां मुलुखभर दंगे धोपे सुरू झाले तेव्हां जयपूरच्या राजानें संधी पाहून सन १७२० मध्यें कांहीं बादशाही मुलुख बळकाविला. त्यांत मेवातचा कांहीं भाग त्याजकडे गेला तो सुमार पन्नास वर्षें पर्यंत जयपूरच्या ताब्यांत होता. पुढें सन १७६४ पासून १७७४ पर्यंत जयपुरांत दिल्ली प्रमाणें बेदंदशाही झाली तेव्हां मेवातांत प्रतापसिंग ह्मणून एक नारुक ठाकूर अडीच खेड्यांचा जाहागीरदार होता त्याणें स्वंतत्र होण्याचें मनांत आणलें. तो प्रथम जयपूरच्या पदरीं होता तेव्हां त्याणें आपलें शौर्य, धैर्य, व कौशल्य, यांच्या योगानें चांगली कीर्ति संपादिली होती. या प्रसंगीं मिरझा नजाफखान याणें जाट लोकां बराबर लढाई सुरू केली असतां प्रतापसिंगानें त्याला खऱ्या निकराच्या प्रसंगीं मदत करून प्रथम वारसाना येथें व नंतर दीग येथें जाटांचा पराभव केला. या कामगिरी बद्दल नजाफखानानें त्याला रावराजा असा किताब दिला आणि त्याच्या वडिलोपार्जित माचेरी गांवाची बादशहा कडून सनद देववविली. या प्रमाणें माचेरीचा जयपुराशीं जो पहिला संबंध होता तो अगदीं तुटला. प्रतापसिंगाची येवढ्यानें तृप्ति झाली नाहीं. त्याणें सन १७७६ मध्यें भरतपूर जरा बलहीन झालेलें पाहून त्याच्या ताब्यांतील अलवारचा मजबूद डोंगरी किल्ला, तटबंदिस्त अलवार शहर, आणिं त्याच्या लगतचा मुलुख बळकाविला.

या प्रमाणें प्रतापसिंगानें राज्य संपादन केलें परंतु हें आपल्या वंशांत निर्वेधपणें चालेल कसें अशी त्याला काळजी पडली. शेवटीं त्याणें पुढील चमत्कारीक युक्ति योजिली. परशत्रूला आपला मुलुख घेण्याचा लोभच उत्पन्न होऊं देऊं नये ह्मणजे झालें, असें मनांत आणून त्याणें रयतांस जमिनीची कष्ट मशागत करूंदेण्याचें बंद केलें, आणि मुलुख वैराण दिसे असा केला; आणि जागो जाग कोट, किल्ले, बांधून त्यांत पुष्कळ सैन्य ठेऊन साऱ्या नाक्यांचा बंदोबस्त केला.

प्रतापसिंगानें ह्या स्वसंपादित राज्याचा उपभोग बीस वर्षें केला. त्या ला पुत्र नव्हता ह्मणून त्याणें बख्तवरसिंग नामक आपला एक दूरचा भाई बंद दत्तक घेतला. याच्या आंगचे गुण त्याला आवडले होते. अलवारावर परचक्र येऊं नये ह्मणून प्रतापसिंगानें आपल्या मतें जरी पुष्कळ बंदोबस्त करून ठेविला होता तरी तो वारल्या नंतर थोड्याच काळानें मराठ्यांनीं त्याजवर झडप घालून कांहीं मुलुख घेतलाच. ह्मणून पुढें सन १८०३ म ध्यें मराठ्यां बराबर लढाई सुरू झाली तेव्हां बख्तवरसिंगानें इंग्रजांचा आश्र य संपादून संरक्षणाकारितां व कुरापत काढून ही मराठ्यांशीं लढेन असा करार करून त्यांच्याशीं तह केला. त्याच्या सुदैवानें लॉर्डलेक याणें लास वारी येथें जो थोर संग्राम केला तो अलवाराहून अगदीं नजीक, सारा स-त्रा मैलांवर. झाल्यामुळें व त्यांत त्याणें मदत केल्यामुळें, त्याला बराच लाभ झाला. त्याच्या मेवाती लोकांनीं आपल्या मूलजातिस्वभावास अनुसरून के-व्हां केव्हां इंग्लिशांच्या फौजेचें सामान सुमान लुटण्यास कमी केलें नाहीं; तरी तें फारसें मनावर न घेतां सरकारानें पूर्वी भरतपूरच्या राजाला दिलेला मुलुख जेव्हां त्याच्या कडून परत घेतला तेव्हां तोच बख्तवरसिंगास दिला. याच सुमारास उभय सरकारांचे सोई करितां थोड्याशा मुलखाची अदला ब-दल ही झाली.

बख्तवरसिंगाचें इंग्रजसरकारच्या आश्रयानें म्हटलें असतां कल्याण झालें. परंतु त्याला तो कांहींच उपकार वाटेना. इतकेंच नव्हे. केव्हां के-व्हां तो त्यांच्याशीं साधारण अकलेच्या मनुष्या प्रमाणें ही वागेनासा झाला. याचें एक उदाहरण सांगतों. मन्हस नाई ह्मणून एक नदी त्याच्या हद्दींतू-न भरतपूरच्या राज्यांत वहात जाते; तिच्या पाण्यावर तेथचे पुष्कळ लोक शेती भाती करतात. त्याणें सन १८०८ मध्यें त्या नदीला बांध घालून पाणी अडविलें. तेव्हां शेतें वाळूं लागून नुकसान होऊं लागलें ह्मणून इंग्र-ज सरकारानें मध्यें पडून पाणी सोडण्या विषयीं त्याला पुष्कळ सांगितलें, परंतु त्याणें कांहीं दिवस पर्यंत ऐकिलें नाहीं. पुढें सन १८११ मध्यें त्या-च्या मनांत धर्मवेड शिरून मुसलमानांनां छळावें अशी इच्छा उत्पन्न झाली. त्याणें त्यांच्या मशिदी पाडल्या आणि कांहीं फकीर धरून त्यांचे नाककान कापून ते आपल्या शेजारच्या नबाबाकडे पाठवून दिले. हें त्याचें धर्मवेड येवढ्यानें ही संपलें नाहीं. त्याणें मुसलमानांचीं पुरलेलीं प्रेतें उकरविलीं

आणि त्यांच्या अस्थि आपल्या राज्यांतून हद्दपार करविल्या.

याच सुमारास म्हणजे सन १८११ मध्यें बख्तवरसिंगानें जयपूरच्या प्रकरणांत हात घालून ढवळाढवळ केलेली सरकारच्या नजरेस आली. त्याचें तें वर्तन सरकाराला अगदीं सहन होण्या सारखें नव्हतें. परंतु त्याच्याशीं पूर्वी सन १८०३ मध्यें जो तह झालेला होता त्यांत त्याणे असें न करण्या विषयीं स्पष्ट ठराव नव्हता म्हणून सरकाराला बोलतां येईना. परंतु सरकारानें लागलाच जुलई महिन्यांत तो तहनामा दुरुस्त करून घेतला. जें एक कलम नवीन घातलें त्यांत असा स्पष्ठ करार झाला कीं राजानें इंग्रज सरकारास कळवून संमति घेतल्या वांचून कोणत्या ही सरदाराशीं किंवा संस्थानिकाशीं कोणत्याही प्रकारचा ठराव किंवा तह करूं नये. असा नवीन ठराव झाला तरी पुढच्याच वर्षी म्हणजे १८१२ मध्यें त्याणें धोवी व सिक्राव हे दोन किल्ले व त्यांच्या खालचा मुलुख घेतला ; आणि अशी गैर गोष्ठ न करण्या विषयीं दिल्लीच्या रेसिडेंट साहेबानें समजून सांगितलें तरी तो परत देईना. सामोपचार थकला तेव्हां त्याला दुसऱ्या रीतीनें ताळ्यावर आणण्याचा सरकारानें विचार केला, आणि फौज रवाना केली. ती अलवारच्या आलीकडे एका मजलेवर येऊन ठेपली तेंव्हा बख्तवर सिंगानें शुद्धविर येऊन तो बळकावलेला मुलुख सोडून दिला, आणि स्वारीच्या खर्चा बद्दल तीन लाख रूपये दिले.

हा रावराजा बख्तवरसिंग सन १८१५ मध्यें वारला. त्याला बनैसिंग म्हणून एक पुतण्या होता त्याला दत्तक घेण्याचा त्याचा हेतु होता ; आणि बळवंतसिंग म्हणून एक अनौरस पुत्र होता. हे दोघे ही अल्पवयस्क होते तरी गादीवर कोणी बसावें हा तंटा सुरू झाला. सर्व ठाकूर पुतण्याच्या पक्षाचे झाले आणि मुसलमान लोक लेकवळ्याच्या पक्षास मिळाले. त्यांत नबाब महंमदबक्षखान हा प्रमुख होता. शेवटीं बनैसिंगाला गादीचे मानपान मिळावे, नांव त्याचें चालावें आणि बळवंतसिंगानें राज्याधिकार चालवावा असा आपसांत ठराव होऊन कलह मिटला. इंग्रज सरकारानें हा ठराव पसंत केला. परंतु तो ते उभयतां वयांत येई पर्यंत कायतो चालला. नंतर बनैसिंगाला नामधारी राजा होऊन रहाणें आवडेनासें झालें. त्याच्या हरएक कृत्याला प्रतिबंध होऊं लागला तो त्याला सहन न होऊन राग आला आणि त्याणें बळवंतसिंगास कैद करविलें व नबाब अहंमद

वक्षखान दिल्लीचे रेसिडेंट साहेबांस भेटण्या करितां गेंला असतां त्याचा खून करविला. तो खुनी मनुष्य कैद होऊन गुन्ह्याची चौकशी सुरू झाली तेव्हां अलवार दरबारापैकीं कित्येक मनुष्यांचे शिकवणीनें हें कृत्य झालें असावें असें दिसून आलें. ह्मणून सरकारानें ते मनुष्य दिल्ली येथें खटल्याची चौकशी करण्या करितां आमच्या स्वाधीन करा असें महाराज़ांस सांगितलें; परंतु बनैसिंग त्यांस स्वाधीन करीना. त्याचें हें नकाराचें उत्तर ऐकून भरत पूरचा पाडाव होतांच लॉर्ड कांबरमीअर यांस तेंच सैन्य घेऊन अलवारावर जावें असा सरकारानें हुकूम केला. त्या प्रमाणें लॉर्ड साहेबांचा मोर्चा इकडे फिरला असें कळलें तेव्हां बनैसिंगानें ते लोक स्वाधीन केले. त्याच वेळीं त्याणें बळवंतसिंगास बंदमुक्त करून आपल्या राज्या पैकीं उत्तरे कडील परगणे ह्मणजे मेवात प्रांत नेमून दिला. तो बळवंतसिंग मेल्या नंतर पुनः त्याजकडेसच आला.

इतकें झाल्यानंतर देखील बनैसिंग सरकाराशीं उद्धटपणानेंच वागत होता. नबाबाचा खून केल्या बद्दल चौकशी होऊन आरोपी दोषमुक्त झाले खरे, परंतु त्यांज विषयीं अतिशय संशय राहिला ह्मणून सरकारानें बनैसिंगास असें लिहिलें कीं यांस तुह्मी कोणतें ही भरंवशाचें काम सांगूं नये. परंतु सरकाराला अगदीं तुच्छ करून त्याणें आपल्या येथील मोठ मोठ्या हुद्याच्या व अधिकाराच्या जाग्यांवर त्यांच्या नेमणुका केल्या. ह्मणून रेसिडेंट साहेबांनीं जेव्हां राजपुतान्यांतील राजे रजवाड्यांच्या भेटी घेतल्या तेव्हां इत ां प्रमाणें अलवारच्या राजाची भेट घेतली नाहीं, व पुढच्या वर्षी ह्मणजे स न १८२७ मध्यें राजानें आपले वकील गव्हरनर जनरलाकडे पाठविले, त्यां ची त्यांणीं भेट घेत नाहीं ह्मणून सांगितलें.

पुढें सन १८३१ मध्यें अलवारच्या राजानें जयपूरच्या महाराजांस पाठविलेलीं पत्रें सांपडलीं. त्यां वरून बनैसिंग जयपूरचा मांडलिक होण्याच्या व महाराजांस पुष्कळ नजर नजराणा कबूल करून त्यांजकडून अधिकाराचीं वस्त्रें घेण्याच्या खटपटींत आहे असें दिसून आले. तेव्हां सरकारानें त्यास असें सांगितलें कीं ह्या पत्रांवरून तुम्ही आम्हांशीं केलेला तहनामा मोडता असें होतें, तर या गोष्टीचा योग्य विचार करा.

बनैसिंगानें या प्रमाणें उद्धटपणाच्या आणखी ही एकदोन गोष्टी केल्या. असा तो बेपर्वा झालेला पाहून सरकारानें पुनः अलवारावर फौज

रवाना करण्याचें मनांत आणलें ; तें कळतांच मग मात्र शुद्धीवर आला.

हा बनैसिंग सन १८५७ मध्यें वारला तेव्हां शिपायांच्या बंडांचा नुकता प्रादुर्भाव होता. त्याचा मुलगा शिवदानसिंग तेव्हां सारा तेरा वर्षां-चा होता तो गादीवर बसला. परंतु त्याला अगदीं वश करून घेऊन मुस-लमान कारभारी होते ते सर्व हुकमत चालवूं लागले. तें त्याच्या पदरच्या रजपूत ठाकुरांस सहन न होऊन त्यांणीं जमून त्यांनां हांकून लाविलें. ते-व्हां ते गडबड करतील ह्मणून सरकारानें त्यांनां बनारस येथें नेऊन नजर कैदेंत ठेविलें, आणि राजा मोठा होई पर्यंत राज्यकारभार चालविण्या क-रितां रिजेन्सि कौन्सिल नेमून त्यास सल्ला मसलत व मदत देण्या करितां पोलिटिकल एजंटाची नेमणूक केली. सन १८६३ मध्यें शिवदानसिंग व-यांत आला; तेव्हां त्यास मुकत्यारी मिळाली. परंतु पोलिटिकल एजंट का-यमच होता.

पुढच्या वर्षी ह्मणजे सन १८६४ महाराव शिवदानसिंग गव्हरनर जनरल साहेबांस भेटण्याकरितां कलकत्यास गेला तेव्हां त्याच्या इतर कां-हीं गोष्टी ऐकून साहेबांच्या मनाचा ग्रह जरी चांगला झाला नव्हता तरी त्या ची हुशारी व बुद्धि पाहून त्यांनां बरें वाटलें. तरी लाट साहेबांनीं त्याला असें सांगितलें कीं अलवारांत जर कांहीं दंगाधोपा होईल तर तो मोडण्या-ला सरकार अगदीं मदत करणार नाहीं हें लक्षांत ठेवा. महारावांस अशी ताकीद देणें जरूर होतें असें थोड्याच कालांत निदर्शनास आलें. त्याच व र्षीं त्यांणीं आपल्या हुजूर पथका कडील मुसलमान जमादारास टार मारल्या बद्दलचा त्यांजवर आरोप आला. त्या खुनाची जरी महारावांवर शाबिती झा-ली नाहीं तरी संशय फार जबर राहिला. यानंतर थोड्याच दिवसांनीं पद-रच्या ठाकुरां बराबर भांडून व जयपूरच्या राजाशीं उद्धटपणानें वागून त्या-णें आपला फार दुर्लौकिक करून घेतला. या वेळीं सरकारानें तेथून पोलि टिकल एजंट काढला होता आणि रक्तपात होऊं नये असा आगाऊच बंदो बस्त ही केला होता तरी महारावांस अशी सक्त ताकीद दिली कीं तुमच्या हातून जर कांहीं गैर गोष्ट घडेल तर तिचें फळ तुम्हांस भोगावें लागेल.

आपल्या गैर वर्तना मुळें सरकारची आपल्यावर इतराजी झाली आ-हे असें महारावास चांगलें समजावें ह्मणून त्याला मुकत्यारी दिल्यावेळीं जीं अधिकाराचीं वस्त्रें द्यावयाचीं राहिलीं होतीं तीं आतां (सन १८६६) मि-

ळणार नाहींत असें सांगणें लाट साहेबांस भाग पडलें. पुढें महारावांची वर्तणूक सुधरेल असें चिन्ह दिसूं लागलें व गव्हरनर जनरलाचे एजंटानें त्यांच्या विषयीं रिपोर्ट ही बरा केला तेव्हां सन १८६७ मध्यें त्यांनां पोषाक मिळाला.

शिवदानसिंगास राज्याचा उपभोग फार दिवस घडला नाहीं. तो सन १८७४ च्या आक्टोबर महिन्यांत अप्रज वारला. तेव्हां ठाणें घराण्या पैकीं हरदेवसिंग म्हणून दूरचा भाईबंद होता त्याचा मुलगा दत्तक झाला. त्याचें नांव मंगळासिंग. हा राज्य चांगलें चालवील अशी आशा वाटते हा वयांत येऊन अधिकार पावला आहे.

अलवारचा सुंदर किल्ला एक हजार फूट उंच डोंगरावर आहे. तेथून खालीं शहरांतील दूमदार भव्य इमारती, बागा, व तलाव, यांची शोभा पहाण्या सारखी आहे. राजपुताना स्टेट रेलवे झाल्या पासून अलवार शहरची मौज पहाण्या करितां पुष्कळ लोक हौसेनें जातात. महारावांच्या पागेंतील उत्तम* घोडे, वाडयांतील ग्रंथ संग्रह, शिलेखान्यांतील नाना तऱ्हांचीं हत्यारें व भांडारखान्यांतील बहुमूल्य रत्नसंग्रह, अवलोकन करण्या सारखेच आहेत.

भाग १३

बिकानीर

जोधपूर स्थापणारा जो राव जोध त्याचा सहावा पुत्र बिकाजी याणें बिकानीर संस्थान स्थापिलें. परंतु बिकानीर हें नांव मात्र त्याच्या नांवावरून न पडलेलें नव्हे. बिका व नारो म्हणून दोघे बघोर रजपूत होते, त्यांणीं हें

---

* सन १८७७ मध्यें महारावांच्या अश्वशाळेंत ७! वळू घोडे ६१ पमू घोड्या, १२१ शिंगरें, ३०४ बसण्याचे व ७४ गाडीचे घोडे होते. पीलखान्यांत हत्ती नग ३४ व उष्ट्रखान्यांत उंठ नफर १९४८ या प्रमाणें वाहनाची तयारी होती.

शहर वसविण्यास जागा दाखविली म्हणून त्याला त्याणें त्यांचेंच नांव ठेविलें असें म्हणतात. मी स्वपराक्रमानें, अरण्यांत जाऊन, राज्य करीन अमें म्हणून बिकाजी हातांत तलवार घेऊन घरांतून बाहेर पडला आणि मारीन अथवा मरेन असा निश्चय करून तीनशें लोक बराबर घेऊन चालता झाला. त्याणें प्रथम जांगलू लेकांस जिंकलें ; नंतर पुगल येथील भाटी राजाचा स्नेह संपादून त्याची कन्या वरिली, आणि पुढें कोरमदेसीर येथें किल्ला बांधून ठाणें घातलें. तेथून त्याची शक्ति थोडी थोडी वाढत चालली, आणि त्याणें हळू हळू जाट लोकांवर आपला अम्मल बसविला. नंतर जाटां प्रमाणें आणखी जे परदेशी लोक त्या मुलखांत राहिले होते त्यांणीं त्याला स्वसंतोषानें राज्य दिलें. असे एकंदर २६७० गांव मिळून नऊ परगणे त्याच्या अमलांत आले. या लोकांची संपत्ति काय ती गुरेंढोरें, मेंढरें, बकरीं, असत ; त्यांवर ते आपला निर्वाह करीत ; लोंकर वगैरे त्यां पासून उत्पन्न होणारे पदार्थ शेजारच्या मुलखांत नेऊन विकीत. बिकाजीला त्यांणीं राज्य देण्याचें कबूल केलें तें अशा करारानें कीं १ ते व आपण अगदीं एक असें त्याणें मानावें आणि ते ज्या लोकांबरावर लढत होते त्यांच्याशीं लढावें. २ पश्चिमे कडून भाटी लोक त्यांच्यावर हल्ले करून उपद्रव देत असत त्यांचा बंदोबस्त करावा, व ३ त्यांचे जे हक्क व मानपान होते ते तसेच चालवावे.

बिकाजीनें या सर्व गोष्टी कबूल केल्या तेव्हां त्यांणीं त्याला व त्याच्या वंशाला राज्यपद देऊन आपल्या परगण्यांतील दर घरावर एक रुपया प्रमाणें भूत म्हणजे चूलपट्टी व कीर्द केलेल्या जमिनीवर शंभर बिघ्यांस दोन रुपये प्रमाणें दस्त बसविण्यास अधिकार दिला. राजसत्ता प्राप्त झाल्या नंतर आपण व पुढें आपले वंशज केल्या करारा प्रमाणें वागतील असा त्या लोकांनां भरंवसा आला पाहिजे म्हणून बिकाजीनें त्यांच्याशीं असा आणखी करार केला कीं जेव्हां जेव्हां कारकीर्द बदलेल आणि गादीवर नवीन पुरुष बसण्याचा समय येईल तेव्हां तेव्हां तुम्हांमध्यें जे वडील असतील त्यांज पासून व पुढें त्यांच्या वंशजांपासून त्याणें अधिकाराचीं वस्त्रें संपादावीं व तीं प्राप्त होत पर्यंत गादी रिकामी आहे असें समजावें.

या प्रमाणें उभय पक्षांचे करार होऊन बिकाजी राजा झाला आणि त्याणें लागलीच लढाई आरंभून त्या लोकांचे शत्रु जे जोहिया यांस प्रथम

जिंकलें आणि पुढें भाटी लोकांवर स्वारी करून त्यांच्या पासून वाघोर मुलु ख घेतला. मग ह्या मुलखांत सन १४८९ मध्यें ह्मणजे मंदूर येथून वर सोडून आल्या पासून बराबर तीस वर्षांनीं त्याणें बिकानीर शहर वसविलें.

बिकाजी सन १४९५ मध्यें वारला. त्याला दोन पुत्र होतें. त्यां-तील वडील नूनकर्ण हा त्याच्या मागून गादीवर बसला, व दुसरा गरसी याणें गरसीसीन व आरसीसर हीं स्थापिलीं.

नूनकर्णानें भाटी लोकां पासून कित्येक प्रांत जिंकून घेतले. त्याला चार पुत्र होते, पैकीं ज्येठानें त्याच्या हयातींतच पृथक होऊन गादीवरील हक्क सोडून दिला ; ह्मणून नूनकर्णा नंतर द्वितीय पुत्र जैतसी गादीवर ब-मला. त्याणें ही राज्य वाढविलें. त्याच्या कारकीर्दीत सन १५३८ मध्यें बाबराचा पुत्र कामरान याणें बिकानीरावर स्वारी केली होती, परंतु त्याला पराजित होऊन परत जावें लागलें. जैतसी नंतर त्याचा वडील पुत्र क-ल्याणसिंग गादीवर बसला. त्याजवर मारवाडच्या राजानें स्वारी करून रा-ज्य घेऊन त्याला हांकून लाविलें, तेव्हां आपली गादी पुनः प्राप्त करून घेण्या करितां त्याला दिल्लीस शेरशहा बादशाहाकडे जाऊन मदत मागणें भाग पडलें. बादशाहानें त्याला पुनः गादीवर बसविलें. परंतु तेव्हां पासून बिकानीर मोंगलांचें मांडलिक होऊन बसलें. त्याचें स्वातंत्र्य नष्ट झालें त-री पुढें या घराण्यांतील पुरुषांस कीर्ति संपादावयास सांपडलें नाहीं असें नाहीं. परंतु त्यांस पारतंत्र्याचें दुःख भोगावें लागलें व मोगलांस आपल्या मुली द्याव्या लागल्या.

कल्याणसिंगा नंतर त्याचा वडील पुत्र रावसिंग सन १५७३ मध्यें गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दीत दिल्लीच्या बादशहाच्या अमलांतील सा-व्या मांडलिक राज्यांत बिकानीर मोठ्या योग्यतेस चढलें. रायसिंग अकब-र बादशहाचा साडू झाला तेव्हां बादशहानें त्याला पुष्कळ वाढविलें, च्यार हजार स्वारांची मनसब दिली, राजा असा किताब दिला आणि हिस्सार प्रां-ताची सुभेदारी सांगितली. त्याजवर बादशहाची कृपा उत्तरोत्तर अधिकच होत गेली. जोधपूरचा राजा मालदेवसिंग याजवर अकबराची इतराजी झा-ली तेव्हां प्रथम नागोर प्रांत घेऊन तो आणि मागाहून त्याचें सारें राज्य घेऊन तें त्याणें रायसिंगास दिलें. बादशहानें एकाचें राज्य काढून दुसऱ्या स दिलें ह्मटलें ह्मणून तें लागलेंच त्याच्या हातीं येऊन निष्कंटक झालें असें

होतच नसे. परंतु रायसिंगावर बादशहाची कृपाच असल्यामुळें त्याणें बिकानिरास परत जाऊन भूतनैर जिंकून जोहिया लोकांचें निर्मूल करून सोडलें. हा गादीवर येण्यापूर्वी रजपूत लोक जाट लोकांच्या ताब्यांतील जमिनी काढून घेण्याच्या कामास लागले होते, त्यामुळें जाट लोकांना विपन्नावस्था येत येत ते अगदीं मजूर बनत चालले होते. हें अवस्थांतर रायसिंगाच्या कारकीर्दीत पुरेंच झालें. पूनिया म्हणून एक जाटकुल राहिलें होतें, त्याच्या ताब्यांत जो मुलुख होता तो रायासिंगानें घेऊन त्यांचें स्वातंत्र्य अगदीं नाहींसें केलें.

अकबर बादशहा लढाईला निघाला कीं रायसिंग राजा आपलें शूर सैन्य घेऊन त्याज बराबर जाई. अमदाबादच्या किल्ल्यावर हल्ला झाला तेव्हां त्याणें चांगलाच पराक्रम करून तेथच्या सुभेदारास ठार मारलें. त्या दोघांचेंच युद्ध होऊन त्याला असें यश आल्यानें त्याची कीर्ति झाली. त्याणें आपली कन्या शहाजादा सलीम (जहानगीर बादशहा) यास दिली. तिचा पुत्र पूरवेझ हा इतर सापत्न बंधूं प्रमाणें राज्यासाठीं शहाजहाना बराबर लढून पराजित झाला

राजा रायसिंग सन १६३२ मध्यें वारला तेव्हां त्याचा एकुलता पुत्र कर्ण गादीवर बसला. औरंगजेब आपल्यास राज्य मिळावें म्हणून खटपट करूं लागला तेव्हां कर्ण त्याचा वडील बंधु दाराशेकू* यास अनकूल होता म्हणून त्याचा घात करण्याची औरंगजेबाच्या एका सरदारानें तजवीज योजली होती , परंतु त्याणें तो डाव चुकवला. तो सन १६७४ मध्यें वारला आणि त्याचा पुत्र अनूपसिंग गादीवर बसला.

अनूपसिंगाला औरंगजेबानें विजापूर व औरंगाबाद येथें सुभेदार नेमिलें होतें व पांच हजारांची मनसब दिली होती. तो आपलें सैन्य घेऊन राजा जसवंतसिंग याजबराबर काबूलच्या मोहिमेस गेला होता. तेथून परत

---

* दुसऱ्या ग्रंथांतील लेख अगदीं उलट आहे, तो असा--बिकानीरचा राजा औरंगजेबास पूर्ण अनुकूल होता. दारा बराबर जी शेवटची लढाई झाली तींत त्याच्या दोघा पुत्रांनीं फार पराक्रम केला. युद्ध करून घामाघूम होऊन ते औरंगजेबा पुढें उभे राहिले असतां त्याणें स्वहस्तानें त्यांच्या अंगावरील ते धूळ झाडली--भाषांतर कर्ता

आल्यावर बिकानीर येथें सन १७०९ मध्यें मेला. नंतर त्याचा पुत्र सरूप सिंग गादीवर बसला. अनूपसिंगाला औरंगजेबानें अडोणीचा किल्ला व त्या खालचा मुलख दिला होता, परंतु तो तो बादशाही फौजेंतून निघून गेला तेव्हां त्यानें परत घेतला होता; तो आपण काबीज करावा म्हणून खटपट करीत असतां अनूपसिंग मारला गेला. त्याच्या मागून सुजनसिंग व झोराव सिंग म्हणून दोन राजे झाले, परंतु त्यांच्या कारकीर्दीत कांहीं मोठी गोष्ट झाली नाहीं.

नंतर राजा गजसिंग गादीवर बसला. त्याणें ४१ वर्षे राज्य केलें, परंतु त्याची सारी कारकीर्द भाटी लोकां बरोबर व भावलपूरच्या राजा बरोबर कलह करण्यांत गेली. परंतु त्यांत त्याचें कांहींच हित झालें नाहीं असें नाहीं. दोघांचाही कांहीं कांहीं मुलुख जिंकून त्याणें आपल्या राज्याच्या सीमा सारख्या केल्या. परंतु त्याची कीर्ति मुख्यत्वें त्याच्या बहुप्रजत्वा विषयीं आहे. त्याला ६१ मुलें होतीं. परंतु एक ग्रंथकार म्हणतो त्यां पैकीं सोरे महापुत्र विवाहित स्त्रियांपासून झालेले होते, बाकीं सारे अनौरस होते. तो सन १७८७ मध्यें वारला; तेव्हां त्याचा पुत्र राजसिंग गादीवर बसला.

हा राजसिंग तेराच दिवस राज्योपभोग करून विष प्रयोग होऊन मेला. त्याच्या सापत्न मातेनें आपला पुत्र सूरतसिंग, सहा पैकीं पांचवा बंधु, याम राजलक्ष्मी यात्री म्हणून हें कृत्य केलें. राजसिंगाला दोन पुत्र होतेच, तेव्हां असें होणें अशक्य खरें, परंतु सूरतसिंगाचा डाव निराळाच होता. सूरतानसिंग व अजितसिंग म्हणून जे राजसिंगाचे दुसरे दोघे बंधु होते ते मित्रे, वडील दादा प्रमाणें आपल्यावर कदाचित पाळी येईल म्हणून घर सोडून जीव घेऊन पळाले. राजसिंगाचे दोघे पुत्र प्रतापसिंग व जयसिंग हे अज्ञान म्हणून सूरतसिंग मी त्यांचा पालनकर्ता असें म्हणून सर्व अधिकार चालवूं लागला. दीड वर्ष पर्यंत तो मोठ्या विचारानें आणि बेतानें चालला; पदरचे ठाकूर, मानकरी, वगैरे लोकांशीं सलुख्यानें वागून त्यांना देखण्या. बक्षिसें देऊन त्याणें त्यांचीं मनें आपल्या कडे वळवून घेतलीं, आणि नंतर आपला हेतु त्यांतील कित्येकांना सांगितला. परंतु तो मतलब बाहेर पडतांच बहुतेक ठाकुरांनां तो गैर वाटून ते प्रतिकूल झाले. पण त्यांच्या हातून त्याला प्रतिबंध करण्याची योग्य तजवीज झाली नाहीं. तो पडला दक्ष आणि कार्य साधु, तेव्हां ते अनुकूल होत नाहींत असें दिसतांच

त्याणें जलदी करून फौज जमा केली आणि त्यांच्यावर हल्ला करून त्यांनां जिंकलें. मग तो तसाच लागलाच बिकानिरास गेला आणि गादी मिळण्या ला कांहींच अडचण राहूं नये म्हणून हवें तें कर्म करण्यास सिद्ध झाला. त्याचा एक पुतण्या या पूर्वीच मरून एक उरला होता तो त्याणें आपल्या बहिणी जवळ ठेविलेला होता. परंतु ती स्त्री सद्गुणी होती, ती याचा कपटभाव जाणून त्या मुलाला फारच जपत असे. तिला फसवणें अशक्य असें पाहून त्याणें दुसरी युक्ति काढली. त्याणें तिचा विवाह करण्याचें ठरवून तिला जो अगदीं अप्रिय त्याच मनुष्याच्या पदरीं तिला बांधलें. या प्रमाणें तिला घरांतून काढून टाकल्यावर कांहींच अडचण उरली नाहीं. मग त्याणें त्या आपल्या अनाथ पुतण्याचा व राजाचा स्वहस्तानें गळा दाबून प्राण घेतला असें म्हणतात. या प्रमाणें दुष्कर्म करून त्याणें मी राजा अशी द्वाही फिरविली. नंतर त्याचे दोघे बंधु फौज घेऊन त्याचें शासन करण्याकरितां म्हणून सन १८०१ मध्यें आले होते, परंतु त्यांचाच पराभव होऊन त्याला निष्कंटक राज्य मिळालें.

सूरतसिंग योद्धा होता. त्याणें आपलें राज्य बरेंच वाढविलें ; मुख्यत्वें भाटी लोकांचा मुलुख सर केला. परंतु जोधपुरांत पुढें जो गृहकलह सुरू झाला त्यांत शिरून त्याणें आपल्या दुर्दैवानें खोटा पक्ष हाती धरल्यानें त्याचें नुकसान फार झालें ; ढोकलसिंग तोतयाला गादीवर बसविण्याची वृथा खटपट करून त्याच्या साठीं त्याणें आपला पांच वर्षांचा वसूल नासला. मग जवळ पैसा नाहींसा झाला तेव्हां तो आपल्या प्रजेवर जुलूम करूं लागला. पण जसजसा त्याचा वृद्धापकाल होत गेला तसतसा दैवभोळेपणा विशेष वाढत जाऊन त्याणें हळुहळु राज्य कारभारांतून मन काढले. यौवनाच्या भरांत असतां जे पुरुष त्या मदानें अंध होऊन अनेक कुकर्में निःशंकपणें करण्यास चुकत नाहींत, त्यांची पुढें अशीच कांहीं तरी विलक्षण तऱ्हा होत असते ; बहुधा धर्मवेड लागतें, तसें याचें झालें. पूर्व वयांत जे त्याचे साहाय्य कर्ते होते, परंतु त्याच्या प्रमाणें ज्यांची मनें अस्थिर झालेलीं नव्हतीं, त्यांणीं सर्व काम कारभार संभाळला. तो सन १८२८ मध्यें वारला, परंतु तत्पूर्वीच पेंढाऱ्यां बराबर लढाई सुरू करण्याच्या अगोदर इंग्रज सरकारानें सर्व राजे रजवाडयांबराबर जे तह केले त्यांत याज बराबर ही केला. त्या तहांत असें ठरलें कीं राजानें इंग्रज सरकारचें

वर्चस्व मान्य करून त्यांच्याशीं स्नेहभावानें वागावें व मदत करावी. इंग्रज सरकारानें त्याच्या राज्याचें संरक्षण करावें आणि त्याच्या प्रजा बंडखोर पणानें वागत होत्या त्यांनां शासन करून त्याच्या आज्ञेंत वागावयास लावावें; राजाला मराठ्यांस खंडणी द्यावी लागत नव्हती सबब इंग्रज सरकारानें ही त्याज पासून घेऊं नये. सुरतसिंगाच्या कारकीर्दीत राज्यांत सारी अंदाधुंदी आणि बेबंदी होती ; सारे ठाकूर उघड बंडावा करून बिघडून होते, दरवडे खोरांनीं मुलुख उद्वस्त करून सोडला होता, शेतकऱ्यांनां सुद्धां हातांत तलवार घेऊन उभें रहावें लागे, तेव्हां दाणा पदरांत पडे. सुरतसिंगानंतर त्याचा पुत्र रतनसिंग गादीवर बसला.

रतनसिंगाला गादी प्राप्त होतांच त्याणें प्रथम जसलमीरच्या राज्या पैकीं कांहीं मुलखावर स्वारी करण्याचा बेत केला. त्याला निमित्त हें कीं जसलमीरच्या कांहीं प्रजेनें किंवा सरकारी नोकरांनींच बिकानीरच्या प्रजेला कांहीं उपद्रव दिला होता, निदान त्यांनां जो उपद्रव झाला होता तो त्यांच्या पासून, असें रतनसिंगास वाटत होतें. राजाची तयारी होऊन त्याणें स्वारी केली आणि इंग्रज सरकारा बराबरचा आपला तहनामा मनांत न आणतां जसलमीरच्या वेशी पर्यंत फौज नेऊन मुलखास उपद्रव दिला. या कृत्याचा सूड उगाविण्या करितां जसलमीरच्या राजानें लागलीच तयारी चालविली. मग उभयतांचें सैन्य येऊन आपआपल्या हद्दीवर उभें राहिलें. आतां राजपुतान्यांत धुमाकुळ उडतो, शांतता मोडते, असें दिसलें तेव्हां इंग्रज सरकार मध्यें पडलें आणि उदेपूरच्या राण्याच्या मध्यस्थीनें उभयतांनीं परस्परांचें जें नुकसान केलें असेल तें भरून द्यावें घ्यावें असा ठराव होऊन तो कलह संपला.

या प्रमाणें बाहेर स्वास्थ्य झालें, परंतु राज्यांत बखेडा होताच आणि पदरच्या पुष्कळ ठाकुरांचा अगदीं बेबनाव होता ; परंतु त्यांनां जेरीस आणण्याचें त्याच्या अंगीं सामर्थ्य नव्हतें ह्मणून सन १८३० मध्यें त्याणें दिल्लीच्या रेसिडेंटा जवळ मदत मागितली. रेसिडेंटाचा गैर समज होऊन त्याणें मदत देण्याचें कबूल केलें, परंतु हें सरकारास कळलें तेव्हां त्यांणीं त्याला असें सांगितलें कीं, संस्थानिकांची किंवा राजे रजवाडयांची प्रजा त्याच्याशीं बेदिल होईल किंवा दंगा करील तर त्यांच्या बंदोबस्ता करितां फौजेची मदत देणें झाल्यास ती खुद आमच्या परवानगी वांचून कधीं ही दे-

ऊं नये. चालू प्रकरणांत आम्हांस हात घालण्याचें कारण दिसत नाहीं, याजकरितां तुम्हीं कबूल केलें ह्मणून मदत देतां येत नाहीं.

अंतःस्थिति अशी होती आणि इकडे जसलमिराबराबर पुनः तंटा सुरू झाला ; तो सन १८३५ मध्यें अगदीं विकोपास गेला तेव्हां तो मिटवण्याकरितां इंग्रज सरकारानें मुद्दाम एक कामदार पाठविला. त्याच्या मेहेनतीस यश येऊन उभयतां राजांचा वैरभाव जाऊन स्नेह झाला परंतु रतनसिंगाचा मूळस्वभाव कांहीं जाईना ; जसलमीर सुटलें दुसरीकडे वळले, परंतु दुसऱ्याचा मुलुख हातांखालीं घालावयाचा हा त्याचा क्रम चालूच होता. त्यांत ही हिस्सारकडे त्याणें विशेष उपद्रव दिला. शेवटीं सरकारानें जेव्हां त्याचें चांगलें पारिपत्य केलें तेव्हां त्याणें ती खोड टाकली.

सन १८४५ मध्यें शीक लोकांबराबर पहिली लढाई सुरू झाली तेव्हां रतनसिंगानें आपलें सैन्य सरकारच्या मदतीस पाठविलें. या राजसेवे बद्दल सरकारानें त्याला नऊ नऊ पौंडांचे गोळे टडवणाऱ्या दोन तोफा साऱ्या सामानासुद्धां बक्षीस दिल्या.

रतनसिंग सन १८५२ मध्यें वारला आणि सरदारसिंग गादीवर बसला. त्याणें सन १८५७ च्या बंडांत सरकारास चांगली मदत दिली; जे साहेब लोक भयत्रस्त होऊन त्राहित्राहि ह्मणत पळत सुटले होते त्यांचें संरक्षण केलें आणि शिरसा, हांशी व हिस्सार प्रांतांतील बंडवाल्यांबराबर लढण्यास जनरल कोर्टलंड यास चांगली मदत केली. ह्या चाकरी बद्दल सरकारानें त्यास ४१ गांव इनाम दिले. हे कांहीं दिवसां पूर्वी सिरमा प्रांतांत सामील केलेले होते.

ह्या महाराजांनीं ही वडिलां प्रमाणें परमुलखाशीं हद्दीचे तंटे सुरू केले आणि जोधपूरच्या राजाशीं इतक्या निकराला गोष्ट आणली कीं सन १८६७ मध्यें इंग्रज सरकाराला त्यांत पडणें भाग आलें, तेव्हा तुह्मी आपले, तहनाम्यांतील करारांचा विचार करा असें निक्षून सांगून त्यांणीं कानउघडणी केली. याच वर्षीं दुसऱ्या एका कामांत ही सरकाराला हात घालावा लागला. महाराजांनीं बंडाच्या वेळीं चांगली मदत केली होती ह्मणून सरकारानें जे ४१ गांव त्यांना बक्षीस दिले होते त्यांतील प्रजेवर फार जुलूम होत असल्याचा गवगवा झाल्या मुळें सरकाराला तिकडे लक्ष द्यावें लागलें. मग हिस्सार प्रांताचे कमिशनरापुढें चौकशी चालली, तेव्हां असें उघड

वीस आलें कीं सदर गांवांकडे सन १८६१ तागायत १८६७ पर्यंत सारें ९०००० रुपये येणें असून राजाच्या कामदारांनीं ते रीती प्रमाणें सारे वसूल घेऊन शिवाय २००००० दोन लक्ष रुपये फाजील घेतले तें पाहून व्हाइसरायांनीं महाराजांस असा खलिता पाठविला कीं सदरहू गांवच्या प्रजेस इंग्रजसरकारांतून जे हक्क व अधिकार मिळालेले होते ते तुह्मी जसेच्या तसे चालविले पाहिजेत; ह्या महालावरील हल्लींचा कामदार दूर करून त्याच्या जागीं दुसरा न्यायानें वागणारा मनुष्य नेमावा.

या नंतर दुसरी कांहीं सांगण्या सारखी गोष्ट झालेली आढळत नाहीं.

बिकानीर खालचा बहुतेक मुलुख अगदीं वालुकामय आहे. सगळ्या राज्यांत एक नदी किंवा ओढा नाहीं, व जंगल ही नाहीं. गांव दूरदर अंतरावर असून त्यांच्या सभोंतीं जनावरांस चरण्यास चांगला चारा व जंगली झुडपें आहेत. अशा ओलाव्याच्या जागा तरी ठिकठिकाणीं नाहींत. बहुतेक भागांत पाणी म्हटलें म्हणजे पाताळांत. शहरा जवळच्या विहिरी अडीचशें हातांहून ही अधिक खोल आहेत.

राजधानी शहर किंचित उंचवट्यावर आहे, परंतु तें स्थळ अगदीं ओसाड व नापीक आहे. तेथील जमीन खडकाळ, टणक व लागवडीच्या अगदीं निरुपयोगीं आहे. शहरा सभोंता साडेतीन मैल घेराचा एकजात दगडी तट आहे. त्याला पांच वेशी व दिंडया आहेत. तटाची रुंदी सहा फूट व उंची पंधरां पासून तीस फूट पर्यंत, कोठें कमी कोठें जास्ती अशी आहे. तटाच्या आंत गेलें म्हणजे येथें लक्ष्मीचा वास बराच असावा अशीं चिन्हे दिसूं लागतात. मोठमोठया इमारती पुष्कळ आहेत त्यांच्या पुढच्या भागास दगड तांबडे असून त्यांत खोदीव काम पुष्कळ केलेलें आहे. शहराची वस्ती सुमार ३६००० आहे.

बिकानिरांत स्थलविशेषीं वारंवार दुष्काळ पडतात व निदान दहा वर्षांनीं एकदां तरी सर्व देशभर दुष्काळ आहेच. बहुतेक लोकांजवळ धान्यसंग्रह मुळींच नसतो; शेतकी करणारे सर्व लोक दारिद्र्यानें अतिशय पीडित असून त्यांनां कोणी अधिकाराचे जोरावर व कोणी तो नसतां ही मिळून हवा तो लुटतो; व हवा सर्व प्रकारें भयंकर असल्या मुळें तिन्ह पासून होणारे अनर्थ ही त्यांस सोसावे लागतात.

भाग १४

जसलमीर

जसलमीरचें राज्य इसवी सन ११५६ मध्यें जयसाल रावळ याणें स्थापिलें. तीन हजार वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत यदुकुलोत्पन्न राजे बलरूप्य स्थापून त्यांचा अम्मल चोहींकडे गाजत होता; त्या कुलाचीच भाटी ह्मणून एक शाखा होती तिचा हा जयसाल राजा होता. त्याचे पुर्वज हिंदुस्थान सोडून आपले लोक बराबर घेऊन मर्ध्द देशांत जाऊन राहिले असें ह्मणतात. त्यांणीं तेथून स्थलांतर केलें, अफगाणिस्थानावर स्वारी करून तें घेतलें आणि गिझनी येथें आपली गादी स्थापिली. तेथून कांहीं कालानें खुरासनच्या राजानें (हा बहुधा आंटिओकस धि ग्रेट असावा) त्यांनां हांकलून लाविलें तेव्हां ते पंजाबांत जाऊन तेथें वसाहत करून राहिले. त्यांणीं सलभान* शहर वसविलें. तेथून गिझनीच्या राजानें त्यांनां पिठाळलें तेव्हां ते जे पळाले ते हिंदुस्थानांतला मरुदेश उपाधिरहित मानून त्यांत येऊन राहिले. तेथें असतां प्रथम अमीरकोटच्या राजघराण्याशीं आणि नंतर झालोर घराण्याशीं त्यांचा शरीरसंबंध झाला; मग त्यांणीं मरुस्थलांत एक किल्ला बांधला त्याचें नांव तनोत ठेऊन तेथें गादी स्थापिली. (सन ७३१) तेथून सुमार शंभर सवाशें वर्षें ते सुखांत होते परंतु पुनः काळ फिरला आणि शेजारच्या लोकांनीं तनोत किल्लयावर हल्ला करून तो घेतला, आंत जितकें लोक सांपडले तितके सारे ठार मारले आणि किल्ला जमीनदोस्त करून टाकला. त्या महत्संकटांतून देवराज रावळ दैवयोगानें निभावला आणि त्याच्याच सारखे जे थोडेसे लोक जगले त्यांनां घेऊन त्याणें कांहीं काल जाऊं दिला आणि हळूच एक उत्कृष्ट युक्ति योजून पुनः दुसरा किल्ला

---

* कर्नल टॉड ह्मणतात सलभान आणि लाहोर हीं एकच असावींत, निदान तीं अगदीं जवळ जवळ तरी असावींत. ते ह्मणतात लाहोरच्या दक्षिणेस शिकंदरच्या देवळा जवळ एक संगल व एक सीहलकोट अशीं स्थळें आहेत. सलभान, सलभानपूर, किंवा नुसता सालपुरा, हा पहिल्या कांपिल नगरीवरच वसला असावा.

बांधला आणि त्याला देवरावळ असें आपलेंच नांव ठेविलें. देवराजानें आपल्या कुळाचें नष्ट झालेलें ऐश्वर्य पुनः संपादलें, लोद्रा रजपुतांचें राजधानी शहर लोदोरवा हें जिंकून घेऊन तेथें आपली गादी स्थापिली. त्याच्यापासून सहावा पुरुष जयसाल ह्याला तें शहर अगदीं उघडे, बिनबंदोबस्ताचें, सबब न आडवून त्याणें तेथून दहा मैलांवर दुसरें वसविलें. तें इसवी सन ११५६ मध्यें बांधून पुरें झालें तेव्हां त्याला जसलमीर असें नांव ठेऊन तेव्हां पासून तो तेथें राहूं लागला. ह्या शहराचें श्रेष्ठत्व अद्याप पूर्ववत कायम आहे व त्या वरून त्या साऱ्या राज्याला ही तेंच नांव पडलें आहे. जयसाल त्याचा उपभोग बारा वर्षें घेऊन नंतर वारला.

त्या नंतर त्याचा पुत्र सलभान गादीवर बसला. तो मोठा योद्धा होता, परंतु तो परदेशीं गेला असतां त्याचा पुत्र बीजिल याणें गादी बळकाविली. पण त्याला तिचा उपभोग फार दिवस घडला नाहीं. बाप बलुची लोकांबराबर लढत असतां रणांगणीं पडला आणि हा त्या मागून लौकरच घरीं मेला. त्या नंतर कैलान गादीवर बसला. हा सलभानाचा बंधु, याणें बलुची लोकांवर स्वारी करून व त्यांचा सरदार ठार मारून भाबा बद्दल सूड उगाविला. त्याणें १९ वर्षें राज्य ही चांगलें केलें.

त्याचा पुत्र चाचिकदेव सन १२१९ मध्यें पितृपद पाऊन त्याचा उपभोग ३२ वर्षें घेऊन मेला. नंतर त्याचा नातु कर्ण आला, तो २८ वर्षें गादीवर होता. हे दोन ही पुरुष शूर आणि कर्ते होते.

नंतर लाखूरसेन गादीवर बसला. हे महाराज क्षिती शहाणे होते ऐका. रात्रीं कोल्हीं ओरडतांना ऐकून त्याणीं त्यांच्या रोदनाचें कारण विचारलें तेव्हां कारभारीमंडळीनें " त्यांनां थंडी लागते ह्मणून " असें सांगितलें. तें ऐकून महाराजांनीं असा हुकूम फर्माविला कीं त्यांनां रुदार अंगरखे करून द्या. तेव्हां " आज्ञा महाराज, उद्यां करून देतों " ह्मणून त्यांणीं सांगितलें. पुनः दुसऱ्या दिवशीं कालहेकुई झालीच, तेव्हां अंगरखे करून दिल्हे कीं नाहीं ह्मणून सरकारानें विचारलें. त्यांणीं सकाळींच दिलें ह्मणून सांगितलें. त्यावर दुसरा हुकूम झाला, अंगरख्यांनीं थंडी रहात नसेल तर त्यांना आमच्या बागेंत घरें बांधून द्या. असो, या प्रमाणें या राजश्रींची कारकीर्द चार वर्षें झाली. नंतर त्यांचे चिरंजीव पंपाल गादीवर आले. ते अतिशय क्रूर निघाले, ह्मणून त्यांनां पदच्युत करून जयतसिंला राज्य द्या

वें असा पदरच्या सांज्या सरदारांनीं विचार ठरविला. जयतसी कर्ण रावळा चा वडील बंधु. खरा हक्कदारच होता, परंतु त्याला गादीवर बसवूं नये असें चाचिकदेवानें मृत्युकाळीं सांगितल्यामुळें ती मिळाली नव्हती.

जयतसीनें १८ वर्षें राज्य केलें. त्याच्या नातवानें कोठें लुट केली म्हणून दिल्लीच्या अल्लाउदीन खिलजी बादशहास राग येऊन त्याणें फौज पाठवून जसलमिराला वेढा घालविला. तो वेढा आठ वर्षें तसाच पडला होता, इतक्यांत जयतसी आंतच मेला. त्या नंतर त्याचा मुलगा मूळराज गादीवर बसला, तेव्हां शत्रूंनीं अधिक निकरानें लढाई चालविली. मूळराजानें त्यांनां जरी कित्येक वेळ हटविलें तरी वेढा कायम राहून अधिकाधिक नाकेबंदी होत गेली. शेवटीं आंतील लोकांचे अतिशय हाल होऊं लागले तेव्हां असें कोंडून घेऊन उपवास काढीत मरण्यापेक्षां हातांत तलवार घेऊन मुसलमानांस मारतां मारतां मरावें हें बरें, असा सर्वांनीं निश्चय करून आधीं जोहर केला ; त्यांत २४००० स्त्रियांस अग्निकुंडांत किंवा धारातीर्थीं पाडून परलोकास पाठवून मग ते रजपूत हातांत तलवार घेऊन जिवावर उदार होऊन निघाले. त्यांणीं मुसलमानांची कत्तल पुष्कळच उडविली, आणि आपणही पडले. त्या दारूण प्रसंगांतून मूळराजाचे दोघे पुतण्ये आणि पुत्र देवराज व थोडीशी फौज मात्र कायती जिवंत निघाली. देवराज पुढें थोडक्याच दिवसांत ज्वरानें मेला. (सन १२९५)

या प्रमाणें रजपुतांनीं प्राणत्याग करून सारें जसलमीर ओसाड पाडलें तेव्हां तें मुसलमानांच्या हातीं सहजच लागलें. मग ते दोन वर्षें तेथें राहून कंटाळून निघून गेले. त्या नंतर कांहीं वर्षांनीं मेहू येथील राहाटोरांनीं तें उद्ध्वस्त पाहून आतां भाटी येथें येणार नाहींत असें समजून तेथें ठाणें दिलें. भाट्यांचा जरी संहार उडाला होता तरी जे थोडे शिल्लक उरले होते ते जेसुराचा मुलगा दुदू यास आपला रावळ म्हणून गादीवर बसवून त्याच्या आज्ञेंत वागत होते. त्या दुदूनें ह्या राहाटोरांवर हल्ला करून त्यांना तेथून हांकून लाविलें आणि आपण तेथें वास्तव्य केलें. परंतु पुढें त्याणें थोडासा अविचार केला त्या मुळें पुनः दुर्धर प्रसंग आला. एक दिवस दिल्लीच्या बादशहाचे घोडे एका तळ्यावर पाणी पाजावयास आणलेले पाहून त्याणें ते जबरीनें नेले. तेव्हां बादशहास क्रोध येऊन त्याणें फौज रवाना केली. या वेळीं ही जसलमिरांत अगदीं यथापूर्व मोठा अनर्थ होऊन

न शेवटीं तें ओसाड पडलें (सन १३०६) पहिल्या प्रसंगांतून मूळरा-
जाचे दोघे पुतण्ये जगले होते, ते दिल्लीस गेले होते ; त्यांणीं बादशहाची
चाकरी चांगली बजाऊन कृपा संपादिली तेव्हां बादशहानें उभयतां पैकीं
वडील गरसी याला त्याचें पित्रार्जित राज्य बक्षीस देऊन पुनः जसलमीर
वसवण्यास परवानगी दिली. मग त्याणें आपल्या भाटी लोकांस बराबर घे
ऊन तेथें जाऊन आपला मित्र मेहूचा जगमल्ल याच्या पदरच्या लोकांच्या
साहाय्यानें सारी व्यवस्था नीट लाऊन शहर बसविलें व फौज ही जमवि-
ली. परंतु त्याला अकालीं मृत्यु आला. दुदूच्या आप्तांच्या पक्षांतील लोकां-
नीं त्याचा खून केला. नंतर त्याचा बंधु केहूर गादीवर बसला. परंतु त्या-
च्या संमतीनें गरसीच्या स्त्रीनें हमीराच्या वंशाकडे गादी चालवावी असें ठ-
रविलें. हा हमीर मूळराजाचा नातू, त्याचा चुलत बंधु होय.

पुढें कैलम, चाचिकदेव, बरसी, जैत, नूनकर्ण, भीम, व मनोहरदा
स, हे रावळपद पावले. त्यांच्या कारकीर्दीत राज्याची पुनः वसाहत होऊन
हद्द ही वाढली. भीम वारल्या नंतर त्याचा पुत्र आपला पुतण्या, गादीचा
मालक, याचा खून करून मनोहर दासानें राज्य संपादिलें होतें. तो मेल्या
नंतर सबळसिंग गादीवर बसला. हा नूनकर्णा पासून चौथा पुरुष होता.
तो गादीवर बसला तेव्हां राज्याचा विस्तार पुष्कळ होऊन उत्तरेस गान्हा
नदी, पश्चिमेस सिंधुनदी, पूर्वेस बिकानीर व दक्षिणेस मारवाड ह्या सीमा
झाल्या होत्या. सबलसिंगानें त्या पैकी पोकर्ण शहर व प्रांत मारवाडच्या रा
जाच्या पदरच्या एका सरदारास* दिला, तो तेव्हांपासून जसलमीरच्या अ-
मलांतून गेला.

सबळसिंगानंतर त्याचा पुत्र अमरसिंग गादीवर बसला. त्याणें आ
पल्या मुलखांतून दरवडेखोर नाहींसे केले. बिकानीचा राजा त्याच्यावर स्वा-
री करणार होता, तें वर्तमान त्याला समजून त्याणें चांगली तयारी केली आ
णि त्याचा बेत निष्फळ केला. अमरसिंग सन १७०२ मध्यें वारला आणि
जसवंतसिंग गादीवर बसला. हा रावळ दुर्दैवी निघाला. पूगल, बारमैल व
फिलोदी हे प्रांत आणि कित्येक शहरें व इतर कांहीं मुलुख याच्या पासून

---

* कारण त्यास मारवाडच्या राजानें सबळसिंगाला गादीवर बसवि-
ण्याबद्दल पाठविलें होतें.

राहाटोरांनीं हिसकांऊन घेतला व गाम्हा नदीच्या कांठचा मुलुख झिकारपूरच्या दाऊदखान अमीरानें बळकाविला. जसवंतसिंग मेल्यानंतर त्याचा भाऊ आणि मुलगे गादीसाठीं भांडू लागले. शेवटीं वडील मुलगा अखीसिंग याला राज्य मिळालें आणि त्याणें तें ४० वर्षें अनुभविलें. त्याच्या पासून देवरावळ आणि सारा खादाल प्रांत इतका मुलुख दाऊद खानाच्या मुलानें घेतला. भावलपूर याणेंच स्थापिलें.

अखीसिंगानंतर सन १७६२ मध्यें मूळराज गादीवर बसला- याणें एका फार वाईट मनुष्याची दिवाणगिरीवर योजना केली, त्यामुळें भाटी लोकांच्या ह्या राज्याचा सर्वस्वीं नाश झाला. ह्या दिवाण साहेबांचें नांव सरूपसिंग असें होतें. त्याचें सारें लक्ष्य आपल्या दुष्ट विषयवासना हरतऱ्हेनें पुरविण्याकडे असे. त्यामुळें राजाच्या पदरचे सरदार, मानकरी, वगैरे बडेलोक, व खुद्द रानपुत्र रायासिंग, यांस त्याचा अतिशय त्रास येऊन त्याचा परिणाम असा झाला कीं रायासिंगानें बापासमोर त्याला तलवारीनें तोडलें. मग तर राज्यभरअगदीं झोटिंग बादशाही झाली. सरदार, ठाकूर, वगैरे सर्वांच्या मनांतून मूळ राजाला गादीवरून काढून रायसिंगाला बसवावें असें होतें, परंतु तो बसण्यास मान्य होईना. शेवटीं तो व त्याच्या पक्षाचे होते ते लोक देश त्याग करून निघून गेले. मूळराजावर अशीं संकटें आलीं तरी तो घाबरला नाहीं. थोडे दिवस दम धरून त्याणें आपल्या त्या प्रिय दिवाणजीचे चिरंजीव थोडे काम करण्या सारखे मोठे होतांच त्यांनां अधिकाराचीं वस्त्रें दिलीं. त्यांचें नांव सालीमसिंग. त्याणें तर बापसे बेटा सवाई ही म्हण सर्वार्थीं खरी करून दाखविली. तो दुर्गुणांचा केवळ पुतळाच होता. एका इतिहासकारानें त्याचें वर्णन असें केलें आहे—सालीमसिंग व्याघ्रासारखा क्रूर असून सर्पासारखा कावेबाज होता. त्याची मुद्रा बायकी आणि भाषण सौम्य असे; चालचालणूक नम्रतेची व सभ्यतेची असे. तो हवें तें वचन देई आणि त्या प्रमाणें करण्याचें त्याच्या अंतर्यामीं यत्किंचित ही नसे तरी भाषणांत असें दाखवी कीं तें ऐकणारास हा आपली वाणी सत्य केल्या वांचून रहाणार नाहीं असें वाटल्या शिवाय राहूंच नये. त्याची परमार्थ भक्ति ही मोटमोट्या धार्मिकांनीं नावांजण्या सारखी होती. मनुष्य किती ही धर्मनिष्ठ असला आणि तोंडानें किती ही आणा क्रिया करीत असला तरी त्याचें वर्तन ह्मणजे तदनुसारच असेल असें समजूं नये. तें किती विपरीत असेल या

विषयींचें या दिवाणजीचें उदाहरण ध्यानांत ठेवण्या सारखेंच आहे.

एकदां असें झालें कीं सालीमसिंग कांहीं कामाकरितां जोधपुरास गेला होता, तो परत येत असतां राजसिंगाबराबर जे ठाकूर हद्दपार झाले होते त्यांतील कांहीं असामींनीं जमून त्याला मार्गांत गांठलें. त्या संकटसमयीं जीवदान देण्या विषयीं त्याणें फारच काकळुतीस येऊन पदर पसरला. तेव्हां त्यांतील एकास दया येऊन त्याणें बाकीच्यांस ही समजूत घालून दूर केलें, आणि त्याच्या एका केंसाला धका न लागूं देतां त्याला घरीं जाऊं दिलें. हे उपकार त्या अधमानें कसे फेडले पहा—त्याणें त्या आपल्या प्राणदात्यालाच आधीं विषप्रयोग करून ठार मारविलें. मग ही गोष्ट आपल्या सरख्या भावाला व बायकोला कळली असें दिसतांच त्यांच्या विषयीं साशंकित होऊन त्या उभयतांस त्याच्या भेटीला पाठविलें. नंतर राजपुत्र रायसिंग आपल्या कुटुंबासहज्या किल्ल्यांत रहात असे त्यांत संधान करून उभयतां स्त्रीपुरुषें एकत्र आहेत आणि आतां त्यांनां येथून सुटून जातां येणारच नाहीं असा समय पाहून त्याणें गृहाला आग लाविली आणि त्यांस जाळून ठार मारिलें. नंतर त्यांच्या बाळांनां तेथून काढून रामगड ह्मणून अरण्यांत एका कोंपऱ्याला एकीकडेसा एक किल्ला आहे त्यांत कैद करून ठेऊन विषप्रयोग केला. मग मूळराजाच्या तिसऱ्या मुलाचा तिसरा मुलगा गजसिंग ह्मणून होता, त्याला त्याणें युवराज करण्याचें ठरविलें. तेव्हां बाकीचे मुलगे व नातू मुठींत प्राण घेऊन पळाले. परंतु दिवाणजींच्या अवतारचरित्राची समाप्ति येवढ्यानें झाली नाहीं. राजकुलाचा बंदोबस्त झाल्या नंतर जे कोणी दरबारी पुरुष आपल्या पेक्षां हुशार, अधिक बुद्धिमान, व यां पासून आपल्याला कांहीं अपाय होईल असें त्याला वाटत होतें, त्यांवर त्याची कृपादृष्टि फिरली आणि अशा सर्वांनां त्यालें परलोक दाखविला. या राक्षसाच्या घोर कृत्यांनीं जसलमीर शहर उजाड होऊन गेलें आणि देशांतील व्यापारधंद्याला फार मंदी आली.

जसलमीर प्रथम इंग्लिशांच्या आश्रयाखालीं मूळराज रावळाच्या कारकीर्दीत आलें. हा आश्रय मूळराजानें सन १८०८ मध्येंच आनंदानें जोडला असता, परंतु तेव्हां त्यांचे राजकीय विचार कांहीं निराळे होते ; यमुनेचें पूर्वतीरच आपली सरहद्द करावयाची, त्याच्या पलीकडे जावयाचें नाहीं, असें ह्मणणारे तेव्हांचे कामदार मिलेभी असल्यामुळें त्याला आश्रय

मिळाला नाहीं. परंतु पुढें सन १८१८ मध्यें तें मान फिरलें तेव्हां त्यां णीं होऊनच तह करण्याचें मनांत आणलें. मग तहनामा होऊन असा ठ राव झाला कीं जसलमीरचें राज्य मूळराजाच्या वंशाकडे चालावें, त्यावर ज- र परचक्र येईल किंवा अन्य कांहीं भय प्राप्त होईल, तर इंग्लिशांनीं त्याचें निवारण करावें, परंतु तंट्याला मूळ कारण मात्र रावळाकडून झालेलें न- सावें. त्याणें इंग्लिशांचें स्वामित्व मान्य करावें परंतु त्यांणीं त्याज पासून क- रभार घेऊं नये.

या नंतर दोन वर्षांनीं मूळराज वारला आणि त्याचा नातू गजसिंग गादीवर बसला. हा अल्पवयस्क असून तशांत आजपर्यंत नजरबंदींत रा- हिलेला व आपल्या कुलाची अशी वाट लागली ती ही त्याणें पाहिलेली असल्या मुळें तो सालीमसिंग दिवाणजींस पाहिजे होतें तसलें कळसूत्री बा- हुलेंच होऊन राहण्या योग्य होता. त्याला गादी मिळाली परंतु कपाळची कैद सुटली नाहीं ; ती विशेष कडकच झाली झटलें तरी चालेल. त्याच्या जवळ अगदीं बेताचीं माणसें ठेऊन त्यांच्या शिवाय दुसऱ्या कोणाचें त्याला दर्शन होऊं नये, व तो काय बोलतो, मुद्रा चर्या कशी होणे, याची ताब- डतोब आपल्यास अक्षरशः वर्दीपोंचावी असा दिवाणजीनीं अष्टौप्रहर बं- दोबस्त ठेविला.

या प्रमाणें गजासिंगाचे नांवानें राज्य चालूं लागल्यावर चार वर्षें सा- लीमसिंग जिवंत होता तों पर्यंत त्याचें क्रौर्य, जुलुम, जबरी आणि राज्याची अव्यवस्था, हीं सर्व यथापूर्व चाललीं होतीं. पूर्वभागीं बिकानीरचे व ज- सलमीरचे हद्दीसंबंधानें तंटे चालले होते तें सांगितलेंच आहे. दिवाणजी अ सल्या स्वभावाचे असल्यामुळें एका बिकानिराशीं भांडून राहिले नाहींत; त्यां णीं आपल्या यजमानाचें नांव पुढें करून आणखी कित्येक राजांच्या मुलखां वर ही हक्क सांगितला, आणि तो मान्य होईना तेव्हां भांडण्याकरितां कल- कत्यास जातों म्हटलें. तेव्हां सरकारानें रावळाला असें स्पष्ट लिहून कळ- विलें कीं आम्ही इतर राजेरजवाड्यांशीं जे तह केले आहेत ते ही आम्हाला पाळले पाहिजेत; याजकरितां त्यांच्या ताब्यांतील मुलखावर तुम्ही हक्क सांगूं लागाल तर तो आम्ही कधीं ही मान्य करणार नाहीं. सन १८२४ मध्यें ह्या सालीमसिंगाचा खून करण्याची खटपट झाली, परंतु ती साधली ना- हीं, तेव्हां ह्या कृत्यास रावळाचीच प्रेरणा होती असें कोणी त्याच्या मनांत

भरून दिलें; तें खरें वाटून त्याणें आपलीं मुलें माणसें तेंथून काढून आपल्या जाहागिरीवर पाठवून दिलीं. या पुढें तो फार दिवस जगला नाहीं; परंतु आतां ही दिवाणगिरी माझ्या वंशांतून बाहेर जाणार नाहीं अशी मी पक्की करून घेतली आहे अशी खात्री मानून त्या आनंदांत त्याच वर्षी मेला.

सालीमसिंग जरी इतका दुष्ट होता आणि लोकांनां त्याच्या त्रासातून केव्हां सुटूं असें झालेलें होतें तरी त्याच्या पक्षास ही पुष्कळ लोक अनुकूल होते. त्या मुळें तो मरतांच त्याच्या वडील मुलालाच दिवाणगिरी मिळाली आणि त्याच्या आवडत्या दुसऱ्या एका बायकोचा मुलगा होता तो त्याचा जोडीदार झाला. उभयतांनीं मिळून काम करावें असें ठरलें. त्या वडील भावानें आपल्या त्या सापत्न मातेचा एका खासगींतील नोकराशीं गुप्त संबंध असलेला दृष्टीस पडल्यानें क्रोधाविष्ठ होऊन —किंवा असा वरकांती आविर्भाव आणून——त्या उभयतांस ठार मारलें. या वेळीं गजसिंग रावळ वयांत आला होता. त्याणें त्या गुन्ह्या बद्दल त्याला कैद करविलें. तेव्हां त्याच्या पक्षाचे लोक जमून त्याला सोडविण्याची खटपट करूं लागले. परंतु रावळ गडबडला नाहीं. त्यांणीं इंग्रज सरकाराकडे जाऊन आपण दिवाणजीस सोडण्यास सांगावें अशी विनंती केली परंतु ती निष्फळ झाली. रावळ आपल्या राज्यांत मुक्तयार आहे, त्याच्या अधिकारांत आम्ही हात घालीत नाहीं असें सरकारानें उत्तर दिलें. मग तो दंगा आपोआप मोडला.

ह्या वेळापासून गजसिंगानें सर्व कारभार आपल्या हातीं घेतला आणि तो प्रजेला न्यायानें व ममतेनें वागवूं लागला, त्या मुळें त्यांना प्रिय ही झाला. बिकानीरचें व जसलमचें जें अगदीं वैमनस्य होतें तें नाहींसें होऊन सख्य झालें. तो इंग्रज सरकाराशीं नेहमी स्नेहभावानेंच वागत असे, सन १८३९। ४० मध्यें सिंधुनदावरील सैन्या करितां त्याणें उंटांचा पुरवटा अगदीं पाहिजे तसा केला. त्या कामीं त्याणें विशेष मेहेनत केली म्हणून सरकारानें त्याचे उपकार मानले.

सिंध प्रांत काबीज केल्यानंतर सन १८४४ मध्यें मीरअल्ली मुराद यास हुकूम करून शहागड, गरासिया, व गतुरा हे तीन किल्ले सरकारानें गजासिंगाचे स्वाधीन करविले, ते पहिले जसलमीरचेच होते, परंतु कांहीं काळ मागें अमीरानें बळकाविले होते, ते या समयीं परत मिळाले परंतु

त्यां बद्दल सनद मिळाल्याचें दिसत नाहीं.

पुढें दोन वर्षांनीं म्हणजे सन १८४६ मध्यें गजासिंग अपुत्रिक मरण पावला. तेव्हां त्याच्या पत्नीनें रणजितासिंगास दत्तक घेतलें, तो सन १८६४ पर्यंत राजलक्ष्मीचा उपभोग घेऊन अप्रजच वारला.

नंतर रणजितसिंगाच्या स्त्रीनें त्याच्या भावासच दत्तक घेतलें. त्याचें नांव बहिरीसाल. हा तेव्हां पंधरा वर्षांचा होता, परंतु गादीवर बसेना. या राज्यभारापासून मला कधीं सुख होणार नाहीं, याजकरितां हें मला नको असें तो म्हणूं लागला. परंतु हा अद्याप अल्पवयस्क, बाल आहे, असें मनांत आणून इंग्रज सरकारानें त्याच्या भाषणाकडे लक्षच दिलें नाहीं आणि राज्याभिषेक समारंभ करावयाचा तो तेव्हां केला नाहीं, लांबणीवर टाकला. बहिरीसालाचा बाप केसरीसिंग हा राज्याचा सर्व कारभार करूं लागला.

राज्यापासून आपल्याला सुख होणार नाहीं, असें जें बहिरीसालाच्या मनांत वेड शिरलें होतें तें पुढें लौकरच म्हणजे सन १८६५ च्या आक्टोबर महिन्यांत गेलें. तेव्हां गव्हरनर जनरलाचे एजंटानें त्यास महाराचळ म्हणून गादीवर बसविण्याचा समारंभ केला. तेथपर्यंत त्याच्या जनकापित्यानें जो कारभार केला तो लोकांनां आवडला म्हणून पुढें ही काम त्याजकडेसच राहिलें.

या राज्याचा बहुतेक भाग अगदीं ओसाड आहे. जिकडे पहावें तिकडे रेतीच्या डोंगरांच्या मोठमोठचा उंचउंच गेलेल्या रांगाच रांगा ; त्यांवर थोडथोडें जाडें भिकार गवत किंवा बाभळीचीं खुरटीं झुडपें मात्र होतात. उत्तरे कडून दक्षिणेकडे वळलें म्हणजे रेतीबदला दगडी टेंकाड्या लगतात आणि त्यांच्या पुढें उतरत उतरत खडकाळ माळ लागतात.

या मुलखांत पाणी म्हटलें म्हणजे दोनशें तीनशें हात खोलीवर लागतें आणि तें बहुधा मचुळच असतें. बिकानीर प्रमाणें याही राज्यांत वहात्या पाण्याचें नांव घ्यावयास नको. पर्जन्यकाळीं मका पिकतो, तें कायतें निर्वाहाचें मुख्य धान्य.

भाग १५

शिरोही

ह्या संस्थानाच्या उत्तरेस जोधपूर, ईशान्येस गोदावर प्रांत, पूर्वेस मेवाड व दक्षिणेस गायकवाडी मुलूख आहे. याच्या व मेवाडच्या दरम्यान आरवली पर्वताची सरहद्द आहे.

येथील राजे चवाण रजपूत आहेत. यांचा मूळपुरुष यव सिसमल्ल हा अकराव्या शतकांत दिल्लीहून येऊन येथें ठाणें देऊन राहिला. विद्यमान राव हा त्याज पासून बाविसावा पुरुष आहे.

राव सुरतनसिंग याच्या कारकीर्दीत गुजराथचा सुभेदार अल्लाउदीन गोरी याणें स्वारी करून शिरोहीच्या ताब्यांतील पूज्यस्थान जो आबूचा पहाड त्यावरील देवालयें भ्रष्ट केलीं. परंतु मोगल, राहाटोर, किंवा मराठे, यांतून कोणास ही करभार न देतां आपलें स्वातंत्र्य राखून राहिलें असें साऱ्या राजपुतान्यांत येवढें एकच राज्य. येथील चव्हाण रजपूत राव व त्याच्या पदरचे ठाकूर हे आपल्या कुलाची प्रतिष्ठा राखणारे राज्यकर्ते होते, तसे भिल्ल, मीन व ग्रासिया वगैरे त्या देशांत रहाणारे जे मूळचे लोक होते ते ही स्वेच्छाचारी होते. ह्या वर्तनास ते आपलें स्वातंत्र्य म्हणत व तें राखण्या विषयीं फार जपत राव वैरीसालाच्या कारकीर्दीत जोधपूरचा राजा महाराज मानसिंग त्यांच्यावर वारंवार स्वाऱ्या करीत होता, परंतु त्याच्या हातून त्यांना जिंकणें झालें नाहीं. ते आरंभीं जसे रानटी, अडाणी आणि स्वतंत्र होते तसेच शेवटपर्यंत राहिले.

परंतु ही त्यांची स्थिति जों पर्यंत आपसांत कलह नव्हता तों पर्यंत टिकली, आणि शेवटीं जेव्हां तो प्रसंग आला तेव्हां त्यांच्या ऱ्हासाला आरंभ झाला. चालू शतकारंभीं त्यांचा धनी राव उदयभानजी त्यांना पूर्वी प्रमाणें नीट वर्तविण्याचें सोडून जुलूम जबरी करूं लागला. हा त्रास ते डोंगरी, जंगली ठाकूर सोसतात! त्यांतील कित्येक तेव्हांच त्या मुलखांतून निघून दुसऱ्या चांगल्या राजांच्या पदरीं जाऊन राहिले. पण बाकीचे जे तेथेंच राहिले त्यांनीं ही आपल्या स्वतंत्रपणाग योग्य असेंच वर्तन केलें. या

चा राजा जेव्हां अन्याय आणि जुलूम करूं लागला तेव्हां त्यांणीं त्याला पदच्युत करून कैदेंत टाकलें आणि त्याचा भाऊ शिवसिंग यास प्रतिनिधित्वानें राज्य करावयास सांगितलें. तेव्हा उदयभानजीनें कैदेंतूनच जोधपूरास राजा मानसिंग याजकडे आपली मुक्तता करून गादीवर बसविण्याविषयीं मोठ्या नम्रतेनें आणि आर्जवानें निरोप पाठविले. हें मानसिंगाला जसें पाहिजे होतें तसें झालें ; मग त्याचा आनंद काय विचारावा! शिरोहीचा राव आमचा ताबेदार असें त्याचे आजेपणजे ह्मणत आले होते तसें तो ही ह्मणत असे, परंतु रावांवर त्यांचा अम्मल कधींच चालला नाहीं; आजपर्यंत सारा तोंडचा व्यापार होता. परंतु आतां गादीचा जो खरा मालक त्याजकडूनच जेव्हां असें बोलणें आलें, तेव्हां आपण एकदां त्याला गादीवर बसविलें म्हणजे आपलें कार्य झालेंच, आणि आपल्या हातून येवढें सहज होईल असा अत्यानंद मानून मानसिंगानें फौज तयार केली, आणि शिरोहीवर स्वारी केली. परंतु स्वातंत्र्यासाठीं प्राण देणाऱ्या त्या डोंगरी बलाढ्य लोकांपुढें त्याचें कांहीं चालेना; सारें सैन्य पराजित होऊन त्याला अपकीर्ति करून घेऊन परत यावें लागलें. उदयभानजी आतां मी मुक्त होऊन पुनः गादीवर बसेंन ह्मणून जो वाट पहात होता, त्याचा कारागृहवास दृढ होऊन त्याचा शेवट ही त्यांतच झाला.

या प्रमाणें चव्हाणांनीं पराक्रम करून आपलें स्वातंत्र्य, नांव, लौकिक, आणि राज्य कायम राखलें, परंतु हें जें त्याजवर अरिष्ट आलें होतें तें कांहीं सामान्य नव्हतें. ह्मणून शिरोहीच्या शेजारचे उदेपूर, जोधपूर, बडोदेंवाले, वगैरे राजांनीं इंग्रज सरकारचा आश्रय केल्यानें त्यांनां जें सुख होऊं लागलें होतें त्याचें महत्व रावाच्या मनांत चांगलें भरलें. लहान लहान संस्थानांचें तर इंग्रजांचें आश्रयानें केवढें हित होऊं लागलें होतें तें राजपुतान्यांत जागोजाग चांगलेंच दृष्टिगोचर होत होतें. अमीरखान पठाणाचा दंगा बंद, पेंढाऱ्यांची धामधूम नाहीं, जो या छायेला वसला तो किती ही लहान जाहागीरदार असो, त्याच्या मनाला आतां माझें कसें होईल, मला कोणी बलाढ्य शेजारी त्रास देईल कीं काय, ही काळजी तिळमात्र उरली नाहीं; सर्व सुखी झाले. अमीरखान पठाण ह्मणजे मोठा लुटारू, बेमानपणाची आणि कपटाची केवळ रास, परंतु लो तर इतरांनीं कित्ता घेण्यासारखा चांगला राजा होऊन धर्मनिष्ठ आणि ईश्वरभजनांत काळ घालविणारा झाला.

शिवसिंगानें हा सर्व प्रकार पाहून आपलें येवढेंसें राज्य, तर तें निर्भय असावें हें बरें, असें मनांत आणून इतरां प्रमाणें आम्हांवर ही कृपाकरून आम्हांस निर्भय करावें असें इंग्रजसरकाराकडे बोलणें लाविलें. तें मान्य होऊन सन १८२३ मध्यें सप्टंबरच्या ११ व्या तारखेस तहनामा झाला. त्यांत असें ठरलें कीं रावानें इंग्रजांचें वर्चस्व मान्य करावें; इतर कोणत्याही राजे रजवाड्यांशीं राजकीय संबंधानें पत्रव्यवहार करूं नये; पोलिटिकल एजंट सल्हा देतील त्या प्रमाणें राज्य करावें; राज्यव्यवस्थेंत चांगली सुधारणा करावी आणि एकंदर वसुलापैकीं सहा आणे खंडणी बद्दल द्यावे; त्यावर मात्र देऊं नये. इंग्रजसरकारानें राज्याचें संरक्षण करावें. शिवसिंगामागें उदयभानजींच्या वंशांतील कोणी असेल तर त्याजकडे गादी चालवावी; आणि राज्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या मालावरील जकातीची हवीतशी व्यवस्था करावी. या प्रमाणें करार होऊन पुढें सन १८४७ मध्यें उदयभानजी अप्रजच मेला तेव्हां शिवसिंग गादीचा मालक आणि त्याचा पुत्र युवराज झाला.

इंग्रजसरकारावराबर तह झाल्यानें परचक्राचें भय उरलें नाहीं खरें, परंतु ह्या सुमारास अंतःस्थिति अगदीं विघडून गेली होती, त्या मुळें राज्य कारभाराचें काम मोठें नाजूक आणि फार विचाराचें झालें होतें. मानसिंग चालून आला होता त्यांचा पराजय केल्यानें संस्थानाची कीर्ति झाली हें खरें, परंतु त्या कामांत रावाचा व कांहीं ठाकुरांचा बेबनाव आला. ते त्याच्याशीं इतके बेदिल झाले कीं कांहींनीं तर अगदीं स्वेछेप्रमाणें वागण्यास सुरवात केली. हा त्यांचा बंडावा मोडण्यास रावाला फौज तयार करावी लागली आणि तिच्या खर्चा साठीं इंग्रज सरकाराजवळ कर्ज मागावें लागलें. सरकारानें दीड लाख रुपये कर्ज दिलें, आणि मीन लोकांवर आपली फौज ही पाठविली, कारण जो सर्वांत शिरजोर ठाकूर होता त्याला या जंगली लोकांचेंच सहाय विशेष होतें. पुढें इंग्रज सरकारचेच मध्यस्थीनें मुलखांत शांतता होऊन असें ठरलें कीं उदयभानजी पदच्युत झाल्यावर ज्या ठाकुरांनीं बंड केलें असेल त्यांणीं मुकाट्यानें पहिल्या प्रमाणें ताबेदारींत वागावें.

सन १८५४ मध्यें रावानें फारच विनवणी केल्यावरून इंग्रज सरकारानें सर्व कारभार आपल्या हातीं घेतला. त्या वेळीं दोन लाख रुपये कर्ज होतें. राज्याची एकंदर जमाबंदी सारी ८०००० रुपये असून या

पैकीं फक्त खंडणी बद्दल ३०००० रुपये द्यावे लागत. तेव्हां येवढें ओझें सोसणें कठीण खरें, अशी खातरी झाल्यावरून सरकारानें त्या पैकीं निम्मे रक्कम माफ केली. सन १८५७ मध्यें कारभार इंग्रज सरकार मार्फतच चालला होता, तरी त्या प्रसंगीं राव अगदीं स्नेहानें वागला हें पाहून सरकार खुष झालें आणि वार्षिक खंडणीची रक्कम पुनः आधीं माफ होऊन ७९०० रुपये बाकी राहिली.

आतां आपला वृद्धापकाळ आला असें पाहून शिवासिंगानें सन १८६१ मध्यें सर्व राज्यभार आपला पुत्र उमेदासिंग याजवर सोंपविला ; राजचिन्हें मात्र आपल्याकडे ठेविलीं. पुढें थोड्याच दिवसांत त्याच वर्षी त्याचा काळ ही झाला. नंतर उमेदासिंग आपल्या नांवानेंच सर्व काम करूं लागला परंतु वर नजर ठैवण्यास पोलिटिकल एजंट होताच ; तो सन १८६५ मध्यें सारें कर्ज फिटलें तेव्हां निघाला.

उमेदासिंगाला तीन भाऊ होते, त्यांनां बापानें ठरवून दिलेल्या नेमणुका थोड्या वाटत सबब त्या त्रिवर्गांनीं हा गादीचा मालक झाल्यावर थोडयाच काळानें बंड केलें. परंतु त्यांचा बंदोबस्त आणि समजूत ही झाली. तेव्हां पासून राज्यांतील शांततेला विघ्न आलें नाहीं. आपल्या राज्यांतील गुन्हेगार इतर राजांनीं मागूं नये, आपण त्यांची चौकशी करूं असें रावाचें म्हणणें असून त्या प्रकरणीं बरेंच काम चालून शेवटीं गुन्हेगार जिकडचे तिकडे दिले पाहिजेत असें सरकारानें ठरविलें.

या राज्यांत चोहींकडे उद्ध्वस्तता झालेली दिसते; तीच प्राचीन इतिहासांतील अनेक शोक कारक गोष्टींची द्योतक आहे. पहावें तिकडे प्राचीन शहरें, गांव, तलाव, विहिरी व देवालयें अगदीं जमीनदोस्त होऊन गेलेलीं आहेत. तीं पाहिलीं असतां पूर्वी येथें राजलक्ष्मीचा वास किती तरी असेल असें वाटतें.

अबूचा पहाड नामक जो ४५०० फूट उंच पर्वत आहे तो याच राज्यांत आहे. तेथील हवा उत्तम म्हणून तेथें फौजेकरितां आरोग्यरक्षास्थळ स्थापण्याचें मनांत आणून सरकारानें तो रावा जवळ मागितला. तेव्हां त्याची म्हणून जेवढी हद्द आहे तींत हिंसा करूं नये, गुरूं, पांखरूं, कांहीं मारूं नये, असा करार करून घेऊन सन १८४५ मध्यें तो रावानें सरकारच्या स्वाधीन केला. गव्हरनर जनरलांचे राजपुतान्यांतील एंजट प्र-

तिवर्षी कांहीं महिनें तेथें जाऊन रहातात. वरील प्रमाणें करार झाला असतां येथें गोवध करण्यास मोकळिक मिळावी ह्मणून सरकारानें पुष्कळ वेळ खटपट केली, परंतु रावांनीं अजून पर्यंत तर हुकार दिला नाहीं. हें जैनलोकांचें परमपवित्र पूज्यस्थान आहे. सारा डोंगर असंख्य देवालयांनीं अगदीं भरून गेलेला आहे.

भाग १६

डोंगरपूर

ह्या छोट्या संस्थानाच्या उत्तरेस व पूर्वेस उदेपूरच्या राण्याचा मुलुख आग्नेयीस बांसवाडा आणि दक्षिणेस व नैर्ऋत्येस महीकांठा प्रांत आहे. येथील राजास रावळ ह्मणतात. हे उदेपूरच्या राजकुलापैकीं वडील घराण्याचे वंशज आहेत. चितूरचा राणा करमसी ह्मणून होता त्याणें अंतकाळीं आपला ज्येष्ठ पुत्र महसजी यास आज्ञा केल्या प्रमाणें त्याणें गादीवरील आपला सर्व हक्क आपला कनिष्ठ बंधु रहसजी यास दिला आणि आपण देशांतर केलें. ही गोष्ट बाराव्या शतकाच्या शेवटीं झाली. डोंगरपूरचे महारावळ हे त्याचे वंशज होत.

महसजी पासून नववा पुरुष सेबरदी हा आपल्यास दिल्लीपतीचा सेवक ह्मणवी, परंतु स्वतंत्र असल्या सारखाच वागे. त्याणें बादशहाचा हुकूम घेऊन सन १२४८ मध्यें बडोद्यांस [डोंगरपूरपैकीं] गादी स्थापिली. त्याचा नातू वीरसिंग याणें ती तेथून काढून डोंगरपुरास आणली. ह्या वीरसिंगापासून नववा पुरुष उदयसिंग नामक झाला. तो रणांगणीं जखमा लागून अगदीं घायाळ होऊन पडला असतां आपला ज्येष्ठ पुत्र पृथुराज यास मही नदीच्या पश्चिमे कडील व कनिष्ठ पुत्र जगमल्ल यास महीच्या पूर्वेकडील, असे राज्याचे विभाग करून देऊन प्राण सोडिता झाला. या प्रमाणें डोंगरपूर व बांसवाडा अशीं एकाचीं दोन राज्यें झालीं.

अकबराच्या वेळेपासून हें संस्थान मोगलांच्या अमलाखालीं होतें, परंतु औरंगजेब मरून मोगलबादशाहीची जी वाताहत झाली तींत याजवर

मराठ्यांची स्वारी होऊन अगदीं दुर्दशा उडाली. बरेच दिवस हें तशा विपन्नावस्थेंत होतें, परंतु सन १८१८ मध्यें इंग्रज सरकारानें याची मुक्तता करून संरक्षण करण्याचें मान्य केलें. ह्या आश्रयाबद्दल पूर्वी धारच्या पोंवारास जी ३५००० रुपये वार्षिक खंडणी द्यावी लागत असे, तीच रावळानें इंग्रज सरकारास देण्याचें कबूल केलें,

पुढें आणखी कांहीं ठराव होऊन रावळानें मागील बाकीबद्दल वगैरे मिळून ३५००० रुपये दिले आणि त्या मानानें खंडणीची रक्कम कमी व्हावी असें ठरलें. तसें होत होत शेवटीं तीन वर्षांनीं २७३८७ सुतीं रुपये कायम ठरले. हाल्लीं खंडणी येवढीच आहे.

सन १८१९ मध्यें संस्थानचे जमाबंदी संबंधीं वगैरे कांहीं मागील कागदपत्र पाहतांना आलीकडेच वसूल फार कमी झाला असें दिसून आलें. राज्यांत चांगली व्यवस्था झाली, तेव्हां आतां पूर्ववत वसूल वाढेल असें फार वाटत होतें, परंतु तसें कांहीं झालें नाहीं.

सन १८२४ मध्यें रावळाचा व त्याच्या पदरच्या ठांकुरांचा बेबनाव होऊन आपल्या हक्कांचें संरक्षण करण्या करितां ते लढण्यास उभे राहिले. त्यांणीं आपल्या मदतीला भिल्ल आणले, तेव्हां रावळाला इंग्रज सरकारची मदत मागणें भाग पडलें. सरकारानें फौज पाठविण्याचें कबूल केलें. परंतु हें वर्तमान त्या ठाकुरांस कळतांच तेवढ्यानेंच काम झालें. ते ठाकूर आश्रितधर्मानें वागूं लागले आणि सैन्य ही परत गेलें.

वर जो ठाकुरांचा आणि रावळाचा बेबनाव झाला म्हणून सांगितलें, तो कांहीं अंशीं रावळाच्याच वाईट स्वभावामुळें झाला. जसवंतसिंग रावळाच्या अंगांत राज्यकारभार करण्याची योग्यता अगदीं नसून शिवाय तो अतिशय हलकट आणि वाईट व्यसनांच्या आधीन झाला होता. तो नालायक आणि राज्यव्यवस्था अगदीं बिघडली म्हणून सन १८२५ मध्य त्याला पदच्युत करून त्याचा दत्तक पुत्र कुवर दलपतसिंग याणें प्रतिनिधित्वानें राज्य चालवावें असें टरलें, त्या प्रमाणें तो कारभार करूं लागला. हा दलपतसिंग प्रतापगडच्या सावंतसिंगाचा नातू.

दलदतसिंगाच्या हातून कांहीं स्थिति सुधरेल असें वाटत होतें, परंतु उलट ती अधिकच बिघडली. ठाकूर लोकांनां जरबेंत ठेवणें त्याच्या हातून होईना. ते त्याला अगदींच जुमानतिनासे झाले, तेव्हां त्यांना योग्य

शासन करून पहिल्या प्रमाणें चाकरी करावयास लावावें म्हणून सन १८३१ मध्यें त्याणें सरकारा जवळ मदत मागितली. ती सरकारानें दिली नाहीं, परंतु असा जबाब दिला कीं हरएक स्वतंत्र संस्थानाच्या मालकानें आपला अधिकार राखण्याकरितां योग्य उपाय योजून अम्मल चालवावा, व मुलखांत शांतता राखावी. हें काम ज्याचें त्याणें केलें पाहिजे.

सरकारानें रावळाला या कामीं जरी असें उत्तर दिलें तरी भिल्ल व इतर लुटारू लोक मुलखास उपद्रव देत तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्यास तें मदत देई.

सन १८४४ मध्यें दलपतसिंगाचा आजा मेला, तेव्हां प्रतपगडची गादी ही त्याजकडेसच आली ; तेव्हां हीं दोन ही राज्यें एक करावी असा विचार निघाला परंतु डोंगरपूरचे ठाकूर त्याला अगदीं प्रतिकूल होते म्हणून तो तितकाच राहिला. शेवटीं असा ठराव झाला कीं दलपतसिंगानें एक मुलगा दत्तक घेऊन त्याला डोंगरपूरची गादी द्यावी व आपण प्रतापगडचें राज्य करावें. त्या प्रमाणें त्याणें सालंबीच्या ठाकुराचा पुत्र दत्तक घेतला. परंतु तो अज्ञान होता म्हणून तो वयांतयेईपर्यंत डोंगरपूरचा ही कारभार त्याणेंच चालवावा असें ठरलें.

ही व्यवस्था जसवंतसिंगाला कांहीं पसंत झाली नाहीं. त्याणें आपल्याला पुनः अधिकार मिळावा आणि आपण दुसराच मुलगा दत्तक घ्यावा म्हणून खटपट केली ; परंतु ती साध्य झाली नाहीं. इतकेंच नव्हे, ती बद्दल त्याला प्रायश्चित भोगावें लागलें. तें असें — सरकारानें त्याला तेथून उचलून मथुरेंत नेऊन ठेविलें आणि सालिना १२०० रुपये नेमणूक ठरवून दिली.

दलपतसिंगाला आजपर्यंत एक राज्य होतें तें संभाळणें होत नव्हतें, आतां तर दोन झालीं. तेव्हां तीं मुळींच चालवितां येणार नाहींत असा लोकांनीं तर्क केला तो कांहीं खोटा झाला नाहीं. आतां तर तो प्रतापगडांत राहून डोंगरपूरचा कारभार करूं लागला. तो तेथें जागेवर असतांना जें काम त्याच्या हातून सुरळीत चाललें नाहीं, तें इतक्या दुरून कसें चालावें ? अर्थांतच पहिल्या पेक्षां स्थिति फार बिघडली. तरी आठ वर्षें तशा अव्यवस्थेंत आणि बेबंदींत घालवून लोक जेव्हां फारच त्रासले, तेव्हां दलपतसिंगाकडून कारभार काढून सरकारानें डोंगरपुरा पुरताच स्व-

तंत्र नेटिव्ह एजंट नेमिला. उदयसिंग रावळ वयांत येऊन मुक्तयार होई पर्यंत तो राज्य चालवीत होता.

बांसवाडा.

ह्या संस्थानाच्या उत्तरेस डोंगरपूर, व उदेपूर, ईशान्येस व पूर्वेस प्रतापगड, दक्षिणेस होळकराचें राज्य आणि पश्चिमेस गुजराथचा कांहीं भाग आहे.

येथील रावळ डोंगरपूरच्या घराण्यापैकींच आहेत हें मागें त्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्या राज्याप्रमाणें याची प्रजाही बहुतेक भिल्ल, व ठाकूर रजपूत आहेत. याला ही मोगल वरचेवर फार उपद्रव देत, आणि त्यांच्या मागून मराठ्यांनीं तर नको नकोसें करून सोडलें होतें. त्यांच्या त्रासांतून कसे सुटूं असें होऊन सन १८१२ मध्यें उमेदसिंग रावळानें इंग्रजसरकाराकडे असें बोलणें लाविलें कीं मला मराठ्यांच्या जाचांतून मुक्त करा ह्मणजे मी तुमचा ताबेदार होतों. त्यांणीं तें मान्य करून शिंदे, होळकर, व पोंवार, यांच्या हातून त्याला सोडविलें. या मुक्ततेबद्दल रावळानें आपल्या उत्पन्नापैकीं सहा आणे देण्याचा करार केला होता. हें बोलणें बोलण्यास त्याणें प्रथम बडोद्यांच्या रेसिडेंटाकडे आपला वकील पाठविला होता, परंतु त्याणें त्याला पत्र देऊन दिल्लीच्या रेसिडेंटाकडे जावयास सांगितलें. तो लागलाच जरी गेला नाहीं, तरी पुढें पांच वर्षांनीं त्याणें तेंच पत्र हजर केलें तेव्हां सन १८१८ मध्यें सप्तंबर महिन्यांत पूर्वी बोलणें झाल्या प्रमाणें सहा आणे देण्या बद्दल तहनामा मुकरर झाला.

या गोष्टीला पुरा महिना झाला नसेल इतक्यांत उमेदसिंग रावळाला आपल्यावर आलेलें संकट गेलें, आतां आपलें काय होणार असें वाटल्यामुळें ह्मणा, किंवा आपण खंडणीबद्दल सहा आणे ह्मणजे फार रकम कबूल केली, परंतु येवढी देऊं नये असें वाटल्यामुळें ह्मणा, त्याणें तहनाम्यावर सही करणाचें नाकारलें. इंग्रजसरकार तर हा तहनामा तुमच्याच कबुलीनें झाला आहे, तेव्हां हाच कायम झाला पाहिजे असें ह्मणूं लागलें; परंतु इतक्यांत दरम्यान धारकरांबराबर तह होऊन डोंगरपूरच्या व बांसवाड्याच्या

रावळा कडून जी पोवारांस वार्षिक खंडणी पोहोंचत असे ती त्यांणीं इंग्रज सरकारास लाऊन दिली म्हणून हा तहनामा दुरुस्त करण्यास सरकारानें फारशी ओढाताण केली नाहीं. मग पुनः बोलणें सुरू होऊन दुसरा तहनामा झाला, त्यावर तारीख २९ नवंबर रोजीं सह्या झाल्या. त्यांत असा करार ठरला कीं इंग्रजसरकारानें रावळाचें, त्याच्या वारसांचें, व जे गादीवर बसतील त्यांचें संरक्षण करावें, त्यांचे कोणी संबंधी किंवा भाईबंद दांडगावा करतील तर त्यांचा बंदोबस्त करावा, आणि रावळानें धारच्या पोवारांनां किंवा दुसऱ्या कोणत्याही राजाला जी खंडणी प्रतिसाल द्यावयाची तिची कांहीं बाकी देणें राहिली असेल तर ती आणि शिवाय त्याचें संरक्षण करण्याबद्दल इंग्रजसरकार जो योग्य खर्च ठरवील तो त्यांनां दरसाल द्यावा; मात्र त्यांणीं ही रक्कम त्याच्या उत्पन्ना पैकीं सहा आण्यांहून जास्ती घेऊं नये. मग खंडणीच्या बाकी बद्दल हिशेब होऊन ३५००० रुपये ठरले व वार्षिक खंडणी तीन सालें पर्यंत कमजास्त होऊन शेवटीं ३५००० रुपये कायम रकमच ठरली. ही हाल्लीं जो निवळ वसूल येतो त्याच्या षष्ठांशाहून थोडी जाजती आहे.

सन १८२४ पर्यंत वांसवाडयानजीकच्या जंगलांतील भिल्ल व इतर लुटारू लोक मुलखावर घाले घालून वारंवार फार उपद्रव देत होते, परंतु त्या वर्षीं त्या दरवडेखोरांचा व चोरट्यांचा बंदोबस्त करण्या करितां चांगला विचार होऊन जी युक्ति योजण्यांत आली ती बरी लागू पडली. तेव्हां पासून त्या मुलखामध्यें चांगली शांतता झाली. मग अर्थांतच आबादानी होऊन जमाबंदी भराभर वाढत गेली. ती त्याहून ही अधिक जलद वाढावयाची. परंतु रावळ महाराज व त्यांचे प्रिय दिवाण साहेब हे उभयतां ही दुर्व्यसनी आणि गैर वर्तन करणारे पडल्यानें बाढेना, असा पोलिटिकल एजंटाचा सरकारास रिपोर्ट गेला.

हे प्रभु आणि मंत्री विषयांत निमग्न होऊन गेल्यानें पुढें परिणाम वासा होईल तें उघड दिसतच होतें. तो प्रसंग कांहीं काळानें सहजच आला. खंडणीबद्दल इंग्रज सरकारास जो प्रतिसाल पैसा द्यावयाचा तो भवानासिंग रावळ व त्याचा प्यारा दिवाण या उभयतांनीं चैनबाजींत उडवून टाकला, त्या मुळें बाकी तुंबत तुंबत सन १८३५ मध्यें देण्याची रक्कम पुष्कळ मोठी होऊन बसली. ही रक्कम द्या व तुमची स्थिति बिघडु-

ली आहे ही सुधरा,' असें वागणें चांगलें नाहीं, वगैरे सरकारच्या एजंट साहेबांनीं रावळास पुष्कळ सांगितलें परंतु त्याचे कान उघडतना. शेवटीं अजून ही तुम्ही असें अयोग्य वर्तन ठेवाल तर सरकार त्याचा योग्य विचार करील आणि असा असा परिणाम लावल्यावांचून रहाणार नाहीं, असें जेव्हां साहेबांनीं स्पष्ट सांगितलें, तेव्हां महाराज दिवाणजींस पदावरून दूर करण्यास सिद्ध झाले. मग सरकारच्या वाकीची फेड करण्याचा ही विचार होऊन ठराव झाला.

आपल्या प्रिय दिवाणास पदच्युत केल्यावर प्रभु भवानसिंग रावळ फार दिवस जगले नाहींत. त्याला पुत्र नव्हता, परंतु त्याच्या पदरच्या ठाकुरांनीं पोलिटिकल एजंटाच्या संमतीनें बहादूरसिंगाला दत्तक दिलें. ह्या बहादूरसिंगाचा गादीवर हक्क वाजवी रीतीनें पोहोंचत होता. पुढें तो अप्रज मेला तेव्हां विद्यमान रावळ लछमनसिंग यांची नेमणूक झाली. ह्यांच्या पेक्षां आपल्या मुलाचाच हक्क विशेष आहे असें खंडू येथील ठाकूर मानसिंग यास वाटत होतें म्हणून तो या नेमणूकीला आडवा आला. परंतु त्याला जी प्रतिसाल रावळाला खंडणी द्यावी लागत असे तींत १३०० रुपये क भी करावे असें ठरून त्याची समजूत झाली आणि त्यानें आपला हक्क सोडला.

प्रतापगड.

ह्या संस्थानच्या उत्तरेस व वायव्येस उदेपूर, पूर्वेस मंदूसर, जावडा, व रतलाम आणि आग्नेयीस बांसवाडा आहे.

येथील राजास महारावत म्हणतात. हें घराणें उदेपूरच्या राजकुलाची शाखा आहे. विद्यमान महारावताचे पूर्वज दिल्लीपतीच्या पदरीं नोकरीस राहिले होते. त्यांच्यामध्यें सलीमसिंग म्हणून एक पुरुष झाला, त्यानें आपलें नांव अद्याप चालू ठेविलें आहे. त्यावर महंमदशहा बादशहाची इतकी मर्जी होती कीं त्यानें त्याला स्वनामांकित मुद्रा पाडण्याचा अधिकार दिला. मग त्यानें लागलीच टंकसाळ घालून नाणें पाडण्यास सुरवात केली, आणि पुष्कळच रुपये पाडले; ते अद्याप माळव्यांत व राजपुतान्यांत

चालू आहेत. सालीमसाई रुपया सुरती पाऊण रुपया बरावर आहे.

मोगलबादशाही लयास गेली तेव्हां सलीमसिंगाचा पुत्र सावंतसिंग होळकराचा मांडलिक झाला. परंतु त्याच्या ताब्यांतून सुटावें अशी त्याची फार इच्छा होती, आणि तदनुसार सन १८०४ मध्यें इंग्रजसरकारचा आश्रय जोडण्याचें मनांत आणून त्यांवरावर त्याणें तह केला; त्यांत सरकारानें त्याचें संरक्षण करावें व होळकराला जी खंडणी तो देत असे ती ह्यांनां द्यावी असें ठरलें. परंतु लॉर्ड कॉर्नवालीस साहेबाचे राजकीय विचार कांहीं निराळे असल्यामुळें तहनामा रद्द होऊन पुनः प्रतापगड होळकराच्या सपाल्यांत सापडला. तें नष्टचर्य चौदा वर्षें भोगावयाचें उरलें होतें तें भोगून सन १८१८ मध्यें हिंदुस्थान सरकारची राज्यपद्धति पुनः जेव्हां पालटली तेव्हां त्याला तो आश्रय कायमचा मिळाला. मग राजपुतान्यांतील इतर राजांबराबर या रावताशीं ही तह झाला. आतां त्याच्या कडून इंग्रजसरकारास खुद्द आपल्या बद्दल म्हणून ७२७०० रुपये व होळकरावद्दल ५६८८७ रुपये वार्षिक खंडणी पोहोचते. होळकराचा इंग्रजांचा जो मंदूसर येथें तह झाला, त्यांत प्रतापगडाकडून आपल्याला सालिना येणारी ही खंडणी त्याणें परभारें लाऊन दिली; त्या प्रमाणें पोंचून होळकराच्या खात्यास जमा होत असते.

सन १८२३ व १८२६ यांच्या दरम्यान सावंतसिंग व त्याचा पुत्र कुवर दीपसिंग यांमध्यें वैमनस्य उत्पन्न झाल्यामुळें प्रतापगडांत बराच धोंटाळा झाला होता व लोक अगदीं नाखुष झाले होते. कांहीं वर्षां खालीं सावंतसिंगानें राज्याचा सर्व कारभार मुलाकडे सोंपविला होता; नो चालवीत असतां त्याला कोणी प्रतिकूळ वागणारे हो होते. परंतु त्याला तें सहन न होऊन फारसा विचार न करतां तेवढी पीडा टाळावी म्हणून त्याणें त्यांनां ठार मारविलें. तेव्हां इंग्रज सरकारानें त्याला कामावरून दूर करून हद्दपार करावें असा त्याच्या बापाजवळ आग्रह धरला. त्या प्रमाणें त्याला पदभ्रष्ट करून देवरावळ म्हणून एक ठिकाण होतें, तेथें राहण्यास हुकूम झाला.

सावंतसिंगानें सुमार वीस वर्षां पूर्वीच या कुंवराच्या हातीं सर्व राज्य देऊन स्वस्थ बसून आनंदांत काल घालविण्याचें मनांत आणलें होतें, परंतु त्याला वृद्धापकाळीं सारें ओझें पुनः शिरावर घेणें आलें. दिलीपसिंग

गास त्याणें देवरावळांत नेऊन अडकाविलें होतें परंतु त्याला तो प्रतिबंध दुःसह होऊन थोडक्याच महिन्यांत तो तेथून निसटला आणि प्रतापगडांत येऊन दाखल झाला. तेथें तो स्वस्थ बसता तर कांहीं हरकत नव्हती, परंतु तें सोडून देऊन खटपठी करूं लागला. मग त्याचें वर्तन इतकें बलात्काराचें आणि भयप्रद झालें कीं शेवटीं त्याचा बंदोबस्त करण्या करितां इंग्रजी फौज बोलवावी लागली. तिणें त्याला करनोर किल्ल्यांत नेऊन कोंडलें आणि तेथेंच तारीख २१ माहे मे सन १८२६ रोजीं त्याचें देहावसान झालें. पोराचे सारे आपराध पोटांत घालून त्याला बंदमुक्त करावें असें सावंतसिंगाच्या मनांत होतें व त्या प्रमाणें त्याणें इंग्रजसरकारास खलिताही पाठविला होता. परंतु त्याचा विचार होऊन उत्तर मिळणार तों पूर्वीच तो इकडे मृत्युमुखांत पडला.

सावंतसिंग अगदीं वृद्ध झाल्यामुळें त्याच्या हातून राज्याचें काम रेटेनासें झालें होतें. तेव्हां अर्थातच सारी अव्यवस्था होऊन गेली. तशांत भिल्ल, थग वगैरे लुटारू व प्राणघातक लोकांना अधिक फाऊन त्यांचा उपद्रव विशेष होऊं लागला. तेव्हां इंग्रजसरकारानें ती गोष्ट मनावर घेऊन त्यांचा चांगला बंदोबस्त केला.

सावंतसिंगाचा एकुलता एक नातु दलपतसिंग हा डोंगरपूर येथें सन १८२५ मध्यें दत्तक दिलेला होता. म्हणून तो जेव्हां १८४४ मध्यें वारला, तेव्हां हिंदुधर्मशास्त्रा प्रमाणें पाहिलें असतां त्यांचा वंशक्षयच झालेला होता. परंतु मागें डोंगरपूरच्या इतिहासांत सांगितल्या प्रमाणें वाटाघाट होऊन त्याला प्रतापगडची गादी मिळाली आणि डोंगरपूरच्या गादीवर दत्तक मुलगा बसून तो मोठा होईपर्यंत तेथचा राज्यकारभार दलपतसिंगानेंच चालवावा असें ठरलें. परंतु हें सुयंत्र चालेना तेव्हां आठव्यें कांहीं तरी लोटून मग दलपतसिंगाचा तिकडचा संबंध तुटला.

ह्या संस्थानची बहुतेक प्रजा भिल्ल व तसलेच इतर जातीचे लुटारू लोक आहेत. ते त्या व शेजारच्या मुलखांत आपल्या स्वभावाप्रमाणें बेबंद वर्तन करून वारंवार उपद्रव देतात.

खंड दुसरें

मध्य हिंदुस्थान व माळवा

भाग १

ग्वाल्हेर अथवा शिंद्याचें राज्य

ह्या घराण्याचा मूळपुरुष राणोजी शिंदा, हा साताऱ्यानजिक कण्हेर खेड ह्मणून गांव आहे तेथील पाटील होता. तो हें आपलें कुलपरंपरागत वतनी वसूलवासलातीचें काम करीतच होता; त्याला कंटाळून किंवा त्या वर चरितार्थ चालेना ह्मणून तें सोडून गेला असें नाहीं; परंतु तो काळ धामधुमीचा होता आणि कित्येक यःकश्चित मनुष्य स्वपराक्रमानें कीर्ति संपादून वैभवास चढलें हें पाहून ज्याच्या अंगांत थोडें बहुत पाणी होतें त्याला स्वस्थ घरांत बसून नुसतां नांगर हांकीत काळ काढणें वरें वाटेना; जो खाऊन पिऊन घरचा सुखी होता त्याला आपल्या पेक्षां हलक्या लोकांचें नशीब खुललेलें पाहून आपण त्यांच्यापेक्षां थोर होतों तें आतां त्यांनां थोर ह्मणत बसावें लागणार असें पाहून ती मानखंडणा दुःसह वाटून आपण त्यांच्या पेक्षां पूर्ववत श्रेष्ठच असावें अशी ईर्षा उत्पन्न झाली आणि जो तो त्या मार्गास लागला ; राणोजीला तशीच थोर होण्याची इच्छा उत्पन्न होऊन एकाद्या थोर पुरुषाचा आश्रय संपादला ह्मणजे आपला हेतु सहज सिद्धीस जाईल असें मनांत आणून त्याणें बाळाजी विश्वनाथ पेशव्याचा आश्रय जोडला. तो वारल्यावर त्याचा पुत्र खरा प्रौढप्रताप बाजीराव बल्लाळ पितृपद पावला. त्याची राणोजीनें अनन्यभावानें सेवा केली. त्याची असामी हुजऱ्यांत, काम जोडे उचलण्याचें ; हें वतनदार पाटलाला ह्मणजे मोठ्या योग्यतेचें वाटण्या सारखें होतें असें नाहीं, परंतु तसें नव्हे. साऱ्या हिंदुपद बादशाहीची दिवाणगिरी हांकणारा जो खरा राजकार्य धुरंधर राव बाजी भट, त्याच्या खास तैनातींत जो सुदैवानें शिरला, तो जोडे उचल्या असो कीं त्याच्या पलीकडचा असो, त्याची लोकांत मान्यताच असे ;

त्याला कोणी हलका समजत नसे. राणोजीसारखे हुजऱ्ये बाजीरावाजवळ थोडे असतील असें नाहीं, परंतु खुद्द त्याच्या ध्यानीं मनीं ही नाहीं अशा एका अकस्मित प्रसंगावरून त्याचें नशीब उघडलें. ती गोष्ट अशी—एक दिवस बाजीराव शाहू महाराजांच्या दर्शनास गेले ते फार वेळ बोलत बसले ; नंतर उठून जावयास निघाले असतां बाहेर हुजऱ्या उभा नाहीं. जरा पुढें होऊन पहातात तर राणोजी जोडा उरावर घेऊन त्याला दोहों हातांनीं घट्ट मिठी मारून उताणा निजला आहे. आपल्या चरणसंपुष्टाला पाटील इतका विलक्षण जपतो असें पाहतांच बाजीरावाचें मन सद्गदित झालें, आणि त्याणें त्याला उठवून शाबासकी दिली. थोर पुरुष ह्मणावयाचे ते कशाला ! ज्यांचें मन थोर ते थोर आणि तेच उच्चपदाला पोंचले असतां आपल्या गुणांनीं त्याला शोभा आणतात. बाजीरावानें लागलाच राणोजीच्या हातचा जोडा सोडविला* आणि त्याची नेमणुक पागेवर केली.

---

* शिंद्याच्यादरबारीं क्याप्टन स्टयूअर्ट ह्मणून असिस्टंट रेसिडेंट होता त्याणें सन १८१९ मध्यें सप्टेंबरच्या तिसऱ्या तारखेस एक पत्र लिहिले लें आहे त्यांत तो ह्मणतो " मी अशी गोष्ट ऐकितों की राणोजीच्या अभ्युदयास जो जोडा कारणीभूत झाला, तो त्याणें यजमानापासून मागून घेऊन एका पेटींत घालून ठेविला आणि पुढचें सारें ऐश्वर्य प्राप्त होण्याला आदिकारण हा असें समजून तो त्याला देवासारखा जपत असे.

शिंद्याचा मूळपुरुष पेशव्यांचा हुजऱ्या होता अशीच साऱ्या महाराष्ट्रांत प्रसिद्धि आहे; व त्या कुलांत साऱ्या मराठे शाहींतील प्रसिद्ध जो महादजी शिंदा ह्मणून झाला तो नानाफडणिसाला वाजूस ढकलून आपण पेशवाईचा कारभार हांकावा या इराद्यानें पुण्यांत आला असतां श्रीमंतांचा जोडा बगलेंत मारून माझें मूळपद हेंच असें ह्मणत असे. ही गोष्ट आबालवृद्धांस माहीत आहे व मराठी, इंग्रजी, कागदोपत्रीं असा लेख ही आहे. एलफिन्स्टन साहेब जे पुण्यास फार दिवस होते, पेशवाईची अखेर ज्यांच्या हातून लागली, त्यांनां व दुसरे प्रसिद्ध इतिहासकार , मराठी दरबारांत फार काळ घालविलेले ग्रांटडफ, यांनां ही गोष्ट पुष्कळ चांगली माहीत असावी. कारण महादजीची सेवा डोळ्यांनीं पाहिलेले शेंकडों लोक त्यांनां समक्ष भेटण्याचा संभव होता व ते ती गोष्ट त्यांनां विचारल्या शिवाय रहाणेंच न

आपल्या ध्यानीं मनीं नसतां अकस्मात जोडा सुटून लागलाच घो-
ला जेव्हां हातीं आला तेव्हां ही भाग्योदयाचीच वेळ आहे असें समजून
राणोजीनें आपला कार्यभाग उरकून घेतला. तो खासपाग्या झाला म्हणून
कांहीं नुसता आडनांवाचा नव्हता. सन १७२५ मध्यें साऱ्या मराठे से-
नानायकांत तो अग्रणी होता. सन १७३६ मध्यें दिल्ली येथें बादशाही
८००० मुसलमान स्वार मराटयांची कथा काय म्हणून त्यांच्यावर चालून
आले असतां त्यांचा जो अगदीं पराभव झाला तो मुख्यत्वें याच्या जोरावर
झाला. त्या पुढें दोन वर्षांनीं निजामउल्मुल्खावर स्वारी करून त्रिवर्ग म-
राठे वीरांनीं आपल्या बुद्धिबलानें व बाहुबलानें त्यास जर्जर करून स्वय-
शोदुंदुभी गाजविला व शिंदे, होळकर, आणि पोंवार नामक तीन नूतन
राजघराणीं स्थापिलीं त्यांतला शिंदा तो हाच राणोजी. तो जसा शूर त-
सा वचनाचा साचा होता. त्याच्या ह्या प्रामाणिकपणामुळेंच सन १७३४

व्हते. असें असतां " हिस्टॉरिकल स्केच ऑफ धि प्रिन्सेस ऑफ इंडिया"
या नांवाचा एक ग्रंथ आहे त्यांतील पुढील मजकूर त्यांणीं तसाच राहूं दि-
ला आहे. हा ग्रंथ कोणी रचला हें कांहीं कळत नाहीं, परंतु तो सन
१८३३ मध्यें एडिंबरो येथें प्रसिद्ध होण्या पूर्वी एल्फिन्स्टन व ग्रॉटडफ या
उभयतांनीं तपासून दिला म्हणून अतिशय प्रमाणभूत होऊन बसला आहे.
" शिंदे हे साताऱ्या जवळ कण्हेरखेड नांवाचा गांव आहे तेथील पाटील.
त्यांची पूर्वस्थिति कशी होती तें कळण्यास जरी कांहीं लेख मिळत नाहीं
तरी ती चांगलीच असावी असें मानण्यास एक मोठें प्रमाण आहे, तें अ-
से—शाहूमहाराज दिल्लीस अटकेंत असतां औरंगजेबानें सन १७०६ चे सु-
मारास त्यांचा विवाह केला तो या घराण्यांतील एका कन्येशीं. ती शाहूचे
मातुश्रीजवळ दिल्लीस असतांच सन १७१० मध्यें निवर्तली. राणोजी शि-
दा पेशव्यांचा हुजऱ्या होता अशी गोष्ट बहुतेक इतिहासकारांनीं वर्णिलेली
आहे, परंतु ती असंभाव्य दिसते. कारण आधीं हें घराणें शिलेदाराचें अ-
सून सत्कुलोत्पन्न, बुद्धिमान व शूर अशा पुरुषांस त्या काळीं लष्करांत शि
रून सहज प्रसिद्धीस येण्यास चांगला मार्ग होता. तर अशा वेळीं या कु-
लांतील असा कोणी पुरुष इतकें हलकें काम पत्करून राहिला असेल असें
वाटत नाहीं.

मध्यें जेव्हां पेशव्यांच्या आणि दिल्लीच्या महंमदशहा बादशहाचा तह झाला तेव्हां करारा प्रमाणें वर्तन होण्या विषयीं त्याणें हमी घेतली तेव्हां मग कांहीं शंका उरली नाहीं. आपले यजमान करारास व्यत्यय आणतील तर आपण त्यांच्या पदरीं रहाणार नाहीं असें त्याणें प्रसिद्धपणें बोलून दाखविलें.

हिंदुस्थानांत स्वाऱ्या करून मराठ्यांनीं जो मुलुख काबीज केला त्या पैकीं सुमार अर्धा पेशव्यांनीं फौजेच्या खर्चा करितां त्याला जाहागीर नेमून दिला. तो सन १७६० च्या सुमारास वारला तेव्हां अर्धा माळवा त्याच्या ताब्यांत होता, आणि सुमार साडेपांसष्ठ लक्ष रुपये खुद्द त्याच्याकडे वसूल पोहोंचत असे.

राणोजीला औरस पुत्र तीन होते, जयाप्पा, दत्ताजी, व जोतवा, हीं त्यांचीं नांवें. सन १७५९ मध्यें जयाप्पाचा नागपुरास खून झाला; दुसरा दत्ताजी दिल्ली नजीक रडबीरच्या समरांत पडला आणि धाकटा जोतबा दीग नजीक कुंभेरीच्या वेढ्यांत प्राणास मुकला.

या औरस पुत्रत्रयाशिवाय राणोजीला तुकाजी व महादजी ह्मणून अनौरस पुत्र होते. त्यां पैकीं वडील त्याच्या पूर्वीच वारला होता आणि धाकट्यानें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहें. त्याचा वृत्तांत आतां कथन करूं.

राणोजी नंतर त्याचा वडील पुत्र जयाप्पा यास सरदारीचीं वस्त्रें मिळालीं, परंतु तो अल्पकाळांतच ह्मणजे १७५९ मध्यें परलोकवासी झाला. मग त्याचा मुलगा गादीवर बसला. परंतु त्याची कारकीर्द फारच लौकर संपली. पानपतच्या समरभूमीवर त्याला शत्रुनीं कैद करून तारीख ६ जानेवारी १७६१ रोजीं ठार मारलें. या प्रमाणें राणोजीचा सारा औरस आणि अर्धा अनौरस वंश संपला. मग एकटा महादजी शिल्लक उरला, त्याचें ही पानपत होत होतें, परंतु मराठेशाईचा कीर्तिध्वज पुनरपि उभारून यश:पताका फडकावीत हिंदुस्थानभर फिरण्याचें; आणि रजपूत, मुसलमान, फिरंगी, फराशीस, ताम्रमुख, इत्यादि सर्वांस आपल्या जरबेंत ठेऊन जरीपटक्याकडे आश्चर्यानें थक्क होऊन टकमक पहात बसविण्याचें पाटीलवांचे वांटणीचें काम अद्याप व्हावयाचें होतें ह्मणून तो पायाला जबर जखम लागून जन्माचा लंगडा होऊनच निभावला आणि पखालीच्या बैलावर

वसून राणाखान पखालजीचे उपकार मानीत एका निर्भयस्थानीं जाऊन पडला. तेथून तो लौकरच पुण्यास पेशव्यांच्या हातून पितृपदाचीं वस्त्रें मिळावीं ह्मणून दरबारांत विनंती करण्या करितां गेला. माळवा प्रांत ह्मणजे सोन्याचा तुकडा, त्याच्या अर्ध्या राज्याला आतां वारस मी, तें माझें मला मिळावें, असें ह्मणत तो फिरत होता तेव्हां त्याज बराबर एक ही नोकर मनुष्य नव्हतें, इतकी त्याची विपन्नावस्था झालेली होती. श्रीमंतांनीं त्यावर कृपा करण्याचें मनांत आणलें, परंतु तें त्यांच्या काकांच्या मनास येईना. रघुनाथराव दादासाहेबांनीं पुष्कळच हरकत घेतली परंतु. रावसाहेबांनीं राणोजीचा वंश चालला पाहिजे असें ह्मटलें, आणि त्याला वस्त्रें दिलीं.

महादजीला जाहागीर चालविण्याचा हुकूम मिळाला तेथूनच त्याच्या उत्कर्षास सुरवात झाली ; त्याला मध्यंतरीं कांहीं विघ्न आलेंच नाहीं असें नाहीं. परोत्कर्षासहिष्णु, मत्सरी, निंदक, अशांनां कोणाची कीर्ति पसरत चालेलली ऐकूं येऊं लागली ह्मणजे त्यांचें कपाळ दुखूं लागतें, त्या प्रमाणें महादजीच्या गुणांची जरी सर्वत्र प्रशंसा होऊं लागली, दरबारांत त्याचें महात्म्य वाढत चाललें, तरी कांहीं असामींनीं त्याला आडकाटी घालण्याचें आपलें काम तेवढें केलें. परंतु महादजी तशाला जुमानणारा नव्हता. त्यांच्या दुष्ट कृत्यांमुळें त्याच्या बेतांनां अडथळे येत, परंतु ते तो मोठ्या विघ्नांत गणीत नसे. पानपतच्या दुर्धर प्रसंगामुळें मराटयांच्या नांवलौकिकाला मोठा कमीपणा आला होता, तो काढून टाकला पाहिजे असें पेशव्यांच्या मनांत अहोरात्र घोळत होतें आणि त्यांणीं हळुहळु तयारी चालविली होती. मग सन १७६४ मध्यें सरकारचें सैन्य माळव्यांत गेलें तेव्हां त्याच्या एका भागाचें आधिपत्य महादजीस मिळालें त्या स्वारींत सांपडली तेवढी हरएक संधी साधून त्याणें नर्मदेच्या उत्तर प्रदेशीं आपला दरारा चांगलाच बसविला. सरजॉन मालकम ह्मणतात या नंतर थोड्याच काळानें महादजीचें प्रस्थ फार वाढलें. तो दिल्लीच्या गरीब बिचाऱ्या शाहाअलम बादशाहाला हात जोडून मी आपला बंदा आहें असें ह्मणे, परंतु खरा त्यालाच आपल्या हुकमांत वागवूं लागला ; तो होळकराशीं वरकांति स्नेह दाखवी परंतु त्याचा प्रतिस्पर्धी बनला असून त्याचें राज्य हाताखालीं घालण्याचे डाव योजीत होता; मध्य हिंदुस्थानांतील सर्व रजपूत राजे रजवाड्यांनां तुम्ही शूर ह्मणून, लौकिकांत त्यांच्या पेक्षां आपण कमी असें दाखवी, परंतु पदो-

पदीं त्यांनां वांकवीत होता, आणि पेशव्यांना आपण यजमान, मी नोकर असें म्हणे परंतु खरोखर त्यांना अगदीं लुटीत होता.

सन १७७६ मध्यें महादजी हिंदुस्थानांतून पुण्यास परत आला. या वेळीं तो नांवाला हुजूर पागेकडील मुख्य कामगार होता, परंतु त्याचें वजन फार असून दरबारांत हरएक कामांत त्याची सल्ला मसलत आधीं ह-वी लागे. तो जो पक्ष धरी तो बहुधा खालीं पडत नसे. या प्रसंगीं म-ल्हारराव होळकर वारून त्याच्या गादीवर त्याचा खुळसर नातू बसलेला होता तो ही वारला, तेव्हां मल्हारराव्याची सून अहल्याबाई इजकडे जाहा-गिरीचें कामकाज सोंपवावें किंवा नाहीं ही वाटाघाट चालली होती. मह्ा-दजीनें अहल्याबाईचा पक्ष स्वीकारला आणि आपल्या सारखें करून घेत-लें. होळकराच्या घराण्याशीं तो कसा वागत होता हें त्या कुलाचा वृत्तांत पुढें सांगूं तेव्हां स्पष्ट दिसेल.

सन १७६९ मध्यें विसाजी कृष्ण बिनीवाले यांजबराबर सैन्य दे-ऊन पेशव्यांनीं त्याला हिंदुस्थानांत पाठविलें, तेव्हां महादजीस आपल्या सै-न्यासह त्याचे मदतीस जाण्यास हुकूम झाला. या स्वारीचें सारें यश म-हादजीनेंच संपादिलें म्हटलें तरी चालेल. त्याणें जो एकएक लढाईचा बेत योजला त्याच्या योगानेंच शहाअलम बादशहाला आतां आपण मराठ्यांच्या पाठीशीं पडावें असें वाटलें. मग सन १७७१ च्या दिजंबर महिन्यांत त्या चा जो दिल्लींत पुनः प्रवेश झाला तो महादजीच्या सैन्याबराबर झाला. या प्रमाणें इकडील प्रकार आटोपल्यावर रोहिलखंडावर स्वारी झाली. तो बहु-तेक मुलुख काबीज होऊन असा पक्का अम्मल बसला कीं तेथून मराठे नि-घतील असें कोणास वाटत नव्हतें. त्या प्रमाणें तीस वर्षें चाललें; नंतर लार्ड लेक आले तेव्हां ठाणीं उठलीं.

पुढच्या वर्षीं म्हणजे १७७२ मध्यें श्रीमंत रावसाहेब वारले, तेव्हां महादजीला पुण्यास जावें लागलें. नंतर नारायणराव पेशवे झाले परंतु अ-ल्पकाळांतच त्याचा फार शोककारक शेवट होऊन रघुनाथराव दादा साहेबांच्या हातीं अधिकार आला. त्यांचा आणि पाटीलबावांचा बद्धकटाक्ष, परंतु ते फार सावध. दादा साहेब जरी पेशवाईपद पावले तरी त्यांनां तेवढ्यानें आपण कृतकृत्य झालों असें वाटत नाहीं, अजून अनेक विघ्नें येतील त्यांतून निभावण्याला काय युक्ति करावी, हेच विचार कांहीं दिवस त्यांच्या मनांत

घोळतील, व त्यां पुढें आपल्यावर वक्रदृष्टि करण्याला त्यांनां फावणार नाहीं व सुचणार ही नाहीं. असें योग्य भविष्य करून दोन वर्षे पर्यंत तो अगदीं स्वस्थ राहिला. हा काळ त्याणें व्यर्थ घालविला नाहीं; तेवढ्यांत आपल्या राज्याचा चांगला बंदोबस्त केला आणि मागली काळजी वाहायाला नको असें होतांच पुढें भयंकर वादळ डोक्यावर येणार तों आधींच तुकोजी होळकराचा स्नेह संपादून त्याच्यासह अकस्मात् दादासाहेबांशीं सामना करण्या करितां गांठ घातली. रघुनाथराव आपल्या मूर्खपणानें साऱ्या राज्याच्या नाशास प्रवृत्त होऊन बसलाच होता.

विनाकारण गृहकलह माजवून राघोबानें इंग्लिशांनां शरण जाऊन त्यांच्या मदतीनें गादीवर बसण्याचा विचार ठरविला. त्या प्रमाणें त्यांणीं फौज रवाना केली तेव्हां पाटील बावांना तिचा समाचार घेणें प्राप्त झालें; तो त्यांणीं चांगलाच घेतला. त्या सैन्याचा अधिपति कर्नल कॉकबर्न* आणि दुय्यम मिस्टर नारनाक म्हणून होता, त्यांचा पराजय होऊन सैन्य पुष्कळ मेलें तेव्हां त्यांणीं आपल्या मोठाल्या तोफा नेतां येतना सबब फोडून टाकल्या, दारू गोळा सामान सुमान जाळून सोडलें आणि पळ काढला परतु लंगड्या पाटलापुढें किती पळतील! त्याणें लगट करून त्यांनां धरलें आणि इंग्रजांनीं हिंदुस्थानांत पाऊल टाकल्या पासून आजमितीपर्यंत त्यांच्या दुसऱ्या कोणत्याच सेनापतीनें केले नसतील असले लाजिरवाणे करार त्यांनां करावयास लाऊन तहनाम्यावर सह्या घेतल्या. हा वडगांवचा तह सन १७७९ मध्यें झाला.

ह्या वडगांवच्या प्रसंगानें महादजीची कीर्ति दिगंत झाली. हिंदुस्थानांत जसें लौकिकाचें आणि प्रतिष्ठेचें प्राबल्य आहे तसें दुसऱ्या कोणत्याच देशांत नसेल. असला लौकिक महादजी पाटीलबावांस या लढाईनें मिळाला तेव्हां पासून मराठ्यांत आणि त्याच प्रमाणें इतर लोकांत त्याचें वजन कांहीं विलक्षण जबर होऊन बसलें.

पुढें इंग्रज सरकारानें कर्नल गॉदर्ड या शूर सरदाराची महादजीशीं सामना करण्या करितां नेमणूक केली. तो आला तसें लढाईचें स्वरूप पा-

---

* हे उभयतां व तिसरे कर्नल ईगर्टन या प्रमाणें सैन्य फाशांत पाडल्या•बद्दल बडतर्फ झाले--ग्रांटडफ्.

लढलें. परंतु त्याच्या बराबरच्या प्रसंगांत ही महादजी म्हणजे सामान्य योद्धा नव्हे, सेनापतित्व करण्यांत मोठा चतुर, अशी शत्रूची खात्री झाली. पाटीलबावाची बुद्धि आणि नजर जशी सूक्ष्म होती तशी त्याच्या समकाली न देशबांधवांत कोणाचीच नव्हती. हे इंग्रज जे आपल्याला शत्रु उत्पन्न झाले आहेत हे कांहीं साधरण नव्हत ; यांच्या हांतून आपली मराठेशाई कायम राखण्याला विलक्षण श्रम पडणार आहेत असें त्याणें तेव्हांच ताडून त्यांच्याशीं सामन्याला साऱ्या हिंदुस्थानांतील लहान थोर राजेरजवाड्यांची एक जूट केली पाहिजे असें मनांत आणलें. त्यांच्याशीं लढण्याचें माझें एकट्याचें काम नव्हे असें समजून चालू प्रकरण कसें तरी मिटवावें झणून आपल्या हातून होईल तितकी खटपट करून कसा तरी तह करण्यास तो पहात होता. परंतु प्रतिपक्षी गोदर्ड साहेब त्याच्याच सारखा दूरदृष्टि होता. असला जबर शत्रु एकदां हातचा सुटून जर ना विसावा खाऊन हुशार झाला, तर मग आपल्याला कधीं आवरणार नाहीं, याज करितां होईल त्या उपायानें याला आतांच जेरीस आणलें पाहिजें, अशा विचारांत तो होता. त्याणें अशीच संधी पाहून तारीख ३ एप्रिल सन १७८० रोजीं शिंद्यावर एकाएकीं घाला घातला. त्या वेळीं पाटीलबावा खरेच बेसावध होते, परंतु शाबास त्यांची! त्या प्रसंगीं दुसरा कोणी असता तर त्याची चांदीच उडती, परंतु महादजी गडबडला नाहीं. त्याणें मोठ्या असम्यानें आपली सारी फ़ौज बचावली; फार थोडें मनुष्य जायां झालें असेल. त्याच्या नैपुण्यानें आपले श्रम व्यर्थ झाले झणून गोदर्ड विस्मित झाला, आणि पुनः बकाव्यान करीत बसून त्याणें पंधरा दिवसांनीं झणजे तारीख १९ रोजीं आणखी एकदां तोच प्रसंग आणला; परंतु पाटलानें तसेंच कौशल्य दाखवून लढाई अजीबाद टाळली, आतां पहिल्या इतकें ही नुकसान झालें नाहीं. या वर्तनानें महादजीचा डाव चांगला साधला. पर्जन्यकाळ संपेपर्यंत तरी त्याला फुरसत पाहिजे होती ती मिळाली. परंतु मध्यंतरी त्याचा जो अगदीं आजिक्य मानलेला ग्वालहेरचा किल्ला तोच क्याप्टन पोपहाम याणें मोठ्या शौर्यानें आणि युक्तीनें अगष्ट महिन्यांत पाडाव करून घेतला. शिंद्या पुढें आपला कांहीं इलाज चालत नाहीं असें पाहून जनरल गोदर्डसाहेब तो मुलूख सोडून पार झाले ते घांट उतरून वसईच्या किल्ल्याला घेरा घालून बसले. त्याच्या संरक्षणार्थ जी फौज गेली तिचा तारीख १० दिसेंबर १७८० इस

वी रोजीं पराभव होऊन दुसऱ्या दिवशीं किल्ला स्वाधीन झाला. पुलें लहान मोठ्या चकमकी हमेष झडतच होत्या, त्यांत केव्हां यश, केव्हां अपयश असें होत होतें, परंतु इंग्रजांना सांगण्या सारखा जय कांहीं आला नाहीं. उलट तारीख २३ एप्रिल सन १७८१ रोजीं त्यांचा पराजयच मोठा झाला. इतक्या काळांत महादजीला जें हवें होतें तें झालें. मध्यहिंदुस्थानांत त्याला आपला अम्मल चांगला बसवतां आला. शेवटीं जनरल गोदर्ड याच्या ध्यानांत आलें कीं तूर्त साऱ्या मराठेशाईंत शिंदा बलाढ्य, त्याचें राज्य सोडून आम्ही दूर मुलखीं इतरां बराबर लढत बसलों हें कांहीं त्याला अनिष्ट नाहीं; तो जों पर्यंत मराठ्यांत अग्रेसरत्वानें लढण्यास रणांगणीं उभा आहे तों पर्यंत आपलें राज्य वाढवीत रहाणार; मग त्याला जिंकायाला कोणी सांपडला तरी हरकत नाहीं; तो जों पर्यंत बलाढ्य आहे तों पर्यंत आमचा हेतु कांहीं साधणार नाहीं. तेव्हां आपण दूर दूर राहणें ही चुकी आहे; त्याला उपद्रव दिला पाहिजे. मग हाच विचार कायम होऊन खुद्द शिंद्याच्या मुलखांत धामधूम उडवावी असा निश्चय झाला.

प्रथम लेफ्टनंट कर्नल काम्याक याजबराबर फौज देऊन सरकारनें त्याची रवानगी केली. ती वार्ता समजतांच पाटीलबावांनीं जें कृत्य केलें तें ऐकिलें ह्मणजे ते जन्मतःच युद्धशास्त्रनिपुण होते असें म्हणावें लागतें. काम्याक बराबर फौज थोडी आहे अशी बातमी लागतांच त्याला मागून कुमक येऊन पोहोचली नाहीं तोंच हात दाखविला पाहिजे हें जयाचें बर्म ध्यानांत आणून तत्क्षणीं पुष्कळ फौज बराबर घेऊन त्यांणीं तळ सोडला आणि सिप्रीची वाट धरली. तरी ते येण्या पूर्वी काम्याकनें तें ठाणें घतलें आणि सिरोंज गांठलें. तेथें उभयतांची गांट पडतांच महादजीनें वेढा घालून फौजेला दाणापाणी मिळेनासें करून उपासमार केली आणि मग बाहेरून तोफांचा भडिमार सुरू केला. सात दिवस पर्यंत असा अग्निचा वर्षाव चालतांना पुष्कळच फडशा उडाला. आतां या पुढें जर येथें राहिलों तर सर्वस्व नाश झाल्या वांचून रहात नाहीं असें पक्कें समजून काम्याकनें तसेंच बाहेर पडून प्राण वांचविण्या करितां पिछेहट करण्याचें मनांत आणलें. कुमक लौकर यावी असें त्याणें तेथून जवळ जी इंग्रजी फौज होती तिजकडे मोठ्या काकळुतीनें सांगुन पाठविलें होतें, परंतु तिची वाट न पहाता तो तेथून निघालाच. सत्रा दिवस पर्यंत तो तसा पळत होता

आणि महादजी त्याच्या पाठीवर सारखा उमद्रव देत येत होता. परंतु अठराव्या दिवशीं त्याणें त्याला फसविलें. पाटीलबावांनां साऱ्या जन्मांत अशी भूल दुसऱ्या कोणत्या ही प्रसंगीं पडली नाहीं, पण यावेळीं काय झालें कळत नाहीं. काम्याक साहेबानें तारीख २८ मार्च रोजीं असें मनांत आणलें कीं आपल्या पाठचा शह कांहीं केल्या सुटत नाहीं तर एकदां साधल्यास छापा तरी घालावा. मग त्याच दिवशीं मध्यरात्री तो हळूच उठला आणि शत्रूवर अकस्मात् जाऊन पडला. शिंद्याच्या लष्करांत सारें सामसूम होतें, यामुळें त्याचा डाव चांगलाच साधला. महादजीचा अगदीं पराभव होऊन त्याचा पाठलाग करणें सोडून द्यावें लागलें. यानंतर थोड्याच दिवसांत काम्याक साहेबास कुमक देण्यास निघालेली फौज घेऊन कर्नल म्यूर येऊन पोहोंचला. महादजीवर तसा प्रसंग गुदरला म्हणून त्याणें हिम्मत सोडली नाहीं. तो खरा मराठा वीर, धीर धरून तेव्हांच सांवरला आणि थोड्याच दिवसांत चोहींकडून घोडेस्वारांची गर्दी करून त्याणें तें इंग्रजांचें सैन्य जागच्या जागीं खिळून टाकलें ; त्याला मागें कीं पुढें जाण्याची सवड ठेविली नाहीं. या प्रमाणें त्याचीच सरशी होती तरी हा धुमाकूळ आपल्याच मुलखांत असाच चालूं दिला तर परिणामीं आपलें नुकसान फार होणार इकडे नजर देऊन तो कर्नल म्यूर बराबर तह करण्यास कबूल झाला. उभयतांचा करार असा झाला कीं शिंद्यानें कोणत्याच पक्षास मिळूं नये, औदासिन्य धरून असावें आणि चोहोंकडे शांतता करण्या करितां आपली भीड खर्चावी; इंग्रजांनीं ग्वाल्हेरचा किल्ला शिवाय करून त्याचा बाकीचा मुलूख घेतला असेल तो परत द्यावा आणि यमुना उतरून पलिकडे जावें.

हा तह महादजीला आपलें हित साधण्याला पाहिजे होता तसा ऐन वेळेवर झाला. इंग्रज सरकाराला कित्येक कारणांमुळें असें वाटूं लागलें होतें कीं हें मराठ्यां बराबरचें युद्ध कसें तरी एकदां मिटेल तर बरें होईल; तसें न होतां हें जर अधिकच चेतेल तर मग आपल्याला हिंदुस्थानांतून कदाचित् गाशा गुंडाळावा लागेल. म्हणून महादजी तहाला राजी होतांच त्यांणीं इतक्या साळढाळपणानें त्याचें म्हणणें मान्य करून तें प्रकरण संपविलें. दुसऱ्याशा वेळीं तर अशा करारांनां ते कधीं ही कबूल होतेना. साऱ्या मराठ्यांत अग्रगण्य पाटीलबावा, तो एक या वेळीं स्वस्थ बसण्यास

कबूल झाला ह्मणून त्यांणीं अत्यानंद मानला. तह झाली ह्मणून महादजी-ला ही त्यांच्या प्रमाणें हर्ष झाला; त्याचीं कारणें अशीं--त्याला मुख्य आधीं एक विश्रांति पाहिजे होती ती मिळाली. लढाईचा कंटाळा आला होता ह्मणून विश्रांति पाहिजे होती असें नव्हे ; जो मुलुख जिंकून मिळवलेला होता त्याची व्यवस्था नीट लाऊन बंदोबस्त करावा, हिंदुस्थानांतील राजे लोकांत आपण स्वतंत्र ह्मणून श्रेष्ठपणानें वागूं लागावें, ग्वाल्हेरच्या किल्ला इंग्लिशांनीं घेऊन गोहदच्या राण्याला दिला होता आणि तो त्यांच्याशीं नेकीनें वागण्याचें कबूल करून चोरट्या सारखा त्यांत स्वस्थ बसला होता त्याला थप्पड मारून तो परत घ्यावा, परंतु या कामीं त्यांच्या कडून कांहीं एक हरकत येऊं नये, आपण त्याला येवढा किल्ला फक्त नीट वर्तन करण्याच्या करारानें दिला असून तें ही त्याच्यानें झालें नाहीं असें त्यांनां वाटूं लागून राण्या विषयीं द्वेष उत्पन्न व्हावा -- इत्यादि अनेक कारस्थानें त्याला करावयाचीं होतीं, ह्मणून विश्रांति पाहिजे होती. ती मिळाली ह्मणून व शिवाय आपण पेशव्यांचे नोकर ह्मणवीत असतां इंग्रजांनीं आपल्याशीं स्वतंत्रपणें तह केल्यानें आपल्याला स्वातंत्र्य आलें ह्मणून ही त्याला अत्यानंद झाला.

गोहदच्या राण्याला कांहीं तरी आगळीक करायाला लाऊन इंग्रजांचा व त्याचा बेबनाव येई असें करण्यास महादजीला मुळींच उशीर नव्हता, परंतु त्याला तसें करतां येईना. कारण पेशव्यांच्या आणि इंग्रजांच्या दरम्यान सालबाईस जो तह झाला तो त्याच्या मध्यस्थीनें झाला आणि त्या तहानें कर्नाटक शिवाय करून बाकी साऱ्या हिंदुस्थानांत शांतता झाली. हा तह पाटीलबावांच्या द्वारें मिस्टर हेस्टिंग्स यांणीं मोठ्या जलदीनें करविला. त्याचें कारण असें कीं कर्नाटकांत हैदर नाईक हा इंग्रजांनां मोठा जबर शत्रु उत्पन्न झाला होता. त्याच्यावर त्यांणीं जें सैन्य पाठविलें होतें त्याची धडगत लागण्याचें चिन्ह त्यांनां दिसेना. मराठ्यांशी जर याप्रसंगीं आपण समेट करून घेतला नाहीं तर कदाचित् महादजी हैदराशीं संधान जुळवील आणि एकदां तसें झालें ह्मणजे दोघे मिळून आपला नाश खचित करतील अशी त्यांनां भीति उत्पन्न झाली. पेशव्यांच्या दरबारीं या वेळीं सर्व कांहीं करणारे अगदीं मुखत्यार नानाफडणीस होते; त्यांनां ही लौकर एकदां तह व्हावा असें वाटत होतें. त्याचीं कारणें दोन--एक मुलखांत

लढाई चालल्यानें नुकसान व खराबी विनाकारण होते ती न व्हावी, आणि दुसरें महादजी शिंदा इंग्रजां बराबर टकर मारून फारच लौकिकास चढूं लागला, तो आतां आपल्याला जड होऊन बसेल, असा त्याच्या विषयीं त्याला मत्सर व द्वेष उत्पन्न झाला होता ; ह्मणून नाना महादजीला जाजती प्रबळ होऊं न देण्याच्या विचारांत होता. या समयीं मराठे व मुसलमान एक झाले पाहिजेत असें पाटीलबावांच्या ध्यानांत आल्या शिवाय कांहीं राहिलें नाहीं ; हैदराबराबर त्यांचें बोलणें सुरू होऊन त्याला त्यांणीं नादास ही लाविलें व बंगाल्यावर स्वारी करावी असा विचार करून त्या गोष्टीला नानाफडणिसाचा रुकार ही घेतला, परंतु यांत आपलें हित किंतपत होईल याचा अंदाज करतांनां वर सांगितलेल्या कारणां करितां इंग्रजां बराबर तह करून विश्रांति मिळविण्यांत नफा आहे असें त्याला वाटलें त्या बराबर त्याणें तोच विचार निश्चयांत आणला.

सालबाईच्या तहानें महादजीला पूर्वी मिळालेला मुलुख त्याजकडे कायम राहून वडगांवच्या तहांत इंग्रजांनीं भडोज शहर त्याला देण्याचें कबूल केलेलें होतें, तें त्याच्या ताब्यांत आलें. त्या तहनाम्यावर सही होते इतक्यांत आपण ही गोष्ट शहाणपणाची केली असें महादजीला वाटण्या सारखा प्रकार बाहेर घडून आला ; मग त्याचा आनंद काय विचारावा ! सालबाईच्या तहनाम्यावर सही तारीख १७ माहे मे सन १७८२ रोजीं होऊन तो तारीख ६ जून रोजीं बहाल झाला आणि तारीख २४ फेब्रुआरी १७८३ रोजीं पेशव्यांच्या पदरांत पडला. तर प्रथम सही होऊन अखेर ठरावा प्रमाणें वर्तन होई पर्यंत जो हा सुमार नऊ महिने काल मध्यें गेला त्यांत दिल्लीच्या दरबारीं बरीच उलटा पालट झाली, तिच्या योगानें महादजीच्या मनांत जी गोष्ट अहोरात्र एकसारखी घोळत होती आणि वीस बावीस वर्षांपूर्वी सारा महाराष्ट्रदेश शोकसागरांत बुडण्याला जी कारण झाली होती, ती साध्य होण्याचा रंग दिसूं लागला.

इसवी सन १७७३ मध्यें मराठे हिंदुस्थानांतून निघून आले तेव्हां पासून दिल्लीच्या बादशाहीचा कारभार रोहिल्यांचा प्रतिपक्षी मिरझानजाफखान चालवीत होता. त्याचा अम्मल एकंदरींत पहातां बरा बसला असून हितावह होता. बादशहाचें नांव जें अगदीं लोपल्यासारखें होऊन गेलें होतें त्याचें पुनरुज्जीवन करून स्वराज्यांत व परराज्यांत त्याणें मोंगलांचा पुनः

एकवार दरारा बसविला. औरंगजेबाची कारकीर्द संपल्यी पासून मोगल.जे अगदीं निर्माल्यवत् होऊन गेले होते त्यांनां हा वजीर पुनः नांवा लौकिका स आणतो असें दिसूं लागलें होतें, परंतु गादीची सद्दीच संपली, मग तें क सें होणार! त्याचें आयुष्य संपून तारीख २२ एप्रिल सन १७८२ रोजीं तो मृत्यु पावला; त्या बरावर झोटिंगबादशाही सुरू झाली. राज्यांत दुफळी आधींच होती आणि आतां आपल्याला अधिकार मिळावा म्हणून अनेक असामी खटपटी करूं लागल्यानें नानाप्रकारचीं कारस्थानें माजलीं. हें पाटीलबावांनां मोठें इष्ट, अगदीं त्यांच्या मनाप्रमाणें झालें. हैदराबरावर सख्य करून इंग्रजांनां घालवून लावण्या करितां त्यांच्याशीं लढत बसण्यापेक्षां त्यांच्याशींच गोड होऊन इकडे जवळच्या जवळ दिल्ली हातांखालीं घालावी हेंच त्याला अधिक श्रेयस्कर वाटलें. मग सन १७८२ च्या अखेरीस दिल्लीकडे तुम्ही हवें तें करा. आम्ही तुम्हाला आडवे येत नाहीं, असें वॉरन हेस्टिंग साहेबाकडून वचन घेऊन त्याणें तोच निश्चय केला आणि मनांत जो एक एक बेत आणला होता तो तडीस नेण्याचा क्रम सुरू केला. त्याला साहित्य कोणतेंच कमी नव्हतें.

याप्रमाणें उपस्थित झालेलें हें दिल्लीचें थोरलें राजकारण नीट साधण्याला मागें दुसरा कांहीं बेध नमावा म्हणून महादजीनें प्रथम आपल्या राज्याची व्यवस्था लाविली. त्याचें संरक्षण उत्तम झालें पाहिजे म्हणून गोहदचा राणा जो कांट्या सारखा त्याच्या मनांत खुपत होता त्याच्याशीं तंटा उकरून काढून त्याणें ग्वाल्हेरचा किल्ला हिसकून घेतला. त्यावेळीं इंग्रज राण्याचा कैवार घेते, परंतु कर्नाटकांत हैदर जरी मेला होता तरी त्याचा मुलगा टिपू त्यांनां चैन पडूं देत नव्हता; यामुळें त्यांनां इकडे पहाण्याला सवड होईना. अशी इकडची सर्व व्यवस्था लाऊन निःकाळजी होतांच पाटील बावांनीं दिल्लीमध्यें बुंद्द चालले होतें त्यांतील एका पक्षाकडे संधान लाऊन बादशहाकडून आपल्याला निमंत्रण येई अशी तजवीज केली. याच समयास उभय पक्षांपैकीं एकीकडील एका प्रमुख मुत्सद्याचा खून झाला. तेव्हां महादजीचें पाऊल चांगलेंच शिरकलें.त्याणें आग्र्यास जाऊन बादशहाची भेट घेतली व त्याजबरावर दिल्लीस जाऊन आपलें बस्तान इतकें उत्तम बसविलें कीं बादशहा त्याला आपली वजिरी देऊं लागला. परंतु तीं त्याणें आपल्या नांवानें न पतकरतां आपले यजमान पेशवे यांचे

नांवें करून घेऊन आपण त्यांचे मुतालीक म्हणून काम चालविलें. असें करण्यांत पेशव्यांस थोरपणा देऊन त्याणें त्यांची मर्जी सहज संपादिली आणि दिल्लीचा कारभार आपल्या हातांत राखला. ह्या वेळे पासून पुढें दौलतराव शिंद्याचा लॉर्ड लेक याचे हातून पराभव होई पर्यंत उत्तर हिंदुस्थानांतील बादशाही मुलुख मध्यंतरी थोडाकाळ शिवाय करून मराठ्यांच्याच ताब्यांत असल्या सारखा होता. बादशहा नांवाचे मालक ; खाऊन पिऊन स्वस्थ होते.

महादजीला दिल्लींत अधिकार मिळाला, परंतु तेव्हांपासून पांचवेंपर्यंत तो कायम राखण्याकरितां त्याला एक सारखी दगदग करावी लागली. हा मराठा दरबारांत शिरला हें तेथल्या अमीर उमराव वगैरे मोठ मोठ्या मुसलमान सरदारांस सहन कसें व्हावें ? त्यांतून राज्यांत आधींच अनेक फळ्या झालेल्या होत्या ; तेव्हां मुसलमान लोक याचा अम्मल सुरळीत चालूं देतील असें होणें सर्वथा अशक्य होतें. त्यांत ही आज पर्यंत सारख्या लढाया चालत आल्यानें व आणखी अनेक कारणांनी मुलखास सतत त्रासच पोहोचत गेल्यानें प्रजा निर्धन होऊन गेली होती. तरी दरबारांत पैशाची जरूर फार असल्यामुळें त्यांनां पिळून काढण्याचा क्रम चालूच होता. तो कांहीं कमी पडेना म्हणून शिंद्याला लोक खुप होतना. रजपूत, जाट, शीक, व कांहीं खुद त्याजबराबरचेच लोक, हा या अधिकाराच्या काय उपयोगीं असें म्हणूं लागले. परंतु पाटीलबावा एवढां बादशा ही अम्मल हातीं आलेला अशा लोकांच्या बडबडीला भिऊन सोडतात कीं काय ? त्यांणीं डी बॉइग्नी नामक एक फ्रेंच सरदार आपल्या चाकरीस ठेऊन त्याजकडून कवाईत शिकवून दोन पलटणें नवीं तयार करविली, आणि जसजशी सवड सांपडली तसतशी हीच फौज वाढवून तिची तयारी ही चांगलीच केली. तशीच बिन कवाइतीची जी फौज होती तींत ही पुष्कळ सुधारणा करून तींत रजपूत व मुसलमान ही भरतीस घालून ती ही त्याणें कवायतीच्या फौजे सारखी तयार केली. त्याचा रणोत्साह आणि हिम्मत अशी विलक्षण असत कीं तीं पाहून त्याच्या सैन्याला स्फुरण येई ; आणि कित्येक वेळ त्याची कांहीं फौज जरी बेमानपणानें विश्वासघात करून त्याला सोडून गेली व त्यामुळें त्याचा पराजय झाला तरी तो डगमगत नसे. जयपूरच्या लढाईत त्याचें कवायती पायदळ ऐन प्रसंगीं त्या

ला सोडून गेलें त्यामुळें त्याचा पराभव झाला, परंतु तो मोठा हिम्मतवान् पुरुष ह्मणूनच त्याणें एक क्षण फुरसत न पडूं देतां आपलीं मजबूद ठिकाणें होतीं तीं बचावलीं, आणि मग बरेंच जाट सैन्य जमवून राणाखान व डी बॉइग्नी या उभयतां बराबर पुष्कळ फौज देऊन त्यांनां पुनः समरांगणीं उभें राहण्यास पाठवून दिलें. तारीख २४ एप्रिल सन १७८८ रोजीं ह्या ही फौजेचा आग्ऱ्याजवळ अगदीं पराभव झाला, तरी न गडबडता त्याणें इतक्या त्वरेनें पुनः सैन्य गोळा केलें कीं महिना दीड महिन्याच्या आंत त्याची तयारी होऊन जूनच्या १८ व्या तारखेस त्याणें लढाई करून शत्रूचा अगदीं फडशा पाडला. मोगल लोकांचा सरदार गुलामकादर याणें शहाअलम बादशहावर हल्ला करून त्याचे डोळे काढले, त्याच्या कुटुंबांतील माणसांचे हाल केलें आणि दिल्लीतील लोकांवर ही तसाच जुलम करून आपलें नांव क्रूरकर्मा ह्मणून इतिहासांत अक्षय्य राही असें केलें तें या लढाई नंतर. परंतु दिल्लींत हा त्याचा थयथयाट व अनर्थ फार दिवस चालला नाहीं. तारीख ११ आक्टोबर रोजीं राणाखान व डी बॉइग्नी याणीं दिल्ली घेतली आणि पुढें लौकरच पाटीलबाबांनीं स्वतः येऊन आंधळ्या शहाअलमास पुनः राज्यपदारूढ केलें व गुलामकादरास कैद करून पिंजऱ्यांत घालून ठेविलें. या प्रमाणें त्या गुलामाचा बंदोबस्त झाला परंतु तेवढ्यानें अगदीं निष्कंटक झालें नाहीं. इस्मायल बेग ह्मणून एक सरदार बलाढ्य होता तो युद्धाला उभा राहिला. तारीख २० जून सन १७९० रोजीं उभयतांचा घोर संग्राम होऊन महादजीस यश आलें. त्यामुळें त्याचा दरारा चांगलाच बसून अम्मल नीट चालूं लागला. इस्मायलबेगाचे सहाकारी कांहीं रजपूत होते, ते त्याचा पराभव झाला ह्मणून हिम्मत न सोडतां तयारी करीतच होते. त्यांच्याशीं पुढच्या वर्षी सप्टंबरच्या १२ तारखेस युद्ध होऊन त्यांचा ही पराभव झाला. परंतु हे खरे शूर लोक, यांच्याशीं फार जिकीर केली तर हट्टास पेटून असेच सतत लढत राहतील, त्यापेक्षां ह्यांचें मन संतोषित करावें हें बरें, असा पोक्त विचार करून महादजीनें त्यांनां पुष्कळ सोईवार असा तह केला.

टिपूवर सन १७९०—९२ पर्यंत जी मोहीम झाली तींत महादजी शिरला नाहीं. त्याचें उलटें असें मत होतें कीं इंग्रजांनां मदत देऊन टिपू मोडणें हें अगदीं अप्रशस्त होय. त्याचें आणि इंग्रजांचें जों पर्यंत तों

ड जुंपलेलें राहील तों पर्यंत मराठेशाहीला दोघांतून एकाच्यानें ही धक्का लावावणार नाहीं. परंतु त्याचा संहार उडवण्यास जर आपण सहाय झालों तर इंग्रजांचें सर्वस्वीं हित होईल. त्याच्या मनाची अशी पक्की खात्री होती झणून नानाफडणाविसाचें करणें त्याला अगदीं नापसंत होऊन इंग्रजांनां मदत केल्याबद्दल त्याणें त्याला फार दोष दिला. नानाचें व त्याचें चित्त शुद्ध नव्हतेंच. तो भित्रा, आंतून गुप्त कारस्थानें करीत होता, आणि तुकोजी होळकर उघड उघड तयारींत होता. तसाच वायव्येकडून अबदालीचा नातू चालून येईल हें भय होतें झणून कसा ही प्रसंग आला तरी सहज पार पडण्या करितां त्याणें स्वराज्याचा बंदोबस्त उत्तम ठेवण्याकडे सारखें लक्ष लाविलें. तो झाल्यानंतर त्याणें असें मनांत आणलें कीं नाना फडणीस तुकोजी होळकर वगैरे मंडळीस असें भीत कां बसा, पुण्यास हुजूरच एकदां जाऊन बसलें झणजे त्यांचे सारे बेत भराभर लटपटवायास सांपडतील. मग त्या प्रमाणें निश्चय करून दिल्लीच्या कारभाराचा बंदोबस्त करून, जिवबादादाबक्षी यांचे स्वाधीन आपलें सारें राज्य करून, वादशहा पासून पेशव्यांचे नांवें वजिरीचीं वस्त्रें, मानमरातब, वगैरे पेशजीं घेतलेले श्रीमंतांस प्रविष्ट करण्याकरितां झणून स्वारी हिंदुस्थान सोडून दक्षिण देशीं यावयास निघाली. श्रीमंतांचीं निमंत्रणपत्रें पूर्वी गेलींच होतीं. महादजीचा अंतस्थ हेतु निराळा होता. जशी दिल्ली हातांखालीं घातली तसें पुणें ही घालून बसावें, जसा दिल्लीचा अंध बादशहा मुठींत वागवावयास सांपडला तसा पुण्याचा बालपेशवा खेळवावयास सांपडणार नाहीं असें नाहीं, आणि तेवढें साधलें झणजें झालें; मग औरंगजेबाला उपभोग घ्यावयास मिळाली तिजपेक्षां ही मोठी राजलक्ष्मी आणि त्याचा प्रतिस्पर्धी हिंदुपदबादशाहीचा स्थापनकर्ता छत्रपति शिवाजी याणें संपादलेली कीर्ति, ह्या दोन्ही आपल्यास एककाळींच प्राप्त होतील अशा आशेनें अनेक बेत मनांत आणीत पाटीलबावा चालले; परंतु ते तृष्णांध होऊन बेफाम झाले नाहींत. दिल्ली दरबारची व पेशवे दरबारची बातमी राखीत हलक्या हलक्या मजला करीत, मध्यें मध्यें बरेच मुक्काम करीत, जसा प्रसंग पडेल तसें पुढें किंवा मागें जलद जातां यावें असा बेत राखीत, आस्ते आस्ते मजल दर मजल एक लाख फौजेनिशीं तारीख ११ जून सन १७९३ रोजीं स्वारी पुण्यास दाखल झाली.

आज मितीस शिंद्या येवढा थोर सरदार आपल्या पदरींचसा काय परंतु साऱ्या हिंदुस्थानांत दुसरा नाहीं झटलें तरी चालेल असें पाहून श्रीमंतांनीं त्याचा फार सन्मान केला. स्वामिदर्शनानें महादजीस मोठा संतोष झाला. नंतर मुमहूर्तावर मोठा दरबार भरून त्यांत पाटीलबावांनीं दिल्ली हून आणलेले बादशाही वजिरातीच्या मसनदाचे पोषाक, नालखी, जवाहीर वगैरे मोठ्या समारंभानें हुजूरांत प्रविष्ट करून अशी विनंती केली कीं हल्लीस वजिरातीचा कारभार करावयाचा तो श्रीमंतांचे तर्फे याच सेवकानें करावा अशी आज्ञा असावी. तें सर्वांचे मनास येऊन वाड्यांत गेल्यावर त्यांणीं महादजीस वजिरातीच्या गुमस्तेगिरीचीं वस्त्रें दिलीं. पाटीलबावा दिल्ली पर्यंत मराठ्यांचा झेंडा लाऊन आले झणून त्यांची सर्वतोमुखी स्तुति चालली, श्रीमंतांजवळ बस्तान चांगलें बसलें, तेव्हां त्यांणीं आपला अंतस्थ हेतु प्रकट केला. नाना फडणिसास तें भय होतेंच, त्यामुळें विषाद वाटला आणि त्याणें आपलें स्थान कायम राखण्या विषयीं करावयाचा तो विचार केला. कांहीं दिवस पर्यंत महादजीस श्रीमंतांचें उत्तर मिळालें नाहीं. परंतु त्याणें एक दिवस श्रीमंतांजवळ दुसरें कोणी नाहीं अशी संधी आणून विनंती केली कीं " सरकारची दिवाणगिरी मिळावी व सर्व राज्याचा कारभार करावा असा हेतु धरून मी हिंदुस्थानांतून आलों आहें. हा सरकारांनीं शेवटास नेला पाहिजे. नाना जो कारभार करतात तो मजकडे सांगावा. " त्यावर श्रीमंतांनीं उत्तर केलें " माझा उजवा हात नाना फडणीस व डावा हात महादजी शिंदे तुम्ही. हे दोन्ही हात कायम आहेत तों पर्यंत राज्य कारभाराविषयीं मी बेफिकीर. याज करितां जें चाललें आहे त्यास तुम्ही कांहीं फांटा फोडूं नये. " या उत्तरानें महादजी कुंठित झाला.

हें वर्तमान नानास कळलेंच. नंतर हरीपंत तात्या फडके यांच्या मध्यस्थीनें महादजीनें नानाशीं सख्य केलें. आपला हेतु आज साधला नाहीं झणून पुढें म्हणजे सफल होणारच नाहीं असें नाहीं, असें तो मनांत समजून होता व त्याणें पुनः श्रीमंतांची मनोधारणा चालविली. चैत्रशुद्ध १ शके १७१९ या दिवशीं पुण्यांत जो रंगाचा अनुपम समारंभ झाला व मनोहर कवीनें आपल्या रसाळ वाणीनें त्याचें हृदयंगम वर्णन केलें आहे, तो याच उद्देशानें झाला*. नाना फडणिसाचा मित्र जो तुकोजी होळकर त्याचा पराभव होऊन तो अगदीं जेरीस आला हें वर्तमान व तेवढा इस्मा-

येलबेग जो आपलां एकटा मुसलमान शत्रु उरला होता तो ही कैद झाला हें वर्तमान त्याला येऊन पोहोंचलें तेव्हां आतां साऱ्या उत्तर व पश्चिम हिंदुस्थानांत व बहुतेक मध्यहिंदुस्थानांत आपल्याला शत्रु उरला नाहीं ह्मणून त्याला आनंद झाला. नाना फडणीस सवाई माधवरावाला उत्तरोत्तर अधिकच जाचांत ठेऊं लागला त्या मुळें त्याला त्यांतून मुक्त होण्याची इछा होऊं लागली. असा चोहीं कडून बराच मेळ जमून येऊं लागला तेव्हां पाटीलबावांस आपलें कार्य पुढें मागें होईल असें वाटणें कांहीं गैर नव्हतें आणि त्याला जर आणखी थोडें आयुष्य असतें तर तो तें करून घेतल्या शिवाय राहिला नसता. परंतु ईश्वरेच्छा तशी नव्हती. महादजींचीं कारस्थानें अशीं पुढें रंगाला येणार तों त्याला नवज्वराची भावना होऊन भाद्रपदमासीं* वानवडीवर देवाज्ञा झाली. त्याला मूल नव्हतेंच व त्याणें दत्तक ही घेतला नाहीं. परंतु त्याचा सख्खाभाऊ तुकोजी याचा नातू दौलतराव ह्मणून न होता त्याला आपल्या मागें सरदारी व जाहागीर मिळावी अशी त्याणें आपली इछा प्रदर्शित केली होती. तसें होऊं नये ह्मणून त्याच्या बायकोनें कांहीं खटपट केली, परंतु शेवटीं दौलतरावासच दौलत मिळाली.

पाटीलबावांच्या मरणानें मराठे मंडळांतील उत्कृष्ट मोहोरा, फार मोठा वीर आणि दूरदृष्टि मुत्सद्दी नाहींसा झाला. तो पानपतांतून निभाऊन सरदारीचीं वस्त्रें मिळावीं ह्मणून श्रीमंतांस विनंती करण्या करितां प्रथम पुण्यास आला आणि आतां बादशाही वजिरातीचीं वस्त्रें श्रीमंतांस समर्पण करून त्यांचा होत्साता दिल्लीस काम करण्या करितां मुतालकीचीं वस्त्रें घेण्यास त्यांच्या पुढें उभा राहिला या दोहों गोष्टींचे मध्यंतरील कालांत त्याची कीर्ति दिगंतरीं जाऊन अजरामर होऊन राहिली. तो नर्मदा उतरून उत्तर प्रदेशीं गेला आणि पर मुलुख जिंकणें, शत्रूला लुटणें, राजकारस्थानांचे व्यूह रचणें इत्यादि त्याच्या कारकीर्दींतील जीं अनेक मोठमोठीं कृत्यें, त्यांस जो एकदां आरंभ झाला तो मग तो मरे पर्यंत अव्याहत चालला हो-

---

* महादजी पुण्यास यावयास निघाल्या पासूनचा वृत्तात मूळ इंग्रजी पुस्तकांतला नव्हे ; तो आम्ही पेशव्यांच्या बखरींतून घेतला आहे. महादजी वारल्याची तारीख १२ फेब्रुवारी सन १७९४ असें इंग्रजी ग्रंथांत आहे. आम्हांस बखर जास्त विश्वसनीय वाटते.— भाषांतरकर्ता

ता. स्वकार्य साधण्याविषयींची त्याची युक्ति मोठी चमत्कारिक होती. मी श्रीमंतांचा नोकर, त्यांच्या आज्ञेप्रमाणें वागावयाचें, असें ह्मणून त्यांच्या नांवावर त्याणें माळव्यांतील व उत्तर हिंदुस्थानांतील राजे एका मागून एक पादाक्रांत करून त्यांजपासून करभार घेण्याचा झपाटा लावला व मुलुख ही पुष्कळ काबीज केला. यजमानांचे आज्ञे प्रमाणें ह्मणून तो राज्य वाढवीत व जुलूम करीत सुटला होता, परंतु पेशव्यांस त्या राज्यापैकीं द्रव्याची प्राप्ति सरासरी नांवाचीच होती. श्रीमंतांस यजमान यजमान ह्मणून त्यांच्याशीं फारच अदबीनें व लीनतेनें वागणें व हरएक गोष्टींत त्यांचें नांव पुढें करणें हा तर महादजीचा विलक्षण गुण होता. सर्व हिंदुस्थान खरोखर त्याच्या अमलांत आल्यानंतर देखील तो पेशव्यां समक्ष आपण होऊन खालीं बसत नसे. शाहाअलम बादशाहा सर्व प्रकारें त्याचा अगदीं कैदी असल्या सारखा झाला होता, तरी त्याच्याशीं महादजी फारच लीनतेनें, हलक्या मनुष्याप्रमाणें वागे. त्याणें लाहान मोठे जितके रजपूत राजेरजवाडे स्वत्रश करून टाकले होते त्या सर्वांशीं बाह्यतः तो असें वर्तन ठेवी कीं कोणी म्हणेल हा त्यांच्या प्रजेपैकीं मनुष्य आहे. परंतु त्याची जी येवढी भरभराट झाली ती केवळ त्याच्या अशा लीनतेच्या वर्तनानें किंवा वक्रतेनें ही नव्हें. त्याणें इंग्लिश फौजेची तऱ्हा बारीक दृष्टीनें लक्ष लाऊन पाहिली आणि सैनस कवाईत शिकविण्यापासून व तींत एक तऱ्हा ठेवण्यापासून तिचे अंगीं कसें सामर्थ्य येत असतें हें आपल्या कुशाग्रबुद्धीनें व चाणक्षतेनें तेव्हांच जाणलें. मराठ्यांचें दळ ह्मणजे बेबंद, स्वेछाचारी, अस्ताव्यस्त असे ; परंतु त्याला त्याणें शिस्त लाऊन त्याच्या निरनिराळ्या टोळ्या केल्या. पहिल्या तोफा फारच मोठ्या, अवजड, बैलांच्या शेंपन्नास जोड्या लावाव्या आणि सारखी हाणामार करावी तेव्हां जागा सोडून चालूं लागत, असल्या होत्या त्या टाकून त्याणें इंग्रजी तऱ्हेचा घोडे लाऊन ओढण्याचा तोफखाना तयार केला, आणि फ्रेंच व इंग्लिश कामदार नेमून सहा कंपू तयार केले. इतकी खटपट करण्यांत त्याचे मुख्य हेतु दोन होते; एक आपल्याला राज्य असावें आणि दुसरा हे इंग्रज शस्त्रास्त्रविद्येंत निपुण असे प्रबल शत्रु उत्पन्न झाले आहेत, परंतु त्यांच्याशीं सामना करण्यास भिऊं नये, मराठे शूरत्वांत कमी नव्हत अशी त्यांची खात्री करून द्यावी. हे त्याचे दोन ही हेतु सिद्धीस गेले असेंच म्हटलें पाहिजे. त्याणें राज्य स्थापिलें

तें अद्यापि चालत आहे, हिंदुलोक रणशूर आहेत कीं नाहीं येविषयीं त्या णें इंग्रजांची किती खात्री करून दिली आणि सेनापतित्व करण्यांत तो त्यांच्या बरोबरीचा होता कीं कमी होता हें मागील वृत्तांतावरून स्पष्ट क-ळतच आहे. इंग्रजी पद्धतीवर कवाईत शिकवून त्याणें जें सैन्य तयार के-लें त्याचा तो मेल्यावर आठ वर्षांनीं लॉर्ड लेक व वलैस्ली या उभयतांनीं मोड केला खरा, परंतु रणभूमीवर मराठे वीरांनां आपल्या शब्दांनीं स्फुरण चढाविण्याला आणि बिकट प्रसंगांतून युक्तीनें पार पाडण्याला तो जर अ-सता तर शिंद्याचा पराभव करणें इंग्रजांनां पुष्कळच जड जातें. पाटील-बावाला जर थोडें जास्ती आयुष्य असतें तर लेक साहेबाला आणि वेले-स्ली साहेबाला त्या फौजेचा असा पिछा पुरवायाला कधीं सांपडला नस-ता. तो जरी येवढा बलाढ्य होता तरी आतां इंग्रज मोडणें हें आपल्या सारख्या एकट्या दुकट्याचें काम नव्हे हें खरें ओळखून सारें हिंदुस्थान ए-क झालें पाहिजे असें म्हणत होता. त्या प्रमाणें त्याणें साऱ्या देशभर का-रस्थानें करून भगव्या झेंड्याच्या संरक्षणार्थ दशादिशा हालवून सोडल्या असत्या. टिपूचे घोडेस्वार आणि फ्रेंच सरदारांनीं कवाईत शिकविलेलें पा-यदळ, निजामाचा जंगी तोफखाना, राजस्थानांत जागोजाग असलेले लहान थोर राजेरजवाडे, ठाकूर, तलवार बहादर रजपूत, पूरभय्ये, आणि " हर-हर महादेव " असा ध्वनि कानीं पडतांच स्फुरण पाऊन अस्तणी वर सार णारा कोंकण, पुणें, इंदूर, बडोदें, नागपूर वगैरे प्रांतीं सांपडता तेवढा म-राठा, हातांत भाला बर्ची देऊन रणांगणीं उभा केल्या शिवाय तो कधीं र-हाताना. इतकेंही होऊन हिंदुस्थानची राजलक्ष्मी इंग्रजाकडे जाणारच अ सती तर जाती, परंतु पाटीलबावा असते तर तिला थोडावेळ तरी रहाती करते यांत संशय नाहीं. परंतु त्यांनांच मृत्युनें ओढून नेलें तेव्हां त्यांचे सारे बेत जागच्या जागीं राहिले, आणि आतां मराठ्यांचें नांव बुडतें, मग नशिबानेंच काय दिवस जाणार असतील ते जातील असें वाटूं ला-गलें.

दौलतरावशिंद्याला पाटीलबावाचें म्हणजे चुलत आजोबाचें येवढें अ फाट राज्य प्राप्त झालें त्यावेळीं त्याचें वय सारें १५ वर्षांचें होतें. त्याची चा-लरीत, अक्कल हुशारी अजून लोकांस कळून यावयाची होती. त्याला ही काम काजाची माहिती करून घ्यावयाची होती; परंतु इतक्यांतच मोठमोठीं

राजकारणें अकस्मात् उपस्थित झालीं. त्यांतून चांगल्या रीतीनें पार पड-ण्याला अनुभव, दम, व पोक्तविचार इत्यादि मुत्सद्याच्या अंगीं अवश्य ला-गणारे गुण दौलतरावाच्या अंगीं येण्यास अवकाश सांपडला नाहीं त्या मु-ळें स्थिति कशी झाली पहा.

सवाई माधवराव पेशवे यांणीं अस्वस्थचित्त होऊन गणपतिरंगमहा-लाचे सातखणी वरून उडी घेतली ती कारंजावर पडून फार लागलें, आ-णि पुढें दोन दिवसांनीं म्हणजे तारीख २५ आक्टोबर सन १७९५ रो-जीं त्यांचा काळ झाला. ही गोष्ट साऱ्या मराठेशाईवर जीं पुढें महत्संकटें ओढवलीं त्यांनां आदिकारण होय. माधवराव मरतांच राघोबादादाचा पुत्र बाजीराव आपल्यास पेशवाईची गादी मिळावी म्हणून खटपट करूं लागला बाजीराव तरुण, चांगला बुद्धिमान, महत्वाकांक्षी, परंतु मनाचा अतिशय खोटा, हवें तें दुष्कर्म करणारा होता. त्याला गादी मिळूं नये असा नाना फडणिसाचा पहिल्या पासून अगदीं संकल्प होता, म्हणून त्याणें त्याला शि-वनेरी किल्लयावर प्रतिबंधांत ठेऊन राज्यव्यवहार प्रकरणीं शिक्षण अगदीं मिळूं दिलें नाहीं.

सन १७९५ मध्यें खर्ड्याची स्वारी होऊन निजामाचा अगदीं मो-ड करून मराठे विजयी झाले. त्या मोहिमेंत दौलतराव शिंदा होताच. तो श्रीमंतांची स्वारी पुण्यास परत आल्यावर निरोप घेऊन हिंदुस्थानांत परत निघून गेला. इतक्यांत मागें माधवरावानें प्राणत्याग केला तेव्हां नाना फ-डणिसानें त्याला मुजरत बोलावणें पाठविलें ; त्या बराबर तो जोंधपुरांवाहून तसाच परतून पुण्यास दाखल झाला. नानाचा व त्याचा वरोपचारी स्नेह जमलेला होता.

नाना फडणिसाचा बेत असा होता कीं शिंदे, होळकर प्रभृति स-रदारांच्या समतीनें माधवरावाची स्त्री यशोदाबाई इच्या मांडीवर दत्तक पुत्र देऊन त्याला गादीवर बसवावें. नानास बहुतेक सरदार अनुकूल होतेच म्हणून दत्तक द्यावा असें ठरलें. ही मसलत शिंद्याचा दिवाण बाळोबाता-त्या रेणवी याच्या पसंतीस आली नाहीं. बाजीरावानें त्याच्याकडे संधान लाऊन त्याला अनुकूल करून घेतलें होतें ; परंतु जिवबादादावक्षी शिंद्या-च्या लष्कराचा मुख्य अधिकारी असून त्याचें पाठबळ बाळोबास मिळेना, त्या मुळें त्याचें कांहीं चालेना ; तेव्हां तें प्रकरण भिजत पडलें. इतक्यांत

जिवबादादा मरणपावला. त्याणें मरते वेळीं शिंद्यास सांगितलें कीं बाळाजी विश्वनाथाचा वंश असतां बाहेरील मनुष्य गादीवर बसवावा हें बराबर नाहीं; मागें मी जी नानाचे म्हणण्यास संमति दिली ती बराबर नाहीं. हें बाळोबास इष्टच झालें. बाजीरावानें त्याला पुष्कळ द्रव्य देऊं केलें होतें; आणि शिंद्याला चार लक्षांचा मुलुख व तो पुण्यास असे पर्यंत लष्करास लागेल तो खर्च ही देण्याचें कबूल करून त्याला ही वश करून घेतलें.

मग बाजीरावाला गादीवर बसविण्याच्या बाबतींत जीं शिंद्यानें व नाना फडणिसानें एकमेकांचा उलट राजकारस्थानें केलीं तो वृत्तांत मोठाच आहे. त्यांत बाजीराव शिंद्याच्या हातीं सांपडून बाळोबातात्यानें त्याला हिंदुस्थानांत पाठविण्याचें ठरविलें आणि सखाराम घाटगे म्हणून एक शिलेदार होता त्याजबराबर फौज देऊन त्याची रवानगी केली. हा सखाराम घाटगा हवें तें कर्म निःशंकपणें करणारा होता. त्याला बाजीरावानें अनेक प्रकारें नादास लाऊन वश करून घेतलें; आपण गादीवर बसलों म्हणजे दौलतरावास दोन कोट रुपये देऊं व त्याची दिवाणागिरी तुला देववूं असें वचन दिलें. त्याणें आणखी खटपट करून घाटग्याच्या मुलीचा दौलतरावाशीं विवाह जमवून दिला. हा शरीरसंबंध शिंद्याला फार दुःखकारक झाला. लग्नानंतर सखाराम घाटग्यास सरजेराव असा किताब मिळाला व कागल गांव इनाम झाला.

इतक्यागोष्टी होत तों मध्यंतरीं दौलतरावाचें वजन चमत्कारिक रीतीनें बसलें. तुकोजीराव होळकर वारल्या नंतर त्याच्या मुलांमध्यें सरदारी बद्दल तंटा लागला. तेव्हां दौलतरावानें काशीरावाचा पक्ष धरून त्याचा शूर बंधु मल्हारराव याचा खून करविला व त्याचा अल्पवयस्क पुत्र खंडेराव यास आपल्या हातीं घेऊन त्याच्या नांवानें राज्य चालविलें. या व्यवस्थेनें त्याला कांहीं काळपर्यंत माळव्यांत कोणाचें भय बाळगावयास नकोसें झालें.

दौलतरावानें कुलाब्याचा किल्ला घेऊन तेथील किल्लेदारास कैद करून टाकलें व किल्ला आणि त्या खालचा मुलुख बाबूराव आंग्र्या म्हणून एक जवळच्या भाईबंद होता त्याच्या स्वाधीन केला. या योगानें घाटाखालीं ही त्याचा दरारा बसला.

बाजीरावाला शिंद्यांच्या साहाय्यानें पेशवाई प्राप्त झाली, मग त्यांची

कांहीं जरूर राहिली नाहीं व तो फौजबंद असल्यामुळें उलट त्याचें भय वाटूं लागलें ; तेव्हां त्याणें आपली कपटविद्या काढून पूर्वी जसें नाना फडणीस एवढा थोरला शहाणा व गादीचा इमानी नोकर असतां त्याला कैद करून किल्ल्यावर नेऊन टाकलें होतें, तसेंच शिंद्यास ही बक्षीस देण्याचें मनांत आणलें. त्याचा द्वेषभाव अद्वितीय असून त्याणें जो डाव घातला तो ही तसाच विलक्षण होता. वर जो सखाराम घाटग्याच्या मुलीशीं दौलतरावाचा विवाह व्हावा असा त्याणें घाट घातला म्हणून सांगितलें तो त्याच्या चांगला उपयोगीं पडला. दौलतरावाचें तें लग्न सन १७९८ च्या मार्च महिन्यांत मोठ्या थाटानें झालें. त्याला अतिशय खर्च लागून लोकांचें देणें झालें. तें फेडण्या करितां बाजीरावानें आपल्यास गादीवर बसविण्या बद्दल जे दोन कोट रुपये देऊं केले होते ते तो मागूं लागला. तेव्हां बाजीरावानें आपल्याजवळ पैसा शिल्लक नाहीं म्हणून मोठी दिलगिरी दाखवून अशी युक्ति काढली कीं सखाराम घाटग्यास पुण्याचा कारभार सांगावा म्हणजे तो पैका जमवून देईल. दौलतराव त्याला मान्य होऊन घाटगे कारभार करूं लागले. मग जो प्रकार झाला तो न भूतो न भविष्यति. त्याणें लोकांवर विलक्षण जुलूम जबरी करून अतोनात पैसा काढला. यांत कितीएक लोक प्राणास मुकले. असा अनर्थ उडाला तेव्हां अर्थातच लोकांनां शिंद्याचा तिटकारा येऊन गेला.

बाजीरावाला हेंच पाहिजे होतें. घाटग्याच्या जुलमाला लोक त्रासले तेव्हां आतां शिंद्याला नाना फडणिसाच्या भेटीस पाठविण्यास कांहीं हरकत नाहीं असें पाहून बाजीरावानें तशी तयारी केली. मग जो प्रकार झाला त्याचें ग्रांटडफ साहेबांनीं असें वर्णन केले आहे. — इतक्या—म्हणजे वर सांगितलेल्या — पंथास गोष्ट येऊन ठेपली, शिंद्याला सारे लोक अगदीं त्रासून गेले तेव्हां अमृतराव साहेबांनीं (हे बाजीराव साहेबाचे दत्तक बंधु व कारभारी) खाशांच्या संमतीनें अशी मसलत केली कीं हुजूरपागे आबाकाळे यांणें आपल्या फौजेची तयारी ठेवावी आणि इशारा होण्या बराबर आंत घुसून दौलतरावास कैद करावें. मग बाजीरावानें कांहीं कामाकरितां म्हणून शिंद्यास वाड्यांत यावयास सांगितलें. दौलतराव बोलावण्या प्रमाणें आला नाहीं तेव्हां बाजीरावानें सक्तीचा हुकूम पाठविला. तो मान्य करून दौलतराव जाऊन मुजरा करून बसला त्या बराबर बोलणें स

रू होऊन बाजीरावानें शिंद्यास प्रथमच्या बोलावण्याबरोबर न येण्याचें कारण विचारलें आणि एकाएकीं रागाचा आविर्भाव आणून त्याला विचारलें तूं आमचा चाकर कीं यजमान? असा प्रकार होईलसें शिंद्याच्या सप्पीं ही नव्हतें, यामुळें तो थक्क होऊन गेला आणि नम्रतेनें व अदबीनें हात जोडून ह्मणाला मी या पायांचा नोकर आहें, जी आज्ञा होईल ती मला शिरसा वंद्य आहे. तो याप्रमाणें नम्र होतांच बाजीराव अधिक त्वेषानें भाषण करूं लागला. तुम्ही व तुमच्या लोकांनीं आमचे प्रजेवर अनेक प्रकारें जुलूम व जबरी करून यांस नागविलें, शहरांत व खुद्द आमच्या वाड्यांत फार अनन्वित प्रकार केले, असें ह्मणून अधिक टाकून बोलूं लागला आणि शेवटीं म्हणाला तुम्ही आह्मांस अगदींच जुमानीत नाहीं, खुद्द आमची बेअदबी व आमान करता, परंतु तुमची ही उद्धटपणाची वर्तणूक इतःपर सहन होणार नाहीं. तुम्ही निघून जांवगांवास चालते व्हा. हें भाषण ऐकून घेऊन दौलतरावानें त्यावर लीनतेनेंच असें उत्तर दिलें कीं सरकारच्या आज्ञेप्रमाणें जाण्यास मी कबूल आहें, परंतु फौजेचा पगार चढला आहे, तो दिल्याशिवाय मला हालतां येत नाहीं. दुसरें, श्रीमंतांस पदारूढ करण्यास मला फार खर्च आला, तें कर्ज लोकांचें देणें आहे; तें सरकारांतून यावयाचें तें आलें पाहिजे; तसें झालें ह्मणजे मला पुणें सोडण्यास उशीर नाहीं. इतकें बोलणें होतें तों अमृतरावानें पूर्वसंकेता प्रमाणें इशारा करूं ह्मणून विचारलें, परंतु बाजीरावास या समयास हूं म्हणण्याचा धीर होईना. केलेला बेत शेवटास नेण्याची त्याला हिम्मत नाहींशी झाली. त्याच्या हरएक कृत्यामध्यें जो अचसानघातकीपणा होता त्याचें हें पहिलें उदाहरण त्याच्या मित्रांच्या प्रत्ययास चांगलेंच आलें. दौलतराव उठून अदबीनें मुजरा करून चालता झाला; परंतु त्याच्या मनांत बाजीरावाविषयीं फार संशय व अविश्वास उत्पन्न झाला. पुढें कांहीं दिवसांनीं बाजीरावानें आपलें नीचत्व आणि भीरुत्व चांगलेंच प्रकट केलें. त्याणें दौलतरावास असें सांगितलें कीं अमृतरावानें तुह्माला कैद करण्याचा असा असा बेत योजला होता ; तर तुह्मी चांगले सावध असत जा.

मग उभयपक्षीं एक एक कारस्थान उपस्थित होऊं लागलें. तशांतच महादजीच्या स्त्रिया दौलतराव आपल्याला योग्यतेप्रमाणें वागवीत नाहीं, इतकेंच नव्हे, साधारणपणें अवश्य अशी ही आपली तरतूद ठेवीत नाहीं,

असें ह्मणून बंड करण्यास प्रवृत्त झाल्या. अशीं राजकारणें पुष्कळच होऊन शेवटीं दौलतरावाचा व बाजीरावाचा अती बेबनाव झाला आणि गोष्ट निकरावर आली. उभयतांची चकमक ही उडाली. उभयतांनीं परराजांकडे मदतीकरितां वकील पाठविले, परंतु अखेर इंग्रजसरकारचे मध्यस्थीनें दोघांचा कलह मिटला. सखाराम घाटग्यास कामावरून दूर करून अटकेंत टाकलें, तसेंच त्याचा हस्तक गरवे यास ही कैद केलें व नाना फडणविसास बंदींतून मुक्त केलें.

या नंतर ही कांहीं काळपर्यंत अशीच अव्यवस्था होती, शांतता होईना. महादजीच्या बायकांची समजूत दौलतरावानें काढली नाहीं त्यामुळें त्या बंड करूनच होत्या ; त्यांनां पुष्कल मोठमोठे सरदार अनुकूल झाले. बाळोबा तात्याला दौलतरावानें पुनः आपली दिवाणगिरी सांगितली, तेव्हां त्याणें आपल्या शहाणपणानें व समंजसपणानें थावराथावर केली, तरी देखील सर्व गोष्टी सुरळीत चालूं लागल्या नाहींत ; मुलखांत सुख व शांति आलीं नाहींत . दौलतरावाच्या वर्तनांत सदसद्विचाराचा अभाव असे ; तो त्याच्या कारकीर्दीतील हरएक थोर थोर प्रकरणांत तेव्हांच दिसून येई. सन १८०० मध्यें थोरला शहाणा मुत्सद्दी नाना फडणीस स्वर्गवासी झाला तेव्हां परवित्तहरणा विषयींची आपली दक्षता किती आहे हें शिंद्यानें स्पष्ट दाखविलें. नानाची चीजवस्त हरण करून घेण्याविषयीं दौलतराव व बाजीराव हे एकमेकां पुढें उड्या घालूं लागले. जेव्हां द्रव्यसंबंध येई तेव्हां त्यांची स्थिति अशीच होई. परंतु जेव्हां स्वतः बदल सूड घेण्याची वेळ असे तेव्हां ते हातांत हात घालून वागण्यास ही सिद्ध होत. शिंद्यानें बाळोबा तात्याला काढून सखाराम घाटग्याला पुढें केलें तेथपासून तों बाजीरावानें नाना फडणिसाच्या इष्टमित्र मंडळीस देशोधडीस लाविलें तेथपर्यंतची हकीगत अगदीं वीट येण्यासारखी आहे. ती येथें सांगणें जरूर नाहीं सबब पुरे.

दौलतराव या प्रमाणें पुण्यांत राजकारस्थानांत गुंतला असतां त्याचा शत्रु यशवंतराव होळकर फौज जमवून माळव्यांत शिरला. हें वर्तमान शिंद्यास कळतांच त्याला हिंदुस्थानांत जाणें जरूर वाटलें. मग लागलेंच तयारीस लागून त्याणें बाजीरावापासून सत्तेचाळीस लक्ष रूपयांच्या वराता हिंदुस्थानांतील वसुलावर घेतल्या आणि नवंबर अखेरीस आपल्या सर्व सै-

न्यासह उत्तरेची वाट धरली.

इकडे यशवंतराव होळकर कांहीं स्वस्थ बसला नव्हता. शिंदा येतो असें कळतांच त्याला सुरक्षितपणें स्वस्थानास जाऊं देऊं नये असें मनांत आणून त्याणें आपलें सैन्य त्याच्या वाटेवर आडवें आणलें. दौलतरावानें उज्जनीच्या संरक्षणाकरितां पुष्कळ फौज पुढें पाठविली होती तिज बराबर युद्ध करून सन १८०१ च्या जून महिन्यांत यशवंतरावानें लागोपाठ दोन वेळ तिचा अगदीं मोड करून सोडला आणि पुढच्याच महिन्यांत शिंद्याचा जो येवढा थोरला जबर तोफखाना, त्यावर साहसानें हल्ला केला. त्या तोफखान्याच्या संरक्षणार्थ फक्त थोडेसे घोडेस्वार आणि पायदळाची चार पलटणें होतीं. तोफखान्यावर मुख्य अम्मलदार जनरल ब्राऊन रिग म्हणून जो गोरा होता, त्याणें मोठ्या हिमतीनें लढून यशवंतरावास माघारें फिरावयास लाविलें, तरी त्याणें ही जी साहसानें उडी घातली होती ती वरून तो म्हणजे सामान्य शत्रु नव्हे, केव्हां कसा प्रसंग आणील याचा नेम नाहीं, अशी त्याची दहशत उत्पन्न झाली.

होळकराच्या ह्या पराभवानें शिंदा बचावला. हा वेळ पर्यंत दौलतरावाला युद्धज्ञान प्राप्त झालें नव्हतें म्हटलें तरी चालेल. त्याच्या अंगीं जहाली, अविचार, असमंजसपणा, आणि निःशंकपणा हे गुण काय ते आज पर्यंत दिसत होते आणि त्यांच्या योगानें परिणाम वाईट होईल असें वाटत होतें, परंतु आतांचा जो त्याच्यावरचा मोठा प्रसंग आलेला टळला त्याणें त्याला शहाणपण आलें. त्याणें आपलें सर्व सैन्य एकत्र करण्याचा विचार केला. तें झालें तरी ही घाई न करतां आपला सासरा सखाराम घाटगा फौज घेऊन येई पर्यंत त्याणें दम धरला आणि मग इंदुरावर चाल केली. यशवंतराव त्याच्या बचावाकरितां धांवला. तारीख १४ आक्टोबर रोजीं उभयतांचें तुंबळ युद्ध होऊन होळकराचा अगदीं पराजय झाला व इंदूर जमीन दोस्त झालें. त्या समयीं जर दौलतराव तशीच लगट करता तर यशवंतरावाला पुनः डोकें वर करतां आलेंच नसतें, परंतु त्याच्या हातून तें झालें नाहीं. सेनानायकाचे खरे गुण अंगीं असल्याचें त्याच्या साऱ्या जन्मांत कधीं दिसून आलेंच नाहीं. या प्रसंगीं त्याला यशवंतरावाबराबर तह करणें बरें वाटलें. होळकराला हेंच पाहिजे होतें. त्याणें शिंद्याला तहाच्या नादास लाऊन अंतस्थ तयारी केली आणि अकस्मात् खानदेशांत जाऊन

लढाई आरंभिली. शिंद्यानें सदाशिवरावाबरोबर फौज देऊन त्याला यशवंतरावावर पाठविलें. त्याला पुण्याजवळ गांठून तारीख २५ आक्टोबर सन १८०२ रोजीं लढाई करून यशवंतरावानें त्याचा अगदीं पराभव केला. हें होतांच बाजीरावानें पुण्यांतून पळ काढला; कोंकणची वाट धरली आणि वसईस जाऊन मुक्काम केला. ह्या पराभवापासून शिंद्याचें फारसें नुकसान झालें नाहीं, पेशवेच बुडाले. कारण त्यांनीं या प्रसंगीं वसई येथें इंग्रजां बरावर तह करून आपलें स्वातंत्र्य गमावलें. इंग्रजानीं आपलें संरक्षण करावें असें ठरवून बाजीरावानें वसईच्या तहनाम्यावर जी सही केली ती तहनाम्या वर नव्हे, साऱ्या राज्याच्या बेदावेपत्रावरच केली म्हटलें तरी चालेल. महादजीशिंदा आणि नानाफडणीस हे दोघे उत्कृष्ट मोहोरे गेले तेव्हां त्यां बरावरच राजकीयप्रकरणीं धोरण, दूरदृष्टि, पोक्तविचार, अक्कल वगैरे गुणांचा लोप होऊन पुढें अल्पकाळांतच मराठेशाईची स्थिति किती निकृष्ट झाली पहा. इंग्रजां बराबर लढण्यास सारे मराठे सरदार एकचित्त झाले पाहिजेत हें जें पाटीलबावांचें म्हणणें होतें तें बाजूस राहून त्याच्या पुढच्याच पिढीचे सरदार आपसांत कलह करूं लागले. आमचें एकतरी पलटण चाकरीस ठेऊन घ्या असें नानाचीं आर्जवें करून इंग्रज म्हणत होते, परंतु त्याणें त्यांचें बोट शिरकूं दिलें नाहीं; परंतु आतां सर्वांत मुख्य यजमान पेशवे स्वतः त्यांच्या पुढें दीनवदन होऊन जाऊन या तहानें हातपाय बांधून घेऊन बसले; राहिले कायते शिंदे आणि होळकर, ते ही परस्परांचें वैरी.

मराठ्यांत एकी नसणें ही मोठी चूक आहे व हीच साऱ्या राष्ट्राच्या नाशास कारण आहे असें दौलतरावाच्या लक्षांत आल्या वांचून राहिलें नाहीं. श्रीमंतांनीं जो वसईस तह केला त्याच्या योगानें महादजी शिंद्यानें केलेले सर्व बेत फुकट गेले इतकेंच नव्हे तर आतां इंग्रजां पासून आपल्याला विशेष भय आहे हें ही त्याच्या ध्यानांत आलें. वसईच्या तहांत स्वसंरक्षणाबद्दलचें जें कलम होतें त्याला मान्य होण्याविषयीं त्याजकडे ही बोलणें झालें, परंतु त्याणें साफ नाहीं म्हणून सांगितलें, आणि तेव्हांपासून पूर्वी महादजीच्या मनांत जी गोष्ट अहोरात्र घोळत होती—कीं साऱ्या मराठ्यांनां एक करून इंग्रजांनां उत्तर, मध्यम, पश्चिम हिंदुस्थानांतून हांकून लावावें—तिचा त्याणें ध्यास घेतला.

परंतु तो काल निघून गेला होता आणि आतां ती गोष्ट दुःसाध्याव

स्थेस जाऊन पोहोंचलेली होती. दौलतरावानें यशवंतराव होळकराकडे बोलणें लाविलें परंतु तो त्याला मान्य होईना. त्याणें लढाईची तयारी चालविली होती आणि बाहेरून मात्र कांहीं नाहीं म्हणे. परंतु तें उघडकीस आल्यावांचून राहिलें नाहीं. म्हणून गव्हरनर जनरल मार्किस वेलेस्ली याणें मोठ्या शहाणपणानें असा विचार ठरविला कीं होळकराला आतां फुरसत देऊन आपण स्वस्थ बसणें बरें नाहीं. मग त्याणें ती गोष्ट लागलीच निकरावर आणली.

दौलतरावाची आणि इंग्रजांची लढाई सुरू होऊन एका मागून एक जे अनेक घोर संग्राम झाले त्यांची साद्यंत हकीगत तेथें देतां येत नाहीं सबब अतीसंक्षेपतःसांगतो कीं सन १८०३ मध्यें तारीख २९ अगष्ट रोजीं अलिगड येथें, तारीख ११ सप्टंबर रोजीं दिल्ली येथें, तारीख २३ रोजीं असई येथें, तारीख १० व १८ आक्टोबर रोजीं आग्रा येथें, तारीख १ नवंबर रोजीं लासवाडी येथें; आणि तारीख २९ रोजीं आरगांव येथें, असे जे तुमुल युद्धप्रसंग झाले त्यांमुळें शिंदा अगदीं जर्जर होऊन गेला, त्याच्या सर्व आशा जागच्या जागीं नाहींशा झाल्या. त्याचें सारें सैन्य, आणि त्यांत ही मुख्यत्वें डीब्राइमी याणें कवाईत शिकवून जें तयार केलें होतें व ज्याणें लासवाडीच्या रणांगणीं आपल्या शौर्याची कमाल करून शत्रूस ही थक्क करून सोडलें होतें, तें सारें सैन्य फार उत्कृष्ट रीतीनें लढलें. पुष्कळ शिपाई रांगांतल्या रांगांत उभे राहिल्या ठिकाणीं मेले, कोणी मागें पाऊल घेतलें नाहीं. परंतु इतकें होऊन ही त्यांचे शत्रु जे गोरे व त्यांचेच ज्ञातिबांधव काळे शिपाई होते, त्यांच्या पुढें त्यांचा टिकाव लागला नाहीं. याचें मुख्य कारण त्यांजवर अम्मलदार लोक फार कमी होते. डी बॉईमीनें तयार केलेली पलटणें हाल्लीं जिला इर्रेग्युलर सिस्टिम म्हणतात त्या तऱ्हेचींच होतीं व त्यांवरचे अम्मलदार त्याच प्रकारचे होते, परंतु त्याचा ही शत्रू कडील स्वजातीय व एकदेशीय शिपायां पुढें टिकाव लागेना, कारण त्यांनां वर्तविणारे इंग्रज ऑफीसर त्यांच्या पेक्षां चौपट अधिक होते.

असे मोठमोठे दारूण प्रसंग होत तों पर्यंत दौलतरावानें हिम्मत सोडली नाहीं. परंतु आरगांव येथील शेवटचा संग्राम झाला तेव्हां आतां मात्र आपण इंग्रजांपुढें उभें राहणें बराबर नाहीं अशी त्याची खात्री होऊन सन १८०३ च्या दिसेंबरच्या ३० व्या तारखेस तो तहास कबूल झाला

इंग्रजांनीं जे त्याच्या पासून करार करून घेतले ते त्याला फारच अनिष्ट होते. ह्या तहाला सुरजी अंजणगांवचा तह असें म्हणतात. त्यांत असें ठरलें कीं दौलतराव शिंद्यानें इंग्रज सरकार व त्यांचे दोस्त यांनां गंगेच्या व यमुनेच्या दरम्यानचा (अंतर्वेदी) व जयपूर, जोधपूर, आणि गोहद यांच्या उत्तरेचा, आपला सारा मुलुख, अहंमदनगर व भडोज हे दोन किल्ले व त्यांतील सारा मुलुख, तसेंच अजिंठा घांट व गोदावरी नदी यांच्या मधील सारा मुलुख द्यावा. दिल्लीचा मोगल बादशहा, पेशवे, निजाम, गायकवाड, व ज्या ज्या राजांनीं इंग्रजांनां साहाय्य केलें असेल ते, या सर्वांवरील आपले हक्क सोडून द्यावे व त्यांतील जे कोणी पूर्वी त्याचे अमलांतील असतील त्यांस स्वतंत्र म्हणावें. यां शिवाय आणखी ही बारीक सारीक करार झाले, परंतु ते येथें सांगत बसण्याची तादृश जरूर नाहीं.

सदरच्या ठरावां पैकीं एक कलम येथें सांगितलें पाहिजे. तें असें होतें कीं दौलतरावाची मर्जी असल्यास त्याणें त्या तहनाम्यांतील स्वराज्यसंरक्षणाविषयी जें कलम होतें तें मान्य करून इंग्रजांची फौज आपल्या रक्षणा करितां ठेऊन घ्यावी, तिचा खर्च पूर्वी जो मुलुख त्याणें सोडून दिला होता त्याच्या वसुलांतून चालावा. हें कलम दौलतरावानें शेवटीं मान्य केलें आणि सन १८०४ मध्यें फेब्रुआरीच्या २७ व्या तारखेस बऱ्हाणपूर येथें नवा तहनामा तयार झाला. त्यांत असा करार ठरला कीं परशत्रु आला असतां उभयतांनीं परस्परांचें संरक्षण करावें, शिंद्यानें इंग्रजी फाज ६००० पायदळ, आपल्या मुलखानजिक ठेऊन घ्यावी, परंतु ती त्यांच्याच हद्दींत छावणी करून राहावी. पण हा दुसरा तहनामा अमलांत आला नाहीं.

सुरजी अंजणगांवच्या तहानें दौलतराव अगदीं बांधला गेला होता, परंतु तसेंच सतत बांधलें राहणें त्याला बरें वाटत नव्हतें, आणि पुढच्या वर्षाच्या आरंभींच एक गोष्ट घडून आली तेव्हां त्या बंधांतून अगदीं मुक्त होण्याची त्याला आशा उत्पन्न झाली. होळकर कांहीं गडबड न करतां अगदीं स्वस्थ राहील अशी मार्क्विस ऑफ वेलेस्ली याची खात्री होईना म्हणून त्याणें सन १८०४ च्या एप्रिल महिन्यांत १६ व्या तारखेस त्याच्याशीं लढाई करण्याचा ठराव केला. यशवंतरावानें कर्नल मॉनसन याचा प्रथम पराभव केला, तरी एकंदर मोहिमेंत त्याचाच फार नाश आणि पराभव झाला. तेव्हां त्याला मदत करावी अशी दौलतरावाला सखाराम

घाटगे दिवाण याणें सल्ला देऊन वीर भरल्या मुळें त्याणें तसें करण्याचा निश्चय केला. परंतु त्या प्रमाणें त्याला रासरोस कांहीं मदत करण्या पूर्वी मिस्टर जेंकिन्स ह्मणून इंग्रज सरकारचा जो अकिंटग रेसिडेंट त्याच्या छावणींत होता त्याला कैद करून त्याणें त्याची मालमत्ता लुटली. ह्या आगळिकी बद्दल दौलतरावानें गव्हरनर जनरलाला ज्या सबबी सांगितल्या त्या त्याणें स्वस्थपणें ऐकून घेतल्या. तरी शिंद्यानें जी लढाईची तयारी चालविली होती तींत कांहीं अंतर पडूं दिलें नाहीं इतकेंच नव्हे, होळकर व आणखी कांहीं सरदार हे इंग्रजांचे शत्रु त्यांच्याशीं प्रत्यक्ष लढत असतां त्यांनां त्याणें आपल्या छावणींत आश्रय दिला. तेव्हां हें कृत्य उघड उघड वैरभावाचें आहे असें ह्मणून इंग्रजांच्या जनरलानें शिंद्यावर हल्ला केला. तेव्हां तो व होळकर अजमिरास गेले, परंतु तेथें असतां त्यांचें परंपरागत चालत आलेलें वैमनस्य पुनः उद्भवलें. तेव्हां दौलतरावानें कांहीं युक्ति करून गव्हरनर जनरलाशीं समेट करून घेतला. हें सख्य जरी क्षणिक होतें तरी त्या पासून एक गोष्ठ चांगली झाली, ती अशी—लाट साहेबांचे सांगण्या वरून शिंद्यानें सखाराम घाटग्यास दिवाणगिरी वरून दूर करून त्या पदावर अंबाजी इंगळ्याची नेमणूक केली. ही योजना बरी झाली. इंगळा विचारी व शहाणा होता.

याच समयास मार्क्विस वेलेस्ली या प्रख्यात पुरुषाच्या जागीं लॉर्ड कॉर्नवालीस गव्हरनर जनरलाच्या कामावर आला. तेव्हां सुरजी अंजणगांवचा तह गुंडाळून ठेवण्यास ही संधी बरी आहे असें दौलत रावास वाटलें. त्याणें तहनाम्यांतील करारांच्या उलट पुष्कळ गोष्टी केल्या होत्या—गोहद व ग्वाल्हेर सोडली नाहीं, होळकर इंग्रजांचा शत्रु असतां त्याच्याशीं संबंध ठेविला, वकील म्हटला ह्मणजे त्याच्या केसाला धक्का लागायाचा नव्हे, परंतु इंग्रजांच्या रेसिडेंटास त्याणें कैद केलें. —परंतु इतक्या ही गोष्टींकडे कार्नवालीस साहेबांनीं दुर्लक्ष केलें; कारण शिंद्याचा पराभव झाल्यामुळें त्याच्या मनांत तें सलणें त्याला कांहीं गैर वाटलें नाहीं. ह्मणून त्याणें पहिला तह रद्दकरून नवीन ठरविला. हा पहिल्या पेक्षां पुष्कळ सढळ होता. या तहनाम्यावर तारीख २३ नवंबर सन १८०५ रोजीं अलहाबाद येथें सह्या झाल्या. त्यांत असें ठरलें कीं ग्वाल्हेर व गोहद हे किल्ले शिंद्यास परत मिळावे व चंबला नदी ही त्याच्या राज्याची उत्तरसीमा समजावी; इंग्रजांनीं जो-

धपूर, उदेपूर, व कोटा येथील राजांबराबर किंवा ग्वाल्हेर, माळवा, व मार वाड यांतील मांडलिक राजांबराबर तहनामे करूं नयेत, व शिंद्यानें त्यांची पाहिजे ती व्यवस्था केली तरी त्यांत बोलूं नये. दौलतराव, त्याची बायको व मुलगी या त्रिवर्गांसें नेमणुकी व जाहागिरी द्याव्या. त्याच्या कांहीं कामदारांस पंधरा लाख रुपयांची नेमणूक दिलेली होती ती, व ढोलपूर, बरी, व राजखेडा, हे मुख्य मुलुख जे पूर्वीच्या तहनाम्यानें त्याच्या कडेच रहाण्याचे ठरले होते ते त्याणें सोडून द्यावे, व सखाराम घाटगे माजी दिवाण यास पुनः आपले पदरीं ठेऊं नये. हीं या नव्या तहाचीं मुख्य कलमें झालीं, बाकी सुरंजी अंजणगांवच्या तहांतीलच ठराव कायम राहिले. या प्रमाणें तह झाल्यानें शिंद्याला बाहेर मुलखांतून कांहीं कोणाचा उपद्रव पोहोंचण्याची भीति उरली नाहीं, तरी त्याच्या राज्यांत शांतता झाली नाहीं, उलट अधिकच बेदा झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण त्याणें जी फौज बाळगिली होती तिचा खर्च त्याच्या मुलखाच्या वसुलाच्या मानानें त्याला न झेपण्या सारखा जबर होता, आणि तो उत्तरोत्तर वाढत चालला. तो भागविण्याकरितां त्याणें जशी युक्ति काढली तशी आत्मघातक दुसऱ्या कोणाला काढवली नसती. त्याणें आपल्या शिपायांनां आपल्या प्रजेवर जुलुम करून चरितार्थ चालविण्यास मोकळीक दिली. लढाईचा खर्च लढाईवर भागवावा अशी नेपोलियन बोनापार्टाची रीति होती, ती अगदीं गैर असें सर्वांचें मत आहे. परंतु ही दौलतरावाची रीत त्याच्या ही पेक्षां गैर. कारण नेपोलियन आपल्या सैन्यास फक्त शत्रूच्या मुलखांत मोकळें सोडीत असे. दौलतरावाचें कृत्य त्याच्याही पेक्षां विपरीत पडलें, तेव्हां परिणाम कसा झाला पहा. ग्रॉटडफ्रू म्हणतो जें सैन्य पूर्वी अफाट प्रदेशावर मनसोक्त लूट, जुलूम, जबरी. वगैरे करण्यास सवकलें होतें त्याला आतां येवढ्याशा मुलखांत काय मिळेल तेवढ्यावर निर्वाह करून रहाणें आलें, तेव्हां त्याणें जो प्रकार चालविला तो कांहीं अनन्वितच. पुष्कळ ठिकाणीं जुलमाची शिकस्त झाली. जे प्रांत पूर्वीं भरभराटींत आणि संपन्न होते त्यांची कंगाल अवस्था होऊन ते अगदीं उजाड झाले.

मुलखाला जसजशी निकृष्टावस्था येत चालली तसतशी दिवसें दिवस वसुलांत तूट पडत चालली हें कांहीं सांगायाला पाहिजे असें नाहीं. दौलतरावाला खर्चाची फार टंचाई होऊं लागली. इंग्रजांनीं त्याला व त्या-

च्या कुटुंबाला जी नेमणूक व जाहागीर करून दिली होती तें उत्पन्न मात्र त्याला बिनतूट चालणारें असें वाटूं लागलें, परंतु तेवढ्यानें ही त्याचें भागेना, आणि सावकारांकडून जबर व्याजानें कर्ज काढून त्या उत्पन्नांतून त्याची फेड करावी लागे.

होळकर इंग्रजां पासून पराभव पाऊन हतवीर्य होऊन बसला व त्याचें राज्य निर्बळ होऊन गेलें, अशा समयास शिंदा त्याच्यावर हात टाकल्या शिवाय राहयाचाच नव्हे, परंतु तो या प्रमाणें द्रव्यहीन झाल्यामुळें बहुधा स्वस्थ बसला असावा. तसेंच पुढें पुष्कळ वर्षे पर्यंत कांहीं एक गडबड न करतां इंग्रजांशीं ही तो अगदीं शांतपणानें वागत होता त्याचें कारण तरी ही निष्कांचनताच यांत कांहीं संशय नाहीं.

असें होतें तथापि सन १८१७ मध्यें जेव्हां इंग्रज सरकारानें पेंढ-ऱ्यांचा उच्छेद करण्याचें मनांत आणलें तेव्हां शिंद्याच्या चंचल मनांत त्या प्रसंगीं उचल खाण्याचें आलें असें दिसूं लागलें. आलीकडे पन्नास साठ वर्षें, मराठ्यांनीं कोटें मोहीम केली कीं पेंढारी आपले त्यांच्या लष्करा मागून आहेतच अशी वहिवाट पडून गेली होती. ते त्यांच्या साठीं लढत ही असत आणि शत्रूस लुटीत ही असत, परंतु लढण्या पेक्षां त्यांचें लक्ष खरें म्हटलें असतां लुटीवरच जास्त असे. शिंद्याला ते अगदीं आपला यजमान व प्रसंगीं रक्षणकर्ता मानीत असत. त्यांची जमात पुष्कळच होती आणि तशांत शिंद्याचें साहाय्य मिळालें म्हणजे इंग्रजांच्या हातून आपलें कांहीं वांकडें होणार नाहीं असा त्यांनां दम होता. हीं व त्यांचीं अशींच आणखी कांहीं सबळ कारणें ऐकून घेऊन शिंद्याचें मन त्यांच्याकडे वळलें. तो त्यांच्यांत अगदीं मिळालाच असता, परंतु तितक्यांत मार्किस ऑफ हेस्टिंग्स याणें जलदी करून तें साधूं दिलें नाहीं. शिंद्याच्या मनाची चलबिचल आहे असें कळतांच त्याणें इंग्रजी फौज एका चांगल्या नाक्यावर पाठवून तेथें तळ दिला, तेव्हां शिंद्याला विचार पडला.

मागें इंग्रजांबराबर ज्या मोठाल्या लढाया झाल्या त्यांतील अनुभवानें तो बराच शहाणा झाला होता म्हणून आतां साहस न करतां तहास कबूल झाला. मग त्याणें आपलें सैन्य अमूक अमूक ठिकाणीं ठेवावें व तें इंग्रज सरकारच्या हुकमावांचून हालवूं नये, आपण करारा प्रमाणें वागूं म्हणण्या बद्दल व रस्ते निर्भय राखण्या बद्दल अशीरगड व हिंदिया हे दोन

किल्ला ओलीस द्यावें आणि रजपूत संस्थानिकां कडून जी खंडणी यावयाची ती तीन वर्षें पर्यंत लाऊन द्यावी, असे करार ठरून तारीख ९ नवंबर सन १८१७ इसवी रोजीं तहनाम्यावर सही झाली.

शिंद्याच्या मनांत आणखी कित्येक गोष्टी घोळत होत्या परंतु त्या कराव्या न कराव्या या विषयीं त्याच्यानें निश्चय करवेना. याच सुमारास साऱ्या मराठे शाईची पुनः एकजूट करावी असें पेशव्यांच्या मनांत येऊन त्यांणीं खटपट चालविली. दौलतरावाला ती गोष्ठ पसंत पडली, परंतु त्याला उघडपणें बाजीरावास सामील होतां येईना ; तथापि आंतून तो त्याला अनुकूल होता. अशीरगड इंग्रजांच्या ताब्यांत देण्याचा त्याणें करार केला होता त्या प्रमाणें तारीख ९ एप्रिल सन १८१९ रोजीं त्यांणीं तो आपल्या ताब्यांत घेतला. त्या वेळीं तेथील किल्लेदाराजवळ शिंद्याचें पत्र सांपडलें, त्यांत तुम्ही बाजीरावाच्या हुकुमा प्रमाणें वागत जावें असें लिहिलेलें होतें. बाजीरावाची आणि इंग्रजांचीं लढाई सुरू असतां शिंद्यानें असें वर्तन करणें हें तहनाम्याला अगदीं विरुद्ध होतें. त्याणें करार मोडल्याची ही लेखी शा बिदी होतांच इंग्रजांनीं प्रथम तो किल्ला जो नुसता ओलीस घेतला होता तो आतां परत देऊं नये असा ठराव केला. दौलतरावाचा हा फंद उघडकीस येण्या पूर्वीच एका वर्षा खालीं तारीख २५ जून १८१८ इसवी रोजीं त्याणें इंग्रजांशीं टराव करून आपल्या मुलखाच्या चतुःसीमा कायम करून घेतल्या होत्या. अजमीर व आणखी कांहीं महाल इंग्रजांस देऊन त्यां बदला तितक्याच वसुलाचा मुलुख त्याणें घेतला होता.

सन १८१८ च्या जून महिन्यांत पेशावाईची परिसमाप्ति झाली, त्यापुढें नऊ वर्षें दौलतराव जिवंत होता. तो त्याचा काळ शांततेंत गेला, परंतु त्याला सुख मात्र झालें नाहीं. तारीख २१ मार्च सन १८२७ रोजीं त्याला मृत्यु आला, तेव्हां त्याचें वय सारें ४८ वर्षांचें म्हणजे थोडेंच होतें. त्याची एकंदर कारकीर्द मोठी धामधुमीची आणि चित्र विचित्र झाली. त्याच्या पूर्वी पाटीलबावांनीं गादीवर असतां जे एक एक मोठमोठे बेत मनांत आणले होते, ते सारे फुकट गेले; त्याला त्यांतला एक ही साधला नाहीं. तरी त्याचे यजमान जे बाजीराव साहेब त्यांच्या पेक्षां व होळकरापेक्षां ही त्याची स्थिति बरी राहिली. तो आपला सर्वस्वनाश करून घेतच होता, परंतु खरोखर इंग्रजसरकारानेंच त्याला वांचविलें म्हणण्यास हरकत नाहीं.

अशी गोष्ट दोन वेळ झाली. ग्वाल्हेर व गोहद हे किल्ले त्याणें बळकाविले होते ते पुष्कळ लढल्या वांचून कधीं सोडले नसते, त्यांत त्याची खराबी पुष्कळच झाली असती; परंतु सन १८०५ मध्यें मार्किस वेलेस्ली जाऊन त्याच्या जागीं लॉर्ड कार्नवालीस गव्हरनर जनरल झाल्यानें तो प्रसंग त्याणें आणला नाहीं, किल्ले त्याजकडे राहूं दिले. पुढें सन १८१७ मध्यें पेंढाऱ्यां बराबर लढाई सुरू झाली तेव्हां तो हुरळला होता आणि जर त्यांच्यांत जा ऊन पडत होता तर जी त्यांची वाट झाली तीच त्याची होत होती; परंतु मार्किस ऑफ हेस्टिंग्सनें त्याची फौज जागेवरून हालूं नये असा बंदोबस्त लाबडतोब केल्यामुळें तो प्रसंग टळला. दौलतराव मेला तेव्हां त्याचें राज्य नीट व्यवस्थेनें चालविलें असतां दीढ कोट रुपये वसूल येई येवढें मोठें होतें. इतका मुलुख त्याजकडे राहिला हा कांहीं त्याच्या मुत्सद्दीपणानें किंवा राजकारणी दूरदृष्टीनें राहिला असें नाहींच, तर केवळ त्याच्या शत्रूंच्या कृपेनेंच; मग ही कृपा त्याच्याशीं लढण्यानें आपलें थोडें तरी नुकसान होईल, त्रास सोसावा लागेल, तो न लागावा अशा बुद्धीनें त्यांणीं केली असें पाहिजे तर म्हणावें. सन १८०५ मध्यें तह ठरला तेव्हां जेवढें त्याचें राज्य होतें तेवढें अंतकाळीं ही होतें. इंग्रजांनीं त्याच्या कडून जो मुलुख घेतला तो मुख्यत्वें करून गंगायमुनेचा दोआब--म्हणजे यमुनेच्या उगमापासून तों गंगेच्या संगमापर्यंत त्या दोहोंच्या मध्यें जो प्रदेश आहे तो. याला अंतर्वेद म्हणतात. दिल्ली शहर याच प्रदेशांत आहे. तें व त्याच्या आसमंतांतील प्रांत तेथील नामधारी मोगल बादशहाकडे त्यांणीं चालविला, परंतु त्यावर खरा अम्मल त्यांच्या रेसिडेंटाचाच होता.

दौलतरावाला पुत्रसंतान नव्हतें व होण्याची आशा दिसेनाशी झाली तेव्हांच त्याणें दत्तक घेण्याचा विचार मनांत आणून आपल्या भाईबंदांचीं कांहीं मुलें पहाण्या करितां दक्षिणेंतून आणण्यास पाठविलें. तिकडून पांच मुलें येण्या करितां निघालीं तीं ग्वाल्हेरीस पोहोंचण्या पूर्वीच त्याचें प्राणोत्क्रमण झालें. मग दत्तक घेण्याचा अधिकार त्याच्या बायकोकडे गेला. हिचें नांव बायजाबाई; ही सखाराम घाटग्याची कन्या. तिणें मुगुटराव म्हणून एक दूरच्या भाईबंदाचा ११ वर्षांचा मुलगा होता तो घेण्याचें ठरविलें; त्या प्रमाणें तारीख १७ जून सन १८२७ रोजीं दत्तविधान होऊन त्याच दिवशीं दौलतरावाच्या नातीं बराबर त्याचा विवाह लागला. दौलतरावाची

कन्या यशवंतराव घोरपडे सेनापति यांस दिली होती, तिची ही मुलगी. मग दुसऱ्या दिवशीं इंग्रज सरकारानें त्या मुलास अलिजा जनकोजीराव शिंदे या नांवानें गादीवर बसविलें.

जनकोजीची कारकीर्द सोळा वर्षें झाली. त्या काळांत परराज्यांशीं कांहीं तंटा बखेडा झाला नाहीं, परंतु स्वराज्यांत दंगाच होता. मुलगा दत्तक घेतल्या पासून पुढें दहा वर्षें पर्यंत बायजाबाईनें त्याला व साऱ्या राज्याला अतिशय त्रास आणि दुःख दिलें. तिच्या मनांत सर्व राज्य कारभार आपल्या हातांत असावा असें होतें, आणि तो हेतु सिद्धीस नेण्या करितां ती असें म्हणूं लागली कीं यजमानांनीं आपल्या अंतकाळीं मी जिवंत असें पर्यंत स्वतःच राज्य चालवावें असा मला अधिकार दिला आहे. मग तिणें जी एक एक राजकारस्थानें आरंभिलीं तीं ती सखाराम घाटग्याची कन्या या नांवाला शोभण्या सारखीं होतीं.

मी हयात असें पर्यंत राज्यकारभार चालविण्याचा हक्क माझा आहे, असें बायजाबाई म्हणत असतां इंग्रज सरकारानें जें वर्तन केलें तें तिला अधिकच उत्तेजन येण्या सारखें होतें. सरकारी कामा संबंधीं कागदपत्रावर शिक्कामोर्तब होणें तें महाराजांच्या नांवचें असावें या पलिकडे इंग्रज सरकार कांहीं बोलेना. जनकोजीला आपलें येवढें मोठें राज्य पुढें नीट चालवितां येण्यास आतां लहानपणीं राजकारभार चालविण्याचीं मूलतत्वें चांगलीं शिकवणें जरूर होतें, परंतु सरकारानें त्याला तें शिक्षण दिलें नाहीं येवढेंच नव्हे, त्याच्या कडून कांहीं तरी विद्याभ्यास करविला पाहिजे इतकें देखील म्हटलें नाहीं. त्या मुळें तो आपला जशाचा तसा राहिला.

जनकोजी अल्पवयस्क व अशिक्षित, तेव्हां अर्थातच त्याला माहिती मुळींच नाहीं, आणि तशांत ही तो मनाचा मुळींच नेटबाज नव्हता; त्यामुळें बायजाबाईस पाहिजे तसा हात चालवावयास सांपडलें. तिणें आपल्या मना प्रमाणें सर्व अधिकार तर हातीं घेतलाच आणि ती जर खरी समंजस व अक्कलवान असती तर आमरण तो तिला खुशाल चालवावयास सांपडता. परंतु ती पडली घाटग्याची कन्या! तेव्हां अविचार, महत्वाकांक्षा, हेकटखोरपणा, व लहरलागेल तें करणें, हे पितृगुण तिला कसे सुटतात! राजकारभार नीट चालवून मुलुख आबाद राखावा, प्रजेचें मन संतुष्ट करून आपल्या विषयीं त्यांच्या मनांत बरेपणा उत्पन्न करावा—मांडीवर घेतलेल्या

मुलाला प्रेमानें वागवून त्याच्या मनांत आपल्या विषयीं विश्वास व प्रीति उत्पन्न करावी—तें सर्व बाजूस ठेऊन तिणें लोकांवर जुलूम चालविला, व मुलाला कैदखान्यांत असल्या सारखें वागवून जांच केला. त्याणें विनवणी केली ती सर्व व्यर्थ गेली. याचें वजन पडूं दिलें तर माझा अधिकार जाईल अशी तिला भीति वाटत होती म्हणून ती त्याला जांची.

अशा जाचणुकीचा परिणाम काय होणार हें उघड होतें त्याप्रमाणें झालें. जनकोजीला सोळावें वर्ष पुरें होण्या बराबर तो राजवाड्यांतून पळाला आणि ब्रिन्शि रेसिडेंटाच्या आश्रयास जाऊन राहिला. (सन १८३८ आक्टोबर)

पुढें दोन महिन्यांनीं म्हणजे दिसेंबर मध्येंच गव्हरनर जनरल लॉर्ड-उइलियम बेंटिंक ग्वाल्हेरीस गेले. इतक्यांत दरम्यान बायजाबाईचें व जनकोजीचें ऐक्य झालें, परंतु त्याच्याशीं तिचें वर्तन यथापूर्वच होतें. अशा प्रसंगीं गव्हरनर जनरलाचें तेथें आगमन झालें ही गोष्ट तिला फार महत्वाची होती. तो उभयतां पैकीं कोणत्यातरी एका पक्षाला अनुकूल होईल हें उघडच दिसत होतें, परंतु कोणीकडे वळेल हें कांहीं कळत नव्हतें; म्हणून त्याला स्ववशकरण्याकरितां उभयतांनीं ज्या खटपटी केल्या त्या कोणाला खऱ्या सुद्धां वाटणार नाहींत; इतकें होऊन ही लाट साहेब कोणीकडेच वळतना. महाराजांच्या पुढच्या हक्कास बाध येण्यासारखें कांहीं गैर वर्तन जों पर्यंत बायजाबाईचे हातून होणार नाहीं तों पर्यंत तिणेंच अधिकार चालविण्यास हरकत नाहीं असें त्यांचें मत असल्याचें स्पष्ट दिसलें. जनकोजीनें पुष्कळ विनंती केली, परंतु त्याला उत्तर येवढेंच मिळालें कीं याकामीं सरकारास हात मुळींच घालतां येत नाहीं; परंतु बायजाबाईचा अधिकार काढून न घेण्याच्या खटपटीस न लागतां तुम्ही जर अगदीं स्वस्थ बसून राहाल तर दुसरा दत्तक घेऊन त्याला गादीवर बसवावें आणि तुमचें नुकसान करावें असें मात्र सरकार तिला करूं देणार नाहीं.

गव्हरनर जनरलाच्या अशा मध्यवर्ती, उदासीनपणाच्या वर्तनानें एकाही पक्षाला संतोष झाला नाहीं. पुढें सात महिने लोटले नाहींत तों जनकोजी महाराज पुनः रेसिडेन्सींत आश्रया करितां गेले, रेसिडेंट साहेबानें त्यांची समजूत घालून माघारें राजवाड्यांत पाठवून दिले, परंतु ते बाहेर पडल्याचें वर्तमान मध्यंतरीं शहरांत पसरतांच बायजाबाईच्या अमलदार लो

लोक त्रासून गेले होते, त्यांनां स्फुरण चढून ते त्याला मदत करण्या करितां दंगा करण्यास ही तयार झाले.

बायजाबाईच्या अमलाला सारा मुलुख अनदीं कंटाळून गेला होता आणि सरदार, मानकरी, व इतर लोक ही बंडावा करण्याला कांहीं तरी निमित्त केव्हां सांपडेल अशी वाट पहात होते, तें महाराज घरांतून बाहेर पडले येवढ्यानें त्यांनां मिळालें. जनकोजी वाड्यांतून रेसिडेनसींत गेले आणि परत आले, परंतु त्याच्या दुसऱ्याच दिवशीं बहुतेक फौजेनें बायजाबाईवर उठून महाराजांचे नांवाची द्वाही फिरविली. तेव्हां बायजाबाई भयाभीत होऊन पळून जाण्या करितां निघाली. परंतु लोकांनीं तिला मध्येंच गांठलें, तेव्हां ती तशीच पळत पळत प्राण वांचविण्या करितां रेसिडेन्सींत शिरली. रेसिडेंटानें तिला आश्रय दिला, परंतु तिच्या पासून आधीं असा करार करून घेतला कीं मी पुनः शहरांत जाणार नाहीं, राज्यावरचा सर्व हक्क सोडून हद्दी बाहेर चालती होईन. हा करार तिनें नाइलाजास्तव मान्य केला होता, परंतु त्यानें तिला त्या प्रमाणेंच वागावयास लाविलें, तेव्हा ती तारीख १३ जुलई रोजीं ग्वाल्हेर सोडून ढोलपुरास निघून गेली. त्या पूर्वी तीन दिवस जनकोजीनें गादीवर बसून मी मालक अशी द्वाही फिरविली होती.

या कामीं रेसिडेंटानें जें वर्तन केलें तें गव्हरनर जनरल बेंटिंक यांस अगदीं नापसंत होऊन महाराजांस मदत देण्या करितां त्यानें तैनाती फौज पाठविली ह्मणून त्याला टपका मिळाला. हिंदुस्थान सरकारचें म्हणणें असें होतें कीं शिंदेशाईचा अधिकार बायजाबाई चालवू अगर जनकोजी चालवू, आम्हाला तें पहाण्याची जरूर नाहीं ; आपण फक्त मुलखांत शांतता आणि आपली कीर्ति राखली म्हणजे झालें ; सारे लोक ज्याला ग्वाल्हेरचा अधिकारी ह्मणतील त्याला आपण ही ह्मणावें. सरकारानें आपलें वर्तन ही या उद्देशास अनुसरूनच ठेविलें. त्यानीं बायजाबाईस सांगितलें कीं तूं आमच्या हद्दींत राहून ग्वाल्हेरीवर चालून जाण्याची तयारी करूं लागशील तर तीं आम्हीं करूं देणार नाहीं, परंतु तुला आपल्या मुलखांत जाण्यास किंवा तेथें आपल्या प्रजेचें साहाय्य घेण्यास आम्हांकडून कांहीं एक हरकत होणार नाहीं.

परंतु बायजाबाई एकदां ग्वाल्हेरींतून बाहेर पडली तेव्हां पासून तेथ-

च्या कारभाराशीं तिचा संबंध तुटला तो तुटलाच. तिच्या सारखी खट्पटी आणि धनसंपन्न बायको एकदम निराश होऊन स्वस्थ हरिहरि म्हणत बसेल असें होणेंच नाहीं. त्याप्रमाणें तिणें जनकोजी व त्याचे दिवाण वगैरे जे अधिकारी होते त्यांनां पुष्कळ तऱ्हेनें आपल्या हातून होईल तितका उपद्रव दिला. परंतु सरते शेवटीं जेव्हां कोठें कांहीं उपाय चालत नाहीं असें झालें तेव्हां मग सारी आशा सोडून उज्जनींत स्वस्थ राहिली. तेथें बराच काळ घालवून मग मुलाच्या परवानगीनें ती ग्वाल्हेरींत गेली, परंतु त्यानंतर थोड्याच दिवसांनीं सन १८६२ मध्यें मृत्यु लोक सोडून गेली.

जनकोजी शिंदा अगदीं मेंपपात्र राजा होता. त्याच्या कारकीर्दींत बहुतेक काळ पर्यंत त्याचा मामाच सारें राज्य हांकीत होता. मिस्टर एटचिसनसाहेब म्हणतात—या वेळीं दरबारांत हमेष तंटे बखेडे सुरू होते; जो तो सरदार आपल्या हातीं सारा अधिकार यावा म्हणून खटपट करीत होता. फौज पुष्कळ दिवसांपासून बंडखोर होऊन बसली होती, यामुळें इंग्रजसरकारा बराबर लढाई करण्यास प्रवृत्त झाली. त्या प्रमाणें महाराज मरतांच लढाई सुरू होऊन तिचा परिणाम असा झाला कीं सरकारचें आजपर्यंत जें शिंद्याशीं वर्तन होतें तो प्रकार सुटून पुढें तें अगदींच निराळ्या तऱ्हेवर गेलें.

जनकोजीच्या कारकीर्दींत कोणाबराबर लढाई किंवा दंगा वगैरे कांहीं प्रकार झाला नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. परराज्याशीं त्याचा खरा-संबंध म्हटलातर काय तो दोनच कामांत आला. तीं एक तैनातीस ठेऊन घेतलेल्या फौजेची व्यवस्था करणें व दुसरें कांहीं मुलखची अदलाबदल करून आपल्या राज्याच्या चतुःसीमा सारख्या करून घेणें.

ह्या तैनाती फौजेची व्यवस्था सन १८३७ मध्यें लागली. सन १८१७ च्या तहांत ही फौज ९००० घोडेस्वार असावी असें ठरलें होतें आणि पुढें लढाई संपल्यावर त्यांत ३००० कमी करून २००० राखण्याचें ठरलें. सन १८३७ मध्यें ही फौज मोडून स्वारांचें एक पलटण, पायदळाचें एक पलटण, व तोफखान्याची एक कंपनी असें ठेऊन त्यावर अमलदार इंग्रज लोक नेमावे असें ठरलें. ह्या व्यवस्थेला जनकोजीनें कबूल व्हावें म्हणून खानदेशांतील त्याचे जे महाल इंग्रज सरकारानें कांहीं दिवस आपल्या ताब्यांत घेतले होते ते परत देऊन त्यांच्या निवळ वसुला इतकी दर-

साल नक्त रक्कम घेण्याचें ठरविलें. तैनाती फौजेचा खर्च या उत्पन्नांतून, सागरप्रांत महाल इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत पूर्वीच घेतले होते त्याचे वसुलांतून, व रजपूत संस्थानांकडून जी खंडणी पूर्वी शिंद्यास पोहोचत असे ती त्यांणीं आपल्याकडे लाऊन घेतली होती तींतून, भागवावा असें ठरलें.

जनकोजीला पुत्रसंतति नव्हतीच. सन १८२७ मध्यें त्याची स्त्री कन्या प्रसवली, तेव्हां तिच्या बदल एक मुलगा आणून ठेवावा आणि तिला लांबवावें अशी खटपट होत होती परंतु ती त्याच्या कानीं गेल्या मुळें सारा बेत फसला. त्याच्या पुढच्या वर्षीं ती स्त्री वारली तेव्हां ताराबाई म्हणून तिचीच बहीण होती तिला जनकोजीनें वरलें. ही अगदींच अल्पवयस्क पोर होती.

राज्यप्रकरणीं इतर साधारण बाबतींत जनकोजीची इच्छा इंग्रज सरकाराशीं अगदीं सलुख्यानें वागण्याची होती. ठग व रस्तेलूट करणारे दरवडेखोर लोकांचा उपद्रव तेथपर्यंत फारच होत होता तो मोडण्या करितां इंग्रज सरकारानें जे उपाय केले त्यांनां त्याच्या कडून चांगली मदत मिळाली. जे गुन्हेगार सांपडून कैद होतील त्यांची आपल्या मुलखांतच चौकशी होऊन त्यांनां शिक्षा व्हावी अशी त्याणें तजवीज केली. सन १८३८ मध्यें नेपाळांतून कांहीं मंडळी ग्वाल्हेरींत आली ; त्यांचा उद्देश इंग्रज सरकाराशीं वैरभाव वाढविण्याचा असावा असा संशय होता, म्हणून त्याणें त्यांनां कैद करून परत पाठविलें. त्याच प्रमाणें सन १८३९ मध्यें अफगाणिस्थानचा राजा दोस्तमहंमद याजकडून एक वकील आला होता, त्याला कैद करून त्याणे रेसिडेंटाकडे पाठविलें.

सन १८४० मध्यें गव्हरनर जनरल अरल् ऑफ ऑकलंड जनकोजीस भेटण्या करितां ग्वाल्हेरीस गेले होते. ही भेट फक्त शिष्टाचाराची होती, तींत दुसरा कांहीं उद्देश नव्हता, परंतु अशा मोठमोठ्या लोकांच्या भेटी होणें म्हणजे भूषण समजतात त्या प्रमाणें शिंद्याला वाटलें.

या पुढें तीन वर्षांनीं म्हणजे सन १८४३ मध्यें फेब्रुआरीच्या ७व्या तारखेस जनकोजीचें देहावसान झालें. त्याचें जें वर चरित्रवर्णन केलें आहे त्यावरून तो फक्त नामधारी राजा होता असें तेव्हांच दिसन येतें. त्याच्या अंगीं महादजीच्या विशालबुद्धीचा किंवा दौलतरावाच्या साहसाचा व धाडर्याचा लवलेश ही नव्हता. तो आपल्या मुलखाच्या राज्यकारभाराकडे

ही मुळीं पहात नसे; त्या कामीं तो म्हणजे एक वाहुलेंच होतें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. त्याला २७ व्या वर्षीं म्हणजे अगदीं पूर्ववयांत मृत्यु आला; तो तरी एकादें अती श्रमाचें काम केल्यामुळें किंवा घोड्यावर फार बसल्या मुळें अथवा विद्याभ्यास करण्यांत शरीर व बुद्धि झिजविल्यामुळें आला असें नाहीं.

जनकोजी निपुत्रिक होता व त्याणें दत्तक ही घेतला नाहीं, त्यामुळें तो मरून गादी रिकामी होतांच ती आपल्याला मिळावी असें ज्यांनां ज्यांनां वाटत होतें त्यांच्या खटपटी सुरू झाल्या; परंतु या प्रसंगीं त्या कांहीं चालूं न देतां अगदीं जवळच्या भाईबंदाचा मुलगा असेल त्याला दत्तक घेऊन गादीवर बसवावयाचें असा योग्य ठराव झाला. अगदीं जवळचा भाईबंद कोणी नव्हताच, तेव्हां हणमंतराव ऊर्फ बाबाजी शिंदा म्हणून जो थोडा दूरचा होता त्याचा मुलगा भगीरथराव म्हणून आठ वर्षांचा होता तो पसंत ठरून ताराबाईनें पदरच्या सरदार मानकरी वगैरे लोकांच्या व इंग्रजसरकारच्या संमतीनें त्याला यथाविधि दत्तक घेतलें. या प्रमाणें राज्यास मालक झाला, परंतु मग तें चालविण्याला प्रतिनिधि नेमणें जरूर आलें. जनकोजीच्या अंतकाळीं व त्यापूर्वी पुष्कळ वर्षें मामासाहेब मुख्य दिवाणगिरीचें काम करीत होते हें वर सांगितलेंच आहे. त्यांच्याविषयीं दोन वर्षांपूर्वी रेसिडेंटानें सरकारास असें लिहून पाठविलें होतें कीं " साऱ्या कारभारी मंडळींत मामासाहेब हुशार आहे आणि खरोखर सांप्रत त्याचें वजन मोठें आहे. " रेसिडेंटानें मामाची अशी प्रशंसा केली होती तरी तो इतक्या योग्यतेस येण्याला व येवढ्या मोठ्या हुद्यावर रहाण्याला मुख्य कारण काय तो भाच्याचा त्यावर पूर्ण विश्वास, दुसरें कांहीं नाहीं असें हळूच सुचवून दिलें होतें. कारण वरच्या शिफारसीपुढेंच त्याणें आणखी असें लिहून ठेविलें होतें कीं " भाच्याच्या प्राणोत्क्रमणा बरावरच मामाची हुशारी, वजन वगैरे सर्व ग्रंथ बहुत करून आटपेल. " परंतु तसा प्रसंग जेव्हां आला तेव्हां रेसिडेंटाचें हें भविष्य खोटें झालें. महाराज वारले तेव्हां ग्वाल्हेरच्या सर्व सरदारांनीं एक मतानें मामा साहेबांसच प्रतिनिधि नेमावें असें ठरविलें व ही नेमणूक सर्वांस फार पसंत वाटते असें रेसिडेंटानें लिहिलें; सरकाराला ही तीच आपल्याला ही बरी वाटते असें म्हणावें लागलें.

मामा साहेबांकडे प्रतिनिधित्व येऊन ते सर्व अधिकार चालवूं लाग-

ले, परंतु त्याला कांहीं महिने लोटले नाहींत इतक्यांत रेसिडेंट साहेबानें दोन वर्षां खालीं रिपोर्ट करितांना महाराजांच्या मरणा बराबर मामाच्या दिवाणगिरीचे बारा वाजतील असें जें भविष्य केलें होतें तें खरें होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तीन महिने पर्यंत मात्र सरासरी सर्वत्र शांतता होती. परंतु तितक्या अल्पकाळांत ही एका पलटणानें बंड केलेंच होतें. तें मोडलें मात्र तावडतोब हें खरें आहे. तथापि आंतून कारस्थानें कांहीं कमी चालू नव्हतीं. जनकोजीच्या तरुण स्त्रीच्या मनांत आपल्या हातीं अधिकार असावा असें फार होतें, त्यामुळें कारस्थानें सुरू झाल्या शिवाय राहणें अशक्यच होतें. अशी जेथें स्थिति होत असते तेथें शहाणे शहाणे म्हणविणारे ही दुराचारी स्त्रियांच्या मुठींत राहून त्या नाचवितील तसे नाचतात किंवा ते महत्वाकांक्षी आणि अविचारी बनून त्यांनां हव्या तशा नाचवितात. दोहोंतून एक गोष्ट मात्र झाल्या शिवाय रहात नाहीं. हा सार्वत्रिक नियम येथेंच कसा बाधित होईल ? त्याला अनुसरून येथें पुढें कसें झालें पहा.

वाड्यांत मोरंगी म्हणून एक बायको होती, तिचें ताराबाईकडे जाणें येणें फार असून ती अगदीं तिच्या म्हणण्या प्रमाणें वागत असे ; निदान लोकांचा समज तरी असा होता. मोरंगीनें दादाखासगीवाल्याशीं आश्लाघ्य संबंध ठेऊन त्याची दोस्ती, कृपा, संपादिली. दादा मामासाहेबांच्या हाताखालीं असून खासगी काम पहात असे. त्याच्या व मोरंगीच्या मसलतींत कांहीं तरी भयंकर कृत्य करण्याची खटपट सुरू असावी असा लौकरच पुष्कळ संशय आल्यामुळें दिवाणजीनीं तिला वाड्यांतून बाहेर काढून टाकलें. तरी देखील दादाखासगीवाल्याची वर्तणूक संशय येण्यासारखीच चाललीं. तेव्हां मामासाहेबानें त्याच्या विषयीं रेसिडेंटाकडे तसा बाका लिहून शिवाय तो राजद्रोही आहे असा गिल्ला केला. तेव्हां दादानें रागाचा आविर्भाव आणून मजवर हा जो वृथा आरोप आणला आहे याची शाबिदी करून दिली पाहिजे असें म्हणून चौकशी करविण्या विषयीं आग्रह धरला. चौकशींत कांहीं शाबीद होईना. परंतु पुढें लौकरच त्याच्या कारस्थानांचा उद्देश काय तो बाहेर पडला. तो उद्धटपणाचें भाषण करूं लागला; आणि मामासाहेबांस तोंडावर तुच्छ करूं लागला. मग आंतून सारी तयारी झाली तेव्हां ताराबाई राणीनें मामासाहेबांस कामावरून दूर क-

ण्याचा आपला निश्चय रेसिडेंटसाहेबांस कळविला.

पुढें ज्या गोष्टी घडून आल्या त्यांवरून असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं ताराबाईच्या मनांत भलतेंच भरून दिलेलें होतें. मामा साहेबांची कन्या महाराजांस दिलेली होती तेव्हां त्या संबंधानें बाईचा अधिकार अजीबाद उडवून तो आपल्या हातांत सारें घेऊन बसणार असें तिला कोणी सांगितलें होतें.

सरकारच्या रेसिडेंटानें दोन गोष्टी समजून सांगितल्या परंतु त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं. मामासाहेबावर अरिष्ट आले असें कळतांच त्याचें मित्रमंडळ त्याला परकें होऊन बसलें; जसें एकाद्या महाव्याधिग्रस्त रोग्याच्या स्पर्शाला भिऊन त्याच्या वाऱ्यास कोणी उभें रहात नाहीं, तद्वत् या प्रतिनिधिसाहेबांकडे कोणी जाईनासें झालें; तेव्हां तो कामावरून दूर होऊन ग्वाल्हेरींतून पळाला. मग दादाखासगीवाले दिवाण झाले.

इतक्या निकराला जेव्हां गोष्ट येऊन पोहोचली तेव्हां गव्हरनर जनरल साहेबांनीं जो आपला अभिप्राय दिला तो तेथें सांगणें इष्ट आहे; कारण त्यांत पुष्कळ चांगला अर्थ आहे. मशारनिल्हेनीं असें लिहून ठेविलें आहे. " मामासाहेबानें या कामाला आपण अगदीं अयोग्य आहों येवढें स्पष्ट करून दाखविलें. कारण शिंदेशाईचा कारभार करण्याला लायक दिवाण झटला झणजे त्याला बायका व पुरुष या दोघांनां ही नीट वर्तवितां आलें पाहिजे. परंतु त्याला त्या दोहों पैकीं एकाला ही वागवितां आलें नाहीं. " असल्या अयोग्य मनुष्याला दिणगिरीकरून दूर केलें यांत ब्रिटिशसरकारची झणजे बेअदबी झाली असें लार्ड एलिन्बरो यांस वाटलें नाहीं व अशा लोकांनां अप्रिय झालेल्या मनुष्यास राजाचें प्रतिनिधित्व बळेंच द्यावें हें ही बरें वाटलें नाहीं. त्याणें असें लिहून ठेविलें कीं आमचा उद्देश कायतो आपल्या सरहद्दीवर शांतता असावी येवढा आहे, तेवढा साधला झणजे झालें; मग ग्वाल्हेरींत कोणत्या ही प्रकारें राज्यकारभार चालला तरी हरकत नाहीं. तो चालविणारांनीं तेवढें काम केलें म्हणजे झालें.

यावरून मामासाहेबास हांकलून दादासाहेब दिवाण झाले झणून इंग्रजसरकारास त्यांत आपली बेअदबी झाल्यासारखें मुळींच कांहीं वाटलें नाहीं हें जसें स्पष्ट दिसून आलें, तसें काय झालें तर सरकारास राग येणार हें ही कळलें. सन १८१९ पासून शिंदेसरकारानें जो शांतपणें वाग-

ज्याचा क्रम ठेविला होता त्यांत जर दादानें कांहीं फेर बदल केला असता तर सरकारास गैर वाटणार होतें.

परंतु दादाचें दुर्दैव त्याला तसें अगदीं स्वस्थ राहूं देईना. त्याणें जो आपला इच्छित हेतु साध्य करून घेतला होता तो बहुत करून फौजेच्या पाठबळानें असावा, ह्मणून त्या लष्करी लोकांनां नेहेमी खुष ठेऊन आपल्याला अनुकूल राखणें त्याला अगदीं जरूर वाटत होतें. सन १८५०।५१ मध्यें युरोपांत साटोरी येथें अशाच मासल्याचा प्रसंग आला होता., तेव्हां तेथच्या मुत्सद्यांनीं फौजेला मांस आणि शांपेन नांवाची उंची दारू यथेच्छ चारून त्यांनां अगदीं खुष करून सोडलें. परंतु तसली कांहीं युक्ति दादाला सुचली नाहीं—आणि कदाचित सुचती तरी ती तेथल्यासारखी येथें उपयोगीं पडली नसती—त्याणें जो मार्ग धरला तो परिणामीं भयंकर होता. फौजेला असईच्या प्रसंगाची आठवण उरली नाहीं आणि लासवाडीचें ही बहुत विस्मरण पडलें असावें. आतां नव्या पिढीची अमदानी चालू होती. महादजीबाबाची तलवार कशी चमकत होती आणि दौलतरावाचें प्रस्थ केवढें होतें तें त्यांणीं डोळ्यांनीं पाहिलें नव्हतें, परंतु लहानपणापासून त्यांच्या कीर्तीचे पोवाडे ऐकून ऐकून त्यांचे कान भरून गेले होते, त्यामुळें त्यांच्या प्रमाणें आपण एकदां रणांगणीं जाऊन नांव करावें अशी त्यांनां फार इछा उत्पन्न झाली होती, आणि ते आपल्याला अनुकूल राहण्याला त्यांनां तीच भरंवशें दादाला जरूर वाटलें.

हा उद्देश मनांत धरून दादानें थोड्याच काळांत लष्करांत जे अमलदार इंग्रजसरकारास अनुकूल होते त्या सर्वांस दूर केलें; त्यांची अप्रतिष्ठा ही केली आणि त्यांच्या जागीं लोकांनां नागवण्याला व लुटण्याला तयार अशा बादान, हलकट लोकांच्या नेमणुका केल्या व शिपायांनां पुष्कळ पैसा बक्षीस दिला. अशामुळें फौजेंत हळु हळु बेबंदी होत जाऊन ती अगदीं बंड करण्याच्या रंगावर येऊन ठेपली.

या प्रमाणें दादानें संकट टाळण्या करितां जो उपाय ह्मणून योजला तो अपाय मात्र होऊन बसला. आग्र्या पासून पन्नास मैलांच्या आंत आपल्या शेजारच्या राज्यांत असा बंडाव्याचा आणि बेबंदीचा प्रकार सुरू झाला असतां इंग्रज सरकार स्वस्थ बसेल ही गोष्ट कधींच घडणारी नव्हे. तशींत त्याच समयास उत्तर सरहद्दीवर पंजाबच्या शिपायांनीं बंड केलें हो-

तें. तेव्हां त्याच्या ध्यानीं हें दुसरें होऊं देऊन मग सरकार जागें होईल असें कधींच घडणारें नव्हतें. शिंद्याच्या लष्करानें आपल्याशीं शत्रुत्व मांडलें असें उघड दिसूं लागलें तथापि लॉर्ड एलिन्बरो यांच्या मनांत एकदम जहाली जाण्याचें नव्हतें. त्याला असें वाटलें—आणि तें कांहीं गैर नव्हतें—कीं इतक्या अनर्थाला कारण काय तो दादा खासगीवाला आहे, त्याला कामा वरून काढलें ह्मणजे हें सारें प्रकरण थंडावेल. हें निर्वेधपणें घडून यावें ह्मणून ग्वाल्हेरच्या रेसिडेंटाच्या जागेवर त्याणें कर्नल स्लीमन यांची नेमणूक केली. त्यावर त्याचा पूर्ण विश्वास होता.

कर्नल स्लीमन याणें जाऊन जो रिपोर्ट केला त्यावरून इकडे जें आधीं अनुमान झालें होतें तेंच खरें ठरलें. त्याणें असें लिहिलें कीं येथची स्थिति इतकी बिघडण्याला कारण दादाच आहे ; हा मनुष्य दंगेखोर, स्वस्थ न बसणारा, कारस्थानी, मुलखांत स्वस्थता टिकूं न देणारा व आपल्या शेजारच्या राजांशीं कलह माजवणारा मात्र आहे ; याच्या अंगांत धैर्य पाहूं गेलें तर इतकें आहे कीं जरा कठीण प्रसंग आला म्हणजे हे राजश्री जनानखान्यांत शिरून अगदीं आंतल्या, आंतल्या, खोलींत जाऊन लपून बसत असतात.

रेसिडेंटाचा असा रिपोर्ट येतांच सरकारचा निश्चय झाला. दादा खासगीवाल्यास ग्वाल्हेरींतून काढून आपल्या मुलखांत आणून चांगल्या मजबूद ठिकाणीं प्रतिबंधांत ठेवावें असा सरकारानें ठराव केला व तो अमलांत आणण्या करितां आग्रा येथें कवाइती फौज जमविण्याचा हुकूम केला.

परंतु हा सरकारचा ठराव अमलांत येण्याची तजवीज होण्या पूर्वीं च ग्वाल्हेरीत गोष्ट निकरास पोहोंचली. लष्करांत कांहीं लोक पहिली ती स्थिति बरी मानणारे होते, ते इंग्रज सरकाराशीं सख्य असावें असें म्हणणारांस अनुकूल होते ; त्यांणीं एकाएकीं जमून एकजुटीनें असें बोलणें लाविलें कीं येवढा अनर्थ ओढवण्यास कारण सारा हा त्रासदायक दादा आहे, याला दूर केलें पाहिजे. त्या लोकांच्या जमावाला दादानें बंड असें नांव ठेऊन तें मोडण्या करितां बाकीची जेवढी फौज त्याला अनुकूल होती तेवढी त्यांवर पाठविली. परंतु तिचा मोड होऊन खुद्द दादा कैद झाला. तेव्हां आतां याचें काय करावें या विषयीं थोडी वाटाघाट होऊन त्याला आग्र्यास इंग्रजांच्या छावणींत पाठवून द्यावें असें त्यांणीं ठरविलें. त्या प्र-

माणें बंदोबस्तास स्वार शिपाई नेमून त्याची रवानगी झाली ; परंतु पुढें वाटेंत त्यांनां त्याणें मनमुराद पैसा दिल्यामुळें झणा किंवा त्यांनां त्याची अतिशय दया आल्यामुळें झणा, काय असेल तें असो, परंतु त्यांणीं त्याला तिकडे न नेतां घरीं परत जाऊं दिलें.

तदनंतर दादाला शिंदेशाई मुलखांतच अटकेंत ठेऊं द्यावें, अशाविषयीं परवानगी मिळावी झणून ग्वाल्हेरदरबारानें एकवार खटपट करून पाहिली, परंतु कर्नल स्लीमन अगदीं ऐकेना. दादाला स्वाधीन केलें तर बरें, नाहीं तर इंग्रजांची फौज ग्वाल्हेरीवर चालून येते असें तो अगदीं निकराचें भाषण करूं लागला.

दरबार येवढ्यानें ही दादाला स्वाधीन करीत नाहीं असें झालें तेव्हां इंग्रजी फौजेचा तळ हालला. खुद्द गव्हरनर जनरल त्या सैन्याचे अधिपति होऊन अगदीं जवळ येऊन जेव्हां ठेपले , तेव्हां आतां मात्र दादाचा त्याग केल्यावांचून परिणाम नाहीं असें समजून दरबारानें त्याला हवाली केलें.

या प्रमाणें अखेर दादा कबजयांत आला, परंतु इतकें होई तों सैन्य फार पुढें आलें; झणून आतां पुनः असें होणार नाहीं असा पुढचा बंदोबस्त करून घेतल्याशिवाय मागें फिरणें लाटसाहेबांस योग्य वाटेना. सबब त्यांणी दरबारास असा निरोप पाठविला की आतां आम्ही इतके आलों आहों ते पुढें येतोंच; ताराबाईसाहेबांची व महाराजांची भेट घेऊं आणि समक्ष तेनेंच सर्व गोष्टी निश्चयांत आणूं .

ह्या मुलाकतीकारितां तारीख २६ दिसंबर सन १८४३ हा दिवस नेमण्यांत आला. परंतु ही बातमी फौजेंत पसरली तेव्हां तिला ती गोष्ट अगदीं रुचली नाहीं, आणि तिणें लढण्याचा निश्चय केला. मुख्य सैन्य पुष्कळ होतें तें महाराजपूर नांवाच्या खेड्याजवळ जमलें, आणि तारीख २८ रोजीं त्याणें कमॉडर इनचीफ सर ह्यू गफ् ह्यास एकाएकीं घेरलें. तसेंच दुसऱ्या एका लहानशा टोळीनें जनरल ग्रे थोडीशी फौज घेऊन जरा वाजूस होता त्याला गांठलें.

असा हा अकस्मात् बिकट प्रसंग गुदरला झणून इंग्रज घाबरले नाहींत. महाराजपूर व पन्ऱ्यार या दोन्ही ठिकाणीं लढाई चांगलीच झाली. शिंद्याची फौज शूरत्वानें उत्तम लढली. त्यांनां सर्व गोष्टी अनुकूलच होत्या.

इंग्रजी सैन्यांतील शिपाई पुष्कळच मेले; त्यांची खराबी फार झाली; तरी अखेर त्यांनांच जयप्राप्ति होऊन ग्वाल्हेरचें बरें वाईठ लॉर्ड एलिन्बरोनें जसें स येईल तसें करावें असा प्रसंग येऊन ठेपला.

याप्रमाणें ग्वाल्हेरचें राज्य स्थापादाक्रांत झालें असतां त्या थोर पुरुषानें त्याच्याशीं जें चतुरपणानें वर्तन केलें तें राजकारस्थानांतील एक मोठ्या कौशल्याचें, नेहेमी वर्णन करण्यासारखें आहे. त्याणें त्या समयीं शिंद्याचा स्नेह जोडला —आणि हा स्नेह पुढें चौदा वर्षांनीं इंग्रजांवर जेव्हां भयंकर प्रसंग येऊन गुदरला तेव्हां उपयोगीं पडला. —लार्ड एलिनबरोनें या प्रसंगी शिंद्याबरोबर तह केला; त्याप्रमाणें तारीख १३ जानेवारी सन १८४३ रोजीं कागदपत्र पुरे झाले. ह्या तहनाम्यांत असें ठरलें कीं राज्य शिंद्याकडे कायम रहावें; मात्र महाराज बयांत येत तों पर्यंत सर्व कारभार रेसिडेंट साहेबाच्या सल्ल्याप्रमाणें चालावा. मुलखासंबंधीं शिंद्याचे सर्व वाजवी हक्क कायम राखण्याचें इंग्रजसरकारानें अभिवचन दिलें. शिंद्यानें सरकारची फौज चाकरीस ठेवावी व तिचे खर्चा बद्दल साठिना १८ लक्ष रुपये वसुलाचा मुलुख तोडून द्यावा, लढाईचे खर्चाबद्दल व कर्जाचे फेडीबद्दल मुलुखच तोडून द्यावा व आपल्या फौजेत फक्त ६००० स्वार ३०००पायदळ२०० गोलंदाज व ३२ तोफा ठेऊन घेऊन बाकी सर्व कमी करावें असा ही ठराव झाला.

लॉर्ड साहेबास असें वाटलें कीं या व्यवस्थेनें शिंद्याच्या मुलखांत शांतता होईल, राज्यव्यवस्थेंत सुधारणा होईल व महाराज हे उपकार स्मरतील. त्या प्रमाणें सन १८४३ पासून १८५७ पर्यंत शिंदेशाईंत स्वस्थता आणि आबादानी होती. महाराज अलिजा जयाजीराव शिंदे हे सन १८५४ मध्यें बयांत आले तेव्हां सर्व कारभार त्यांच्या हातीं गेला, तरी देखील राजकीय प्रकरणीं कोठें कांहीं दंग्याधोप्याचा यत्किंचित ही प्रकार नव्हता. परंतु सन १८५७ मध्यें बंगाल्यांत शिपायांचें बंड उद्भवलें. त्या पूर्वी चार वर्षांपासून शिंद्याची दिवाणगिरी दिनकरराव राजवाडे करूं लागले होते. हे ब्राह्मणगृहस्थ मध्यहिंदुस्थानांत आजपर्यंत जे मोठे प्रामाणिक, फार दूरदृष्टि, आणि अत्यंत हुशार मनुष्य होऊन गेले त्यांच्याच वर्गांतील होत. त्यांचा कारभार सुरू झाल्यापासून तेवढ्या अल्प कालांत लोकांनां हितावह अशा पुष्कळ मोठमोठ्या सुधारणा झाल्या. त्याणीं पुष्कळ वीर गोष्टी बंद क

न रयतेस सुख वाटे असे केलें. ह्या सुधारणा सर्वांनां आवडल्याच असें कांहीं झालें नाहीं. चौदा वर्षांपूर्वी ज्यांच्या मूर्खपणामुळें दादाखासगीवाल्याला आश्रय मिळून दिवाणगिरी लाभली आणि तो इंग्रजसरकार ह्मणजे यः कश्चित मानूं लागला, असल्या कित्येक थोर थोर घराण्यांतील लोकांस मोठा राग आला, परंतु त्या शांततेच्या व सुखाच्या काळीं त्यांच्या खटपटी, कारस्थानें, वगैरे कांहीं चाललें नाहीं.

परंतु इकडे जेव्हां शिपायांचें थोरलें बंड चालू झालें तेव्हां तें वारें ग्वाल्हेरच्या लोकांच्या अंगांत भरल्या शिवाय राहिलें नाहीं. ज्या लोकांची मनें असंतुष्ट झालेली होतीं त्यांनां आशा उत्पन्न झाली व मानकरी वगैरे जे थोर घराण्यांतील लोक होते त्यांच्या मनांत अनेक तरंग येऊं लागले. या प्रमाणें साऱ्या राज्यांतील लोकांचीं मनें अगदीं व्यग्र होऊन गेलीं असतां त्या प्रसंगीं दोघा पुरुषांच्या मनाचें मात्र धैर्य कायम राहिलें. हे दोघे कोण तर एक महाराज जयाजीराव आणि दुसरे त्यांचे दिवाण दिनकरराव.

अगदीं आरंभा पासून शिंद्याचा विचार कांहीं झालें तरी आपण इंग्रज सरकारच्या बाजूस असावें असा होता आणि दिनकरराववाला हें पूर्ण संमत असून तो वरचेवर तेंच सांगत असे. तेव्हां सन १८४३ मध्यें लॉर्ड एलिन् बरो याणें जी दूर दृष्टि पोहोंचवून व्यवस्था केली ती खऱ्या मुत्सद्दीपणाची नव्हे काय ? राज्यलोभास गुंतून शिंद्याचा मुलुख खालसा करण्याच्या भरीस न पडतां त्याणें सर्व राज्य जसेंच्या तसें शिंद्यास समर्पण केलें आणि तो अल्पवयस्क ह्मणून वयांत येई पर्यंत तें नीट चालण्याची तजवीज करून दिली तें कांहीं फुकट गेलें नाहीं. असा बंडाचा प्रसंग जर महादजीबाबा असतांना येता तर तो केव्हांच आपला इष्ट हेतु सिद्धीस नेता ; दौलतराव असता तर तो देखील अशा संधीस कधीं स्वस्थ बसताना. परंतु जयाजी यत्किंचित ही गडबड न करतां इंग्रजांबराबर जो तहनामा झालेला होता तो अक्षरशः घडून चालला इंग्रजांची सद्दी संपली असें दिसूं लागलें, ग्वाल्हेरी पासून २५ कोसांवरच्या मुलखांतला इंग्रजी अम्मल उडाला. तरी त्याणें आपलें व्रत सोडलें नाहीं. त्या वेळची साऱ्या हिंदुस्थानांतील लोकांच्या मनाची स्थिति ध्यानांत आणली ह्मणजे जयाजी रावांला हें काम करण्याला केवढें महाप्रयास पडले असतील त्याचें अनुमा

न होईल.

इंग्रज सरकाराशीं इमानानें वागावयाचें असा शिंद्याचा निश्चय होता ह्मणून त्याणें प्रथम असें केलें कीं वायव्य प्रांतांत जेव्हां बंड झालें तेव्हां तें मोडण्या करितां तेथच्या लेफ्टनंट गव्हरनराला मदत देण्या साठीं आपली हुजूरपागा आग्र्यास पाठविली. नंतर त्याणें आपली सारी तैनाती फौज ( ) ही मदती करितां त्याच्याच हवालीं केली. ही सर्व मदत त्या गव्हरनरानें घेतली. परंतु पुढें लौकरच असें दिसून आलें कीं ज्या कारणा मुळें बंगाल्यांतील फौज बंडास प्रवृत्त झाली त्याच कारणांनीं शिंद्याच्या तैनाती फौजेचें ही मन दूषित झालेलें आहे. त्या प्रमाणें हत्रास, नीमच, आगर, ललतपूर, येथील फौजेनें व शेवटीं तारीख १४ जून रोजीं खुद ग्वाल्हेर येथील तैनाती फौजेनें बंड करून आपल्या वरील पुष्कळ गोऱ्या अम्मलदारांची कत्तल उडविली.

या प्रमाणें बंड करून ते सारे शिपाई तसेच जयाजीरावाकडे गेले आणि आतां आम्हास आग्र्यास इंग्रजावर घेऊन चला अशी विनंती करूं लागले. त्या प्रमाणें जर शिंदा करीत होता तर इंग्रजाला चांगलाच धक्का बसत होता ; परंतु तो फार इमानी व दूरदर्शी पडला ह्मणून बचावलें. त्या वेळीं आसमंतांत पाहिलें तर बंडवाल्यांची सरशी चांगलीच होती. एक दिल्लीच त्यांच्या कबजांत जाऊन राहिली नव्हती ; आग्र्याच्या वायव्ये कडील सारा मुलुख त्यांच्या हातीं गेला होता. शिवाय कानपूर व लखनौ येथें जे इंग्रजी सैन्य होतें त्याला ते वेढे देऊन बसलेच होते आणि खुद बंगाल्याच्या उत्तरेस जो मुलुख इंग्रजाकडे होता तो आतां एकदां त्यांचा पराभव झाला म्हणजे सारा जातो असें खास वाटूं लागलें होतें. आम्हाला तुम्हीं आतां आग्र्यावर घेऊन चला, असें जयाजीरावास जे शिपाई ह्मणूं लागले होते ते यःकश्चित किंवा थोडे होते असें ही नाहीं. त्यांची संख्या बीस हजार असून ते चांगले कवाईत शिकलेले होते. त्यांनीं कानपूर येथें जनरल उईंड ह्यूम याजबराबर व झांशी येथें लॉर्ड स्ट्राथनेअर्न याजबराबर रणांगणीं सामन्यास उभें राहून जे घोर संग्राम केले त्यांत त्यांची तयारी किती उत्तम होती तें स्पष्ट दिसून आलें. तर अशा लोकांच्या विनवणीला या प्रसंगीं जर शिंदा मान्य होत होता तर बंगाल्याच्या उत्तरेकडे इंग्रजी बुडप्याला जो एक धक्का पाहिजे होता तो खचित त्याच्या हातून बसत होता.

असा हा उत्तम समय आला असतां जयाजीराव त्या बंडखोरांना वश झाले नाहीत याचें कारण त्यांनां आपली शक्ति खरी केवढी आहे हें कळलें असावें असें म्हणणें म्हणजे समंजस होते इतकेंच म्हटल्या सारखें आहे, परंतु तसें नाहीं ; त्यांचें शहाणपण व दूरदृष्टि सामान्य लोकां पेक्षां खचित पुष्कळ अधिक असें म्हटलेंच पाहिजे. ते व त्यांचे हुशार दिवाण आपल्याच मनानें व विचारानें वर्तत असून या प्रसंगीं इतके इमानानें, अ गदी खरेपणानें व इंग्रज सरकाराला इतके अनुकूल वागले कीं सरकारानें त्या बद्दल त्यांचे उपकार मानावे. महाराजांनीं या प्रसंगीं असें असें वागावे असें शिकविण्या करितां हिंदुस्थानसरकारानें जर आपल्या कौन्सिलांत-ला एक हुशार मेंबर त्यांकडे पाठवून दिला असता आणि तो सारा दिवस त्यांच्या कानाशीं तोंड लाऊन बसता तरी त्याला आपल्या सरकारच्या हिताची म्हणून याहून विशेष कांहीं मसलत सांगतां आली नसती.

इंग्रजांवर आम्हाला घेऊन चला, असें बंडवाले म्हणत होते परंतु महाराजांनीं तें ऐकिलें नाहीं इतकेंच नव्हे, त्यांणीं त्यांनां मोठ्या चातुर्यानें आणि युक्तिनें वागवून, फुसलाऊन, पैसा वक्षीस देऊन, तुम्हाला नेण्याला अडचणी आहेत अशा उगाच कांहीं तरी सबबी सांगून, कसें तरी त्यांनां तेथेंच रहातें केलें. इतकेंच नव्हे, जेव्हां मोहोची आणि होळकराच्या मुलखांतली बंडखोर फौज त्यांच्या राज्यांतून जाऊं लागली तेव्हां त्यांणीं ह्या आपल्या फौजेला त्यांत जाऊन सामील होऊं दिलें नाहीं. खरें म्हटलें तर दिल्लीचा पाडाव झाला आणि कानपुराला मदत जाऊन पोहोंचली तेथपर्यंत त्यांणीं त्यांनां हालचाल करूं दिली नाहीं. शेवटीं ते अगदींच अनावर झाले आणि गेले ते आयतेच सर ह्यू रोज व सर कॉलीन क्यांबेल यांच्या तोंडीं सांपडले.

ह्या बंडास सुरवात झाल्या पासून आतां आपण गबर व्हावें अशी इच्छा करणारे लोक पुष्कळच झाले होते व त्यांची संख्या झपाट्यानें वाढत होती; तर अशा लोकांनां जयाजीरावाचें हें करणें अगदीं आवडलें नसेल हें कांहीं सांगायाला नको. त्यांच्या मनांत वैरभाव उत्पन्न होऊन फार दिवस लोटले नाहींत तों ते उघडपणें शत्रुत्व दाखवूं लागले. सन १८५८ च्या जून महिन्यांत तात्या टोपे आपली बंडखोर फौज घेऊन ग्वाल्हेरींत शिरले तेव्हां शिंद्याला आपली फौज स्वाधीन ठेवणें अगदीं हुकापास्त होऊन

रोके होतें इतकेच नव्हे, ते लोक खरेच त्या बंडवाल्यांस सामील होऊन उलट त्याच्या बरच्या उलटले, तेव्हां त्याला आपल्या दिवाणासह पळून जाऊन आग्र्यास इंग्रजांचा आश्रय पहावा लागला. पुढें साच महिन्यांत सर ह्यु रोज याणें त्याला नेऊन स्वस्थानापन्न केलें.

या प्रमाणें जयाजीरावानें इंग्रजांशीं जें बगदी इमानानें वर्तन केलें तें त्यांच्या लक्षांत राहिलें नाहीं असें नाहीं. या प्रसंगीचा त्याची वागणूक खरोखर अशी अत्यंत प्रामाणिकपणाची होती कीं इंग्रजांनां कोणत्याही प्रकारें तिची चोरवी मानल्या वांचून रहातां आलें नसतें. त्यांणीं सन १८६० मध्यें दिजंबरच्या १२ व्या तारखेस त्याच्याशीं तह करून त्याला तीस लाख रुपये वार्षिक उत्पन्नाचा मुलुख परत दिला व त्याच्या मनांत दुसरा सगा मरो नेवढ्या वसुली वेरजेचा मुलुख मोबदला करावयाचा होता त्यास ही इंग्रजसरकार मान्य झालें. त्याचें पायदळ ३००० असावें असें पूर्वी ठरलें होतें तें वाढवून ५००० करण्यास व तोफा पाहेल्या ३२ ठरल्या होत्या त्या आतां ३६ ठेवण्यास मंजुरी मिळाली. तैनाती फौजेनें बंड केलें सबब तिच्या बदला दुसरी फौज चाकरीस ठेवण्याचें सरकारानें कबूल केलें.

या नंतर कांहीं दिवसांनीं सरकारानें जयाजीमहाराजांचें नांव स्टार ऑफ इंडियावाले सरदारांचे पहिल्या प्रतीत घातलें.

सन १८५९ पासून जयाजीराव आपले दिवाण आपण होऊन राज्यकारभार स्वतः पाहूं लागले. त्यांचे माजी दिवाण सर रावराजे दिनकरराव राजवाडे हे बहुत करून आग्र्यास रहातात. त्यांचे चिरंजिवास शिंद्यानीं आपल्याजवळ ठेऊन घेतलें.

जयाजीरावांस तीन पुत्र झाले होते, परंतु ते सारे जाऊन संततीचा अभाव झाला, तेव्हां त्यांणीं दत्तक घेण्याचा विचार मनांत आणला. तो अधिकार त्यांनां प्राप्त झालाच होता तो सन १८६५ मध्यें त्यांणीं अमलांत आणला. गणपतराव या नांवाचा एक मुलगा त्याणीं दत्तक घेतला; परंतु त्याला घेते वेळीं असा करार केला कीं आपल्याला ईश्वरकृपेनें औरस पुत्र झाला तर तो गादीचा मालक होईल; गणपतरावानें साडिना लाख रुपये उत्पन्नाचा मुलुख घेऊन स्वस्थ बसावें. परंतु त्याच्या दुर्बुद्धीनें त्याला येवढें ही प्राप्त होऊं दिलें नाहीं. त्याणें कांहीं राजकारण उपस्थित केल्या मुळें जयाजीरावानें त्याचें दत्तविधान इंग्रज सरकारचे संमतीनें रद्द करून

त्याला अन्नाच्छादना पुरती नेमणूक करून देऊन जनकपितृगृहीं परत पाठविले. या नंतर महाराजांनीं विवाह केला ; त्या संबंधा पासून त्यांना पुत्ररत्नलाभ झाला.

भाग २

इंदूर

हे राज्य स्थापन करणारा मल्हारराव होळकर सन १६८६ च्या सुमारास जन्मला. हा जातीचा धनगर. त्याचा बाप खंडूजी बीरकर खुटेकर निंबाळकराच्या फलटणा पासून दहा मैलांवर निरानदीवर जो जुना पूल आहे तेथून जवळच होळ ह्मणून खेडें आहे तेथील रहाणारा, ह्मणून त्यास होळकर असें नांव पडलें. खंडूजी मेंढरें वळून घोंगडीं विणून आपला निर्वाह करी. तो तेथचा चौगुला होता. त्याची बायको खानदेशांतील वळोदें गांवची होती. खंडूजी वारला तेव्हां त्याचा मुलगा मल्हारी पांच वर्षांचा होता. त्याला घेऊन इसवी सन १६९३ च्या सुमारास ती तळेघांस आपल्या भावाकडे रहावयास गेली. त्याचें नांव भोजराजजी बारगल. हा पांढरे सरदार यांजवळ बारगीर होता. मल्हारी बाळाला मामानें प्रथम स्वकुलोचित कर्म जें मेंढरें राखणें तेंच करावयास लाविलें होतें. असें असतां एक दिवस मोठा चमत्कार घडला ह्मणून सांगतात. तो असा—सूर्य मध्यान्हास येऊन त्याच्या प्रखर किरणांनीं आसमंतात् भूमि तप्त होऊन गेली आहे, अशा समयीं मल्हारी वृक्षछायेस बसून मेंढरांवर नजर ठेवीत आहे इतक्यांत सूर्यतापानें पीडित झाल्यामुळें त्याचा डोळा लागला असतां जे तीव्र किरण त्याचे मुखावर पडले त्यां पासून त्याला सहजच बाधा झाली असती, परंतु तितक्यांत एका मोठ्या सर्पानें येऊन त्याच्या मस्तकावर आपली फणा धरली आणि तो ताप निवारला. इतक्यांत त्याची आई ह्मणून भाकर घेऊन आली, ती तो प्रकार पाहून घाबरली आणि तशीच शंकित माघारी जाऊन भावास घेऊन आली. माणसें जमलेलीं पाहून सर्प बरोबर शिरला. मग मुलास उठवून तीं घरीं घेऊन गेलीं आणि स्वज्ञा-

नंचे चार झातारे जमवून सांस ती गोष्ट सांगून तिचें फळ विचारूं लागलीं. ते तर प्रत्यक्ष धनगर, परंतु त्यांतला एक म्हणाला कोणा ब्राह्मणाला विचारा. त्या प्रमाणें त्यांणीं जाऊन विचारतां त्याणें तो शुभ शकून झाला, मुलगा मोठा भाग्यवान होईल झणून सांगितलें ; तें ऐकून त्यांनां आनंद झाला.

मग मामानें मल्हारीचें मेंढरें वळणें सोडवून त्याला उदयास येण्यास सुलभ व प्रतिष्ठित मार्ग लाऊन द्यावा झणून त्याला घोड्यावर बसवून राऊत बनविलें, आणि पांढरे सरदार यांच्या पथकांत चाकरी लाऊन दिली व आपली बारगिरी त्याजवरच सोंपविली. या वेळीं मराठ्यांचें व निजामाचें युद्ध सुरू होतें त्यांत सुदैवानें खुद्द मल्हारजीच्या हातानें निजामउल्मुलुखाकडील एक सरदार प्राणास मुकला त्या बराबर त्याची वाहवा होऊन त्याला पंचवीस स्वारांची मनसबी मिळाली. मग भोजराजजीनें आपली रूपवती व बुद्धिमती कन्या गौतमाबाई इच्याशीं त्याचा विवाह लाविला. तो आपली टोळी घेऊन पांढऱ्याच्या जाहागिरींत चाकरीवर असतां पेशव्यां कडील एक स्वारांचें पथक माळव्यांत जावयास निघालें, तें त्याच्या यजमानाच्या मुलखांतून जाऊं लागलें तेव्हां त्याणें आडवें होऊन इकडून जावयासें नाहीं असें झणून रस्ता बंद केला ; तेव्हां अर्थांतच प्रकरण हातघाईवर आलें. त्या वेळीं मल्हारजीनें जें धैर्य प्रकट केलें तें पाहून पेशव्यांनां संतोष वाटला आणि असा शूर शिपाई आपल्या पदरीं असावा अशी इछा उत्पन्न झाली. बारगलापासून त्यांणीं त्याला मागून घेऊन पांचशें स्वारांची मनसबी सांगितली. तेव्हां आपले पहिले यजमानाचें स्मरण राहण्या करितां त्याणें त्यांचेंच निशाण* पूर्ववत फडकावण्याची परवानगी मागितली, ती पेशव्यांनीं दिली. ही गोष्ट सन १७२४ मध्यें झाली. त्याच्या अंगीं लहानपणींच जें शौर्य व चापल्य दिसूं लागलें होतें तें उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेलें. ही पांचशें स्वारांची मनसबी मिळाल्या नंतर पुढें चारच वर्षांत तो पुष्कळ मोठ्या योग्यतेस चढला. त्याची कर्तबगारी पाहून बाजीराव

---

* होळकराचें सांप्रत ही हेंच निशाण आहे. तें तिकोनी असून त्याला तांबडे व पांढरे पट्टे असतात आणि वर फरारे ही त्याच रंगाचे असतात.

पेशव्यानें खुष होऊन सन १७२८ मध्यें नर्मदेच्या उत्तरेकडील १२ म-हाल त्याला नेमून दिले. सन १७२१ मध्यें आणखी वीस महाल दिले व त्याच वेळीं स्वदस्तुरचें पत्र लिहून माळव्यांतील आमचा अम्मल आतां तु-ह्यांवर सोंपविला आहे, हा संभाळावा असें सांगितलें. सन १७३२ मध्यें माळव्याचा सुभेदार दयाबाहादर याचा पराभव झाला तेव्हां पेशव्यांच्या हा नाखालीं मुख्य सरदार होळकरच होता. या स्वारींत जिंकून घेतलेला मु-लूक व इंदूर मल्हारराव्याच्या फौजेच्या खर्चाकरितां पेशव्यानीं जाहागी र करून दिलें आणि सन १७३५ मध्यें नर्मदेच्या उत्तरेकडील म्राठ्या म-राठी फौजेचें सेनाधिपत्य त्याजकडे दिलें. सन १७३८ मध्यें निजामउल्मु-लुख मोंगलाचें अफाट सैन्य घेऊन मराठ्यांवर शस्त्र धरून आला तेव्हां म-ल्हारराव्यानें त्यावर मोठ्या शौर्यानें हल्ला करून त्या फौजेची दाणादाण उ डवून दिली, आणि नर्मदेच्या व चंबलेच्या दरम्यानच्या मुलखावर मराठ्यां चा अम्मल पक्का बसविला.

सन १७३९ मध्यें पेशव्यांनीं वसईचा किल्ला पोर्तुगीसलोकांपासून घेतला तेव्हां मदत करण्याकरितां मल्हारराव गेला होता. तो किल्ला घेण्या स मराठ्यांस श्रम फार पडले व नुकसान ही फार झालें—पांचशें मनुष्य प डलें असें म्हणतात. तेथून येऊन तो पुनः पेशव्यांस मिळाला आणि त्यां-च्या सरहदीचें संरक्षण करण्या करितां गेला. या वेळीं नादिरशाह स्वारी करण्यास येत आहे अशी आफवा उठून मोठें भय उत्पन्न झालें होतें, परंतु त्याची स्वारी झाली नाहीं.

मल्हारराव एकदां आपल्या सैन्यासह दिल्ली च्या जवळ तटाजवळ जाऊन तेथ कालिंका मंदिराची मोटी थोरली जत्रा भरली असतां गिऱ्हाइकास व दुकानदारा स सरसकट एकीकडून लुटून पार झाला. त्यानंतर आग्र्याजवळ धौलपुर मु-लुखाचे हाताखालील मोगलसैन्यानें त्याला गांठून अगदीं पराजित करून मोडलें तेव्हां तो मोठ्या संकटानें, प्राण घेऊन पळाला. परंतु पुढें एकदां दिल्लीच्या बादशहाची बेगम मलिका झमाना ही मोठ्या थाटानें चालली अ मतां त्याची संधी राखून चमेळ शिकंदरा येथें स्वारीवर अकस्मात धाड घालून मनसोक्त लूट केली; आणि रथ, गाड्या, सोन्या रुप्याची भांडीं, शालजो ड्या मारजीवस्त्रें, जनानखान्याकडील दागिने, वगैरे अगणित जिन्नस ने ल्यांचा किमतीचा बराबर अंदाज देखील झाला नाहीं. महंमदशाह प

ळोन दिल्लीस गेला. बेगम होळकराचे हातीं सांपडली, परंतु त्याणें तिचा योग्य बंदोबस्त ठेऊन दिल्लीस पोंचवन दिलें.

अशी सन १७५१ पर्यंत दहा अकरा वर्षें अनेक लढाया आणि लुटालुट करण्यांत गेलीं, परंतु त्यांत या शूर पुरुषाची नेहेमी बहुधा फत्तेच होत गेली; त्यामुळें त्याची कीर्ति पसरत गेली व राज्य वाढत गेलें. या दैवा नुकूलतेमुळें त्याच्या मनांत उत्तरोत्तर मोठमोठे बेत येऊं लागले आणि असें वाटलें कीं हें सर्व सफळ होण्याला दिल्लीच्या तख्ता वरील मोगल बादशहा काढून हिंदू बसला पाहिजे.

त्याच्या मनांत असा बेत आला असतां सन १७५१ मध्येंच रोहिल्यांनीं अयोध्येवर शस्त्र उचललें. तेव्हां मल्हारराबानें वजीर सफ़्दरजंग यास अनुकूल होऊन उत्तम प्रकारें मदत केली. या प्रसंगीं त्याणें जी एक विलक्षण युक्ति केली तिच्या योगानें त्याची सेनानायकत्वाविषयीं योग्यतेची मोठी ख्याति झाली. एका समयीं त्याच्या जवळ फौज अगदीं थोडी होती आणि शत्रू तर पुष्कळ फौजबंद होते, तरी त्याणें रात्रीं त्यांच्यावर हल्ला करून चांगल्याच जय मिळविला. त्या प्रसंगाचें वर्णन सरजॉनमालकम याणीं असें केलें आहे—मल्हारराबानें हजारों गुरांच्या शिंगांनां पलिते बांधून ते पेटवावयास सांगितले, आणि त्यांचे तांडेच्या तांडे एकारोखानें चालविलें; तसेंच दुसऱ्या बाजूस दरदर झाडाझुडपावर हिलाल उभे करून ते पेठवून टाकले; आणि मग तिसऱ्याच वाटेनें आपलें ते थोडेच स्वार बराबर घेऊन काळोखांतून जाऊन शत्रूवर अकस्मात् छापा घातला. असा हल्ला होऊन एकाबाजूनें खराच मार बसूं लागला आणि बाहेर पहावें तिकडे हजारों दिवठ्या दिसूं लागल्या तेव्हां मराठ्यांनीं आपल्याला चांगलेंच घेरलें, या संकटांतून आपण पार पडत नाहीं, असें वाटून ते अगदीं गर्भगीळ होऊन गेले आणि देहभान विसरून आपला प्राण कसा तरी बचावावा म्हणून छावणी सोडून ज्याला जिकडे वाट सांपडली तिकडे तो पळाला. मग मल्हारबानें त्यांचा गोट सावकाशपणें लुटला. असा युक्तीनें मोठा जय मिळवून त्याणें कीर्ति संपादिली.

याप्रमाणें या मोहिमेंत मल्हारराबानें उत्कृष्ट कामगिरी बजाविली म्हणून दिल्लीपतीनें बहुत संतुष्ट होऊन त्याला किताब व देणगी दिली आणि खानदेशांत चांदोरची देशमुखी देऊन तेथील वसुलावर अष्टमांश म्हणजे

शेंकडा साडेचारा रुपये व्याज घेण्याचा अधिकार दिला.

परंतु हा मुसलमानांचा आणि मराठ्यांचा स्नेह फार दिवस कोठून टिकणार! यानंतर थोड्याच वर्षांनीं मल्हारराव्यानें आपले कृतांतासारखे सडे स्वार व असंख्य बाजारबुणगे बरोबर घेऊन कोठें लूट केली आणि अनेक प्रकारच्या अगणित जिनसांनीं घोडीं अगदीं वांकत पर्यंत लादून शिकंदरे जवळ येऊन तळ दिला. त्या फौजेला महाराजांनीं हूं म्हणण्याची फुरसत म्हणजे त्यांची मर्जी तशीच अमल्यास घोड्यावरची मांड न हालवतां यमुना पार होऊन दोआबांतींल अफाट शेतांत शिरण्यास किंवा राजपुतान्यांतील विस्तीर्ण वाळवंट तुडवण्यास, किंवा पापणीस पापणी न लावतां काळोख्या रात्रीं सारखी मजल करून दूरच्या एकाद्या गांवावर सूर्योदयीं विद्युल्लते प्रमाणें पडून सर्वस्व नाश करण्यास किंवा स्वप्राणाचा बलि देण्यास ही तिची तयारी होती. परंतु अशा काळोखांत आपल्याला कोण पाहतो असें म्हणून सर्व निर्भयचित्तानें जागच्याजागीं स्वस्थ होते इतक्यांत महंमदशहाच्या कांहीं अफगाणस्वारांस त्यांची वातमी लागली. तेव्हां त्यांणीं लगेलग तयारी करून एकदम येऊन त्याच्यावर छापा घातला. मग मराठ्यांनीं जेव्हां तलवार उपसली तेव्हां केवळ विजेचाच वर्षाव होत आहे कीं काय असा भास उत्पन्न झाला, आणि अल्पकाळानें पहातात तों काळोख न म्हणतां, रस्ता वाईट, वाट माहीत नाहीं, अशी रड न गातां सर्व सैन्य दश दिशांस नाहींसें झालें.

मराठ्यांच्या सैन्याची किती ही दाणादाण झाली आणि तें देशोधडीस लागलें तरी अल्पकाळांत पुनः एकत्र कसें व्हावें हें त्यास सांगावें लागतच नाहीं. त्या प्रमाणें पुढें फार दिवस लोटूं न देतां मल्हारराव आपलें अफाट सैन्य घेऊन पहावें तिकडे मुलुख जाळीत सुटलाच.

या मराठ्या महावीराचा शेवटचा संग्राम म्हटला म्हणजे पानपतच्या समरभूमीवर. त्या रणांगणीं मराठी सैन्याची उजवी बाजू शिंदे व होळकर या उभयतांनीं संभाळली होती. एकदां मल्हारराव आपली खासफौज घेऊन मुख्य लष्करांत चालला असतां शत्रूनीं त्याला वाटेंत अकस्मात् गांठलें तेव्हां लहानशी लढाई होऊन त्याचा अगदीं पराभव झाला, तरी तो मुख्य सैन्यांत जाऊन मिळाल्या वांचून राहिला नाहीं, व पुढें तशाच प्रकारच्या चकमकींत शत्रूंचा नाश केल्या वांचून त्याणें सोडलें नाहीं. परंतु

तें घोर युद्ध सुरू होण्या पूर्वी पासूनच मुख्य सेनानायक, साऱ्या मराठे मंडळीचे अधिपति सदाशिवरावभाऊ पेशवे यांणीं मल्हाररावाचा उपमर्द मांडला. अनेक युद्ध प्रसंग पाहिलेला तो कृतकर्मा वारंवार ज्या युक्तीच्या गोष्टी किंवा खरी शहाणपणाची मसलत सांगे त्यांचा अव्हेर आणि उपहास करून तो गर्वोद्धत भाऊ ह्मणे " ह्या धनगराची अक्कल ध्यायाला इतका कोण अडला आहे ? " तरी त्याणें आपला सेवकधर्म सोडला नाहीं. तो सदाशिवराव भाऊला असें म्हणत होता कीं तुम्ही आपल्या सैन्या भोंवते खंदक खणून आपल्या हातानें आपल्याला कोंडून घेता हें बरें नव्हे, असें करूं नका. शत्रूच्या अंगावर जावें, त्याला हुलकावणी दाखवावी , त्यांणीं आपलें जडभारी सामान व अफाट फौज घेऊन आमच्या पाठीस लागावें, आह्मी पळत सुटावें, बरेंच दूर जाऊन एकाएकीं उलटावें आणि मग त्यांचा यथेच्छ समाचार घ्यावा, लांडगे तोड करावी व कत्तल उडवावी , ही जी आपली मराठेशाई लढाईची पूर्वापार चालत आलेली रीत आहे ती सोडूं नये. हा त्याचा उपदेश अगदीं खरा होता, परंतु साऱ्या महाराष्ट्राचें दुर्दैवच ओढवलें त्यामुळें भाऊला आपल्या ज्ञानाचा व बलाचा गर्व होऊन तो कोणाचेंच ऐकेना. शेवटीं अखेर संग्रामाकरितां नेमलेला दिवस तारीख ६ जानेवारी सन १७६१ हा येऊन ठेपला. तेव्हां मल्हाररावाचें सर्व सैन्य सूर्योदया बराबर पहावें तों समरांगणीं उभें, समोरून कसा ही भडिमार चालला तरी एकाही शिपायाचें पाऊल तसूभर मागें नाहीं; त्यांचा सरदार खरा वीर, तो सर्वांच्या अघाडीस, त्याचें सर्व सैन्य त्याच्या साठीं प्राण देण्यास त्याच्या तोंडून काय निघतें तें ऐकण्यास आणि तो कोणीकडे वळतो हें पहाण्यास एकाग्रचित्त उभें होतें.

हा जो शोककारक संग्राम झाला त्यांत मल्हारराव पहिल्या प्रमाणें हिमतीनें लढला नाहीं. त्याणें आपलें सैन्य ही निकरानें लढूं दिलें नाहीं, व दोन प्रहर होण्यापूर्वीच समरांगण सोडलें हें चांगलें केलें नाहीं , असा कोणी त्याला दोष देतात; परंतु कोणी त्यावर असें म्हणतात कीं मराठ्यांना जय येणें नाहीं असें त्याला सकाळींच पुरें भविष्य कळलें, तेव्हां आपलें सैन्य फुकट मरू देण्यांत अर्थ नाहीं असें समजून अखेर दाणादाण होऊन पळापळ झाली असतां आपल्यास घर तरी गांठतां यावें ह्मणून त्याणें सावधपणा ठेविला हें शहाणपणच केलें. तें कसें ही असो, पण लढाईच्या

अंतीं जी पळापळ झाली तींत साऱ्या मराठे सरदारांपैकीं एकटा मल्हारराव मात्र थोडा बहुत व्यवस्थेनें आपलें सैन्य बचाऊन घेऊन देशीं परत आला हें खरें आहे.

पानपताहून माळव्यांत परत आल्यानंतर मल्हारराव आपल्या राज्यास बळकटी आणण्याच्या व त्याची नीट व्यवस्था लावण्याच्या उद्योगास लागला. त्याकामीं त्याला यश चांगलें आलें. कारण तो मनुष्यच थोर बुद्धीचा, विचारी व शांत असून निश्चयी होता; आणि या गुणांच्या योगानें तो आपल्या प्रजेला आवडत असे. मल्हारराव उतारवयाचा होऊन सन १७६५ मध्यें वारला. तेव्हां त्याला शहात्तरावें वर्ष होतें. मराठे सरदारां मध्यें त्याच्याहून मोठा कीर्तिमान असा एक महादजी शिंदा मात्र झाला; तो शिवाय करून त्याच्या तोडीचा पुढें आज पर्यंत एकही वीर झाला नाहीं, आणि राजकीय-व्यवहार-शास्त्रांत तर एक महादजीच कायतो त्याच्याहून श्रेष्ठ झाला. त्याच्या अंतकाळीं त्याच्या राज्याची एकंदर जमाबंदी पाऊण कोट रुपये होती.

मल्हाररावाला खंडेराव म्हणून एकुलता एक पुत्र होता, तो कुंभेरीच्या वेढ्यांत पडला. परंतु त्याची स्त्री अहल्याबाई इच्या उदरीं मालेराव नामक पुत्र व एक कन्या ही होती. खंडेराव पडला तेव्हां अहल्याबाई सती जावयास निघाली, परंतु मल्हाररावानें तिला रहाती केली आणि सर्व प्रपंच तिजवर सोंपविला. मालेराव वेडा होता तरी आजोबा मरतांच त्याच्या नांवानें राज्य चालूं लागलें. परंतु तो फार दिवस जगला नाहीं, नऊच महिन्यांनीं मेला. तेव्हां पासून राज्याचा सर्व भार मातुश्री अहल्याबाईवर पडला. तो तिणें तीस वर्षें वाहिला आणि दया, दाक्षिण्य, सद्धर्माचरण, मनोनिग्रह, गांभीर्य, ज्ञान व विलक्षण हिम्मत इत्यादि सकलराजगुणांनीं भरत खंडांतील मोठमोठ्या राजकार्यधुरंधर मुत्सद्यांस ही दुर्लभ असा उत्कृष्ट लौकिक संपादला. या जगतीतलावर तिजसारखीं अपूर्व स्त्रीरत्नें फार थोडींच निर्माण झालीं असतील.

अहल्याबाईचा कारभार प्रथम सुरळीत चालेना; त्याला विघ्न आल्या वांचून राहिलें नाहीं. रघुनाथराव दादासाहेबाच्या मनांत अहल्याबाईच्या मांडीवर एक लहानसा मुलगा देऊन मग त्याला आपल्या तर्फेच्या मनुष्यां कडून हवें तसें वर्तवावें आणि संस्थान अगदीं आपल्या मुठींत राखावें असें

होतें. ह्मणून त्याणें दत्तक देण्या विषयीं आपल्याकडून झाली तितकी खट पट करून पाहिली परंतु ती सर्व व्यर्थ गेली. अहल्याबाई दृढनिश्चयी आणि शहाणी होती व तिचा पक्ष महादजी शिंद्यानें धरला होता. त्याणें आण खी कांहीं सरदार तिच्या पक्षाला वश करून घेतले व खुद्द पेशवे माधवरा- व त्याला अनुकुल होते; तेव्हां अहल्याबाई मल्हाररावाची सून, सवब खरी हक्कदार आहे. तिची इछा नसल्यास दत्तक देण्याचें कारण नाहीं , तिलाच संस्थान चालवूं दिलें पाहिजे, तिचा हक्क राखण्यास मी तिला पाहिजे तशी मदत करणार, असें तो ह्मणूं लागला. तेव्हां रघोबादादानें तो नाद सो- डला.

याप्रमाणें अहल्याबाईचा अधिकार कायम होतांच तो सुरक्षित राख- ण्याकरितां तिणें प्रथम आधीं आपल्या फौजेवर योग्य मनुष्य नेमण्याचा वि चार मनांत आणला. तो काळ ह्मटला ह्मणजे ज्याच्या अंगीं शक्ति, आणि ज्याची तलवार सतत चमकत राहील त्याची गादी नांदावयाची, अशी चो हींकडे तऱ्हा होती. त्याप्रमाणें होळकरशाई कायम राखण्याला अहल्याबाई- ला तसला मनुष्य पाहिजे होता आणि तो शोधून काढणें ह्मणजे मोठ्या परीक्षेचें आणि धूर्ततेचें काम होतें. परंतु अहल्याबाईनें आपल्याला मनुष्या- ची तशीच परीक्षा आहे असें सर्वांच्या नजरेस आणून दिलें. तुकोजी हो- ळकर ह्मणून एक पोक्त व अनुभविक मनुष्य होता त्याला तिणें निवडून काढलें. हा आडनांवाचा होळकर इतकेंच; मल्हाररावाच्या कुळाशीं त्याचा कांहीं संबंध नव्हता. तुकोजी वखेडेखोर किंवा राज्यलोभी असला मनुष्य नव्हता ह्मणन तो सर्व लोकांनां प्रिय झाला. त्याच्या पेक्षां चांगला असा दुसरा मनुष्य मिळालाच नसता. तो व ती हीं उभयतां परस्परांची योग्य- ता खरीं जाणणारीं असून परस्परांस फार मानीत असत. त्या उभयतांनीं एकविचारें वागून तीस वर्षें पर्यंत राज्यकारभार उत्तम प्रकारें चालविला.- तेवढा काळ पर्यंत होळकराच्या प्रजेला जसें सुख होतें आणि त्यांची जशी भरभराट होती तशी पूर्वी तर कधीं नव्हतीच आणि तेव्हां पासून आलीक डे आजपर्यंत कधीं झाली असेल असें वाटत नाहीं. तीं उभयतां मिळून राज्य चालवीत तें कोणत्याप्रकारें याचें वर्णन सरजॉन मालकम यांणीं असें केलें आहे. —तुकोजी दक्षिणदेशांत असला ह्मणजे सातपुड्याच्या दक्षिणेक- डील साऱ्या मुलखाची व्यवस्था तो पाही आणि उत्तरेकडील मुलखाचा

बंदोबस्त अहल्याबाई ठेवी; मांडलिक राजांकडून वार्षिक खंडण्या वगैरे या बचाच्या त्या तिजकडे पोहोचत. तो हिंदुस्थानांत गेला ह्मणजे तिकडील सं पादलेल्या मुलखाचा व बुंदेलखंडाचा वसूल घेई व राजपुतान्यांतील खंडण्या ही जमा करी. माळवा व नेमाड हे प्रांत नेहेमी तिच्याचकडे असत, व अ शा वेळीं दक्षिणेंतील मुलखाचा ही बंदोबस्त ती राखी. मल्हारराबाच्या जा मदार खान्यांत द्रव्य फार होतें तें सर्व तिच्या ताब्यांत असे आणि शिवाय खासगी शेतवाड्या होत्या त्यांचें उत्पन्न चार लाख रुपये येई तें सर्व ती घे- ई. या साऱ्या पैशाचा खर्च तिच्या मर्जीप्रमाणें होई. बाकी राज्याचा ह्म- णून जो वसूल येई त्या साऱ्याचा नीट हिशेब ठेऊन तो ती राज्याच्या ख- र्चाकडे लावी. जी जमा होई तिचा व खर्चाचा हिशेब अगदीं चोख ठेऊन मुलकी व शिबंदी प्रकरणीं खर्च त्यांतून भागवून जी शिल्लक उरे ती बा- हेर मुलखीं पाठविलेल्या फौजेच्या खर्चाकरितां तो तिजोरींत शिल्लक राखी.

मालकम साहेब आणखी असें लिहितात कीं तुकोजी कोठेंही अस- ला तरी साऱ्या मुलखाच्या हिताहिता प्रकरणीं एकादी गोष्ट त्याच्यापुढें आ ली ह्मणजे तो विचाराकरितां ती अहल्याबाईकडे पाठवी. तसेंच परदरबारीं जे वकील पाठवयाचे ते खुद्द ती नेमून पाठवी.

या परमविख्यात स्त्रीनें तीस वर्षें पर्यंत राज्यभार मस्तकीं वाहून जी कीर्ति संपादिली आणि परदेशीय राजांकडून वाहवा ह्मणून घेतली व मान मिळविला तसें तितकें राज्य करून कोणत्याच राजानें किंवा राणीनें वरें ह्म णून घेतलें नसेल. ती मोठी धार्मिक आणि भजनपूजनांत निमग्न असे त- री येवढ्या मोठ्या राज्याचें तिला जें नित्य पुष्कळ, महत्त्वाचें व विचाराचें काम पडे तें उरकण्याला तिला वेळ सांपडे. राज्यसंबंधीं काम उघड दरबा रांत बसून करावयाचें अशी तिची नित्याची वहिवाट होती. मालकम साहेब ह्मणतात तिच्या राजनीतीचें आदितत्व हें होतें कीं जमिनीवर दस्त माफक ठेवावयाचा व गांवगन्नाच्या कामदारांच्या व जमिनीच्या मालकांच्या हक्कांस केंव्हा इतका धक्का लावावयाचा नाहीं. ती लोकांच्या फिर्यादि स्वतः ऐकून घेई व न्यायाधीश, पंच, मुलकी कामदार वगैरेकडे निकालाकरितां नेहेमीं प्रकरणें पाठवावी, परंतु तिच्यापुढें जाण्याला ह्मणजे कोणाला बंदी, असें क धीं नव्हतें न्यायप्रकरणीं हरएक गोष्टींत ती आपल्यावर फारच मोठी जबा- बदारी समजत असे आणि तिच्याकडे जेव्हां खटल्याचा निकाल सांगण्याचें

येई तेव्हां ग्वटला किंवाही क्षुल्लक असला तरी ती फार शांतपणानें आणि कंटाळा अगदीं न करितां त्याची चौकशी करी.

ती आपल्या कारभारसंबंधाचें काम करण्याला सकाळीं नऊ वाजल्यापासून अकरा वाजेपर्यंत आणि दोनप्रहरीं दोन वाजल्यापासून सहा वाजेपर्यंत बसत असे. ती कामाकडे नित्य चांगलें लक्ष पुरवीत असे त्यामुळें तिच्या कारकीर्दींत शेजारच्या राजेरजवाड्यांशीं स्नेह उत्तम राहिला. एकदां मात्र तिच्या राज्यावर परशासु चाल करून आला, परंतु त्याचाच पराभव झाला तिच्या कारकीर्दींत होळकरशाईतील प्रजा जशी सुखी आणि संतुष्ट होती तशीसाऱ्या हिंदुस्थानांत दुसऱ्या कोणच्याही राज्यांतील नव्हती.

अहल्याबाईचें वृत्त लिहितांना मालकम साहेब म्हणतात —"तिज विषयीं एक एक गोष्ट ऐकावी तो तों अधिकाधिक आश्चर्य वाटतें. परंतु ऐन तिशीच्या वयांत, राज्यकारभार अंगावर घेऊन तो सुरळीतपणें चालविण्याकरितां तिणें जो मानसिक व शारीरिक जबर श्रम करण्याचा एकदां निश्चय केला, तो पुढें तीस वर्षें पर्यंत अणुमात्र ढळूं न देतां, साठाव्या वर्षीं मरेपर्यंत प्रथम दिवसाप्रमाणें अव्याहत चालविला, हें पाहून मन थक्क होऊन जातें. अहोरात्रींत ती आपला यत्किंचित ही काळ व्यर्थ घालवीत नसे. नियमाप्रमाणें राज्यकारभार उरकून जो वेळ मोकळा सांपडे तो ती दानधर्म, भजनपूजन, कथा पुराण, यांत घालवी. तिची धर्मश्रद्धा जबर होती त्यामुळें इहलौकिक कोणतें ही कृत्य करणें झालें तरी तें मनःपूर्वक करीत असे. ती वारंवार असें म्हणत असे कीं मला अधिकारपरत्वें ज्या ज्या गोष्टी कराव्या लागत आहेत त्या सर्वांचा ईश्वरापुढें झाडा द्यावाच लागेल, याजकरितां जें करणें तें त्याला स्मरून केलें पाहिजे." तिणें येवढ्या थोरल्या राज्याचा कारभार मोठ्या हुशारीनें व दक्षतेनें चालविला हें पाहून तिच्या बुद्धिवैभवाचें व हिमतीचें आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं, त्याप्रमाणेंच तिचें आपल्या त्या वेडगळ बाळावर जें अती प्रेम असे आणि त्याचें सांगोपन ती फार जपून करीत असे व त्याचे मरणानें तिला जो शोक झाला त्याचें शांतवन कशानेंच होईना, अशा विषयीं ही ज्या अनेक गोष्टी ऐकूं येतात तेणेंकरून अंतःकरण सद्गदित झाल्या वांचून रहात नाहीं. ही तिची वत्सलता स्वापत्याविषयीं मात्र होती असें नाहीं; आपल्या प्रजांचे ठायीं तिचें प्रेम पुत्रवतच होतें. त्यांच्या सुखाकरितां व सोईकरितां तीवारीक नजर पुरवून

अनेक गोष्टी करीत असे. तिचा दानधर्म व मोठमोठ्या देणग्या ही अगणित होत्या. तिणें देवालयें ही पुष्कळ बांधिलीं, त्यांस नेमणुका करून दिल्या सदावर्तें, अन्नछत्रें वगैरे घातलीं, तीं सर्व अद्याप चालूं आहेत, हें तिच्या पुण्याईचें फळ असेंच म्हटलें पाहिजे.

होळकराचें राजधानी शहर इंदूर हें अहल्याबाईनें वसविलें. तिचा कारभार सुरू झाला तेव्हां तें येवढेंसें खेडें होतें; परंतु पुढें लौकरच मोठें शहर बनलें. तिणें किल्ले ही पुष्कळ बांधले, आणि पुष्कळ द्रव्य खर्चून विंध्याद्रिपर्वतांतून जाण्या येण्यास एक घाट बांधला. त्या ठिकाणीं हा पर्वत अगदीं उभा सुळका आहे.

अहल्या मातुश्री साठ वर्षांची अगदीं वृद्ध होऊन काळजीनें व श्रमानें थकून जाऊन इसवी सन १७९५ मध्यें परलोकवासी झाली. तिच्या मरणानें साऱ्या हिंदुस्थानांतील आबालवृद्धांस दुःख झालें.

अहल्याबाईवर दुःखाचे एक एक पर्वत कोसळले होते. तिच्या भर तारुण्यांत तिचा पति वारला व पुढें दोन वर्षांनीं तिला पुत्रशोक झाला. तिची कन्या मंचाबाई ही एक पुत्र प्रसवली आणि तिचा पति वारला, तेव्हां तिणें त्याच्याशीं सहगमन केलें. असें न करण्याविषयीं मातुश्रीनें पुष्कळच्च मांगितलें परंतु तिणें ऐकिलें नाहीं. या प्रमाणें तिचें हृदय शोकाग्नीनें पोळलें होतें तरी प्रजेच्या कल्याणाविषयीं ती सतत सारखी झटत असे.

अहल्याबाईचा बांधा फार उंच नव्हता व ठेंगणाही नव्हता. ती अगदीं सडपातळ असे. ती म्हणण्यासारखी सुंदर नव्हती, परंतु तिच्या मुखावर विलक्षण तेज असे, आणि अंतकाळ अगदी समीप येऊन ठेपला तरी तिची मुखकांति म्लान झाली नाहीं. ती सुहास्यवदन असे व बहुधा रागावत नसे. परंतु एकदां रागावली म्हणजे तिच्यापुढें कोणास शब्द ही बोलवत नसे. भ्रतार निवर्तल्यापासून ती फक्त शुभ्र वस्त्र परिधान करी. तारुण्याची भर ज्वानी, अमर्याद ऐश्वर्य व सत्ता, इतक्या गोष्टी अनुकूल असून ही तिचें पातिव्रत्य तिळमात्र ढळलें नाहीं. तिची कोणी स्तुति केली असतां ती तिला तिलप्राय खपत नसे परंतु ह्या पुण्यवती सतीची स्तुति करावी तितकी थोडीच आहे.

अहल्याबाईच्या कारकीर्दीत तुकोजीनें जीं शूरत्वाचीं कृत्यें केलीं त्याचें आतां थोडें वर्णन करूं. इसवी सन १७८० मध्यें तो महादजी शिंद्याब-

राव्हर गुजराथेंत जाऊन इंग्रजां बराबर लढला. त्यांचा सरदार कर्नल गोदर्ड याचा पराजय कसा झाला तें महादजीच्या चरित्रांत सांगितलेंच आहे. सन १७८६ मध्यें सावनूरचा नवाब आपला यजमान टिपू सुलतान याजबराबर लढूं लागला, तेव्हां तुकोजीनें त्याच्या मदतीस जाऊन टिपूचा पराभव केला सन १७९२ मध्यें त्याणें आपले फौजेस युरोपियन लोकां प्रमाणें कवाईत शिकविण्याची तजवीज केली आणि चार पलटणें तयार करून त्यांचें आधिपत्य शिव्हेलियर डूड्रेनेक म्हणून एक फ्रेंच होता त्याजकडे दिलें.

त्याची व शिंद्याची अजमीर नजीक लखेरी येथें लढाई झाली तींत हीं चार पलटणें म्हणजे तीस हजार लोक होते. शिंद्याकडील मुख्य सरदार गोपाळराव भाऊ म्हणून होता त्याची फौज अशीच युरोपियन तऱ्हेची कवाईत शिकून तयार झालेली २०००० स्वार आणि ९००० पायदळ मिळून २९००० होती. तिच्यावर मुख्य अम्मलदार डी बाइनी नामक फ्रेंचच होता. त्याणेंच हल्ला करण्याचा बेत ठरविला. डूड्रेनेकचीं पलटणें समूळ नाहींतशीं होत पर्यंत लढलीं, आणि होळकराच्या साऱ्या तोफा शत्रूनीं घेतल्या तरी तीं पलटणें जागा सोडून हाललीं नाहींत, हें पाहून डूड्रेनेकच्या तऱ्हेनेंच पुनः कवायती फौज तयार करावी असें तुकोजीनें ठरविलें.

अहल्याबाई वारली तेव्हां तुकोजीच सर्व राज्याचा मालक झाला. कारण त्याला ती पुत्रवत मानीत असे. परंतु तिच्या मागें तो फार दिवस राहिला नाहीं, दोनच वर्षांनीं म्हणजे सन १७९७ मध्यें वारला. त्याला चार पुत्र होते पैकीं काशीराव व मल्हारराव हे दोन औरस आणि विठोजी व यशवंतराव हे दोन अनौरस होते. वडील काशीराव दादा हे अगदीं भोळे, खुळेच होते. दुसरा मल्हारराव, तो मात्र पाणीदार, मोठा कर्ता निघेल असें दिसत होतें. तुकोजी वारला तेव्हां सरदारीचीं वस्त्रें कोणास द्यावीं हा विचार सुरू होऊन पेशव्यांनीं या चतुर्वर्ग बंधूंस पुण्यास बोलाविलें. यापरमाणें ते गेले असतां मल्हारराव मोठा हुशार सबब त्यालाच वस्त्रें मिळतील असा रंग दिसूं लागला परंतु त्यावेळीं पुण्यांत दौलतराव शिंद्याचें प्राबल्य असून बाजीराव पेशवा त्याच्या मुठींत असल्या सारखा होता, आणि त्याच्या मनांत होळकराचें राज्य आपल्या हाताखालीं घालावयाचें होतें. म्हणून त्या खुळ्या काशीरावास गादीवर बसविलें म्हणजे आपला हेतु सिद्धीस जाईल असे मनांत आणून दौलतरावानें याचा पक्ष चांगलाच धरला आणि एके

दिवस मल्हारराव्यास कैद करण्याकरितां फौज पाठविली. फौज येते असें वर्तमान कळतांच मल्हारराव युद्धास उभा राहिला. अस्तमान पासून मध्य-रात्र उलटून गेली तरी तो रणांगणीच होता. नंतर शिंद्याची फौज परत गेली तेव्हां गोटांत गेला आणि पहाटे देवपूजेस बसला असतां ती बातमी राघून दौलतरावाची फौज पुनः आली तेव्हां तसाच उठून घोड्यावर स्वार होऊन शत्रूची कत्तल करीत सुटला. परंतु त्याची सारी फौज बेसावध पडली असल्यामुळें पाठीशीं मदत नाहींशी झाली आणि शत्रूंची गर्दी फार झाली, त्यामुळें तो व त्याचा मित्र लाख्या बारगीर धारातीर्थी पडले. त्याची बायको गरोदर होती तिला पेशव्यांनीं शहरांत नेऊन बंदोबस्तानें ठेविलें. ती प्रसूत होऊन पुत्र झाला. त्याचें नांव खंडेराव ठेविलें. काशीराव्याला सरदारींचीं वस्त्रें मिळून तो राज्य चालवूं लागला.

या प्रमाणें पुण्यांत अनर्थापात उडाला तेव्हां विठोजी व यशवंतराव तेथून पळाले, ते दोघे दोहींकडे गेले. विठोजीनें बंडावा मांडला म्हणून त्या जवर पेशव्यांनीं फौज रवाना केली. तो सांपडून कैद झाला, नंतर कांहीं दिवसांनीं बाजीरावानें त्याला पुण्यांत हत्तीच्या पायाशीं बांधून ठार मारलें. यशवंतराव पळाला तो नागपुरास भोसल्यांचा आश्रय मिळवावा म्हणून गेला, परंतु तेथें विश्वासघातानें कैद झाला तथापि तेथून अल्पकाळांतच सुटका करून घेऊन मग दीड वर्ष पर्यंत तो भटकत फिरत होता, परंतु तेवढ्या काळांत त्याला आपल्या आंगचें धैर्य व पराक्रम, तसेच पोक्त व गंभीर विचार प्रकट करण्याला पुष्कळ संधी सांपडली. त्याच्या शौर्याची बाहेरं प्रशंसा होऊन इंदुरांत ज्या बातम्या येत त्या अतिशयोक्तिपूरित असत, परंतु त्या ऐकून साऱ्या फौजेला असें वाटूं लागलें कीं आपल्याला हा यजमान केव्हां येऊन भेटेल. शेवटीं त्याणें दर्शन देऊन त्यांचे हेतु पूर्ण केले. तो आला असें समजतांच शीव्हेलियर डूडेनेक यानें तयार केलेली कवायती फौज व तोफखाना, अमीरखानाचे पठाण व त्याचे सोबती पेंढारी, वगैरे झाडून सारी फौज आपण होऊन त्याजकडे जाऊन मिळाली.

या प्रमाणें इंदुरांत चांगला पाय शिरला तेव्हां यशवंतरावानें काशीबायाला कांहीं हक्क नाही म्हणून दूर केलें आणि आपला पुतण्या खंडेराव यास गादीचा मालक ठरवून आपण त्याचा पालनकर्ता व प्रतिनिधि म्हणून सर्व कारभार हातीं घेतला. परंतु पुढें त्या मुलाला त्याणें विषप्रयोग करून

मारलें. सबब तेव्हां पासून म्हणजे सन १७९८ पासून त्याचीच कारकीर्द मानली पाहिजे. इंदुरास अहल्याबाईच्या खासगी जामदारखान्यांत पुष्कळ द्रव्य शिल्लक होतें, तें सर्व यशवंतरावाच्या हातीं लागलें. तेव्हां त्याणें असा पुकारा केला कीं आम्ही फौजेस पगार माहिने महा देणार. गादीवर येतांच त्याणें आधीं ही गोष्ट केल्यामुळें फौजेला मोठा संतोष झाला. परंतु या बोलण्या प्रमाणें फार दिवस चालणें झालें नाहीं. त्याला लौकरच पैशाची तूट पडली, कारण तो फार महत्वाकांक्षीस्वभावाचा पडल्यामुळें त्याचा खर्च वाढत चालला. शेवटीं फौजेचा खर्च भागण्याकरितां तिला दुसऱ्याचा मुलुख लुटण्याची मोकळीक देणें भाग पडलें. तेव्हां शिंदा शत्रु काय आणि पेशवा यजमान काय, त्याचा फारसा विचार न करतां तो सरसकट दोघांचा ही मुलुख लुटीत सुटला. त्याणें आपला मुलुख वैराण केल्याचें जेव्हां दौलतरावाला वर्तमान येऊन पोहोचलें, तेव्हां तो त्याचा समाचार घेण्याकरितां पुणें सोडून निघाला.

परंतु सेनाधिपत्य करण्याच्या कामीं त्या धैर्यशाली यशवंतरावापुढें दौलतराव कसचा टिकतो. युद्धारंभींच गर्दी करून शत्रूला मोठी भीति पाडली म्हणजे आपलें अर्धे अधिक काम झालेंच, असें समजून यशवंतराव सन १८०१ च्या जून महिन्यांत शिंद्याचा सरदार हेसिंग कवायती फौज घेऊन उज्जनीस होता त्यावर तुटून पडला. त्या युद्धांत त्याला जय चांगलाच मिळाला. मग पुढच्या महिन्यांत त्याणें शिंद्याचा मोठा थोरला जंगी तोफखाना नर्मदेच्या उत्तरतीरीं होता त्यावर मोठ्या साहसानें हल्ला केला. त्या प्रसंगीं त्याचा पराजय झाला हें खरें, परंतु शिंद्याला त्याची दहशतच पडली, आणि तेथून तळ हालवून तो इंदुरावर चाल करून निघाला. मग त्या ठिकाणीं फार निकराचा, घोर संग्राम झाला. त्यांत यशवंतरावाला जयप्राप्ति होती तर साऱ्या मराठेशाईचें नशीब चांगलें होतें म्हणण्यास कांहीं हरकत नव्हती, परंतु तें फिरलें, मग तसें कोठन होणार! या समयीं दौलतरावाला जय आल्यानें वसईचा तह होऊन पेशवाई बुडण्याला मार्ग खुला झाला.

यशवंतरावाचा पराभव होऊन नाश ही फार झाला आणि दौलतरावाच्या अंगीं जर खरा मुत्सद्दीपणा असता तर त्याचा समूळ विनाश होण्यास ही अवकाश लागला नसता. परंतु त्याच्या अंगांत तो गुण नसल्यामुळें

मुळें तो तह करण्याच्या व्यर्थ नादास गुंतून हातची शिकार घालवून बसला यशवंतरावाच्या साऱ्या सैन्याचा फडशा पडला होता, परंतु न गडबडतां त्याणें पुनः फौज तयार केली. शिपायगिरीचा धंदा करणारे लोक चोहींकडे फिरतच असत, ते गोळा करण्याला त्याला फार उशीर लागला नाहीं. तेवढी तयारी होतांच त्याणें प्रथम राजपुतान्यांत लूट केली, तेथून खानदेशांत जाऊन तो लुटून तसेच पुण्याकडे मोर्चे फिरविले. पुण्याजवळ दौलतरावाचा एक सरदार फौज घेऊन होता, त्याचा तारीख २५ आक्टोबर रोजीं यशवंतरावानें पराभव करून पुण्याची वाट धरली. हें वर्तमान कळतांच बाजीराव साहेब तेथून पळाले. यशवंतरावानें पुण्यांत शिरून यथेच्छ लूट केली.

बाजीराव पेशवा आपला भित्रेपणा थोडा बाजूस ठेऊन कांहीं तरी मर्दपणानें वागता तर होळकरावरावर तह करण्याची खटपट करून थोडे दिवस कसे तरी काढण्याचें त्याचे मनांत आलें असतें. इतक्यांत दौलतराव शिंदा आपलें अफाट सैन्य घेऊन येत होता तो पोहोचतच होता. परंतु असल्या भित्र्याला इतका दम कोठून निघणार! त्याणें क्षणैक विजयी होण्याच्या आशेला भुलून वसईच्या तहनाम्यावर सही केली, आणि आपलें स्वातंत्र्य गमाविलें. इंग्रजांनीं त्याला पुण्यांत नेऊन पुनः स्वपदारूढ केलें, परंतु त्या तहापासून तो त्यांचा कैदी बनला.

मग यशवंतराव स्वराज्यांत परत आला आणि तेथून इंग्रजांचें व शिंद्याचें युद्ध जुंपून जे दारुण संग्राम होत होते ते स्वस्थपणें पहात बसला. त्या प्रसंगीं तो जर दौलतरावाला साहाय्य करता तर त्या युद्धाचा परिणाम अगदीं विपरीत होता. परंतु तो शिंद्याला कां सामील झाला नाहीं हें अद्याप कळत नाहीं, तें आपलें गूढ आहे. त्याला असें वाटलें असावें कीं हें युद्ध फार दिवस चालेल आणि दोन्ही पक्ष जर्जर होऊन जातील, परंतु जयप्राप्तीची उभयतांनां ही शंकाच राहील तर असा प्रसंग येई पर्यंत आपण स्वस्थ राहून मग मध्यें पडावें आणि दोघांसही आपलें सांगणें मान्य करण्यास लावावें. सन १८६६ मध्यें युरोपांत मोठें युद्ध झालें तेव्हां तिसऱ्या नेपोलियनाला असेंच वाटत होतें. शिंद्याचें व इंग्रजांचें जें युद्ध चाललें तें फार निकराचें तर खरेंच परंतु तें अल्पकाळांत आटपून त्याचा पक्का निकाल लागेला. दौलतराव हतवीर्य होउन स्वस्थ बसतो इतक्यांत यशवंतराव इंग्र-

जांच्या विजयी फौजेशीं गांठ घालण्याला समरांगणीं उभा राहिला.

यशवंतरावानें जो युद्धाला आरंभ केला तो त्याच्या हिमतीला आणि निश्चयाला शोभण्या सारख्या प्रकारचा होता. प्रथम तर त्याला दैव बरेंच अनुकूल होतें. कर्नल मॉनसन याचा पराभव करून त्याला त्याणें पळाया-लाच लाविलें. त्याणें इंग्रजांच्या मुलखावर एकदम हल्ला केला परंतु पुढें त्या चीं गति इंग्रजांबराबर आज पर्यंत जे जे राजे लढण्यास उभे राहिले त्यांच्या च प्रमाणें झाली. फत्तेगड व दीग या ठिकाणीं तुंबळ युद्ध झालें त्यांत व आणखी कांहीं ठिकाणीं हलक्या लढाया झाल्या त्यांत त्याचा अगदीं पराभ-व झाला, तेव्हां तो भरतपूरच्या राजाच्या आश्रयास गेला. इंग्रजांनीं त्या कि ल्ल्याला वेढा घातला, परंतु त्या राजानें व यशवंतरावानें किल्ल्याचें संरक्षण उत्तम प्रकारें करून इंग्रजांच्या सैन्याचा अतिशय नाश करून त्यांना तेथून हटवून लाविलें. पुढें भरतपूरच्या राजाशीं इंग्रजांनीं तह केला, तेव्हां यश-वंतराव पळून पंजाबांत गेला. रणजितसिंगानें आपल्याला मदत करावी अ-सा त्याचा हेतु होता परंतु तें कांहीं झालें नाहीं. लॉर्ड लेक इंग्लिशांकडील कमांडर त्याच्या पाठीस लागला. लेक साहेब इकडून तिकडे कूच करण्या विषयीं तर फारच हिम्मतवान असे; त्या प्रमाणें या प्रसंगीं करून त्याणें य-शवंतरावास अगदीं जेरीस आणलें. त्याला मग कशाची ही आशा उरली नाहीं तेव्हां तो निरुपायास्तव शत्रूच्या स्वाधीन होऊन आतां माझी व माझ्या राज्याची व्यवस्था पाहिजे तशी करा म्हणाला. परंतु इंग्रज सरकारानें त्या-चा सर्व मुलुख त्याला परत दिला तेव्हां त्याला मोठें आश्चर्य वाटलें. त्या वे ळीं सरकारानें थोडासा मुलुख खालसा केला, परंतु तो देखील पुढच्या वर्षी सोडून दिला.

या प्रमाण युद्धाचा शेवट लागून यशवंतराव इंदुरास परत आला, त्या बरोबर तो आधीं आपल्या सैन्याची व्यवस्था करूं लागला. त्या वेळीं त्याणें जी सुधारणा केली ती फार शहाणपणाची खरी. त्याच्या फौजेंत शि पायांची भरती फाजील झालेली असल्यामुळें व्यवस्था नाहींशी झाली होती, आणि त्यामुळें सारें बाजारबुणगें भरल्या सारखें झालें होतें. तर हें उपयोगीं नाहीं असें तेव्हांच ध्यानांत येऊन त्याणें तें सारें तेव्हांच भराभर कमी के-लें आणि आपल्या राज्याच्या उत्पन्नाच्या मानानें खर्च भागे इतकी फौज का यम राखली, आणि तींत व्यवस्था व बंदोबस्त नीट केला लुटारू घोडेस्वा

र होते ते युद्धांत उपयोगीं पडण्याकडे फारसें लक्ष देत नसत, त्यांची नजर लुटीवर विशेष असे, सबब आतां हे उपयोगीं नाहींत असें समजून त्यांणें ते एकदम कमी केले.

या प्रमाणें यशवंतरावानें आपल्या घरची व्यवस्था लावली यांत कांहीं गैर केलें नाहीं,परंतु तें त्या कमी केलेल्या फौजेस बरें न वाटून ती सर्व त्यावर उलटली, आणि त्याला गादी वरून काढण्याचें ठरवून त्यांणीं त्याचा पुतण्या खंडेराव जो खरा मालक होता त्यास राजा करून त्याचे नांवाची द्वाही फिरविली. यशवंतरावानें तें बंड तत्काल मोडलें. पुतण्यापासून केव्हांच त्रास होऊं नये म्हणून त्याला विषप्रयोग करून त्यांणें तें शल्य काढून टाकलें म्हणून मागें सांगितलें आहे तें या समयीं. या वेळीं त्या मुलाचें वय अकरा वर्षांचें होतें. त्या नंतर थोड्याच दिवसांनीं आपला भाऊ काशीराव याला ही त्यांणें त्याच उपायानें परलोकास पाठविलें, आणि त्याची स्त्री गरोदर असतां तिला त्याच मार्गानें त्याच्या भेटीस लावून दिलें.

अशा क्रूरकर्मांनीं राज्य अगदीं निष्कंटक करून मग यशवंतराव पूर्वी मनांत आणल्याप्रमाणें युद्धसामग्री तयार करण्यास पहिल्यापेक्षां दुप्पट मेहेनत करूं लागला. तोफा ओतण्याचा कारखाना सुरू करून तो भट्टीवर बसून स्वहस्तानें काम करी. त्याचा स्वभाव आधींच तापट होता, तो उत्तरोत्तर अधिकच वाढत गेला. त्यांणें कांहीं हुकूम केला आणि तो तत्काळ अमलांत आला नाहीं म्हणजे तर त्याच्या रागाला अगदीं सीमाच नाहींशी होई. तो विलक्षण श्रम करी, आणि तशांत सुरापानाचें व्यसन लागून तें फार वाढलें, यामुळें त्याचें मन अनावर झालें आणि बुद्धीला भ्रंश पडूं लागला असें होतां होतां तो चांगलाच वेडा बनला, तेव्हां सन १८०८मध्यें त्याला वेड्याचे सर्व शिष्टाचार करण्याचा प्रसंग आला. त्याला बरा करण्या करितां पुष्कळ उपाय झाले परंतु त्यांपासून कांहीं गुण आला नाहीं. प्रथम एक वर्ष भ्रमिष्टपणांत जाऊन मग तर तो अगदींच वेडा होऊन पडला. तशीं दोन वर्षें जाऊन शेवटीं तारीख २० आक्टोबर सन १८११ रोजीं बंबुरा शहरांत त्याचा काळ झाला.

यशवंतरावाच्या शरीराचा बांधा मध्यमसर असून तो वळकट आणि चपळ होता. त्याचा वर्ण श्याम असून तो एका डोळ्यानें आंधळा होता, परंतु स्वभावतः मोठा पाणीदार असल्यामुळें विरूप न दिसतां त्याची मुख

च्यां मनोहर दिसे. त्याची चालचर्या ग्रांट डफ् साहेबांनीं अशी वर्णिली आहे—यशवंतरावाच्या स्वभावाचा मुख्य धर्म म्हटला म्हणजे तो फार विलक्षण हिम्मतवान व धाडशी पुरुष होता. इतर मराठ्यां प्रमाणें जयाच्या प्रसंगीं त्याचे हे गुण अनावर होत असतच, परंतु त्यांच्या प्रमाणें कशाही पराजयाच्या प्रसंगीं तो आपलें धैर्य खचूं देत नसे हें विशेष होतें; इतर मराठे सरदारांपेक्षां तो विद्वान होता. त्याला स्वभाषा लिहितां वाचतां येई. तो मनाचा मोकळा असून केव्हां आर्जववृत्ति ही धरी. त्याला विनोदपर भाषण करण्याची शैली साधली होती; तें भाषण हिंदु शिपायांनां मोठें आवडत असे. त्या शिवाय त्याच्या अंगीं इतर गुण थोडेच होते. त्याची लहर लागली ह्मणजे तो केव्हां केव्हां पुष्कळ पैसा उधळी, परंतु स्वभावतः लुटारू, निर्दय, क्रूर, उद्धट, मत्सरी, आणि जुलमी होता.

यशवंतरावाला वेड लागलें तेव्हां सर्व कामकारभार त्याची राख तुळसाबाई* पाहूं लागली. ही स्त्री फार रूपवती आणि बुद्धिमती असून तिच्ची चालरीत ही मोठी मोहक होती. यशवंतरावाची आणखी एक राख कुंभारीण होती, तिचा सरासरी चार वर्षांचा मुलगा होता तो तुळसाबाईनें दत्तक घेतला. त्याचें नांव मल्हारराव. तो वयांत येण्याला पुष्कळ वर्षांचा अवकाश होता ह्मणून तेथपर्यंत सारें राज्य आपल्या हातांत राहील असें तिला सहजच वाटलें. बलरामशेट ह्मणून यशवंतरावाचा दिवाण होता त्यालाच तिणें कायम राखलें. तो आपल्याला अगदीं अनुकूल आहे असें ती समजत होती.

यशवंतरावानें नीट व्यवस्था लाऊन जें नवीन सैन्य तयार केलें होतें तें आपल्या बळाचा गर्व वहात होतें; त्याची शक्ति उघडच दिसत होती

---

* यशवंतरावाची तुळसाबाईशीं दोस्ती जमण्यापूर्वी तिचें लग्न झालेलें होतें. तो तिला पाहून मोहिंत झाला. आणि पुढें थोड्याच दिवसांनीं तिच्या नवऱ्याला तुरंगांत टाकून तिला वाड्यांत घेऊन गेला. असली सुंदर बायको उपटून नेली हे तिच्या नवऱ्याचें नुकसान केलें, असें शेवटीं त्याच्या मनांत येऊन त्याणें त्याला मुक्त करून एक घोडा, पोषाक आणि थोडासा पैसा देऊन बोळविलें.

तर अशा फौजेला आवरणें म्हणजे अगदीं सामान्य काम नव्हतें; त्यांतून तें फक्त रूपसंपन्नतेच्या जोरावर अधिकारपद पावलेल्या स्त्रीला लटलें म्हणजे विशेषच होतें. तें सैन्य केवळ बंडखोर असल्या सारखें मन मानेल तसें वागूं लागलें. होळकरांनीं आपल्या शेजारच्या राजेरजवाड्यांचा मुलुख काबीज करून घेऊन आपल्या राज्यांत सामील केलेला होता. तो परत द्यावा अशी त्यांची इच्छा होतीच, ती पूर्ण करून घेण्याला ही वेळ चांगली आहे असें पाहून किल्येकांनीं निर्भयपणें महाल बळकाविले. मल्हारराव्याच्या आणि अहल्याबाईच्या वेळेस राज्याला जी बळकटी होती ती नाहींशी होत जाऊन त्याचे तुकडे तुकडे उडून नाश होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. फौज वरचेवर पैसा मागूं लागली आणि इतकी उद्धटपणानें वागूं लागली कीं शेवटीं तुळसाईबास गंगाराव किल्ल्यांत पळून जाऊन रहावें लागलें. परतु ती तेथें स्वस्थ बसली नाहीं. गणपतराव म्हणून तिचा एक अक्कलशून्य सखा होता, त्याच्या चिथवणीनें तिणें एक भयंकर बेत चालविला होता, तो साध्याकरितां बळरामशेट दिवाणाचा तिणें खून करविला. या भयंकर कृत्यानें फौजेंत कांहीं दहशत पडली नाहीं; त्यांची कुरकुर बंद न होतां उलट ते अधिकच चेतले आणि तुळसाबाईवर चालून गेले. तिच्या जवळ जे लोक होते त्यांचा पराभव झाला. तेव्हां ती मुलाला घेऊन पळाली ती तेथून सोळा मैलांवर अलोट शहरीं आश्रया करितां गेली. याच सुमारास म्हणजे सन १८१७ मध्यें इंग्रजांनीं पेंढाऱ्यां बरोबर लढाई सुरू केली होती म्हणून उज्जनी जवळ त्यांची फौज जमत होती तर ही उत्तम संधी फुकट घालवूं नये असें तुळसाबाईच्या मनांत येऊन तिणें मल्हा व माझ्या मुलाला या प्रसंगीं आश्रय द्या असा इंग्रजी कमांडराकडे मोठा काकुळतीचा निरोप पाठविला तिची विनंति मान्य झाली, परंतु पुढें करारमदार होऊन बोलणें अमलांत यावयाचें इतक्यांत इंग्रजांची आणि बाजीरावाची लढाई सुरू झाली. होळकराच्या दरबारांत दुफळी होऊन पुष्कळ मोठे व वजनदार लोक होते ते एका पक्षास मिळाले आणि बाजीराव पेंढारे हे आपले यजमान, याजकरितां या प्रसंगीं आपण त्यांची सेवा केली पाहिजे असा निश्चय करून त्याला जाऊन मिळण्याला सिद्ध झाले असा प्रसंग आला तेव्हां तुळसाबाई अगदींच बलहीन होऊन बसली. किल्येक पठाण सरदार सैन्यांत होते त्यांनीं सर्व सैन्य आपल्या ताब्यांत घेतलें आणि ते इंग्रजांवरावर कोणत्याही प्र

कारें सख्य करण्यास कबूल नव्हते. त्याणीं एकदम लढाईच सुरू केली आणि प्रथमारंभींच तुळसाबाईला व तिचा सखा गणपतराव याला धरून कैद केलें, तसेच बालराजा मल्हारराव यास ही आपल्या ताब्यांत घेतलें. दुसऱ्या दिवशीं म्हणजे तारीख २० दिसेंबर सन १८१७ रोजीं क्षिप्रेच्या तीरीं त्यांणीं तुळसाबाईचा शिरच्छेद केला.

तिच्या स्वभावा विषयीं व गुणांविषयीं सर जॉन मालकम असें लिहितात--तुळसाबाईचा वध झाला तेव्हां ती तीस वर्षांची असेल नसेल. तिचें सौंदर्य उत्तम होतें, बुद्धि तीव्र होती, आणि चालरीत ही मोहक होती. तिचें वक्तृत्व असें अस्खलित आणि मनोवेधक होतें कीं त्याच्या योगानें श्रोत्यांच्या मनाचें आकर्षण होऊन तिच्या हेतूप्रमाणें वर्तावें अशी त्यांची मनीषा होई. असे तिच्याहून पटाईत बोलके त्या दरबारीं थोडेच होते. तिचें घोड्यावर बसणें ऐटदार होतें आणि बाहेर निघाली तर पदरच्या मोठमोठ्या सरदारांच्या वगैरे पुष्कळ बायका आपल्या बराबर घेऊन थाटानें जाई. परंतु ईश्वरीकृपेनें असे कांहीं लोकोत्तर गुण अंगीं असतां व राजलक्ष्मी ही प्राप्त झाली असतां दुर्व्यसनांत निमग्न होऊन त्या सर्वांचें मोतेरें करून टाकल्याचें या बाईसारखें दुसरें ध्यानांत ठेवण्या सारखें उदाहरण इतिहासांत कोठेंच नसेल. ती कांहीं यशवंतरावाची विवाहित स्त्री नव्हती, तरी त्याचें सारें कुटुंब तिच्या स्वाधीन व त्याचा वारस म्हणून जो मुलगा मालक ठरलेला तो तिच्या हातांत असल्यामुळें ती खरी धनीण असल्या सारखाच तिचा हुकूम चालत होता. यशवंतरावाची तिच्यावर प्रीति होती, आणि आतां जो गादीचा मालक त्याचें संरक्षण करणें तिजकडे आहे हें मनांत आणून होळकराच्या पदरचें लोक तिला पुष्कळ मानीत होते; परंतु तें सर्व बाजूस राहून पुढें तिला कोणी विचारीनासें झालें आणि ती मेली तर कोणाला वाईट वाटलें नाहीं. तुळसाबाईला मारल्याचा दुसऱ्या दिवशीं महिदपूर येथें होळकराच्या सैन्याची आणि इंग्लिशांची लढाई झाली, त्यावेळीं तो पोडशवर्षात्मक बालराजा मल्हारराव गजारूढ होऊन समरांगणीं उभा राहिला. तो प्रथम मोठी हिम्मत धरून होता, परंतु त्या सैन्याची तारांबळ उडून तें जेव्हां पळूं लागलें तेव्हां बिचारा रडूं लागला आणि मागें परतण्या विषयीं शिपायांची विनवणी करूं लागला. पुढें पंधरा दिवसांनीं म्हणजे तारीख ६ जानेवारी १८१८ इसवी रोजीं मंदोसरचा तह झाला; त्यांत त्याचें. सुमार दोन

तृतीयांश राज्य जाऊन तो इंग्रजांचा मांडलिक होऊन बसला. त्या तहांतील मुख्यमुख्य ठराव असे होते--होळकरानें सातपुड्यांतील व त्याच्या दक्षिणेकडील आपला सारा मुलुख इंग्लिशांस द्यावा; रजपूत संस्थानिकांवर आपले जे हक्क असतील ते व त्यांजपासून जो कांहीं मुलुख जिंकून घेतलेला असेल तो सर्व सोडून द्यावा; कोट्याचा राजापासून पूर्वी चार महाल मक्त्यानें घेतलेले होते ते सोडावें, अमीरखान पठाणाला व गफूरखानाला ज्या जाहागिरी करून दिल्या होत्या त्या चालवाव्या; गफूरखानानें मात्र जाहागिरीबद्दल ६०० स्वारांनिशीं नोकरी करावी, आणि इंग्रजसरकारानें होळकराच्या शिल्लक राहिलेल्या राज्याचें संरक्षण करावें. या प्रमाणें ठराव होऊन होळकराकडे जो मुलुख उरला त्याचा तेव्हां वर्षास बारा लक्ष रुपये निवळ वसूल येत होता, परंतु तो पुढें पुष्कळ वाढण्या सारखा होता. त्या प्रमाणें बराच वाढला.

हा मंदोसरचा तह होळकरांचे दिवाण तात्या जोग यांच्या मार्फत ठरला. त्या प्रमाणें तहनाम्यावर सह्या होऊन गेल्यावर त्या दिवाणानें आपलें सारें लक्ष बाजवी पेक्षां फाजील सैन्य होतें तें कमी करण्याकडे, खर्च तोडण्याकडे. आणि जमाबंदी वाढविण्याकडे लाविलें. हा त्याचा यत्न स्तुत्य होता व त्या कामीं त्याला इंग्रज सरकारच्या अम्मलदारांकडून उत्तेजन आणि मदत ही मिळाली. त्या वांचून त्याचे सर्व श्रम व्यर्थ झाले असते-- कारण खाजिना रिकामा पडला होता आणि मुलखांत अव्यवस्था झाली होती, परंतु तात्या जोगाला लागला तसतसा थोडा थोडा पैसा इंग्रजसरकार वारंवार काढून देत गेले, त्यामुळें साऱ्या अडचणी पार पडल्या.

पुढें सन १८१९ मध्यें दोन बंडें उद्भवलीं, त्या मुळें दिवाणजीला विशेषच संकट झालें आणि तो जी मुलखाची व्यवस्था लावणार होता तें काम लांबलें. एका बंडाचा पुढारी मल्हारराव होळकर म्हणून कोणीं तोतया उठला होता तो आणि दुसऱ्याचा हरीराव होळकर म्हणून महाराजांचा एक चुलत भाऊ होता तो होता. त्याचें म्हणणें मीच गादीचा वारस आहें सबब ती मला मिळावी असें होतें. त्या तोतयाचें नांव कृष्ण कुंवर असें होतें त्याणें चंबळेच्या पश्चिमतीरास राहून बरेंच सैन्य गोळा केलें, कांहीं शिपाई नोकरीस ठेविले आणि कांहीं दिवस पर्यंत रण गाजविलें. परंतु महिदपूर येथें दिवाणजीनें इंग्रजी अम्मलदार नेमून जी फौज चाकरीस ठेविली

होती, ती त्यावर पाठविली. तिणें बंडखोरांचा मोड करून दाणादाण उड वून दिली; तेव्हां तोतया पळाला तो कोट्यास गेला; तेथें त्याची ओळख पटून तो कैद झाला. परंतु त्याला उगाच दुसऱ्या लोकांनीं फसवून नांवा ला मात्र पुढें केलें होतें असें दिसून आल्यावरून त्याला क्षमा होऊन तो बंदमुक्त ही झाला. दुसरें हरीरात्र होळकराचें जें बंड होतें तें इतकें ही चे तलें नाहीं; कारण आपण हा वेडेपणा केला अशी त्याची लौकरच खात्री होऊन तो शुद्धीवर आला आणि महाराजांस शरण गेला. त्यांचे मनांत या ला क्षमा करावयाची होती, परंतु तें दिवाणजीचे विचारास येईना. अशा मनुष्यास शासन न करतां सोडून दिलें तर तो जाऊन मुलखांत पुनः दंगा मांडील असें वाटून त्याणें त्याला महेश्वरास अटकेंत ठेविलें.

सन १८२१ व १८२२ या वर्षीं पुनः आणखी दंगे झाले परंतु इंग्रजसरकारच्या फौजेच्या मदतीनें ते मोडले.

होळकर सरकारचें राज्य नीट चालूं लागून पुनः त्याचा उत्कर्ष व्हा वा ह्मणून मनापासून झटणारा हा हुशार दिवाण तात्या जोग सन १८२६ च्या एप्रिल महिन्यांत वारला. त्याच्या जाग्यावर रावजी त्रिंबकाची नेमणूक झाली. परंतु पुढें वर्षानें त्याला दूर करून दाजी बक्षी ह्मणून तात्या जोगा चा कोणी आप्त होता तो कारभार करूं लागला. पण तो त्या कामाला ना लायक ठरल्यामुळें आपाराव कृष्ण ह्मणून एक पंडित होता त्याची नेमणूक झाली. हा मनुष्य बुद्धिमान आणि चलाख होता.

मल्हारराव्याच्या कारकीर्दीत मुलखांत स्वस्थता झाली हें एक काम मो ठें झालें. त्याच्या खालोखाल दुसरें ह्मटलें तर माळव्यांतील सारी अफू वि- कत घेण्याचा अधिकार फक्त एकाच्या इंग्रज सरकारास असावा असा उभय तांचा ठराव झाला. परंतु असा मक्ता केल्यामुळें पुष्कळ मोठमोठ्या अडचणी उभ्या राहूं लागल्या तेव्हां सन १८२९ मध्यें तो मोडून माळव्यां तून बाहेर पडून इंग्रज सरकारच्या हद्दींतून समुद्र किनाऱ्यास जी अफू जा ईल तीवर निर्यात जकात बसवावी असें ठरलें.

मल्हारराव होळकर राज्यकारभार संबंधीं कामाकडे स्वतः मुळींच प हात नसे. तो अगदीं दुर्व्यसनी, उधळ्या मनुष्य होता, आणि खुषमस्करी करून मर्जी संपादणारे नादान लोक नाचवतील तसा नाचत होता. मग त्याचा नाश होण्याला किती उशीर! रावजी त्रिंबकाचे मागून जे तीन दि-

वाण झाले त्यांतून एक ही नांवालौकिकाचा मनुष्य नव्हता. असे राजे आणि प्रधान मिळाल्यावर जो परिणाम व्हावयाचा तो सहजच झाला. वसुलांत तूट पडली, आणि देशाची स्थिति थोडी थोडी बिघडत बिघडत महीदपूरच्या लढाईपूर्वी जी अवस्था होती तीच होत आली—खजिना रिकामा पडला, आणि फौज बंडाला प्रवृत्त झाली. मग सन १८२९ मध्यें महाराजांचे डोळे उघडून पुढील संकट मनांत येऊं लागलें. तेव्हां आतां मी नीट वागतों, स्थिति सुधारतों, अशीं मातुश्रीस वचनें देऊन तें भावी संकट टाळण्याकरितां तो तिजजवळ पैसा मागूं लागला. तिच्या जवळ द्रव्य पुष्कळ होतें तें तिणें दिलें आणि आपाराव कृष्ण यास कामावरून दूर करून माधवराव फडणिसास दिवाणगिरीचीं वस्त्रें देवविलीं.

या नंतर चार वर्षांनीं म्हणजे सन १८३३ च्या आक्टोबर महिन्यांत मल्हारराव्याची कारकीर्द संपली. तो अगदीं पूर्ववयस्क, सारा २८ वर्षांचा होता, परंतु अत्यंत दुराचारानें शरीर प्रकृति बिघडून जाऊन अकाळीं मृत्युमुखीं पडला. त्याला संतति नव्हतीच, परंतु त्याचा मरणकाळ अगदीं समीप येऊन ठेपला तेव्हां त्याची स्त्री गौतमाबाई इणें सासूबाईच्या संमतीनें बापू होळकराचा मुलगा मांडीवर घेतला. बापू आणि मल्हारराव एकाच घराण्यांतले असून तो तुकोजी होळकराला अगदीं जवळ होता. ह्या मुलाचें नांव महाराज मार्तंडराव होळकर असें ठेऊन तारीख १७ जानेवारी सन १८३४ रोजीं मोठ्या समारंभानें प्रसिद्धपणें त्याची गादीवर स्थापना झाली. त्याचें वय चार वर्षांचें सुद्धां नव्हतें. एकंदर हुकमत दिवाणजी माधवराव फडणीस यांचीच होती. इंग्रज सरकारानें तें दत्तविधान मान्य केलें, परंतु दुसरा कोणी वारस असून या योगानें त्याचा हक्क बुडत असेल किंवा होळकराच्या पदरचे बहुतेक सरदार, मानकरी, आश्रित वगैरे लोकांस तें मान्य नसेल तरी याच मुलास मदत देऊन गादीवर कायम राखूं असें मात्र कबूल केलें नाहीं.

मार्तंडरावाला निर्बंधपणें राज्योपभोग घडणें कठीण असें थोड्याच काळांत दिसूं लागलें. माजी राजाचा चुलत भाऊ हरीराव होळकर महेश्वरास कैदेंत पडला होता, पण तो अजून जिवंत होता. त्याच्या पक्षाचे कांहीं लोक होतेच, त्यांणीं तारीख २ फेब्रुआरी रोजीं रात्रीं तुरंगावर [illegible] ठून त्याची मुक्तता केली आणि लगेच त्याला मंडळेश्वरास नेऊन त्याच्या

नांवानें द्वाही फिरविली. त्याच्या सेंभोंते हजारों लोक जमले; मार्तंडरावाला कोणी विचारीनासें झालें. पुढें तारीख १७ एप्रिल रोजीं सरकारच्या रेसिडेंटा समक्ष हरीरावाची गादीवर स्थापना झाली. मार्तंडरावाला त्या मुलखांतून हद्दपार करून त्याणें गादीवर कोणताही हक्क सांगूं नये असा करार होऊन त्याला दरमहा ५०० पांचशें रुपये नेगणूक देण्याचें ठरलें.

हे जे नूतन महाराज झाले ते राज्याच्या अगदीं नालायक होते. हरीराव वेकूब, भ्याड आणि देवभोळा माणूस होता. त्याचीं पंधरा वर्षें कारागृहांत गेल्यामुळें त्याला हिम्मत कशी ती मुळींच उरली नव्हती. त्याच्या हरएक कृत्यांत बुद्धिहीनत्व दिसे. मार्तंडरावाला महाराज करून गादीवर बसविण्याच्या खटपटींत जे लोक होते त्यांवर कडीं नजर करून त्याणें सूड घेतला. हें स्वकुलोचित कर्म आटोपल्यावर मग रिवाजी फानशा म्हणून हिंदुस्थानाच्या कोणीकडल्या एका कोपऱ्यांत १५ वर्षें अंधारांत पडलेला एक कोणसा भिकारी होता, त्याला शोधून काढून आणून महाराजांनीं आपले मुख्य दिवाण बनविलें. मग दिवाणसाहेबांनीं आपलें स्वरूप प्रकट केलें. त्याला त्या मुलखाची मुळींच माहिती नव्हती, तो स्वभावतःच कर्तृत्वशून्य होता आणि पुष्कळ दिवस दारिद्र्यावस्थेंतच गेल्यामुळें आपलपोट्या आणि हावरा झाला होता; आणि शिवाय सुरापानासक्त होता. मग काय विचारावें!

दिवाणजींस अधिकार प्राप्त होतांच त्यांणीं प्रथम आपले ज्येष्ठ चिरंजीव राजाभाऊ---हेही मद्यपी होते—यांचा महाराजांचे एका अनौरस कन्येशीं विवाह जुळविला. नंतर त्या दंपत्यास एक मोठा चांगला पर्गणा बक्षीस दिला. राज्य आधींच ओढघस्तीस आलेलें होतें; तशांत तो चांगला पर्गणा गेल्यानें तिजोरीस द्वादशांश वसुलाची तूट पडूं लागली.

अशी या दिवाणाची गैरशिस्त कारकीर्द सुरू झाल्यापासून उत्पन्न कमी होत गेलें आणि खर्च वाढत गेला. अखेर सन १८३४ मध्यें अगदीं कमाल झाली. त्या वर्षीं वसूल ९२५००० रुपये आणि खर्च तेवीसलक्ष एकुणसत्तर हजार रुपये झाला. परंतु मग असें कळून आलें कीं ही तर दिवाणजींच्या कर्तबगारी पैकीं सारी एक गोष्ट झाली. हरीरावाचा स्वभाव भित्रा असल्या मुळें त्याला चांगलेंच फावलें. त्याणें त्याच्या मनांत असें बिंबवून दिलें कीं आपलें सैन्य अगदीं बंड करण्याला उभें आहे, परंतु हेच दिवाण

आहेत ह्मणून त्याचा बंदोबस्त होतो. मग तो आपल्या मनास येई तेव्हां जसा त्याला बरा वाईट प्रसंग वाटे त्या प्रमाणें पाहिजे तितके शिपाई नवे ठेवी आणि पाहिजे तितके काढून टाकी. हा जो नित्याच्या बाहेर अनियमित खर्च होई त्या साठीं तो सावकारांपासून जबर व्याजानें कर्ज काढी.

परंतु असा प्रकार किती दिवस चालणार ! शेवटीं इसवी सन १८३५ मध्यें कांहीं लोकांनीं एक कट केला. त्यांत माजी दिवाण माधवराव फडणीस हे सूत्रचालक होते असें ह्मणतात. या सालच्या सप्टंबर महिन्यांत आठवे तारखेस माजी राजाच्या वेळचे दोन असामी अम्मलदार ३०० हत्यारबंद लोक बराबर घेऊन इंदुरांत शिरले. त्यांनां भर रस्त्यानें वाड्याच्या दरवाज्याशीं जाईतों कोणी अडविलें नाहीं इतकेंच नव्हे, तेथील लोकांनीं खुशाल आंत येऊं दिलें, आणि महाराजांकडील कांहीं स्वार ही त्यांत मिळाले. ते जर तसेच बिनदिकत पुढें जाते तर त्यांचें काम फत्ते होत होतें, परंतु थोडी चूक झाली. जे दोन अम्मलदार त्यांच्या बरोबर होते ते मल्हारराव्याच्या स्त्रीकडे आज्ञा मागण्या करितां गेले. तिनें त्यांनां शिव्या देऊन त्यांच्या कृत्यास रूकार न देतां निघून जावयास सांगितलें. इतक्यांत हरीरावाशीं इमानें इतबारें वागणारे कांहीं स्वार होते, ते लगबगीनें जमून त्यांच्यावर चालून आले. तेव्हां आपला बेत फसला आणि आतां सर्वस्व बुडालें असें समजून या उभयतांनीं आपल्याच तलवारी उपमून स्वप्राणत्याग केला. मग सारखी कत्तल सुरू झाली ; त्या चालून येणाऱ्या कटवाल्यांचे आणि त्यांनां सामील झालेल्या लोकांचे मुडदे पडले, त्यांतला एक असामी जिवंत सुटला नाहीं.

असा या कटाचा शेवट लागला, परंतु त्याच्या योगानें हरीरावाचा मित्रेपणा अधीकच वाढला. तशांत दिवाणजीनें त्याला दहशत घालून वाड़ा ह्मणजे तुरुंग असल्या सारखा केला, जागोजाग शिपाई नेमून कडेकोट बंदोबस्त केला. राज्यकारभाराचें जें खरें काम तें अगदीं मंदावलें, जमाबंदीच्या कामांत अधिकच अव्यवस्था झाली. हरीराव महाराजांची तेव्हां काय अवस्था झाली होती ह्मणाल तर ते भिऊन जे एकदां खोलींत शिरले ते पंधरा महिन्यांत प्रतिज्ञेला एकदां देखील बाहेर पडले नाहींत.

असें होतां होतां शेवटीं अखेर परिणामाची वेळ आली. रावजीफाशाला कोठें कर्ज सुद्धां मिळेना. त्याणें आपल्या, यजमानाची व संस्थाना-

ची इतकी नापत करून सोडली. मग झाली चाकरी सोडण्या वांचून दुसरा उपाय राहिला नाहीं. त्या प्रमाणें सन १८३६ च्या नवंबर महिन्यांत दिवाणगिरीवरून निवून तो घरीं बसला. नंतर तात्या जोगाच्या पेढीचा मुनीम शाळीग्राम मंत्री झणून होता तो दिवाण झाला.

परंतु होळकराच्या मुलखाची अगदीं दुर्दशा उडून गेली तेव्हां सन १८३७।३८ मध्यें इंग्रज सरकाराला कारभारांत हात घालणें भाग आलें. सरकारानें हरीराव होळकरास असें सांगितलें कीं तुमचे राज्यकारभाराची सुधारणा होऊन अमूक दिवसांत स्थिति पालटल्या वद्दल आमचे जे इंदुरास रेसिडेंट आहेत त्यांजकडून लिहून येईल तर बरें, नाहीं तर तुमच्या मुलखाची व्यवस्था नीट लावण्या करितां आम्हांस आपले अम्मलदार पाठवावे लागतील ; असें करणें हें आमचें कर्तव्यकर्म आहे असें आम्हीं समजतों.

या प्रमाणें सरकारांतून निक्षून ताकीद पोहोंचली ती गुणास चांगली आली. आबाजी बुलाव झणून एक हुशार, चांगला लायक, मनुष्य होता त्याची दिवाणगिरीच्या कामावर नेमणूक झाली, आणि त्याणें थोड्याच महिन्यांत पुष्कळ मोठमोठ्या सुधारणा केल्या ; आधीं खर्च तोडला, मुलकी खात्यांत लांचखाऊ कामदार होते ते काढून टाकले ; कांहीं महालांतील प्रजे पासून जुलमानें फाजील पैसा वसूल घेतल्यानें त्या लोकांचें नुकसान झालें होतें सबब त्यांत मूट घातली, आणि जमाबंदीच्या रीतींत फेरफार केला. अशी चांगली व्यवस्था लावल्यानें लष्करी खात्यांतील व दिवाणी खात्यांतील लोकांचें जें देणें तुंबलें होतें तें ही थोड्याच दिवसांत फेडतां आलें.

या प्रमाणें सुधारणा झाली तेव्हां गव्हरनर जनरल लॉर्ड ऑकलंड यांणीं हरीराव महाराजांस स्वदस्तुरचें पत्र लिहून असें कळविलें कीं तुम्ही जी व्यवस्था लाविली ती पाहून आम्हाला संतोष वाटतो.

हरीराव ४८ वर्षांचा होऊन सन १८४३ मध्यें आक्टोबरच्या २५ व्या तारखेस मृत्यु पावला. त्याच्या मागें कोणी वारस नव्हता. हिराबाई झणून त्याची स्त्री होती तिच्या उदरीं एक पुत्र झाला होता, परंतु तो अगदीं लहान असतांच वारला ; झणून त्याणें मरणा पूर्वी दोन वर्षां खालीं खंडेराव झणून एक तेरा वर्षांचा मुलगा दत्तक घेतला. हा होळकर घरा-

प्यातल्या एका दूरच्या गरीब भाईबंदाचा मुलगा होता. इंग्रज सरकारानें त्याला महाराजांचा वारस म्हणून लागलेंच कबूल केलें. परंतु तीन महिन्यांवर फार दिवस तो जगला नाहीं. त्याचें लग्न झालें नव्हतें. त्या मुळें होळकर वंशाचें अगदीं नक्कल झालें म्हणण्यास हरकत उरली नाहीं. या राजकुलांतला म्हणणारा कोणी पुरुष वारस राहिला नाहीं, आणि दत्तक घेऊन गादी चालवावी तर दत्तक घेण्याला ही कोणी शास्त्रतः खरा अधिकारी उरला नाहीं. म्हणून आतां कोणाला तरी गादीवर बसवावें हा अधिकार इंग्रज सरकाराकडे आला. तेव्हां सर रॉबर्ट ह्यामिल्टन म्हणून जे इंदुरास रेसिडेंट होते त्यांनां सरकारानें असें लिहिलें कीं तुम्ही कोणी तरी मुलगा पहावा ; परंतु त्याला गादी देणें हें फक्त इंग्रज सरकारच्या अगदीं कृपेचें काम आहे असें अगदीं स्पष्ट दिसून येई अशी तजवीज ठेवावी*. इकडे हरीराव होळकराची आई माई साहेब म्हणून होती ती जिवंत होती, तिला लोक फार मानीत ही असत, आणि खंडेराव मरण्यापूर्वीं राजकीय कामांत

---

* ह्या मोठ्या प्रकरणांत कागद पत्र झाले ते—प्रथम तारीख १७ फेब्रुआरी सन १८४४ चें इंदूरचे रेसिडेंट सर सी बेड यांजकडून इंडियासरकारचे सेक्रेटरी एफ्. करी यांस खंडेराव होळकर मेल्या बद्दल अखबारपत्र गेलें. त्याचें उत्तर सदर रेसिडेंटास ता० १ मार्च सन १८४४ रोजीं असें गेलें कीं आतां गादीस वारस ठेर पर्यंत राज्यकारभार माईसाहेबांस करूं द्यावा पुढें सर रॉबर्ट ह्यामिल्टन रेसिडेंट झाले. त्यांस सेक्रेटरी कडून तारीख २७ एप्रिलचें पत्र गेलें. त्यांत असें लिहिलें होतें कीं दत्तक घेण्यास अधिकारी कोणी उरलें नाहीं तर आतां गादीस वारस म्हणून नेमण्याचा अधिकार सरकारानें आपल्याकडे घेणें हें सांगलें सोईचें आहे. नंतर सदर रेसिडेंटास सेक्रेटरींनीं दुसरें पत्र पाठविलें ; त्यांत सरकारचा हेतु पुढें कसें कसें वागण्याचा होता तो अधिक स्पष्ट करून दाखवून भाऊ होळकराचा कनिष्ठ पुत्र नेमण्यास योग्य दिसतो असें ही सुचविलें होतें. त्यावर तारीख २४ जून सन १८४४ रोजीं ह्यामिल्टनानें उत्तर लिहून आम्ही असें असे केलें म्हणून सरकारास कळविलें त्यामुळें तारीख ९ जुलै सन १८४४ रोजीं सरकारचे सेक्रेटरींकडून त्याला पत्र आलें, त्यांत तुम्ही हुकूम सदन मजनेंच केलें हें बेर केलें असा मोठा दपका आला.

तिची संमति घेत असत ; ती आतां असें म्हणूं लागली कीं मार्तंडराव हक्क दार आहे, तर त्याला गादी द्यावी. परंतु सरकारानें तिचें म्हणणें मान्य के. लें नाहीं, आणि भाऊ होळकराचा धाकटा मुलगा चौकशी अंतीं गादीवर बसविण्यास उत्तम आहे, त्याला कांहीं हरकत नाहीं असें ठरेल तर त्यालाच बसवावें असें मनांत आणून रेसिडेंटास लिहिलें. त्याणें लागलाच बडा दरबार भरून त्यांत असें बोलून दाखविलें कीं इंग्रज सरकारच्या मनांत होळकर सरकारच्या गादीवर योग्य हक्कदार असेल त्यास बसवून राज्य कायम राखावयाचें आहे. माईसाहेबांचें म्हणणें भाऊ होळकराचे कनिष्ठ चिरंजीव या राज्यपदास योग्य आहेत असें आहे ; गव्हरनर जनरल माईसाहेबांस फार मानतात, याज करितां ह्या त्यांच्या मनोदया प्रमाणेंच करण्याचें त्यांणीं ठरविलें आहे. या प्रमाणें प्रसिद्धपणें दरबारांत बोलून गेल्यावर सरकारच्या हुकमाची वाट न पहातां तिसऱ्या दिवशीं रेसिडेंट साहेबांनीं त्या मुलास मोठ्या समारंभानें त्या घराण्याच्या रीतीप्रमाणें यथाविधि गादीवर बसविलें. परंतु त्याचें हें कृत्य सरकारच्या हुकमास फार सुटून झालें म्हणून सरकारानें त्याला मोठा टपका दिला आणि असें लिहिलें कीं " या प्रसंगीं आपल्या राजकीय पद्धतींत महत्वाचा नवीन प्रकार सुरू करण्याची आम्हाला उत्तम संधी आलेली असून ती तुम्ही बुडविली. " या प्रमाणें ही गोष्ट सरकारच्या हेतूच्या अगदीं उलट झाली, तरी रेसिडेंट म्हणजे आपले प्रतिनिधि, त्यांणीं जें केलें तें आपणच केल्या सारखें आहे, सबब आतां फिरविता येत नाहीं, असें समजून सरकारानें तीच व्यवस्था कायम केली. मग गव्हरनर जनरलांनीं ते नूतन बालराजे तुकोजीराव होळकर यांच्या नांवचें पत्र पाठविलें ; त्यांत हें राज्य तुम्हाकडे अशा अशा शर्तींवर चालेल म्हणून लिहिलें. हें पत्र राज्याबद्दल सनदे दाखलच समजलें जाईल असें लिहिलें होतें व तें प्रविष्ट करते वेळीं त्यांजकडून सरकारानें १०१ मोहोरा नजराणा घेतला.

याप्रमाणें तुकोजीराव होळकर राज्यपदारूढ झाले तेव्हां दहा वर्षांचे होते. ते सन १८५२ मध्यें वयांत येऊन तेव्हां पासून राजकारभार आपला आपण पाहूं लागले.

सन १८५७ मध्यें शिपायांचें थोरलें बंड उद्भवलें त्या पूर्वी ह्या महाराजांच्या कारकीर्दीत सांगण्या सारखी मोठीशी गोष्ट कांहीं झाली नाहीं. सं-

वेळीं यांचें लष्कर २००० रेग्युलर व ४००० इर्रेग्युलर मिळून ६००० पायदळ, २००० रेग्युलर आणि १२०० इर्रेग्युलर मिळून ३२०० स्वार ५०० गोलंदाज वगैरे तोफखान्या कडील लोक आणि २४ लढाऊ तोफा. इतकें होतें. ह्या पैकीं त्या इर्रेग्युलर फौजेनें त्यावेळच्या आवेशाच्या भरांत वे वंद होऊन बंड केलें, आणि माजी सर हेनरीडयंड रेसिडेंट यांस अकस्मा त् बंगल्यांत घेरलें. त्याच्याजवळ बायका मुलें होतीं, त्यांचें संरक्षण झालें पा हिजे म्हणून तो कांहीं संकटानें बाहेर पडून भोपाळास गेला. इतक्यांत मध्यहिंदु स्थानांत स्वस्थता करण्या करितां म्हणूनच जी मुंबईकडून फौज येत होती ती जवळ येऊन ठेपली, तेव्हां तिला कोणीकडून कशीन्यावी वगैरे विचार क रण्या करितां तो तसाच औरंगाबादेस जाण्यास निघाला. त्याची आणि त्या फौजेची गांठ अशीरगडासच पडली, मग त्याणें तिला वर्तविण्यांत आपले आंगचा नेटबाजपणा दाखविला. तो एक धारचा किल्ला बंडखोरांपासून घे ऊन राहिला नाहीं. मंदोसर येथें दोन लढाया मारून त्याणें नीमचचा ब चाव अगदीं ऐन वेळेवर केला. त्याला असा जय मिळाल्यानें होळकराच्या बंडखोर फौजेचा अगदीं धीर सुटला इतकेंच नव्हे, त्यांना चांगलीच दहशत पडून त्यांणीं इंदूर येथें आपल्या हातांतील शस्त्रें थोड्या दिवसांखालीं ज्या मनुष्यावर विश्वासघातानें प्राण घेण्याच्या इरादानें उचलली होतीं त्याच्याच पुढें हातांतून खालीं ठेविलीं, असें लाजिरवाणें कृत्य केलें. मग मध्यहिंदु-स्थानांत शांतता झाली.

होळकराच्या फौजेनें बंड करून जो जुलूम जबरी केली, तिशीं तु-कोजी महाराजांचा कांहीं संबंध असावा असें सरकारच्या मनांत आलें नाहीं. त्यांना सन १८६२ मध्यें दत्तकाचे परवानगीबद्दल सनद मिळाली व पुढें नाइट कमांडर ऑफ धि स्टार ऑफ इंडिया हा किताब मिळाला.

तेव्हापासून होळकरशाईंत सांगण्या सारखी मोठीशी गोष्ट कांहीं व-डली नाहीं. त्यांचे व इंग्रजसरकारचे दरम्यान किरकोळ बारीक सारीक गो-ष्टी बद्दल लढे होते, परंतु सरकारानें पुष्कळ अंशीं महाराजांचे म्हणण्या प्रमाणेंच त्यांचा निकाल लाविला. ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वेची शाखा नेमाडापासुन इंदुरावरून काढावी असें सरकारचे मनात होतें; तेव्हां त्या रेल्वेकारितां जी जमीन पाहिजे होती ती देण्याच्या बाबतींत सन १८६४ मध्यें महाराजां बराबर बोलणें होऊन ठराव झाला.

महाराज तुकोजीराव होळकर हे फार हुशार राज्यकर्ते होते. जमाबंदी संबंधीं हिशेब राखण्याची जी जुनी पेशवाई पद्धति, तींत ते फार उत्कृष्ट वाकबगार होते. राज्यसंबंधीं हरएक गोष्टीवर ते स्वतः नजर पोहोचवीत असत. त्यांणीं हिंदुस्थानांत पुष्कळ प्रवास करून देशाटणापासून होणारे लाभ संपादिले होते. हिंदुस्थानांतील श्रेष्ठ राजांत त्यांच्या तोडीचे हुशार, ज्ञानवान, विद्वान, राजे थोडेच होते.

भाग ३

भोपाळ

औरंगजेबबादशहाच्या पदरीं दोस्तमहंमदखान ह्मणून मिरजोखेल जातीचा एक अफगाण सरदार होता, त्याणें सत्राव्या शतकाच्या शेवटीं भोपाळचें राज्य स्थापन केलें. औरंगजेबाच्या लष्करांत त्याणें लहानपणींच नोकरी धरली ; पुढें तें सैन्य माळव्या मध्यें गेलें असतां त्याचें शौर्य पाहून माळव्याच्या सुभेदाराची त्याजवर कृपादृष्टि झाली, आणि तो भराभर मोठ्या योग्यतेस चढला. देशांत धांदल व अस्वस्थता असली ह्मणजे शौर्य साहसादिक विशेष गुणांनीं युक्त पुरुषांस कीर्ति मिळवण्यास व नशीब काढण्यास ती एक संधी असते; तशी यावेळीं दोस्त महंमदास संधी सांपडली. तो शूर, धाडसी, महत्वाकांक्षी, व कोणत्याही कामीं मनांत दिकत न घेणारा होता. सन १६९० मध्यें भैरसिया प्रांताची देखरेख करण्या करितां औरंगजेबानें त्याची नेमणूक केली. औरंगजेब बादशहा जिवंत असतांच त्याणें तो प्रांत अंशतः आपल्या तलवारीच्या जोरावर, कांहीं इनाम ह्मणून, कांहीं लबाड्या करून व कोणी म्हणतात कांहीं विश्वासघात करून, मिळून सरासरी आपल्या ताब्यांत चांगलाच आणला होता ; आणि औरंगजेबाच्या मरणानंतर जेव्हां राज्यभर धामधूम उडाली, तेव्हां त्याणें आह्मी स्वतंत्र, नवाब, ह्मणून भोपाळ येथें गादी स्थापिली, व सान्या मुलखाचें नांव तेंच ठेविलें.

औरंगजेब वारल्या नंतर सोळा वर्षांनीं ह्मणजे सन १७२३ मध्ये

दोस्तमहंमद वारला ; तेव्हां त्याचें वय ६६ वर्षांचें होतें. तो मोठा बुद्धिमान आणि धैर्यवान मनुष्य होता अशी त्याची मागें कीर्ति राहिली. तो मरतांच गादी विषयीं तंटे सुरू झाले. यारमहंमद म्हणून त्याचा वडील मुलगा होता तो अनौरस होता आणि सुलतान महंमद म्हणून औरस होता तो वयानें लहान होता. तथापि तो प्रथम गादीवर बसला. परंतु यारमहंमदास निजामाचें साहाय्य मिळून तो प्रबळ झाला ; तेव्हां सुलतान महंमदानें राठगड किल्ला व त्याच्या खालचा मुलुख घेऊन बाकी सर्व राज्यावरील हक्क सोडून दिला.

यारमहंमदाच्या अंगांत बापाची हुशारी मुळींच नव्हती. त्याची स्त्री* मामुल्ला ही फार हुशार होती ; तिला माजी साहेब म्हणत. पन्नास वर्षें पर्यंत सारें राज्य तिच्या विचारा प्रमाणें चाललें होतें व तिणें भोपाळाचें पुष्कळ कल्याण केलें ; याज करितां तिज विषयीं थोडें बोललें पाहिजे. तिज विषयीं सरजॉन मालकम असें लिहितात--तिचा स्वभाव फार दयाळू होता म्हणावें, किंवा तिचें ज्ञान अत्युत्कृष्ट होतें म्हणून ती इतकी कीर्ति पावली असें म्हणावें हें सांगणें कठीण आहे. ती सर्व लोकांस मोठी प्रिय होती, व सर्व तिला फार मान देत असत. भोपाळांत तिचें नांव अद्याप गाजत आहे. चोहींकडे दंगेधोपे, खून, मारामारी, सारखी चाललीं असलीं तरी ज्याच्या अंगीं सद्गुण, चांगुलपणा, ज्ञान व हिम्मत, तो श्रेष्ठत्व पावेलच पावेल व त्याची कीर्ति झाल्यावांचून रहाणार नाहीं ही गोष्ट तिचें चरित्र अवलोकन केलें म्हणजे मनांत येऊन मोठा आनंद होतो.

यारमहंमदास पुत्र तीन ; फैजमहंमद, शाहीनमहंमद व हयातमहंमद. त्या तिघांनीं ही भोपाळचें गादी वर बसून राज्य केलें.

फैजमहंमद सर्व विषयोपभोग सोडून अगदीं विरक्तपणानें वर्तत असे. त्याणें आपलें सर्व आयुष्य स्वधर्माचरणांत घालविलें. मालकम साहेब म्हणतात, त्याची शारीर शक्ति आणि मानसिक शक्ति ह्या परस्पर अगदीं उलट होत्या. त्याचा देह फारच विशाळ होता. तो जवळ जवळ सातफुट

---

* हिला संतति झाली नाहीं नबाबाशीं हिचा प्रसिद्धपणें विवाह झाला नव्हता; निका मात्र लागला होता. हा विधि विवाहापेक्षां गौण खरा, परंतु सर्व मुसलमानांस संमत आहे.

उंच आणि आजानुबाहु होता. आपल्या वाड्याच्या बाहेर तो साऱ्या जन्मांत एकवार मात्र गेला होता. त्याचें ४८ वे वर्षीं देहावसान झालें.

हे जे दोन नबाब झाले ते स्वतः हुशार नव्हते परंतु दुसऱ्याची हुशारी पाहून त्याला ते उत्तेजन देत ; हा त्यांचा गुण फार चांगला होता. त्यांच्या कारकीर्दीत सारा राज्यकारभार चालविणारे त्यांचे वजीर हिंदु होते. ते मनुष्य प्रामाणिक आणि विलक्षण बुद्धिमान होते.

फैजमहंमद ३८ वर्षं राज्योपभोग घेऊन मेला. त्याच्या बद्दल लोकांनां कांहींच वाईट वाटलें नाहीं. नंतर महंमद यासीन गादीवर बसला, परंतु तो थोडयाच दिवसांत मेला. त्या या मागून तिसरा बंधु हयातमहंमद गादीवर आला, तो ही भावा प्रमाणें बुद्धीचा जड असून स्वभावतः व सवईनें विरक्त असल्या सारखाच होता. त्यामुळें सर्व कारभार दिवाणजीं कडे अव्याहत चालत होता.

परंतु ह्या नवाबाची कारकीर्द बरीच लांब, २९ वर्षं झाली. तेवढ्या काळांत पुष्कळ मोठमोठया गोष्टी झाल्या. त्यां पैकीं प्रथम म्हटली तर इंग्रजांचें आणि मराठ्यांचें युद्ध ही होय. ह्या लढाईचा शेवट वडगांव येथील जो लाजिरवाणा तह होऊन झाला त्यामुळें इंग्रजांचें पश्चिम किनाऱ्या वरील राज्य बुडतें कीं रहातें अशी भीति उत्पन्न झाली. वॉरनहेस्टिंग मोठा दूरदर्शी अशी जी त्याची ख्याति होती ती या प्रसंगीं खरीच तारीफ करण्या सारखी होती, कारण त्याणें इकडे असा कांहीं तरी बिकट प्रसंग गुदरेल हें भविष्य जाणूनच बंगल्यांतून चार पांच हजार फौज रवाना केली होती. तर ती आतां केव्हां येऊन पोहोंचेल अशी इकडे अधिकारी अगदीं वाट पहात होते. परंतु तें सैन्य मध्य हिंदुस्थांतून येत असतां वाटेनें त्याला हजारो विघ्नें आणि संकटें आलीं. मार्गांत जीं रजपूत व इतर संस्थानें लागलीं तीं थोडीं बहुत मराठ्यांचीं ताबेदार पडल्यामुळें इंग्रजांनां मदत करीतना त्या प्रसंगीं त्यांच्या उपयोगीं एकच संस्थान पडलें ; तें हें भोपाळ. इंग्लिशांकडील जनरल गोदर्ड सैन्य घेऊन चालला असतां त्याला ज्या वाटेंत अडचणी आल्या त्या फारच कठीण असल्यामुळें तो फार त्रासून गेला होता. परंतु तो भोपाळच्या हद्दींत शिरला तेव्हां नबाबानें त्याला मार्ग दिला इतकेंच नाहीं ; त्याला जें हवें होतें तें सामान सुमान मनमुराद दिलें. तेव्हां जी इंग्रजांची व नबाबाची दोस्ती जमली ती अद्याप चालत आ-

ली आहे व ती उभय पक्षीं अंतःकरण पूर्वक असल्यामुळें उभयतांस ही ती पासून लाभ होत आहे.

हयातमहंमदाच्या वेळीं आणखी दोन धामधुमी एककाळींच झाल्या; त्या एक पेंढाऱ्यांचा आणि दुसरा मराटयांचा हल्ला ह्या होत. प्रथम पेंढाऱ्यांची टोळांसारखी धाड आली, तेव्हां त्यांनां हांकून लावावें ह्मणून मराटचांस निमंत्रण झालें. ते जे आले ते पेंढाऱ्यांपेक्षां अधिक लुटीत सुटले. नवाब साहेब अगदीं कमकुवत पडले व दरबारात अनक लुच्चे लोकाच्या खटपटी आपली तुंवडी भरण्या पुरत्या चालल्या, त्यामुळें थोड्याच काळांत राज्य अजीबाद बुडण्याचा प्रसंग आला होता; परंतु वजीरमहंमद ह्मणून नवाबाचा एक चुलत बंधु होता, त्याणें समयास हजर होऊन राज्याचें रक्षण केलें. त्याणें पूर्वीच्या एका दिवाणाच्या वेळीं बंड केलें होतें ह्मणून त्याणें त्याला हद्दपार करून लावलें होतें, परंतु राज्यावर असें संकट आलें तेव्हां तथून परत येऊन त्याणें आपल्या बुद्धिबलानें, शौर्यानें, धैर्यानें, व मोहक गुणांनीं पेंढारी व मराठे या उभयतांस वाटेस लाऊन आठ महिन्यांत राज्य अगदीं निष्कंटक केलें.

भोपाळची गादी खरें म्हटलें असतां याप्रसंगीं वजीर महंमदानें वांचविली, परंतु ते उपकार न स्मरतां नवाबाच्या घरांतील मनुष्यें त्याचा मत्सर करूं लागलीं. नवाबाचा मुलगा गोस महंमद हा तर त्याच्या विषयीं मनांत फारच संशय आणूं लागला. त्याची लोकप्रियता त्याला दुःसह होऊन हा मेरल तर वरें असें त्याला वाटूं लागलें. त्याच समयास दिवाणाची जागा रिकामी झाली, तेव्हां ज्याच्या त्याच्या तोंडून ती वजीर महंमदास द्यावी असें येऊं लागलें. गोसमहंमदाला तो तर नकोसा होता, तेव्हां त्या जागीं दुसऱ्याची योजना केली म्हणजे तो सहजच त्याचा प्रतिस्पर्धी होऊन आपण कायम होण्याकरितां त्याच्या नाशास प्रवृत्त होईल अशी त्याला युक्ति सुचली.

ती युक्ति त्याणें करून पाहिली ती बरीच लागू पडली. मुरीदमहंमदखान म्हणून हें राज्य स्थापनकरणारा जो मूळपुरुष दोस्तमहंमद त्याच्या शिष्या वंशापैकींच एक मनुष्य होता त्याची दिवाणगिरीवर नेमणूक झाली. त्याणें कामावर येतांच आधीं वजीर महंमदास मराठयां बराबर लढण्यास पाठवून दिलें आणि मग होईल त्या तऱ्हेनें पैसा मिळवण्यास आरंभ केला.

तेव्हां त्याणें निर्लज्जपणाणें जीं एकएक कृत्यें केलीं त्यांनां त्रासून लोकांनीं बंड केलें. तें मोडण्या करितां त्याणें मराठ्यांस बोलावणें पाठविलें.

वजीरमहंमदाला परत येण्यास ही संधी उत्तम होती, ती त्याणें फुकट जाऊं दिली नाहीं. तो भोपाळाबर मराठे येतात असें ऐकतांच त्याच्या संरक्षणाकरितां धांवला. त्याच्या जवळ फौज फांटा थोडा होता, तेवढ्यानें शत्रूबरोबर त्याच्यानें सामना करवला नसता, परंतु त्याच्या सुदैवानें तिकयांतच शिंद्याच्या मुलखांत गडबड झाली, ह्मणून तो आधीं आपलें घर संभाळलें पाहिजे ह्मणून लगबगीनें परत गेला. या प्रमाणें हें परचक्र सहज टळलें, आणि त्याला जें मूळ कारण तें ही नाहींसें झालें. मराठे परत जातानां मुरीदमहंमदास आपल्या बरावर घेऊन गेले. तो त्यांच्या कबजांत असतां भीतीनेंच मेला.

या प्रमाणें वजीरमहंमदाच्या शत्रूचा नाश होऊन त्याला दिवाणगिरी मिळाली. परंतु त्यावेळीं खजिना अगदीं रिकामा पडला होता, मुलुख कंगाल होऊन गेला होता, आणि सैन्य पुष्कळ कमी झालें होतें. तरी तो झटून काम करूं लागला त्यामुळें थोड्याच काळांत जमाबंदी पहिल्या बेताला आली, आणि सैन्य विजयी होऊं लागलें. तसाच आणखी कांहीं काळ लोटला असता ह्मणजे भोपाळ चांगलें भरभराटीस आलें असतें, परंतु पुनः दुर्दैवाचा फेरा आला. नबाबाचा मुलगा गौसमहंमद वजीरखानाचा फार मत्सर करीत होता, हें मागें सांगितलेंच आहे. त्याणें त्याला घालवून देण्या करितां प्रथम पेंढाऱ्यांस आणि मागून मराठ्यांस बोलाविलें.

याच संधीस त्याचा बाप नबाब हयातमहंमद वारला आणि गौसमहंमदाकडे पूर्ण मालकी आली. परंतु आपल्या प्रजा आपल्याला अनुकूल राहून पाठबळ देतील असा त्याला भरंवसा वाटेना, ह्मणून आपले संरक्षण करतें कायते मराठे असें समजून त्याणें त्यांनां बोलावलेंच. तेव्हां वजीरमहंमद तो मुलुख सोडून चालता झाला. तो बाहेर जाऊन अगदीं टपून बसला होता आणि योग्य संधी दिसतांच येऊन त्याणें मराठ्यांस मुलखांतून घालवून दिलें. तेव्हां पासून गौसमहंमद फक्त नांवाचे नबाब बनले ; खरा अम्मल वजीरमहंमदाचा चालूं लागला.

येथून पुढें नऊ वर्षें वजीरमहंमद स्वराज्याच्या संरक्षणा करितां मारवा लढत होता. सन १८०९ मध्यें इंग्रज सरकार पेंढाऱ्यांचा पाठलाग

करीत होतें आणि त्याला तर त्यांच्यांत सामील होऊन रहावें लागलें. परंतु इंग्रज कमांडराचो गांठ पडली तेव्हां त्याणें आपल्याला पेंढाऱ्यांत कां शिरावें लागलें ती सादंत अगदीं खरी हकीगत सांगून आतां मी आपल्या सरकारचा स्नेह संपादण्याला फार उत्सुक आहें असें कळविलें. परंतु त्या वेळीं कांहींच बोलणें नियमांत आलें नाहीं, तरी त्याच्या मनांतून ती गोष्ट कांहीं गेली नाहीं. पुढें चार वर्षांनीं शिंदे व नागपूरकर भोसले या उभय तांनीं एक विचारानें भोपाळावर हल्ला करून किल्ल्याला वेढा घातला. या प्रसंगीं वजीरमहंमदानें अतुल शौर्य आणि धैर्य दाखवून नऊ महिने पर्यंत किल्ला सारखा लढविला, आणि शत्रूच्या सैन्याच्या मानानें पाहिलें असतां त्याची शिबंदी अगदींच थोडी असतां हल्ले होत ते सहन करून अखेर त्यांनाच त्याणें पिटून लाविलें. मग त्याणें ती कुशारकी कां सांगूं नये ? पुढच्या वर्षी पुनः शिंदे भोपाळाला वेढा घालण्यास निघाले, परंतु त्यावेळीं इंग्रजसरकारानें मध्यें पडून ती स्वारी होऊं दिली नाहीं. भोपाळची योग्यता आतां कोठें थोडीशी सरकारच्या लक्षांत येऊं लागली होती.

त्यानंतर १८ महिन्यांनीं म्हणजे सन १८१६ मध्यें वजीरमहंमद वारला. त्याचें वय ५१ वर्षांचें होतें. हिंदुस्थानच्या त्या भागांत त्याच्या सारखा मोठा वीर, अतिशय युक्तिमान, आणि धैर्यवान सेनापति आणि उत्कृष्ट शहाणा मुत्सद्दी दुसरा झालाच नाहीं अशी त्याची कीर्ति आहे. त्याच्या मागून त्याचा मुलगा नजरमहंमद दिवाण झाला. तो त्याच्याच सारखा बहुगुणसंपन्न होता. त्याची नात भोपाळच्या गादीवर बसली.

नजरमहंमदानें पुरीं चार वर्षें देखील दिवाणगिरी केली नाहीं ; परंतु तितक्या अल्पकालांत त्याणें भोपाळावर अतिशय उपकार करून ठेविले. सन १८१७ मध्यें त्याणें इंग्रजां बराबर करारनामा केला, त्यांत असें ठरलें कीं त्याणें इंग्रजसरकारास मदत देण्याकरितां फौज बाळगावी. व पेंढाऱ्यांशीं लढाई करण्यास त्यांस साहाय्य करावें--हा करार त्याणें अगदीं इमानानें पुरा केला--आणि त्या बद्दल इंग्रजसरकारानें भोपाळची गादी त्याच्या कडे चालविण्याचें कबूल केलें. मग पुढच्या वर्षी हेच करार मुख्य धरून त्या आधारें उभय सरकारांची कायमची दोस्ती व ऐक्य असावें अशाविषयी रीतीप्रमाणें तहनामा झाला. त्याणें ६०० स्वार व ४०० पायदळ चाकरीस ठेवण्याचें कबूल केलें. त्याच्या खर्चा बद्दल त्याला माळव्यांत

पांच महाल मिळाले ; परंतु त्यांच्या स्वामित्वाचे हक्काबद्दल त्याणें वर्षास ६००० रुपये द्यावे असें ठरलें.

ह्या हुशार मनुष्याच्या देखरेखीनें राज्याचा वसूल वाढला आणि पूर्वीच्या लढायांत जे कांहीं प्रांत गेले होते ते परत मिळाले. खरोखर त्या राज्याला त्याच्या कारकीर्दीपासून ऊर्जित दशा येऊं लागली होती, परंतु तितक्यांत पुनः दुर्दैव उभें राहिलें. सन १८२० मध्यें नजरमहंमदाचा मेहुणा फौजदार महंमद नामक अष्टवर्षात्मक अज्ञान बाळ हातांत पिस्तुल घेऊन खेळत असतां त्याची अकस्मात् गोळी उडाली ती नबाबास लागून प्राण गेला. नजरमहंमदा सारखा आपला खरा मित्र, शूर शिपाई व शहाणा राजा गेला ह्मणून इंग्रज सरकारास फार वाईट वाटलें. भोपाळचें तर हें मोठेंच नुकसान झालें.

नजरमहंमदास एकच स्त्री होती, तिचें नांव कुदशिया बेगम. ही नबाब गौसमहंमदाची कन्या. ती अगदीं वृद्ध होऊन नांतवंडांचीं नातवंडें मांडीवर खेळवन थोड्यावर्षां खालीं वारली. हिला एकच मुलगी झाली, तिचें नांव शिकंदर बेगम. भोपाळची बेगम ह्मणून जी इतिहासप्रसिद्ध होऊन राहिली आहे ती प्रख्यात स्त्री हीच.

नजरमहंमद वारला तेव्हां भोपाळ येथील अमीर उमरावांच्या संमतीनें व इंग्रजसरकारज्या विचारें असें ठरलें कीं त्याच्या वडील भावाचा मुलगा मुनीरमहंमदखान याचा शिंकंदरबेगमेशीं विवाह लाऊन त्याला नबाब करावें आणि तो समारंभ होई पर्यंत मध्यंतरीं विधवा कुदशिया बेगम हिणें पालन कर्ती ह्मणून राज्य चालवावें.

हा ठराव लागलाच अमलांत आला. कुदशिया बेगम तेव्हां सारी सत्रा वर्षांची, अगदीं तरुण होती, तरी तिणें आपल्या नवऱ्याच्या वेळचे सर्व कामदार ज्या त्या हुद्यावर कायम राखून त्यांच्या विचारें कारभार नीट चालविण्यास सुरवात केली. पुढें जसजसा काल लोटत चालला तसतशी तिला अधिकाराची गोडी अधिकाधिक लागून तो सोडूं नये असें वाटूं लागलें. मुनीरमहंमदखानास तिणें आपली मुलगी देण्याचें ठरविलें होतें त्या प्रमाणें ५ । ६ वर्षें वाट पाहून सन १८२७ मध्यें तो आतां लग्न लावा आणि मला अधिकार द्या असें म्हणूं लागला. तेव्हां कुदशिया बेगमेस राग येऊन तुला मुलगी मिळणार नाहीं असें त्याला साफ सांगून तिणें तो

झालेला ठराव रद्द केला. असें लग्न मोडणें बराबर नाहीं म्हणून मुनीरमहंमदानें पुष्कळ रड गाइली, परंतु तिणें आपल्या पदरचे अमीरउमराव जमवून त्यांचे विचारें असें ठरविलें कीं आपण कांहीं काळपर्यंत यथेच्छ राज्योपभोग करावा. मग मुनीरमहंमदाची रोज उठून पाठीशीं कटकट नको म्हणून त्याला तिणें ४०००० रुपयांची जाहागीर देण्याचें ठरवून त्याच्या कडून आपले सर्व हक्क आपला भाऊ जहानगीर महंमदखान यास देवविलें.

हा जहानगीरमहंमदखान अजून लहानच होता आणि कुदशिया बेगमेच्या मनांत हातांतला अधिकार लौकर सोडावयाचा नव्हता, म्हणून तिणें अनेक सबबा लाऊन लग्न लांबणिवर टाकलें. परंतु असें किती दिवस चालणार ! शेवटीं सन १८३९ च्या एप्रिल महिन्यांत विवाह झाला. परंतु तेणें करून कलह अधिक माजला. कुदशिया बेगम, तिची मुलगी शिकंदर बेगम, आणि तिचा नवरा जहानगीर महंमदखान या त्रिवर्गाच्या मनांत आपण सर्व अधिकार चालवावा असें असून त्यांणीं आपआपला हेतु सिद्धीस नेण्या करितां कारस्थानें मांडली. जहानगीर जर थोडावेळ दम धरता तर त्याचा डाव साधला असतां, परंतु तो फार उतावीळ पडला ; त्याला माझा पाय गादीला केव्हां लागेल असें होऊन त्याणें सासूला धरून कैद करण्याचा बेत ठरविला. त्याची सर्व तयारी चांगली होऊन डाव चांगला साधत होता, परंतु अगदीं ऐन प्रसंगीं त्याच्या मनाचा धीर सुटला, आणि बेगम त्याच्या हातीं सांपडली असतां त्याणें तिला निसटून जाऊं दिलें.

जहानगीर महंमदानें या प्रमाणें हातची शिकार घालविल्यानें मग त्यालाच पश्चात्तापांत पडावें लागलें. बेगम लागलीच त्याच्यावर उठली, आणि उभयतांचें चांगलेंच युद्ध सुरू झालें. त्यांत त्याचा पराभव होऊन तो आप्तांच्या किल्ल्यांत आश्रयाकरितां शिरला असतां बेगमेनें बाहेरून वेढा घातला. तो दोन महिने किल्ल्यांत अडकून होता. शेवटीं इंग्रज सरकार मध्यस्थ होऊन जें सांगेल तें मान्य करण्यास उभय पक्षांची कबूली झाली. मग असें ठरलें कीं बेगमेनें ताहयात ६०००० रुपयांची जाहागीर घेऊन ती अनुभऊन असावें आणि सर्व राज्यकारभार जहानगीर महंमदाकडे सोपवावा या प्रमाणें कुदशिया बेगमेच्या पूर्ण संमतीनें तारीख २९ नवंबर सन १८३७ रोजीं जहानगीर गादीनशीन झाला.

तेव्हां पासून कुदशिया बेगमेचें नांव भोपाळच्या राज्य कारभारांत

येई नासें झालें. परंतु ती स्वस्थ बसली ह्मणून राज्याला शांतता आली असें मात्र झालें नाहीं. तिची मुलगी, नव्या नवाबाची बायको, शिकंदर बेगम ही त्याच्या पेक्षां फार हुशार निघाली. तिला त्याच्याच सारखा राज्य लोभ मोठा होता आणि तिचें मन त्याच्या पेक्षां अधिक शांत असून ती निश्चयी ही त्याच्याहून अधिक होती. त्या दंपतीचा नित्य कलह होऊं लागला. परंतु शिकंदरेनें नवऱ्याचें पाणी पुरें ओळखिलें होतें. आपण थोडा धीर धरला असतां किंचित्कालानें आपला हेतु खचित सिद्धीस जाईल हें पक्कें जाणून ती त्याच्यापासून उठून आईजवळ जाऊन राहिली.

पुढें तिनें भविष्य केल्या प्रमाणेंच झालें. जहानगीर वेवकूब आणि बदफैलीच होता ; तो सहा वर्षें सरासरी राज्य करून मेला. त्याच्या पश्चात शिकंदर वेगमेनें एकटीनें अगर तिनें व तिच्या आईनें मिळून सर्व राज्य कारभार करावा ह्मणून पुष्कळ खटपटी झाल्या ; परंतु तिच्या मनांत तसें नसल्या मुळें त्या सर्व निष्फळ झाल्या. शेवटीं सन १८१७ मध्यें फेब्रुआरी महिन्यांत आपल्या एकुलत्या कन्येच्या नावानें शिकंदर वेगमेनें पूर्ण प्रतिनिधित्वानें राज्य चालवावें असें ठरून तिची नेमणूक झाली.

शिकंदर बेगमेला हा हुद्दा मिळाल्यानें तिला आपल्या बुद्धिवैभवाचा प्रकाश पाडून दाखविण्यास पुष्कळ अवकाश सांपडला, आणि तिच्या कर्तृत्वाविषयीं जो मोठा भरंवसा वाटत होता तो तिनें खरा करून दाखविला. राज्याला जें कर्ज झालेलें होतें तें तिनें प्रथम सहा वर्षांत सारें फेडून टाकलें ; महाल, मामलती, मक्त्यानें देण्याची वहिवाट होती ती बंद करून गांवगन्नाच्या मुख्य अम्मलदारांबरोबर ती स्वतःच ठराव करूं लागली. किंत्येक व्यापारीजिनसांचे व हस्तकौशल्याच्या पदार्थांचे क्रयविक्रयाचे मक्ते होते ते तिनें बंद केलें. टंकसाळेची व्यवस्था ती स्वतः पाहूं लागली ; तिनें पोलीस बंदोबस्ताची नीट व्यवस्था लाविली व आणखी ही पुष्कळ सुधारणा केल्या. सारांश तिनें राज्यांतील सर्व खात्यांत हिमतीनें, मेहेनतीनें आणि हुशारीनें लक्ष पुरवून ज्या सुधारणा केल्या त्या एकाद्या मोठ्या अनुभविक मुत्सद्याला भूषण देण्या सारख्या होत्या.

शिकंदर बेगमेची प्रतिनिधि ह्मणून जी प्रथम नेमणूक झाली तिची मुदत तिची मुलगी १८ वर्षांची होई पर्यंत होती. परंतु पुढें त्या मुलीचा बक्षी बाकर महंमदखान ह्मणून फौजेवरचा मुख्य जमादार होता त्याच्याशीं

विवाह झाला तेव्हां ती मुदत आणखी तीन वर्षें वाढली. तथापि तिचा ते वढ्यानें संतोष झाला नाहीं. तिचा हेतु आपण तख्ताची मालकीण असें ह्मणून राज्य करण्याचा होता. परंतु इंग्रज सरकारानें तिची मुलगी शहाजहान बेगम ही गादीची हकदार असें पूर्वीच म्हटलें होतें म्हणून आतां तिचें म्हणणें त्यांनां मान्य करतां येईना. तथापि पुढें लौकरच जो प्रसंग आला त्यामुळें तिला तसाच विशेष हक्क प्राप्त झाला. मध्यंतरीं तिच्या मुलीनें आपला सर्व राज्याधिकार ती जिवंत असें पर्यंत तिलाच दिला.

सन १८५७ मध्यें जेव्हां बंडरूपी थोरला प्रचंड झंझावात सुटला तेव्हां भोपाळच्या राज्यनौकेचें सुकाणूं शिकंदर बेगमेच्या हातांत होतें. या भयंकर वादळांतून तें तारूं निभाऊन नेण्याला ती योग्य नावाडी होती. तिणें आपल्या देशाचा लौकिक, आपण पूर्वी दिलेलें वचन, आपला प्रामाणिकपणा आणि सत्यभाव हीं कायम राखलीं. इतउत्तर इंग्लिशांस जुमानूं नये, त्यांचें राज्य बुडवावें, अशा अर्थाचा शिळाछापावरचा एक जाहिरनामा तिच्या हातीं आला. त्यांतील मजकूर त्या वर्षाच्या आरंभीं एप्रिल मध्येंच ब्रिटिश एजंटास तिणें कळविला पुढें एक मनुष्य सैन्य जमवीत आहे असें तिला कळलें, परंतु तो तें कोणा करितां, कां जमवीत होता, तें कांहीं कबूल करीना ह्मणून तिणें त्याला जूनमहिन्यांत भोपाळांतून घालवून लाविलें. जुलईमध्यें होळकराच्या फौजेनें बंड करून इंग्रज अम्मलदारांनां इंदुरांतून पळवून लाविलें तेव्हां त्यांनां तिणें आश्रय दिला. या प्रसंगीं भोपाळांत इंग्रजी अम्मलदारांच्या हाताखालीं जी फौज चाकरी करितां ह्मणून तयार केलेली होती, तिणें बंड केलें होतें; बेगमेची खुद्द आई धर्मवेडी होऊन ती, तिचे चुलते, हलक्या मनाचे काजी, मुल्ला वगैरे लोक सांगतील तसें नाचणारे लोक होते ते, असे सारेच तिला ह्या काफर लोकां बरोबर तूं आतां जीहाद सुरू कर ह्मणून टोंचूं लागले होते; तर अशा समयीं इंग्रजांना आश्रय देणें फार कठीण काम होतें, परंतु ती डगमगली नाहीं; तिणे आपला शब्द तडीस पोहोंचविला. तिणें साऱ्या इंग्रजी अमलदारांनां प्रथम हुशंगाबादेस सुरक्षित पोहोचतें करून दिलें, आणि मग मोठ्या युक्तीनें आपल्या शहरांतील लोकांनां जो आवेश आला होता तो नाहींसा केला. फौजेनें जें बंड केलें होतें ते शूरत्वानें मोडलें, आणि शेवटीं आपल्या साऱ्यामुलुखभर शांतता केली. नंतर इंग्लिशांचें नष्टचर्य संपून पुनः जेव्हां त्यांची सद्दी

आली तेव्हां त्यांनां तशी मदत करण्यास ही ती सिद्धच होती. फौजफांटा, दारूगोळा, चंदीवैरण वगैरे त्यांनां जें लागलें तें सामानसुमान तिणें हवें तसें पुरवलें.

आपल्यावर मोठा प्रसंग गुदरला होता, त्यावेळीं शिकंदर बेगम या प्रमाणें बहुत उपयोगीं पडली हें समजून इंग्रजसरकारानें धार संस्थानापैकीं जो भैरसिया प्रांत खालसा केला होता तो तिला बक्षीस दिला आणि सन १८५९ मध्यें खुद्द तिलाच भोपाळच्या गादीची मालकीण ठरवून ती पुढें मुसलमानी शास्त्रा प्रमाणें तिच्या मुलीकडे व तिच्या वंशजांकडे चालावी अ सें ठरविलें ; तिला चार तोफा बक्षीस दिल्या आणि सन १८६३ मध्यें स-प्टंबरच्या पहिल्या तारखेस महाराणी साहेबांच्या प्रतिनिधींनीं पहिल्या प्रती-चा स्टार ऑफ इंडिया हा किताब दिला.

ती तशीच उदार आणि थोर मनाची होती. आपल्या प्रजेपैकीं जे लोक १८५७ मध्यें चांगले उपयोगीं पडले होते त्यांनां तिणें मोठालीं पु-ष्कळ बक्षिसें दिलीं.

या नंतर दोन महिन्यांनीं आपल्या मुलीचें संरक्षण करण्याचें काम इंग्रज सरकाराकडे सांगून शिकंदर बेगम मक्केच्या यात्रेला गेली. तेथून म-दिनेला आणि तसेंच पुढें विलायतेला जावें असा तिचा मानस होता, परंतु लुटारू लोकांनीं तिला जो उपद्रव दिला त्याला त्रासून ती सुमार आठ म-हिन्यांनीं परत आली ; ती सन १८६४ च्या जून महिन्यांत मुंबईस पोहों-चली. तेथें चार पांच महिने राहून भोपाळास गेली.

या नंतर चार वर्षें पर्यंत भोपाळचें राज्य यथापूर्व शहाणपणानें व अकलेनें करून सन १८६८ मध्यें आक्टोबरच्या ३० व्या तारखेस शि-कंदर बेगम परलोकास गेली. तें वर्तमान ऐकून हिंदुस्थान सरकारास अ-त्यंत वाईट वाटलें.

शिकंदर बेगम वारल्यावर तिची कन्या नबाब शहाजहान बेगम, जी. सी. एस. आय. ही लागलीच गादीवर बसली. हिचे दोन विवाह झाले. प्रथम पति बक्षी बाकर महंमदखान याज पासून सुलतान जहानबेगम नामक तिला एक कन्या झाली. ती पुढें गादीवर बसणार, शहाजहान बे-गमेचा विद्यमानपति महंमदसदीकहुसेन याचा प्रथम विवाह जमालउद्दीनखा न वजीर याचे कन्येशीं झाला असल्यामुळें तो बऱ्याच मोठ्या योग्यतेस चे

ढला होता. ती वजीरकन्या हयांत आहे. ह्या द्वितीय संबंधानें आतां त्या स नबाब ही पदवी प्राप्त झाली आहे व हा बेगमपति होय असें हिंदुस्थान सरकारानें मान्य केलें आहे. बेगमेची कन्या सुलतान जहान हिचा सन १८७९ मध्यें फेब्रुआरीच्या पहिल्या तारखेस मीरअहंमदअल्लीखान बहादूर नामक एका अफगाण उमरावा बरोबर विवाह झाला.

भाग ४

धार

हाल्लीं धार येथें पंवार नामक जे राजे राज्य करीत आहेत ते फार प्राचीन काळीं पंवार शाखेचें एक रजपूत घराणें माळव्यांत रहात होतें त्या चें वंशज होत. त्या घराण्या पैकीं एक शाखा पुष्कळ वर्षां पूर्वी पुण्याजवळ जाऊन ठाणें देऊन राहिली. या कुलांत शिवाजी पंवार हा प्रथम नांवा लौकिकास आला. तो पुण्याच्या ईशान्येस ३० मैलांवर मलठाण म्हणून खेडें आहे तेथील पाटील होता. ती पाटीलकी त्याच्या वंशांत अद्याप चालत आहे. शिवाजीला कृष्णाजी ह्मणून एक मुलगा होता. तो व त्याचे तिघे पुत्र बाबाजी, रायजी व केरोजी हे चौघे ही जमीन जुमला करून शिवाय शिलेदारी करीत असत. बाबाजीला संभाजी व काळोजी असे दोन पुत्र झाले, ते छत्रपति शिवाजी महाराजांच्या सैन्यांत राहून सरदारी करूं लागले. संभाजीचे पुत्र तीन, उदाजी, आनंदराव व जगदेवराव हे शिवाजीचा नातू शाहू महाराज यांच्या पदरीं सरदार होते. असा या कुलाचा हिंदुपदबापशाहीशीं प्रत्यक्ष संबंध होता ह्मणून पोंवार हे आम्ही शिंदे होळकरापेक्षां मानानें अधिक म्हणतात ; कारण ते पेशव्यांच्या पदरचे ह्मणजे चाकराचे चाकर झाले. या त्रिवर्ग बंधूं पैकीं उदाजी मोठ्याच योग्यतेस चढला. त्याच्या हाताखालीं सैन्य पुष्कळ होतें व शाहू महाराज आणि बाजीराव पेशवे हे उभयतां ही त्याला फार मानीत असत.

परंतु पुढें बाजीरावाचें आणि उदाजीचें वैमनस्य येऊन शेवटीं बाजीरावानें त्याला धरून कैदेंत टाकलें ; तेव्हां पासून त्याचें नांव इतिहासां-

तून लोपलें. मलठाणची पाटीलकी अद्याप त्याच्या वंशाकडे चालली आहे. उदाजी कैदेंत पडल्यावर ती सरदारी त्याचा भाऊ आनंदराव यास मिळाली. तो त्यावेळीं कौरा येथील पाटील होता. माळवा व गुजराथ या प्रांताच्या वसुलावर मराठ्यांचे जे हक्क होते ते वसूल करण्याचा अधिकार सन १७३४ मध्यें आनंदरावास मिळाला. पुढें तो धारेस जाऊन राहिला, आणि मग त्याला सन १७३९ मध्यें पेशव्यां कडून त्याच्या लगतचा मुलख व शेजारचे रजपूत राजांकडून जी खंडणी येत असे ती, अशी त्याच्या व फौजेच्या खर्चा करितां जाहागीर मिळाली. या प्रमाणें आनंदराव पोवार धार संस्थानाचा स्थापनकर्ता झाला.

आनंदराव पोवार सन १७४० मध्यें वारला, तेव्हां त्याचा पुत्र यशवंतराव यास सरदारीचीं वस्त्रें मिळालीं. या कुळांत राजा हें पद प्रथम यासच प्राप्तझालें. यशवंतराव मोठा शूर आणि तसाच उदार ही होता. त्याची कीर्ति माळव्यांतील लोक अद्याप गातात. इतर मराठे सरदारां बराबर हा ही सन १७६१ मध्यें पानपतच्या रणांगणावर धारातीर्थी पडून परलोकास गेला.

यशवंतराव मेला तेव्हां त्याचा पुत्र खंडेराव हा अगदीं लहान, सारा अडीच वर्षांचा होता ; तरी सरदारीचीं वस्त्रें त्यालाच मिळालीं. गादीचा मालक बाल्यावस्थेंत असल्यामुळें या संस्थानाचें फार नुकसान झालें. राजे साहेब आम्हांपेक्षां श्रेष्ठ, ते आम्हाला मान्य आहेत, असें शिंदेहोळकर तोंडानें त्याचें गौरव करीत, परंतु हातानें त्याच्या राज्याचे लचके तोडण्यांत मात्र कमी करीत नव्हते. तशांतच पुढें राघोबादादा पेशव्यांचा जेव्हां पुण्यांतून उठाव झाला, तेव्हां तर धारेच्या दुर्दैवाची अखेर झाली. कारण सन १७७४ मध्यें राघोबाला पुण्यांतली कारभारी मंडळी जेव्हां उपद्रव देऊं लागली तेव्हां त्याणें आपल्या कुटुंबाची रवानगी धारेस करून दिली. तेव्हां आनंदीबाई गरोदर होती, ती शेवटच्या बाजीरावास धारच्या किल्ल्यांत प्रसवली. बाईला पुत्र झाल्याचें वर्तमान कळतांच त्याला आपल्या हस्तगत करून घेण्याकरितां राघोबाचे सारे शत्रु धारेवर धांवले. त्यावेळेस तेथचा मालक खंडेराव हा जरी वयांत आला नव्हता, तरी तो कामकाज पाहूं लागला असून राघोबाला पूर्ण अनुकूल होता. ह्मणून त्याच्या मुलखाची नासाडी करणें त्यांनां यत्किंचित गैर वाटलें नाहीं. त्यांणीं सारा मुलुख व्यापला अ-

णि जेव्हां त्याणें आनंदीबाईला मुलासह त्यांच्या ताब्यांत दिलें आणि ते तिला कैद करून पुण्यास घेऊन गेले, तेव्हां तो मोकळा झाला.

खंडेराव पोवार या गोष्टी नंतर फार दिवस वांचला नाहीं. तो अगदीं पूर्ववयस्क, सारा २१ वर्षांचा असतांच सन १७८० मध्यें वारला. त्या वेळीं त्याची स्त्री गरोदर होती. ती गोविंदराव गायकवाडाची कन्या, पुढें सहा महिन्यांनीं बडोद्यास पितृगृहीं पुत्र प्रसवली. आजोबानें त्याचें नांव आनंदराव असें ठेविलें.

आनंदराव १७ वर्षांचा होई पर्यंत आजोळींच होता. नंतर पितृपदारूढ होण्या करितां धारेस गेला. तेथें रंगराव उरेकर म्हणून दिवाण होता तो जो आजपर्यंत सर्व अधिकार चालवीत होता, त्याला तो हातचा सोडावासें वाटेना. तो अम्मल बळकाऊं पहात होता, परंतु कांहीं चालेना तेव्हां पळून होळकराच्या दरबारीं गेला, तेव्हां होळकरानें आनंदरावास सांगून तुला पुनः दिवाणगिरी देववितों असें त्याला नादास लाविलें आणि इकडे राजाजवळ मध्यस्थी करितां म्हणून मनुष्य पाठवून मुलुख लुटून ओस पाडला, तेव्हां त्याचें बोलणें वरोपचारी, केवळ लबाडीचें आहे असें समजून रंगराव तेथून उठून दौलतराव शिंद्याकडे गेला, आणि त्याला धारेवर चाल करण्या विषयीं भर देऊं लागला. तो तर अशा कृत्याला अगदीं तत्परच होता, त्याणें मला पेशव्यांचा असा हुकूमच आहे असें म्हणून सारें संस्थान आपल्या हस्तगत करून घेण्याची दहशत घातली आणि सात वर्षें सारखा उपद्रव देऊन आगर व सोनेईल हे प्रांत घेतले; शिवाय हाडोतींल पोवारांचा जो मुलूख होता तो घेतला आणि आनंदरावाकडून पुष्कळ पैसा ही उपटला. यापुढें आणखी दोन वर्षांनीं शिंद्याच्या हुकमानें त्याच्या संभाजी जुग्गा नांवाच्या एका सरदारानें जाऊन राजाजवळ पाऊण लाख रुपये मागितले, ते मिळतना तेव्हां त्याणें त्या जर्जर झालेल्या राजावर पुनः हल्ला केला आणि बदनावरा जवळ लढाई करून तो सारा प्रांत हस्तगत करून घेतला. तो सोडवून परत घ्यावा म्हणून आनंदरावानें तेवढी रकम उभी करून त्याची भरती केली; परंतु प्रांतसुटून ताब्यांत येण्या पूर्वीच त्याला मृत्यूनें गांठलें. मग अर्थातच त्या संस्थानांत सारा घोंटाळा झाला, तेव्हां शिंद्यानें हातचा मुलुख ही सोडला नाहीं आणि पैसा ही परत दिला नाहीं. आनंदरावाची बहीण जेठी बदफैली बायको होती; तिणें त्याला विष घालून मारलें असा लोकांचा

समज आहे असें करण्यांत तिचा हेतु सर्वराज्यसूत्रें आपले हातीं असावीं असा होता, आणि तो एकमुलगा दत्तक देऊन आपण कारभार करूं लाग लें ह्मणजे साधेल असें तिला वाटत होतें. या प्रमाणें तिचाजर खरोखर हे-तु असला तर तो कसा सिद्धीस गेला ऐका. आनंदराव मेल्यावर थोड्याच दिवसांनीं तिला व तिच्या साथी मंडळीला--कांहीं खरेच तसे तोते ह्मणून व कांहींनां संशया वरून--धरून लोकांनीं फांशी दिलें.

आनंदराव मेल्यावर त्याची स्त्री मीनाबाई इणें राज्यकारभार आपल्या हातीं घेतला ती त्यावेळीं गरोपर होती ह्मणून तिच्या शत्रूंपासुन व मुख्यत्वें करून मुरारराव नामक लेकर्वळ्या पैकीं तिचे नवऱ्याचा एक दायाद होता त्या-पासुन तिला भीती फार वाटत होती. त्याची कारस्थानें चालू नयेत ह्मणून तिणें आपल्याळडे बरेंच लोक अनुकूल करून घेऊन स्वपक्ष प्रबल केला; आणि मग ती प्रसूत होण्याकारितां मंदूस गेली. नवमास पूर्ण होऊन ती पु-त्र प्रसवली; त्याचें नांव तिणें रामचंद्रराव असें ठेविलें. वाळंतपणांतून उठून हिंडती फिरती होण्या बराबर ती धारेस गेली आणि तेथें मुरारराबानें जे कां-हीं बेत चालविले होते ते तिणें आपल्या शहाणपणानें व मनाच्या निर्धारानें सारे लटपटविलें. मग तिणें आपल्या मदती करितां वडोद्यांहून सैन्य आण-विलें. प्रसंगीं हें आपल्या खरें उपयोगीं पडेल असा तिला त्याचा भरंवसा वाटत होता. त्याच्या जिवावर अगदीं निःकाळजी होऊन तिणें आपलें स-र्व तनमन स्वराज्य ऊर्जित दशेस आणण्याकडे लाविलें. त्यावेळीं तेथचा कारभार चांगला चालला असेल असें स्वप्नांत ही कोणाच्या मनांत येणार नाहीं, आणि खरी स्थिति तशीच होती. राज्य कारभार हें नांव देखील लो पलें होतें असें म्हटलें तरी चालेल. सारे राज्य इतकें उजाड होऊन गेलें होतें कीं जेवढा नेमाचा वसूल यावयाचा तेवढा गोळा करण्याची ही को-णाला खटपट करावीसें वाटेना, आणि जरी कोणी त्या कामाला लागला तरी त्याचे श्रम निष्फळ होते. मुरारराव राज्याचा एक कोंपरा बळकाऊन बसलाच होता, आणि बाकीच्यावर ही झडट घालण्याला टपला होता. अ-शी स्थिति होऊन गेल्यामुळें संस्थानची दिनचर्या भागविण्या करितां आस-पासच्या रजपूतमुलखावर धाड घालावी लागे.

या प्रमाणें सरासरी कशी तरी हातातोंडाची गांठपडे अशा तऱ्हेचा कारभार चालला असतां तो बालराजा रामचंद्रराव वारला परंतु मीनाबाईनें

पुत्रशोक बाजूस ठेऊन आधीं राज्य कायम राखण्याचा निश्चय केला आणि शिंदे होळकरांच्या संमतीनें आपल्या बहिणीचा मुलगा लागलाच दत्तक घेतला. त्याचें नांव रामचंद्रराव असेंच ठेविलें. तो सरासरी तिच्या मुलाच्याच वयाचा होता. तेथून पुढें आठ वर्षे धार आपल्या शेजारच्या बलाढ्य राज्यांच्या दाढेंत सांपडलेलें होतें. मुरारराव मेला परंतु त्याच्याजागीं दुसरे शत्रु उठले. दरबाराच्या हातून पेंढाऱ्यांचें देखील निवारण होईना. या प्रमाणें धारच्या येवढ्या थोरल्या राज्याची इतकी दुर्दशा उडून गेली कीं सन १८१७ मध्यें पेढाऱ्यांचा समूळ उच्छेद करावा म्हणून जेव्हां इंग्रज माळव्यांत शिरले तेव्हां मीनाबाईच्या ताब्यांत एक धारशहर मात्र उरलें होतें आणि तें तरी केवळ तिनें आपल्या धैर्यावर आणि निर्धारावर संभाळलें होतें. तिला सरासरी वीसपासून तीस हजारां पर्यंत वसूल येई.

सन १८१९ मध्यें जानेवारीच्या १० व्या तारखेस इंग्रजांचा व धारकरांच्या तह ठरला, आणि इंग्रजांनीं राज्याचें संरक्षण करण्याचें काम आपल्या कडे घेतलें; तेव्हां पासून धारेची स्थिति सुधरत चालली. राजाच्या ताब्यांतील पुष्कळ महाल शत्रुंनीं बळकाविले होते ते इंग्रजांनीं काबीज करून त्याचे त्यास परत दिले आणि आणखी अशी व्यवस्था लाऊन दिली कीं ते जे अगदीं कंगाल होऊन गेले होते ते पुनः भरभराटीस येण्यास त्यांनां जितका काल लागणार होता तेथपर्यंत त्यांत स्वास्थ्य असावें.

अशी व्यवस्था लावल्यानें व आणखी दोन वर्षांनीं आणखी कांहीं मुलुख परत मिळाल्यानें धार, बदनावर व नलच, इतक्या प्रांतांवर राजाचा अम्मल चालूं लागला. मैरसिया प्रांत धारसंस्थानापैकींच होता तो इंग्रज सरकारानें आपल्या कडे घेतला होता, त्याच्या वसुला बद्दल व अल्डी मोहना काढून राजास जो खंडणी येत असे ती सन १८२१ मध्यें इंग्रजसरकारानें आपल्याकडे लाऊन घेतली होती ती बद्दल मिळून दरसाल ११०००० रु पये इंग्रजां कडून राजास रोख पोंचूं लागले. वासवाड्यांतील रजपूत संस्थानिकां कडून जी राजास खंडणी पोहोचत असे ती सन १८१९ मध्येंच इंग्रजसरकाराकडे गेली होती.

इंग्रज सरकाराशीं सख्य होऊन त्यांचा हात शिरला त्या बराबर धारेचा ऊर्जितकाळ आला. तेव्हां पासून तेथची स्थिति फार जलद सुधारली बापूरघुनाथ म्हणून तेथचा जो दिवाण होता तो फार हुशार होता.

राजा अल्पवयस्क असल्यामुळें सर्व कारभार तो मुक्त्यारीनें पहात होता. त्या पें फौजेची व्यवस्था लाविली ; पहिले जे अव्यवस्थित, बेशिस्त, उगाच नांवाला मात्र पुष्कळ शिपाई भरलेले होते ते सारे घालवून देऊन चांगले निवडक ३०० स्वार व ८०० पायदळ ठेविलें ; शिवाय पोलीस फौज होतीच. मुलखाच्या बंदोबस्ताला येवढें सैन्य पुरे होतें. मागच्या आठ वर्षांत जमाबंदी होत होत २०००० पर्यंत उतरली होती ती पुनः चढून सन १८२० मध्यें २६७००० रुपये वसूल झाला ; आणि आतां मुलखांत शां तता राहील असें जेव्हां रयत लोकानां दिसूं लागलें तेव्हां त्यांनां जमिनीची मेहेनत करण्याला धीर आला.

पुढच्या वर्षीं राजे रामचंद्रराव पोंवार यांचा दौलतराव शिंद्याची पुतणी अन्नपूर्णाबाई इच्यार्शी विवाह ठरला. वधू अष्टवर्षात्मक आणि वर द्वादशवर्षात्मक असा तो जोडा टीक होता. लग्न समारंभ शिंद्यांनीं आपल्या नांवा लौकिका प्रमाणें मोठ्या थाटानें ग्वाल्हेर येथें यथास्थित केला ; उभयपक्षांकडील मानकरी मंडळीस संतोष झाला. एक लाख रुपये वसुलाचा मुलुख शिंदे वरास आंदण देतील असें तत्पक्षीय मंडळीस वाटत होतें, परंतु त्यांणीं फक्त देकतन महाल दिला ; तेव्हां धारची मंडळी थोडी विरस झाली.

सन १८२७ मध्यें दौलतराव शिंदा दुखणेकरी पडला तेव्हां रामचंद्रराव त्याच्या समाचारा करितां ह्मणून गेला, परंतु खरा उद्देश निराळाच होता. दौलतरावाचा आपल्यावर लोभ होऊन तो कांहीं तरी मुलुख बक्षीस देईल असें त्याला वाटत होतें. दुसरें, लग्न झाल्यापासून अन्नपूर्णाबाई इकडे आलीच नव्हती, तर तिला नेण्या करितां आपण स्वतः आलों हें पाहून दौलतराव खुष होईल असें ही त्याला वाटत होतें, परंतु त्याच्या पासून कांहीं एक प्राप्ति झाली नाहीं. तेव्हां राजे राणीस समागमें घेऊन घरीं परत आले.

इंग्रजांबराबर प्रथम जो तहनामा झाला होता त्यांतील कलमांत सन १८२८ । ३१ आणि ३५ मध्यें असे तीन वार फेरफार झाले, परंतु त्यामुळें राजाकडील मुलखास कांहीं धक्का लागला नाहीं किंवा उभयतां सरकारचे दोस्तींत अंतर आलें नाहीं ; याज करितां ते येथें सांगण्याची जरूर नाहीं. त्यांत विशेष नवीन ठराव येवढा झाला कीं भैरसिया प्रां-

तावदल जी ठरीव एक रकम मक्त्यासारखी देत असत ती बंद करून प्रांताचे वहिवाटी वद्दल जेवढा खर्च होईल तेवढा वसुलांत वजा घेऊन बाकीचा सारा पैसा राजास वर्षास द्यावा असें ठरलें.

सन १८३२ मध्यें राज्यांत एक बंड उपस्थित झालें, त्यामुळें मुलखांत पुनः अस्वस्थता होऊन उपद्रव झाला. उचितराव नामक एक तरुण मनुष्य मी मुरारराव्याचा मुलगा, धोरले वशवंतराव पोंवार, जे पानपतावर पडले त्यांचा नातू, मला राज्याचा हिस्सा पाहिजे ह्मणून उठला. मुरारराव भिल्ल लोकांशीं फार संबंध ठेऊन होता, त्या मुळें ते झाडून सारे त्याला अनुकूल झाले आणि बंड बरेंच माजलें. त्यांणीं कितीएक गांव लुटून जाळून फस्त केले आणि तीन हजारांवरच गुरें धरून जंगलांत नेलीं. असा अनर्थ झाला तेव्हां दिवाण वापूरघुनाथ यांणीं तें बंड मोडण्या करितां इंग्रज सरकाराकडे मदत मागितली. त्याणें सरकारास असें लिहिलें कीं हें बंड लौकर मोडण्याची तजवीज केली तर बरें आहे, नाहीं तर आधींच गांव ओस पडत चालले आहेत ते हातचे अजीच जातील. सरकारानें प्रथम मध्यस्थी करून सामोपचारानें तें प्रकरण मिटवावें असें मनांत आणलें, परंतु तें सिद्धीस गेलें नाहीं, तेव्हां योग्य विचार केला. अखेर मुख्य बंडवाला उचितराव व त्याचे अनुयायी भिल्ल कौलास येऊन असें म्हणूं लागले कीं आम्ही इंग्रज सरकारासच पंच समजून आपला सर्व मजकूर कळवितों, तो ऐकून सरकारानें तिऱ्हाईतपणानें ठराव करावा ह्मणजे तो आम्हांस मान्य आहे. मग चौकशी सुरू झाली ; तींत उचितरावानें आपण मुरारराव्याचा मुलगा खरा ह्मणून जो साक्षीपुरावा आणला तो सबळ आणि भिल्ल जीं गाऱ्हाणीं सांगूं लागले तीं ही खरीं ठरलीं ; तेव्हां सरकारानें असा ठराव केला कीं बंड झाल्यापासून गुरें ढोरें व इतर जो माल गेला तो उचितरावानें परत आणून द्यावा आणि धारेवर कांहीं एक हक्क सांगूं नये ; अशास तो कबूल असेल तर आमरण पर्यंत राजानें त्याला दरमहा २०० रुपये प्रमाणें नेमणूक द्यावी. भिल्लांच्या ज्या अडचणी होत्या त्या सरकारानें दूर करावया.

रामचंद्ररावाच्या वयाला पुरीं १४ वर्षें झालीं नाहींत तों त्याची कारकीर्द आटोपली. तो सन १८३३ च्या आक्टोबर महिन्यांत सारा ११ दिवस दुखणेकरी पडून परलोकास गेला. त्याला एक मुलगी मात्र होती,

मुलगा नव्हता, ह्मणून अन्नपूर्णाबाईनें मलठाण येथील यशवंतराव पोवारा-च्या भाईबंदांपैकीं एक मुलगा लगतचासा पाहून दत्तक घेतला — हा उ-दाजीच्या घराण्यापैकीं होता. त्याचें पहिलें नांव मल्हारराव. इंग्रज सर-कारास हें दत्तविधान मान्य होऊन सन १८३४ च्या एप्रिल महिन्यांत तो मुलगा यशवंतराव पोवार या नांवानें गादीवर बसला. त्याला दोन वर्षें झा-लीं नाहींत तों अन्नपूर्णाबाईच्या लग्नाच्या वेळीं आंदण दिलेला देकतन म-हाल शिंद्यानें काढून घेतला ; परंतु तो त्याच्याकडे फार दिवस राहिला ना-हीं. त्याच्या फौजेवरील जमादार आपसांत भांडूं लागले, तेव्हां थोडीशी बे-बंदी झाली, तेवढी संधी साधून धारकरांच्या तेथच्या अम्मलदारांनीं झटकर पुनः आपला अम्मल बसविला. मग त्याला पुनः केव्हांच उपद्रव लागूं न-ये असा पक्का बंदोबस्त करण्याचें मनांत आणून धारच्या दिवाणानें इंग्रज सरकारास असें लिहिलें कीं या महालाची वहिवाट आपण करून खर्च व-जा जातां जमाबंदींत जी शिल्लक राहील ती राजाकडे द्यावी. सरकारानें ती विनंती मान्य करून महाल कबजांत घेतला.

धारच्या राज्याचा कारभार उत्तमरीतीनें करणारा हा हुशार दिवाण बापूरघुनाथ सन १८३६ मध्यें वारला, तें राज्याचें एक नुकसानच झालें. त्याच्या पश्चात त्याचा तिसरा मुलगा कारभाराचें काम पाहूं लागला. तो ही उत्तम स्वभावाचा मनुष्य होता. पुढच्या वर्षीं नानाबाई ह्मणून पुणें प्रांतीं-च्या एका पाटलाची मुलगी होती ती वधू निश्चयांत येऊन पुढें कांहीं दि-वसांनंतर राजाचा तिजशीं विवाह झाला. या स्त्रीस संतति झाली नाहीं.

पुढें सन १८५७ पर्यंत या राज्यांत उत्तम शांतता होती ; तिला विघातक असें कांहीं घडलें नाहीं. त्यावर्षीं दोन गोष्टी घडल्या, त्यां पैकीं एकीच्या योगानें राज्य बुडालेंच असतें परंतु तें दुसरीमुळें तरलें. तो प्र-कार असा. त्या वर्षीं यशवंतराव राजा मेला. त्याला मुलगा नव्हताच म्ह-णून त्याचा अल्पवयस्क सावत्र भाऊ गादीवर बसला. इकडे शिपायांचें बं-ड झालें तेव्हां ती संधी पाहून धारचें दरबार इंग्लिशांवर उठलें ; त्याणें ही बंड केलें. परंतु इंग्रज सरकारानें तें मोडलें आणि राज्य खालसा केलें. प-रंतु अनेक कारणांमुळें सरकारच्या मनांत दया येऊन ह्या राज्यावर येवढी अवकृपा करूं नये असें वाटलें. — बंड उद्भवलें त्यासीं राजाचा संबंध कां-हींच नव्हता, तो बिचारा अल्पवयस्क बाल होता असा एक विचार सर-

कारच्या मनांत आला असावा असें दिसतें – ह्मणून सुरकारानें मेहेरबानी करून खालसा केलेलें राज्य सोडून दिलें ; परंतु राजा वयांत येईपर्यंत सर्व कारभार आपल्याच हातांत ठेविला ; आणि बंड केल्याबद्दल शिक्षा झाली असें स्मरण रहावें म्हणून राजाचा भैरसिया प्रांत पुष्कळ वर्षांपासून जो आपल्याकडे वहिवाटीस होता तो घेऊन भोपाळच्या बेगमेस देऊन टाकला.

सन १८६३ मध्यें आनंदराव पोवार वयांत आला तेव्हां त्याला मुक्त्यारी द्यावयाची, परंतु तो राज्यभार मस्तकीं घेण्याला लायक नाहीं असें तेथच्या पोलिटिकल एजंटाचें सरकारास लिहून गेल्यामुळें ती मिळावयास अवकाश लागला. तथापि सन १८६४ च्या अगष्ट महिन्यांत गव्हरनर जनरल सर जॉन लॉरेन्स यांचे विचारास असें आलें कीं त्याला आपलें राज्य चालवितां येईल कीं नाहीं हें त्याला अधिकार देऊन पहावें. मग त्याचा निश्चय होऊन आक्टोबरच्या पहिल्या तारखेस आनंदरावास मुक्त्यारी मिळाली. परंतु ती देतांनां सरकारानें त्याजपासून कांहीं करार करून घेतले; ते असे—राज्यव्यवस्थेची सरकारानें जी पद्धति सुरू केली होती तीच चालू ठेवावी; तींत फेर बदल करूं नये; तरम जमाबंदी होऊन जी मुदत ठरली होती ती पुरी होईपर्यंत पूर्वी दिलेले कौल व करारनामे कायम राखावे; मुख्य दिवाण नेमण्याच्या कामीं गव्हरनरजनरलाचे एजंटाची संमति घ्यावी ; रयतांच्या संबंधानें जमाबंदी प्रकरणीं जी व्यवस्था झालेली होती ती तशीच असूं द्यावी ; कोणताही मुलूख किंवा मालमत्ता शेजारच्या कोणत्याही संस्थानिकास देणें झाली तर एजंटाच्या विचारास आल्याशिवाय देऊं नये, आणि धारचा किल्ला तेव्हां जसा होता तसा राखावा.

इतक्या अटी राजानें कबूल केल्या, तेव्हां कराराप्रमाणें वागणें म्हटलें ह्मणजे त्याला मुलखांत शांतता आणि व्यवस्था ठेऊन लोकांस खुष राखणें भागच आलें.

आनंदरावास नाइट कमांडर ऑफ धि स्टार ऑफ इंडिया असा सरकारानें किताब दिला.

भाग ५

देवास

संभानीपाटलाचा मुलगा कृष्णाजी, त्याचे मुलगे तीन ; बाबाजी, रायजी, व केरोजी , आणि बाबाजीचे मुलगे दोन , संभाजी व काळोजी ; हे उभयतां शाहू महाराजांच्या पदरीं राहून लौकिक पावले असा वृत्तांत मागच्या भागांत कथन केलाच आहे. आतां त्याचा भाऊ काळोजी याणें जें घराणें स्थापिलें त्याचा वृत्तांत सांगूं . काळोजीला कृष्णाजी, तुकाजी , जिवाजी, आणि मानाजी असे चार पुत्र होते. त्यांपैकीं तुकाजी आणि जिवाजी ही जोडी बाजीराव पेशवे सन १७२५ मध्यें माळव्यावर स्वारी करावयास गेले तेव्हां त्यांच्या बराबर गेली. तो प्रांत सर करून पुढें बाजीरावानें त्याची वांटणी केली तींत देवास, सारंगपूर , अलोट व दुसरे कांहीं मिळून २४२९०० रुपये वसुलाचे महाल या उभयतांस दिले. ही जमाबंदी नांवची होती, आणि हींतून दरसाल २६००० रुपये गिराशी सरदारांस द्यावे लागत. या मुलखा शिवाय कांहीं प्रांतांच्या खंडणी बद्दल ७८९२२ रुपये येत असत ते ही बाजीरावानें यांसच दिले , व पुढें कांहीं दिवसांनीं बुंदेलखंडांत हमीरपूर व दोआबांत कंदोबा हे महाल नेमून दिले , परंतु त्यांनां त्यांचा उपभोग फार दिवस घडला नाहीं.

देवासची राज्यव्यवस्था मोठी विलक्षण आहे. प्रथमतः तुकाजी व जिवाजी या उभयतांस मिळून हें संस्थान मिळालें म्हणून तें समाईक होतें, परंतु पुढें उभयतां बंधूंमध्यें वैमनस्य उत्पन्न झाल्यामुळें त्यांणीं मुलुख वांटून घेतला. पुढें त्यांचे जे वंशज झाले त्यांच्या मनांत एकत्र रहावें, साऱ्या संस्थानावर हुकूम, अम्मल वगैरे पूर्ववत एकच असावा, असें आलें म्हणून ते एक झाले आणि तो एकोपा आजपर्यंत तसाच चालत आला आहे. उभयतां राजांचे हक्क, मानपान, सारें सारखें असून जें उत्पन्न येतें तें दोघे सारखें वांटून घेतात. सर जॉन मालकम लिहितात—यांच्या मानपानासंबंधीं व्यवस्था कशी ठेवावी याचा विचार करावयाचा होता म्हणून यांचा एक मेकांशीं संबंध कसा आहे तो समजून घ्यावा म्हणून एकदां चौकशी कर-

प्यांत आली, तेव्हां तिकडच्या एका कामदारानें हंसत हंसत सांगितलें. ‘‘ आमच्या राजे साहेबांकडे एकादा कुणबी मुजऱ्याला आला आणि त्याणें एक खरबूज पुढें ठेविलें तर तें मधोमध चिरून दोघां यजमानांकडे दोन तुकडे द्यावे लागतात. ’’ मालकम साहेब आणखी असें लिहितात. — या प्रमाणें उभयतां राज्यांच्या मनांत यत्किंचित ही किल्बिष नव्हतें, तरी त्यांच्या थोर थोर नोकरांचेंच वारंवार भांडण होतें असें सहज दिसन आलें. तें त्यांच्या ऐक्याचा नाश करणारें होतें. त्यांचा सख्यसंबंध कायम रहावा आणि संस्थानाचें कल्याण व्हावें ह्मणून सरकारानें प्रथम असें मनांत आणलें कीं उभयतां मिळून एक दिवाण असावा असें त्यांच्या मनांत भरून द्यावें. तें त्यांनां ही बरें वाटून ते कबूल झाले, आणि त्याणीं आपल्याच पदरचा एक संभावित, जुना नोकर होता त्यास दिवाणगिरी सांगितली. ह्या व्यवस्थेनें त्यांच्या मुलखाची सुधारणा फार झाली.

तुकाजी व जिवाजी यांच्या मरणानंतर जे दोन राजे झाले त्यांचे दिवस फार विपत्तींत गेले. त्यांचें राज्य मध्यहिंदुस्थानांतल्या अतिशय उपद्रव पावलेल्या प्रदेशाच्या अगदीं मध्यभागीं पडल्यामुळें त्यांनां असें दुःख भोगावें लागलें आणि त्यांच्या प्रजेचे तर हाल फारच झाले. त्यांच्या अंगांत मोठी फौज बाळगण्याचें सामर्थ्य नव्हतें त्या मुळें त्यांचें संरक्षण होणें कठीण पडलें. शिंदे, होळकर हे तर बलाढ्यच होते, ते त्यांनां लुटीत यांत कांहीं आश्चर्यच नाहीं, परंतु पेंढारी व इतर पाळेगार वगैरे, जो हवा तो त्यांच्यावर धाड घालून लुटून फस्त करी. हमीरपूर व कंडपा हे त्यांचे दूरचे महाल अशानेंच गेले. एकदां शिंद्यानें त्यांचा सारंगपूर प्रांत बळकाविला; तो पुढें पेंढाऱ्यां बराबरची लढाई सन १८१७ । १९ संपल्यावर त्यांनां परत मिळाला. अशा स्थितींत त्या दंग्याधोप्याच्या काळांत हें येवढेंसेंच संस्थान जिवंत राहिलें हेंच मोठें आश्चर्य वाटतें.

तुकाजीला मूल नव्हतेंच ह्मणून त्याणें आपल्या ज्येष्ठ बंधूचा नातू कृष्णाजी यास दत्तक घेतलें. तो ही अपुत्रिक होता. त्याणें आपला भाऊ राणोजी याचा मुलगा तुकाजी यास मांडीवर घेतलें. हा तुकाजी ही सन १८२४ मध्यें अप्रज मेला, तेव्हां त्याचा दत्तक पुत्र रुक्मांगदराव गादीवर बसला पुढें तो ही अनपत्य, ह्मणून त्याचा दत्तक पुत्र कृष्णाजीराव सन १८६० मध्यें गादीवर बसला. तो तेव्हां अल्पवयस्क होता तो वयांत आला

तेव्हां सन १८६७ मध्यें मार्चच्या २३ व्या तारखेस मुखत्यारी मिळून पूर्णाधिकारी झाला.

पोवार घराण्याच्या या शाखेंत औरस संततीचा अगदीं अभाव आणि गादी स्थापन झाल्यापासून आजपर्यंत दत्ताकावर चालत आली, हा एक ईश्वरी लीलेचा मासलाच आहे.

मूळ गादी स्थापन करणारा दुसरा भाऊ जिवाजी पोवार यास दोन पुत्र होते, पैकीं वडील सदाशिवराव वारला तेव्हां त्याला रुक्मांगद ह्मणून पुत्र होता, परंतु तोही वारला आणि त्याचा नष्टांश झाला मग दुसरा मुलगा आनंदराव गादिवर बसला. नंतर त्याचा मलगा हैबतराव गादीवर बसला; तो अपुत्रिक होता; त्याणें नीलकंठराव ह्मणून आपला मूळ पुरुष जो काळोजी त्याचा पणतू, नानाजीचा नातू, दत्तक घेतला, आणि त्याचें नांव आनंदराव ठेविलें. हा सन १८३७ मध्यें अपुत्रिकच मेला, तेव्हां त्याचा दत्तकपुत्र हैबतराव गादिवर बसला. त्याणें ही सन १८५८ मध्यें एक मुलगा मांडीवर घेतला, परंतु तेव्हांच असा ठराव करून ठेविला कीं आपल्यास जर पुढें औरस पुत्र होईल तर या दत्तकाला कांहीं हक्क नसावा. त्या प्रमाणें त्याला सन १८६० मध्यें पुत्र झाला. त्याचें नांव नारायणराव. पुढें सन १८६४ च्या मे महिन्यांत १२ व्या तारखेस हैबतराव वारला तेव्हां सरकारानें नारायणरावास गादीवर बसविलें. या प्रमाणें दोन ही राजे अज्ञान पडल्यामुळें गोविंदराव रामचंद्र ह्मणून एक कामदार होता तो संस्थानचा कारभार करूं लागला. त्याच्यावर देखरेख गव्हरनर जनरलाचे एजंट यांची होती. या प्रमाणें व्यवस्था सन १८६७ च्या मार्चच्या २३ तारखेपर्यंत चालली. त्या दिवशीं थोरली पातीदार कृष्णराव पोवार यांस वर सांगितल्या प्रमाणें मुकत्यारी मिळाली तेव्हां सर्व अधिकार त्यांजकडे गेला.

शिंदे होळकरां सारख्या बलाढ्य शत्रूं पासून ह्या संस्थानास फार उपद्रव पोहोंचत होता, परंतु आपल्या धारकर भाईबंदां प्रमाणें येथील राजांनीं सन १८१८ मध्यें इंग्रजांचा आश्रय जोडला तेव्हां त्यांनां पूर्वी पेक्षां पुष्कळ सुख होऊं लागलें. इंग्रजांनीं शिंद्यास सारंगपूर परगणा राजास परतं द्यावयास लाविलें. देवास, अलोट, सारंगपूर, गुरगूच, विम्रवाद, बघावद वगैरे जे या राज्यांतिल महाल त्यांवर उभयतां राजांचा हक्क सारखा असून त्यांची व्यवस्था पाहिजे तशी करण्यास ते मुकत्यार आहेत असें सर-

कारानें कबूल केलें. तसेंच सदरसी प्रांताच्या उत्पन्नाच्या तिसऱ्या हिश्शावर शेंकडा ७ रुपये प्रमाणें व डुंगेला प्रांताचे उत्पन्ना पैकीं बराबर निम्मेवर त्यांचा हक्क सरकारानें कबूल केला. त्यांचा बघदाद महाल फार दूर पडल्यामुळें तेथील अम्मल त्यांनां नीट चालवितां येत नव्हता सबब तो सन १८२८ मध्यें इंग्रज सरकारानें आपले कडे वहिवाटीस घेतला आणि खर्च वजा जाऊन जो नफा राहील तो राजांस देण्याचें कबूल केलें.

सन १८१८ मध्यें इंग्रज सरकाराशीं संबंध झाल्यापासून देवासची शांतता बहुत करून मोडली नाहीं. केव्हां केव्हां राजांच्या पोटचे जाहागिरदार खंडणी देण्यास तकार करून किंवा लुटीच्या अथवा दरवड्याच्या कामांत सामील होऊन थोडा बहुत दंगा करीत व आम्ही स्वतंत्र म्हणत, परंतु त्यांचा बंदोबस्त तावडतोब होई. रघूगडच्या ठाकुरानें असा दंगा जरा फाजील मांडला होता, परंतु सन १८३४ मध्यें तो एका मोठ्या दरवड्यांत सांपडला, तेव्हां राजानें त्याला तुरंगांत टाकलें, तसा त्याचा पक्का बंदोबस्त झाला, आणि तेव्हां पासून तसले बखेडे फारसे नाहींत.

सन १८९७ मध्यें देवासच्या उभयतां राजांनीं सरकारास चांगली मदत केली.

भाग ६

जावडा

अमीरखान पठाण नामक जो प्रसिद्ध लुटारू होऊन गेला त्याचा मेहुणा गफूरखान याणें जावडा संस्थान स्थापिलें. टोंकच्या इतिहासांत अमीरखानाचें चरित्र वर्णन करतांना हें सांगितलेंच आहे.

अठराव्या शतकाच्या शेवटच्या पंचविशींत रोहिलखंडांत अफगाण कुलांत गफूरखान जन्मला. सन १७९८ मध्यें अमीरखान होळकराच्या पदरीं नोकरीस राहिला, तेव्हां आप्तसंबंधामुळें गफूरखान त्याजवळ गेला. त्याची कामकाजांत चांगली हुशारी दिसून आली ह्मणून सन १८०८ मध्ये यशवंतराव होळकर वेडा झाल्यामुळें इंदूरचा कारभार चालविण्या करि-

तां जी प्रतिनिधि मंडळी नेमण्यांत आली तींत अमीरखानानें त्याला ढकलले. यशवंतरावाची राख तुळसाबाई ही नांवाला मुख्य प्रतिनिधि होती. त्या मंडळीनें जो राज्य कारभार चालविला त्याचें वर्णन ग्रॉंट डफ साहेबांनीं असें केलें आहे. — जमाबंदी प्रमाणें सुरळीत वसूल होत नसे ; आपली फौज कमी करण्याचें सरकारच्या अंगांत अवसान नव्हतें. राज्याचा जो वसूल येत होता त्याची व्यवस्था कितीही शहाणपणानें कोणी करता तरी तेवढ्यांत सर्व कारखान्यांचा खर्च कधीं ही भागला नसता....अशा प्रकारची जेथंची स्थिति त्याला सरकार हें नांव शोभत असेल तर द्यावें. वरें जे प्रतिनिधि नेमले होते, त्यांच्यांत तरी ऐक्य असावें होतें, तें ही नाहीं ; त्यांत मराठे व पठाण अशी दुफळी पडली असून ते एक मेकांचा पाडाव करण्या करितां अनेक कारस्थानें रचण्यांत नेहमी गुंतलेले असत. त्यामुळें सारा मुलुखभर जशी झोटिंग बादशाही होऊन गेली होती तशी कोठेंच झालेली नसेल. दरबारांत लांच, देहांत शासन आणि खून या वांचून बोलणें नाहीं ; तसेंच मुलखांत जुलूम जबरी, लुटालूट आणि हाणामारी तोडातोडी या शिवाय दुसरें नांव नाहीं.

दरबारांत दुफळी माजली होती म्हणून वर सांगितलेंच आहे , त्यांत पठाणांच्या बाजूस गफूरखान प्रमुख होता. मग तुळसाबाई जे एकएक भयंकर बेत करी त्यांत तो केव्हां तिला सामील असे आणि केव्हां तिच्या प्रतिपक्षाला सामील होई. त्यांतल्या एका प्रसंगीं मराठे मंडळीस जय आला तेव्हां गफूरखान तेथून जो पळाला तो आपल्यालां जेवढी फौज अनुकूल होती ते घटी घेऊन जावड्यास गेला. तो प्रांत त्याला जाहागीरच दिलेला होता. म्हणून तो त्यांतून हवीतशी मदत घेऊं लागला ; परंतु तेवढ्यावर न थांबून त्यानें आसपासच्या मुलखांत लूट मांडली. तेव्हां दरबारांतून मराठेमंडळीनें त्याच्यावर फौज रवाना केली. इतक्यांत त्याचा मेहुणा अमीरखान आपली फौज घेऊन त्याचे मदतीस आला ; त्यानें लढाई करून शत्रूंस पळवून लाविलें. मग पठाणपक्षाचें वर्चस्व झालें. अमीरखान राजपुतान्यांत निघून गेला आणि गफूरखान अल्पवयस्क मल्हारराव्याचा पालक होऊन बसला. तदनंतर एकावर एक कारस्थानें सुरू झालीं आणि शेवटीं तुळसाबाई गणराव शहरांत जाऊन राहिली असतां गफूरखानानें तिच्यावर तेथें हल्ला करविला तेव्हां तिला तेथून ही पळावें लागलें आणि गोष्ट अगदी निकरावर येऊन

ठेपली. असें हें जें द्वंद्व माजलें त्याचा शेवट महीदपूरच्या लढाईच्या आदले दिवशीं लागला. तो असा--गफूरखानानें मल्हारराव्यास आपले ताब्यांत घेऊन तुळसाबाईचा शिरच्छेद करविला आणि तिच्या प्रियकरास कैद करून न ठेविलें.

दुसऱ्यादिवशीं महिदपुरास लढाई झाली तींत होळकराच्या सैन्याचा व गफूरखानाचा अगदीं पराभव झाला. परंतु पुढें तारीख ६ जानेवारी १८१८ रोजीं तहनामा झाला, त्यांतल्या बाराव्या कलमांत सुजीत, मल्हारगड, ताल, मुंदावल, जावडा व वरोदें हे महाल, पिपळोद्याची खंडणी व सर्व महालांवरील जकात, इतकें गफूरखानाकडे चालावें असा ठराव झाला. आणखी असें ही ठरलें कीं इतका सर्व मुलुख त्याजकडे वंशापरंपरा चालावा व त्याणें त्याबद्दला ६०० स्वार परमुलखीं चाकरीस पाठविण्या करितां नेहेमी तयार ठेवावे व पुढें ह्या जाहागिरी मुलखाचा वसूल जसा वाढेल तसतसे त्या प्रमाणानें स्वार अधिक ठेवावे.

या प्रमाणें गफूरखानाला जो हा मुलुख मिळाला त्यावर अमीरखान आपला हक्क सांगूं लागला. त्याचें म्हणणें असें होतें कीं गफूरखानाला मी आपल्या तर्फेनें मुक्त्यार नेमून गेलों होतों, याजकरितां इंग्रज सरकारच्या व माझ्या दरम्यान जो तहनामा झाला आहे त्याला अनुसरून हा सर्व मुलुख मला दिला पाहिजे. तेव्हां त्या प्रकरणाचा योग्य विचार करण्या करितां सरकारानें चौकशी सुरू केली, तींत असें दिसून आलें कीं गफूरखान दरबारांत शिरून योग्यतेस चढला तो मूळ अमीरखानाच्या वशील्यानें व आश्रयानें हें खरें ; परंतु त्याला ही जी जाहागीर मिळाली ती तो होळकराच्या राज्याचें रक्षण करण्या करितां प्रतिनिधिमंडळांत होता सबब, आणि तो जरी प्रथम अमीरखानाच्या तर्फेनें म्हणून असला तरी त्याचा तो संबंध सन १८१७ मध्यें लढाई सुरू होण्यापूर्वीच सुटला होता. म्हणून अमीरखानाचा त्या जाहागिरीवर कांहीं हक्क नाहीं असें ठरून गफूरखान पूर्ण मालक झाला.

ह्या प्रमाणें जावडा संस्थानाची स्थापना हिंदूंच्या डोळ्यांनीं इंग्रजां प्रमाणेंच अगदीं परमुलखी दिसणाऱ्या एका धाडशी अफगाणानें आपल्या बाहुबलानें केली.

मंदोसरचा तह झाल्यावर गफूरखान सात वर्षें जिवंत होता. तो

सन १८२९ मध्यें वारला, तेव्हां त्याचा मुलगा नबाब गौस महंमदखान गादीवर बसला. तो अगदीं अल्पवयस्क, सारा दोन वर्षांचा होता. संस्थानाच्या बंदोबस्ताची तजवीज इंग्रज सरकारानें लाविली. हें संस्थान जरी आतां अगदीं स्वतंत्र असल्या सारखें झालें, होळकराशीं त्याचा कांहीं संबंध उरला नाहीं, तरी मूळ जाहागीर त्यांणीं दिलेली ह्मणून नव्या नबाबाला मल्हारराव होळकराकडून वस्त्रें घ्यावीं लागलीं व त्याला दोन लाख रूपये नजराणा द्यावा लागला. ही गोष्ट इंग्रज सरकारचे संमतीनेंच झाली. सरकारानें गफूरखानाच्या थोरल्या बायकोला मुलाची पालन करणारी नेमून तिचा जांवई जहानगीरखान यास तिचा मुक्त्यार नेमिलें व त्यांणीं इंदूर येथील गव्हरनर जनरलाचे एजंटास जाहागिरीच्या उत्पन्नाचा दिशेव देत जावें असें ठराविलें. पुढें दोन वर्षांनीं त्या बाईची नेमणूक रद्द झाली, कारण ती एजंट साहेबाचे सांगण्या प्रमाणें वर्तत नव्हती आणि अव्यवस्था फार झाली. दुसरा ठराव असा झाला कीं गौसमहंमद मेला असतां जाहागीर गफूरखानाच्या भाईबंदांकडे गेली तर मात्र पुरुष व स्त्रिया समान हक्कदार असतील तरी पुरुषासच गादीवर बसवावें.

सन १८२९ मध्यें मंदोसरच्या तहनाम्यांत फेरफार झाला तेव्हां जावड्याच्या नबाबानें चाकरी करितां जी फौज ठेवावयाची ती ५०० स्वार ५०० पायदळ व दोन तोफा इतकी ठेवावी असें ठरलें. परंतु पुढें सन १८४२ मध्यें सरकारानें ही जावड्याची फौज, इंदूरकरांची फौज, व देवासकरांची फौज, अशी सारी एकत्र केली, तेव्हां नबाबानें नक्त पैकाच द्यावा असें ठरलें. नबाब गौसमहंमद बंडाच्या वेळीं सरकारच्या फार उपयोगीं पडला ह्मणून सन १८५९ मध्यें सरकारानें मेहेरबानी* करून ह्या र-

---

* बंडाच्या वेळीं जावड्याच्या नबाबानें जी सरकारची कामगिरी बजाविली ती कांहीं अशी तशी नव्हे. इंग्रजसरकाराला अनेक प्रसंगीं ज्या कित्येक अगदीं तथ्य बातम्या कळल्या त्या मुख्यत्वें ह्या नबाबाच्या द्वारें. होळकराचें सैन्य बंडवाल्यांस सामील झालें ही बातमी माजो सर हेनरी डयूरंड, गव्हरनर जनरलाचे एजंट, यांस नबाबानींच कळविली; आणि ते डयूरंड साहेब जेव्हां सैन्य घेऊन समरांगणीं उभे राहिले तेव्हां त्यांच्या छावणींत जाऊन त्यांनां धैर्यानें व तत्परतेनें सामील झाले असे येवढेच.

कमेंत कांहीं कमी घेण्याचें ठरविलें.

सन १८६५ मध्यें तारीख २९ एप्रिल रोजीं नवाब गौसमहंमद वारला. तेव्हां त्याचा मुलगा महंमद इस्मायलखान ११ वर्षांचा होता, म्हणून गव्हरनर जनरलचे एजंटांनीं शिफारस केल्या प्रमाणें सरकारानें संस्थानचें काम चालवण्या करितां एक प्रतिनिधि मंडळ नेमलें. त्यांत माजी-नवाबाचा मुख्य कामदार हजरत नूरखान ह्मणून होता तो एक, नवाबाच्या घराण्या पैकीं दोन असामी आणि इस्मायलखानाची आई अशीं चार नांवें होतीं ; पैकीं ती बाई नवऱ्याच्या मागून तिसऱ्याच दिवशीं मेली. तेव्हां मुख्य कामदार एकटा आणि नवाबाच्या खाशा मंडळी पैकीं दोघे, असे राहूं दिले तर घरगुती जुने तंटे मात्र पुनः उपस्थित होतील ह्मणून ही जाहागीर होळकर सरकारानें दिलेली, तेव्हां त्याच्या हुकमा प्रमाणें चालावयाची असें बोलून तशी तजवीज ठेवण्याचें ठरलें. त्या प्रमाणें गव्हरनर जनरलाचे एजटास असा हुकूम झाला कीं तरुण नवाबास तुम्ही सरकारचे हुकमानें, परंतु होळकर महाराजांचे नांवानें गादीवर बसवावें व नवाबाकडून होळकरास यजमान ह्मणून पूर्वी प्रमाणें २ लाख रुपये नजर देववावे. या प्रमाणें समारंभ होणार इतक्यांत मध्येंच तंटे उपस्थित झाले. महंमदगौसखानाची वडील स्त्री आपला सावत्र भाऊ टोंकचा नवाब याला भेटावयास गेली होती ती परत आली आणि नवाबाची मी वारसदार, मला गादी मिळाली पाहिजे असें म्हणूं लागली. टोंकचा नवाब ही आला, आणि पूर्वी सन १८१८ मध्यें अमीरखान जसा हक्क सांगत होता तसाच सांगं लागला व शिवाय महंमदइस्मायलखान हा नवाबाचा औरस पुत्र नव्हे असें ही म्हणं लागला.

मग तें सर्व प्रकरण हिंदुस्थान सरकाराकडे विचाराकरितां गेलें. सरकारानें योग्य चौकशी करून त्या उभयतांचा तकरार गैर वाजवी दिसली तेव्हां वर सांगितल्या प्रमाणें त्या मुलास गादीवर बसविण्यास सांगितलें. मग तो समारंभ झाला. त्या समयीं नवाबास इंग्रज सरकारांतून पोषाक देण्यांत आला.

नवाब अल्पवयस्क ह्मणून संस्थानचें काम पाहण्या करितां सरकारानें एक कामदार नेमिला व त्यावर देखरेख करण्याचें काम तेथील पोलिटिकल अम्मलदाराकडे सांगितलें. पुढें सन १८७२ मध्यें नवाब वयांत आ-

ले तेव्हां त्यांस मुक्त्यारी मिळाली.

औरस संततीच्या अभावीं मुसलमानी धर्मशास्त्रा प्रमाणें जो वारस असेल त्यास गादी मिळेल अशी सन १८६२ मध्यें जावड्याचे नबाबास सनद मिळाली आहे

खंड दुसरें समाप्त

खंड ३

बुंदेलखंड

भाग १

रीवा

रीव्याच्या राज्याच्या उत्तरेस अलहाबाद, मिरझापूर प्रांत, ईशान्येस मिरझापूर, आग्नेयीस कोरिया, दक्षिणेस सागर आणि पश्चिमेस मध्यप्रांताचा कांहीं भाग व बुंदेलखंड आहे.

प्राचीनकाळीं कालिंजर ह्मणून जें राज्य होतें त्याचाच हा भाग असावा असें दिसतें. औरंगजेब बादशहाच्या कारकीर्दींत तें मोगलांच्या हातीं जाऊन अलहाबादेला जोडलेलें होतें, परंतु त्यावर मोगलांचा अम्मल फारसा चालला नाहीं; त्यांनां फक्त थोडीशी खंडणी पोंचे.

येथील दरबारांत राजकुलाचा इतिहास लिहून ठेवलेला आहे, त्या वरून पाहिलें असतां बिलगर देव ऊर्फ बिआग देव याणें हें राज्य स्थापिलें असें दिसतें. तो इसवी सन ५८० च्या सुमारास दक्षिणेंतील आपलें संस्थान सोडून यात्रेच्या मिषानें बाहेर पडला ; परंतु त्याचा खरा उद्देश जो प्रदेश निर्बळ, अरक्षित, असा दिसेल तो सहज हातीं सांपडल्यास बळकावावा असा होता. त्या प्रमाणें प्रथम मरफा किल्ला त्याणें आपल्या हातीं घेऊन पुढें कालगी पासून चंदलगड पर्यंत बहुतेक मुलुख हळुहळु काबीज केला. नंतर पिन्होवण येथील राजाच्या कन्येशीं त्याचा विवाह झाला. बिलगर देवानंतर त्याचा पुत्र कर्णदेव ६१५ मध्यें गादीवर बसला. रीव्याच्या राज्याखालीं सांप्रत जो मुलुख आहे तो बहुतेक त्याणें मिळविला व त्याचें नांव बघेलखंड असें ठेविलें. त्याणें मंडळ येथील राजाची कन्या वरिली ; तेव्हां बंधुगड नामक प्रसिद्ध किल्ला आंदण मिळाला, तो त्याणें आपल्या गादीचें स्थान केलें. वर जे शक सन दिले आहेत ते खरे असतील तर कर्णदेव हा महंमद पैगंबर, प्रचंडवायूनें खवळलेला समुद्र आपल्या शब्दसामर्थ्यानें

शांत करणारा क्याडवाल्ले, व द्वितीय खुपरूस जिंकणारा हिराक्लियस, यांच्या काळीं घेऊन गेला असावा. पुढें सन १०९६ मध्यें वल्लरदेव गादीवर बसला. तो मूळ पुरुषा पासून बारावा राजा. तो दिल्लीचा बादशहा तैमूरशहा याच्या फार उपयोगीं पडला म्हणून बादशहानें त्यास कालिंजर किल्ला व मोममोठे किताब दिले असें लिहिलेलें आहे. परंतु हिंदुस्थानचे जे इतिहास उपलब्ध आहेत त्यांत या बादशहाचें नांव कोठें आढळत नाहीं. तो दिल्लीवर स्वारी केलेला तैमूरलिंग म्हणावा तर त्याची पहिली स्वारी सन १३९८ मध्यें झाली. बिरभण देव नामक जो १९ वा राजा तो सन १६०१ मध्यें गादीवर बसला. या वरून पाहतां पांचशें वर्षांत फक्त सात राजे झाले. शीरशहानें हुमायून बादशहास पदच्युत करून हांकलून लाविलें होतें, तेव्हां त्याचे कुटुंबास बिरभण देवानें आश्रय दिला होता असें म्हणतात ; परंतु हुमायुनाचा मरणकाल सन १५५६ आहे*.

मोगल बादशाहीचा ऱ्हास झाला तेव्हां रीव्याचे राजे नांवाला पेशव्यांचे अंकित झाले, परंतु खरें पाहिलें तर ते बहुतेक स्वतंत्रच झाले, आणि सन १८०२ । ३ मध्यें वसईचा तह होण्याला कारण असा जो पेशवाईवर प्रसंग गुदरला, त्यावेळीं तें जें नांवाचें थोडेंसें पारतंत्र्य होतें तें ही गेलें. आपल्या राज्याचें आम्ही संरक्षण करूं अशा अर्थाचें इंग्लिशांनीं राजाजवळ तहाचें बोलणें लाविलें तें याच समयास. परंतु आतां आपलें संरक्षण आपल्यास करतां येईल असेंच बहुधा वाटून राजा जयसिंगदेव याणें त्यांच्याशीं तह करण्याचें नाकारलें आणि खरोखर त्याचें राज्य दंग्याधोप्याच्या मुख्य ठिकाणांपासून अगदीं दूर पडल्यामुळें कांहीं वर्षें पर्यंत त्याला कोणाची पर्वा नव्हती. परंतु तसेंच सुखानें नांदण्याचें सोडून सन १८१२ मध्यें त्याणें थोडें फाजील शहाणपण केलें. त्यावेळीं पेंढारी लुटी करितां इकडून तिकडे हिंडत होते, त्यांच्या एका टोळीला इंग्रजांच्या मिरझापूर प्रांतांत लूट करण्याला फूस देऊन जयसिंगदेवानें त्या कृत्यास मदत ही दिली. पुढें त्याणें असें विनाकारण शत्रुत्व केल्या बद्दल इंग्लिशांची पुरी खात्री झाली तेव्हां त्यांणीं त्याला तहास कबूल हो म्हणून सांगितलें. मग तह झाला

---

* हें विसंगत दिसतें, परंतु १६०१ हा जर विक्रमादित्याचा शक धरला तर नीट जुळतें.

त्यांत असा ठराव झाला कीं इंग्लिशांनीं त्याला रीव्याचा राजा ह्मणून त्याचा मान मरातब व दर्जा कायम राखावा व त्याच्याशीं सख्य ठेऊन त्याचें सरक्षण करावें; त्याणें आपल्या शेजारच्या राजेरजवाड्यांशीं कांहीं तंटे असतील तर ते इंग्रजसरकारच्या मध्यस्थीनें उलगडून घ्यावे; आपल्या मुलखांतून इंग्रजांचें सैन्य जाऊं येऊं द्यावें व मुलखांत उतरूं द्यावें, आणि जे शत्रु, बंडवाले, किंवा गुन्हेगार मुलखांत सांपडतील ते त्यांच्यां स्वाधीन करावे.

जयासिंगदेवानें हा तहनामा मान्य ह्मणून त्यावर सही केली खरी, परंतु तो पाळला नाहीं. उलट सन १८१३ मध्यें इंग्रजांचे शिपायांची टोळी त्याच्या मुलखांतून निघाली त्या पहिल्याच प्रसंगीं त्याणें तिजवर हल्ला केला व त्यांनां अन्नपाणी मिळूं नये अशी ही खटपट केली; परंतु त्याचे ते दोन्ही वेत फसले. अशी त्याणें उघड आगळीक केली तेव्हां त्याचें पारिपत्य केलें पाहिजे ह्मणून सरकारानें फौज रवाना केली. ती जाऊन त्याच्या मुलखांत दाखल झाली मात्र, त्या बराबर तो लढाईचें नांव सोडून मुकाट्यानीं शरण आला. मग जून महिन्यांत दुसरा तहनामा झाला. त्यांत असा ठराव झाला कीं राजानें कोणत्याही पर दरबाराशीं राजकीय प्रकरणीं पत्रव्यवहार ठेऊं नये, आपल्या दरबारीं अखबारनवीस अगर दुसरा एजंट राहू द्यावा, आपल्या साऱ्या मुलखांतून टपालखात्याची व्यवस्था करूं द्यावी व कित्येक मोठमोठे जमीदार लोक इंग्रज सरकाराशीं दुराग्रहाचें किंवा शत्रुत्वाचें वर्तन करीत होते त्यांस शासन करावें किंवा तें करण्यास मदत करावी.

राजा जयासिंगदेव या तहनाम्यास कबूल झाला, परंतु त्याच्या मनांत तो अमलांत आणावयाचा नव्हता आणि त्याला असें वाटलें कीं हा कायतो माझ्या पुरता लागू. ह्मणून त्यांतिल करार अमलांत आणण्या पूर्वीच त्याणें आपला मुलगा विश्वनाथसिंग राज्याचा मालक असें ह्मणून गादी सोडली; परंतु तशानें तो भोळा विचारा राज्यास मात्र मुकला. इंग्रज सरकार तशानें फसतें ! बापानें केलेले सर्व करार मला मान्य आहेत असा विश्वनाथसिंगाजवळ त्याच्या सहीचा कागद ते मागूं लागले. असा करार करण्याला तो अगदीं नाकबूल होता. त्याणें आपल्या हातून झाली तितकी टाळाटाळीची पराकाष्ठा करून पाहिली आणि अगदीं नाइलाज झाला तेव्हां शेवटीं तहनाम्यावर सही केली.

सन १८१४ मध्यें राजा बराबर पुनः तिसरा तहनामा झाला ; तेव्हां सरकारानें पूर्वी त्याच्या कांहीं जमिनी खालसा केल्या होत्या त्या सोडून दिल्या, व त्याच्या आणि त्याच्या पोटजाहागीरदारांच्या दरम्यानच्या कामांत हात घालण्याचा आपला हक्क ही सोडला.

तेथून पुढच्या वीस वर्षांत कांहीं मोठी गोष्ट घडली नाहीं. सन १८३४ मध्यें विश्वनाथसिंग मेला आणि त्याचा मुलगा रघुराजासिंग गादीवर बसला. तेथच्या वंशावळीं प्रमाणें हा मूळ पुरुषा पासून ८२ वा पुरुष होतो. या राज्यांत सती जाण्याचा प्रचार होता तो यानें सन १८४७ मध्यें बंद केला. सन १८५७ मध्यें तो सरकारच्या उपयोगीं पडला ह्मणून सोहागपूर व अमरकंटक हे दोन प्रांत सरकारानें त्यास बक्षिस दिले. रीवा येथें रीजन्सी होती ती काढण्या विषयीं त्यानें विनंती केल्यावरून सरकारानें सन १८६२ मध्यें ती काढली. सन १८६४ च्या आक्टोबर महिन्यांत व्हाईसराय साहेबांनीं त्यास स्टार ऑफ इंडिया हा किताब दिला. पुढच्या वर्षी त्याच्या मुलखांतून दरवडेखोरांच्या टोळ्या जाऊन त्यांणीं आसपासचा मुलुख लुटला ह्मणून सरकारानें त्याला बंदोबस्त राखण्या विषयीं चांगली ताकीद दिली, तेव्हां दरवडेखोरांचा दंगा त्यानें मोडला ; कांहीं असामी धरून कैद ही केले. रीव्याच्या राज्यांतून आगगाडी झाली तेव्हां तिज करितां जी जमीन हवी लागली ती सर्व देऊन त्यानें तिजवरील आपले सर्व राजकीय हक्क सोडून दिले.

आपल्या राज्यव्यवस्थेंत कांहीं फेरफार करण्या करितां त्यानें सन १८६७ मध्यें सरकारची मदत मागितली, परंतु सरकारानें ती देण्याचें नाकारलें. कारण त्याच्या कारभारांत प्रत्यक्ष हात घालून राजा ह्मणून त्याजवर जी जबाबदारी होती ती उडविणें सरकारास योग्य वाटेना. सन १८६८ मध्यें त्यानें मक्त्यानें मामलती देण्याची वहिवाट बंद केली ; आपल्या मुलखांतून जाणाऱ्या येणाऱ्या मालावरील जकात सोडली व रावराजे सर दिनकरराव राजवाडे के. सी. आय. यांस आपले दिवाण नेमिलें.

सन १८७३ मध्यें त्याच्या राणी साहेबांची कोणी बेअदबी केली सबब त्याचा सूड उगविण्या करितां म्हणून महाराजांनीं हत्यारबंद फौज सोहावळ प्रांतांत पाठऊन एका घरावर हल्ला करविला व तें लुटून त्यांतील एक मनुष्य मारविला. या प्रमाणें इंग्रज सरकाराबराबर असलेला तह मो

इला म्हणून त्या गुन्ह्याबद्दल सरकारानें खुद्द महाराजांस १०००० रुपये व त्या स्वारीस जितके त्याच्या पदरचे सरदार सामील होते त्या सर्वांस प्रत्येकास १००० रुपये प्रमाणें दंड केला.

सन १८७९ मध्यें महाराजांनीं सरकारास सांगितलें कीं राज्याचा कारभार आह्मास निभत नाहीं, याज करितां आमचे दिवाणास हाताखालीं घेऊन पोलिटिकल एजंटांनीं सर्व व्यवस्था पहावी. सरकारानें तें ह्मणणें मान्य करून त्याप्रमाणें तजवीज केली. नंतर कांहीं दिवसांनीं आपणास अधिकार परत मिळावा अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली होती, परंतु ती सफल होण्या पूर्वीच त्यांस मृत्युनें गांठलें. नंतर त्यांचा अल्पवयस्क पुत्र गादीवर बसला.

या राज्याचा विस्तार पुष्कळ मोठा आहे. त्याचे कित्येक भाग तर पर्वांपर्यंत कोणी नीट शोधून पाहिलेले देखील नव्हते. यांत मोठ मोठीं जंगलें आहेत व कोळशाच्या खाणी ही आहेत; त्यां पासून पुष्कळ उत्पन्न होण्यासारखें असून तें करून घेणारा कोणी नव्हता आणि कित्येक वर्षांपासून राज्यास कर्जाचें मनस्वी ओझें झालें होतें तें उतरत नाहीं ह्मणून मात्र हाकाटी होती. परंतु आतां ती स्थिति पालटली आहे, कोळशाच्या खाणी सुरू झाल्या आहेत व उत्पन्न पुष्कळ होत आहे.

भाग २

उर्चा ऊर्फ तिऱ्हे

हें संस्थान आग्र्याच्या आग्नेयीस व सागर प्रांताच्या उत्तरेस आहे. सर्व बुंदेल्या संस्थानांत फार प्राचीन व मानानें श्रेष्ठ असून पेशव्यांच्या हातीं गेलें नाहीं असें हें येवढें एकच. असें सांगतात कीं सन १८१८ मध्यें येथील महाराजांनीं गव्हरनर जनरलास नजर दिली तेव्हां ते बोलले दुसऱ्यास श्रेष्ठ ह्मणून त्याच्या पुढें मान वांकविण्याचा आमच्या घराण्यास आजचा हा पहिलाच प्रसंग आहे.

उर्चाच्या राजघराण्याची बखर लिहिलेली आहे, तींत दंतकथा वर्ज्य

अयोध्येचा रघुकुलोत्तंस जो राजा राम त्या पासून ७२ पुरुषांचा इतिहास दिलेला आहे. रामचंद्राचा द्वितीय पुत्र कुश या पासून क्रमानें १६ वा पुरुष गुंगरख नामक झाला त्याणें गयेस कांहीं उत्तम देवालयें बांधिलीं. तसेंच पुढें राजा बलदेवरख नामक विसावा पुरुष झाला, त्याणें प्रयागास देवालयें बांधिलीं ; आणि त्याचा पुत्र इंद्रद्युम्न याणें जगंनाथाचें प्रसिद्ध देवालय बांधलें. पुढें बत्तिसाव्या राजाचा द्वितीय पुत्र रंतसिंग नामक राजा झाला, तो आपला कूटस्थ असें बरगूझा रजपूत मानितात. नंतर कर्मशाय नामक चौंतिसावा राजा झाला, त्याणें काशी प्रांत जिंकून घेतला. पुढें ४६ व्या राजाचा द्वितीय पुत्र केंकुरु याणें हिंदचल पर्वताचे शिखरावर जाऊन तपश्चर्या आरंभिली. तो आपल्या प्राणाचा बळी देण्यास सिद्ध होऊन रक्तपात करतो इतक्यांत ती पर्वतवासिनी देवी संतुष्ट होऊन त्याच्या पुढें प्रकट झाली. त्याच्या रक्ताचा एक बुंद खालीं पडला होता त्यावर अमृतसेचन करून तिणें त्या पासून एक बालक निर्माण केला. तो पुढें वीरसिंग या नांवानें प्रसिद्ध झाला. आपण रक्ताच्या बुंदापासून उत्पन्न झालों याचें स्मरण राहण्या करितां त्याणें आपल्या लोकांचें नांव बुंदेले असें ठेविलें. त्याणें पुढें लौकरच राज्य संपादन केलें, आणि प्रजापालन न्यायानें केलें. पुढें राजा प्रतापरुद्र नामक साठावा पुरुष झाला, त्याणें उर्चा शहर स्थापन करून राज्य पुत्राच्या स्वाधीन केलें ; आणि आपण मोहिमेवर ह्मणून जो गेला तो परत आलाच नाहीं. पुढें मधुकर नामक ६२ वा राजा झाला, तो मोठा बलाढ्य असून केवळ न्यायमूर्ति आणि धर्मावतार होता अशी त्याची कीर्ति आहे. हा अकबर बादशहाच्या वेळीं होता. त्याचा ज्येष्ठ पुत्र रामासा याला अयोध्येचा सुभा सांगून द्वितीय पुत्र नरसिंगदेव यास जहानगीर बादशहानें उर्चाच्या गादीवर बसविलें. कुलपरंपरागत चालत आलेलें पद रामासास न मिळाल्यानें सहजच विषाद वाटणार होता, म्हणून त्याला संतुष्ट करण्या करितां बादशहानें चंदेरी प्रांत दिला. नरसिंगदेवाला बारा पुत्र होते, त्यांपैकीं तिसरा पहारसिंग हा पुढें औरंगजेबा बराबर औरंगाबादेस गेला. तेथें त्याणें एक पुरा वसविला त्याला त्याचें नांव अद्यापि चालत आहे. चौथा पुत्र भगवानदास हा कुरर कुळाचा मूळ पुरुष. चंपतराव ह्मणून ६८ वा राजा झाला. तो शहाजहान बादशहास खंडणी देत नाहीं म्हणाला ह्मणून बादशाही फौजेनें बुंदेलखंडावर दोन वेळ

स्वारी केली ; यामुळें या मुलखाची दुर्दशा उडून यंत अगदीं झोटिंगवा-दशाही झाली ; परंतु उर्वा बादशहाच्या हस्तगत झालें नाहीं, राजा शरण गेला नाहीं, आणि ती फौज परत चालली असतां बुंदेल्यांनीं असा अनर्थ उडवला कीं तीपैकीं थोडेच लोक जिवंत जाऊं दिले. पुढें औरंगजेब आपला बंधु दारा याजवरावर लढूं लागला तेव्हां चंपावतराव औरंगजेबाला सामील झाला. याचा पुत्र छत्रसाल हा तेव्हां सारा तेरा वर्षांचा होता, परंतु त्याणें विनी संभाळली. औरंगजेबाला जो जय आला तो केवळ या पितापुत्रांनां त्या मुलखाची व यमुनेला कोठें उतार आहे, कोठें नाहीं, याची जी उत्कृष्ट माहिती होती ती मिळाली म्हणून, असें सांगतात. परंतु तो दुष्ट यवन हे त्यांचे उपकार लवकरच विसरला--हा तर त्याचा जन्मस्वभावच होता—आणि चंपावतराय मरतांच त्याणें आपलें सैन्य बुंदेलखंडांत पाठविलें आणि बुंदेल्या लोकांनां जबरीनें बाटविण्याची खटपट केली. त्या वेळीं छत्रसाल जयपूरच्या जयसिंग राजाच्या हाताखालीं असून दक्षिणेंत शिवाजीवर स्वारी करण्या करितां त्याजबराबर गेला होता. तेथें शिवाजीचा आणि त्याचा परिचय झाला. पुढें एका भेटींत छत्रपति महाराजांनीं आपल्या जन्मभूमीचें संरक्षण आणि स्वधर्माचें परिपालन करणें हें आपलें खरें कर्तव्य कर्म असें त्याच्या मनांत चांगलें बिंबवून दिलें, आणि मग त्याच्या कंबरेला तलवार बांधून त्याला सांगितलें आतां स्वराज्यांत माघारा जा आणि आपल्या जन्मभूमीची त्या दुष्ट यवनापासून मुक्तना कर, माता भवानी तुला यश देईल. हा गुरूपदेश छत्रसालाच्या हृदयांत ठसला, आणि त्याणें जाऊन औरंगजेब मेल्यावर बुंदेलखंडाचा बराच भाग जिंकला.

या प्रमाणें ह्या संस्थानाचा हा पौराणिक इतिहास आहे ; तथापि इतकें खरें दिसतें कीं दतिया, संपथर, झांशी व रीव्याचा कांहीं भाग, इतका प्रदेश छत्रसालानें जिंकला होता. त्याच्या मरणानंतर दतिया हें एक निराळें संस्थान झालें. तेथचा राजा त्याच्याच वंशांतील पुरुष होता. छत्रसाल अगदीं वृद्ध झाला आणि त्याचे मुलगे अल्पवयस्क होते, अशा समयीं महंमद बंगषानें त्याच्यावर स्वारी केली. तेव्हां त्याणें आपलें संरक्षण करण्याकरितां दक्षिणेंत बाजीराव पेशव्यांस मोठ्या काकुलतीनें निमंत्रण पाठविलें. बाजीरावानें तत्क्षणीं पुण्याहून निघून बंगषाचा आधीं पराभव केला आणि नंतर छत्रसालाची भेट घेतली; तेव्हां त्याणें त्याचे अत्यंत उपकार मानून आ

पल्या पुत्रां बराबर राज्याचा एक विभाग त्यास दिला. (सन १७३९) तें प्रसिद्ध माजी झांशी संस्थान. तिसरा भाग तिऱ्हे. त्याच्या स्वातंत्र्याला केव्हांच भीति उत्पन्न झाली नाहीं. तिऱ्हेची राजधानी उर्चा. छत्रसालानें बहु तेक बुंदेलखंड स्वतंत्र करून सोडलें तेव्हां त्याला सुमार दोन कोट रुपये वसूल येऊं लागला होता, परंतु राज्याचे विभाग झाल्यानें परिणाम वाईट झाला. सन १८३७ मध्यें तिऱ्हेचा वसूल सारा सहा लक्ष आला आणि उत्तरोत्तर त्यांत ही कमीच होत गेला असें झणतात.

तिऱ्हेच्या राजाची आणि इंग्लिशांची अगदीं प्रथम बोल चाल झाली ती सन १८०९ मध्यें. त्यावेळीं राजानें इंग्लिशांनां अशी विनंती केली होती कीं तुम्ही बुंदेलखंडांतील इतर रजपूत राजांशीं सख्य करून वसईच्या तहनाम्यांत त्यांचें संरक्षण करण्याचें ठरविलें त्या प्रमाणें मला ही आपल्या आश्रयास घ्यावें. परंतु त्याची ही विनंती त्या वेळीं मान्य झाली नाहीं. कारण इतःपर राजेरजवाड्यांशीं अगदीं संबंध करावयाचा नाहीं अशी लॉर्ड कॉर्नवॉलीस यांणीं जी एक राज्यपद्धति काढली होती तीच त्याच्या मागून आलेल्या व्हॉइसरायास ही संमत असून तेव्हां तिचें प्राबल्य विशेष होतें, झणून सरकारास तसा तह करतां येईना. परंतु पुढें ज्या एक एक गोष्टी घडत गेल्या त्या पाहून सरकारास त्या कामदारांचा हेका बाजूस ठेवावा लागला. सन १८१२ मध्यें जेव्हां पेंढारी मिरझापुरांत शिरले तेव्हां बुंदेलखंडांतील स्वतंत्र राजांशीं स्नेह जोडून त्यांचें संरक्षण करण्याचें कबूल केलें तर त्यांत आपलें ही पुष्कळ हितच होईल असें सरकारच्या नजरेस चांगलें आलें, तेव्हां त्यांणीं उर्चाचा राजा विक्रमाजित मोलंदर याजशीं तह करण्याचें ठरवून त्याला आपल्या मित्रमंडळींत घेतलें. सरकारानें त्याच्याशीं असा ठराव केला कीं कांहीं एक करभार न घेतां तुझें राज्य तुजकडे व तुझ्या वंशाकडे आम्ही सुरळीत चालवूं आणि त्याचें संरक्षण ही करूं. राजानें आपल्या तर्फे असा करार केला कीं पर राजांशीं किंवा इतर सरदारांशीं माझे जे तंटे बखेडे, हक वगैरे असतील त्यांचा निकाल मी तुमच्या मार्फत करून घेईन ; आपल्या मुलखांतील रस्त्यांचा व घांटांचा बंदोबस्त ठेवीन, त्यां वरून लुटारूंच्या टोळ्या तुमच्या मुलखांत जाऊं देणार नाहीं ; तुमच्या सैन्यास आपल्या मुलखांतून जाण्या येण्यास किंवा त्यांत रहाण्यास हरकत करणार नाहीं.

या पुढें साडेचार वर्षांनीं पेंढाऱ्यांबराबर लढण्या करितां चाललेलें कांहीं सैन्य बराबर घेऊन मार्क्विस ऑफ हेस्टिंग्स तिऱ्हैच्या मुलखांतून निघाले, तेव्हां विक्रमाजित राजानें त्यांच्या भेटीस जाऊन नजरनजराणा दिला. आमच्या कुलास हा संस्कार आजपर्यंत नव्हता असें त्याणें भाषण केलें ह्मणून जें वर सांगितलें आहे तें याच प्रसंगीं.

हा विक्रमाजित राजा सन १८३४ मध्यें वारला. त्याचा एकुलता एक पुत्र त्याच्या पूर्वीच वारला होता, ह्मणून त्याचा बंधु तेजसिंग गादीवर बसला. तो आपल्या चुलत भावाचा मुलगा सूरजनसिंग यास दत्तक घेऊन ठेऊन सन १८४२ मध्यें वारला. परंतु तें धर्मपाळाच्या स्त्रीस न आवडून ती मी दत्तक येणार ह्मणून उठली. तो तंटा इतका माजला कीं तो मोडण्याकरितां इंग्रजसरकारास फौज आणून उभी करावी लागली. शेवटीं सरकारानें सूरजनसिंगासच वारस ठरविलें; शेजारचे जाहागीरदार, सरदार, वगैरे लोकांस ही त्याचा हक्क विशेष बळकट वाटला; सबब त्यास गादीवर व सवून धर्मपाळाच्या राणीला तो वयांत येई पर्यंत त्याचें पालन करणारी नेमिलें. सुरजनसिंग प्रौढ होऊन त्याला मुक्त्यारी मात्र मिळाली, राज्याचा उपभोग घडला नाहीं. तो लौकरच मेला. तेव्हां त्याची स्त्री ताराबाई हिणें मुख्य मुख्य बुंदेले सरदारांचे अनुमतानें आपल्या भाऊबंदापैकींच हमीरसिंग नामक एक मुलगा दत्तक घेतला. तो लहान असल्यामुळें ती पालनकरणारी ह्मणून राज्यकारभार करीत असतां १८५७ चें बंड उद्भवलें, तेव्हां तिणें सरकारास मदत चांगली केली ह्मणून तेरवली प्रांताबद्दल त्यासंस्थानास जी झांशीवाल्यांस ३१०० रुपये खंडणी द्यावी लागत असे ती सरकारानें माफ केली.

या संस्थानाचा बराच भाग अरण्यानें व्यापलेला आहे आणि वस्ती फार पातळ आहे.

हमीरसिंग सन १८७४ मध्यें वारला तेव्हां त्याचा भाऊ महाराज महेंद्र प्रतापसिंग गादीवर बसला.

सन १८४७ मध्यें या राज्यांत सतीजाण्याची वहिवाट बंद झाली.

दतिया

ह्या संस्थानचे राजे हे उर्चाचे भाईबंदच होत. ते सन १७३५

च्या सुमारास विभक्त झाले. परंतु तेव्हां ही ते अगदीं स्वतंत्र झाले नाहीं त, त्यांनां पेशव्यांचें वर्चस्व कबूल करावें लागलें. सन १८०२ मध्यें बाजीरावानें वसईचा तह मान्य केला तेव्हां त्याणें बुंदेलखंडांतील सर्व संस्थानांवरील आपला हक्क इंग्लिशांस दिला, त्यांत दतियावरील त्याचा हक्क इंग्लिशांकडे गेला. ह्मणून सन १८०४ च्या मार्च महिन्यांत पंधराव्या तारखेस त्यांणीं तेथील राव राजा पारिचेत याजबराबर तह करून त्याचें संरक्षण करण्याचें कबूल केलें.

सन १८१७ मध्यें पेशव्यां बराबर लढाई होऊन बाजीराव पदभ्रष्ट झाले, त्या युद्धांत ह्या रावराजानें इंग्लिशांस मनापासून झटून मदत केली म्हणून त्यांणीं त्याला सिंधु नदीच्या पूर्वे कडील प्रदेश बक्षीस दिला, आणि सन १८१८ मध्यें जुलईच्या ३१ व्या तारखेस त्याच्याशीं दुसरा तहनामा केला.

राजा पारिचेत हा सन १८३९ मध्यें वारला. त्याला अपत्य नव्हतें, परंतु एक मुलगा सांपडलेला होता, तोच त्याणें दत्तक घेतला होता, तो गादीवर बसला. त्याचें नांव विजयबहार असें होतें. त्याला गादी मिळं नये, मला मिळावी, म्हणून माजी राजाच्या एका भाईबंदानें तक्रार केली. त्याच्याजवळ राजाचा असा एक जुना लेख होता कीं तो अनपत्य मेला असतां गादीवर वारसा त्याचा. परंतु इंग्रज सरकारानें विजयबहादरास राजाचा वारस म्हणून कबूल केलें होतें, तो त्या मुलखाचें राज्य चांगल्या प्रकारें चालवीत होता व तो गादीवर असावा हें लोकांनां आवडत होतें, म्हणून त्यांणीं त्या भाईबंदाचा हक्क मानला नाहीं.

विजयबहादर सन १८५७ मध्यें वारला, तेव्हां त्याणें दत्तक घेतलेला एक भवानीसिंग व दुसरा त्याचा अनौरस पुत्र अर्जुनसिंग, हे उभयतां आपल्यास गादी मिळावी म्हणून कलह करूं लागले. धर्मशास्त्राप्रमाणें पाहिलें असतां दत्तक पुत्राचा हक्क विशेष मजबूद म्हणून सरकारानें त्यासच वारस ठरविलें. परंतु अर्जुनसिंगास तो अगदीं अन्याय वाटला, व राणी त्याला अनुकूल असून ती ही तसेंच म्हणूं लागली, ह्मणून त्याला दतियांतून काढून लावणें भाग पडलें. पुढें थोड्याच दिवसांनीं राणीनें बंड केलें आणि शिवंदा किल्ला बळकाविला. तेव्हां इंग्रजांची फौज आणावी लागली. तिणें तो घेऊन आंतील शिबंदीस कैद केलें. त्या बंडवाल्यांत जे प्र-

मुख होते त्यांनां जन्मठेपेच्या शिक्षा देऊन सरकारानें चुनारच्या किल्ल्यांत नेऊन टाकलें, आणि राणीवर सक्त पहारा नेमला. पूर्वी सांगितलेल्या त्या भाईबंदानें पुनः सन १८६१ मध्यें आपला हक्क सांगितला ; परंतु सरकारानें तेव्हां ही तो मान्य केला नाहीं.

या राज्यांत सन १८४७ मध्यें सती जाण्याची वहिवाट बंद झाली. दतिया येथें तलवारीचे परज आणि भाल्याचीं फळें उत्तम होतात अशी प्रसिद्धि आहे.

संपथर

ह्या संस्थानाचे मालक गुजर अहीर आहेत. हें छोटेंसें संस्थान सन १७६२ पर्यंत दतियाच्या ताब्यांत होतें, तेव्हां कसें स्वतंत्र झालें या विषयीं पुष्कळ तपास करून ही अद्याप खरी माहिती मिळत नाहीं. दतिया पेशव्यांचें अंकित होतें आणि संपथर आपल्यास स्वतंत्र म्हणवीत होतें, तेव्हां बहुधा असें झालें असावें कीं पानपत येथें पेशव्यांचा पराजय होऊन पुढें कांहीं काळपर्यंत मराठ्यांस जी निर्बलता आली त्या संधीस हें स्वतंत्र झालें असावें. तें आपल्यास नेहेमी स्वतंत्र म्हणवीत असे परंतु मराठ्यांस फार भीत असे ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. सन १८०५ मध्यें हें चांगलेंच दिसून आलें. तेव्हां शिंदेहोळकरांचा पराभव होऊन गेला होता, तरी राजा रणजितसिंग आपल्यास इंग्रजांचा आश्रम मिळावा म्हणून फार झटत होता. त्याच्या म्हणण्यास रुकार पडून तहनाम्याचा मसुदा देखील तयार झाला होता ; इतक्यांत लॉर्ड कार्नवालीस गव्हरनर जनरलाचे कामावर आले. त्यांणीं अगदीं नवीन राज्यपद्धति सुरू केली, त्यामुळें तो तह होण्याचा तितकाच राहिला. पुढें आपल्याला आश्रय मिळावा म्हणून राजा वारंवार विनंती करीतच होता, परंतु सन १८१७ पर्यंत त्याचा हेतु सिद्धीस गेला नाहीं. त्या वर्षी सरकारची राज्यरीति बदलून संस्थानिकां बराबर तह करण्याचें ठरलें तेव्हां तो योग घडून आला ; आणि तारीख १२ नवंबर रोजीं राजाबराबर तह झाला. त्यांत असें ठरलें कीं त्याणें कांहीं स्वारांनिशीं सरकारची नोकरी करावी, सरकारचें हित करण्यास झटावें आणि सरकारानें शत्रूंपासून त्याचें संरक्षण करून त्याजकडे राज्य कायम राखावें.

राजानें ठरावा प्रमाणें लागलेच स्वार पाठविले ते सरकारानें आपल्या लष्करा-च्या मध्य भागांत सामील केलें. त्यांणीं नोकरी चांगली बजाविली.

राजा रणजितसिंग हा इसवी सन १८२७ मध्यें वारला आणि त्याचा मुलगा हिंदुपत गादीवर बसला. तो तेव्हां सारा सहा महिन्यांचा बाळ होता. त्याची आई पालनकर्ती ह्मणून राज्यकारभार करूं लागली. पुढें हिंदुपत मोठा झाला तेव्हां तो वेडा आहे असें दिसून आलें. तथापि त्याचें लग्न झालें आणि त्यास संतति ही झाली. तो वयांत येतांच त्याच्या राणीनें आपल्या पदरच्या ठाकुरांच्या व कामदारांच्या संमतीनें त्याला प्रतिबंधांत ठेऊन कारभार आपल्या हातांत घेतला. आपला मुलगा चतरसिंग ऊर्फ राजा बहादूर वयांत येई पर्यंत आपण काम करावयाचें असें ती तोंडानें म्हणे परंतु सन १८६४ मध्यें तो २१ वर्षांचा झाला, तरी त्याला कांहीं करूं देईना. तेव्हां त्याणें जाऊन पोलिटिकल एजंटाकडे अशी कागाळी सांगितली कीं आई मला राज्य कारभार करूं देत नाहीं तर नाहीं, परंतु आपण सारा पैसा उधळून टाकीत आहे, आणि राज्यांत सारी अव्यवस्था झालेली आहे, याचा विचार झाला पाहिजे. त्याणें आणखी ही एक कागाळी केली, परंतु ती येथें लिहिणें जरूर नाहीं.

या प्रमाणें फिर्याद आली तेव्हां सरकारानें एकदम असा हुकूम केला कीं राजा बहादुरास मुकत्यार करून सर्व अधिकार त्याचे हाती द्यावा ; त्याच्या वेड्या बापास व आईस आलमा तालुक्यांत नेऊन ठेवावें व उभयतां हयात असत पर्यंत सर्व उत्पन्नाचा चौथा हिस्सा त्यांस द्यावा, आणि राजा बहादुरास राज्य चालवण्यास मदत करण्या करितां सहा असामींचें एक कौन्सिल नेमावें. तो हुकूम अमलांत येऊन त्या प्रमाणें सर्व व्यवस्था झाली.

खंड तिसरें समाप्त

खंड ४

पश्चिमहिंदुस्थान

भाग १

बडोदें अथवा गायकवाडाचें राज्य

गायकवाडकुलांत पहिला इतिहासप्रसिद्ध पुरुष दमाजी. हा मराठ्यांमध्यें खंडेराव दाभाडे ह्मणून जो नामांकित सेनापति होऊन गेला त्याच्याजवळ नोकरीस राहिला होता. त्याचा बाप केरोजी हा सेनापतीच्या घरचा अगदीं विश्वासू नोकर होता. दमाजीचें शौर्य, धैर्य, इत्यादि गुण पाहून सेनापतींची त्याजवर मर्जी बसली, आणि त्यांणीं त्याला वाढवीत वाढवीत अखेर शाहूमहाराजांकडून समशेर बहादर असा किताब व वस्त्रें देविलीं, आणि सरनोबतीच्या पदावर नेमविलें. तो बाळापूरच्या लढाईंत लौकिकास चढला. पुढें सन १८२० मध्यें दमाजी वारला तेव्हां त्याचा पुतण्या पिलाजी यास तो अधिकार प्राप्त ह्माला. पिलाजी ही बुद्धिमान आणि हिम्मतदार सरदार होता. दमाजीच्या पाठीमागून थोडयाच महिन्यांनीं त्याचा पुरस्कर्ता सेनापति खंडेराव वारला व त्याचा मुलगा त्रिंबकराव तत्स्थानापन्न ह्माला.

पुढें सन १७२९ मध्यें बाजीराव पेशव्यांनीं गुजराथचा सुभेदार सरबुलंदखान याजपासून गुजराथ प्रांताची चौथ व आणखी कांहीं हक्क संपादून सनदा करून घेतल्या आणि त्या मुलखास उपद्रव देणारे लोकांत मराठ्यांच्या प्रजेस सामील होऊं देणार नाहीं असा करार केला. यांत जरी त्रिंबकराव दाभाडे किंवा पिलाजी गायकवाड यांचें नांव नव्हतें, तरी सारा रोख त्यांच्यावर होता, ह्मणून त्यांनां विषाद वाटला ; व बाजीरावानें आपले हक्क बुडविले असें वाटून त्याणें नवीन संपादलेले हक्क सुरळीत चालूं देऊं नयेत ह्मणून त्रिंबकरावानें गुजराथेंतील इतर सरदार सामील करून घेऊन बाजीरावाशीं वैर मांडले. त्यांचा द्वेष पुष्कळच वाढून अखेर सन १७३१

मध्यें बडोद्यांजवळ डभई येथें उभयतांचें तुंबळ युद्ध होऊन सेनापति ठार झाला. तेव्हां बाजीरावानें त्याचा मुलगा यशवंतराव यास सेनापति पदाचीं वस्त्रें देवविलीं आणि तो लहान ह्मणून सर्व कारभार त्रिंबकजीची स्त्री उमाबाई हिणें चालवावा असें ठरवून पिलाजीस सेनापतीचा मुताल्लिक नेमविलें ; आणि त्याला आपल्या पदरीं नोकरीस ठेऊन घेऊन सरदारी सांगितली. तेव्हां पासून गायकवाड पेशव्यांचे नोकर झाले. नंतर पिलाजीस सेनाखासखेल असा किताब मिळाला. परंतु त्या पुढें तो फार दिवस जगला नाहीं. सरबुलंदखानाच्या जागीं जोधपूरचा राजा अभयसिंग गुजराथचा सुभेदार होऊन आला, त्याणें सन १७३२ मध्यें मारेकरी घालून पिलाजीचा खून करविला.

पिलाजीच्या पश्चात त्याचा पुत्र दमाजी यास सरदारीचीं वस्त्रें मिळालीं. परंतु त्या वेळीं जी एक गोष्ट घडली तिच्या योगानें गायकवाडांस आपल्या प्रभूस डाव्या हातानें मुजरा करण्याचा अधिकार आला. तो प्रकार असा — पिलाजी मरून कांहीं काळ लोटला तरी दमाजीच्या नांवानें सरदारी होईना, ह्मणून साशंकित होऊन त्याणें फौज जमा केली. ती घेऊन तो दक्षिणेंत शाहूमहाराजांकडे पितृपदाचा अधिकार मागण्याकरितां गेला. तेव्हां शाहूनें त्याच्या हातावर हात देऊन तुझ्या इछेप्रमाणें काम होईल असें वचन दिलें, आणि फौजेस फांटा द्यावयास सांगितलें. त्या प्रमाणें त्याणें सैन्य घालविलें आणि मग शाहूनें पेशव्याकडून त्याच्या गोटावर हल्ला करवून गोट लुटविला. तेव्हां दमाजीला मोठा संताप येऊन त्याणें लागलीच अशी शपथ वाहिली कीं माझ्या हातावर हात देऊन मजशीं धन्यानें असा बेमानपणा केला त्या पेक्षां त्या हातानें त्याला कधीं मुजरा करणार नाहीं.

दमाजीला सरदारी मिळाल्यावर थोड्याच दिवसांनीं त्याणें आपल्या बापाला मारणाराचा सूड उगविण्याचा निश्चय केला आणि आपला चुलता महादजी गायकवाड यास समागमें घेऊन बडोद्यांवर हल्ला करून तें घेतलें. तेव्हां जें गायकवाडांचें तेथें ठाणें पडलें तें अद्याप कायम आहे. मग त्याणें गुजराथेंतील पूर्वेकडील पुष्कळ परगणे घेऊन शेवटीं जोधपुरापर्यंत मोर्चे नेऊन भिडविले. तेव्हां अभयसिंग भयभीत होऊन अमदाबादचा सु-

भा आपल्या मुतालिकाच्या स्वाधीन करून तिकडे घर संभाळण्याकरितां धांवला.

पुढें यशवंतराव दाभाडा वयांत आला, तेव्हां त्याणें आपलें सेनापतिपद संभाळावयाचें, परंतु तो बाहेरख्यालीं, अतिशय दुर्व्यसनी, निघाल्यामुळें येवढ्या मोठ्या अधिकारास नालायक ठरला ; आणि दमाजी त्याचा मुतालिक म्हणून जो काम करीत होता तोच या जागीं कायम झाला. या प्रमाणें दाभाड्यांचें सेनापतित्व गायकवाडांच्या घरांत गेलें. पुढें ताराबाईच्या मनांत आपला नातू सातारचा राजा असतां त्याला नानासाहेब पेशवा जो अगदीं बंदा असल्या सारखा वागवीत होता, त्याची मुक्तता करून त्याला आपल्या हातांत घ्यावें असें येऊन तिणें दमाजीस अनुकूल करून घेतलें. तिचा डाव साधला नाहींच, परंतु बाजीरावाला हें कळून त्याणें कपटानें दमाजीस पकडलें, आणि गुजराथच्या खंडणी बद्दल त्याच्याकडे १५ लक्ष रुपये बाकी राहिली होती, म्हणून त्याणे जिंकलेल्या मुलखापैकीं अर्धा, व पुढें जिंकील त्यांतला अर्धा देण्याचें जेव्हां कबूल केलें, तेव्हां त्याला सोडून दिलें. त्याच्या पुढच्या वर्षी दमाजीनें आपण जिंकलेल्या काठेवाडांतील मुलखापैकीं अर्धा पेशव्यास दिला, आणि जेव्हां आपल्यास कारण पडेल तेव्हां फौज घेऊन मदतीस येईन असें कबूल केलें. त्या प्रमाणें पुढें तो राघोबादादा गुजराथ जिंकण्याकरितां गेला, तेव्हां त्याच्या बराबर गेला. सन १७५५ मध्यें त्या उभयतांनीं मिळून अमदाबाद सर केली, आणि तें शहर व मुलूख सारखा वांटून घेतला. तेव्हां पासून गुजराथेंत मोगलांचें पाऊल पुनः पडलें नाहीं.

या प्रमाणें राज्य स्थापन झाल्यावर दमाजी त्याची व्यवस्था करण्यास लागला. इतक्यांत हिंदुस्थानची थोरली मोहीम ठरली, तेव्हां तो आपलें सैन्य घेऊन सदाशिवराव भाऊ बराबर गेला. पानपतच्या घोर संग्रामांतून जे निभाऊन आले त्यांत तो ही प्राण घेऊन गुजराथेंत येऊन पोहोंचला. त्याच्या राज्याची स्थापना नुकतीच झालेली होती, आणि इतरां प्रमाणें पानपतच्या लढाईनें त्याचें नुकसान ही फार झालें, म्हणून तो पुनः त्याचा बंदोबस्त करण्याच्या कामास लागला. परंतु दुर्दैव कोठें सुख भोगूं देतें ! बाळाजीबाजीराव वारून माधवराव पेशवे झाले तें राघोबादादास सहन झालें नाहीं; आपल्यास गादी मिळावी असा हेतु धरून त्याणें बंड केलें. ते-

व्हां दमाजीनें त्याला अनुकूल होऊन आपला पुत्र गोविंदराव याजबराबर पुष्कळ सैन्य देऊन त्याच्या मदतीस पाठविलें. त्या मोहिमेंत जरी एकादी मोठी लढाई झाली नाहीं तरी राघोबाच्या पक्षाचा मोड झाला आणि माधवरावानें गायकवाडास शिक्षा झाली पाहिजे, म्हणून त्याच्यावर वर्षास सवा लाख रुपये खंडणी बसविली, व त्याणें बारमहाच्या नोकरीस ३००० स्वार पाठवावे व लढाईचा वगैरे मोकदमा असेल तेव्हां ४००० पाठवावे असा ठराव केला. शिवाय पेशव्यांकडे कांहीं मुलुख होता, तो घेऊन त्या बदल सालिना २५४००० रुपये गायकवाडानें देण्याचें कबूल केलें. असे त्या वर एकंदर ७७९००० रुपये बसले. हा ठराव सन १७६८ मध्यें झाला, आणि पुढें त्याचवर्षी दमाजी मेला.

दमाजीला चार मुलगे होते. सयाजी सर्वांत वडील हा दुसऱ्या बायकोचा, गोविंदराव त्याच्याहून लहान. परंतु तो पहिल्या बायकोचा आणि मानाजी व फत्तेसिंग हे तिसऱ्या बायकोचे होते. दमाजी वारला तेव्हां गोविंदराव पुण्यांत होता, त्याणें माधवराव पेशव्यांस पुष्कळ नजराणा भरून दमाजी बराबर पूर्वी जे जे ठराव झाले होते ते सर्व मान्य केले. सन १७६८ मध्यें त्याच्या वरावर जो तहनामा झाला होता, त्यावर सही होणें राहिली होती, तो आपण मान्य करून पुरा करून दिला, आणि सरदारींचीं वस्त्रें व सेनाखासखेल हें पितृपद मिळविलें. नंतर सन १७७१ मध्यें फत्तेसिंग पुण्यास गेला आणि ज्येष्ठ बंधु सयाजी यास वस्त्रें मिळावीं म्हणून खटपट करूं लागला. सयाजी वेडा, राज्य करण्याला लायक नव्हता, तरी फत्तेसिंगाच्या मेहेनतीस यश आलें. कारण गायकवाड हे गुजराथेत बलाढ्य होऊन बसले होते, म्हणून त्यांनां हलके करावें असें माधवरावाचे मनांत आलें, त्याला हा गृहकलह आयता उपयोगीं पडला. सयाजी वडील सबब तोच गादीस वारस असें ठरवून त्याणें त्याच्या नांवानें वस्त्रें दिलीं, आणि तो वेडा सबब फत्तेसिंगास त्याचा प्रतिनिधि म्हणून सर्व कारभार पहावया स सांगितलें. त्या मुळें फत्तेसिंगाचें आणि गोविंदरावाचें अगदीं हाडवैर पडलें.

या प्रमाणें फत्तेसिंग बडोद्यांचा खरा अधिकारी होऊन बसला व माधवरावाचें राजकारण त्याचे लक्षांत आलें, म्हणून तो कदाचित पुनः गोविंदरावास अधिकार देईल या भीतीनें आपल्या बाजूस विशेष बळकटी अ-

साक्षी ह्मणून त्याणें कसा ही प्रसंग आला तरी परस्परांनीं एकमेकांस साहा-
य्य करावें अशा प्रकारचा तह करावा असें सन १७७२ मध्यें इंग्रजांशीं
बोलणें सुरू केलें. परंतु मुंबईच्या गव्हरनरास तसा तह करण्याचा आधि-
कार नव्हता ह्मणून तेव्हां तह झाला नाहीं. तथापि पुढच्या वर्षी जानेवारी
महिन्यांतच त्याचा हेतु सिद्धीस गेला. सन १७७२ च्या नवंबर महिन्यां-
त इंग्रजांनीं भडोजच्या नवाबा बराबर भांडून तारीख १८ रोजीं हल्ला क-
रून शहर घेतलें होतें. तेथच्या वसुलांत जो गायकवाडांचा हिस्सा होता,
तो त्यांचा त्यांस पूर्ववत देण्याचें या तहनाम्यांत इंग्रजांनीं कबूल केलें.

पुढें लौकरच नारायणराव पेशव्यांचा खून होऊन पेशवाईची सत्ता
किंचित् कालपर्यंत राघोबादादाच्या हातांत आली, तितक्यांत त्याणें गोवि-
दराव गायकवाडास वस्त्रें देऊन बडोद्यांच्या गादीवर बसविलें. या गोष्टीला
फार दिवस झाले नाहींत, तों पुण्यांतील कारभारीमंडळीनें गर्भवासी सवा-
ई माधवराव यांच्या नांवानें राज्य चालविण्यास सुरवात करून राघोबास ध
रण्या करितां फौज पाठविली. तो गुजराथेंत पळत सुटला, तेव्हां गोविंद-
रावानें पूर्व उपकार स्मरून त्याला साहाय्य केलें. तसें फत्तेसिंगानें अपका-
र स्मरून वैर साधलें. तो कारभारी मंडळीला पूर्ण अनुकूल होता. त्याला
आपल्याकडे वळवावें ह्मणून राघोबाला इंग्रजांकडून मदत पोहोंचल्यावर
त्याणें पुष्कळ इलाज केला, परंतु प्रथम तो वळला नाहीं. पुढें इंग्रजी फौ-
जेनें थोडीशी लढाई करून जय मिळविला, तेव्हां राघोबाचा आणि फत्ते-
सिंगाचा तह ठरला, त्यांत असा करार झाला कीं फत्तेसिंगानें राघोबाला
फौज व पैसा पुरवावा, आणि आपण बडोद्याचें राज्य करावें व गोविंदरावा-
ला राघोबानें दक्षिणेंत एक जाहागीर देऊन त्याची समजूत करावी. इंग्रज
सरकारानें हा तहनामा अमलांत येण्यास आपण जामीन होऊन तेवढ्याब-
द्दल भडोजच्या उत्पन्ना पैकीं गायकवाडांचा जो हिस्सा त्यांस द्यावा लागत
असे, तो आपल्यास माफ असावा व कांहीं गांव शिवाय कायमचे मिळावे
असा करार करून घतला. हा तहनामा अमलांत यावयाचा, परंतु इतक्यां-
त गव्हरनर जनरलाकडून मुंबई सरकारास असा हुकूम आला कीं तुम्ही
राघोबाला मदत देऊं नये, आणि युद्ध करूं नये ; त्यामुळें तो तितकाच
राहून इकडे पुण्याच्या कारभारी मंडळीबराबर कर्नल अप्टन मार्फत पुरंदर
चा तहनामा झाला. त्यांत एक कलम असें होतें कीं फत्तेसिंगानें जर कां-

हीं मुलुख दिला असेल आणि पेशवे सरकारचे मंजुरीशिवाय त्याला तो देण्याला अधिकार नाहीं, असें शाबीत होईल तर तो त्याचा त्यास परत दिला पाहिजे. असें कलम घालण्यांत कारभारी मंडळीचा उद्देश इतकाच होता कीं फत्तेसिंगाकडून आपण कांहीं स्वतंत्र नव्हे, पेशव्यांचे ताबेदार आहों, इतके सहज कबूल करवावयाचें. त्या प्रमाणें होऊन सन १७७८ च्या फेब्रुआरी महिन्यांत त्याच्याकडून खंडणीची बाकी चुकती करून घेऊन प्रधान मंडळीनें त्याला पुनः पूर्ववत सेनाखासखेल केलें.

पुढें पेशव्यांची आणि इंग्रजांची लढाई होऊन त्यांना वडगांवचा जो फार लाजिरवाणा तह कबूल करावा लागला, तेव्हांपासून ते मराठ्यांना हरतऱ्हेनें बलहीन करण्याची संधी साधण्यास अगदीं टपून बसले होते. त्यांणीं असा बेत केला कीं गायकवाडाबराबर तह करून त्याला स्वतंत्र म्हणून पेशव्यांचा आणि त्याचा संबंध तोडून टाकावा आणि गुजराथेंत जो पेशव्यांच्या हिश्शाचा मुलुख आहे, तो आपण जिंकून घ्यावा. त्यांचा जनरल गोदर्ड गुजराथेंत मोहिमेवर गेला होता. त्याणें थोडा बहूत जय मिळवून वर सांगितल्या प्रकारचा तारीख २६ जानेवारी सन १७८० रोजीं फत्तेसिंगाबराबर तह केला. त्यांत असें ठरलें कीं उभयतांनीं स्वसंरक्षणार्थ एक मेकांस साहाय्य करावें, आणि पर मुलुख जिंकण्यास ही मदत करावी; महीनदीच्या उत्तरेकडील पेशव्यांचा मुलुख फत्तेसिंगानें घ्यावा ; तापीच्या दक्षिणेकडील आपला मुलुख, अष्टाविशी महाल, भडोजचा व त्याच्या जवळच्या गांवांचा वसूल आणि नर्मदेच्या कांठचा सिनोर महाल इंग्लिशांस द्यावा, व त्यांजकडे ३००० स्वार मदतीस पाठवावे आणि पेशव्यांनां खंडणी देण्याची बंद करावी. हा तहनामा मुख्य बंगाल सरकारास बहुतेक मान्य झाला, परंतु त्यांतील शब्दांत फेरफार करावा असें वाटलें. त्या प्रमाणें फेरफार करून त्यांणीं नवीन प्रती तयार केल्या आणि त्यांवर कौन्सिलदारांच्या सह्या व सरकारचें शिक्कामोर्तब करून फत्तेसिंगाकडे देण्याकरितां त्या मुंबई सरकाराकडे रवाना केल्या. परंतु हा फेरफार केलेला त्याला अगदीं कळविला नाहीं. ही लबाडी पुढें केव्हां दृष्टोत्पत्तीस येऊन वाद व्हावयाचा, परंतु सन १७८२ मध्यें पेशवे व इंग्रज यांच्या दरम्यान सालबाईचा तह होऊन हा तहनामा रद्द झाला त्यामुळें तसा प्रसंग आला नाहीं. सालबाईच्या तहांत असें ठरलें कीं लढाईपूर्वी गायकवाडाकडे मुलुख होता त-

साच राहूं द्यावा आणि फत्तेसिंगानें पेशव्यांस पूर्वींप्रमाणें खंडणी द्यावी, परंतु त्याजकडे मागची कांहीं बाकी असेल तर तेवढी त्यांणीं माफ करावी. याप्रमाणें फत्तेसिंग इंग्रजांच्या व पेशव्यांच्या मध्यें सांपडला होता, परंतु त्याचें कांहीं नुकसान किंवा अप्रतिष्ठा न होतां पार पडला. त्याणें एकंदर अठरा वर्षें राज्यकारभार केला, तो एकंदरींत बराच सहाणपणानें व हुशारीनें केला. तो सन १७८९ मध्यें दिसेंबरच्या २१ व्या तारखेस आपल्या वाड्याच्या दुमजल्यावरून खिडकींतून पडून मेला.

फत्तेसिंगाचा बंधु मानाजी याणें तो मरतांच ज्येष्ठ बंधु वेडा सयाजी यास आपल्या ताब्यांत घेऊन कारभार करण्यास सुरवात केली. फत्तेसिंगाची फत्ते झाल्यापासून गोविंदराव त्रासून पुण्याजवळ एका खेड्यांत जाऊन राहिला होता ; त्याला हें वर्तमान कळतांच आतां तरी मला अधिकार मिळावा अशी त्याणें पेशव्यांच्या दरबारीं जाऊन विनंती केली. त्याचा हक्क खरा होता, परंतु मानाजीनें जाऊन ३३१३००१ तेतीस लक्ष तेरा हजार आणि वर एक, इतके रुपये नजर दिली, आणि फत्तेसिंगाकडे छत्तीस लाख रुपये बाकी येणें राहिली होती, ती ही देण्याचें कबूल करून वस्त्रें नेलीं. परंतु मग महादजी शिंद्यानें गोविंदरावाचा पक्ष उचलला आणि पहिला ठराव रद्द करून त्याला अधिकार देवविला. तेव्हां मानाजी इंग्रजांकडे गेला आणि सन १७८० चे तहनाम्या प्रमाणें मला मदत करा म्हणूं लागला. सालबाईच्या तहनाम्यानें तो रद्द झाला, सबब आतां मदत देतां येत नाहीं, असें त्यांणीं सांगितलें ; परंतु उभयतां बंधूंचें सख्य होण्याचा विचार सांगितला. तो गोविंदरावाला रुचला नाहीं. पुढें सन १७९३ च्या अगष्ट महिन्यांत मानाजी वारलाच, तेव्हां या भाईबंदी तंट्याचा शेवटच झाला. गोविंदरावाला कोणी प्रतिस्पर्धी उरला नाहीं, तेव्हां पेशव्यांनां पुष्कळ नजराणा, तापीच्या दक्षिणेकडील गायकवाडी मुलुख व सुरतेच्या जकाती पैकीं आपला हिस्सा देण्याचें कबूल करून त्या प्रमाणें कागद करून देऊम दिसेंबरच्या १९ व्या तारखेस तो कारभार करूं लागला. पुढें गायकवाडाकडून असा मुलुख घेणें हें सालबाईच्या तहास सुटून आहे, अशी इंग्रजांनीं तक्रार केल्यामुळें पेशव्यांनीं तो मुलुख घेतला नाहीं.

या प्रमाणें गोविंदराव बडोद्याचें राज्य चालवूं लागल्यावर थोड्यावर्षांनीं आबाशेलूकराचा आणि त्याचा तंटा सुरू झाला. शेलूकर हा पेशव्यां-

चा अमदाबाद येथील सुभेदार होता, तो गायकवाडांच्या अमलांतील गांवाच र खंडणी बसवूं लागला, हें मूळ तंट्यास कारण ; त्यांत तो नानाफडणिसाच्या पक्षाचा होता, म्हणून बाजीरावानें गोविंदरावास भर देऊन कलह माजविला. त्या दोघांचें युद्ध बरेंच जुंपलें, इतक्यांत सन १७९९ मध्यें सुरतेचा नबाब वारला. तेव्हां गव्हरनर जनरलाचे हुकमावरून मुंबईचे गव्हरनर मिस्टर डंकन नबाबाचें राज्य ताब्यांत घ्यावें व त्याच्या भावाला नेमणूक ठरवून द्यावी आणि त्याचें बेदावे पत्र घ्यावें असा विचार करण्या करितां सुरतेस गेले. त्यांनां भेटून शेलूकराबराबर लढण्यास मदत मिळेल तर पहावें म्हणून खटपट करण्याकरितां गोविंदरावानें आपले वकील तेथें पाठविले. ती संधी साधून डंकन साहेबानें असें बोलणें लाविलें कीं सुरतेंत आपला जो चौथाई हक्क आहे, तेवढा आम्हाला माफ करावा आणि सुरतेला लागून जो आपला चौऱ्याशी महाल आहे तेवढा द्यावा. येवढें मान्य केलें असतां आपल्याला मदत पाहिजे आहे, ती इंग्रजांकडून मिळेल, या आशेनें गोविंदरावानें कबूल होऊन म्हटलें पेशव्यांकडून दुमाले पत्रें मिळाल्या वांचून आमची ही देणगी चालणार नाहीं ; याजकरितां तुम्ही तेवढीं आणा म्हणजे आम्हांकडून उशीर नाहीं. त्याची अशी कबुली झाली, परंतु गव्हनर साहेबांनीं त्याला मदत पाहिजे होती, ती देण्याचें मात्र कबूल केलें नाहीं. परंतु तितक्यांतच गोविंदरावानें अमदाबादेवर जो हल्ला केला तो चांगला साधून शहर स्वाधीन झालें, व आबा शेलूकर कैद झाला ; तेव्हां त्यांच्या मदतीची जरूर राहिली नाहीं. गोविंदरावाला हा जय मिळाला, तेव्हां बाजीरावानें दरसाल पांच लाख रुपये घेण्याचें ठरवून गुजराथेंतील आपल्या हिश्शाचा पांच वर्षें पर्यंत त्यालाच मक्ता देऊन टाकला. परंतु त्या प्रमाणें करारपत्र होण्यापूर्वीं एक महिना गोविंदराव गायकवाड वारले. (सन १८०० सप्टेंबर .)

गोविंदरावाला अकरा मुलगे होते, त्यां पैकीं चौघे औरस होते ; त्यांतला वडील आनंदराव, तो गादीवर बसला, ; परंतु तो बुद्धिहीन, राज्य करण्याला नालायक होता, त्या मुळें आपल्या हातीं कारभार यावा, अशी इच्छा धरून अनेक असामींनीं कारस्थानें मांडलीं. गोविंदरावाच्या अनौरस पुत्रांत वडील कान्होजी हा मोठा दंगेखोर म्हणून बाप जिवंत असतांच कैदेंत पडला होता, तो तो मेल्यावर सुटून प्रथम आनंदरावाचा मुख्य दिवा-

ण होऊन बसला, आणि मग गादी कावूं पहात होता, परंतु तें साधलें नाहीं. रावजी आपाजी म्हणून गोविंदरावाच्या वेळचा मुख्य दिवाण होता, त्याच्या पक्षाला पुष्कळच लोक मिळाले, आणि त्याणें कान्होजी पासून शिक्का मोर्तबें हिसकाऊन घेतलीं. मग दोनही पक्षांनीं आपल्यास मदत मिळावी म्हणून मुंबई सरकारास विनंती केली, त्राणि युद्धावर येऊन ठेपलें. दोन्ही पक्षांची तयारी बरीच होती. रावजी आपाजीचा भाऊ गुजराथी रिसाल्याचा मुख्य होता, तो त्याला सामील होताच ; शिवाय सात हजार आरब शहरशिबंदींत होते ते ही त्यालाच अनुकूल होते. कान्होजीच्या बाजूस गोविंदरावाचा चुलत बंधु मल्हारराव होता. गोविंदरावाचा आणि फत्तेसिंगाचा कलह चालला होता, तेव्हां मल्हाररावाचा बाप गोविंदरावास होईल तितकी मदत करीत होता ; असें असतां पुढें गादी मिळाली, तेव्हां गोविंदराव ते उपकार विसरला, त्याणें आपल्यास ओळखिलें नाहीं, हा मल्हाररावाच्या पोटांत रोष होता. तो जात्या शूर, बुद्धिमान, आणि धाडसी होता. लढाई करावयाची झटली कीं आरंभींच खूप धामधूम उडवून दिली पाहिजे, तेव्हां सईल सोडून उपयोगीं नाहीं, असें त्याचें म्हणणें असे ; त्या प्रमाणें त्याणें शहरावर असा जोरानें हल्ला करून गर्दी उसळून दिली, कीं बडोद्यांतले मोठमोठे सरदार वगैरे सारे घाबरून गेले.

हें प्रकरण इतक्या पल्ल्यास येण्याची मुंबईसरकार वाटच पहात बसलें होतें. आपण ह्या तंट्यांत पडून रावजी आपाजीस चांगली मदत द्यावी, असें गव्हरनरानें गव्हरनर जनरलास पूर्वीच लिहून पाठविलें, परंतु त्या जकडून कांहीं उत्तर येईना, तेव्हां पंचाईत पडली. त्याला आपल्या मना प्रमाणें वागतां येईना, तरी त्याणें रावजीस मदत देण्या करितां मेजर वॉकर यास १६०० लोक बराबर देऊन पाठविलें. त्याला हुकूम मात्र असा दिला होता, कीं प्रथम होईल तितकें सामोपचारानें प्रकरण मिटवावें, नाहीं तर शेवटीं बाबाजीकडे मिळावें. मग मेजर वॉकर आणि बाबाजी मिळून मल्हाररावावर चाल करून निघाले ; तेव्हां त्याणें भिऊन पळतो अशी हूल दाखवून त्यांनां मोहांत पाडलें, आणि अकस्मात् उलटून खूप नाश केला ; परंतु अखेर त्या दोघांनीं त्याला हटवून लाविलें. पुढें थोड्याच दिवसांनीं असें नजरेस आलें, कीं मल्हाररावानें बाबाजीच्या सैन्यांतील बरेच लोक फितूर केलेले आहेत. तेव्हां मात्र मेजर वॉकर चिंताग्रस्त झाला ; कारण

पुढच्या बाजूस प्रत्यक्ष शत्रु होताच, पण आपल्याच छावणींत हे गुप्त शत्रु उत्पन्न झाले. परंतु त्याच्या सुदैवाने मल्हाररावाचे सारे बेत तेवढ्यांत सिद्ध झालेले नव्हते, आणि त्याला आणखी मुंबईहून कुमक आणाविण्यास अवकाश सांपडला. नवी फौज तारीख २९ एप्रिल सन १८०१ रोजीं येऊन पोहोंचली, आणि दुस. याच दिवशीं त्याणें मल्हाररावाच्या छावणीवर हल्ला केला. त्यावेळेस मोठें तुंबळ युद्ध झालें ; सैन्य फार खराब झालें, आणि छावणी हातीं आली. पुढें लौकरच मल्हारराव स्वाधीन झाला. तेव्हां सरकारानें त्याला नडीयाद शहर राहावयास देऊन सालिना सवालक्ष रुपये नेमणूक करून दिली, व नीट वागलास तर पुढें ज्यास्ती देऊं असें वचन दिलें ; आणि कान्होजीस कैद करून बडोद्यांतच अटकेंत टाकलें. मग सरकारानें जे ठराव केले, त्यांवरून राजेरजवाड्यांशीं कोणत्या प्रकारें वागण्याचा तेव्हां उद्देश होता, तो स्पष्ट दिसून येतो. तारीख २९ जुलै सन १८०२ रोजीं उभय सरकारांचा तहनामा झाला, त्यांत असें ठरलें कीं गायकवाडानें इंग्रजांचे ३००० शिपाई व तोफखान्याकडील एक गोरी पलटण आपले चाकरीस ठेऊन घ्यावी, आणि सुरतेवरील चौथाई हक्क व चौथ्याशी परगणा सरकारास द्यावा. रावजी आपाजी बराबर खासगी ठराव झाला, त्यांत सरकारानें त्याजकडेच दिवाणगिरी कायम ठेवण्याचें व त्याचें, त्याचा मुलगा, भाऊ, पुतण्ये, आप्त, इष्ठ वगैरे मंडळीचें संरक्षण करण्याचा करार केला. त्याचवेळेस गायकवाडाचे दरबारीं पोलिटिकल रेसिडेंटाची नेमणूक झाली. गायकवाडाबराबर झालेले हे सर्व ठराव आपल्यास मान्य आहेत, असें वसईच्या तहनाम्यांत चौदावे कलमीं बाजीरावाकडून इंग्रिलशांनीं लिहून घेतलें.

गायकवाडाच्या पदरीं जे आरब लोक चाकरीस होते, त्यांनां कमी करण्याला इंग्रजांनीं मदत करावी असें सन १८०२ च्या तहनाम्यांत एक कलम* होतें, परंतु त्या कलमाला हात घालण्यापूर्वी सरकारानें जे थोडे

---

* हा जो तहनामा झाला, त्याणें गायकवाडाच्या राज्यांत इंग्रजांनां हवी तशी ढवळाढवळ करण्याचा अधिकारच मिळाला. ह्या तहनाम्याच्या वेळीं बडोद्यांत राज्यव्यवस्था कशी ती नव्हतीच ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. आनंदरावाचा अम्मल कान्होजी ही चालूं देत नव्हता, आणि

बंडखोर अद्याप शिल्लक होते, त्यांचा बंदोबस्त केला ; मग राज्याच्या जमाबंदीचा जो अगदीं सारा घोटाळा होता, तो मोडण्याचें काम झपाट्यानें सुरू केलें. तेव्हां आतां आपल्यावर ही पाळी आल्यावांचून रहात नाहीं. असें समजून त्या आरबांनीं आपल्याच हातांत अधिकार घेण्याचें मनांत आणलें. गायकवाडींत त्यांचें प्राबल्य फारच झालें होतें. त्यांच्याबद्दल गायकवाडांस सालिना ३००००० रुपयं खर्चावे लागत. परंतु तेवढा खर्च सोसण्याची त्यांची शक्ति नव्हती. त्यांच्या पगाराची बाकी तुंबत तुंबत वीस लाख रुपये त्यांचें देणें झालें होतें ; आणि राज्याचें सारें उत्पन्न सावकारांकडे कर्जाचे फेडीस लाऊन दिलेलें होतें. झणून त्यांणीं प्रथम गायकवाडास अटकेंत टाकलें ; मग कान्होजीला कैदेंतून मुक्त केलें, आणि मल्हारराववावरावर बोलणें सुरू केलें. त्यांची कांहीं तरी समजूत करावी म्हणून रेसिडेंट साहेबानें मेहेनत करून पाहिली, परंतु ती सर्व व्यर्थ झाली,

---

मल्हारराव ही चालूं देत नव्हता ; खुद्द त्याला आरबांनीं उचलून कैदेंत टाकलें होतें, आणि ते जरी थोडे होते, तरी नाकेबंदीच्या, बंदोबस्ताच्या, अशा जेवढ्या जागा होत्या, तेवढ्या आटोपून त्यांवर चौकीपहारे त्यांणीं आपले ठेविले होते. कान्होजीला पुनः सर्व अधिकार द्यावा, अशाविषयीं त्यांजकडे बोलणीं सुरू होऊन वाटाघाट चाललीच होती. तेव्हां सरकारानें ही त्यांजकडे सांगून पाठविलें, कीं तुमचा जो तनखा चढला असेल तो चुकता करून देतों, आणि तुम्ही गुजराथ सोडून चला. परंतु तेवढ्याला ते कबूल झाले नाहींत, तेव्हां ती चकमक उडाली. शेवटीं ते स्वाधीन होऊन मुलुख सोडून जाण्यास कबूल झाले, ते अशा करारानें कीं इंग्रजांनीं त्यांची बाकी चुकती करून द्यावीच, आणि जेथें जेथें त्यांची जामीनगत किंवा बहादरी गुंतली असेल तेथें तेथें आपली तरी गुंतवून त्यांची मुक्तता करावी. त्यावेळीं गुजराथेंत अशी चाल पडून गेली होती, कीं कोणत्याही प्रकारची मोठी देवघेव किंवा करार होणें तर तो जामिनगतीवांचून किंवा बहादरीवांचून होत नव्हता. गायकवाड सरकारानें शेंकडों सावकारांकडून कर्ज काढलेलें होतें, आणि त्याला आरबांच्या जमादारांची जामीनगत किंवा बहादरी होती , इतकेंच नव्हे, त्या सावकारांच्या शरीराला धका लागूं नये, त्यांच्यावर जुलुम जबरी होऊं नये, असा त्यांचें संरक्षण करण्याचा ही

तेव्हां त्याणें इंग्रजी फौजेच्या मदतीला एक गोरी पलटण आणविली, आणि त्यांच्यावर हल्ला करून शहराला वेढा घातला, तो दहा दिवस पर्यंत होता. तितक्या काळांत आरबांनीं त्या फौजेचें पुष्कळ नुकसान केलें, पुष्कळ लोक मारले, परंतु शेवटीं ते स्वाधीन झाले. मग त्यांच्या बराब्बर बोलणें होऊन सरकारानें त्यांचें म्हणणें पुष्कळ अंशीं मान्य केलें, तेव्हां ते गायकवाडाचा मुलुख सोडून जाण्यास कबूल झाले.

आरबांनीं कान्होजीची मुक्तता करून दिली, तेव्हां त्याणें जाऊन फौज जमविली, आणि सौरी येथें मोठ्या निकरानें. युद्ध केलें, परंतु त्यांत त्याचा पराजय झाला ; पुनः महिन्यानें तयारी करून कापडवंजेजवळ आणखी एकवार तो लढला, आणि पुनः पराभव झाला, तेव्हां पळून उज्जनीस गेला. तेथून पुढें कांहीं दिवसांनीं त्याणें नवानगरच्या जामाकडे संधान बांधून बडोद्यांची गादी मिळवावी, व इंग्रजांनां गुजराथेंतून हांकून लावावें,

---

या जमादारांनीं पत्करा घेतला होता. म्हणून त्यांनां फांटा देतेवेळीं इंग्रज सरकारानें त्यांच्या साऱ्या जामिनगती आपण संभाळून त्यांच्या करारपत्रांवर आपलीं शिक्केमोर्तबें करून दिलीं, तेव्हां ते जाण्यास मोकळे झाले. आरबांची बाकी चुकती करून देण्याकरितां व आणखी कामांकरितां गायकवाडांस जें आणखी कर्ज काढावें लागलें, त्याला जामीन इंग्रज सरकारच झालें. तसेंच दिवाण व इतर कामदार लोक हे जरी मुलकी, दिवाणी, अधिकाराचीं कामें करीत होते, तरी आमच्या व आमच्या मुलामाणसांच्या संरक्षणाची जबाबदारी तुम्ही घेतल्याशिवाय तुमच्या राज्यपद्धतीस आम्हाला अनुसरतां येत नाहीं, असें म्हणूं लागले, तेव्हां इंग्रज सरकारानें ती ही हमी घेतली.

इंग्रजांनीं त्या वेळेस ह्या ज्या अनेक जामीनगती पतकरल्या, त्या बडोद्यांत त्यांचें वजन पडण्याला फार उपयोगीं पडल्या ; आणि त्यांत गायकवाडाची ही प्रतिष्ठा राहिली. बडोद्यांचें हरएक काम कारभारांत जों पर्यंत त्यांचा हात होता तों पर्यंत त्या जामीनगतींचें सरकारास कांहीं वाटलें नाहीं, परंतु सन १८२० मध्यें सर्व अधिकार गायकवाडाकडे पुनः गेला, आणि तेव्हां पासून त्यांनां त्यांमुळें फार त्रास पोहोचूं लागला. मग त्यांणीं हळूहळू आपलें अंग होईल तितकें काढून घेतलें.

असा विचार चालविला, तेव्हां इंग्रजांनीं त्याला धरून सन १८१२ मध्यें कैद करून मद्रासेंत नेऊन टाकलें. मल्हारराव मुंबईस कैद होऊन पडला होता, तो तेथेंच मेला.

आरबांची बाकी चुकती करण्याला व इतर लोकांचें देणें फेडण्याला वगैरे मिळून गायकवाडांस ४१३८७३२ रुपये कर्ज काढावें लागलें. त्या पैकीं ईस्टइंडिया कंपनीनें स्वतः निम्में दिलें, व बाकी निम्में आपल्या जिम्मेवर सावकारांकडून देवविलें. एकंदर रकम बारा आणे मितीनें तीन वर्षांत फेडावी, न फेडल्यास रदकर्जास महाल लाऊन द्यावे, असा ठराव झाला. परंतु सन १८०५ च्या एप्रिलपर्यंत त्यापैकीं मुळीं कांहीं फेड झाली नाहीं, तेव्हां आतां पूर्वीचे सारे तहनामे रद्द करून एक नवाच करावा, असें सरकारानें मनांत आणलें. त्या प्रमाणें त्या एप्रिलांतच तहनामा झाला. यावरून पूर्वी सन १८०३ च्या जूनमध्यें इंग्रजांनीं प्रथम चाकरीस ठेवलेली फौज वाढवून ३००० केली होती, ती कायम करून तिच्या खर्चाकरितां म्हणून ११७०००० रुपये वसुलाचा मुलुख अगदीं तोडून घेतला, तसेंच कर्जाच्या फेडीकरितां १२९५००० रुपये वसुलाचा आणखी मुलुख घेतला, व पूर्वी चौऱ्याशीं, खेड्डा, सुरत आणि चिकली हे परगणे दिलेले होते, ते गायकवाडानें परत मागूं नये, असा या तहनाम्यांत करार झाला.

गायकवाडास हें कर्जाचें ओझें मोठेंच होतें, आणि व्याजाचा दर जबर पडला, त्यामुळें तें वाढतच चाललें. पुढें चार वर्षांनीं म्हणजे सन १८०९ मध्यें तर अशी स्थिति झाली, कीं आतां गायकवाड यांतून मुक्त होणें परम दुर्घट असें वाटूं लागलें. इतिहास म्हणजे खरें वृत्त कथन करणें आहे, याजकरितां हें येथें सांगितलें पाहिजे, कीं गायकवाडाची इतकी दुर्दशा होण्याला कांहीं अंशीं त्यांचे बडे सावकारच कारण होते. त्या चार वर्षांत त्यांणीं त्यांजवर कांहींच मेहेरनजर केली नाहीं इतकेंच नव्हे, उलट त्यांच्याकडून तारीख १८ जून सन १८०७ इसवी रोजीं १७६१६८ रुपये वार्षिक वसुलाचा आणखी मुलुख तोडून काढून घेतला ; कारण चाकरीस ठेवलेल्या फौजेच्या खर्चाकरितां म्हणून पूर्वी जो सुमार पावणेबारा लक्षांचा मुलुख घेतला होता, तेवढ्यांत खर्च भागेना. महाराजांच्या डोक्यावर कर्जाचें हें जें विलक्षण ओझें झालें होतें, त्याणें मान मोडण्याची वे-

ळ आली, तरी इंग्रज आणखी लादूं पहातच होते. सन १८१२ मध्यें मुंबई सरकारानें महाराजांस असें म्हटलें कीं तुम्ही आम्हास एक कोट व वर कांहीं लाख रुपये द्या आणि फौजेच्या खर्चा करितां जो मुलुख आम्हाकडे लाऊन दिलात आहा तो परत घ्या ; वसईच्या तहानें आम्हाकडे जो मुलुख आला आहे, तो तुम्ही मक्त्यानें घ्या ; आणि फौजे विषयीं इतर ठराव आहेत, ते तसेच असूं द्या. हा व्यापार पटता तर कंपनीसरकारास विलक्षण फायदा झाला असता, परंतु तो गव्हरनर जनरलांनीं पसंत केला नाहीं. मुंबई सरकारास हें भविष्य कळलेंच होतें.

या प्रमाणें स्थिति होऊन बसलेली, आणि तशांतच सन १८१३ मध्यें राज्यांत दुष्काळ पडला. मग काय विचारावें ! तिकडे वसूल येण्याची मारामार, खर्चाची ओढ. आणि इकडे सावकारांची ओढ.

सन १८०२ मध्यें गायकवाडाचे दरबारीं रेसिडेंट नेमण्याचें ठरलें हें वर सांगितलेंच आहे. या जागेवर प्रथम नेमणुकीस मेजर वॉकर योग्य मनुष्य आहे, असें सरकारास वाटलें. रावजी आपाजीस मदत करण्याकरितां पाठविलेला तोच हा मेजर. तो फार विलक्षण बुद्धिमान आणि शाहाणा मनुष्य होता असें दिसतें. त्याणें प्रथम वडोद्यांच्या कौन्सिलांत थोडी तरी कांहीं व्यवस्था म्हणून लाविली, आणि नंतर सन १८०६ मध्यें सरकारास असा रिपोर्ट केला, कीं हाल्लीं या राज्याचें उत्पन्न सारें ५५ लक्ष आणि खर्च ८२ लक्ष रुपये आहे. त्यावर सरकारानें असा हुकूम पाठविला, कीं तुम्ही आतां कारभारांत साधेल तितका हात शिरकवावा, आणि दोन्ही तोंडांची मिळवणी घालावी. मग आरबांस फांटा देणें, सावकारांच्या जामीनगती पतकरणें, सरकारांतून कर्ज देणें, वगैरे पूर्वोक्त प्रकार त्याणें केले. त्यावेळीं गादीवर आनंदराव महाराज होते, ते नांवाचेच होते, ते कामांत ढुंकून देखील पहात नसत--पहाण्या सारखे नव्हतेच--सर्व राज्यकारभार चालविणारें कौन्सिल--तें नांवाचेंच--व त्यावर रेसिडेंटाची देखरेख असावी असें होतें, परंतु सर्व कांहीं ते साहेबच करीत आणि हे सभासद असत, सल्ला देत.

मेजर वॉकर सन १८११ मध्यें नोकरी सोडून गेले, तेव्हां सर जेम्स रिव्हेट कारनाक रेसिडेंट झाले- हे त्यावेळीं क्याप्टन होते- वॉकर साहेबानें आपल्या बुद्धिबलानें व मेहेनतीनें पुष्कळ काम केलें होतें, तरी अ-

जून करावयाचें ही पुष्कळ होतें.

सन १८१३ मध्यें जो दुष्काळ पडला, त्याणें सारी स्थिति उलट झाली. सन १८०५ मध्यें सारें कर्ज सुमार ४१ लक्ष होतें, तें आणखी पांच वर्षांत फिटेल, असा वॉकर साहेबानें १८०९ मध्यें अंदाज केला होता, तो बाजूस राहून सन १८१६ मध्यें तें ९५ लक्ष होऊन बसलें.

सन १८०० मध्यें पेशव्यांनीं गुजराथेंतील आपल्या हिश्शाच्या मुलखाचा मक्ता गायकवाडास दिला होता, ती मुदत भरत आली, तेव्हां सन १८०४ मध्यें आणखी दहा वर्षांचा मक्ता दरसाल साडेचार लाख रुपये प्रमाणें इंग्रजांच्या मध्यस्थीनें व त्यांसच जामीन देऊन गायकवाडानें पुनः घेतला. तो पैसा व काठेवाडचे खंडणीबद्दल पैसा पेशव्यांस आदा व्हावयाचा, त्यांत भडोजच्या वसुलाची रकम वजा झाली पाहिजे, असें गायकवाड तर्फे म्हणणें होतें. कारण पेशव्यांनीं भडोज इंग्रजांस दिलें, परंतु तें त्यांचें नव्हतें, गायकवाडांचें होतें, तर त्यांची कबूली घेतली पाहिजे होती, ती त्यांणीं घेतली नव्हती. शिवाय गुजराथेंतील पेशव्यांचे मुलखाच्या संरक्षणार्थ ठरावा पेक्षां कांहीं जास्त फौज ठेवावी लागली होती, तर तिच्या खर्चा बद्दल ही पैसा त्यांतच वजा मिळाला पाहिजे, असें गायकवाडांचें म्हणणें होतें. परंतु त्यास बाजीराव मान्य होईना, व ह्मणून सन १८१४ मध्यें नवीन मक्ता ठरावयाचा तो ठरवून देईना, आणि बाजीरावाचा प्यारा त्रिंबकजी डेंगळा याणें काठेवाडांतील जाहागीरदारांस असा हुकूम फर्माविला, कीं सरकारचे हिश्शाची जी खंडणी यावयाची ती तुम्ही गायकवाडास देऊं नये. तेव्हां या तंट्याचा निकाल करावा, ह्मणून गायकवाडाचे वकील गंगाधरशास्त्री पटवर्धन पुण्यास आले. त्यांच्या जिवास कांहीं अपाय होऊं देणार नाहीं, अशी इंग्रज सरकारानें हमी घेतली होती. तथापि त्यानींच त्रिंबकजीच्या मसलतीनें बाजीरावानें त्यास पंढरपुरास नेऊन ठार मारविलें ; तेव्हां इंग्रजांनां त्या गोष्टीचा चांगलाच विचार करणें आला. त्यांणीं तत्काळ बाजीरावाकडे असें बोलणें लाविलें, कीं त्रिंबकजीस आमच्या स्वाधीन करा. त्याणें प्रथम पुष्कळ टाळाटाळ करून पाहिली, परंतु शेवटीं नाइलाजास्तव त्यास स्वाधीन केलें. त्यांणीं त्याला ठाण्याच्या किल्ल्यांत मोठ्या बंदोबस्तानें ठेविलें असतां पहारेकऱ्यांच्या हातावर तुरी देऊन तो जो निसटला तो शंभुमहादेवाच्या डोंगरांत जाऊन फौज जमवून लढण्या-

ची तयारी करूं लागला. त्याला बाजीरावाची आंतून फूस व मदत ही होती. तसें न करण्याविषयीं त्याला इंग्लिशांनीं पुष्कळ सांगितलें, परंतु बाजिराव ऐकेना, तेव्हां त्यांणीं शस्त्र उचललें. इंग्रजांची फौज येऊन तिणें पुण्यास वेढा घातला, तेव्हां बाजीराव शुद्धीवर आले,- आणि तारीख १३ जून सन १८१७ रोजीं तेथचे रेसिडेंट मिस्टर एल्फिन्स्टन यांणीं जसा सांगितला , तसा तहनामा त्यांणीं मुकाट्यांनीं कबूल करून सही करून दिला.

या प्रमाणें गायकवाडांच्या पेशव्यांच्या कलहाचा शेवट झाला. एल्फिन्स्टन साहेबानें जो तहनामा करून घेतला, तो गायकवाडास पुष्कळ हितावह झाला. त्यांत असे ठराव होते--इतःपर गायकवाडांनीं पेशव्यांस आपले यजमान समजूं नये, व पेशव्यांनीं गायकवाडास आपले नोकर समजूं नये. पेशव्यांच्या बाबतींत मागचा हिशेब होणें राहिला, ही तक्रार पुनः कोणी काढूं नये, गायकवाडानें प्रतिसाल ४ लाख रुपये द्यावे, आणि पेशव्यांनीं तेवढे घ्यावे. अमदाबादचा सुभा पूर्वीप्रमाणें मक्त्यानें गायकवाडाकडे चालावा ; परंतु काठेवाडांतील जाहागीरदारांकडील खंडणीचा ऐवज इंग्रजांनीं घ्यावा, आणि चाकरीस ठेवलेली फौज वाढवावी, ह्मणजे गुजराथप्रकरणीं पेशव्यांनां आणि गायकवाडांनां परस्परांशीं कांहीं गोष्ठ बोलण्याचें कारण उरलें नाहीं.

गायकवाडास वर सांगितल्या प्रमाणें चार लाख रुपये पेशव्यांस द्यावे लागत, ते पेशवाई बुडाल्यावर इंग्रजांनीं माफ केलें.

हा तह होतांच पुढें थोड्या दिवसांनीं ह्मणजे तारीख ६ नवंबर रोजीं त्याच्याच अनुसंधानानें इंग्रजांनीं गायकवाडाबरावर नवा तह केला. त्यांत असें ठरलें, कीं चाकरीस ठेविलेली फौज वाढवावी, गुजराथेंतील पेशव्यांच्या हिश्शाचा मक्ता मिळाल्यानें जे हक्क प्राप्त झाले असतील, ते सर्व इंग्लिशांस द्यावे, गुजराथेंतील उभयतांच्या मुलखाची परस्परांस सोईवार होई अशी अदलाबदल करावी ; लढाईच्या वेळीं गायकवाडाची फौज इंग्रजांच्या फौजेशीं मिळून लढावी, आणि उभयतांनीं एकमेकांच्या मुलखांतील गुन्हेगार द्यावे घ्यावे.

आनंदराव गायकवाड तारीख ३ आक्टोबर सन १८१९ रोजीं वारला. त्याचा भाऊ फत्तेसिंग, बारा वर्षें नामधारी प्रतिनिधि होऊन राहिले-

ला, त्याच्या पूर्वी दोन वर्षें वारला होता ; आणि तिसरा भाऊ सयाजीराव तत्स्थानापन्न झाला. आनंदरावाला बळवंतराव व पिलाजीराव असे दोन पुत्र होते , परंतु ते वाजूस राहून सयाजीच गादीचा मालक होऊन वसला.

आनंदराव गायकवाड राज्याच्या अगदींच उपयोगीं नव्हता, ह्मणून सरकारानें सर्व कामकारभार आपल्या हातांत घेतला होता, तो आतां सयाजीरावाचे स्वाधीन करावा, असें सरकारचे मनांत आलें, ह्मणून त्यांणीं सयाजी महाराजांस असें कळविलें, कीं दिवाण वगैरे मंडळीच्या नेमणुका, पोट जाहागीरदारांबराबरचे ठराव, सावकारांशीं केलेले करार, वगैरे ज्याला ज्याला आमची बहादरी किंवा जामीनगत आहे, तें सर्व तुम्हीं तसें चालविलें पाहिजे, व एकंदर कामकारभारावर रेसिडेंटाची देखरेख राहील ; हें तुह्मांस मान्य असेल तर आह्मीं कारभारांतून हात काढतों.

मग उभयतांचा संबंध पुढें कसा असावा, तें अगदीं स्पष्ट ठरावें, व उभयतांचा स्नेह चालावा, ह्मणून ठराव करण्याकरितां मुंबईचे गव्हरनर ऑनरेबल मौंट स्यूअर्ट एल्फिन्स्टन साहेब स्वतः सन १८२० मध्यें बडोद्यांसच गेले. तेथें महराजांच्या व त्यांच्या पुष्कळ वेळ भेटी होऊन बोलणें नियमांत आलें ; त्यांतील मुख्य ठराव असे होते—

१ महाराजांचा परराज्यांशीं जो कांहीं संबंध किंवा काम असेल त्याची सर्व व्यवस्था पूर्वीप्रमाणें इंग्रज सरकाराकडे असावी.

२ आपल्या राज्याचा सर्व कामकारभार गायकवाडांनीं करून पाहिजे तशी व्यवस्था ठेवावी, त्यांस इंग्रजांकडून कांहीं प्रतिबंध नसावा; मात्र त्यांचे जामीनगतीनें सावकारांशीं जे करार झालेले होते, ते महाराजांनीं पुरे केले पाहिजेत ; व प्रतिसाल जमा किती होणार व त्यांतून खर्च किती करण्याचा विचार आहे, हें रेसिडेंट साहेबांस कळवावें, त्याला पाहिजे तेव्हां हिशेब पाहूं द्यावे, व कोणतें ही मोठ्या खर्चाचें काम हातीं घेणें झालें तर आधीं त्यांचें मत घ्यावें.

३ दिवाण, कामदार व इतर ज्या लोकांस इंग्रज सरकारची बहादरी असेल त्यांच्याशीं गायकवाडांनीं अगदीं त्या करारा प्रमाणें वर्तावें.

४ गायकवाडांनीं दिवाणाची निवडणूक आपल्या मर्जी प्रमाणें करावी, परंतु त्या विषयीं रेसिडेंटाचें मत घेऊन मग त्यास कायम करावें.

गायकवाडांस् आपण होऊन सल्ला मसलत देण्याचा अधिकार इंग्रज सरकारास असावा.

या प्रमाणें सयाजी महाराजांस सरकारानें चोहींकडून अगदीं बांधून टाकल्या सारखें केलें, आडवाटेस जाण्याची सवडच ठेविली नाहीं, तेव्हां ते सरळ मार्गानें चाललेच असतील, असें कोणास ही वाटेल ; परंतु ते तसे वागतात ! छेः त्यांणीं आपला तृतीयःपंथ सुरू केला, आणि हप्तेबंदी प्रमाणें कर्ज न फेडतां उलट अधिक केलें. सन १८२० मध्येंच कर्जाची रक्कम एक कोट सात लक्षांवर गेलेली होती, ती फेडण्याकरितां सयाजीच्या कबूलीनेंच सरकारानें कांहीं महाल सात सात सालांच्या मक्त्यानें कित्येक चांगल्या प्रतिष्ठित सावकारांस लाऊन दिले, आणि त्याच्याकडून रयत लोकांस त्रास पोंचूं नये, असे योग्य ठराव करून घेतले. मग सयाजी महाराजांनीं जो क्रम आरंभिला त्याणें मुंबई सरकाराचा व त्यांचा अगदीं उघड वेवनाव आला. त्याला पैशाचा अती लोभ उत्पन्न होऊन तिजोरी पैकीं साधेल तितका पैसा कोणत्या तरी निमित्तानें घेऊन तो आपल्या खासगी-कडे नेऊन सांठवूं लागला. दौलतीचें कर्ज फेडण्याकरितां सावकारांस इंग्रज सरकार जामीन झालेलें आहे. हें तो मनांत देखील आणीनासा झाला, आणि कित्येक लोकांच्या संरक्षणाची इंग्रज सरकारानें जबाबदारी घेतली असतां त्यांवर जुलुम जबरी करूं लागला. सारांश सन १८२० मध्यें एल्फिन्स्टन साहेबाबराबर जो तहनामा झाला होता, त्याच्या अगदीं उलट तो उघड उघड वर्तन करूं लागला.

एल्फिन्स्टन साहेब जाऊन त्यांच्या जागीं सर जॉन मालकम मुंबईचे गव्हरनर झाले ; त्यांणीं सयाजी महाराजांस उपदेश करून तहनाम्यांतील ठरावाप्रमाणें वागावयास लावावें, ह्मणून आपली होती तेवढी अक्कल खर्च केली, परंतु तो बुद्धिवाद व्यर्थ झाला, तेव्हां त्यांणीं दहशत घालून पाहिली, आणि ती ही निष्फळ झाली, तेव्हां जेवढ्या कर्जास इंग्रज सरकार जामीन होतें, तेवढ्याच्या फेडी पुरता मुलुख तोडून घ्यावा, असा अखेर निश्चय केला. त्या प्रमाणें सन १८२८ मध्यें गोष्ट अमलांत येऊन एकंदर २७ लक्ष रुपये वसूल वर्षास येई येवढा मुलुख मुंबई सरकारानें आपल्या कबज्यांत घेतला ; परंतु येवढ्यानें झालें नाहीं. इंग्रज सरकारानें आपली फौज चाकरीस ठेविली होती, तिचे मदतीस गायकवाडानें आपले तीन ह

जार स्वार नेहेमी चांगले तयार ठेवावे, असा ठराव होता. त्या तहनाम्यांतील ठरावाप्रमाणें खरें म्हटलें असतां इंग्रज सरकारची ती फौज कामगिरीवर जाण्यास निघाल्या शिवाय या फौजेस काम सांगण्याचा इंग्रजांस अधिकार मुळींच नव्हता. परंतु तिला पोटसंस्थांत पाहिजे तेव्हां पोलीस कामगिरीवर पाठवावी, अशी वहिवाट चालू होती. ती फौज कांहीं चांगली तयार नव्हती, ह्मणून सन १८३० मध्यें तिजपैकीं दोनतृतीयांश फौज चांगली तयार असली पाहिजे, असें सरकारानें बोलणें लाविलें. ती तयार करणें गायकवाडाचे हातून झालें नाहीं, सबब तिची तयारी करण्याकरितां व वेळच्यावेळीं खर्च भागविण्याकरितां ह्मणून सरकारानें १५ लक्षांचा आणखी मुलुख काढून घेतला.

या प्रमाणें गायकवाडाचा ४२ लक्षांचा मुलुख जप्त होण्याला सयाजीरावाचें अयोग्य वर्तनच कारण असो किंवा अन्य कांहीं असो, परंतु त्या योगानें त्या राज्यावर मोठा कठीण प्रसंगच येऊन गुदरला म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. हें मुंबई सरकारच्या लक्षांत येऊन सन १८३२ इसवीमध्यें लार्ड क्लेअर महाराजांस भेटण्या करितां बडोद्यांस गेले. तेथें परस्परांच्या बऱ्याच भेटी होऊन अखेर कांहीं बोलणें नियमांत आलें. कर्जाच्या बाबतींत गायकवाडांचें व सावकारांचें तोडजोडीचें कांहीं बोलून इंग्रजसरकारची जामीनगत दूर झाली. परंतु कर्जाच्या बाबतींत वादविवादांत ते बोलले ह्मणून मनांत रोष बाळगून गायकवाड सरकार जर तुमचें कांहीं नुकसान किंवा छळ करील तर आहीं तुमचें संरक्षण करूं असें सरकारानें त्यांस वचन दिलें. तसेंच गायकवाडांनीं २००० स्वार चांगले तयार ठेवावे, असें ह्मणून त्यांच्या खर्चाकरितां जो १५ लक्षांचा मुलुख सरकारानें जप्त केला होता, तो त्यांस परत दिला, आणि रोख १० लक्ष रुपये अनामत ठेऊन घेतले, व स्वारांचा पगार वगैरे वेळच्या वेळीं न पोचेल तर ती रक्कम अनामतींतून घ्यावी असें ठरविलें.

इतकें झालें ह्मणून सयाजीराव आपला मुळ स्वभाव सोडतात कीं काय ? लॉर्ड क्लेअर स्वतः येऊन असे ठराव करून गेल्यावर देखील आतां तुम्हीं करारांबाहेर वागूं नका वरें, असें मित्रत्वाच्या नात्यानें सरकार त्यांस हरएक प्रसंगीं समजून सांगतच होतें ; परंतु त्याणें तें कांहीं ऐकिलें नाहीं. इतकेंच नव्हे, सरकारानें आपल्यावर कृपा केली ती स्मरण्याचें बाजूस ठेऊन

ते करार आपल्यास लागूच नाहींत, असें तो ह्मणूं लागला. परंतु त्या पैकीं एक खुद्द त्याच्याच बराबर झालेला, आणि बाकीचे त्याच्या भावांबराबर झालेले होते. सन १८२० मध्यें एल्फिन्स्टन साहेबाबराबर जो तहनामा झाला होता, त्यांतील तिसऱ्या कलमीं दिवाणास व आणखी कांहीं लोकांस सरकारची बहादरी होती, ती अगदीं मनःपूर्वक पाळली पाहिजे, असा ठराव होता, परंतु अजीबाद तें कलमच नसल्या सारखा तो वागूं लागला. तेव्हां असें करणें चांगलें नव्हे, ह्मणून बहुत प्रकारें समजून सांगितलें असतां ही तो तें अगदीं तुच्छ करूं लागला. परंतु या उद्धटपणाचें प्रायश्चित पुढें लौकरच भोगावें लागलें. तें असें--कांहीं महालांत गायकवाडाचे हक्काबद्दल कांहीं पैसा येणें असे तो सरकारमार्फत वसूल होऊन त्यास पोहोंचत असे. तो सरकारानें आपले व त्याचे करार पुरे करण्याकरितां सन १८३७ मध्यें विलायत सरकारचे हुकमानें अनामत ठेविला, आणि पुढच्या वर्षी असे करार पुरे करण्याकरितां नवसरी प्रांत आपल्या ताब्यांत घेतला.

इतकें झालें तरी सयाजीराव बेपर्वाच होता, त्याचा चालूं क्रम कांहीं सरला नाहीं. त्याला वेणीराम ह्मणून जो दिवाण मिळाला होता, तो तसलाच होता, आणि त्याच्या मसलतीनें तो असा कांहीं वागूं लागला, कीं इंग्रज सरकार जी सल्ला मसलत देई किंवा भय घालीं तीं दोन्हीं अगदीं तृणवत मानून सरकारचा उपमर्द करण्याचा आपला निश्चयच असल्या सारखें दाखवूं लागला. सरकार अगदीं नाखुष होण्या सारखीं जीं शेकडों कारणें त्याच्या हातून घडलीं तीं सांगून पुरवणार नाहींत. तो कोणा एका बराबर ही इमानानें वागत नव्हता. त्याची राज्यव्यवस्था ही इतकी वाईट होती, कीं तिला अधिक दोष द्यावा, कीं इंग्रज सरकाराबराबर तो जें असें उद्धटपणाचें वर्तन करून संबंध ठेवीत होता, त्याला अधिक दोष द्यावा, हें सांगणें देखील कठीण आहे. सन १८३९* पर्यंत शेकडों कामांचा नि-

---

* महाल जप्त करण्यापूर्वी सरकारानें सयाजीस ज्या अनेक गोष्टी करावयास सक्तीनें सांगितलें, आणि त्याणें केल्या नाहींत, त्यांतील मुख्य कलमें

१ वेणीरामास दिवाणगिरीवरून दूर करून दुसरा दिवाण नेमावा,

काल करण्याला सरकारानें सांगितलें, व पुनः पुनः मुदत दिली, परंतु सर्व व्यर्थ, त्याणें कांहीं केलें नाहीं, आणि उत्तर ही दिलें नाहीं.

सयाजीरावास असें बेपर्वाईनें वागूं देणें सरकारास बरें वाटेना, ह्मणून सन १८३९ मध्यें त्यांणीं असा ठराव केला, कीं आपल्या गैर वर्तना मळें सरकारची आपल्यावर फार इतराजी होऊन शिक्षा झाली, असें त्यास

आणि तो सरकारास पसंत झाल्यास त्यास कायम करावें.

२ नारायणराव व्यंकटेश ह्मणून पूर्वी उखामंडळ तालुक्यावर कामदार होता, त्याणें इंग्रज लोकांचीं गलबतें लुटण्यास चांचे लोकांनां फूस दिली, व त्या लुटीचा हिस्सा घेतला, असा त्यावर आरोप होता, सबब त्याला स्वाधीन करावें.

३ अमरेळीचा वहिवाटदार मोहबूबखान याणें काठेवाडांतील पोटजाहागीरदाराशीं सरकारचे जे करार होते, ते मोडले सबब त्यास शिक्षा करावी.

४ चुडालकाती लोकांचे हक्कांबद्दल मिस्टर ब्लेन याणें त्यांच्यांशीं ठराव केले, ते कायम करून द्यावे.

५ काठेवाडांत मुरजोमणिक याचा खून झाला, त्या मुकदम्यांत सामील असलेले सर्व लोक स्वाधीन करावे.

६ काठेवाडांतील बाबा कोमौन काती सरदार याच्या हक्कांबद्दल विचार करून ठराव करून द्यावा.

७ नवानगर येथील जामाच्या एका गांवावर दरवडा पडला होता, तो भरून द्यावा.

८ काठेवाडांतील राज्यव्यवस्थेंत सुधारणा करावी, व तेथील जाहागीरदारांबराबर सरकारचे जे ठराव आहेत, त्यां बरहुकूम वागावें.

९ पोलीस प्रकरणीं कामांत गायकवाडांकडून व त्यांचे कामदारांकडून अगदीं मदत मिळत नाहीं, असे गुजराथेंतील सरकारी कामदारांकडून गिल्ले येतात, तर पुढें असा बोभाटा न येई असा बंदोबस्त करावा, आणि मागील वर्तणुकीबद्दल जाबसाल द्यावा.

१० काशीपूर येथें धरलेले कैदी स्वाधीन करावे. आघर येथील प्रतापसिंगाचे फिर्यादीचा व हक्कांचा निकाल करून ठराव करावा, आणि

वाटलें पाहिजे, याजकरितां पेटलाद प्रांतांत गायकवाडाचे हिस्शास जो ७३२००० रुपये वसुलाचा मुलुख आहे, तो जप्त करावा. त्या प्रमाणें लागलाच मुलुख घेऊन सरकारानें सयाजीरावांस आणखी अशी ही भीति घातली, कीं तुम्हांस पदच्युत करून दुसरा कोणी भाईबंद गादीवर बसवूं. पेटलादच्या वसुलापैकीं कांहीं खर्चानें सरकारानें गुजराथ इर्रेग्युलर हॉ-

---

विजापूर महालावरील कांहीं कामदार दोषी आहेत, त्यांस कामावरून दूर करावें.

११ भास्करराव विठ्ठल यास सरकारची बहादरी असतां त्यांजबराबरचा करार मोडला, तर नुकसान भरून द्यावें.

१२ बडोद्यांस सरकार तर्फे रेसिडेंट आहे, तर त्याच्या योग्यतेस व अधिकारास योग्य असा त्याचा मानमरातब राखावा, व बडोद्यांतील लोकांत ज्या कोणांजवळ त्याला बोलण्याचें कारण पडेल त्यांनां त्याजकडे जाण्यायेण्यास व बोलण्यास अगदीं हरकत नसावी.

पैशा संबंधीं गायकवाडाकडे सरकारचीं मागणीं होतीं, तीं या खेरीज. परंतु खंडणीबद्दलचा जो पैसा जमला होता, त्यांतून सरकारानें तो निकाल करून घेतला.

वर सांगितल्यावेळीं गायकवाडाशीं आणखी कांहीं प्रकरणीं बोलणीं होतींच, पैकीं कांहींची चौकशी सुरू होती, व कांहींची पुरी झाली होती; तीं येणें प्रमाणें—

१ महीकाठ्यांतील दोघा कोळ्यांचे खून झाले होते. त्या कामीं जे लोक होते, त्यांस चौकशीकरतां स्वाधीन करावें, व त्या उभयतां मयतांच्या मुलामाणसांस नुकसानीबद्दल पैसा द्यावा.

२ परलोकवासी आनंदराव गायकवाडाचे चिरंजीव मयत पिलाजीराव यांस सरकारची बहादरी होती, ती मोडली सबब त्यांचें नुकसान भरून द्यावें.

३ खेड्याच्या किल्ल्यावरील किल्लेदार मयत सुभानजी याणें युद्ध न करतां किल्ला स्वाधीन केला, म्हणून सरकारानें आपले बहादरीनें त्यास नेमणूक करून देवविली, ती त्याच्या कुटुंबास चालविणें वगैरे—

४ कांहीं लोकांनीं राजकोटास दरवडा घातला, त्यांत खून झाला.

र्स ह्मणून एक रिसाला नवा तयार केला, आणि सन १८४० मध्यें सया. जीरावाकडे असें बोलणें लाविलें, कीं तुमची फौज कमी करून फक्त १५००० शिपाई चांगल्या तयारीनें ठेवावे. ह्या गोष्टीस तो प्रथम अगदींच नाकबूल होता, परंतु मग एकाएकीं कबूल झाला. त्याला कारण काय झालें असेल तें असो. त्याच्या पूर्वी एक साल ह्मणजे सन १८३९ म-

---

ह्या दरवडेखोरांच्या बाबतींत गायकवाड सरकारचे कामदारांनीं जें वर्तन केलें, त्या बद्दल जाबसाल द्यावा.

५ चामराजवाल्या ह्मणून एक प्रसिद्ध पुंड होता, त्याणें काठेवाडांत कितीएक वर्षं दंगा मांडला होता, परंतु गायकवाडाचे कामदारांनीं त्याजकडे कानाडोळाच केला, त्या त्यांच्या सदोष वर्तनाबद्दल जाबसाल द्यावा.

६ सावखेड्याचे गोपाळराव गणपतराव गायकवाड यांच्या प्रकरणाचा विचार करावा.

७ बडोद्याच्या अगदीं शेजारीं कांहीं सरकारी कामदारांची मालमत्ता होती, तीवर बडोद्यांच्या प्रजेनें दरवडा घातला. ती भरून द्यावी.

८ उखामंडळ येथील कित्येक वाघर लोकांनीं कच्छ प्रांतांतील इनखौ गांवावर दरवडा घातला, तो भरून द्यावा.

९ गुन्हेगार लोक गायकवाडी मुलखांत येऊन लपून रहातात, तर त्यांणीं मुलखांत येऊं नये असा बंदोबस्त होण्याचा उपाय योजावा.

या प्रमाणें ज्या ज्या मुख्य गोष्टींवियर्यी सरकारचें बोलणें होतें, त्यांचो याद करून ती सरकारानें गायकवाडांकडे दिली, व अमूक मुदतींत सर्व प्रकरणांचा निकाल झाला पाहिजे असें सांगितलें ; परंतु त्या मुदतींत कांहीं झालें नाहीं. तरी येवढ्यावरून हें प्रकरण निकरास येणें बराबर नाहीं, असें वाटून सरकारानें आणखी मुदत दिली, आणि असें कळविलें कीं आतां ही मुदत जर टळेल तर आपला जो मुलुख अद्याप जप्तींत आहे, त्याचा वसूल आपल्यास मिळणार नाहीं ; तो खालसा होऊन सार्वजनिक व लोकोपयोगीं कामांकडे लाविला जाईल. ही याद तारीख १ आक्टोबर रोजीं गायकवाडास देण्यांत आली. ती प्रमाणें न वागलें, तर पुढें काय होईल हे त्यांस स्पष्ट कळलें तरी ते बेफिकीरच राहिले. तेव्हां तारीख १ नोव्हेंबर रोजीं सरकारानें फौज पाठवून पेटलाद महाल कबजांत घेतला.

ध्यें सरकारानें सातारच्चे महाराज प्रतापसिंह यांस पदच्युत केलें, त्या प्रमाणें कदाचित आपली वाट लागेल अशी त्याला भीति वाटली असेल. नंतर सन १८४१ मध्यें त्याचा आणि सरकारचा दुसरा तह झाला, त्यांत असें ठरलें कीं गायकवाडानें गुजराथ इर्रेग्युलर हॉर्सच्या खर्चाकरितां दरसाल तीन लाख रुपये द्यावे, व आपण ३००० स्वार बाळगावे ; ते पोट जाहागीर मुलखांत कामगिरीस पाठवावे, व त्यांत पाहिजे तेव्हां निम्मे कमी करावे. हा तहनामा झाल्यावर सरकारानें पेटलाद महाल सोडला, व सन १८३२ मध्यें दहा लक्ष रुपये अनामत ठेऊन घेतले होते, ते परत दिले. येथून पुढें सयाजीराव सरकारचें सांगणें केवळ पहिल्या प्रमाणें तुच्छ वारीतनासे झाले, परंतु त्यांच्या राज्यस्थितींत कांहीं सुधारणा झाली नाहीं.

हे सयाजीराव सन १८४७ मध्यें दिसेंबरच्या १९ व्या तारखेस वारले; आणिं त्यांचे ज्येष्ठ पुत्र गणपतराव गादीवर बसले.

गणपतरावाची कारकीर्द नऊवर्षें झाली, परंतु तितक्या काळांत खुद्द त्याच्या हातून सांगण्यासारखी अशी एक ही गोष्ट घडली नाहीं. हिंदुस्थानांतील राजकुलांत जन्मलेल्या इतर पुरुषां प्रमाणें तो ही सारा दिवस ऐषआरामांत आणि विषयोपभोगांत निमग्न असे. लक्षावधि प्रजा ताब्यांत होती, तिच्या कल्याणाकल्याणाची काळजी करण्यापेक्षां तो आपल्या मिजादीस अधिक जपत असे. त्याच्या हयातींत नाहीं म्हणायाला एक गोष्ट त्याचें नांव केव्हांतरी निघण्यासारखी झाली. ती ही कीं मुंबई व बडोदा रेलवे इंग्रजांनीं बांधिली, तिला त्याणें सडकेला जमीन दिली. आगगाडीच्या योगानें गायकवाडाचे मुलखांतील व्यापाराच्या मालावरील जकातीचे वगैरे उत्पन्नाचें त्याचें नुकसान होऊं नये म्हणून सरकारानें असा करार केला कीं प्रतिसाल अमूक नुकसान झालें असें त्यांणीं शाबीत करून द्यावें आणि तेवढें भरून ध्यावें. गायकवाडाच्या राज्यांतील जेवढ्या प्रदेशांतून रेल्वे गेली आहे तेवढ्यांत जे गुन्हे होतील त्यांची चौकशी करण्याचा अधिकार बडोद्यांच्या रेसिडेंटास दिलेला आहे.

याच वर्षीं म्हणजे सन १८५६ मध्यें नवंबरच्या १९ व्या तारखेस गणपतराव वारून त्यांचे धाकटे बंधु खंडेराव गादीवर बसले.

खंडेराव राज्याधिकारी होऊन फार दिवस लोटले नाहीत, इतक्यांत शिपायांचें थोरलें बंड उद्भवलें. त्या प्रसंगीं खंडेराव सरकारासीं अगदी

खेरेपणानें व इमानानें वागले. लॉर्ड क्यानिंग यांणीं त्यांजविषयीं असें लिहिलें आहे, कीं ते सरकारचें जें हिताहित तेंच आपलें हिताहित असें समजून वागले. सरकारास उपद्रव देण्यासारखें आपलें सामर्थ्य नाहीं, त्यांच्या कल्याणांत आपलें कल्याण आहे, आणि तें बुडालें असतां आपला निभाव लागणार नाहीं, इतकें ते समजून होते. असो, बंडांत ते सरकारच्या उपयोगीं पडले, ह्मणून सरकारानें खुष होऊन गुजराथ इर्रेग्युलर हॉर्स फौजेच्या खर्चाकरितां त्यांनां जे दरसाल तीन लाख रुपये द्यावे लागत होते, ते माफ केले, व सन १८१७ च्या तहनाम्यांत तैनाती फौजे विषयीं जे ठराव होते ते पुनः सुरू केले, आणि शिवाय त्या फौजेनें जाहागीर मुलखांत पोलीस काम करावें असें ठरविलें. शिवाय खंडेरावास पहिल्या प्रतीचा स्टार ऑफ इंडिया हा किताब, मोरचेलें, सोन्याचे तोडे वगैरे बहुमान दिला.

खंडेरावानें बडोद्यांच्या राज्याची जी व्यवस्था ठेविली होती, ती कांहीं चांगली म्हणण्या सारखी नव्हती. तो प्रजेच्या कल्याणाविषयीं अगदीं निःकाळजी, मोठा डामडौल करणारा, ऐषआरामी, आणि पैसा खूप उधळणारा होता, आणि क्रूर ही होता. एका शिपायानें गुन्हा केला होता—तो एका कटांत होता, ह्मणून त्याला देहांत शासन ठरलें होतें—त्याला हत्तीच्या पायाशीं बांधून मारावें, असा सन १८६६ मध्यें त्याणें बेत केला, तेव्हां मुंबईचे गव्हरनर सर बार्टल फ्रीअर यांणीं त्याला शिस्तीनें वागण्या विषयीं सूचना पाठविली. त्याच्या पुढच्या वर्षी सरकारांत पूर्वी न कळवितां त्याणें नवा दिवाण नेमला, तेव्हां अशी नेमणूक करण्याचा आपल्यास अधिकार नाहीं, असें त्याच गव्हरनरानें त्यास लिहिलें.

खंडेराव सन १८७० मध्यें नवंबरच्या २८ व्या तारखेस वारले, आणि त्यांचे बंधु मल्हारराव गादीवर आले.

सन १८६३ मध्यें खंडेरावाला विषप्रयोग करून मारण्याचा प्रयत्न केल्याचा मल्हारराववावर आरोप आला होता, त्याची चौकशी करवून खंडेरावानें त्याला पाद्रा येथें कैदेंत ठेविलें होतें. खंडेराव वारला तेव्हां रेसिडेंट साहेबानें त्याची मुक्तता करून गादीवर वसविण्याकरितां ह्मणून तेथून बडोद्यांस आणलें, परंतु त्यावेळीं खंडेरावाची स्त्री जमनाबाई गरोदर होती ; ह्मणून तिला पुत्र झाला असतां मी गादीवर वारसा सांगणार नाहीं, असा त्याजकडून लेखी करार करून घेऊन सरकारानें त्यास प्रतिनिधित्वानें राज्य

करण्याचा अधिकार दिला. परंतु पुढें जमनाबाईस कन्याच झाली, तेव्हां त्यास कायम केलें.

मल्हारराव गादीवर थोडेच दिवस होता, परंतु तितक्यांत बडोद्यांची प्रजा त्याला त्रासून गेली. गादीवर येई पर्यंत त्याचा काळ कोणत्या प्रकारानें गेला, हें मनांत आणलें ह्मणजे तो चांगला राज्यकर्ता निघेल असें आधीं वाटतच नव्हतें, तेंच खरें झालें. लहानपणीं तो काय, राजाचा मुलगा ह्मणून स्वच्छंदच वागत होता ; त्यावेळीं त्याला विद्याध्ययन वगैरे संस्कार झालाच नाहीं ; पुढें तर तुरंगांतच पडला. तेथून सुटला तो एकदम गादीवर आला. परंतु राज्य चालवितां येण्यास लागणारे गुण अंगीं कधीं आले होते ! ह्मणून बळवंतराव राहूरकरासारखे डाळपीटविक्ये दिवाण झाले ; आणि अर्थातच जुलूम, जबरी, अन्याय, उधळपट्टी, नाच, रंग, तमाशा, अशी स्वल्पकाळांत झोटिंगबादशाही सुरू झाली. हा बेबंदशाईचा प्रकार सन १८७३ मध्यें इतक्या पंथास जाऊन पोहोचला, कीं लोकांच्या ज्या शेकडो फिर्यादी आल्या, त्यांची चौकशी करण्याकरितां सरकारास एक कमिशन नेमणें भाग पडलें. त्या कमिशनानें मुलकी, राजकीय व न्याय संबंधीं वगैरे सर्व खात्यांची चौकशी करून सन १७७४ च्या मार्च मध्यें रिपोर्ट केला.

त्या रिपोर्टाचा विचार करून सरकारानें मल्हाररावास असा हुकूम फर्माविला कीं सन १८७५ साल पुरें होण्यापूर्वी तुम्ही आपल्या राज्य व्यवस्थेंत पुष्कळ सुधारणा करून दाखविली पाहिजे, नाहीं तर आपल्या प्रजेच्या कल्याणाकरितां व राज्याच्या संरक्षणाकरितां व शांतीकरितां आपल्यास पदच्युत व्हावें लागेल. ही ताकीद इतकी खरमरीत होती, पण कांहीं गुणास आली नाहीं. पुढें अकस्मात् एक भलतेंच प्रकरण उपस्थित झालें, त्याणें मल्हाररावाच्या कारकीर्दीची परिसमाप्तिच केली.

कमिशनाचें काम आटोपल्यानंतर पुढें मे महिन्यांत मल्हाररावानें लक्ष्मीबाई नांवाच्या एका राखलेल्या स्त्रीशीं विवाह केला. हा प्रकार प्रशस्त मानावा किंवा कसें याचा सरकारास संशय उत्पन्न झाला, ह्मणून त्यांणीं आपले रेसिडेंट कर्नल फेअर यांस असा हुकूम पाठविला, कीं तुम्हांस निमंत्रण येईल, परंतु लग्न समारंभास जाऊं नये. त्या प्रमाणें त्याणें येत नाहीं म्हटल्यावरून मल्हाररावानें जें लिहिलें त्याणें तो सरकारच्या अती इ-

तराजीस पात्र झाला. लग्नानंतर पांचच महिन्यांनीं लक्ष्मीवाई पुत्र प्रसवली, तेव्हां गादीस वारस झाला, झणून चाली प्रमाणें महोत्सव झाला, परंतु त्यांत ही रेसिडेंट गेलें नाहींत. मल्हारराववर सरकारची आधींच इतराजी झालेली, आणि त्यांतच त्याणें त्यास नापसंत होणारी अशी एक एक गोष्ट अधिकच केली.

सन १८७४ च्या अखेर एकादिवस कर्नल फेअर यांस सरबतांत वि प आढळलें झणून त्याणें आपल्याला मारण्याविषयीं प्रयत्न झाला असा स रकारास रिपोर्ट केला. तेव्हां त्या प्रकरणाची चौकशी करण्याकरितां व म-ल्हारराचा आणि फेअरसाहेबाचा बेबनाव होता सबब त्याला राज्यकारभा-रांत सुधारणा करण्यास हवी. तशी मदत मिळणार नाहीं तर ती देण्याकरि-तां झणून सरकारानें सर ल्युईस पेली याची नेमणूक केली. पेली साहेबानें चौ कशी सुरू केली तींत त्याचे नजरेस असें आलें कीं कर्नल फेअर यास विष-प्रयोग करण्याची खटपट झाली यांत शंकाच नाहीं व त्यांत मल्हारराचें कांहीं अंग असावें. त्याणें रिपोर्ट केल्यावरून सरकारानें मल्हारराची चौ-कशी करण्याचें ठरविलें व तो गादीवर असतां ती व्हावी तशी होणार ना-हीं, साक्षी पुरावा नीट मिळणार नाहीं असें वाटून त्याला तूर्त पदच्युत क-रण्याचें मनांत आणलें; आणि फौज पाठवून त्याला प्रतिबंधांत टाकलें, रा-ज्यकारभार आपल्या हातीं घेतला व एक जाहिरनामा प्रसिद्ध केला; त्यांत असें लिहिलें होतें कीं रेसिडेंट कर्नल फेअर यास विषप्रयोग करण्याचा प्रय-त्न मल्हारराचानें केल्याचा त्याजवर जबर संशय आहे. त्याची चौकशी क-मिशन पुढें चालेल; अखेर निकाल कसा ही झाला तरी बडोद्यांत मराठी राज्य कायम राहील.

पुढें आणखी एक जाहिरनामा प्रसिद्ध झाला त्यांत मल्हारराची चौकशी कोणकोणत्या आरोपांवर करावयाची तें लिहिलें होतें. ते आरोप येणें प्रमाणें———

१ कर्नल फेअर याणें ठेविलेल्या किंवा रेसिडेन्सींत कामावर असले-ल्या कांहीं नोकर लोकांशीं अयोग्य कामाकरितां मल्हारराचाने आपल्या मु-क्त्यारामार्फत व स्वतः गुप्त संबंध ठेविला होता.

२ मल्हारराचानें चाकरलोकांस लांच दिले किंवा देवविले.

३ असा गुप्त संबंध ठेवण्याचें व लांच देण्याचें कारण त्या चाकरां-

नां आपले गुप्त हेर करून त्यांच्या द्वारा गुप्त गोष्टींची अयोग्य रीतीनें माहिती मिळवावी आणि कर्नल फेअरयास इजा करावी किंवा विष घालून मारवावें असा हेतु होता.

४ मल्हारराव्यानें या प्रमाणें वश करून घेतलेल्या लोकांनीं कर्नल फेअर यास विष घालण्याचा प्रयत्न खरोखर केला.

या प्रमाणें आरोपांची चौकशी करण्या करितां जें कमिशन नेमलें त्यांत कलकत्याचे चीफ जस्टिस अध्यक्ष असून मागच्या कमिशनाचें अध्यक्ष सररिचर्ड मीड व मिस्टर मेलव्हिल हे दोन युरोपियन व जयपूरचे महाराज, शिंदे महाराज, व सर दिनकरराव राजवाडे, हे तीन हिंदु, असे पांच सभासद होते. विलायतेंतील नामांकित बारिस्टर सारजंट बालांटाईन मल्हाररावाच्या तर्फे वकील होते. चौकशीअंतीं निकाल सांगण्याचा अधिकार व्हाईस रॉय लॉर्ड नॉर्थब्रूक यांणीं आपल्याकडे ठेविला होता, ह्मणून अध्यक्षांनीं मेंबरांचीं मतें घेऊन त्यांजकडे रिपोर्ट केला. त्या तिघा युरोपियनांचें मत सर्व आरोप शाबीत झाले असें पडलें. शिंदे व सर दिनकरराव यांचें मत मल्हाररावावरील थोरराले आरोप शाबीत झाले नाहींत असें पडलें, व जयपूरच्या महाराजांस मल्हाररावाचें अंग कोणत्याही आरोपांत नव्हतें, असें शाबीत झालेंसें वाटलें. त्या प्रमाणें त्यांणीं मत दिलें.

कमिशनापुढें चौकशी चाललेलें प्रकरण वाजूस ठेऊन सरकारच्या नजरेस ज्या दुसऱ्या अनेक गोष्टी आल्या त्यांवरून मल्हारराव गादीच्या उपयोगीं नाहीं, असें त्यांस वाटलें. चौकशी केल्याप्रकरणीं कमिशनरांचीं मतें तर भिन्न भिन्न पडलीं. तेव्हां केवळ कमिशनाच्या रिपोर्टावरून किंवा मल्हाररावावर आलेले सर्व आरोप शाबीद झाले, असें न मानतां, मल्हारराव गादीवर बसल्यातागायत त्याचें प्रसिद्ध दुर्वर्तन, राज्याची अगदीं अव्यवस्था, अवश्य झाल्या पाहिजेत, अशा सुधारणा करण्याविषयीं त्याची नालायकी व बडोदें राज्यप्रकरणीं इतर अनेक गोष्टी मनांत आणून विलायत सरकारानें असा ठराव केला, कीं मल्हाररावास पदच्युत करावें, व बडोद्यांच्या गादिचे जे हक्क, मानपान व अधिकार त्यांशीं त्याचा व त्याच्या संततीचा कांहीं संबंध ठेऊं नये.

कमिशन मार्फत चौकशीस आरंभ तारीख २३ फेब्रुआरी सन १८७५ रोजीं झाला होता, आणि तारीख १९ एप्रिल सन १८७५ रोजीं

वर लिहिल्या ठरावाचा जाहिरनामा प्रसिद्ध होऊन मल्हारराव्याची स्पेशल ट्रेनींतून मद्रासेस रवानगी झाली. तेथें कारागृहांत कैंद काढतां काढतां तारीख २५ जुलै सन १८८२ रोजीं त्याच्या आयुष्याची समाप्ति झाली.

बडोद्यांत पुनः मराठेशाई सुरू होईल, असें पहिल्या जाहिरनाम्यांत होतें, त्या प्रमाणें सरकारानें होळकरांचे प्रसिद्ध दिवाण सर टी. माधवराव यांस मागून घेऊन लागलेंच बडोद्यांचे दिवाण नेमिलें, आणि सन १८५७ मध्यें खंडेराव गायकवाड आपल्या फार उपयोगीं पडले होते, ह्मणून त्यांची स्त्री जमनाबाई इच्या मांडीवर दत्तक पुत्र देऊन खंडेरावाचें नांव चालवावयाचें असें ठरविलें. त्या प्रमाणें पिलाजीराव गायकवाडाचे चिरंजीव प्रतापराव यांचे वंशांतील गोपाळराव नामक चतुर्दशवर्षात्मक मुलास हिंदुस्थान सरकारचे पंसतीनें बाईनें भांडीवर घेऊन त्याचें नांव सयाजीराव महाराज असें ठेविलें.

सयाजीराव महाराजांचें दत्तविधान होतांच सरकारानें मिस्टर ईलियट यांस त्यांच्या विद्याध्ययनाची देखरेख करण्याकरितां नेमून त्यांजकडून चांगला अभ्यास करविला, व ते वयांत आल्यावर सन १८८१ च्या दिजंबर महिन्यांत राज्यकारभार त्यांच्या स्वाधीन केला. तदनंतर एक वर्षानें सरटी. माधवराव दिवाणगिरीचा राजीनामा देऊन गेले; तेव्हां महाराजांनीं काजी शाबुदीन यांची त्या जागीं नेमणूक केली.

भाग २

कोल्हापूर

ह्या राज्याच्या उत्तरेस व वायव्येस सातारा जिल्हा, पूर्वेस व दक्षिणेस बेळगांव जिल्हा आणि पश्चिमेस सावंतवाडी व रत्नागिरी जिल्हा आहे.

सारा हिंदुस्थान देश यवनांनीं पादाक्रांत करून सोडला असतां उदेपूरच्या राजघराण्याची एक शाखा डोंगरपूर येथें राज्य करीत होती, तींतील तेराव्या पुरुषाचा एक पुत्र पितृपदास अंतरून विजापूरच्या बादशहाच्या पदरीं नोकरी करावयास गेला. त्याणें पराक्रम करून बादशहापासून

८४ गांवांची जाहागीर व राजा हें पद संपादिलें. त्याचें नांव सजनसी. त्याचा नातू भोसाजी यास दहा पुत्र होते. त्यांपैकीं ज्येष्ठ मालोजी याचा नातू आर्यभूमीचा उद्धारकर्ता, महाकीर्तिमान, प्रौढप्रताप, छत्रपति शिवाजी महाराज याणें सातारची गादी स्थापिली. पुढें त्याचाच नातू शिवाजी कोल्हापूरचा राजा झाला. या प्रमाणें सातारचें व कोल्हापूरचें हें राजघराणें एकच. परंतु ह्या शिवाजीला व त्याच्या मागून संभाजी राजा झाला, त्याला ही औरस संतति नव्हती, ह्मणून आद्य शिवाजीचा खरा वंश येथेंच खुंटला ह्मणावयाचा. तथापि भोसले कुलाच्या पूर्व शाखांचा विस्तार मोठाच होता, त्यांतून यथाशास्त्र दत्तक घेऊन आजपर्यंत राज्य चालत आलें आहे. भोसाजीचा अगदीं कनिष्ठ, दहावा, पुत्र कवठें गांवांत रहात असे, ह्मणून त्याला कंवठेकर भोसले असें नांव पडलें. संभाजी वारला, तेव्हां त्याच्या कुलांतील एक मुलगा दत्तक झाला. ह्मणून कंबठेकर हे कोल्हापूरकर महाराजांचे कूटस्थ असें ही म्हणण्यास हरकत नाहीं.

छत्रपति शिवाजीचा पुत्र संभाजी शिरच्छेद पावला, व त्याचा पुत्र शाहू दिल्लीस औरंगजेबाच्या येथें कैदेंत पडून राहिला, तेव्हां शिवाजीचा दुसरा पुत्र राजाराम यास गादीवर बसवून मंत्रिमंडळानें राज्य चालविलें. परंतु तो अल्पायू होऊन सन १७०० मध्यें वारला. तेव्हां त्याची ज्येष्ठ पत्नी ताराबाई हिणें आपला पुत्र शिवाजी यास गादीवर बसवून राज्य चालविलें. पुढें तो वेडा निघाला, तेव्हां सन १७०३ मध्यें त्यास कैद करून ठेऊन त्याच्या नांवानें आपण राज्यकारभार हांकण्यास तिणें सुरवात केली. असें चाललें असतां दिल्लींतून शाहूची सुटका होऊन तो स्वदेशीं आजोबानें स्थापलेल्या सिंहासनावर बसण्याकरितां आला. तेव्हां अर्थांतच कलहास आरंभ झाला. शाहूनें सातारा बळकाविला, तेव्हां ताराबाई आपल्या पुत्रासह पन्हाळ्यावर गेली. आणि तेथून कोल्हापुरास जाऊन सन १७०८ मध्यें शिवाजीच्या नांवानें गादी स्थापून राज्य चालवूं लागली. परंतु सन १७१२ मध्यें तो वेडा मुलगा ही मेला, तेव्हां तिचे हातचा अधिकार गेला. मग राजारामाची दुसरी स्त्री राजसबाई हिचा पुत्र संभाजी गादीवर बसला. त्याला रामचंद्रपंत अमात्य, कागलकर घाटगे व इतर सरदार मंडळी अनुकूल होती. सन १७३१ पर्यंत त्याचें शाहूच्या युद्ध चालून अखेर त्या उभयतांचा तह झाला. त्यांत असें ठरलें कीं सभा

जीनें सातारच्या गादी विषयीं हक्क सांगूं नये, कृष्णेच्या व वारणेच्या संगमापासून खालच्या, कृष्णा व तुंगभद्रा यांच्या संगमाच्या दरम्यानच्या मुलखाचें राज्य करून असावें आणि परशत्रूशीं लढण्याकरितां उभयतांनीं परस्परांस मदत करावी.

या प्रमाणें शिवाजी महाराजांचा नातू संभाजी हा कोल्हापूरचा खरा पहिला राजा झाला. तो सन १७६० मध्यें निपुत्रिक वारला, तेव्हां त्या घ्या स्त्रीनें कंवठेकर भाईबंद भोसल्याचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव शिवाजी असें ठेविलें.

हा शिवाजी अल्पवयस्क असल्यामुळें ती संभाजीची स्त्रीच राज्य चालवीत होती. परंतु तिच्या अंगीं ताराबाई वगैरे स्त्रियां प्रमाणें हुशारी नव्हती, म्हणून राज्यांत सारी बेबंदी व अव्यवस्था होऊन गेली. कोल्हापूरची प्रजा आसपासच्या संस्थानिकांच्या मुलखांत लूट करूं लागली, आणि समुद्रावर चांचेपणा करूं लागली. त्या चाच्यांचा उपद्रव मुख्यत्वें करून मुंबई येथील व्यापारी गलबतांस फार पोहोचूं लागला, तेव्हां मुंबई सरकारानें लढाऊ गलबतें पाठऊन सन १७६५ मध्यें मालवण किल्ला घेतला. मग राणी तहास कबूल झाली. तहनाम्यांत असा ठराव झाला, कीं राणीनें लढाईचे खर्चाबद्दल साडेसात लाख रुपये द्यावे ; आपल्या राज्यांत समुद्रकिनाऱ्यावर इंग्रजांस वखार घालूं द्यावी ; विलायती कापड व इतर माल आणून विकण्याचा एकट्या त्यांस अधिकार द्यावा ; चांच्यांचा बंदोबस्त करावा ; आणि त्यांच्याशीं स्नेहभावानें वागावें. हा तहनामा झाला, तेव्हां सरकारानें मालवण किल्ला परत दिला, परंतु राणीच्या हातून त्या करारांपैकीं एक ही पुरा झाला नाहीं. सन १७७२ मध्यें ती मरे पर्यंत खुषकीवर चोरांचा आणि दर्यावर चांच्यांचा उपद्रव यथापूर्व चालूच होता. राणी मेल्यावर शिवाजी स्वतः राज्यकारभार पाहूं लागला, परंतु त्याला ही त्यांचा बंदोबस्त झाला नाहीं. त्याच्या कारकीर्दीत तर राज्यावर अनेक संकटें आलीं. पेशव्यांनीं हल्ला करून कांहीं मुलुख घेतला, आणि तो पटवर्धनांस देऊन टाकला ; पुढें तो त्यांजकडून राजास परत देवविला, परंतु त्यांना त्याचा लोभ सुटेना ; त्यामुळें त्यांणीं पुष्कळ वर्षें पर्यंत सारखा उपद्रव दिला. कोल्हापूरकरांचे दुसरे शत्रु सावंतवाडीकर देसाई ; हे २३ वर्षें सारखे लढतच होते. त्यामुळें राज्यांत शांतता कशी ती नव्हती, मग सुधारणेचें नां

च कशास पाहिजे ! त्या काळांत खरी राज्यव्यवस्था कशी ती नव्हतीच म्हटलें तरी चालेल. गादीवर राजा होता, तो नांवाचा, कामदारमंडळींत तट पडलेले, आणि त्यांचें सारें लक्ष लुटीवर ; ती मिळण्याचा उपाय दरवडे आणि चांचेपणा -- त्याणें सारी प्रजा त्रस्त होऊन गेलेली--अशी गेल्या शतकाच्या शेवटीं कोल्हापूरची स्थिति होती. त्या लुटारूंच्या उपद्रवानें इंग्लिश व्यापाऱ्यांस फार त्रास झाला, तेव्हां शेवटीं सन १७९२ मध्यें मुंबई सरकारानें पुनः स्वारी करण्याची तयारी केली. परंतु स्वारी होण्या पूर्वीच राजा तहास कबूल झाला, आणि इंग्रज व्यापाऱ्यांचें जें नुकसान झालें असेल, तें भरून देण्याचा व मालवण आणि कोल्हापूर येथें त्यांस वखारी घालण्याची परवानगी देण्याचा त्याणें करार केला.

शिवाजी महाराजांनीं जी थोरली हिंदुपदबादशाही स्थापन केली, आणि पेशवे, शिंदे, होळकर इत्यादि वीरांनीं अटकेपर्यंत जिचे झेंडे लाविले, तिचा ऱ्हासकाल आतां समीप येऊन ठेपला, आणि हे श्वेतद्वीपस्थ गौरकाय, स्वकार्यसाधु जे आले, त्यांचा संबंध जडल्यापासून तिच्या नाड्या सारख्या आकर्षण होत चालल्या. कोणा दोघा सरदारांचा कलह चालला असावा, तो मिटवण्याकरितां म्हणून आपण मध्यें पडावें, आणि दोघांस दोहींकडे बसवून बलहीन करून सोडावें, व आपला लाग साधावा, हा दैवयोगच घडून आला, किंवा अ ग्यासें राज्य काबीज करण्यास दूर दृष्टीनें त्यांणी ही युक्तीच काढली, काय असेल तें असो, पण त्यांचा हा क्रम जेथें तेथें सारखा चालू होता. तो कोल्हापूरप्रकरणांत ही आढळतो. कोल्हापूरकरांस निपाणकर हा एक जबरदस्त शत्रु होता. त्याचा त्रास बरेच दिवस सोसून महाराज कंटाळले. तेव्हां सन १८१२ च्या आक्टोबर मध्यें इंग्रजांनीं त्यांच्या बरावर तह केला, त्यांत असें ठरविलें कीं महाराजांनीं निपाणी व पेशव्यांचा मुलुख यांजवरील आपले सर्व हक्क सोडावे, आणि मालवण किल्ला, बंदर, त्याच्या खालचीं बंदरें, व मुलुख व आणखी कांहीं किल्ले इंग्रजांस द्यावे ; दुसऱ्या कोणत्या संस्थानाशीं कलह करूं नये, व कोणाशीं तंटा असेल तर तो इंग्रजांचे मध्यस्थीनें तोडून घ्यावा ; आणि त्यांणीं महाराजांकडे शिल्लक राहिलेल्या मुलखास परशत्रूचा उपद्रव लागूं देऊं नये.

सन १८१२ ह्याच वर्षीं शिवाजी मरण पावला, आणि त्याचा ज्येष्ठ पुत्र संभाजी ऊर्फ आबा साहेब गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दीतच

इंग्रजांचें आणि पेशव्यांचें पुण्यास युद्ध होऊन सन १८१८ च्या जून मध्यें पेशवाईची परिसमाप्ति झाली. त्या लढाईंत आबा साहेब आपल्याशीं इमानानें व खरेपणानें वागून उपयोगीं पडला, बाजीरावास सामील झाला नाहीं, म्हणून इंग्रजांनीं चिकोडी व मनोळी हे दोन तालुके जे पूर्वीं सन १८१२ मध्यें पेशव्यांस देवविले होते, ते त्यास बक्षीस दिले, परंतु ते त्याच्या पदरीं पडले* नाहींत ह्या राजाच्या कारकीर्दीत कोल्हापूरच्या राज्यव्यवस्थेत पुष्कळ सुधारणा झाला.

कोल्हापूरकरांच्या पदरीं सयाजी मोहिते म्हणून एक सरदार होता. त्याची जाहागीर कांहीं कारणानें महाराजांनीं जप्त केली. ती परत मिळवावी, किंवा सूड तरी उगवावा, असा निश्चय करून तो कोल्हापुरास गेला. जाहागीर कांहीं परत मिळेना, म्हणून त्याणें सन १८२१ च्या जून मध्यें राजवाड्यांत शिरून महाराजांस गोळी घालून ठार मारलें. याप्रमाणें आबा साहेबांचा शोककारक परिणाम झाला, तेव्हां त्यांचा बंधु शहाजी ऊर्फ

---

* बुडत्याचा पाय खोलांत ही म्हण या स्थळीं चांगली प्रत्ययास आली, महाराजांस हे तालूके परत देण्याचे ठरल्या प्रमाणें ते घेण्याकरितां ते बेळगांवांस गेले. तेथें एजंट साहेबांची त्यांची भेट होऊन त्या कामाप्रकरणींच भाषण सुरू झालें. इतक्यांत अकस्मात एक बार उडाला ; त्या बरोबर साहेब दचकून उभे राहिले. बार कोणी काढला, याची चौकशी करतांना महाराजांच्या पदरच्या एका मानकऱ्याचे कमरेस तमंचा होता, तो धक्का लागून उडाला, असें कळलें. त्यांत गोळी होती, कीं बायबार होता, असें साहेबांनीं विरतांना त्याणें गोळी नव्हती, म्हणून सांगितलें. त्यांणीं लगेच चिटी पाठवून लष्करांतून स्वार आणविले. त्यांणीं तंबु वेढून कचेरीची जागा खणाविली. तेव्हां साहेबाच्या खुर्चीपासून जवळच गोळी निघाली, ती त्या तमंच्यांतीलच असें ठरलें. मग पानसुपारी न देतां महाराजांची स्थानगी करून साहेबांनीं सरकारास झाल्या हकीगतीचा रिपोर्ट केला. त्यावर विचार होऊन हे तालुके आतां महाराजांस परत देऊं नयेत, असा सरकारानें ठराव केला. या प्रमाणें महाराजांचा कांहीं अपराध नसतां तालुके हातांत आलेले परत गेले, आणि शिवाय महाराजां विषयीं सरकारास संशय वाटूं लागला. याचें नांव हिंदूचें नशीब—— भाषांतर कर्ता.

बाबा साहेब यांणें सारासार विचार न करतां मोहिते कुलाचा संहार उडविला. आबा साहेबास एक अगदीं लहान पुत्र होता, परंतु तो त्याच्या पश्चात एका वर्षानें वारला, तेव्हां बाबा साहेबच गादीस मालक झाला. त्याच्या अंगांत भावाची बुद्धि, हुशारी, किंवा योग्यायोग्य विचार मुळींच नव्हता. तो अगदीं जुलमी आणि दुराचरणी मनुष्य होता. त्याच्या मनांत आपलें राज्य हरप्रयत्नानें वाढवावें, अशी भलतीच इछा उत्पन्न होऊन तो इंग्रजांबराबरचा तह मोडून हवें तसें वागण्यास सिद्ध होता. सन १८२४ मध्यें वेळगांव जिल्ह्यांत कित्तूर येथें मोठा दंगा होऊन अगदीं वडच उद्भवल्या सारखें झालें, आणि तशांत अशी वातमी पसरली, कीं ब्रह्मदेशांत इंग्रजांचा अगदीं पराजय झाला. तें ऐकून बाबा साहेबास स्फुरण चढलें, आणि आपला इष्ट हेतु सिद्धीस नेण्यास ही उत्तम संधी आली आहे, ही फुकट घालवूं नये, असें त्यास वाटूं लागलें. मग ५००० पायदळ १००० स्वार आणि ७ तोफा असें लढाईचें सामान बराबर घेऊन तो एकाएकीं कोल्हापूराहून निघून सावंतवाडीकर देसायांवर स्वारी करण्यास चालला. इंग्रजांबराबर पूर्वी झालेल्या तहनाम्यांतील करारांप्रमाणें त्यांच्या मार्फत तंटा तोडून घेण्यास तो कबूल होईना व त्यांचें ऐकेना.

या प्रमाणें इंग्रजांस न जुमानतां स्वतंत्रतेनें वागण्याचा तो आपला नुसता झोंक दाखवून राहिला नाहीं. ग्वाल्हेरच्या महाराजांचे भाईबंद हिंदूराव म्हणून कोणी होते, त्यांनां कणंगलें गांव किल्ला सुद्धां जाहागीर देऊन त्याच्याच बापानें सनद करून दिली असतां त्यावर हल्ला करून त्याणें किल्ला तर सर केला. तेथची तेवढी लूट झाल्यावर इंग्रज सरकारास कांहीं न कळवितां स्वारीचा रोख सातारच्या हद्दीकडे वळला. त्याचा उद्देश उघडच होता, म्हणून भयभीत होऊन सातारकर महाराजांनीं तें विघ्न निवारण करण्याविषयीं इंग्रज सरकारास विनंती केली.

इतक्या पंथास गोष्ट येऊन ठेपली असतां ही इंग्रज सरकार स्वस्थ वसलें असें होणें अशक्य होतें. सन १८२५ च्या अखेरीच्या सुमारास इंग्रजांची फौज कोल्हापुरांत शिरली, तेव्हां महाराजांनीं कौलास येऊन करारनामा लिहून दिला ; त्यांत असें कबूल केलें कीं मी लोकांच्या शांततेसंबंधीं हरएक कामांत इंग्रजसरकारच्या सल्ल्या प्रमाणें वागेन; हिंदुराव व इतर जाहगीरदार यांचे हक्क कायम राखीन; आपली फौज कमी करून आपल्या

किंवा बाहेर मुलखांतील स्वस्थतेस व्यत्यय न येई येवढेंच सैन्य कायम राखीन व आपल्या मुलखांत बंडवाल्यांस कधीं ही आश्रय देणार नाहीं.

हा तह झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं मुंबईसरकाराकडून त्यांतील ठराव रद्दकरून घेऊन बंदमुक्त होण्याच्या इराद्यानें महाराजांची स्वारी पुण्यास गेली ; परंतु तो हेतु कांहीं सिद्धीस गेला नाहीं तेव्हां स्वारी कोल्हापुरास परत आली. परंतु खुद्द पुण्यास असतां व वाटेनें येतांना त्याणें असें कांहीं आन्यायाचें व जबरीचें वर्तन केलें कीं त्यावरून त्याला वेड लागलें असें मानण्यास कांहीं हरकत उरली नाहीं. कोल्हापुरास परत आल्यावर फौज कमी न करतां त्याणें जास्तीच ठेविली आणि सरकारानें संरक्षण करण्याचें पत्करलेल्या जाहागीरदारांचें मुलुख बळकावले. तो येवढ्यानें ही थांबला नाहीं, जरा फुरसत सांपडतांच आपल्या शेजाऱ्यांच्या मुलखास उपद्रव देऊं लागला.

महाराजांची ही कृति पाहून सरकारानें सन १८२७ मध्यें पुनः सैन्याची योजना केली. या प्रसंगीं तें सैन्य पूर्वीप्रमाणें तसेंच माघारें फिरलें नाहीं ; त्याणें जाऊन कोल्हापूर कबजांतच घेतलें. हें सैन्य येतांच शहरच्या तटावर संरक्षणाकरितां दोन तीन हजार आरब व बलुची वगैरे शिबंदीकडील लोक होते, त्यांणीं तें खालीं करून दिलें. मग सरकारानें राजाला नवा तहनामा कबूल करावयास लाविलें. त्यांत त्याणें आपली फौज आणखी कमी करून ४०० स्वार व ८०० पायदळ ठेवण्याचें कबूल केलें ; किल्ल्याच्या संरक्षणार्थ शिवाय शिबंदी असावी, असें ठरून तिची याद झाली. कोल्हापूर व पन्हाळा या ही किल्ल्यांवर गोरी फौज ठेऊन तिचा खर्च महाराजांनीं द्यावा, असें ठरलें. तसेंच त्यांणीं जे कांहीं गांव जबरीनें घेतले होते, ते सरकारानें परत देवविले ; ज्या जाहागीरदारांस महाराजांनीं उपद्रव दिला, त्यांच्या ताहयातच नव्हे, तर जाहागिरी असे पर्यंत, त्यांचें संरक्षण करण्याचें पत्करलें, व त्यांच्या नुकसानी बद्दल महाराजांनीं १४७९४८ रुपये द्यावे, असें ठरवून ते पटत पर्यंत कांहीं मुलुख ताब्यांत घेतला. कोल्हापूरचा कारभार पुढें सुरळीत चालावा, ह्मणून सरकारानें दिवाण नेमून दिला, व त्याला काढण्याचा अधिकार महाराजांच्या हातीं ठेविला नाहीं.

पुढें कांहीं दिवसांनीं पन्हाळ्यावर आपली शिबंदी ठेवण्याचा अधि-

कांर सरकारानें महाराजांस हिला, व त्यानंतर कोल्हापुरांतून ही आपली फौज उठविली. सरकारानें जो दिवाण नेमला, तो कारभार बरा करील, अ सें वाटत होतें, परंतु त्याच्या हांतून तसें घडलें नाहीं, आणि महाराज पूर्वी पेक्षां पुष्कळ निवळून आतां नीट वागतील असें चिन्ह दिसूं लागलें ह्मणून सरकारानें त्यांसच राज्यकारभार संभाळावयास परवानगी दिली. परंतु समक्ष भेटींत मुंबईच्या गव्हरनरांनीं त्यांनां असें बजाऊन सांगितलें, कीं सरकारची फौज पुनः कोल्हापुरांत जाण्याचा जर आतां प्रसंग आला, तर ती तेथें कायम होऊन बसेल, हें पक्कें समजून असा.

बाबा साहेब महाराजांच्या इतउत्तरच्या कारकीर्दींत दंगाधोपा न होता, ते तारिख २९ नवंबर १८४८ रोजीं वारले. त्यांनां शिवाजी व चिमाजी असे दोन पुत्र होते, परंतु ते अल्पवयस्क असल्यामुळें त्यांची चुलती (आबा साहेबाची स्त्री) व चार कामदार मिळून सहा असामींचें कौन्सिल नेमून सरकारानें त्याजकडे सर्व अधिकार सोंपविला. परंतु सहा असामींचा एक विचार होऊन कारभार सुसूत्र चालेल असें चिन्ह मुळींच दिसेना. त्यांच्या मध्यें ती आबासाहेबाची स्त्री आयराबाई मनाची निग्रही आणि आपल्या इछे प्रमाणें सारें करणारी होती. बाकी कोणांत पाणी नव्हतें. तेणें करून त्यांनां गुंडाळून ठेऊन सर्व अधिकार तिणें आपल्या हातांत घेतला. तिच्या ह्या कर्तृत्वावरून दिवाण साहेब असें तिचें नांव पडलें. इतिहासांत ती या नांवानेंच प्रसिद्ध आहे.

कौन्सिलाचा सर्व अधिकार एकटी दिवाणसाहेब बाई बळकाऊन बसली, तो सरकारानें तिजकडेसच राहूं दिला. तिणें तीन वर्षें पर्यंत कारभार केला, परंतु तितक्यांत सारी दुर्दशा करून सोडली. कोल्हापूरचे तेवढे दिवस फारच विपत्तींत गेले ; तेव्हां अव्यवस्था ह्मणजे अगदीं शिखरास जाऊन पोहोंचली होती. अशी स्थिति झाली, तेव्हां सरकाराला हात घालणेंच आलें. सरकारानें प्रथम सामोपचारानेंच कार्यभाग उरकण्याचें मनांत आणलें होतें, परंतु तें कांहीं साध्य होईना, तेव्हां सन १८२७ च्या तहनाम्यांत करार करून घेतल्याप्रमाणें दिवाण नेमण्याचा हक्क आपला आहे असें ह्मणून तिला अधिकारावरून दूर केलें आणि दाजी कृष्ण पंडित ह्मणून आपला विश्वासू गृहस्थ दिवाणगिरीवर नेमला. पंडितांनीं राज्यव्यवस्थेत जे सुधारणेचे प्रकार सुरू केले ते दिवाणसाहेबाच्या पक्षाची जी जुनी

खाबू मंडळी होती तिला सहन न होऊन त्यांणीं त्यांच्याशीं अगदीं शत्रुत्व मांडलें; तें इतकें कीं परिणामीं सन १८४४ मध्यें त्या पासून बंड उद्भवलें आणि तें वाढत वाढत सावंतवाडीपर्यंत जाऊन पोहोंचलें. मग तें मोडण्यास सरकाराला आपली फौज आणावी लागली. शेवटीं सरकारानें सर्वच अधिकार आपल्या हातांत घेतला.

मग राज्यव्यवस्थत पुष्कळ फेरफार व सुधारणा झाल्या. सरकारानें साऱ्या किल्ल्यांनां भगदाडें पाडलीं ; शिबंदी वंशपरंपरा असण्याची वहिवाट होती ती बंद केली, पहिल्या फौजेस फांटा दिला, तिच्या बदला दुसरी नवी ठेविली आणि बंड मोडण्याला जो खर्च लागला तो सर्व कोल्हापूरच्या तिजोरींतून घेतला. राज्यांतील सर्व कारखान्यांत व खात्यांत मग शिस्त आणि व्यवस्था लागली.

सरकारानें आपल्या हातांत अधिकार घेतल्यापासून पुष्कळ सुधारणा झाली, आणि सन १८६२ मध्यें शिवाजी महाराजांस मुक्तयारी मिळाली. त्या समयीं त्यांच्या बराबर जो तह झाला त्यांत असें ठरलें कीं सर्व महत्वाच्या कामांत राजानें सरकारच्या सल्लया प्रमाणें वागावें. सन १८६७ मध्यें बंड झालें तेव्हां महाराजांचे बंधु चिमासाहेब त्यांत सामील झाले ; परंतु शिवाजीमहाराज सरकाराशीं इमानानें व भक्तीनें वागले. चिमासाहेबांस कैद करून कराचीस नेऊन ठेविलें होतें तेथें कित्येक वर्षां नंतर त्यांचा काळ झाला.

शिवाजी महाराजांस राज्योपभोग फार दिवस घडला नाहीं. मुक्तयारी मिळाल्यावर चारच वर्षांनीं म्हणजे सन १८६६ मध्यें अगष्टच्या चौथ्या तारखेस ते वारले. त्यांनां पुत्र नव्हताच म्हणून त्यांणीं आपले भाचे नागोजीराव पाटणकर यांस दत्तक घेऊन त्यांचें नांव राजाराम ठेविलें.

शिवाजीराव महाराज वारले, तेव्हां सरकारानें राज्यकारभार पुनः आपल्या हातांत घेतला. राजाराम महाराजांचें वय १६ वर्षांचें होतें, त्यांजकडून चांगला अभ्यास करविला. ते बुद्धिमान व सुशील होते, म्हणून त्यांपासून आपल्यास पुष्कळ सुख होईल, अशी प्रजेला मोठी आशा लागली होती. सन १८६९ मध्यें सरकारानें त्यांस खासगी खात्याची व्यवस्था पहाण्याची परवानगी दिली. त्याचवर्षी त्यांचे मनांत इंग्लंडचा प्रवास करून यावें, असें येऊन ते गेले. तिकडून परत येत असतां सन १८७०

च्या नवंबर महिन्यांत इटलींत फ्लॉरेन्स शहरीं निर्दय काळानें त्यांजवर झड-प घालून त्यांची प्रजा, आप्त, इष्ट, या सर्वांस दुःखसमुद्रांत बुडविलें.

पुढें दहा महिन्यांनीं राजारामाच्या ज्येष्ठ पत्नीनें कंवठेकर दिनकर-राव भोसल्यांचे चिरंजीव नारायणराव यांस सरकारचे संमतीनें दत्तक घेऊन त्यांचें नांव शिवाजी ठेविलें. हे बुद्धिमान होते, व त्यांचा विद्याभ्यास चांगला चालला होता. परंतु दुर्दैवानें त्यांचे मतीस भ्रंश पडून थोडक्याच काळांत ते अगदीं वेडे झाले.

भाग ३

सावंतवाडी

हें लहानसें संस्थान दक्षिणकोंकणाच्या शेवटास मालवण प्रांत व गोवें प्रांत यांच्या मध्यें आहे. येथील सरदार सांवत हे भोसले कुळांतीलच असून अद्याप ही तें नांव केव्हां केव्हां लावतात ; परंतु त्यांचें प्रसिद्ध नांव सरदेसाई असें आहे. गोंव्याजवळचा जो वाडीगांव तेथचे ते इनामदार देशमूख. त्यांच्या कुळांत खेमसांवत ह्मणून जो पुरुष प्रथम प्रसिद्धीस आला तो विजापूरच्या बादशाहाच्या पदरीं सरदार होता ; व बादशहाकडून वाडी प्रांताचा कांहीं भाग त्याला जाहागीर मिळाला होता. पुढें शिवाजी महाराजांच्या प्रतापसूर्यापुढें त्या अस्तास जाणाऱ्या बादशाही ताऱ्याचें तेज फिक्कें पडूं लागलें, तेव्हां तो छत्रपतींच्या सेवेस तत्पर झाला. शिवाजीनें त्याला त्या साऱ्या कोंकणपट्टीचा सरदेसाई करून त्या प्रांताच्या निम्मे वसुलांत त्यानें ३००० पायदळ बाहेर मुलखीं चाकरीस नेण्या तयार ठेवावें, शिवाय मुलखाच्या बंदोबस्तास लागेल ती फौज ठेवावी, व बाकी निम्मे वसूल आपल्यास द्यावा, असें ठरविलें. परंतु हा ठराव त्याला सर्वांशीं मानवण्या सारखा नव्हता, ह्मणून शिवाजीला जरा प्रतिकूल काल येतांच तो त्याला सोडून पुनः विजापूरकरांकडे गेला. परंतु सन १६६२ मध्यें त्या बादशाहास चांगला हात दाखवून शिवाजीनें लागलीच वाडीवर चाल केली, आणि देसायास त्राहि त्राहि करून सोडलें. खेमसांवत शरण आला, तेव्हां शिवा-

जानें कृपा करून तो प्रांत त्याजकडेच पूर्वीच्या ठरावानें ठेविला. मग सांवत राजसेवेंत कधीं चुकले नाहींत. पुढें सन १७०७ मध्यें शाहूमहाराजांनीं खेमसांवताला त्या जाहागिरीची सनद करून दिली, व शिवाय कुलाब्याच्या आंग्र्याला साळशी महालाचा वसूल निम्मेनिम नेमून दिला.

खेमसांवतानंतर त्याचा पुतण्या फोंडसांवत सन १७०९ मध्यें गादीवर बसला. इंग्रजांचा वाडीशीं संबंध जुळला तो प्रथम याच्या कारकीर्दीत. कुलाब्याच्या आंग्र्याच्या संमतीनें किंवा त्याच्या हुकमानें ही इंग्रजव्यापाऱ्यांच्या गलबतांवर हल्ले करून चांचे लोक त्यांनां अठराव्या शतकाच्या आरंभीं फार उपद्रव देत असत. त्यांच्या लुटारूपणाचा बंदोबस्त करावा व पश्चिम किनाऱ्यावरील कोणा एका तरी राजाचा स्नेह संपादन करावा ह्मणून सन १७३० मध्यें इंग्रजांनीं फोंडसांवताबरोबर तह केला. तहनाम्यांत असें ठरलें कीं कुलाब्याच्या कान्होजी आंग्र्याबरोबर लढण्यास उभयतांनीं एकमेकांस मदत करावी आणि लढाईंत जो मुलुख काबीज होईल त्या पैकीं घेऱ्या किल्ला व खानेरी (व क्यानेरी) बेट मात्र इंग्रजांनीं ठेऊन घ्यावें आणि बाकी सारा मुलुख सांवतांच्या हिश्शास द्यावा.

फोंडसांवताचा ज्येष्ठ चिरंजीव नारसांवत याणें त्याच्याशीं बिघडून बंड केलें, आणि त्यांतच तो मारला गेला. तेव्हां फोंडसांवताला पुत्र शोक फार होऊन राज्य नकोसें वाटूं लागलें, आणि त्याणें तें आपला नातू रामचंद्र सांवत याच्या स्वाधीन केलें. त्याणें त्याचा उपभोग १९ वर्षें केला, परंतु तितक्या काळांत सांगण्या सारखी महत्वाची गोष्ट कांहींच घडली नाहीं. तो सन १७५९ मध्यें वारला, तेव्हां त्याचा अल्पवयस्क पुत्र खेमसांवत गादीचा मालक झाला, आणि पुढें लौकरच कोल्हापूरकरांबरोबर लढाई सुरू झाली. लढाईस कारण म्हटलें तर सरदेसाई आपल्यास स्वतंत्र ह्मणवूं लागले हें छत्रपतीस सहन झालें नाहीं, आणि त्यांचा त्यांचा फार दिवसांपूर्वीपासून द्वेष पडलेला होता, या वांचून दुसरें कांहीं नव्हतें. या वेळीं प्रथम कुरापत महाराजांनीं काढली, आणि तिला द्वेषावांचून दुसरें कारण कांहीं नव्हतें. खेमसांवताच्या पालनकर्त्यास येवढें एकच संकट येऊन राहिलें नाहीं. त्यांच्या शेजारी खालच्या बाजूस गोंव्याचे फिरंगी आणि वरच्या बाजूस इंग्रज हे दोघे ही लढाईस उठले. कारण सांवताच्या प्रजांनीं चांचेगणा करून त्यांच्या गलबतांस फार उपद्रव दिला होता. चांच्यांचा उ

पद्धव मोडावा, ह्मणून खेमसांवतांच्या आजाचा आणि इंग्रजांचा तहनामा झाला होता, हें मागें सांगितलेंच आहे, परंतु आतां त्याच्या पालनकर्त्यांकडून त्या लोकांना फूस मिळाल्या मुळें म्हणा, किंवा त्यांना दहशत माहींशी झाल्यामुळें म्हणा, त्यांणीं इंग्रजांच्या गलबतांवरच शस्त्र धरलें. त्यांणीं सन १७६५ मध्यें आपल्या मुंबई आरमारापैकीं कांहीं गलबतें मेजर गॉर्डन व कॅप्टन जॉन वॉटसन या उभयतां अम्मलदारांबरोबर देऊन त्यांना कोल्हापूरकर व सांवतवाडीकर चांच्यांचा बंदोबस्त करण्यास हुकूम दिला. त्या प्रमाणें त्यांणीं कांहीं काळ पर्यंत आपला दरारा बसविला. सावंतवाडीकरांचा यशवंतगड ऊर्फ रेडी किल्ला घेऊन त्यांणीं त्याचें नांव फोर्ट ऑगस्टस असें ठेविलें. परंतु पुढें त्या पासून कांहीं नफा होत नाहीं, असें दिसलें, तेव्हां सरकारानें तो देसायांस परत दिला, आणि त्यांजकडून असा करार करून घेतला, कीं तुमच्या गलबतांस किंवा व्यापारास आम्हीं अगदीं उपद्रव देणार नाहीं ; कारली व साळशी या दोहों नद्यांच्या दरम्यानचा मुलुख घाटपायथ्यापासून तहत समुद्रापर्यंत सारा तुम्हांस देऊं, स्वारीखर्चाबद्दल एक लाख रुपये देऊं, व आमचे मुलखांत तुम्हांस एक किल्ला बांधूं देऊं.

खेमसांवत जर प्रौढवयाचा असता आणि राज्यकारभार स्वतः चालविण्याची त्याला शक्ति असती. तर त्याणें या तहनाम्याप्रमाणें वर्तन केलें असतें. परंतु त्याच्या आप्त वर्गांतले कामदारांची सारी नजर कायती लुटीवर होती, ह्मणून त्यांणीं तहनाम्यावर सही होते, इतक्यांतच त्याच्या उलट वागण्यास आरंभ केला, त्या मुळें फुकट संस्थानाचें नुकसान झालें. इंग्रजांनीं तो तह रद्द करून लागलाच दुसरा पतकरावयास लाविलें ; त्यांत स्वारीखर्चाबद्दल एक लाख होते, ते दोन लाख कबूल करविले, आणि पैसा रोख नाहीं, ह्मणून वेंगुर्ले महाल, तें शहर व बंदर, तेरा वर्षांच्या मुदतीनें किंवा पुढें ऐवज फिटेपर्यंत गाहाण ह्मणून कबज्यांत घेतलें, आणि बाकी शर्तीं पुऱ्या होण्याकरितां दोन मनुष्य ओलीस घेतले.

या करारा नंतर थोड्याच दिवसांनीं एक चमत्कारिक गोष्ट घडली; ती ह्मटलें असतां तहकरणाऱ्या उभय पक्षांस लज्जास्पद आहे. त्यावेळीं इंग्रजांनां सारा पैसा एकदम रोख पाहिजे होता ह्मणून त्यांणीं विठोजी कोसटी ह्मणून एक सावकार होता त्याजकडून ऐवज घेऊन वेंगुर्ले महाल त्याच्या ताब्यांत करविला आणि तो त्याजकडे चालविण्याचा आपण हमी घेऊन त्या-

च्या संरक्षणार्थ आपले शिपाई नेमून देऊन आपला बावटा चढविला. तहनाम्यावर सही झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं ते ओलीस घेतलेले दोन ही मनुष्य पळाले. मग खेमसांवत फौज जमवून वेंगुर्ल्यावर चालून गेला आणि विठोजीनें वसूल जमा करण्याकारिता जे गुमस्ते ठेविले होते त्यांस हाकून लाऊन परत आला. त्यांत आश्चर्य मानण्याची गोष्ट येवढीच कीं त्याणें इतका उघड अन्याय आणि जुलूम केला तरी त्यांला इंग्रज " असें करूं नये " याच्या पलीकडे एक शब्द बोलले नाहींत. इतकेंच नव्हे तेरा वर्षांची मुदत होती, ती संपली, तेव्हां सन १७८० च्या जून मध्यें खेमसांवतानें वेंगुर्ल्यावर पुनः हल्ला करून तें घेतलें, आणि इंग्रजांचा पुष्कळ खासगी व सरकारी ही माल लुटला तरी त्याला कोणी प्रतिबंध केला नाहीं. याचें कारण असें असावें, कीं त्यांत इंग्रजांचें नुकसान कांहीं नव्हतें ; काय तो गाहाणदार विठोजी बुडाला. बुडेना ! त्याला त्यांची बहादरी होती, परंतु त्याच्या पदरांत महालाचा वसूल कांहीं पडला नाहीं. खेमसांवताला असा खुशाल दंगा करायाला सांपडला, त्यामुळें त्याला पुनः चांचेपणा करण्यास ही उत्तेजन आलें, आणि तो त्याचा धंदा पुढें बत्तीस वर्षे अप्रतिहत चालला होता. त्या पुढें बंद झाला.

या खेमसांवतानें ४८ वर्षे राज्य अनुभविलें. त्याला थोरला खेमसांवत म्हणत. सयाजीराव शिंद्यानें त्याला आपली कन्या दिली होती, आणि दिल्लीपतीकडून त्याला रावबहादूर असा किताब मिळाला होता. त्याच्या कारकीर्दभर बहुतकरून लढायाच चालल्या होत्या. तो सन १८०३ मध्यें वारला, तेव्हां कोल्हापूरकरांबराबर मोठें तुंबळ युद्ध चाललें होतें, आणि राज्यांत लुटालुटीचा प्रकार अगदीं अनन्वित होऊन गेला होता.

खेमसांवताला मुलगा नव्हता, ह्मणून त्याच्या बापाचे दोघे चुलत भाऊ आपल्याला गादी मिळावी, ह्मणून भांडूं लागले. तो गृहकलह बराच चालून पुढें दोन वर्षांनीं त्याची ज्येष्ठ पत्नी लक्ष्मीबाई हिणें रामचंद्रसांवत ऊर्फ भाऊ साहेब यास दत्तक घेऊन गादीवर वसविलें. आणि आपल्या हातीं कारभार घेतला. परंतु खेमसांवत मरून थोडी गडबड होतांच देसाः याचे शत्रु करवीरकर महाराज यांणीं त्याच्या मुलखावर स्वारी केली, आणि त्याचे सैन्याचा मोड करून वाडीस वेढा घातला. त्या संकटांतून पार पडण्या करितां लक्ष्मीबाईनें विश्वासराव घाटगे व आपा देसाई निपाणकर हे

शिंद्याच्या व पेशव्यांच्या पक्षाचे जाणून त्यांची मदत मागितली. निपाणकरानें गुप्तपणें पेशव्यांची संमति घेऊन तिला मदत दिली, आणि महाराजांनीं आपण होऊन वेढा उठवून चालतें व्हावें, अशी युक्ति काढली. ती ये वढीच कीं ते दूर गेलेले पाहून त्याणें कोल्हापुरास वेढा घालण्याचा बेत के ला. हें आपल्या घरावर संकट आलेलें पाहून महाराज वेढा उठवून घर संभाळण्यास चालते झाले. असा आपा देसायाचा डाव साधून वाडी बचा वली. तनदंतर त्याला असा लोभ उत्पन्न झाला कीं आतां वाडीचें राज्य आपल्याच मुठींत असावें. मग त्याणें युक्तीनें भाऊसाहेबाचा चुलत चुलता फोंडसांवत व लक्ष्मीवाई यांस वश करून घेऊन त्यांच्या व आपल्या एका मु ख्य मसलतदाराच्या विचारें मालकास अजीबाद टाळावें असें ठरविलें आ णि भाऊसाहेब निजला असतां बिछान्यांतच त्याचा गळा दाबून प्राण घेत-ला. (सन १८०७) परंतु त्या घोर पातकापासून निपाणकरास दुष्की-र्तिं शिवाय दुसरा कांहीं लाभ झाला नाहीं. आपल्याला गादी मिळावी अशी फोंडसांवताची इछा प्रथम पासून होतीच, ह्मणून ती रिकामी होतांच त्याणें बळकाविली आणि निपाणकरास वाडींतून हाकून लाविलें.

त्यानंतर थोड्याच काळाने लक्ष्मीवाई वारली, तेव्हां तिची सवत दु र्गाबाई आतां मी मालकीण असें म्हणूं लागली, परंतु फोंडसांवतानें तिला बाजूस वसावयास लाविलें.

या प्रमाणें फोंडसांवताची कारकीर्द सुरू झाली तेव्हां चांचेपणा चा लू होताच. इतकेंच नव्हे, ती एक संस्थानच्या उत्पन्नाची बाबच समजत असत. परंतु सन १८१२ मध्यें इंग्रजसरकारानें असें मनांत आणलें कीं आतां या गोष्टीचा पक्का बंदोबस्त केलाच पाहिजे, इतउत्तर हा उपद्रव सो-सावयाचा नाहीं. मग त्याच वर्षी आक्टोबर महिन्यांत फोंडसांवताबराबर तह झाला. त्यांत असें ठरलें, कीं वेंगुर्ले किल्ला व बंदर व त्या खालचा मु-लुख इंग्रजांजे स्वाधीन करावा, आणि जर कोणी एकादें गलबत लुटलें, त-र रेडी व नेवती हे आणखी दोन किल्ले द्यावे ; रीतीप्रमाणें जकात देऊन इंग्रज व्यापाऱ्यांनीं सांवतवाडी मुलखांत माल न्यावा आणावा, परंतु वाडी प्रांतांत जी फौज राहील तिचे उपयोगाकरितां येणाऱ्या कोणत्या ही माल वर जकात घेऊं नये.

हा तह झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं सन १८१३ मध्यें फोंड-

सांवत वारला, आणि त्याचा मुलगा खेमसांवत गादीवर वसला. परंतु तो अल्पवयी होता, ह्मणून खेमसांवताची द्वितीय स्त्री दुर्गाबाई त्याची पालनकर्ती ह्मणून कारभार पाहूं लागली. तिणें लागलाच कोल्हापूरकरांशीं कलह सुरू करून भरतगड व नरसिंहगड हे दोन किल्ले बळकावले. ते पहिले वाडीपैकींच होते, परंतु कांहीं वर्षांपूर्वी कोल्हापूरकरांनीं घेतले होते. त्या नंतर त्यांचा व इंग्रजांचा तह झाला होता, त्यांत कोल्हापूरचे राज्याचें संरक्षण करण्याचें त्यांणीं आपल्या शिरावर घेतलें होतें ; ह्मणून ते किल्ले सोडण्याविषयीं त्यांणीं दुर्गाबाईस पुष्कळ प्रकारांनीं सांगितलें, परंतु ती अगदीं ऐकेना, तेव्हां लढाई सुरू केली, आणि मालवणाल्लगतचे दोन महाल घेऊन वाडीवर चालून जाण्याकरितां तयारी सुरू केली. इतक्यांत तेथेंच बंड उद्भवलें. खेमसांवताची चौथी स्त्री दुदाबाई हिणें एक तोतया भाऊ साहेब उभा केला, आणि निपाणकरानें गळा दाबून मुलगा मारला म्हणतात तें खोटें, तोच हा भाऊ साहेब, असें ह्मणून त्याला गादीवर वसविण्याचा इरादा धरला. तिच्या पक्षाला पुष्कळ लोक मिळाले, आणि त्यांणीं कांहीं किल्ले ही घेतले. कित्येकांचें लक्ष नुसत्या लुटीवर होतें, आणि त्यांणीं आपलें तेवढेंच कार्य साधून घेतलें. असा साराच वंडावा माजला, तेव्हां दुर्गाबाईनें इंग्रजांकडे बोलणें लाविलें, परंतु आम्ही ह्या प्रकरणांत पडत नाहीं, असें त्यांणीं उत्तर दिलें. तेव्हां संभाजीसांवत वगैरे जी मंडळी तिच्या पक्षाला अनुकूल होती, त्यांच्याच मदतीनें तिणें तें तोतयाचें बंड मोडून पुनः आपला अम्मल पूर्ववत बसविला. तदनंतर पेशव्यांची आणि इंग्रजांची लढाई सुरू झाली, तेव्हां दुर्गाबाईनें आपल्या हातून झाली तितकी बाजीरावास मदत केली. तो पळाला, पेशवाई बुडाली, तरी तिचे लोक इंग्रजांचा मुलुख लुटीतच होते. परंतु पुण्याकडील सर्व प्रकरण स्थिरावलें तसे इंग्रज देसायावर चालून गेले. त्यांणीं रेडी व नेवती हे किल्ले देऊन तहास मान्य व्हा, असें सांगून पाठविलें. इतक्यांत दुर्गाबाई मेली, आणि फोंडसांवताच्या दोघी स्त्रिया सावित्रीबाई व नर्मदाबाई कारभार करूं लागल्या. त्या तहास झटकर कबूल झाल्या. मग तारीख १७ फेब्रुआरी सन १८१९ रोजीं तह नामा पुरा झाला ; त्यांत असें ठरलें, कीं इंग्रजांनीं वाडीच्या राज्याचें संरक्षण करावें, देसायांनीं त्यांचें वर्चस्व मान्य करावें, कारलीनदीपासून तहत गोमांतकाच्या हद्दीपर्यंत समुद्रकिनाऱ्यावरचा हक्क सोडावा, आणि इंग्रजां-

ची फौज वाडीस ठेऊन घ्यावी. दरबारने अपिल्या अटी लौकर मुकाल्यानें मान्य केल्या, ह्मणून इंग्रज सरकारानें खुष होउन पूर्वी घेतलेल्या पैकी दरसाल ३०००० रुपये निवळ उत्पन्नाचा मुलुख पुढच्या वर्षी परत दिला.

सावित्रीबाई व नर्मदाबाई यांच्या हातांत जो अधिकार आला तो त्यांनां सोडावासा वाटेना. पुढें खेमसांवत वयांत आला तरी राज्यकारभारांत त्या त्याला बोलूं देखील देतना. परंतु त्यांचा तो जबरदस्तपणा फार दिवस चालला नाहीं सन १९२२ मध्यें खेमसांवत मुकत्यार ह्मणून सर्व अधिकार चालवूं लागला, परंतु त्याच्या अंगांत कांहींच पाणी नव्हतें आणि थोड्याच दिवसांत हा येवढ्या मोठ्या पदाला अगदीं लायक नाहीं असें दिसून आलें. राज्यांत सारी अव्यवस्था होऊन बेबंदी झाली; त्याच्या मूर्खपणामुळें बंड़ावा झाला, तो मोडण्याकरितां सन १९३० मध्यें त्याणें इंग्रजसरकारास विनंती केली. पुढें सन १९३२ मध्यें पुनः तसाच प्रसंग आला तेव्हां इंग्रजांबराबर त्याणें जो तहनामा केला त्याला हेतु ह्मणून आरंभींच अगदीं लाजिरवाणा मजकूर लिहून दिला. तो असा—माझ्या दुर्वर्तनामुळें माझ्या मुलखांत अनेक वेळ अव्यवस्था आणि गोंधळ उडून गेला. असो. ह्या तहनाम्यांत त्याणें असें कबूल केलें कीं सरकार पसंत करील त्या मनुष्यास मी आपला कारभारी नेमीन आणि सरकारच्या मंजुरीवांचून त्याला दूर करणार नाहीं; तो कारभारी सांगेल आणि सरकार पसंत करील त्या त्या सुधारणा करीन; या करारांप्रमाणें न वागेन तर जरूर पडल्यास गादीचा हक्क सोडीन; मुलखाचा बंदोबस्त करण्याकरितां सरकारास कांहीं फौज पाठवावी लागली तर तिचा खर्च देईन.

या प्रमाणें त्याणें जरी अगदीं लज्जास्पद करार केले, ते मोडले असतां राज्य सोडीन, असें कबूल करून लिहून दिलें, तरी त्याच्या वर्तनांत कांहीं अंतर पड़लें नाहीं. जितकें साधेल तितकें त्या तहाला सोडून वागण्याचा त्याचा निश्चय असल्यासारखा होता. तो कारभाऱ्यावर नेहेमी वरचेवर फिर्यादी करी, चौकशीअंतीं त्या निराधार व आदावतीच्या ठरत. त्याचे सरदार त्याला कंदाळून स्वतंत्रपणानें वागूं लागले, त्याचा अधिकार मानीतनासे झाले. असें होतां होतां राज्यांत स्वस्थता व बंदोबस्त राखण्याकरितां सन १९३६ मध्यें सरकारास हात घालावा लागला. या प्रमाणें साठ वर्षांत चार वेळ झालें. सन १९३८ मध्यें पुनः तसा प्रसंग आला,

तव्हां एका अम्मलदारानें त्या मुलखाच्या स्थितीविषयीं सरकारास रिपोर्ट केला, त्यांत असें लिहिलें आहे—— देसायाच्या अंगांत आपला मुलख नीट संभाळण्याचें सामर्थ्य नाहीं, व तो अयोग्य आहे, असें पुनः पूर्ववत दिसूं लागलें. आपलें जीवित व वित्त सुरक्षित रहाणें कठीण. अशी लोकांस पुनः पूर्वी प्रमाणें भीति वाटूं लागली आहे ; फोंडसांवताच्या लोकांच्या टोळ्या अजून मुलखांत उपद्रव देतच आहेत, व त्यांत आणखी आणखी लोक येऊन भरत आहेत. लुटारूंच्या आणखी ही टोळ्या उठल्या आहेत ; त्या सरदेसायास मुळींच भीत नाहींत ; त्याच्या अमलांतील गांवांतील गरीब बिचाऱ्या प्रजेस लुटतात, आणि लगतच्या आमच्या हद्दीतील गांवांवर अद्याप जरी त्यांचा हल्ला झाला नाहीं, तरी लोकांस त्यांची भीति वाटत आहे. या टोळ्यांच्या नायकांशीं देसायानें कांहीं बोलणें लाविलें होतें, परंतु ते तें मान्य करीत नाहींत. सरकारानें त्याला जो कारभारी नेमून दिला आहे, त्याच्या सल्लयानें वागण्याचा त्याणें करार केलेला आहे, परंतु तो त्या प्रमाणें चालत नाहीं, त्याचें ऐकत नाहीं, व त्याणें कांहीं काम सुरू केलें, तर त्यास मदत देत नाहीं. त्याचें वर्तन पाहिल्याप्रमाणें हद्दीपणाचें असून त्याच्या जवळ मर्जीतले म्हणून जे लबाड, वाईट चालीचे मनुष्य आहेत, ते जशी भर देतात, तसा तो वागतो.

अशी राजस्थिति झाली, म्हणजे पुढें जो परिणाम व्हावयाचा तो होण्यास मग अवकाश लागला नाहीं. राज्यांतील चांगले लोक तो मुलुख सोडून भराभर बाहेर जाऊं लागले, आणि जे तेथेंच राहिले, त्यांच्यावर झोटिंगबादशाहीचा अम्मल चाललाच होता.

या प्रमाणें वाडीच्या राज्याची अगदीं दुर्दशा झालेली पाहून सन १८३८ मध्यें इंग्रजसरकारास वाटलें कीं आतां ही स्थिति अशी राहूं देणें कांहीं इष्ट नाहीं, आतां आपण यांत हात घातलाच पाहिजे. मग सरकारानें असा ठराव केला कीं खेमसांवतास गादीवरून काढून फक्त नेमणूक देऊन ठेवावें आणि सर्व अधिकार आपण चालवावा.

सरकारचा विचार ठरला तो लागलाच आमलांत आला. त्यांणीं आपल्या हातांत अधिकार घेतला आणि बंड मोडून कामकाजाची नीट व्यवस्था लाविली तेव्हां लोकांस ही भरंवसा आला. परंतु तेवढ्यानें प्रजेचें नष्टचर्य संपलें असें झालें नाहीं. सांवताच्या पदरचे सरदार जसे त्याला ज़ुमानीत

नव्हते तसे सरकाराला ही ऐकतना. त्यांणीं सन १८३९ मध्यें दंगा केला. सरकारानें तो मोंडला, तरी पुनः पांच वर्षांनीं त्यांणीं आणखी बंड केलें. याप्रसंगीं खेमसांवताचा मुलगा फोंडसांवत ऊर्फ अण्णासाहेब हाही त्यांस सामील झाला. इंग्रजांचा अम्मल येथें नको, असें त्या सरदारांस वाटत होतें, परंतु सरकारानें बंड मोडून त्यांस चांगलें ताळ्यावर आणलें. बंडवाल्यांचा पराभव झाला, तेव्हां अण्णासाहेब पळाला, तो गोमांतकांत जाऊन राहिला ; परंतु पुढें त्याला स्वदेशीं येण्याची इछा झाली, तेव्हां सरकारानें येऊं दिलें ; परंतु गादीवर मी अगदीं वारसा सांगणार नाहीं, असा त्याचा बेदावा घेतला. पुढें सन १८५७ मध्यें थोरलें बंड उद्भवलें, तेव्हां खेमसांवत व अण्णासाहेब यांच्या हातांत कांहीं सत्ता वगैरे नव्हतीच ; तरी ते सरकाराशीं नीट वागले, झणून सरकारानें मेहेरबानी करून सन १८६१ मध्यें अण्णासाहेबास क्षमा केली, व त्याला खेमसांवताच्या पश्चात् गादी मिळावी, असें ठरविलें. परंतु त्याजपासून तेव्हांच असे करार करून घेतले, कीं सन १८४४ चें बंड मोडण्यास सरकारास जो खर्च लागला, तें संस्थानाकडे सरकारचें कर्ज येणेंच होतें, तें सर्व त्याणें फेडावें ; गादीवर बसते वेळीं एक सालचा वसूल नजराणा द्यावा ; आपल्या प्रजेच्या संरक्षणा विषयीं कसें वागावें ते करार गादीवर बसते वेळीं व्हावे, व वाडीस सरकारचा एजंट राहील त्याचा सर्व खर्च त्याणें द्यावा. सरकारचें कर्ज साडेपांच लाख रुपयांवरच झालें होतें, तें सन १८६२ मध्येंच फिटलें. पुढें सन १८६७ मध्यें खेमसांवत वारला, आणि अण्णासाहेब गादीवर बसला, तेव्हां पूर्वी ठरल्याप्रमाणें सरकारानें एक सालचा वसूल नजराणा झणून घेतला. अण्णासाहेबास अफू खाण्याचें व्यसन फार असल्यामुळें त्याच्या हातून राज्यकारभार नीट चालणार नाहीं व पूर्ववत अव्यवस्था होईल झणून त्याणें अमूक प्रकारानेंच वागावें, असा बंदोबस्त सरकारानें तेव्हांच करून घेतला ; परंतु ते कागद पुरे होण्या पूर्वीच सन १८६९ च्या मार्च महिन्यांत तो वारला आणि पुनः सर्व कारभार सरकारच्याच हातांत गेला.

भाग ४

कच्छ

कच्छच्या राज्याच्या उत्तरेस व वायव्येस सिंधप्रांत, पूर्वेस गायकवाडाचा मुलुख, दाक्षिणेस काठेवाड व कच्छचें अखात, आणि नैर्ऋत्येस समुद्र आहे.

कच्छ प्रांतांत प्राचीन काळीं धनगर वगैरे लोक रहात असावे ; कारण कुणबी ह्मणजे शेतीभाती करणारे यांची या देशांत केव्हांच मोठीशी वस्ती असल्याचें दिसून येत नाहीं. या देशांत पाहिले राज्य करणारे चौरा रजपूत होते, परंतु आतां त्यांचा ही कोठें मागमूस राहिलेला आढळत नाहीं. पंधराव्या शतकाच्या सुमारास सिंध प्रांतांतून सम्म कुलापैकीं झारा नामक सरदाराचा पुत्र लखा हा आपल्या लोकांसह येऊन येथें राहिला. हा जातीचा हिंदू कीं मुसलमान या गोष्टीचा कच्छ प्रांतांतील लोकांस ही अद्याप संशयच आहे, निश्चयात्मक कांहींच सांगवत नाहीं. असो. त्याणें तेथचें राज्य काबीज करून घेऊन आपल्यास जाम असें पद स्वीकारिलें व आपल्या कुळास झारेझा असें नांव ठेविलें. जाम लखा याच्या पश्चात त्याच्या तिघा नातवांनीं कच्छप्रांत विभागून घेतला. त्यांचीं नांवें जामदादूर, जामहमीर व जामरावळ अशीं होतीं. सन १५४० च्या सुमारास ते राज्य करीत होते. कच्छ प्रांताचा पूर्वभाग वाघर हा दादूर याच्या ताब्यांत होता ; रावळानें हमीराचा खून करून त्याचा हिस्सा व आपला हिस्सा मिळून पश्चिमेकडील सारा मुलुख एकत्र करून राज्य चालविलें. त्यासच कच्छ ह्मणतात. हमीराचा मुलगा खेनगार हा बापाचा खून होतांना अमदाबादच्या राजाच्या आश्रयास जाऊन राहिला. त्याजपासून त्याणें मोरवी प्रांत व राव असा किताब संपादला——कच्छच्या राजांस हाल्लीं हाच चालत आहे——आणि त्याच्याच सहायानें बापाचा खून करणाराचा सूड घेऊन त्याला हांकून लाविलें, आणि दुसरा चुलता दादूर यास ही जिंकून प्रपितामहार्जित सर्व राज्य काबीज केलें.

सन १५८२ मध्यें हें राज्य अगदीं स्वतंत्र होतें, असें अबुलफजल

यानें वर्णन केलें आहें. परंतु त्याचा परमोत्कर्ष अठराव्या शतकाच्या पहिल्या पन्नाशींत झाला, असें दिसतें. त्या वेळीं राव दासल गादीवर तोता. त्याचा अम्मल सिंध, पारकर व काठेवाड या मुलखांत चालत होता. त्याच्या मागून सन १७९१ मध्यें राव लाख गादीवर बसला, त्यानें हे प्रांत गमाविले. त्याची कारकीर्द थोड्याच काळांत आटोपून राव घोर गादीवर बसला. तो अगदीं दुर्बळ होता, त्यामुळें राज्यभर अव्यवस्था आणि बेबंद शाई उडाली. तो सन १७७८ मध्यें वारला, आणि राव रायधन गादीवर बसला. हा खेनगारापासून अकरावा पुरुष. रायधनाचा स्वभाव अनिवार तापट होता. तो क्रोधांध होऊन अतिशय क्रूर कर्में करी ; असें होतां होतां त्याला तें वेडच लागलें. तेव्हां त्याच्या पदरच्या सरदार वगैरे मंडळीनें त्रासून सन १७८६ मध्यें त्याला कैद करून ठेविलें. तेव्हांपासून त्यांच्यांत अधिकाराविषयीं कलह सुरू होऊन सन १७९२ मध्यें जमादार फत्तेमहंमद ह्मणून एक हुशार कामदार होता, तो कारभार करूं लागला. तो प्रथम सामान्य शिलेदार होता. पुढें भाईजीबाबा ह्मणून रावाचा भाऊ होता, त्याला पुष्कळ लोक अनुकूल होऊन सन १८०२ मध्यें त्यानें फत्तेमहंमदास हांकून दिलें. परंतु नंतर लौकरच त्यानें ही फौज जमवून कांहीं मुलुख काबीज करून घेतला, आणि अंजर येथें राहून त्यावर अम्मल चालविला. त्याच्या प्रतिपक्षाकडे हंसराज दिवाण प्रमुख होता, तो मांडवी येथें ठाणें घालून बाकीचा मुलुख संभाळून राहिला, राजधानी भूज येथें वेडा राव रायधन हा होता.

या प्रमाणें कच्छ मंध्यें दुफळी सुरू झाली, तेव्हां कांहीं लोक हंसराजास मिळाले, व कांहीं फत्तेमहंमदास मिळाले, परतु कित्येक झारेजे सरदार कोणासच न मिळतां स्वस्थ राहिले. परंतु पुढें थोडक्याच काळांत फत्तेमहंमदानें भूजवर हल्ला करून तेथें आपलें ठाणें घातलें, तो तेथून गुजराथ व काठेवाड प्रांतांवर स्वाऱ्या करून उपद्रव देऊं लागला, आणि समुद्रावर कच्छी लोक चांचेपणा ही फार करूं लागले, तेव्हां इंग्रज सरकारानें सन १८०९ मध्यें फत्तेमहंमद व हंसराज या उभयतां बराबर तह केले. त्यांत असें ठरलें, कीं त्यांणीं कच्छच्या अखाताच्या व रणाच्या पूर्वेकडील मुलखांवर आपले कांहीं हक्क असले तरी सोडून द्यावे, चांच्यांचा बंदोबस्त करावा, व आपल्या मुलखांत अन्य कोणा युरोपियन अगर अमेरिकन लो-

कांस येऊं देऊं नये. राव आपलें राज्य स्वतः चालवूं लागे पर्यंत इंग्रजांनीं हंसराजास मांडवी येथें स्वतंत्रपणें अधिकार चालवूं देऊन त्याचें रक्षण करावें.

या तहानंतर लौकरच हंसराज वारला, आणि त्याचा मुलगा शिवराव तो अधिकार चालवूं लागला, तेव्हां फत्तेमहंमदानें त्याच्याशीं युद्ध सुरू केलें. शेवटीं स्वस्थता करण्या करितां इंग्रज सरकारास आपली फौज पाठवावी लागली. अखेर हंसराजाच्या मरणापूर्वीं चालत आल्याप्रमाणें उभयपक्षांनीं वहिवाट करावी असें ठरलें.

सन १८०९ मध्यें जो तह झाला, त्या प्रमाणें वर्तन घडेना, म्हणून कित्येक वेळ सांगून पाहून शेवटीं सन १८१३ मध्यें सरकारानें एक अम्मलदार पाठविला. त्याणें सक्तीचें बोलणें लाऊन दुसरा तह ठरविला, परंतु तो पुरा होण्यापूर्वीच फत्तेमहंमद वारला. त्याच्या मागून एका महिन्यानेंच वेडा राव रायधन ही नवंबर मध्यें वारला.

रायधनास मानसिंग ऊर्फ भारमल्ल नामक अठरा वर्षांचा एक अनौरस पुत्र होता, व लाडोबा नामक पुतण्या होता ; त्यांचा गादीविषयीं लागलाच कलह सुरू झाला. त्यांत हुसेनमिय्यां व इब्राईममिय्यां हे फत्तेमहंमदाचे पुत्र भारमल्लास सामील झाले, त्यामुळें लाडोबाचें कांहीं चाललें नाहीं.

भारमल्ल बापा प्रमाणेंच वेडा होता. त्याणें गादीवर वसतांच क्रूर कर्म व आपल्या शेजारच्या राजेरजवाड्यांस उपद्रव देण्यास सुरवात केली. पुढें लौकरच त्या उभयतां मिय्यांचा ही त्यास आधार नाहींसा झाला—कारण एकाचा भर दरबारांत खून झाला, तेव्हां आतां आपला एकट्याचा निभाव लागणें कठीण असें समजून दुसरा मुकाट्यानें वाजूस झाला. तेव्हां पासून तर भारमल्ल अगदींच अनावर झाला ; आणि तशांत अतिशय मद्यपान करूं लागला, त्यामुळें त्याच्या वेडास सीमाच नाहींशी झाली. तो अगदीं अनर्थावह जुलूम करूं लागला, तेव्हां त्याच्या मुलखांत जबरीनें जाऊन व्यवस्था लाविली पाहिजे, असें सरकारास वाटलें, आणि फौज रवाना झाली. मग सन १८१६ च्या जानेवारी महिन्यांत तह झाला, त्यांत असें ठरलें, कीं वाघर लोकांनीं सरकारच्या मुलखांत लूट करून जें नुकसान केलें तें रावानें भरून द्यावें, चांच्याचा बंदोबस्त करावा, पुंड लोकांस आपल्या

मुलखांत आश्रय देऊं नये ; अंजर किल्ला, तुरिया बंदर व त्या लगतचे २४ गांव सरकारास द्यावे, आणि शिवाय रावशाई दोन लाख ह्मणजे सुरती ७०००० रुपये प्रतिसाल द्यावे ; या बदला इंग्रज सरकारानें वाघर लोकांचा बंदोबस्त करून रावाच्या सर्व राज्यांत शांतता करावी, व त्याचा अम्मल सुरळीत चालेसा करून दावा. हा बंदोबस्त त्यांणीं एका महिन्यांत चांगला करून दिला. या तहनाम्यांत अकरावें कलम असें होतें, कीं कच्छच्या हद्दींत गाई, बैल, ह्मशी वगैरे पशूंचा वध किंवा रावाच्या प्रजाजनांस धर्म संबंधानें वाईट वाटेल अशी हिंसा करूं नये. गेलीं वीस वर्षें सतत त्रास पोहोंचल्या मुळें हा मुलुख अगदीं निस्त्राण झाला होता, ह्मणून त्याची विपन्नावस्था मनांत आणून या तहानंतर कांहीं महिन्यांनीं सरकारानें आपण होऊन रावास सैन्याबद्दलचा खर्च माफ केला, व वार्षिक खंडणी ठरली होती, ती ही सबंद सोडली.

सरकारानें कृपा करून हा नवीन ठराव अमलांत आणला न आणला इतक्यांत भारमल्लानें आपला पूर्वोक्त क्रूरत्वाचा वर्तनक्रम सुरू केला. लाडोबा जो गादीचा खरा वारस, त्याचा त्याणें खून केला. नंतर अंजरवर हल्ला करण्याकरितां नवीन फौज ठेविली, आणि वाघर सरदारांस सरकारचें अभयवचन असतां त्यांच्या जाहागिरींवर हल्ला करून असें स्पष्ट म्हटलें, कीं इंग्रज आपलें संरक्षण करतील असें ज्यांनां ज्यांनां वाटत असेल त्यांची दशा अशीच करीन. या प्रमाणें त्याचा जुल्म जेव्हां अगदीं असह्य झाला, तेव्हां आतां आह्मास यांतून सोडवा, अशी कित्येक झारेजे सरदारांनीं सरकारास विनंती केली ; तेव्हां सरकारास विचार करणें आलें.

सरकाराला दुसरा कांहीं उपाय दिसेना, ह्मणून सन १८१६ चा तहनामा कांहीं काळ तहकूब ठेवावा, असें ठरवून त्यांणीं रावाच्या मुलखांत फौज रवाना केली. तदनंतर तह व्हावा, असें ठरलें. भारमल्लास अगदीं वेड लागलें, असें पाहून सरकारानें त्यास पदच्युत करून त्याचा पुत्र दयसल यास गादीवर बसविलें, आणि तो अल्पवयस्क ह्मणून कारभार चालविण्या करितां सहा झारेजे सरदारांचें प्रतिनिधिमंडळ नेमलें, व त्यांणीं आग्रह केल्यावरून आपल्या रेसिडेंटाची ही त्यांतच योजना केली. तसेंच त्या मुलखाच्या संरक्षणाकरितां आपली फौज ठेऊन ती कमी करणें अथवा अजी काढणें हें आपल्या मर्जीवर ठेवलें. पुढें सन १८१९ च्या आक्टोबर

महिन्यांत तह झाला त्यांत असें ठरलें कीं ह्या फौजेचा खर्च रावानें चालवावा ; स्वचक्रपरचक्रापासून राज्याचें संरक्षण इंग्रजांनीं करावें, त्याणें अन्य राजेरजवाड्यांशीं राजकीय प्रकरणीं पत्रव्यवहार ठेऊं नये, दुसऱ्यास उपद्रव देऊं नये व बालहत्या* करूं नये. याच तहनाम्यांत आणखी असे ठराव झाले कीं झारेझे भायाद व इतर रजपूत वगैरे सरदारांनीं बालहत्या करणार नाहीं, केल्यास उभय सरकारांचे विचारें ठरेल ती शिक्षा भोगूं ह्मणून पृथक करारनामे लिहून द्यावे आणि त्यांच्या जाहागिरी त्यांजकडे निर्वेध चालाव्या ; येविषयीं इंग्रजसरकार जिम्मेदार झालें. तदनंतर लौकरच कित्येक वाघर सरदारांकरून आह्मी दंगा करणार नाहीं, स्वस्थता राखूं असे करार करून घेऊन प्रतिनिधिमंडळानें त्यांचीं संस्थानें त्यांस परत दिलीं.

पुढें सन १८२२ मध्यें अंजर किल्ला, शहर, व महाल, सरकारानें रावास परत देऊन त्याबद्दल प्रतिसाल ८८००० रुपये घेण्याचें ठरविलें. सरकारानें जी फौज कच्छमध्यें ठेविली होती, तिच्या खर्चाबद्दल वर्षास दोन लाख रुपये रावास द्यावे लागत, परंतु ते देण्याची त्यास शक्ति न सल्यामुळें हप्ते चुकत चुकत, बाकी पुष्कळ राहिली. तेव्हां सन १८३२ मध्यें कोर्ट ऑफ डायरेक्टर्स याणें असा ठराव केला, कीं अंजर बद्दलची रकम जबर आहे, याजकरितां ती सोडावी. त्या प्रमाणें ती व मागील सारी बाकी सूट घालून दरसाल फक्त दोन लाख रुपये घ्यावे, असा ठराव झाला. आणखी असें ही ठरलें, कीं ही फौज जसजशी कमी होत जाईल तसतशी त्या प्रमाणानें दोन लाखांत सूट घालावी, आणि सारीच फौज कमी होईल तर अंजर बद्दल पूर्वी प्रमाणें ८८००० रुपये घ्यावे. हा न्याया-चा ठराव झाल्यानें कच्छचें हित झालें.

पुढें सन १८३३ मध्यें पदच्युत केलेल्या भारमल्लाविषयीं पुनः विचार करणें आला. त्याच्या तरुण पुत्राला सरकार सुशिक्षित करून, त्याच्या मनांत सदुपदेश ठसवून, त्यास सुमार्गास लावीत असतां ह्या शहाण्या वडिलांनीं अंतस्थ खटपट करून दुष्ट लोकांकडून त्याच्या मनांत दुर्विचार भरवून देण्याचा यत्न चालविला आहे, व त्याच्या वर्तनावर नजर ठेवण्याक

---

* कित्येक रजपूत राजेरजवाड्यांत मुली होतांच मारण्याचा दुष्ट प्रघात फार होता, तो सरकारानें अनेक उपायांनीं अगदीं मोडला.

रितां नेमलेले लोकांस मोठी दहशत उत्पन्न झाली आहे, असें नजरेस आ-ले. तेव्हां सरकारानें त्याला राजवाड्यांतून काढून दुसऱ्या एका वाड्यांत नेऊन ठेविलें, आणि पाहिल्या पेक्षां विशेष बंदी करून त्याच्या हातून तसा कांहीं उपद्रव होऊं नये, अशी व्यवस्था केली. तो बंदोबस्त झाल्यानंतर त्या तरुण रावास कौन्सिलांत बसून कामकारभार कसा चालतो तो पहावा, आणि आपण शिकावें असें उत्तेजन मिळालें. त्या कामीं तो लक्ष चांगलें पुरवूं लागला, व त्याची हुशारी बरीच दिसून आली, तेव्हां पूर्वसंकेतापे-क्षां एक वर्ष आधींच, त्याच्या वयास १९ वर्षें पुरीं होणार इतक्यांतच सर-कारानें सन १८३४ च्या जून मध्यें त्यास मुकत्यारी देऊन सर्व राज्यभार त्याजवर टाकला.

राव दयसल याणें जो वर्तनक्रम आरंभिला, त्या वरून त्याणें आ-पल्यावर सरकारानें जो ऐवढा भरंवसा टाकला तो कांहीं व्यर्थ जाणार ना-हीं, असें सिद्ध करून दाखविलें. सन १८३५ च्या दिसेंबरमध्यें गुलामां-चा व्यापार बंद करण्याकरितां सरकारचे विचार मान्य करून त्याणें आ-पल्या राज्यांत असे जाहिरनामे लाविले, कीं आजपासून सहा महिन्यांपुढें जर कोणी मनुष्य या राज्यांत गुलाम आणील तर त्यास जब्बर शिक्षा होईल.

पुढें सन १८३८ मध्यें सरकारानें काबुलांत लढाई सुरू केली, ते व्हां रावानें फार श्रम करून फौजेकरितां उंट वगैरे लागली, ती सामग्री पुरविली. त्या कामीं त्यास खर्च पुष्कळ आला, परंतु त्याणें सरकारापासून पैसा घेतला नाहीं. हें त्याचें औदार्य पाहून सरकार खुष झालें, आणि त्या च्या राज्यांत कांहीं वर्षें सतत नापीक झाल्यामुळें नाइलाजास्तव पुढच्या व र्षी त्याणें सरकारच्या खंडणीचा पैसा सालमजकुरीं देण्यास ताकद नाहीं, सबब महकूब करावा अशी विनंती केली, ती सरकारानें मेहेरबानीनें मनास आणून मान्य केली, आणि तो पैसा पुढें दरसाल चौथाई प्रमाणें चार ह-प्त्यांनीं घेतला.

वारा प्रतिकूल लागूं लागला ह्मणजे जीं गलबतें मांडवी बंदरांत घु-सतात, त्यांवर जकात नसावी, असें सरकारचें बोलणें पडलें, तें रावानें मा-न्य केलें, आणि त्याप्रमाणें सन १८४० त उभयतां मध्यें करारपत्र झा-लें. सन १८५२ मध्यें झारेझे सरदारांचे अनुमतीनें रावानें आपल्या मुल-

खांत सती जाण्याची वाहिवाट बंद केली. झारेज्या लोकांत बालहत्येचा प्रकार बंद झाला. तेव्हां पासून स्त्री पुरुषांचें प्रमाण किती वाढत गेलें पहा. सन १८४२ मध्यें त्यांच्यांत ८ पुरुष तर एक स्त्री असें प्रमाण होतें, तें पुढें सन १८५२ मध्यें ३ = १ व सन १८६८ मध्यें तर १.०४ = १ असें झालें, मुलींच्या लग्नांस खर्च फार येतो, तो करण्याची शक्ति नाहीं, सबब त्यांस जन्मतांच अगर पुढें लौकरच मारण्याचा दुष्ट प्रचार या लोकांत फार होता.

सन १८६० मध्यें राव दयसल वारला, आणि त्याचा ज्येष्ठ पुत्र प्रागमल्ल गादीवर बसला. तो चांगला राज्यकर्ता निघाला. झारेज्ञे भायाद सरदार हे सर्व रावाचे भाईबंद असून आपआपल्या हद्दींत त्यांनां मोठाले अधिकार आहेत. त्यांची संख्या पुष्कळच वाढून ते कित्येक प्रसंगीं रावाचें अगदींच ऐकतनासे झाले ; तेव्हां रावानें त्यांजवर सक्ती चालविली, असें फार दिवसांपासून चाललें होतें. त्या तंट्याचा निकाल करण्याकरितां सन १८७२ मध्यें सरकारचे मंजुरीनें भायादकोर्ट स्थापन झालें. त्यांत सरकारच्या दिवाणी व फौजदारी कायद्या आधारें काम चालावें असे प्रथम नियम ठरले, परंतु पुढें तें नीट चालेना, तेव्हां नवीन नियम ठरवून सरकारानें तें रावाकडे दिलें. त्याणें आपल्या नायब दिवाणास सरन्यायाधीश नेमिलें.

पुष्कळ कच्छीलोक आफ्रिकेंत झांझिबारास व्यापाराकरितां राहिलेले आहेत. त्यांमध्यें गुलामांचा व्यापार चालतो असें सन १८६९ मध्यें नजरेस आल्यावरून रावानें पुनः पूर्ववत जाहिरनामा प्रसिद्ध केला. सन १८७२ मध्यें त्याणें आपल्या झांझिबार व मसकत येथील प्रजेस पुनः जाहिरनाम्यानें असें कळविलें कीं तुह्मी जर गुलामांच्या व्यापारांत प्रत्यक्ष किंवा परंपरेनें गुंतलेले आढळाल तर तुम्हांस इंग्रज सरकार शिक्षा करील ; या कामीं आपल्या प्रजेप्रमाणें तुम्हांस शिक्षा करण्याचा अधिकार आह्मी त्यांस दिला आहे , शिवाय असा गुन्हा करणाराची जी मालमत्ता कच्छमध्यें असेल ती च प्त करून तिजोरीकडे घेऊं. हा व्यापार बंद करण्या करितां याच वर्षीं सरबार्टल फ्रीयर आफ्रिकेच्या पूर्वकिनाऱ्यावरील प्रदेशांत गेले होते, तेव्हां त्यांस मदत करून जे कच्छीलोक तो व्यापार करीत होते त्यांस शिक्षा करण्याकरितां त्याणें आपल्या दिवाणाची तिकडे रवानगी करून दिली. याप्रमाणें राव मनःपूर्वक झटतांनां पाहून सरकारास संतोष झाला.

राव प्रागमल्लजी यांणीं आपल्या प्रजेची प्रीति चांगली संपादिली होती. युवराज प्रिन्स ऑफ वेल्स यांचें मुंबईस आगमन झालें तेव्हां रावांची प्रकृति बिघडलेली असतां ही त्यांच्या दर्शनार्थ ते मुंबईस आले आणि परत जाऊन लौकरच सन १८७६ च्या जानेवारी मध्यें वारले. त्यांच्या मरणानें प्रजेस फार दुःख झालें.

राव प्रागमल्लजी नंतर त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव राव खेनगार गादीवर बसले. ते अल्पवयस्क असल्यामुळें राज्य कारभार सरकार मार्फत चालला होता. ते वयांत आल्यानंतर सन १८८४ च्या नवंबर मध्यें त्यांस मुक्त्यारी मिळाली. त्यांणीं काम चांगलें चालविलें आहे. लोक शिक्षणाकडे त्यांचें लक्ष चांगलें आहे.

कच्छमध्यें भायाद मंडळीची संख्या दोनशेंवरच आहे व ते सालिना आठ लक्ष रुपये वसुलाचा मुलुख अनुभवीत असतात.

वर्षांतून बहुतेककाळ कच्छ अगदीं बेट असतें त्याच्या सभोतें समुद्राचें पाणी पसरलेलें असतें, त्याला रण अशी संज्ञा आहे. ह्या प्रदेशास जलस्थलयुक्त ओसाड वालुकामय अरण्य ह्मणतात ; कारण पर्जन्यकाळीं हा प्रदेश अगदीं पाण्यांत बुडालेला असतो. त्या ऋतूंत येथें एक तेथें एक असे कांहीं उंचवटे कोरडे रहातात. त्यांवर भरतीचें पाणी चढत नाहीं. त्या ठिकाणीं रानगाढवांचें कळप एकत्र होतात आणि वनमक्षिकांचे भयंकर थवेच्याथवे जमतात. कांहीं ठेंगण्या ठेंगण्या टेंकड्यांच्या रांगा आहेत त्यांतून पर्जन्यकाळीं ओढे नाले वहातात. प्रतिसाल पर्जन्य बहुत करून १२ इंचांवर पडत नाहीं. सर्व प्रांतांत मोठें, इमारतीच्या उपयोगीं असें, झाड आढळत नाहीं. परंतु कित्येक ठिकाणीं व त्यांत मुख्यत्वें करून दक्षिण भागांत झाडांचीं मोठमोठालीं खोडें कुजलेलीं सांपडतात ; त्यावरून पूर्वी येथें मोठें जंगल असावें असें होतें. बहुतेक मुलखांत जमीन रेतड किंवा खारलेली आहे.

कच्छ प्रांतींचें कशिद्याचें काम सर्वप्रसिद्धच आहे. तेथें रुप्याचीं भांडीं वगैरे सामान व दागडकाम ही उत्तम होतें.

खंड ५

दक्षिणहिंदुस्थान

भाग १

हैदराबाद अथवा निजामाचें राज्य.

हैदराबादचे निजाम हे इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील सामंत राज्यांत सर्वांत श्रेष्ठ मांडलिक होत. यांच्या राज्याचा विस्तार इंग्रजांकडे लाऊन दिलेला वऱ्हाड प्रांत सुद्धां पाहिला तर ग्रेटब्रिटनापेक्षां १०००० चौरस मैल अधिक आहे. खुद्द निजामाचे खास अमलांतील प्रजा ऐलंडांतील प्रजेपेक्षां अधिक आहे. येवढ्या थोर राज्याचा बंदोबस्त व पोंढी राखण्याकारितां ३७००० पायदळ व ८००० स्वार इतकी फौज बाळगलेली आहे.

दक्षिणदेशीं सन १३४७ पासून १५२६ पर्यंत अफगाण कुलोत्पन्न मुसलमान राजे राज्य करीत होते, त्यांस ब्राह्मणी वंशाचे बादशहा असें ह्मणत, त्यांच्या ताब्यांत हा प्रदेश होता. सन १५२६ ह्या वर्षीं हैदराबाद प्रांतीं ब्राह्मणी वंशाचा अम्मल अगदीं लयास जाऊन कुली कुतुब नामक टर्कोमन बादशहाची सत्ता चालूं लागली. पुढें या मुलखावर सन १५९९ मध्यें अकबर बादशहानें स्वारी केली. त्याच्या मागून सन १६१२ मध्यें जहानगीर, सन १६२० । २१ मध्यें शहाजहान व सन १६५० मध्यें औरंगजेब, या बादशहांच्या स्वाऱ्या झाल्या. या शेवटच्या स्वारींत तो कपटाचार्य मोगल शहाजादा तोंडानें तह करावयाचा असें ह्मणत ह्मणत विश्वासघातानें अकस्मात् हैदराबादेवर जाऊन पडला. त्याणें ती गोवळकोंड्याची राजधानी तेव्हांच घेऊन अगदीं धुळीस मिळविली आंणि पुढें विलक्षण जबर करार करून घेऊन परत दिली. परंतु औरंगजेबाचा खरा हेतु फार गुप्त होता. त्याणें सन १६८७ मध्यें पुनः असाच विश्वासघाताने हल्ला केला, आणि तें प्राचीन राजघराणें बुडवून सन १६८८ मध्यें सारें राज्य खालसा केलें. मग त्या नूतनसंपादित मुलखावर त्याणें आपलः

प्रिय पुत्र कामबक्ष याची नेमणूक केली. पुढें औरंगजेब मरून बहादूरशहा गादीवर बसला, तेव्हां सन १७०८ मध्यें कामबक्षानें बंड केलें ; परंतु त्या जवर बादशहानें जी फौज पाठविली, तिजशीं लढत असतां तो जखमी होऊन मेला. तदनंतर बादशहानें त्या सर्व मुलखावर आपला बलाढ्य सेनापति झुलफिकारखान यास सुभेदार नेमलें. परंतु पुढें त्याची हुजूर दरबारीं जरूर लागली, तेव्हां तो दाऊदखान पन्नी यास आपल्या तर्फे सुभा संभाळावयास ठेऊन दिल्लीस निघून गेला. सन १७१३ मध्यें दाऊदखान निघून दुसऱ्याची योजना झाली ; आणि पुढें तीन वर्षांनीं फरूकशीर बादशहानें आपला सेनापति हुसेनअल्ली यास पाठविलें. तेव्हां त्याणें दाऊदखानाचा पराभव करून त्यास ठार मारिलें. तदनंतर मीर कमरुद्दीन ऊर्फ चिनकिलिचखान नामक सरदाराची दक्षिणेच्या सरसुभेदारीवर नेमणून झाली.

हा चिनाकिलिचखान प्रकृत घराण्याचा मूळ पुरुष होय, यास्तव त्याचा वृत्तांत विस्तारानें सांगितला पाहिजे. त्यास निजाम उल्मुलुख व असफजा असे किताब मिळाले होते, व विशेषतः त्या नांवानेंच तो प्रसिद्ध आहे. त्यांचें जन्म एका संभावित तुर्क घराण्यांत झालेलें होतें. त्याचा बाप गाजी उद्दीन हा औरंगजेबाच्या फार मर्जीतला सरदार होता. चिनकिलिचखान स्वतः हुशार, शहाणा, हवें तें निःशंकपणें करणारा आणि हुजुरांत त्याचा वशीला ही थोर, मग तो भरारल्या शिवाय रहातो ! तो औरंगजेबाच्या लष्करांत चाकरीस राहून वाढत वाढत मोठी योग्यता पावला. बादशहानें त्यास पांच हजार स्वारांची मनसब देऊन विजापूरच्या सुभेदारीवर पाठविलें. पुढें औरंगजेब वारल्यावर फिरुकशिरास गादीवर स्थापण्याचे कामीं चिनकिलिचखानानें पुष्कळ साहाय्य केलें म्हणून त्या नव्या बादशहाची त्याजवर फार मर्जी बसून त्याणें त्यास आपली वजिरी ही दिली आणि निजामउल्मुलुख असा किताब दिला. त्याचा अर्थ चांगली राज्यव्यवस्था करणारा असा आहे.

फिरुकशिराच्या पश्चात दिल्लींत फार अंदाधुंदी झाली. अबदुलखान व हुसेन अल्लीखान नामक सय्यद बंधुद्वय बादशहास व इतर मुत्सद्यांस गुंडाळून ठेऊन हवातसा कारभार करूं लागलें ; तेव्हां दरबारांत त्यांच्या विषयीं द्वेष उत्पन्न झाला. त्यावेळीं निजाम उल्मुलुख माळव्याच्या सुभेदारीवर होता. तो मोठा कपटी, अभिमानी आणि महत्वाकांक्षी असे. त्याच्या मनांत सय्यदबंधूंविषयीं मत्सर उत्पन्न झाला. त्याजपाशीं सैन्य पुष्कळ होतें, ते-

व्हां त्याणें असें मनांत आणलें कीं ह्या उभयतां पुंडांच्यां अमलाचा आपल्या वर जो बोजा आहे तो फेंकून देऊन आपण दक्षिणप्रांत जिंकून घेऊन तिकडे स्वस्थ रहावें. ह्या उद्देशानें तो १२००० फौज घेऊन नर्मदा उतरला आणि अशीरगड, बऱ्हाणपूरचा सुभा इत्यादि घेऊन पुढें निघाला. चंद्रसेन जाधव, रावरंभा निंबाळकर, असे मराठे सरदार संभाजीला सोडून गेले होते, ते त्याला मिळाले आणि त्याचें प्रस्थ बरेंच माजलें ; तेव्हां आपल्यास हा प्रबळ शत्रु उत्पन्न झाला अशी सय्यदांस भीति वाटून त्यांणीं त्याजवर फौज रवाना केली.

प्रथमत: औरंगाबादचा अधिकारी अलमअल्लीखान ह्यानें चाल केली. त्याची आणि निजामउल्मुल्खाची वऱ्हाडांत पैनघांटानजीक बाळापुरा जवळ लढाई होऊन खान पराजित झाला. हें वर्तमान दिल्लीस कळतांच सय्यदांस भय आणि दु:ख वाटलें ; परंतु बादशहास अंत: मोठा आनंद झाला. निजामउल्मुल्ख आतां सामान्य सरदारांस आटोपत नाहीं. असें पाहून धाकटा सय्यद हुसेनअल्ली बादशहास समागमें घेऊन स्वत: त्याचे पारिपत्यास निघाला. तो दिल्लीहून कांहीं मजला गेल्यावर निजामउल्मुल्खानें मारेकरी पाठवून वाटेनें चालतां चालतां पालखींतच त्यास मारविलें. असा ह्याचा परिणाम होतांच बादशहा सर्व सैन्यासह दिल्लीस परत गेला. तेथें ज्येष्ठ सय्यद होता, त्यास ही निजामाच्या मित्रांनीं ठार मारविलें. हें वर्तमान सन १७१९ मध्यें झालें. त्या उभयतां बंधूंच्या जाचांतून आपण मुक्त झालों, ह्मणून बादशहानें निजामउल्मुल्खाचे फार उपकार मानले, आणि त्यास आपली वजिरी देण्याचा निश्चय केला. परंतु तो दाक्षिणेंत नवीन संपादलेल्या मुलखाची व्यवस्था करण्यांत गुंतला असल्यामुळें त्यास दिल्लीस जाणें झालें नाहीं. पुढें सन १७२२ मध्यें तो हुजूर गेला, तेव्हां दरबारची अव्यवस्था पाहून त्यास फार चमत्कार वाटला. महंमदशहा बादशहा ऐषआरामांत अगदीं निमग्न होऊन गेला होता. एका राखेनें त्याला इतकें वेडाऊन सोडलें होतें, कीं दरबारचें मुख्य मोर्तब त्याणें तिच्या हातीं देऊन टाकलें होतें. मग ती मनास येई तशी पाहिजे त्यास सनद करून देऊन तें वर ठोकून देई ! सर्व राज्यकारभार अप्रतिष्ठित, हलकट, लोकांच्या हातीं सोंपला असून त्यांस सर्व काळ खुषमस्करी वांचून दुसरा धंदा नसे. कोणाची कांहीं तरी कुचेष्टा करून बादशहास खुष करावें, हें काय तें त्यां

ध्यें कसब आणि ते आपली इतिकर्तव्यता ही तेवढीच समजत. निजामउ-ल्मुलुख औरंगजेबाच्या तालमेंतील मुत्सद्दी त्याच्या सारखा मोठा सभ्य, प्रौढ वुद्धीचा आणि तसाच कडक स्वभावाचा होता ; त्याला तो पोरकटपणा आ णि हलकटपणा आवडतो ! त्याणें वजिरी पत्करिली होती, परंतु कामांत लक्ष लागेना, आणि त्याणें कांहीं मसलत केली, तरी ती ती खुषमस्करी मं डळी तडीस जाऊं देईना. तो अपमान त्यास सहन होईनासा झाला. अ-शी स्थिति होऊन त्या खुषमस्कऱ्यांनीं एक दिवस खुद्द त्याची थट्टा करून बादशहास हंसविलें. तेणेंकरून निजामउल्मुलुखास अतिशय वाईट वाटून तो तत्क्षणीं वजिरी सोडून दिल्लीहून निघाला तो सन १७२३ मध्यें दक्षि-णेंत आला. तेव्हां बादशहानें बाह्यात्कारी फार वाईट वाटलें, असें दाख-विलें परंतु मनांत संतोष मानला. इतकेंच नव्हे — निजामउल्मुलुख इत-का तोऱ्यानें दक्षिणेंत निवून गेला आहे, तर त्याची फाजिती केली पाहिजे, असें ह्मणून मुबारीजखान नामक हैदराबादेस जो त्याचा सुभेदार होता, त्यास गुप्तपणें असें पत्र पाठविलें, कीं निजामास तेथें थारा देऊं नये ; त्या चा नीट समाचार घेतला असतां दक्षिणेच्या सहा सुभ्यांचा अधिकार तुम्हां-स मिळेल. बादशहा नुसतें येवढें पत्र पाठवून राहिला नाहीं. त्याणें त्या पत्राबराबर त्याच्या नांवची सहा सुभ्यांची सनद ही पाठविली. याचें नांव अक्कल व मसलत !!

बादशहाचा असा हेतु कळतांच मुबारीजखानानें तत्काळ लढण्याची तयारी केली. तें पाहून निजामउल्मुलुखानें नहाचें बोलणें लाविलें, परंतु त्याला तो मान्य होईना. शेवटीं सन १७२४ च्या आगष्ट महिन्यांत शक्क-रखेडा नांवाच्या गांवाजवळ उभयतांची लढाई झाली. तींत मुबारीजखान प्रा-णास मुकला ; त्याचे दोन पुत्र ही मेले, व दुसरे दोन जखमी झाले. मग निजामउल्मुलुखानें त्या खानाचें शीर कापून तें आपल्या विनंतीपत्रासोबत बादशहाकडे दिल्लीस पाठवून दिलें. पत्रांत असा उपरोधिक मजकूर लि-हिला होता, कीं मुबारीजखानानें मोठें बंड केलें होतें, परंतु खाविंदांच्या च रणकृपेनें तें मोडून मुख्य जबरदस्त बंडावाल्यास देहांत शासन झालें. प रंतु हें पत्र गेलें, तेव्हां दिल्लीदरबार ऐषआरामांत इतकें चूर होऊन गेलें होतें, कीं त्याकडे कोणी पाहिलें देखील नाहीं ! मग वाचतो कोण आणि पुढचा विचार होतो काय !

शक्करखेड्याच्या लढाईनें दक्षिणेचें आधिपत्य मोंगलांकडून निघून निजामाकडे गेलें तें गेलेंच. त्या जया नंतर निजामउल्मुलुख हैदराबादेस गेला. तेथें मुबारीजखानाचा पुत्र होता, त्याशीं सल्ला करून त्याणें गोंवळकोंडा व इतर किल्ले हस्तगत केले, आणि दैदराबाद येथें आपली गादी स्थापिली. हें वर्तमान दिल्लीस समजलें, तेव्हां गुजराथ व माळवा हे दोन सुभे निजामउल्मुलुखाकडे होते, त्यांवर बादशहानें नवीन सुभेदार नेमून ते घेतले, परंतु निजामउल्मुलुखानें तिकडे लक्ष दिलें नाहीं.

पुढें पेशवे प्रबळ होत चालले ; त्यांच्या व निजामाच्या कटकटी सुरू होऊन अगदीं निकरावर आलें. बाजीरावानें पुष्कळ फौज आणून लढाई आरंभिली, आणि निजामास अगदीं बेजार करून सोडले, तेव्हां सन १७२८ मध्यें त्याणें त्याच्याशीं तह केला. पुढें दहाच वर्षांनीं बाजीरावानें दिल्लीवर स्वारी करण्याचा बेत केला, तेव्हां बादशहानें घाबरून जाऊन निजामउल्मुलुखास असें लिहून पाठविलें, कीं तुम्ही दिल्लीस लौकर निघून यावें, नाहीं तर मुसलमानी राज्य बुडतें. त्या बराबर तो ३५००० सैन्य घेऊन दिल्लीस जावयास निघाला असतां बाजीरावानें त्यास भोपाळांत गांठून आपलें सैन्य त्याच्या सभोतें पसरलें, आणि त्याच्या लष्करांत अगदीं दुष्काळ पाडून अगदीं अन्नान्नगत करून सोडली, तेव्हां त्याणें दीन होऊन बोलणें तहाचें लाविलें, आणि बाजीरावास ५० पन्नास लाख रुपये कबूल करून शिवाय त्याणें म्हटलें तें तें मान्य केलें.

पुढच्या वर्षी ह्मणजे सन १७३९ मध्यें नादिरशहानें दिल्लीवर स्वारी केली, तेव्हां निजामउल्मुलुख तिकडेच होता. नादिरशहा गेल्यावर दिल्लींत पुनः कज्जे व दुफळ्या माजल्या त्यांत तो तुराणी सरदारांच्या पक्षाचा प्रमुख होता. महंमदशहा बादशहा सन १७४८ मध्यें वारला. त्याच्या पश्चात त्याचा पुत्र अहंमदशहा तख्तनशीन झाला. त्याणें निजामउल्मुलुखास आपली वजिरी पत्करण्याविषयीं फार आग्रह केला. परंतु आतां मी अगदीं म्हातारा झालों, माझ्यानें काम होणार नाहीं, असें स्पष्ट सांगून त्याणें ती नाकारली. पुढें दीड महिन्यानें, दिल्लीहून दक्षिणेंत येत असतां बऱ्हाणपूर येथें जून्या १९ व्या तारखेस तो मृत्यु पावला. त्या वेळीं त्याचें वय १०४ वर्षांचें होतें, असें ह्मणतात.

त्याचा वजीर पुत्र गाजीउद्दीन व दुसरा नासिरजंग हे बंधु एकोदर

आणि तिसरा सलाबतजंग, चौथा महमद शरीफ ऊर्फ बसालतजंग, पांचवा निजामअल्ली व सहावी मीर मोगल हे सर्व भिन्नोदर होते. त्यांत पहिले दोन औरस, बाकी अनौरस होते. शिवाय सहा कन्या होत्या, त्याही दोन औरस व चार अनौरस, अशा होत्या; त्यां पैकीं ज्येष्ठ औरस होती तिचा विवाह लाहोरच्या सुभेदाराशीं झालेला होता व दुसरी हैदराबादच्याच एका उमरावास दिलेली होती ; तिला मुजफरजंग नामक पुत्र झाला. त्यावर निजामाची इतकी ममता असे कीं पुढें हाच गादीचा मालक होईल असें लोकांस वाटूं लागलें. त्यांचा तो तर्क अगदीं खरा झाला. आपल्या मागें मुजफरजंगासच सुभेदारी मिळावी अशी दिल्लीदरबारीं खटपट करून असफजानें बादशहापासून त्याच्या नांवें फरमानाही आणून टेविला.

दक्षिणोत्तर त्रिचनापल्लीपासून नर्मदेपर्यंत पूर्व पश्चिम मच्छली बंदरापासून विजापूर पर्यंत, येवढें थोरलें हें आपलें राज्य त्या लाडक्या नातवास मिळावें, ह्मणून निजामउल्मुल्खानें जरी आपल्या मतें असा बंदोबस्त केला, तरी त्याचे सहा ही पुत्र ह्मणजे अगदीं मुकाट्यानें त्यास मान्य होऊन स्वस्थ बसतील अशी कांहीं गोष्ट नव्हती. त्याचा वडील पुत्र गाजीउद्दीनखान हा हुजूर दिल्लीस असून मोठ्याच हुद्यावर होता, ह्मणून तेथें भरभराट होण्याचा संभव होता, याजकरितां तो हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागत दक्षिणेंत येईल असें वाटत नव्हतें, आणि त्या प्रमाणें त्याणें दिल्ली सोडली नाहीं. त्याच्या पाठचा नासिरजंग हा नेहेमी बापाशीं बिघडून बंड करूनच असे, आणि तो मेला, तेव्हां जवळच होता. वाकी जे चौघे राहिले, त्यांत निजामअल्ली हा पुढें नांवा लौकिकास आला, परंतु तो या वेळीं अगदीं लहान होता, आणि ते सारे थोडे बहुत प्रतिबंधांत असल्या सारखेच होते.

निजामउल्मुल्ख वारला, तेव्हां त्याचा आवडता नातु मुजफरजंग विजापुरास आपल्या हुद्यावर होता. नासरजंग जवळ होता, त्याणें कालदेशानुरूप वर्तन केलें. त्याणें आधीं बापाचा सारा खजिना हस्तगत करून घेतला, आणि मग सैन्यांतील अधिकारी अमीर उमराव वगैरे अनुकूल करून घेऊन दक्षिणदेशाचा सुभेदार मी अशी द्वाही फिरविली.

मुजफरजंगास आजोबा मेल्याचें वर्वमान कळतांच हैदराबादची गादी ठरल्या प्रमाणें आपल्यास मिळावी, ह्मणून तो यत्न करूं लागला. त्या-

णें मराठ्यांकडे वकील पाठवून त्यांजकडून मदत मिळण्याचें वचन घेतलें. याच वेळीं कर्नाटकचा नबाब मरून अर्काट येथें त्यांच्या गादीवर अन्वरुद्दीन बसला. परंतु मुजफरजंग हैदराबादच्या गादीविषयीं जसा यत्न करीत होता, तसा चंदासाहेब ह्मणून पूर्वीच्या नवाबाचा मुलगा होता, तो अर्काटची गादी आपल्यास मिळावी, ह्मणून यत्न करीत होता. ते उभयतां सम-दुःखी असल्यानें एकत्र होऊन परस्परांस मदत करण्यास सिद्ध झाले. याशिवाय त्यावेळीं पोंदेशरी (पाँडीचरी) येथें फ्रेंच लोक होते, त्यांचा मुख्य सरदार डुप्ली याची शूरत्वाविषयीं बरीच ख्याति झाली होती, त्याजकडे ही त्याणें मदत मागितली. ती डुप्लीनें तत्क्षणीं मोठ्या आनंदानें देण्याचें कबूल केलें. मग तिन्ही सैन्यें एकत्र होऊन त्याणीं प्रथम अन्वरुद्दीनाबराबर अंबूर नजीक लढाई केली. तींत तो ठार होऊन त्यांस यश आलें, तेव्हां आनंद पाऊन मुजफरजंग आपल्यास निजाम व चंदासाहेब आपल्यास नबाब म्हणवूं लागला.

फ्रेंचां प्रमाणें इंग्रज लोक ही हिंदुस्थानांत राज्य मिळवण्याच्या हेतूनें आले होते, आणि कोणा दोघां राजांचा तंटा सुरू झाला, कीं एकीकडे मिळून साधेल तितका आपला नफा करून घेण्यास टपलेलेच असत. त्यांनां हा असफजाच्या गादीविषयीं तंटा उपस्थित होतांच आनंद झाला, आणि फ्रेंचांप्रमाणें त्यांणीं ही दुसऱ्या पक्षास मदत दिली. मुजफरजंगाची तयारी चालली, तशी नासिरजंगाची ही चालली. त्याणें कित्येक राजेरजवाड्यांची मदत घेऊन तीन लाख फौज जमविली. मुजफरजंगाकडे डी आर्टिल नामक फ्रेंच सरदार गोरी फौज घेऊन आला, तसा त्याजकडे मेजर लॉरेन्स हा इंग्रज सरदार गोरी फौज घेऊन होता. परंतु मुजफरजंगाच्या लष्करांत बेबंदी होऊन कोणी कोणाचें ऐकेनासा झाला. नासिरजंगाची तयारी कडेकोट होती. त्याच्या पुढें मुजफरजंगाचें कांहीं चालेनासें होऊन शेवटीं तो त्याच्या स्वाधीन झाला. आणि कैदेंत पडून राहिला.

इंग्रजांची आणि फ्रेंचांची नित्य स्पर्धा चाललेली असून येवढ्या मोठ्या कामांत अपयश आलें, ह्मणून त्यांस विषाद उत्पन्न झाला, आणि मुजफरजंग जाऊन कैदेंत पडला, ह्मणून त्याचा पक्ष न सोडतां त्यांणीं विशेष हिमतीनें काम चालविलें. त्यांचा दुसरा सरदार डी ला टौची यानें ता-रीख १२ एप्रिल सन १७५० रोजीं नासिरजंगाच्या फौजेवर छापा घात-

ला. तारीख १ सेप्टेंबर रोजीं डीआटिल याणें त्याचा सरदार महंमदअल्ली यांस गांठून त्याचा अगदीं पराभव करून सोडला. पुढें दहाच दिवसांनीं बुसीनें चंदीवर हल्ला करून ती घेतली. नंतर दिसेंबरच्या १६ व्या तारखेस डी ला टौचीनें खुद्द नासिरजंगाच्या छावणीवर हल्ला केला ; त्या प्रसंगांत तो प्राणास मुकला. मग फ्रेंचांनीं जयजयकार करून मुजफरजंगाच्या पायांतील बिडी काढून त्याला दक्षिणेचा सुभेदार म्हणून यशोदुंदुभि वाजविला.

याप्रमाणें मुजफरजंग बंधमुक्त होऊन त्याच्या कपाळीं आजोबाच्या मनांत होतें तसां गादीचा टिळा लागला , परंतु तिचा उपभोग मात्र यत्किंचित ही घडला नाहीं. तिजवर बसण्याकरितां तो हैदराबादेस जात असतां वाटेंतच सन १७५१ च्या फेब्रुआरी महिन्यांत कडपा, करनूल, व सावनूर येथील त्रिवर्ग नबाबांनीं मिळून विश्वासघात करून त्याचा वध केला. नंतर निजामाचा तिसरा मुलगा सलाबतजंग गादीवर बसला. त्यापुढें थोड्याच दिवसांनीं १७५२ मध्यें त्याचा वडील बंधु गाजीउद्दीन हा गादीवर आपला वारसा खरा करावा म्हणून दिल्लीहून येत असतां वाटेंत औरंगाबाद येथें त्याची सावत्र आई होती, तिनें त्याला मेजवानीस बोलाऊन विषप्रयोग करून ठार मारलें. आपला पुत्र निजाम अल्ली यास गादी मिळावी या हेतूनें तिणें हें क्रूर कर्म केलें. याप्रमाणें सलाबतजंगावर तें जें विघ्न येत होतें तें सहज टळून त्याणें पुढें दहा वर्षें राज्य केलें.

फ्रेंचांनीं ज्याचा पक्ष धरला होता तो मुजफरजंग मेला, परंतु त्याला दोन पुत्र होते ; तेव्हां खरें म्हटलें असतां त्यांणीं त्यांतील एकाला गादीवर बसवावयाचें ; परंतु त्यांची सारी नजर पैशाकडे पडली, म्हणून हीं लहान पोरें हातीं धरून अर्थ काय असें मनांत आणून त्यांणीं सलाबतजंगाकडे प्रेषक करून त्याला झटकर गादी बळकावावयास सांगितलें. केवळ त्यांच्या पाठबळानें आपल्यास मसनद मिळाली, म्हणून मग तो त्यांचे फार उपकार मानीत असे, आणि हैदराबादच्या दरबारीं त्यांचें वजन फार झालें. त्यांचा मुख्य सरदार डुप्ली हा मोठा हुशार व कारस्थानी होता. त्याणें सर्व सूत्रें आपल्या हातांत अशीं कांहीं ठेविलीं होतीं, कीं सलाबतजंग त्याच्या मसलती शिवाय एक कवडी इकडची तिकडे हालूं देत नव्हता. सारांश, मुजफरजंगास बंधमुक्त केल्यापासून त्यांचा उत्कर्ष होत होत या वेळीं तर तेच

सर्व राज्याचे अधिकारीं असल्या सारखे होऊन बसले. या काळचा सुमार दहा वर्षांचा हैदराबादेचा इतिहास फ्रेंचांचाच इतिहास असल्या सारखा आहे. परंतु तो सांगण्याचें हें स्थळ नाहीं, सबब त्यांचा अभ्युदय होऊन पुढें ऱ्हासकाल ही लौकरच आला, इतकें सांगून पुढें जाऊं. दरबारांत फ्रेंचांचें प्रस्थ माजलें होतें, तें बरेंच मोडलें, आणि सलाबतजंग आळसांत व विषयांत निमग्न झाला, तेव्हां त्याचा धाकटा भाऊ निजाम अल्ली हा राजकारभार पाहूं लागला. सन १७५६ मध्यें सदाशिवराव भाऊ पेशव्यानें स्वारी करून निजामाचा विजापूर प्रांत जिंकून घेतला. याच्या पुढें ही फ्रेंच निजामाकडे होतेच, आणि इंग्रज त्याच्या शत्रूकडे होते. त्यांचा सरदार कर्नल फोर्ड याणें सन १७५९ च्या जानेवारींत फ्रेंच सरदार एम कॉन्फ्लन्स याचा पराजय केला, तेव्हां सलाबतजंग पुष्कळ सैन्य बराबर घेऊन त्याला मदत करण्यास निघाला. कर्नल फोर्ड यानें त्याला गांठून घाबरें केलें, तेव्हां तो तहास कबूल झाला. इंग्लिशांचा आणि निजामाचा येथून संबंध सुरू झाला, तो उत्तरोत्तर कसा वाढत गेला, तें आतां पुढें येईलच. या तहाचा मुख्य हेतु फ्रेंचांस दक्षिणेंतून हांकून द्यावें असा होता; तो कांहीं ताबडतोब सिद्धीस गेला नाहीं, परंतु त्या मार्गास लागला. फ्रेंचांचें पलटण दक्षिणेंत कधीं येऊं देऊं नये, व त्यांच्याशीं कोणता ही संबंध ठेऊं नये, असा त्यांणीं करार करून घेतला, व मच्छलीपट्टण वगैरे दरसाल चार लाख रुपये वसुलाचा मुलुख घेतला. ही इंग्रजांची पहिली कमाई.

पानपतच्या लढाई नंतर निजाम अल्लीच्या मनांत असें आलें, कीं पेशव्यांनीं आजपर्यंत आपला जो मुलुख घेतला, तो आतां आपण सोडवून घ्यावा. ही संधी बरी आहे. ह्या हेतूनें तो सैन्य घेऊन अगदीं पुण्याजवळ गेला.

तो सात कोसांवर येऊन ठेपला, तरी पेशवे गडबडले नाहींत, तेव्हां विचारांत पडला; आणि त्यांजकडून तहाचें बोलणें आलें, त्यास मान्य झाला. पेशव्यांनीं २७ लाखांचा मुलुख त्यास दिला. सलाबतजंग या स्वारींत होताच. त्यासह तेथून वेदरास जाऊन निजाम अल्लीनें त्यास धरून कैदेंत टाकलें, आणि सर्व राज्यकारभार पूर्णपणें हातांत घेतला. ही गोष्ट सन १७६२ च्या जुलै महिन्यांत झाली. पुढें पंधरा महिन्यांनीं सलाबतजंगास ठार मारून निजाम अल्लीनें आपल्यास दक्षिणेचा सुभेदार म्हण-

विलें.

सन १७६५ मध्यें निजाम अल्लीनें कर्नाटकावर स्वारी करून तें लुटलें. तेव्हां तेथच्या नबाबाचें संरक्षण करण्याचा पत्कर इंग्रजांनीं घेतलेला होता, ह्मणून त्यांनां पुष्कळ राग आला ; परंतु त्याच्याशीं तत्काळ सामन्यास उभें रहाण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य नव्हतें, ह्मणून त्यांणीं मेजर कॉलियड यास तह करण्यास पाठवून दिलें. त्याणें निजाम अल्लीनें जें जें ह्मटलें तें तें मान्य करून त्याजकडून उत्तरसरकार* मुलुख दरसाल नऊ लाख रुपये देण्याचे करारानें कंपनी सरकारचे नांवानें मक्त्यानें ठरवून घेतला ; व कंपनीची कांहीं फौज निजामाचे चाकरीस ठेवण्याचें ठरवून तिचे खर्चा बद्दल पैसा या रकमेंत वजा ध्यावा असें ठरविलें. निजामास जरूर लागेल, तेव्हां ही फौज पाठवावी, असा करार होता. इंग्रजांचे मदतीस त्याणें आपलें सैन्य देण्याचें मान्य केलें.

पुढें निजाम अल्लीनें हैदर अल्लीशीं लढाई आरंभिली, तेव्हां इंग्रिलशांनीं या तहांतील करारास अनुसरून बंगळुरास वेढा घालण्या करितां त्याचे मदतीस दोन पलटणें पाठविलीं. परंतु हैदर फार धूर्त पडला, त्याणें निजामास वश करून घेऊन लढाई तहकूब केली, आणि त्याचा व इंग्रजांचा बेबनाव आणून त्याजकडून तो तह मोडविला. मग त्या उभयतां अल्लींनीं आपल्या फौजा एकत्र करून सन १७६७ च्या अगष्ट मध्यें कर्नाटकावर स्वारी केली. तींत त्यांस कोणी आडवा आला नाहीं, ह्मणून अधिक स्फुरण येऊन इंग्रिलशांचा सरदार लेफ्टनंट कर्नल स्मिथ, जो निजामास मदत करण्या करितां गेला होता, त्यावरच त्यांणीं हल्ला केला. तेव्हां त्यास त्रिनोमाली येथें पळून जावें लागलें, परंतु तेथें नीट सावरून त्याणें त्यांच्या वर छापा घालून अशी दुर्दशा उडविली, कीं निजाम आतां तह होईल तर बरें असें ह्मणूं लागला. परंतु त्याला पाहिजे होते, तसे करार स्मिथ साहेबास मान्य होतना, ह्मणून तह जमला नाहीं. इतक्यांत इंग्रजांची आणखी कुमक येऊन पोहोचली, तेव्हां उभयतांवर अंबूर नजीक हल्ला करून स्मिथ साहेबानें त्यांस कावेरी पट्टनांत नेऊन घातलें. नंतर कांहीं कारणावरून

---

* गंजम , विशाखापट्टन, गोदावरी व कृष्णा. या चार प्रांतांस ही संज्ञा आहे.

परस्परांचीं मनें विटलीं, तेव्हां निजामानें आपला विचार आपण पाहून सन १७६८ च्या फेब्रुआरी माहिन्यांत इंग्रजांशीं मुकाब्यानें तह केला. त्यांतील ठराव येणें प्रमाणें — दक्षिणेच्या सुभेदारांनीं हैदरास ज्या सनदा करून दिल्या असतील, त्या सर्व रद्द असत ; हैदरानें कर्नाटकांतील जो वरघांटीं मुलुख घेतला असेल त्याची वहिवाट इंग्रजांनीं करावी, व त्या बदल निजामास दरसाल सात लाख रुपये द्यावे ; अर्काटकच्या नबाबाच्या मुलखास निजामानें उपद्रव देऊं नये ; त्या लढाईच्या खर्चाबद्दल २५ लाख रुपये द्यावे, उत्तर सरकाराबद्दल पूर्वी नऊ लाख रुपये ठरले होते, परंतु ते पांच लाखच द्यावे, आणि त्यां पैकीं ही दोन लाख रोख घेऊन बाकी २५ लाखाच्या फेडीला लाऊन द्यावे ; हैदर अल्ली हा बंडवाला आहे, असें समजून उभयतांनीं त्याचा बंदोबस्त करण्याची लौकर तजवीज करावी. इंग्रजांनीं आपलीं दोन काळीं पलटणें व तोफा निजामास लागतील तेव्हां द्याव्या ; त्यांचा खर्च त्याणें द्यावा ; परंतु हें सैन्य इंग्रजांचे कोणत्या ही दोस्त सरकाराशीं लढण्यास नेऊं नये. ह्या तहानंतर पुढच्या वर्षीं इंग्रजांनीं हैदराशीं तह केला, ह्मणून वर जो त्याच्या विषयीं झालेला ठराव सांगितला, तो अमलांत आला नाहीं.

पुढें सन १७७९ मध्यें गंतूर प्रकरणावरून कलह उपस्थित होऊन निजामाचा व इंग्रजांचा वेबनाव झाला. निजामाचें ह्मणणें अगदीं रास्त व सरळ न्यायाचें होतें. त्याणें आपल्या पेक्षां वडील जो आपला बंधु बसालतजंग त्यास गंतूर प्रांत जाहागीर नेमून दिला होता, त्याचा तो अनुभव करीत होता. पुढें इंग्रजांनीं दिल्लीच्या बादशापासून सरकार प्रांताच्या सनदा करून घेतल्या, तेव्हां असें ठरलें, कीं गंतूर प्रांत बसालतजंगाच्या पश्चात त्यांणीं द्यावा. सन १७६८ मध्यें जो तहनामा झाला, त्यांतील दुसरे कलमीं हाच करार होता. पुढें सन १७७४ मध्यें बसालतजंगानें आपले पदरीं कांहीं फ्रेंच फौज ठेविली ; तेव्हां तें कृत्य तहास सुटून होतें, ह्मणून निजामानें आपण त्याचे यजमान या संबंधानें त्यास त्या फौजेस फांटा द्यावयास सांगितलें. बसालतजंगानें तें ऐकिलें नाहीं ; परंतु पुढें पांच वर्षांनीं हैदर त्याच्यावर स्वारी करण्यास उठला, तेव्हां दहशत पडून त्याणें इंग्रिलशांची मदत मागितली, व फ्रेंचांनां घालवून देऊन त्यांनां चाकरीस ठेवण्याचें कबूल केलें. इतका पाय शिरतांच त्यांणीं त्याच्यापासून गंतूर प्रां-

त कौलानें वहिवाटीस घेतला ; तेव्हां अर्थातच निजाम अल्लीस पुष्कळ राग आला. या कामांत त्याला त्यांणीं नुसतें विचारलें देखील नाहीं. त्याचा कांहींच संबंध ठेविला नाहीं, आणि सन १७६८ च्या तहनाम्यांतील दुसऱ्या कलमांतील कराराच्या उलट वर्तन केलें. तें प्रकरण विलायत सरकाराकडे गेलें, तेव्हां निजामाचें म्हणणें रास्त, व आपल्या कामदारांची चूक असें त्यांणीं ही कबूल करून मद्रासचा गव्हरनर सर टॉमस रंब्रोल्ड व त्याचे कांहीं कौन्सिलर यांजवर त्या व दुसऱ्या कांहीं अपराधाबद्दल इनराजी करून त्यास बडतर्फ केलें.

आपल्या कामदारांनीं चूक केली, म्हणून इंग्रज सरकारानें त्यांस शासन केलें, हें विहित झालें ; परंतु त्यांत निजामाचा काय नफा झाला ! त्याची कांहीं समजूत निघाली नाहीं. म्हणून तो हैदर अल्लीस सामील झाला, आणि बसालतजंगानें इंग्रजांस जो ठराव करून दिला होता, तो तो रद्द न करील तर त्याजवर स्वारी करतों म्हणून तयारीस लागला. इकडे मराठ्यांची आणि इंग्रजांची लढाई जुपली होती, तींत त्यांनां अपयश येऊन वडगांवचा लाजिरवाणा तह महादजी शिंद्यानें जसा सांगितला तसा त्यांस कबूल करावा लागला. तें वर्तमान ऐकून निजाम अल्लीस आनंद झाला, आणि आपण, हैदर व मराठे यांणीं एकाचित्त होऊन हे इंग्रज जे सर्वांच्याच डोक्यावरून हात फिरवूं पहात आहेत, त्यांचा समाचार घ्यावा असा त्यांणें बेत केला.

परंतु महादजी शिंद्याचे विचार फार प्रौढ, आणि त्याची दृष्टि फार दूर ; त्याची सर निजाम अल्लीस कोठून येणार ! त्याच्या मनाची शाश्वती कोठें होती ! बंगाल सरकारानें गंतूर प्रकरणीं मद्रास सरकारचें कृत्य अयोग्य म्हणून त्याजकडून तो प्रांत निजामास परत देवविला, आणि त्याची समजूत करून पुनः स्नेह संपादावयास सांगितलें. त्या प्रमाणें त्यांणीं खटपट करून त्यास इतकें वश करून घेतलें, कीं हैदराबराबर जी शेवटची लढाई झाली, तींत तो अगदीं हूं कीं चूं न करतां फक्त मौज पहात राहिला. त्या वेळीं म्हटलें तर त्याची शक्ति इतकी होती, कीं तो जर हैदरास मनापासून साहाय्य करता तर त्या युद्धाचा परिणाम अगदीं उलट, हैदराच्या मना प्रमाणेंच झाला असता.

पुढें सन १७८२ मध्यें बसालतजंग वारला, तेव्हां गंतूर प्रांत ठरा-

रा प्रमाणें इंग्रजांस मिळवयाचा, परंतु निजामानें सन १७८८ च्या सप्टेंबर पर्यंत तो सोडला नाहीं. पुढें त्याच्या स्वामित्वाबद्दल इंग्रजांकडून दरसाल ७२०००० रुपये प्रमाणें सन १८२३ पर्यंत त्यास पैसा पोहोचत होता. परंतु सन १८१७ मध्यें जी लढाई झाली, तिचे खर्चाकरितां वगैरे पामर कंपनीकडून निजामानें जें कर्ज काढलें होतें, तें फेडण्या करितां सरकारानें त्यास ११६६६६६ रुपये देऊन गंतूरवर त्याणें पुढें कांहीं हक्क सांगूं नये, असा ठराव करून घेतला.

पुढच्या क्षणजे सन १७८९ ह्या वर्षीं हैदराचा मुलगा टिपूसुलतान याजबराबर इंग्रजांनीं लढाई आरंभिली, तेव्हां निजाम अल्लीस तींत पडणें भाग आलें. गव्हरनर जनरल लॉर्ड कॉर्नवॉलीस यांणीं त्याची विनवणी करून व टिपूकडून जो मुलुख मिळेल, त्याची तुम्हास बराबर वांटणी देऊं असें सांगून त्यास वश करून घेतलें. आपण या लढाईंत गुंतलों तर मराठे आपल्या राज्यांत शिरतील असें त्यास भय होतें, म्हणून ते उपद्रव देणार नाहींत, अशी तो खात्री मागूं लागला ; परंतु कॉर्नवॉलीस साहेबास ती देववेना ; तथापि आणखी कित्येक कारणांवरून त्याणें तसेंच मान्य होऊन सन १७९० च्या जुलै मध्यें तो मित्रत्वाचा तह मान्य केला.

इंग्रजांनीं निजामाप्रमाणें पेशव्यांस ही अनुकूल करून घेऊन त्यांच्याशीं ही तसा तह केला. टिपूबराबर त्रिवर्गांनीं हिमतीनें लढावें, जो मुलुख काबीज होईल, त्याचे तीन सारखे हिस्से करून घ्यावे, व तह करणें झाल्यास सर्वानुमताशिवाय करूं नये, असे या तहांत मुख्य करार होते.

मग त्रिवर्गांची तयारी होऊन लढाई सुरू झाली. परंतु ती फार काळ लांबली नाहीं. श्रीरंगपट्टणास वेढा पडून टिपू जेरीस आला, आणि आपलें अर्धें राज्य द्यावयास कबूल झाला. त्या प्रमाणें सन १७९२ च्या फेब्रुआरींतच त्याजबराबर तह होऊन लढाई तहकूब झाली. त्याजकडून घेतलेल्या मुलखापैकीं सुमार ५२६४००० रुपये वसुलाचा निजामाच्या वांटणीस आला ; शिवाय रोख खंडणी पैकीं त्याच्या तिसऱ्या हिश्शास एक कोट रुपये आले.

मराठ्यांची निजामास भीति वाटत होती, व त्यांचा उपद्रव होऊं नये, अशी तो कॉर्नवॉलीस साहेबाजवळ खात्री मागत होता, असें मागें

सांगितलेंच आहे. लॉर्ड साहेबांनीं पेशव्यांस तेव्हांच विचारून पाहिलें, परंतु ते ऐकतीलसें चिन्ह दिसेना, तेव्हां निजामाकडे कानावर हात ठेविले होते. टिपूचें प्रकरण संपून उभयतां ही मोकळे झाले, तेव्हां निजामानें रेमाँड नांवाचा एक फ्रेंच सरदार चाकरीस ठेऊन त्यास कवाईत शिकवून फौज तयार करण्यास सांगितलें

निजाम अल्ली मराठ्यांस भीत होता, तें उगाच नव्हे. त्याच्या व पेशव्यांच्या दरम्यान हिशेबाचा लढा होता, आणि त्याजकडे त्यांची पुष्कळ बाकी निघत होती ; तिचा निकाल करण्याविषयीं त्यांजकडून वरचेवर बोलणें येतच होतें. अशांत एक भलतीच गोष्ट होऊन अकस्मात लढाईच रच बेतलें. तो प्रकार असा — पेशव्यांकडून गोविंदराव काळे हे निजामाच्या दरबारीं वकील होते, आणि गोविंदराव पिंगळे हेही कांहीं बोलण्यास आले होते. तेव्हां एक दिवस निजामाकडे तमाशा झाला ; त्या कचेरीस ते उभयतां बसले असतां निजामाचा दिवाण मश्रुन्मुलुख याणें सवाई माधवराव व नाना फडणीस यांचीं सोंगें आणविली ; तेव्हां उभयतांस क्रोध येऊन ते तत्क्षणीं उठून चालूं लागले. तें पाहून निजामानें काळ्यांस जवळ बोलाऊन म्हटलें, " असें रागाऊन जाण्याचें कांहीं कारण नाहीं. हा तमाशा आहे, त्याचा विधिनिषेध काय बाळगता ? " तेव्हां त्यांणीं उत्तर केलें, " हा राजदरबार आहे. येथें आमच्या खाविंदांचीं सोंगें आलीं, आतां आम्ही बसण्याची मजा नाहीं, सबब जातों. परंतु या कचेरींत सर्वां देखत आपल्यास अर्ज करतों येवढा ध्यानांत असावा. आमच्या खाविंदांचीं सोंगें तमाशांत आणून लोकांस दाखविलीं, याचें उसनें असें घेऊं कीं आपले कडील दिवाण वगैरे मंडळीस पुण्यास नेऊन दारोदार फिरवून लोकांस प्रत्यक्ष दाखवूं तरच नांवचे गोविंदराव काळे. हें पक्कें समजून ठेवावें. " इतकें बोलून उभयतां मुजरे करून निघाले, आणि पुण्यास गेले. तेथें नाना फडणिसानें सर्व मजकूर समजून घेऊन लढाईची तयारी आरंभिली. तेव्हां गव्हरनर जनरल लॉर्ड टेनमौथ यांणीं मध्यस्थी केली, परंतु पेशव्यांनीं ती ऐकिली नाहीं. शेवटीं सन १७९५ च्या फेब्रुआरीमध्यें खर्डे मुक्कामीं उभयतांची लढाई झाली. त्या वेळीं तो फ्रेंच सरदार रेमाँड आपलें सर्व सैन्य घेऊन आला होता. निजाम त्याची मसलत ऐकता. तर त्यास यश आल्या सांगून राहातेंचना ; परंतु तसें न करतां दिवसा पराभव पाऊन रात्रौ खर्ड्या

च्या एवज्याशा किल्ल्यांत शिरला. त्या वरावर शत्रूनीं घेरून त्याला आंतच कोंडलें, आणि तीन दिवसांत अन्न कीं पाणी मिळूं दिलें नाहीं ; तेव्हां जेरीस येऊन त्याणें आपली शिक्के कट्यार श्रीमंतांकडे पाठविली, आणि वकिलाचे हातीं सांगून पाठविलें, कीं " तुम्हास जो मुलुख घ्यावयाचा असेल तो घेऊन आम्हांस काय ठेवावयाचा असेल तो ठेवा. " त्यावर त्यांणीं असें उत्तर दिलें, कीं " आधीं मश्रुन्मुलुख आमचे स्वाधीन करावा, मग इतर काय तें बोलणें बोलावें. " तेव्हां नाइलाज होऊन निजामानें दिवाणास स्वाधीन केलें. पुढें तह होऊन देशव्यांनीं ४० लक्षांचा मुलुख, दौलताबाद किल्ला, व स्वारी खर्चा बद्दल तीन कोट रुपये घेतले. प्रतिज्ञेप्रमाणें मश्रुन्मुलुखास पुण्यांत नेऊन अटकेंत ठेविलें होतें, त्याची सुटका पुढें सन १७९७ मध्यें बाजीरावाच्या कारकीर्दीत झाली.

या लढाईच्या तयारीस लागतांना निजाम अल्लीनें इंग्रजांजवळ दोन पलटणें मदतीस मागितलीं होतीं ; परंतु त्यांचा व पेशव्यांचा वेबनाव नव्हता सबब लॉर्ड टेन मौथ यांणीं तीं दिलीं नाहींत. तथापि निजामास आपल्या राज्याचा बंदोबस्त राखण्यास लागली तितकी गोरी फौज देऊन त्यास आपलें सारें सैन्य लढाईस नेण्यास मोकळें करून दिलें. पेशव्यांबरावर त्यांचा जो तहनामा होता, तो पाहिला असतां त्यांणीं निजामास इतकें साहाय्य करणें ही वाजवी नव्हतें. तथापि त्याच्या तहाप्रमाणें त्यास त्यांणीं मदत केली पाहिजे होती. ती हवी तशी झाली नाहीं, म्हणून तो फारच संतापला, आणि इतःपर यांची जरूरच ठेऊं नये, असें मनांत आणून त्यांची जी फौज चाकरीस होती, ती घालवून द्यावी, आणि फ्रेंच कवाइतीची फौजच वाढवावी, असा त्याणें निश्चय केला. त्या प्रमाणें इंग्रजांचे फौजेस त्याणें फांटा दिला, ती चालती ही झाली ; आणि इतक्यांत एक गोष्ट घडली, ती मुळें त्याला तीसच परत बोलावावें लागलें ; तो प्रकार असा—— निजाम अल्लीचा पुत्र अल्लीजहां याणें बंड केलें —— हें कर्म म्हणजे स्वकुलास अनुचित असें त्याणें केलें असें नाहीं —— त्याचा हेतु जसें बापानें भ्रातृहत्या करून राज्य संपादलें, तसें आपण पितृद्रोह करून संपादावें असा होता ; कारण तो होऊन आपल्यास अधिकार देईल असा त्यास संभवच दिसत नव्हता, आणि पूर्णायुष्याचें मान म्हणजे शत संवत्छर, त्याच्या ही पुढें आजोबाप्रमाणें हा जगणार असला तर आपणास राजलक्ष्मीचा उ-

पभोग तो घडावा कधीं, असें वाटून त्याणें हा सुलभ उपाय मनांत आणला होता ; आणि त्याच्या अंगांत जर ज्ञान थोडें अधिक असतें तर त्याचा हेतु खचित पूर्ण होता ; परंतु तें कमी पडल्यानें फसलें. बंड होतांच तें मोडून त्यास पकडून आणण्याकरितां निजाम अल्लीनें फ्रेंच पलटण पाठविलें. त्यांणीं त्यास धरून हत्तीवर हौद्यांत घातलें, आणि हैदराबादेस आणलें. पुढें हौद्यावर बुरखा घालून त्याला झांकून आणावें असा दिवाणानें हुकूम केला. गोष्टींतील बायकां प्रमाणें कोणास तोंड न दाखवितां येणें हें मर्दास आणि राजपुत्रास तर मोठेंच लांछन होय. तें त्याला कसें सहन व्हावें ! त्याणें तत्काळ विष भक्षण करून प्राण त्याग केला. इतक्यांत निजाम अल्लीनें इंग्रजांचीं पलटणें परत बोलाविलीं होतीं, तीं आलीं. आतां त्यांची जरूर उरली नाहीं खरी, तरी अल्लीजहां मेल्यानें ह्मणजे आपण निर्भय झालों, असें त्याला वाटेना सबब त्यांणें तीं ठेऊन घेतलीं.

निजामानें फ्रेंच लोकांस चाकरीस ठेऊन फाजेस कवाईत शिकविण्यास सांगितलें होतें, तें काम चाललेंच होतें, तें इंग्रजांच्या डोळ्यांत फार सलत होतें. सन १७९८ मध्यें या फौजेची तयारी चांगलीच होती. युरोपिन तऱ्हेनें कवाईत शिकलेले हत्यारबंद पलटणी लोक १४००० असून त्यांवर १२४ फ्रेंच अम्मलदार होते. १००० चें एक एक पलटण होतें, त्यांत अवश्य लागणारे अम्मलदार असून शिवाय हे फ्रेंच आठ आठ होते. त्या साऱ्या प्रचंड सेनेचें आधिपत्य एम रेमाँड याजकडे होतें.

ह्या प्रसिद्ध पुरुषाला पुष्कळ इंग्रजग्रंथकारांनीं " साहसी रेमाँड " असें म्हटलें आहे. ते तसें ह्मणोत, परंतु तो कांहीं सामान्य पोटभरू साहसी मनुष्यां पैकीं नव्हता. आलीकडे नुकताच निवर्तलेला इटली देशांतील प्रख्यात ग्यारिबाल्डी याच्या सारखा तो शूर, साडसी, विश्वासू आणि उत्तम व्यवस्था करणारा होता. असे पुरुष कोणत्याही देशांत, कोणत्या कां काळीं होतना, तेथच्या इतिहासांत त्यांचीं नांवें चिरस्थायी होऊन रहातात ; त्या प्रमाणें कीर्ति पावलेल्या या वीराचा वृत्तांत संक्षेपतः तरी येथें सांगितला पाहिजे — रेमाँड सन १७९५ मध्यें ग्यास्कनी प्रांतांत जन्मला. तो वीस वर्षांचा होतांच हैदरअल्लीच्या पदरीं जी फ्रेंच फौज होती, तिचा कमांडर शिव्हेलियर डी लासी याचे हाताखालीं सबलेफ्टनंट होऊन राहिला. त्याणें कित्येक शूरत्वाचीं कृत्यें केलीं, तीं पाहून फ्रेंच अम्मलदारांची त्यावर

मर्जी बसली, आणि त्यांणीं त्याची बढती करून क्याप्टनाची जागा दिली. पुढें सन १७८३ मध्यें त्यांचा प्रख्यात सरदार बुसी हैदरअल्लीस मिळून इंग्रजांशीं लढण्यास निघाला, तेव्हां त्याणें त्याला आपला एडिकाँ नेमिलें. बुसी वारल्या नंतर पोंदेशरीस जो गव्हरनर आला, त्याणें सन १७८९ मध्यें निजामाजवळ त्याची शिफारस करून हा अम्मलदार आपण पूर्ण भरंवसा टाकण्या लायक आहे, असें सांगितलें. तेव्हां निजाम अल्लीनें त्यास दरमहा पांच हजार रूपये पगार ठरवून देऊन एक पायदळ पलटण तयार करण्यास सांगितलें. त्या प्रमाणें त्याणें जें पलटण तयार केलें, तसलें निजामाचे दृष्टीस पूर्वी कधींच पडलें नव्हतें, ह्मणून खुष होऊन त्याणें आणखी कांहीं पलटणें करावयास सांगितलें. मग तीं वाढत वाढत चौदांची भरती झाली. त्यांची खरी योग्यता म्हटली तर अशी होती, कीं महादूजी शिंद्यानें व त्याच्या पश्चात दौलतरावानें जीं पलटणें तयार करविलीं होतीं, तीं ही कांहीं त्यांच्या बरचढ नव्हतीं. खर्ड्याच्या लढाईंत मराठे घोडेस्वारांनीं चोहींकडून गर्दी केली, तेव्हां त्यांनां जें काय थोडें बहुत मागें हटविलें, तें रेमाँडानें व त्याच्या कवायती फौजेनें ; आणि तो मैदान सोडून गांवांत शिरूं नका, असें जें सांगत होता, तें जर निजाम ऐकता तर पेशव्यांसच हटावें लागतें. रेमाँडाची कीर्ति त्या वेळीं मोठी होती आणि त्याचें नांव अद्याप ही गाजत आहे. हिंदुस्थानांत पुष्कळ युरोपियन लोक येऊन कीर्ति करून गेले, आणि मेले ; परंतु पश्चात शंभर वर्षें आज जसें रेमाँडाचें नांव सर्वांच्या मुखांतून निघतें, आणि हैदराबादच्या मोठमोठ्या अमीर उमरावांच्या घराण्यांत त्याच्या अनेक गोष्टी निघतात, आणि त्याचा लौकिक जसा अगदीं ताजा असल्या सारखा तेथच्या लोकांच्या मनांत बिंबलेला आहे, तसा दुसऱ्या कोणाचाच नसेल असें ह्मणण्यास कांहीं हरकत वाटत नाहीं.

अशा प्रकारच्या ह्या फ्रेंच वीरानें निजामाच्या पदरीं राहून जी सेना तयार केली होती, तिची व्यवस्था, वातबेत आणि तयारी अत्युत्कृष्ट होऊन राहिली असतां लॉर्ड टेन मौथ जाऊन त्याच्या जागीं मार्किस वेलेस्ली गव्हरनर जनरल झाले. टिपूचा एकदां पराभव होऊन त्याच्याशीं तह झाला होता, तरी आतां लौकरच त्याजशीं पुनः युद्ध सुरू होईल असें त्यास चिन्ह दिसलें. तर अशा समयीं त्याचा जातभाई निजाम जरी आपल्याशीं तह करून स्नेहभावानें असला तरी त्याला इतका बलाढ्य राहूं देणें हें

कांहीं आपल्याला इष्ट नव्हे, असें त्याला वाटलें ; ह्मणून त्याणें त्या सर्व सैन्यास फांटा दिलाच पाहिजे, असें निजामाकडे बोलणें सुरू केलें. निजाम अल्लीला अर्थातच तें मुळीं रुचलें नाहीं. ते फ्रेंच अम्मलदार आणि तें सैन्य ह्मणजे त्याचे केवळ पंचप्राण होते ; ह्मणून त्याणें त्यास नकाराचें उत्तर दिलें. परंतु त्याचें नशीबच फिरलें, त्यामुळें याच प्रसंगीं त्याला अगदीं प्रतिकूल अशा दोन गोष्टी घडून आल्या. एक, तो वीर रेमॉंडच मृत्युमुखीं पडला, आणि दुसरी त्याच्या दिवाण मश्रुन्मुलुख पुण्यांतून मुक्त होऊन खर्ड्याच्या तहांत घाबा लागलेल्या मुलखांपैकीं तीन हिस्से मुलुख सोडवून व तीन हिस्से खंडणीची सूट घेऊन परत आला. त्या योगानें निजामाची त्या वर मर्जी झाली, आणि तो तर इंग्रजांस अगदीं अनुकूल होता.

असा घाट जमून आल्यानें इंग्रजांचें कार्य झालें. निजाम त्यांच्या ह्मणण्यास वळून त्यांचीं फौज जास्त ठेवण्यास व फ्रेंच फौज मोडण्यास कबूल झाला. सर्व बोलणें नियमांत येऊन सन १७९८ मध्यें सप्टंबरच्या पहिल्या तारखेस तहनामा झाला त्यांत ही इंग्रजांची फौज कोण कोणत्या कामावर पाठवावी त्याचा स्पष्ट उल्लेख असून त्याच्या राज्याचें संरक्षण त्यांणीं करावें, त्याणें परराज्याशीं राजकीय संबंध ठेऊं नये, व परराज्याशीं त्याचे तंटे असतील त्यांचा निकाल इंग्रजांचे मध्यस्थीनें व्हावा असे करार झाले.

ह्या तहनाम्यावर सही होतांच इंग्रजांचीं चार पलटणें तोफांसह हैदराबादेस येऊन येथें जीं पहिलीं दोन होतीं त्यांत मिळालीं. तरी देखील निजाम फ्रेंचांस फांटा देण्या विषयीं कांकूं करूं लागला. तेव्हां इंग्रजांनीं आपली फौज उभी करून निजामाच्या त्या तरेत फौजेस तुम्हां वरील सर्व फ्रेंच अम्मलदार आजपासून कमी केले आहेत असा जाहिरनामा वाचून दाखविण्यास त्यास भागच पाडलें. ते शब्द कानीं पडतांच त्यांणीं अगदीं आकांत केला यांत आश्चर्य काय ! त्या फौजेला आपल्या वरील त्या फ्रेंच अम्मलदारांचा मोठा अभिमान वाटत असे; आपला जो येवढा लौकिक झाला आहे तो फक्त या अम्मलदारांच्या कसबामुळें हें ती समजून होती. त्यांच्या बराबर ते सर्व शिपाई पृथिवीच्या पाठीवर पाहिजे तेथें जाऊन उडी घालण्यास सिद्ध होते; अशा आपल्या प्रिय अम्मलदारांस निजाम आज घालविण्यास सिद्ध झाला तो कांहीं आपखुषीनें नव्हे, केवळ या इंग्रजांच्या जुलमास्तव, हें ही त्यांस अवगत झालें, ह्मणून क्रोधाविष्ट होऊन त्यांचा सूड घे-

ण्यास तत्काल सिद्ध होऊन त्यांणीं बंड केलें. परंतु दुर्दैव ! असा प्रसंग आ ल्याशिवाय रहाणार नाहीं हें इंग्रजांनीं आधींच अनुमान करून त्या प्रमाणें हुशारीनें अंतस्थ तयारी ठेविली होती. इंग्रजांच्या कमांडरानें त्यांच्या छाव- णी सभोता आपल्या सैन्याचा गराडा घातला आणि सर्व नाक्यानाक्यांनीं मो र्चेबंदी करून त्यांवर तोफा रोखल्या. असे कोंडले गेले तेव्हां कांहीं इलाज चालेनासा होउन व्यर्थ मरणें बराबर नाहीं असें वाटून ते हातचीं शस्त्रें टा कण्यास कबूल झाले. मग त्यांच्या त्या फ्रेंच अम्मलदारांस इंग्रजांनीं केवळ कैदी प्रमाणेंच न बागवितां इंग्लंडांत नेऊन तेथून फ्रान्सास पोहोचविलें रेमाँड वारल्यावर पेरॉन हा मुख्य सेनानायक होता.

या प्रमाणें इंग्रजांनां जें निजामाच्या फ्रेंच कवाइती फौजेचें भय वाट- त होतें तें समूळ नाहींसें करून अगदीं निर्धास्त होऊन त्यांणीं लागलीच टिपूवरावर लढाई आरंभिली, आणि सन १७९९ मध्यें त्याचा प्राण घेऊन मुष्काळ मुलुख काबीज केला. ह्या लढाईंत निजामाचें सैन्य साहाय्य कर- ण्यास गेलें होतें, ह्मणून त्याला त्यांणीं घेतलेल्या मुलखापैकीं २४ लक्ष रु- ये वसुलाचा मुलुख दिला ; ते पेशव्यांस जो मुलुख देत होते, तो ते घेत- ना सबब त्या पैकीं ही दोन तृतियांश यास दिला. हा व पूर्वीचा सन १७९२ च्या लढाई बद्दल दिलेला मिळून निजामास एक कोट रुपये वसू- ल येऊं लागला होता. परंतु सन १८०० मध्यें इंग्रजांनीं त्याला आणखी आपली फौज चाकरीस ठेऊन घ्यावयास लाऊन एकंदर ८००० पायदळ व १००० स्वार व कांहीं तोफखाना अशी भरती केली, व तिचे खर्चाब- द्दल ह्मणून तो एक कोटीचा सारा मुलुख निरंतरचे करारानें लाऊन घेतला. या वेळीं जो करारनामा झाला, त्यांत असें ठरलें कीं लढाईचा प्रसंग आल्य[1] स या फौजे पैकीं ६००० पायदळ, घोडेस्वार व तोफखाना, आणि निजा- माचे खास फौजे पैकीं ६००० पायदळ व ९००० स्वार मिळून शत्रूशीं सामना करावा. पुढें आणखी एक नवीन कलम त्यांत घातलें, तें असें कीं उभयपक्षांनीं आपआपल्या किल्ल्यांत परस्परांचें सैन्य बोलाविलें असतां पाठ- वावें.

पुढें सन १८०३ मध्यें निजामअल्ली पूर्णायुषी म्हणजे शंभर वर्षां- चा होऊन वारला. त्याला आठ पुत्र होते, ते सर्व भिन्नोदर होते. सर्वांत वडील अल्लीजहां याचा शेवट कसा झाला, तें मागें सांगितलेंच आहे ; दु-

सरा शिकंदरजहां हा गादीवर बसला. सन १७९२ मध्यें टिपूबराबर लढण्याकारितां निजामाची जी फौज गेली होती, तिचें आधिपत्य याजकडे होतें. बाकी जे सहा पुत्र राहिले ते कोणत्याच प्रकारें प्रसिद्धीस न येतां खाऊन पिऊन पडून होते, आणि कालवशात मरून गेले.

या प्राच्य देशांतील राजकुलोत्पन्न पुरुषांत प्रायः आढळणारे अवगुणांपैकीं शिकंदरजहांच्या अंगीं बरेच होते. तो गादीवर बसला, तेव्हां सारा ३४ वर्षांचा म्हणजे ऐन जवानींत होता, परंतु त्याला कांहीं एक कारायाला नको असे; ऐष आरामांत, चैनींत, खुशाल पडून रहाणें आवडे; कोण्यावधि प्रजा ताब्यांत होती, परंतु तिच्या हिताहिताविषयीं त्याला कांहींच काळजी नव्हती. तो इतका बुद्धिमंद होता, कीं पक्का मूर्खच झटलें तरी चालेल. त्याला इंग्रज आवडत नव्हते, आणि तें तो उघडपणें बडबडे; व त्या मुळेंच दक्षिणेच्या सुभ्यावर आपली नेमणूक कायम करून घावी, झणून त्याणें दिल्लीच्या बादशाहास अर्ज केला — त्या वेळची दिल्ली दरबारची स्थिति मनांत आणली झणजे या गोष्टीची केवढीशी अवश्यकता होती, व त्या नेमणुकींत किनीशी शाश्वती होती, हें तेव्हांच कळतें — दुसरें, शिंदे होळकरांबरावर इंग्रजांनीं युद्ध मांडलें, तेव्हां हा त्यांचा पराजय होईल तर बरें अशी इच्छा करीत होता. परंतु इंग्रजांनीं आपल्या विषयीं त्याची अशी अप्रीति होती, झणून त्याचा सूड न घेतां त्याच्या बापाशीं जसे तहनामे होते, तसेच त्याच्याशीं ही केले, आणि बाजीरावाबराबर लढाई होऊन पेशवाई बुडाली, तेव्हां लढण्यास तुम्ही आम्हांस चांगली मदत केली, असेंच झणून त्यास सहा लक्षांचा मुलुख बक्षीस दिला. तेव्हां त्याच्या राज्याची हद्द उत्तरेस विंध्याद्रिपर्यंत व वर्धा नदीपर्यंत पोहोचली.

शिकंदरजहां गादीवर बसल्यापासून सन १८०८ पर्यंत सर्व व्यवहार स्वस्थपणें चालला होता; त्यांत सांगण्यासारखी कांहीं मोठीशी गोष्ट झाली नाहीं. परंतु त्याचा मुख्य दिवाण मीरअलिम हा वारला. तेव्हां मात्र हैदराबाद व कलकत्ता सरकार यांच्या स्नेह संबंधांत अंतर येईल अशी भीति उत्पन्न झाली. कारण शिकंदरजहां जरी इंग्रजांचा तिरस्कार करीत असे तरी तो दिवाण त्यावर पांघरूण घालून तें दिसूं देत नसे, व त्याचें वजन ही पुष्कळ होतें. परंतु आतां त्याच्या जागीं हा कोणी तरी अयोग्य, आपल्या सारखाच त्यांचा द्वेष करणारा मनुष्य नेमील, असें भय वाटूं लाग-

लें, तसें वाटण्यास कारण होतें. मग बलाढ्य इंग्रज सरकार आपल्या मर्जी नुरूप निजामास वागवूं पाहूं लागलें, आणि तो दुर्बळ आपला हट्ट पुरवूं पाहूं लागला. असा जेव्हां दोघांचा विलक्षण खटला जुंपला, तेव्हां त्याचा परिणाम ही मजेचाच झाला, व तो अशा प्रकरणांत जे पूर्वापार अनुभव आलेले आहेत, त्या दाखल्यांस सुटून झाला नाहीं. निजाम साहेबांस घोड्यावर बसावयास मिळालें, परंतु लगाम मात्र दुसऱ्याचे हातीं राहिला; तरी ते खुषच होते. तो प्रकार असा — शिकंदरजहांच्या मर्जीतला एक मनुष्य होता. त्याला दिवाणगिरी देऊन राज्यप्रकरणीं कारभारांत मात्र त्याणें फारसें मन घालूं नये ; एक कायस्थ ब्राह्मण होता, त्याणें पाहिजे तें करावें, अशास निजाम कबूल झाले. हा ब्राम्हण इंग्रजांचा उपजीवी असून त्यांच्या इच्छेप्रमाणें राजसूत्रें चाळविणारा होता.

या ब्राम्हणाचें नांव चंदूलाल. तो निजाम अल्लीच्या वेळींच दरबारांत प्रमुख होऊन बसला होता. निजाम अल्लीनें मुनीरउल्मुलुखास आपला दिवाण नेमिलें होतें, त्याच्या हाताखालचा हा पेषकार ; परंतु पुढें निजाम अल्लीस ही जड होऊन बसला. त्याला जेव्हां अगदीं त्याच्या मुठींत वागावें लागूं लागलें, तेव्हां तें असह्य होऊन तो त्याला काढून टाकण्याचा विचार करूं लागला, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. चंदूलालानें ज्याला त्याला यथेच्छ लांच देऊन सारें दरबार अगदीं भारून टाकून असें स्ववश करून ठेविलें होतें, कीं निजाम अल्लीचा बेत किती ही गुप्त असला तरी तो त्याला कळल्यावांचून रहातच नसे. निजाम अल्लीची प्रत्यक्ष सासू देखील घरांतील यच्चयावत् वर्तमान त्याला कळवीत असे.

चंदूलाल बुद्धीचा मोठा तीव्र होता, परंतु त्याची राज्यकारभार करण्याची रीति अगदीं पहिल्या काळची आणि जुलमी होती ; तींत मुख्य गुण झटला तर एक साधेपणा हा होता. त्याणें राज्यांतील बरेच महाल मक्त्यानें देऊन टाकले आणि वसूल बाकीची कटकट करावी न लागतां तेव्ह ढें उत्पन्न विनघोर तिजोरींत येऊन पडेसें केलें. परंतु अशानें संरक्षण अगदींच होईनासें झालें. मक्तेदार हवे तसे वागून नाना प्रकारें जुलूम करूं लागले, त्याणें सारीच बेबंदी होऊन गेली. त्यांच्या जुलमानें लोक धुळीस मिळूं लागले तेव्हां ते ही दरवडेखोर बनले ; आणि त्यांचा उपद्रव फार झाला तेव्हां सरकारानें बंदोबस्तकरितां फौज रवाना केली. फौजेवर अम्मलदार

इंग्रज असून ती नेहेमीच्या तयारीची ; तिच्या पुढें ते बिचारे पोटाकरितां लूट करणारे लोक लढण्यास उभे रहातात ! ते आधींच जुलमानें त्रासून गेलेले आणि तशांत जेव्हां इंग्रज अम्मलदार पाठीस लागले तेव्हां त्यांनां देमाय धरणी ठाय असें होऊन जो अनर्थ उडाला त्याचें वर्णन तरी काय करावें !

मग ह्या लज्जास्पद स्थितीचा शेवट लावण्याकरितां सन १८२० मध्यें सरकारानें सर चार्ल्स मेट्काफ यांस हैदराबादचे रेसिडेंट नेमून निजामाच्या राज्यकारभारांत हात घातला. त्या हुशार राजकार्यधुरंधर पुरुषानें नेटानें दर खात्यांत सुधारणा करण्यास सुरवात केली. प्रजेकडून गांवकामदार, महालअम्मलदार व निजाम सरकार या त्रिवर्गांतून कोणी किती पैसा घ्यावा. त्यांचे हक कसकसे आहेत, याची चौकशी करून निर्बंध ठरवावा, ह्मणून त्यांणें महालोमहालीं इंग्रज कामदार नेमून रवाना केले, आणि तो निबंध ठरला, तेव्हां वसूली कामदारांनीं रयतेकडून त्यापेक्षां फाजील पैसा घेऊं नये, ह्मणून देखरेख करण्या करितां त्यांसच ठेविलें. या इंग्रज कामदारांनीं सारी चौकशी केली, मागची वसुलाची सरासरी काढली, लागवड होण्यासारखी व लागण झालेली जमीन किती आहे, तें पाहिलें आणि त्या वरून जमाबंदी ठरवून रयतांशीं पांच पांच सालचे ठराव केले, व त्या प्रमाणें कौल देऊन या करारांप्रमाणें आम्ही वागूं अशा रयतांच्या कबुलायती घेतल्या.

इंग्रजी अम्मलदारांनीं ज्या तजविजी योजल्या त्या अगदीं साध्या व न्यायाच्या होत्या, त्या योगानें जें फळ आलें, तें अगदीं आश्चर्य मानण्या सारखें होतें. साऱ्या राज्यांत अशी शांतता झाली, कीं इंग्रजांनीं हें कांहीं तरी गौडबंगाल केलें, असें लोकांस वाटूं लागलें. गांवगन्ना वसूल करण्यास मग स्वार, शिबंदी पाठविण्याची जरूर उरली नाहीं ; आणि सरकार म्हटलें म्हणजे लोकांनां जो तिटकारा येत असे तो जाऊन प्रेमा उत्पन्न झाला ; जमिनिची लागवड अधिकाधिक होत गेली, आणि तसतसा वसूल आपोआप वाढला.

सन १८१७ पासून १८२२ पर्यंत इंग्रजांनीं पेंढाऱ्यांबराबर व पेशव्यांबराबर वगैरे ज्या लढाया केल्या त्यांत निजामाची फौज साहाय्यास होती, ह्मणून सरकारानें सन १८२२ मध्यें निजामास ६२६३७५ रुपये

वसुलाचा मुलुख बक्षीस दिला. परंतु त्यांतील जमीनदारांचे हक्क कायम रा. खूं असा त्याजपासून करार करून घेतला. तथापि त्याजकडून तसें वर्तन घडेना, सबब त्या प्रकरणीं सरकाराकडे नेहेमी पुष्कळ तंटे येत.

सन १८२० मध्यें चंदूलालानें कायमचे फौजेची नवीन व्यवस्था केली. तींत इंग्रजांचीं पायदळाचीं सहा पलटणें व स्वारांचीं चार अशीं दहा मिळून १०२४४ लोक निजामाच्या तैनातीस असावे, व त्यांच्या खर्चाबद्दल त्याणें दरसाल ४० लक्ष रूपये द्यावे असा ठराव झाला. ह्या फौजेवर १५०० साहेब लोक अम्मलदार होते. सन १८२१ मध्यें आणखी तह झाला, त्यांत सीनानदी उभयतांचे राज्याची सरहद्द कायम ठरली.

शिकंदरजहां पुष्कळ वर्षेपर्यंत कामकारभाराकडे मुळींच पहात नसे ; इकडे राज्याचें कांहीं होईना, तो आपला खुशाल आनंदांत पडून असे. असा काळ घालवून तो शेवटीं सन १८२९ च्या मे महिन्यांत २४ तारखेस मेला. तेव्हां त्याचें वय ५९ वर्षांचें होतें. त्याच्या मागून त्याचा वडील पुत्र नासीरउद्दवला गादीवर बसला.

नासीरउद्दवल्यानें गादीवर येतांच सर्व राज्यकारभार मी आपल्या मर्जीप्रमाणें चालवणार असें बोलणें लाविलें. तें इंग्रज सरकारानें मान्य करून मेटकॉफ साहेबानें नेमलेल्या ज्या कामदारांचे श्रमानें निजामाचे मुलखांत इतकी आबादानी, व्यवस्था आणि शांतता झाली होती, त्या सर्वांस परत बोलाविलें ; त्यांणीं रयतेस जे कौल व पट्टे वगैरे करून दिले होते, त्यांची मुदत सरेंपर्यंत त्यांतील ठरावांत फेरफार करणार नाहीं, असें मात्र निजामाकडून कबूल करून घेतलें. परंतु ते कामदार निघून जाण्याचा काय तो अवकाश ! त्यांची पाठ फिरतांच ते कौल, पट्टे, चट सारें गुंडाळून ठेऊन सारी अंदाधुंदी आणि अव्यवस्था सुरु झाली. एकूण एक खात्यांत शिस्त नाहींशी होऊन निजाम सरकारची पत इतकी नाहींशी झाली कीं सावकार कर्ज देतना. तशांत फौजेच्या खर्चाबद्दल देण्याची बाकी तुंबूं लागली, त्याणें तर अव्यवस्था अधिकच झाली.

अशी स्थिति झाली तेव्हां इंग्रज सरकारास पुनः हात घालणें आलें. सरकार उदारपणानें व मोकळ्या मनानें चांगली सल्ला मसलत सांगे; निजाम सरकार त्या प्रमाणें वागण्याचें वचन मात्र देत. अशीं पुष्कळ बोलणीं चालणीं होऊन अखेर सन १८५३ मध्यें तह झाला. इंग्रजांनीं ५० लक्ष

रुपये वसुलाचा मुलुख अनामत म्हणून ताब्यांत घेतला. त्या उत्पन्नांतून ५००० पायदळ २००० स्वार व लढाऊ तोफांच्या चार ब्याटऱ्या इतकी फौज गोरे अम्मलदार नेमून त्यांच्या हाताखालीं असावी असें ठरलें. एटचिसन साहेब म्हणतात ' या तहनाम्यानें निजामास आपण इंग्रजांची चाकरीस ठेविलेली फौज ( ) व आपण तयार ठेवावयाची ती फौज ( ) या दोहींचा हवा तसा उपयोग घेतां येऊन लढाईच्या वेळीं पुष्कळ फौज पुरविण्याचें जोखीम राहिलें नाहीं. आपण मदती करतां तयार ठेवावयाच्या फौजेवर त्याचा हक्क उरला नाहीं ; ती त्याच्या मदती करितां इंग्रजांनीं ठेवलेली फौज ठरली.' ह्या तहनाम्यांत एक कलम असें होतें कीं ह्या घेतलेल्या मुलखाच्या वसुलाचा हिशेब निजामास दरसाल देतजावा आणिं फौजेच्या खर्चाबद्दल ठरलेली रकम वजा जाऊन जो पैसा उरेल तो त्यास परत द्यावा.

या प्रमाणें लाऊन दिलेला मुलुख इंग्रजांचे ताब्यांत जातांच त्याच्या जमाबंदीची नामी व्यवस्था झाली ; त्या बराबर दोन सालांतच वसूल वाढून फौजेच्या खर्चा बद्दल जितका पैसा ठरला होता, त्या पेक्षां पुष्कळ अधिक येऊं लागला, तेव्हां डलहौसी साहेबांनीं तीन लक्षांचा मुलुख सोडला. पुढें शिपायांच्या थोरल्या बंडांत निजाम फार उपयोगीं पडले, म्हणून सन १८६० मध्यें लॉर्ड क्यॉनिंग साहेबानीं रायचूर, नळदुर्ग, धारूर वगैरे प्रांत परत देऊन फक्त वऱ्हाड ठेऊन घेतला.

नासिरउदौला सन १८६७ मध्यें वारला. तो वास्तविक जितका होता, त्या पेक्षां आपल्याला फार अधिक हुशार समजत होता, आणि त्याचा सारा जन्म ह्या भ्रमांत आणि घमेंडींत गेला. त्या डौलांतच त्याणें गादविर बसतांच दिवाणाची कांहीं जरूर नाहीं, सर्व काम कारभार आपण स्वतः करूं असा आव घातला. परंतु तें कसचें निभतें ! तें काय असें बडबडल्यानें होत असतें ! हुजूरांच्या कारकीर्दीस फार दिवस लोटले नाहींत, तों सारी अव्यवस्था आणि बजबज होऊं लागली, तेव्हां दिवाणाशिवाय चालत नाहीं, अशी त्याची खात्री झाली. तरी तो त्याचा पाडाव करण्याची खटपट करीत होता, परंतु तें ही साधलें नाहीं. नासिरउदौल्याला बडेजाव आणि डामडौल यांची फार आवड होती, आणि तो बाह्यात्कारी भपका दाखविण्या करितां फौजेकडे खर्च फार करूं लागला, आणि त्या येा-

गानें वर्षानुवर्ष कर्जांत अधिकाधिक बुडूं लागला. शेवटीं सावकारांजवळ त्याची पत नाहींशी होऊन कोणी कर्ज देईनासा झाला. तेव्हां तो अनेक वेळ संकटांत सांपडला असतां इंग्रज सरकारानें केव्हां दम धरून केव्हां कृपा करून मदत देऊन व उदार होऊन त्याच्या बाप आजाची जशी मुक्तता केली होती तशी त्याची ही केली.

नासिरउद्दौल्या नंतर त्याचा पुत्र अफजलउद्दौला गादीवर बसला. त्या वर्षीं इंग्रजांना फारच अनिष्ट ग्रह आले, होते. बरोबर शंभर वर्षांपूर्वीं जे शिपाई आपलीं शिरकमळें तळहातावर घेऊन प्लॉसीच्या रणांगणीं इंग्रजांसाठीं लढले आणि ज्यांच्या जिवावर त्यांणीं हिंदुस्थानचें अफाट राज्य कावीज केलें, त्यांचे नातू पणतू आज बंड करून तें राज्य धुळीस मिळवावें, आणि इंग्रज बुडवावा, असा हेतु धरून लढण्यास उभे राहिले. किंचितकालपर्यंत असा ही रंग दिसूं लागला कीं आतां एक दोन प्रसंगांत जर त्यांनां यश येतें आहे, तर त्यांची मनीषा परिपूर्ण होते. थोड्या राजांनां, पुष्कळ शिपायांनां, साऱ्या धर्म वेड्यांनां आणि बहुतेक अज्ञानी लोकांनां असेंच दिसलें ; आणि त्या प्रमाणें हैदराबादच्या प्रजेपैकीं थोड्या थोडक्यांनां नव्हे, पुष्कळांसच वाटलें. कित्येकांस नुसतें असें वाटून राहिलें नाहीं ; तर आपल्या हातून होईल तर आपणच तें करून टाकावे असें ही त्यांचें मन धावलें. त्या प्रमाणें कांहीं असामींनीं कट करून तारीख १७ जुलै रोजीं ब्रिटिश रेसिडेंटाच्या रहात्या वाड्यावर जाऊन हल्ला केला. तेव्हां रेसिडेंटानें त्यांनां हटवून संरक्षण केलेंच, परंतु हैदराबादचाच रहाणारा असून स्वतः राजा किंवा शिपाई नव्हे, तसाच धर्मवेडा किंवा अज्ञान माणूस ही नव्हे, अशा एका गृहस्थानें त्यांवर लागलाच हल्ला करून त्यांचा मोड केला. हा गृहस्थ कोण म्हणाल तर हिंदुस्थानच्या प्रस्तुत कालच्या उत्तम मुत्सद्यांत ज्याची गणना होते, तो सर सालरजंग. हा अगदीं पूर्ववयस्क असतां हैदराबादच्या दिवाणगिरीचें काम अंगावर घेऊन मोठ्या हुशारीनें करीत होता. त्याणें निजामाला वरचेवर उत्तम शहाणपणाची सल्लामसलत देऊन त्या बंडरूपी प्रचंडवादळांतून सुरक्षितपणें पार पाडलें. त्या कठीण समयीं मुंबई सरकारास मोठी धास्ती पडून आतां आम्हाला कोठें कांहीं आधार राहिला नाहीं, एक निजाम बंडवाल्यांस सामील होतील तर आमचें इकडचें राज्य बुडालेंच समजावें, असे गव्हरनराच्या तोंडून उद्गार नि-

घूं लागले व तसे त्याचे लेख ही आहेत ; परंतु केवळ सर सालरजंगाच्या शहाणपणानें तो प्रसंग टळला.

कांहीं अंशीं या समर्थांची ही राजभक्ति मनांत आणून व सन १८०२ मध्यें जो व्यापारसंबंधीं तह झालेला होता, त्यांत कांहीं भानगडी होत्या, त्या दूर करण्या करितां म्हणून सन १८६० च्या दिजंबर मध्यें सरकारानें निजामावरावर नवा तह केला. त्यांत असें ठरलें, कीं निजामाकडे सरकारचें पन्नास लक्ष रूपये कर्ज येणें होतें तें सोडावें, व सन १८५३ मध्यें ठरल्याप्रमाणें सरकाराकडे जो पन्नास लक्ष रूपये वसुलाचा त्याचा मुलुख अनामत होता, त्यापैकीं १८ लक्षांचा सोडून देऊन ३२ लक्षांचा ठेऊन घ्यावा. या नवीन व्यवस्थेंत कांहीं मुलखाची अदलाबदल ही झाली.

अफजलउद्दौला आपल्या पूर्वजांप्रमाणें इंग्रजांचा द्वेष करीत होता. त्याच्यावर व त्याच्या घराण्यावर इंग्रज सरकारचे उपकार पुष्कळ झालेले होते, तेव्हां त्याणें असें करणें कांहीं रास्त नव्हतें. परंतु त्याच्या दरबारांत इंग्रजांचें वजन फार होतें, व तें सारें सालरजंगामुळें होतें ; म्हणून सन १८६१ मध्यें त्याला दिवाणगिरीवरून दूर करण्याचा विचार त्याणें मनांत आणला. परंतु इंग्रजांनीं त्याचा पक्ष धरून आपलें वजन खर्चून निजामाचा तो बेत रहित करविला. सालरजंग राज्य उत्तम चालवून साऱ्या प्रजेला सुख देऊन संतोषवीत असतां सन १८६८ मध्यें एक दुष्ट त्याच्या जिवावर* उठला, परंतु ईश्वरकृपेनें त्यास कांहीं अपाय झाला नाहीं.

अफजलउद्दौला तारीख २७ फेब्रुआरि सन १८६९ रोजीं वारला. पुढें तिसऱ्या दिवशीं त्याचा पुत्र मीरमहबूब अलीखान गादीनशीन झाला. तो अगदीं अल्पवयस्क असल्यामुळें सरकारानें सर सालरजंग व नबाब श-

---

* एका घटस्फोटाच्या खटल्यांत रहाशन अल्ली म्हणून एक मुसलमान होता. काजीनें मुसलमानी शऱ्या प्रमाणें त्याच्या उलट निकाल दिला, म्हणून त्या मूर्खानें फार दिवसांपासून दिवाणावर डाव धरला होता, आणि एक दिवस गोळी घातली. दिवाणास इजा कांहीं झाली नाहीं, म्हणून हैदराबादच्या तमाम लोकांस व अमीर उमरावांस मोठा संतोष झाला. तो साहसी मनुष्य तारीख २१ मार्च रोजीं फांशीं गेला.

मशुल उमराव या उभयतांनीं रेसिडेंटाच्या मदतीनें कारभार करावा असा ठराव केला.

हे निजाम आधीं लहान आणि तशांत प्रकृतीनें फार नाजुक असल्यामुळें त्यांचा बराच काळ जनानखान्यांत आजीजवळ गेला. ते सन १८७४ मध्यें जुलैच्या २४ व्या तारखेस प्रथम सुमुहूर्तानें वाड्याबाहेर पडून अंबारींतून पिराचे दर्शनास गेले. तेव्हां स्वारी बराबर २०००० मनुष्य होतें. रेसिडेंटाची व त्यांची प्रथम भेट पुढें आठ दिवसांनीं झाली. हुजूर बरेच मोठे झाले, तेव्हां सर सालरजंगानें त्यांस आपला मुलुख पहाण्या करितां सन १८८२ च्या दिसेंबर मध्यें बाहेर काढून रायचूर, गोवळकोंडा औरंगाबाद वगैरे प्रांत दाखविले.

या पूर्वी थोड्या वर्षां खालीं सर सालरजंग युरोपांत फिरावयास गेले होते, तेव्हां इंग्लंडांत यांचा योग्य सन्मान व आदर झाला. तेथून परत आल्यानंतर यथापूर्व उत्तम प्रकारें राज्यकारभार करीत असतां सन १८८३ च्या फेब्रुआरींत त्यांस पटकीचा उपद्रव होऊन मृत्यूनें अकस्मात् गांठलें. या मोठ्या मुत्सद्याच्या मरणानें निजामाच्या प्रजेसच नव्हे, साऱ्या हिंदुस्थानांतील लोकांस वाईट वाटलें.

भाग २

म्हैसूर

ह्या संस्थानच्या पूर्वकालिक इतिहासाची फारशी माहिती मिळत नाहीं. लोकांमध्यें दंतकथा अशी आहे — कर्नाटकच्या पश्चिमेस दोन किल्ले, आणि त्यां खालीं थोडींशीं खेडीं येवढा मुलुख मिळून म्हैसुराजवळ हदना ह्मणून एक संस्थान होतें. तेथील राजकन्या कारुगळी येथील संस्थानिकास देण्याचें ठरून तो विवाहाकरितां समारंभानें आला. त्या वेळीं य दुकुलोत्पन्न दोन तरुण पुरुष हदना येथेंच लग्नसमारंभाकरितां पाहुणे आले होते. त्यांणीं वधूस व तिच्या आप्तमंडळीस अनुकूल करून घेऊन त्यांचे संमतीनेंच त्या निश्चित वरास ठार केलें. तेव्हां त्यांत जो वडील होता,

त्यास त्या स्वयंवरवधूनें माळ घातली. या प्रमाणें त्या उभय संस्थानांचा तो मालक होऊन स्वतंत्रतेनें वागूं लागला. ही गोष्ट सन १३३९ मध्यें घडली. परंतु आपणाला आतां ज्याची कांहीं साधारण माहिती मिळते असा पहिला राजा म्हटला तर चामराज. ह्याला सहा वोटें होतीं. हा सन १९०७ मध्यें गादीवर बसला.

चामराजाला राजा हें नांव होतें खरें, परंतु तो आपला एक लहानसा जमीनदार होता. त्याच्या ताब्यांत थोडींशीं खेडीं होतीं, आणि त्यां पैकीं दोन तटबंद होतीं ; येवढें काय तें त्याचें राज्य. तथापि त्याच्या मागून वेताद चामराज ह्मणून जो गादीवर बसला, त्याणें सन १९२४ मध्यें त्याचे तीन विभाग करून ते आपल्या तिघा पुत्रांस दिले. त्यांतला कनिष्ट चामराज, यास खल्वाट म्हणत ; त्याचे हिश्शास पूरगड किल्ला व त्या खालंचे कांहीं गांव गेले. त्याणें त्याच वर्षी त्या किल्ल्याची दागदुजी करून मजबुदी केली, आणि त्याला महिषासुर असें नूतन नाम दिलें ; त्याचा अपभ्रंश होत होतं म्हैसूर असें होऊन बसलें.

हा चामराज त्या घराण्याचा कांहीं आद्य पुरुष नव्हे, व पुढें त्याच्या शाखेचा नष्टांश होऊन त्याचा हिस्सा त्याच्या भावाच्या वंशाकडे गेला, तरी म्हैसूर या नांवानें जें राज्य स्थापन झालें, त्याचा आद्य राजा हा इतकें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. चामराज राज्य करूं लागल्यानंतर लौकरच दक्षिणहिंदुस्थानांत मुसलमानांचा उपद्रव होरूं लागला. सन १५६४ मध्यें दौलताबाद, विजापूर, गोवळकोंडा व बेदर, येथील चौघा राजांनीं मिळून विजयानगरचें हिंदुराज्य बुडविलें. परंतु तें म्हैसुराला फार हितावह झालें. तो किल्ला तेव्हां येवढासा असून दक्षिणेस फार दूर असल्यामुळें मुसलमानांची त्यावर फारशी नजर गेली नाहीं, आणि विजयानगर बुडाल्यामुळें त्यांची जी तावेदारी करावी लागत असे, ती सुटून सहज स्वतंत्रता मिळाली. मग चामराजाच्या वंशजांनीं हळू हळू आपलें राज्य ही वाढविलें.

विजयानगरचा राजा पराजित होऊन जो पळाला, तो श्रीरंगपट्टणास गेला, आणि तेथें राजकीय डौलानें राहूं लागला. परंतु त्याच्या अंगांत पाणी किंवा शक्ति हें कांहीं नव्हतें. हा अंतस्थ खरा प्रकार चामराजानंतर हीरचामराज ह्मणून जो राजा झाला, त्याला जसा पक्का माहीत होता, तसा दुसऱ्या कोणास नव्हता. ह्मणून तो पूर्ववत खंडणी देण्याला टाळाटाळ क

रूं लागला, आणि जागोजाग किल्ले बांधून त्या राजाच्या कामदारांस धुडकाऊन लाऊन पुढें खुद त्याला ही जुमानीनासा झाला. हिंदुस्थानांत आजपर्यंत जितकीं लहान थोर राजघराणीं झालीं, त्या सर्वांचा एक तऱ्हा आढळते. एकाद्या श्रेष्ठ राजाच्या पदरीं जे मांडलिक राजे सरदार, जाहागीरदार, असतील त्यांणीं त्याला यजमान यजमान म्हणावयाचें, परंतु त्याच्या विषयीं खरी स्वामिभक्ति त्यांचे ठायीं यथायथाच असावयाची. म्हणून जों पर्यंत त्याची तलवार चमकत असेल तों पर्यंत त्यांणीं त्याला अगदीं नमून असावयाचें आणि त्याचा जरा ऱ्हासकाल आला, कीं प्रथम आपणच त्याचे लचके तोडूं लागावयाचें. राजा सुखी तर प्रजा सुखी, तो शास्ता असेल तर स्वधर्माचें रक्षण होईल, त्याला आपत्काल आला, तर आपण आधार देऊन त्याचा नांवलौकिक राखावा, राज्य बुडूं देऊं नये, तरच त्याला आपण यजमान म्हटल्याचे सार्थक, इत्यादि जे खरे सेव्येसेवकभावाचे प्रांजलबुद्धीचे विचार ते त्यांच्या मनांत येत नाहींत ; आलेच तर टिकत नाहींत, अभिलाषबुद्धि प्रबल होऊन ते लोपून जातात. हिंदुस्थानच्या इतिहासांत अथपासून इतिपर्यंत सारा हा प्रकार आढळतो. मग एक म्हैसूरच्या राजा या नियमास सुटून कसा वागेल ! विजयानगरचें राज्य मुसलमानांनीं बुडविलें खरें, परंतु तेथचे राजे आपली पुन. संस्थापना व्हावी, म्हणून यत्न करूं लागले असतां त्यांच्या प्राचीनपासून पदरचे म्हणविणाऱ्या, स्वधर्मी, सामंतचक्रानें त्यांस मदत न करतां उलट स्वार्थबुद्धीनें साधला तितका अपहारच केला. मग तें राज्य* बुडेना तर काय होईल !

सन १५७६ मध्यें म्हैसूरचें राज्य बरेंच वाढलें. कारण त्या वर्षीं हीरचामराज अप्रज मेला, तेव्हां त्याचा पुतण्या बेताद वडेर गादीवर बसला त्याच्या बापाच्या हिश्शास हेमनकल्ली किल्ला व त्या खालचे गांव गेले होते, ते मग अर्थातच यांत सामील झाले.

पुढें कांहीं वर्षें लोटल्यावर बेतादवडेराचा भाऊ राजवडेर यानें आपला चुलत भाऊ जो केंबलकिल्ला व त्या खालचे गांव मिळून राहिलेला

---

* मुसलमानांनीं उच्छेद केला, म्हणून विजयानगरचे राजे श्रीरंगपट्टणास गेले, परंतु तेथें ही थारा नाहींसा झाला, तेव्हां पेनकोंडा येथें जाऊन राहिले. तेथें त्यांचा वंशक्षयच झाला.

तिसरा हिस्सा अनुभवीत होता, तो त्याजपासून जिंकून घेऊन पुनः सारें राज्य एक केलें.

हा राजवडेर बराच हुशार असावा. त्याणें राज्य बरेंच वाढविलें, आणि त्याची शक्ति बरीच वृद्धि पावली. त्याणें जिंकलेल्या मुलखांत श्रीरंगपट्टण हें सर्वांत श्रेष्ट शहर होतें, आणि त्याणें तेथें जी आपली गादी नेऊन स्थापिली ती अद्याप तशीच चालत आहे. त्याच्या गादीचें स्थान पालटलें त्या बरोबर धर्मपंथ ही पालटला, ही लक्षांत ठेवण्या सारखी विशेष गोष्ट आहे. तेथें जाण्यापूर्वी राजा जंगम होता, परंतु मग वैष्णवपंथांत शिरला. श्रीरंगपट्टणानंतर त्याणें दुसरा पुष्कळ मुलुख घेतला.

हा राजवडेर पुष्कळ कीर्ति संपादून अखेर सन १६१७ मध्यें परलोकवासी झाला. म्हैसूरच्या राज्याचे जे प्रथम तीन तुकडे झाले होते, ते एकत्र करून त्याणें राज्य वाढविलें इतकेंच नाहीं; श्रीरंगपट्टण शहर घेतल्यानें तो कृष्णेच्या दक्षिणेस जे हिंदु राजे होते, त्या सर्वांत अग्रगण्य होऊन बसला. त्याचा कित्ता पुढें तसाच चालला. त्याचा नातू चामराज यानें वीस वर्षें राज्य केलें. त्याणें ही पुष्कळ मुलुख जिंकून घेतला, परंतु पादाक्रांत केलेल्या राजांस सौम्यतेनें वागविलें. तो सन १६३७ मध्यें वारला, आणि त्याचा चुलता इमदीराज गादीवर बसला. हा राजा राजवडेरा प्रमाणें रणशूर होता, परंतु सारें दीड वर्ष राज्य करून आपल्या प्रधानाच्या हातून विषप्रयोगानें प्राणास मुकला. त्याला अपत्य नव्हतें, म्हणून राजवडेराच्या ज्येष्ठ बंधूचा पुत्र कांतिराय नरसराज यास गादी मिळाली.

कांतिराय राजपदारूढ होई पर्यंत कांहीं प्रसिद्धीस आलेला नव्हता, परंतु तो जात्या शूर असून त्याच्या अंगांत विलक्षण शक्ति व धैर्य होतें. एकदां तो आपलें नाम गोत्र कळूं न देतां त्रिचनापल्लीच्या राजदरबारीं गेला, आणि एक सर्वतोमुखी नांवांजलेला योद्धा होता, त्याच्याशीं द्वंद्व युद्ध करण्यास सिद्ध झाला. त्या प्रमाणें उभयतांचें युद्ध झालें, त्यांत त्याणें त्या वीराला ठार मारलें, आणि त्रिचनापल्लीचा राजा आपल्या पदरीं रहा म्हणत असतां त्याला नम्रतेनें नाहीं, म्हणून सांगून घराची वाट धरली. इमादीराजाला प्रधानानें विष घालून मारलें तें बहुधा सर्व सत्ता आपल्या हातांत असावी, येवढ्याच हेतूनें असावें; परंतु मग कांतिरायाला गादीवर बसविण्याकरितां श्रीरंगपट्टणास बोलाऊन नेलें, तें त्याचें खरें स्वरूप त्याला माहीत

नव्हतें, ह्मणून ; तसेंच त्याणें जाण्याचें कबूल केलें, तें तरी त्याला प्रधानाचें कर्म कळलें नव्हतें ह्मणून. परंतु पुढें तो जाऊन गादीवर बसल्यावर प्रधान साहेब जेव्हां उद्धटपणानें वागूं लागले, तेव्हां गोष्ट निकरावर आली. इमादी राजाचा शेवट कसा लागला तें कळवून आपली गति तीच, संभाळा, असें त्याला कोणी सांगितलें ; त्या बराबर सावध होऊन त्याणेंच आधीं डाव साधण्याचा निश्चय केला. त्या प्रमाणें मग त्याणें त्या प्रधानास मार्गांत अकस्मात गांठलें, आणि त्याच्याशीं तुंबळ युद्ध करून त्याचा प्राण घेतला

हा राजाला रणधीर कांतिराय असें म्हणत ; तें विशेषण त्यास शोभत असे. म्हैसूरच्या सिंहासनावर त्याचें आरोहण अगदीं योग्य समयास झालें. कारण तो बसल्यावर पुढच्याच वर्षीं त्या राज्यास मुसलमानांचा उपद्रव होऊं लागला. विजापूरच्या बादशहाच्या एका सरदारानें स्वारी करून श्रीरंगपट्टणास वेढा घातला, आणि तटाखालीं सुरुंग लाऊन ते उडवून आंत जाण्यास मार्ग केला. शत्रु आंत शिरत असतां कांतिराय आंतून आपलें सैन्य घेऊन त्यांवर मोठ्या आवेशानें धांवला, आणि अगदीं तुटून पडून त्याणें त्यांची फार कत्तल उडविली, आणि मागें हटवून आपल्या हद्दीतून हांकून लाविलें. हा जय प्राप्त झाल्यानंतर तो पूर्वी घेतलेल्या सर्व मुलखाचा नीट बंदोबस्त करून राज्य दृढ करण्याचा व त्याची चांगली व्यवस्था लावण्याया कामास लागला. तदनंतर त्याणें श्रीरंगपट्टणचा किल्ला वाढविला, आणि टंकसाळ घातली. त्याच्या पूर्वजांत जे शूर पुरुष होऊन गेले, त्यांच्यापेक्षां ह्याला रणांगणांत जाण्याचें औत्सुक्य कमी होतें असें नाहीं. त्याणें पुष्कळ मुलुख काबीज करून विजयनगर व मदुरा इकडे आपली हद्द वाढाविली, आणि शेवटीं माद्रीच्या राजाबराबर मोठें युद्ध करून त्याचा मुलुख घेतला.

हा कांतिराय सन १६५९ मध्यें वारला. तो अप्रज होता, ह्मणून दोड्ड देवराज नामक त्याचा एक दूरचा भाईबंद होता, तो गादीवर बसला. बेदनूरच्या राजानें त्याच्या मुलखावर मोठीच स्वारी केली, परंतु त्याणें त्याचा व मदुरेच्या नायकाचा पराभव करून उभयतांपासून कांहीं मुलुख घेतला, आणि कांहीं लहान लहान संस्थानें बुडवून आपलें राज्य पुष्कळच वढविलें. तो सन १६७२ मध्यें वारला. त्या वेळीं फ्रेंच लोक कर्नाटकां-

त अगदीं एका कोपऱ्यास असून त्यांचीं कारस्थानें नुकतीं सुरू झालीं होतीं.

हा काळपर्यंत म्हैसूर मोठ्या जमीनदारीवर्गांत होतें, तें आतां दक्षिण हिंदुस्थानांत चांगलें महत्वास येऊन राज्य या अभिधानास योग्य झालें. असें म्हणण्यास हरकत नाहीं. आजपर्यंत जे राजे होऊन गेले, त्यांचें सर्व लक्ष राज्य कमावण्याकडे गुंतलेलें असल्यामुळें त्यांनां ऐषआराम भोगण्याला वेळ नव्हता. दर पुरुषानें आपल्या कारकीर्दींत मागच्या पेक्षां थोडें तरी राज्य वाढविलें पाहिजे, असा कित्ताच पडून गेल्यासारखा होता, आणि तसेंच हा वेळपर्यंत जिंकून घेतलेल्या मुलखांतील प्रजेस आपल्या पदरच्या लोकांप्रमाणेंच नीट वागवून त्यांच्या जमिनींवर दस्त न वाढवितां राजे त्यांस खुष ठेऊन त्यांची मनोधारणा करण्यास झटत होते. परंतु राज्य चालविण्याचें जें खरें कठीण काम तें आतां पुढें येऊं लागलें. राज्याचा फैलाव होत गेला, तसतसें त्याजकडे पर राजांचें लक्ष जाऊं लागलें. दक्षिणेंत मुसलमानांच्या उत्कर्षाचा अगदीं कळस झाला होता. दक्षिणदेश म्हणतात तो सारा, तसेंच पूर्वेकडे कर्नाटक व पश्चिमेकडे विजापूर हे मुलुख त्यांच्या ताब्यांत होते, आणि त्रिचनापल्ली घेण्याचा त्यांचा हेतु उघडच दिसत होता. पश्चिमेकडे मराठ्यांचा उदय होऊं लागून ते हिंदु, मुसलमान वगैरे सर्व राजांस पादाक्रांत करतील असें चिन्ह दिसूं लागलें होतें. तेव्हां अशा प्रसंगीं म्हैसूरवाले जर राज्यलोभानें अंध होऊन जातील तर त्यांजवर कठीण प्रसंग गुदरेल असें सहजच वाटूं लागलें.

दोड्ड देवराजा नंतर सन १६७२ मध्यें चिक्कदेवराज गादीवर बसला. ह्याच्या कारकीर्दींत मराठे पुष्कळ भरारून चांगलेच बलाढ्य झाले. जिंजी (चंदी) व वेलूर हीं दोन्हीं मोठीं बिकट ठाणीं शिवाजीच्या हस्तगत होऊन तंजावरावर ही त्याणें स्वारी केली, आणि तें घेतलें. विजापूर व गोवळकोंडा ह्या दोन ही राज्यांत तो पुष्कळच घुसला होता. या प्रमाणें मराठे जरी प्रबळ होत चालले होते, तरी त्यांनां म्हैसूर फारच दूर असल्यामुळें देवराजाला आपण होऊन त्यांच्या वाटेस गेलें नाहीं, ह्मणजे भय बाळगायाला नको होतें, आणि तो तेवढें शहाणपण करीत होता. तो अगदीं सावध राहून आपल्या सरहद्दीला चांगला जपत असे, आणि त्यांतच अंगावर वाजू न येतां हात मारायाचा लाग दिसला कीं तेवढें काम मुका-

ह्यांनीं करीत असे. या प्रमाणें बाहेरची तजवीज झाली, परंतु त्याणें आपलें सारें लक्ष मुख्यत्वें करून राज्याची व्यवस्था लावण्याकडे लाविलें. त्याणें टपाल बसवून लोकांनां पत्रें पाठविण्याची सोय करून दिली. बाहेरून दिसण्याला हें प्रजेच्या हिताकरितां झालें, परंतु त्याचा अंतस्थ हेतु निराळाच होता. त्या योगानें त्याला चोहींकडच्या सर्व गुप्त बातम्या सर्वांच्या आधीं समजत, आणि त्या त्या प्रमाणें सर्व तजवीजी करावयास सांपडत ; त्या मुळें सर्व राज्यांत त्याचा अगदीं दरारा असे. त्याणें आपल्या ताब्यांतील व पदरचे सरदार, संस्थानिक, जाहागीरदार यां पैकीं कोणी आपल्याला राजा ह्मणून वेऊं नये, असे सक्तीचे हुकूम करून ते अमलांत आणले व त्या सर्वांनां श्रीरंगपट्टणांत हमेष रहाण्याला लावलें ; त्यामुळें त्यांचा आधीं जो मुलखांत पुंडावा चालत असे, तो मोडून ते अगदीं आज्ञाधारक राजमंडळ बनून गेले. हें त्याचें राजकारणी चातुर्य युरोपखंडांत फ्रान्सामध्यें तेराव्या ल्युईच्या कारकीर्दींत रिचेला ह्मणून जो मुत्सद्दी होता, त्याच्या सारखें हुबेहुब होतें ; आणि उभयतांचे हेतु ही एकच होते — हे जे अर्धवट स्वतंत्र सरदार, पुंड, पाळेगार होते, त्यांचा उच्छेद करून आपल्या स्वेच्छ राजसत्तेला कांहीं विघ्न उरूं द्यावयाचें नाहीं. त्याचीं अन्य राजकारणें इतकीं शहाणपणाचीं नव्हतीं. त्याच्या मनांत जामिनीवर पैसा चढवावयाचा होता, परंतु त्याला लोक मान्य होण्या सारखे नव्हते, ह्मणून त्याणें शेती लोकावर नाना तऱ्हेचे, त्रास उत्पन्न करणारे अनेक कर बसविले. या युक्तीनें आपला हेतु सिद्धीस जाईल, ह्या अनेक करांच्या त्रासापेक्षां एकच जबर असला तरी पुरवला, तो एकदां देऊन टाकला, ह्मणजे पीडा नाहीं, असें म्हणून तरी लोक आपोआप त्याला कबूल होतील असें त्याला वाटत होतें. ज्या लोकांच्या जामिनी शिपायगिरीच्या चाकरीकरितां दिलेल्या होत्या, त्यांवर हे कर त्याणें बसविले नाहींत, हा त्यांत एक शहाणपणा केला होता. हे कर फारच जुलमी होते, आणि ते जर बंगालच्या प्रजेवर बसविले असते तर ती अनर्थ करून सोडती ; परंतु त्या म्हैसूरच्या लोकांनीं जरी तक्रार केली, तरी त्यांची सहनशीलता फार मोठी असेंच म्हटलें पाहिजे. आम्ही हे कर देणार नाहीं, असें ह्मणून ते लोक अडून बसले, तेव्हां म्हैसूरच्या त्या ज्ञानवान, सुज्ञ, राजानें त्यांच्याशीं कसें वर्तन केलें तें पाहिलें ह्मणजे अशा प्रसंगीं इंग्रज लोकांचें किती सौम्यतेचें वर्तन असतें, आणि त्यांत यांत केवढें

जमीन अस्मानाचें अंतर असतें, तें चांगलेंच दिसते. ते रयत लोक आम्ही हे कर देणार नाहीं, ह्मणून अडून बसले खरे, परंतु त्यांणीं कांहीं बंड कीं दंगाधोपा केला होता का ? कांहीं नाहीं. ते जमिनींत बीं पेरण्याला निघाले, कापणीला गेले, मळणी करूं लागले, किंवा बाजारांत धान्य विकायाला घेऊन चालले तरी आपला कांहीं तरी एक कर पाठीशीं आहेच. तेव्हां ह्या जुलमाला त्रासून त्यांणीं आपआपल्या गांवच्या वेशींत आपले सारे नांगर नेऊन उलटे उभे केले, आणि आह्मी इतके कष्ट करून सरकार जर आमच्या तोंडांत अन्न पडूं देत नाहीं, तर आह्मी हा मुलुख, घरदार, सारें सोडून जातों असें ह्मणूं लागले; आह्मी सूड घेऊं असें म्हणणारे त्यांत फारच थोडे होते. तेव्हां बाकीचे जरी मुकाट्यांनीं परमुलखीं जाण्यास सिद्ध झाले होते, तरी त्यांनां जाऊं दिलें असतां आपलें व आपल्या राज्याचें केवढें अहित होतें, तें चिकदेवराव समजून होता. ह्मणून त्यांनां जाऊं न देण्याविषयीं त्याणें काय उपाय केला ऐका — हे सर्व लोक जातीचे जंगम होते, ह्मणून त्याच्यांत प्रमुख जे अय्या व मठपति त्या सर्वांस राजानें निमंत्रण करून म्हैसूरच्या दक्षिणेस पांच सहा कोसांवर नंजनगोंडाचे देवालयांत जमावयास सांगितलें व तेथें त्या लोकांच्या तक्रारी ऐकून घेऊन निकाल करण्याचें ठरविलें. परंतु कदाचित दगा फटका होईल, ह्या भीतीनें लोक फार जमले नाहींत, सरासरी ४०० आले. चिकदेवराजानें सभास्थाना करितां तेथें एक मंडप घालविला होता. आणि त्याच्या मागें लागूनच कनाथी उभ्या करून एकांत एक असे चौक बनविले होते, व त्यांच्या ही मागें एक मोठा खळगा खणून त्या सभोंती ही कनाथ लाविली होतीं. या प्रमाणें आधीं गुप्तपणें सारी तयारी करून देऊन तो जाऊन दरबारास बसला. मग एक एक अय्या येऊन मुजरा करूं लागला, तो घेऊन तो त्यास आंत जावयास सांगे. अशा प्रसंगीं यजमानानें निमंत्रितांस भोजन घालावें, असा जंगमांचा सांप्रदाय आहे, त्या प्रमाणें आंत सिद्धता असेल असें समजून ते आंत जात ; परंतु तेथें त्याणें मोठे तरबेज असे मांग उभे केले होते. ते जेवढा असामी कनाथीच्या आंत येई तेवढ्याचें डोकें तत्क्षणीं उडवून प्रेत त्या खळग्यांत ढकलून देत. हें घोर कर्म ते इतक्या सफाईनें करीत होते, कीं एक आंत जाऊन दुसरा मागून येई त्याला त्याचा संशय ही येत नसे. त्यामुळें इकडे दरबारच्या कामास व्यत्यय मुळींच

आला नाहीं. या प्रमाणें ४०० अय्यांचा मुकाट्यांनीं संहार उडवून मग त्यां च्या अनुयायांचा समाचार घेण्याचे जे बेत त्याणें योजून ठेविलेले होते, त्या कर्मास राजा प्रवृत्त झाला. जेथें जेथें ते रयत लोक समा करून वसले हो- ते, तेथें तेथें गुप्तपणें आधींच सैन्य पाठवून त्याणें एकाच दिवशीं एक का- ळीं त्यांचा समाचार ध्यावा, अशी तजवीज करून ठेविली होती. हें सैन्य बहुतेक घोड्यावरचें, स्वार होते, आणि त्यांनां हुकूम येवढाच होता, कीं जे थें लोकांची गर्दी दिसेल तेथें अकस्मात शिरावें, आणि कोणा एकाशीं भा- षण न करतां भगवा जंगम पाहिला, कीं खापलल्याच, अशी तलवार सा- ऱ्या ठिकाणचे बाकीचे लोक पळून जातपर्यंत अव्याहत चालवावी. त्या स्वारांनीं ती आज्ञा मान्य करून जेव्हां तसा प्रलय मांडला, तेव्हां सारे लो- क अगदीं गर्भगळीत होऊन गेले. मग राजानें गांवोगांवच्या लोकांपासून नांवाला त्यांच्या कबूलीनें भरारा राजीनामे घेतले. त्यांत त्यांणीं असें लिहून दिलें, कीं सारी जमीन सरकारची, आमची ह्मणून नाहीं, तिच्यावर आम- चा हक्क कांहीं नाहीं. सरकारानें हवी ती व्यवस्था करावी. इकडच्या लो- कांनां इतर हवें तें सोसेल, परंतु त्यांच्या जमिनीच्या हक्काला धक्का लावले- ला त्यांनां कधीं पुरवणार नाहीं, असें असतां त्यांच्याच राजानें त्यांच्यावर असा कहर उसळून देऊन त्यांचे हक्क सर्वस्वीं बुडविल्याचें असें उदाहरण इतिहासांत क्वचित आढळेल.

इतक्या पंथास गोष्ठ येऊन पोहोंचे तों तिकडे शिवाजी मरून औ- रंगजेबाच्या सत्तेला तो जें वारंवार विघ्न आणीत असे तें नाहींसें झालें. म- ग त्याणें दक्षिणेंत स्वारी करून विजापूर व गोवळकोंडा ह्या दोन्ही बादशा- ह्या बुडविल्या, आणि तिसरी शिवाजीनें नूतन स्थापलेली जी हिंदुपद बाद- शाही ती ही बुडविण्याचा संकल्प करून मराठ्यांवर भारी शस्त्र धरलें. म्हैसूरवाल्यांचा आणि त्यांचा हा वेळपर्यंत कांहीं संबंध नव्हता, परंतु आ- तां जेव्हां दक्षिणहिंदुस्थानांत त्यांचें युद्ध जुंपलें, तेव्हां त्यांनां ही त्यांत शि- रायाला सांपडलें. त्या वेळीं बंगळूर प्रांत तंजावरच्या राजाच्या कबजांत हो- ता, परंतु आतां ही मुसलमानांची टोळधाड आली, म्हणजे तो आपल्या ता ब्यांत राहील न राहील अशी त्याचे मनांत शंका उत्पन्न होऊन त्याणें तो म्हैसूरच्या राजाला तीन लाख* रुपयांस विकला. हें वर्तमान औरंगजेबास

* बंगळूर सारखा प्रांत सारा तीन लाख रुपयांनां विकला, तेव्हां या

कळतांच त्याणें सैन्य पाठवून म्हैसूरकरापूर्वी तो व्यापला. तथापि त्याच्या किमतीबद्दल ठरलेले तीन लाख रुपये तंजावरच्या राजास न देतां मला घ्या ल तर मी तो सोडून देतों, असें सांगून तेवढी रक्कम घेऊन तो आनंदानें चालता झाला. या प्रमाणें औरंगजेबाचा स्नेह संपादून देवरावानें मराठ्यां-चा व बेदनूरच्या राजाचा ही मुलुख थोडा बहुत घेतला. परंतु तें वैषम्य मनांत बाळगून मराठे वीरांनीं अकस्मात सैन्य नेऊन श्रीरंगपट्टणास वेढा घा-तला, पण त्या प्रसंगीं त्याच्या पुत्रानें युक्तीनें व करामतीनें त्यांना हटवून घालवून दिलें. हा वेळ पर्यंत म्हैसूरवाला जमीनदार असेंच दिल्ली दरबारीं म्हणत असत, परंतु या नंतर थोड्याच दिवसांनीं औरंगजेबानें चिकदेवरा-वाला राजा असा किताब देऊन हस्तीदंती सिंहासनावर बसण्याचा अधिकार दिला. त्याणें तेव्हां जें सिंहासन तयार केलें, त्याजवरच त्याचे वंशज बस-त आले. टिपूच्या कारकीर्दीत हें त्याच्या जकिऱ्यांत पडलेलें होतें ; परंतु सन १७९९ मध्यें त्याला मारून इंग्रजांनीं तें बाहेर काढलें, आणि त्याच्या खऱ्या मालकाला त्यावर बसवून अभिषेक केला ; आणि आतां दरबारच्या प्रसंगीं महाराज त्याजवरच विराजमान होत असतात.

हा चिकदेवराव सन १७०४ मध्यें वारला. त्याणें मोठमोठाले तेरा प्रांत जिंकून आपल्या राज्यांत सामील केले, आणि औरंगजेबापासून राजा हें पद संपादून त्या सार्वभौम सत्ताधीशाशिवाय दुसऱ्या कोणाचा अधिका र आपल्यावर चालूं दिला नाहीं.

या प्रमाणें म्हैसूर ही पहिली येवढीशी जमीनदारी असतां हळुहळु वा ढत वाढत सुमारें दोनशें वर्षांनीं तिचें येवढें थोरलें राज्य बनलें. परंत ज्या राजवंशानें पिढ्यानपिढी खपून उदयास येऊन राज्य इतक्या लौकिकास आणलें त्याच्या नशिबीं अखेर सर्व स्वेच्छाचारी राजकुलांच्या मागें लागले-ली भोक्तृत्वदशा आली ; ती इतकीच कीं मग तो वंश क्षय पावण्याचा त-री प्रसंग यावा, किंवा जो नूतन अंकुर यावा, तो राज्य चालविण्याला अ-योग्य तरी असावा. चिकदेवरावाच्या पश्चात तसेंच झालें. त्याचा पुत्र कां-तिराय सिंहासनारूढ झाला, तो जन्मतःच मूक आणि बधिर होता. त्या-

---

काळीं राज्यें किती अशाश्वत आणि त्यांचें संरक्षण होणें किती कठीण वाट-त असेल याचें अनुमान सहज होईल.

च्या अंगीं येवढें मोठें व्यंग तो प्रजापालन आणि राज्यरक्षण काय करणार ! चिकदेवराय अठरा कारखान्यांवर आपली आपंग नजर राखून सर्व खातीं नीट चालवीत होता, ह्मणून तो जिवंत असेपर्यंत सर्व यथास्थित चाललें होतें ; परंतु त्याच्या पश्चात असा व्यंग पुरुष गादीवर येतांच राज्य बुडण्याच्याच पंथास लागलें. जीं राज्यें केवळ स्वेच्छ सत्ताधीस राजसत्ताक तन्हेनें चालणारीं त्यांत त्या राजानें सर्व कांहीं आपणच असलें पाहिजे, तर तीं नीट चालतात ; आणि जरना राज्याचा सर्व भार आपल्या शिरावर घेण्याचें त्याच्या अगीं सामर्थ्य नसलें, तर त्याला दुसरा कोणी तरी तसा सामर्थ्यवान पाहून त्यावर तो भार टाकावा लागतो. हें तरी त्याणें होऊन करावें लागतें असें मुळींच नाहीं ; ज्याच्या अंगांत तिनकें कर्तृत्व असतें तो आपणच पुढें सरकतो ; आणि एकदां त्याच्या हातीं सत्ता गेली, ह्मणजे मग ती आतां आपल्या वंशांत कायम रहावी अशी त्यास स्वार्थबुद्धि उत्पन्न होते. राजसत्ताक राज्यांच्या मागील इतिहासावरून पहातां असेंच आढळतें, आणि सांप्रत ही तसाच अनुभव येत आहे. म्हैसुरांत तोच प्रकार झाला. कांतिराय दहा वर्षें राजा म्हणवून घेऊन मेला. नंतर त्याचा पुत्र दोड्डकृष्णराज गादीवर बसला. ज्यानें म्हैसुराला राज्य अशी संज्ञा दिली, व आपणास सिंहासनावर बसण्याचा अधिकार प्राप्त करून घेतला, त्याचा हा नातू. त्याच्या व याच्या कारकीर्दीत अंतर ही अगदीं अल्प होतें. त्याच्या हयातीपर्यंत राज्य कमावण्याला किती काळ लागला, आणि कसे परिश्रम करावे लागले, हें येथपर्यंत सांगण्यांत आलेंच आहे. परंतु इतक्या महाप्रयासानें स्थापलेलें तें राज्य किती अल्पकाळांत ऱ्हास पावलें पहा ! कांतिराय असून नसल्या पैकींच होता ; आणि पुढें हा दोड्डकृष्णराव झाला तो अगदीं अकर्ता, दुर्बल निघाला. त्याच्या पुढच्या पिढीला राजा येवढें नांव आणि शोभेला तेवढें सिंहासन कायतें उरलें. अशी विचित्र कालगति प्राप्त झाली !

दोड्डकृष्णराजाच्या निस्तेज कारकीर्दीचें काय वर्णन करावयाचें आहे ! त्याच्या वेळीं ज्या कांहीं थोड्या शहाणपणाच्या किंवा पराक्रमाच्या गोष्टी झाल्या, त्या सर्व त्याच्या प्रधानांच्या कर्तृत्वाच्या होत्या. ते त्याच्या पुढें दीन वदन दाखवून आणि आर्जववृत्ति धारण करून, त्याच्या मर्जीचा कल पाहून तदनुसार खुषामत करीत आणि त्याला फक्त खुष ठेऊन सर्व अधि-

कार आपल्या मुठींत कायम राखीत व हवेतसे वर्तन. कृष्णराज बेकूब आणि क्षणिक स्वभावाचा होता ; तो आपल्या जवळच्या लोकांवर विलक्षण जुलूम करून त्यांनां मारी व त्यांचें सर्वस्व हरण करी, आणि लागलाच त्यांच्यावर अत्यंत खुष होऊन त्यांच्या गळ्यांत हात घालून त्यांचें झालेलें नुकसान भरून ही देई. व्याघ्रादि हिंस्र पशु, सर्प, विंचू, किडे, वगैरे जीव वाळगून प्रतिसाल एक लाख रुपये तिकडे उडवण्यास त्याला कारभारी कां हीं नको म्हणत नव्हते ; तरीच्यावर तो आपल्याला अगदीं मुक्त्यार राजा असें समजत असे. तो बहुतेक वेळ विषय सुखांत अगदीं निमग्न झालेला असे, आणि त्या विषयवासना तृप्त करण्याचीं सावनें मिळालीं, म्हणजे मा झ्या सारखा सुखी व थोर राजा साऱ्या पृथिवींत नाहीं असें म्हणे. अशीं त्या विचाऱ्याच्या कारकीर्दीचीं १९ वर्षें गेलीं. परंतु तितक्या काळांत ह्या सर्व सुखप्राप्तीचें साधन येतें कोठून आणि कसें हें त्याला एकदां ही कळलें नाहीं किंवा कळावें अशी इच्छा ही उत्पन्न झाली नाहीं. असा अक्कलसे अंधा आणि पैकेसे पूरा यजमान मिळाला, आणि कारभाऱ्यांनां त्याच्याशीं आर्जववृत्ति धरून त्याची मनोधारणा कशी करावी ती युक्ति पुरी साधली, मग ते पूर्णाधिकारी बनून आपलें कर्म करण्याला चुकतात ! त्या कारभारी मंडळांत देवराज व त्याचा चुलत बंधु नंदराज ह्मणून एक जोडी प्रमुख होती. कृष्णराज जीवंत असे पर्यंत सर्व अधिकार जरी त्यांच्या हातांत होता, तरी ते त्याला खुष करण्यास झटत आणि त्या नामधारी राजाला राजचिन्हांचा नुसता डौल तरी मिरवूं देत. परंतु तो सन १७०१ मध्यें मरतांच पुढें त्यांनां तितकें करण्याची ही जरूर वाटेनाशी झाली. कृष्णराजानंतर चामराज ह्मणून त्याचा जो भाईबंद गादीवर बसला, त्याचा ते उघड उघड अपमान करूं लागले. त्यांचीं प्रथम प्रथमचीं कृत्यें तर खरोखर फारच उद्दामपणाचीं होतीं, त्यामुळें चामराज क्षुब्ध झाला. तो कुत्सिमनाचा होता. हें खरें, परंतु अशा क्षुद्रबुद्धीच्या मनुष्यांच्या अंगांत जो एक गुण असतो तो त्याच्या ही अंगांत होता. त्याला गुप्त बेत कसा करावा हें चांगलें समजत होतें ; त्या प्रमाणें करून त्याणें त्या उभयतांस एकाएकीं बडतर्फ केलें, आणि त्यांच्या जागीं आपल्या मर्जीतले असामी नेमले. येथपर्यंत ठीक झालें, परंतु पुढें आपल्या अधिकाराला बळकटी आणण्याला व आपली छाप बसविण्याला जी मनाची दृढता पाहिजे, तो त्याच्या अंगीं नव्हती, त्यामुळें दे-

वराजास संधी सांपडून त्याणें उलट कारस्थानें मांडलीं, व राजा थोडेच लोक वरावर घेऊन शहरांतून गेला आहे, अशी वेळ पाहूनें वाड्यांत शिरून त्याणें तेथील शिपाई वश करून घेतले. पुढें चामराज परत येण्याबराबर त्यास धरून देवराजानें त्याला जन्मठेपेची शिक्षा ठरविली, आणि कावलदुर्ग किल्ल्यावर नेऊन टाकलें. त्या ठिकाणची नुसती वाईट हवा त्याचा प्राण घेण्याला पुरे होती ; परंतु देवराजाचा तेवढ्यानें संतोष न होतां त्याणें त्या कैदी राजाला वाईट अन्न घालण्याची सुरवात केली. मग त्याचे हाल काय विचारावे ! त्या योगानें तो अकाळीं मृत्युमुखांत पडला.

म्हैसुरांत जें राजघराणें दोनशें वर्षे पर्यंत नांदून स्वपराक्रमानें इतक्या महत्वास चढलें त्याचा हा चामराज पदभ्रष्ट झाल्यापासून अगदीं लोपच झाल्या सारखा झाला. मग त्या वंशांतील पुरुष नांवाला गादीचा मालक असे, परंतु तो वाड्यांत केवळ कैदी असे, त्याला दरवाजाबाहेर पाऊल टाकतां येत नसे. सर्व राज्याधिकार कोणी तरी बलिष्ट हिंदु किंवा मुसलमान वळकाऊन वसून मनसोक्त चालवी. याजकारितां पुढील वृत्तांतांत प्रायः या प्रधानराजांचींच नांवें येतील.

चिककृष्णराज नामधारी राजा झाला, तेव्हां देवराज व नंदराज हे उभयतां चुलत बंधु पहिले प्रधान राजे झाले. त्यांणीं राज्यांतील सर्व मोठमोठ्या हुद्यांवर आपली परिवार मंडळी नेमून बंदोबस्त केला, आणि पुढें लौकरच त्या जोडीपैकीं नंदराज वारला. तदनंतर थोड्याच महिन्यांनीं कर्नाटकचा नबाब दोस्त अल्ली याणें म्हैसुरावर स्वारी केली. परंतु देवराजाच्या अंगीं त्याच्या पेक्षां विशेश कर्तृत्व असल्यामुळे नबाबाचें सैन्य फार खराब होऊन पराभव पावलें. पुढें कांहीं काळानें दक्षिणेचा सुभेदार निजाम उल्मुलुख याणें मोठ्या फौजेनिशीं स्वारी केली, तेव्हां देवराजानें त्याला खंडणी देऊन दिल्लीपतीचें स्वामित्व मान्य करून त्याला वाटेस लाविलें. या पुढें वृद्धापकाळामुळें त्याला रणांगणीं जाण्याचें सामर्थ्य उरलें नाहीं, तेव्हां आपला कनिष्ठ बंधु नंदराज याजकडे तें काम सोंपवून आपण स्वस्थ वसून काम कारभार पाहूं लागला. नंदराजानें त्रिचनापल्ली घेण्याकरितां केव्हां इंग्लिश व फ्रेंच यांशीं मिळून व केव्हां केव्हां त्यांचा प्रतिपक्षी होऊन अनेक पराक्रम केले, त्यांचें साद्यंत वर्णन ऑर्मी नामक इंग्रज ग्रंथकारानें केलें आ. हे त्याणें आपली कन्या त्या नामधारी चिककृष्णराजाला देऊन आपल्या

योग्यतेस व अधिकारास वळकटी आणली.

देवराज व त्याचा बंधु नंदराज हे जरी हुशार आणि शक्तिमान हो ते, तरी त्यांणीं जसें राज्याच्या खऱ्या मालकाला गुंडाळून ठेऊन आपला हा त चालला तितका चालविला, तसेंच तिसऱ्यानें करून त्यांनां गाशा गुंडाळावयास लाविलें. एकानें बलाढ्य होऊन अधिकार वळकाविला ह्मणजे ज्यांच्या अंगांत त्याच्या सारखें पाणी असतें, ते ही त्याचेंच पाहून आपल्या मनांत ह्मणूं लागतात, कीं हाच येवढा कोण ? ह्याला बाजूस ढकलून आ-ह्मी कां पुढें होऊं नये ? आणि मग जो बळी तो कानपिळी हा न्याय हो-तोच होतो. नंदराजाच्या सैन्यांत हैदर अल्ली ह्मणून एक शिपाई होता, तो अशा प्रकारच्या महत्वाकांक्षी निघाला. त्याचा आजा महंमद बहिलोल हा पंजाबचा रहाणारा, फकीर होता. त्याणें इकडे येऊन हैदराबादेंत एक लहानशी मशीद बांधली. त्याचा मुलगा फत्तेमहंमद हा अबदुल रसूलखानाच्या पदरीं राहून सीरा प्रांत घेण्याकरितां सादतअल्ली बराबर लढत असतां पडून मेला. त्याचा धाकटा मुलगा हैदर २७ वर्षांचा होईपर्यंत स्वच्छंदपणानेंच फिरत होता. मग नोकरी करावी असें त्याच्या मनांत आलें, तेव्हां भावाच्या वशील्यानें तो म्हैसूरच्या सैन्यांत शिपाई बनला. तो चार रुपड्यांचा नोकर होता खरा, परंतु बुद्धिमान असल्यामुळें तेव्हांच प्रसिद्धीस आला. नंदराजाची त्यावर मर्जी बसून पहिल्याच मोहिमेवरून आल्यावर त्याणें त्याला एका पथकाचा स्वतंत्र सरदार बनविलें.

त्या वेळेपासून हैदर नाईक हें नांव म्हैसूरच्या राज्याशीं अगदीं खिळून गेलें आहे. त्याणें स्वतंत्रपणें, किंवा नंदराज मुख्य सेनापति असून जें सैन्य प्रथम इंग्रजांनां व मागाहून फ्रेंचांना राज्य स्थापण्यास मदतीस दिलें, त्याणें जे पराक्रम केले, त्यांचें वर्णन करण्याचें हें स्थळ नाहीं. देवराज नंदराज ही जोडी पुष्कळ दिवसपर्यंत आपला अधिकार मोठ्या दराऱ्यानें चालवीत होती. त्यांणीं राज्य वाढविण्याची किंवा संपत्ति मिळविण्याची थोडी देखील संधी फुकट जाऊं दिली नाहीं. ते रयत लोकांच्या हिताहिताकडे मुळींच पहात नव्हते. परंतु चिकदेवराजानें पूर्वी कसे कसे अनर्थ केले हो ते, तें लोकांनीं ऐकिलें होतें व दोड्डकृष्णराव अगदीं अकर्ता असल्यामुळें काय काय झालें तें अगदीं ताजें त्यांच्या डोळ्यांपुढेंच होतें, त्यामुळें राजवंशाचा कैवार घेऊन राजाला बंदींतून सोडवून मुक्तयार करावें असलें कांहीं

त्यांच्या मनांत येईना. प्रजेवर जुलूम व आणखी कांहीं अशाच गोष्टी होत असल्यानें राज्य बलहीन होत चाललें ; पर मुलखाशीं लढाई सुरू झाल्यानें त्यांत अगदीं त्राण नाहींसें झालें. तशांत सन १७५५ मध्यें मुजफरजंगानें स्वारी केली ; त्याच्या मदतीस फ्रेंचांचा पराक्रमी सरदार बुसी आपली फौज घेऊन आला होता ; तेव्हां श्रीरंगपट्टण शहर त्यांच्या हातीं पडूं देऊं नये, ह्मणून देवराजानें ५६ लक्ष रुपये खंडणी कबूल केली, आणि तिची भर करण्याकरितां कांहीं देवालयें व राजाचा खासगी जामदारखाना लुटला. अशी स्थिति झाल्यावर मुलखाचें दैन्य काय विचारावें !

चिककृष्णराज नांवाचा राजा परंतु खरा कैदी होता,. तो त्या स्थितीला कंटाळून जो नुसता आंतल्या आंत चडफडत असे ती त्याणें जरा कोठें हालचाल केली, तेव्हां त्या महापराधाबद्दल त्याला शिक्षा करणें त्या इमानी कारभारीद्वयास अत्यंत अवश्य वाटलें, परंतु वडील दादाच्या मनांत त्याला कडक शासन करावयाचें नव्हतें ; ती गोष्ट छोटे भाईच्या मनास येईना, त्यामुळें उभयतांमध्यें थोडें वैमनस्य उत्पन्न झालें. या कामांत अशी शिक्षा केली पाहिजे, कीं सर्वांनां आमची पक्की दहशत रहावी, असें ह्मणून नंदराजानें राजवाड्यावर एकदम तोफांचा भडिमार सुरू केला. मग दरवाजे फोडून आंत शिरून त्याणें राजास धरून सिंहासनावर बसविलें, आणि त्याला जी साहाय्य करणारी मंडळी होती, त्यांतील मुख्य मुख्य असामींस त्याच्या पुढें आणून त्यांचीं नाकें व कान कापविले. ही गोष्ट सन १७५६ मध्यें झाली.

बंधुराजाचें हें वर्तन न आवडून आतां आपण येथें राहणें बराबर नाहीं, असा त्याणें मनांत विचार केला, आणि इतके दिवस लोकांचे शाप घेऊन जें द्रव्य जमविलें होतें, तें बगलेस मारून गाशा गुंडाळला. तो श्रीरंगपट्टण सोडून गेला, तेव्हां मग अर्थातच अष्टाधिकार एकट्या नंदराजाकडे आले. पुढें थोड्याच दिवसांनीं मराठे श्रीरंगपट्टणावर चालून आले, तेव्हां नंदराजाला म्हैसुरापैकीं बराच मुलुख त्यांनां द्यावा लागला. हें परचक्र निवारतो तों स्वचक्र उत्पन्न झालें, मिळून त्याला सुख नव्हतेंच. देवराज नंदराजांत विकल्प उत्पन्न झाला, त्या बराबर हैदरनायकाला आपलें घोडें ढकलण्यास फावलें. तत्पूर्वीच नंदराजाला त्याची भीति वाटूं लागली होती, परंतु ती बाहेर न दाखवितां तो त्याच्याशीं मोठ्या प्रीतीनें वागत होता.

त्याणें त्याला पुष्कळ मुलुख नेमून दिला, त्या योगानें तो बलाढ्य होऊन त्याचें वजन ही फार पडूं लागलें. नंदराजानें त्याला राजाकडून फत्ते हैदर असें आदरानें म्हणविण्याचा पाठ घातला ; तो स्वतः तर तसें म्हणतच असे, आणि त्याची हुशारी ओळखून आपण त्याला वाढविलें, ह्मणून आपला डौल सांगे. परंतु हैदराचें खरें स्वरूप दृष्टीस पडण्याची वेळ अद्याप आली नव्हती ती आतां आली. त्याच्या मनांत म्हैसुरांत आपण सर्व सत्ताधीश होऊन वसावें असें आलें. परंतु त्याला नंदराज हें एक विघ्न होतें, सबब ते वढें टाळण्याचा त्याणें विचार केला. त्याणें माजी राजाच्या, राणीशीं कांहीं मसलत करून नंदराजाच्या मनांत भीति उत्पन्न केली ; तेव्हां त्याणें आपण होऊन कामाचा राजीनामा दिला. आणि दंगा करण्याचा कांहीं आव घातला, परंतु शेवटीं म्हैसूरा पासून १२ कोसांवर कुन्नूर येथें स्वस्थ रहाण्याचें कबूल केलें. मग राज्याच्या वसुलापैकीं अर्धा अधिकच दरबारांतून हैदर नायकला खर्चाकरितां नेमून मिळूं लागला, तरी तो कांहींना कांहीं निमित्त काढून वरचेवर जास्त मागत असे. असें होतां होतां शेवटीं सन १७६० मध्यें सारें राज्य एकदां कसें त्याच्या हातीं गेलें. त्याच वर्षीं त्याला हुसकून लावण्याचा एक मोठाच बेत झाला, आणि तो बहुतेक साधला होता, परंतु त्याची सद्दी मोठी, त्यामुळें तो अखेर फसला, आणि त्याला आमरण तेवढ्या साऱ्या राज्याचा उपभोग घ्यावयास सांपडला.

हैदरनाईक खरा पराक्रमी, शूर, अक्कलवान आणि राजकारस्थानी पुरुष होता. त्याला इंग्रज लोक हे बरोबरीचे शत्रु भेटले. परंतु तो जेव्हां आसमंतांतला प्रदेश जाळीत सुटून मद्रासच्या वेशीशीं येऊन ठेपला, तेव्हां त्यांच्या तोंडचें पाणी पळालें. तो आणि त्याचा पुत्र टिपूसुलतान, ज्याला म्हैसूरचा वाघ ह्मणत तो, यांच्याशीं सामना करण्याचा जेव्हां प्रसंग आला तेव्हां त्यांणीं किती दूर नजर पोहोंचवून कोठें कोठें कशीं संधानें बांधलीं, बंगाला वगैरे इतर ठिकाणच्या लढाया कशा बंद केल्या, हैदराबादचे निजाम व पुण्याचे पेशवे यांच्याशीं स्नेह संपादून त्यांची केवढी मदत मिळविली, केवढाल्या लढाया मारल्या, त्यांनां किती ठिकाणीं यश आणि किती ठिकाणीं अपयश आलें, आणि किती शूरांच्या प्राणांच्या आहुती पडल्या, त्यांचें साद्यंत वर्णन करूं लागलें तर फारच विस्तार होईल, व तो खरें म्हटलें असतां इंग्रजांच्या उत्कर्षाच्या इतिहासाचा भाग आहे, याजकरितां तो सोडून

हैदराच्या कारकीर्दीत म्हैसूरच्या खऱ्या राजवंशाची स्थिति कशी काय होती ती पाहूं. तो नामधारी राजा चिककृष्णराज सन १७६६ मध्यें वारला, तेव्हां हैदरानें त्याचा ज्येष्ठ पुत्र नंदराज वडेर यास सर्व राजचिन्हांनीं भूषित करून सिंहासनाधिष्ठित केलें, आणि नेमणूक ठरवून देऊन प्रतिबंधांत ठेविलें. परंतु पुढें लौकरच त्या तरुण राजपुत्राला मनुष्यास सहज प्रिय जे स्वातंत्र्य तें थोडें बहुत असावें अशी इच्छा उत्पन्न झाली. तें वर्तमान हैदराच्या कानीं जातांच त्याणें ती नेमणूक बंद केली, राजवाड्यांत शिरून बायकांच्या अंगावर असलेले दागिने शिवाय करून सर्व चीज वस्तु व नकत पैसा वगैरे चटसारें लुटून फस्त केलें, आणि चाकरीचीं सारीं माणसें हांकून लाऊन आपल्या खातरीचीं, इत्थंभूत वर्तमान आपल्यास लागलेंच कळविणारीं, नवीं ठेऊन दिलीं. पुढें पांच वर्षांनीं म्हणजे हैदराच्या भाग्याचा पूर्ण भर असतां त्या हतभाग्य राजानें मराठ्यांकडे संधान लाऊन कांहीं बोलणें सुरू केलें. तें उघडकीस येऊन हैदरास समजतांच त्याणें त्याच्या मानेचा घोट घेवविला, आणि त्याचा भाऊ चामराज यास गादीवर बसविलें. तो बिचारा सन १७७९ मध्यें वारला. त्याला मूलबाळ नव्हतेंच, तेव्हां तो शेवटचा पुरुष व खरा राजवंश त्या बराबर संपलाच असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. परंतु हैदराची अशी लहर लागली, कीं गादीवर नांवाला हिंदूराजा असावा हें बरें. म्हणून त्याणें एक मूल आणून बसविण्याचा निश्चय केला ; परंतु त्या राजघराण्यापैकींच कन्यावंशांतील अगदीं लगतचा, राजाचा एक नातूच होता, तो नको म्हटलें आणि आपल्या इच्छेस आला तो प्रकार केला. कर्नल उइल्क्स यांणीं त्याचें सांगोपांग वर्णन केलें आहे, तें असें—

चामराज जिवंत असेपर्यंत हैदर नाईक आपण त्याचा प्रतिनिधि होऊन राज्य चालवीत होता. प्रतिसाल दसऱ्याच्या दिवशीं तो राजवाड्यांत मोठ्या थाटानें दरबार भरी ; त्यांत तें बाहुलें आणून त्या हस्तीदंती सिंहासनावर बसवी आणि आपण दिवाण व सेनापति म्हणून त्या स्थानीं बसे. हा प्रकार अन्य कोणत्याही देशांत होता, तर लोकांचीं मनें क्षुब्ध होऊन त्या राज्यापहार करणाराला तें मोठें संकट झालें असतें. परंतु हिंदुलोक गरीब पडले, तशांत त्यांचा सारा देश मुसलमानांच्या जाचानें त्रस्त होऊन गेलेला, ते पहात होते ; एक महाराष्ट्रदेश मात्र त्यांच्या जुलमांतून मुक्त झा-

ला होता, परंतु त्यांच्या राजाची जी दशा होती, आणि मुख्य पेशव्यावर मुसलमानां पेक्षां ही वरच्या कडीच्या जो नुकताच कहर उसळला होता, तो पाहून स्वधर्मी राजा असावा, ही इच्छा जरी साहजिक आहे तरी त्यांची ती बदलली होती आणि हैदर त्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या वहिवाटीस अनुसरून जें असें केव्हां केव्हां वर्तन करी तेवढ्यानेंच ते आनंद मानीत. ही त्यांच्या मनाची स्थिति ओळखून त्यांनां खुष ठेवण्याकारितां हैदरानें चामराजाच्या जागीं दुसरा एक टिक्याचा धनी उभा करण्याचा निश्चय केला. राजकुलांत औरस कोणी उरलाच नाहीं. तेव्हां दुसरा कोणी तरी बसवायाचा, म्हणून अशा प्रसंगीं भाईबंद वंगरे ज्या कुळांतील मुलगा घेण्याची वहिवाट होती, त्या साऱ्यांची मुलें त्याणें गोळा केलीं. परंतु त्यांतून गोरें गोमटें, नीट नेटकें, किंवा बोलकें चालकें, हुशार असलें मूल निवडून न काढतां त्याणें तिसराच प्रकार केला ; तो तत्वतः पोरकट पण त्या भोळ्या लोकांनां फार गोड वाटून आवडणारा आणि त्याच्या मनांत तर त्यांनां फसवावें, आणि खुप ही करावें असें होतें, तो ही हेतु साधणारा होता. तो असा — सारीं मुलें जमवण्या पूर्वी कचेरीच्या दिवाणखान्यांत फळफळावळ, मेवामिठाई, फुलें, हार, तुरे, गजरे, नानाप्रकारचीं मुलांचीं खेळणीं, हत्यारें, पंध्या पुस्तकें, बायकापुरुषांचे दागिने, रुपये, होन मोहोरा भरलेल्या थैल्या, तसेच पोरकट किंवा शूरत्वाच्या कामधंद्यांत लागणारे पदार्थ व अनेक चिजा जागोजाग मांडून ठेऊन मग त्या साऱ्या मुलांस त्याणें एकदम आंत सोडलें, आणि ज्याला जें अतिशय आवडेल तें घ्यावयास सांगितलें. बहुतेक पोरें मेवामिठाई, फळफळावळ व खेळणीं यांवर घुसलीं परंतु एक मुलगा एक लहानसा लखलखित खंजीर पाहून त्याला भुलला आणि तो उजव्या हातांत घेऊन मग पुढें त्याणें डाव्या हातानें एक खरबूज उचललें. त्या बराबर हैदर ओरडून म्हणाला, हा आमचा राजा, याला मला आधीं आलिंगूंदे ; हा हातांत शस्त्र धारण करून प्रजापालन करणें हा आपला मुख्य राजधर्म समजेल, व राज्यांत फलसमृद्धि करणें म्हणजे संपत्ति वाढावणें हें ही आपलें कर्तव्य समजेल, तस्मात् हा राजा योग्य आहे. तें ऐकून जमलेल्या सर्व मंडळीला मोठा आनंद झाला. मग हैदरानें त्या मुलास राजवाड्यांत नेऊन त्याला अभिषेक करण्याची सिद्धता करण्यास हुकूम केला. त्या मुलाचें नांव चामराज असेंच ठेविलें. हा विद्यमान

महाराजांचा आजा ; हैदराच्या वंशाचा उच्छेद करून या राजवंशाची पुनः संस्थापना करून इंग्रजांनीं ज्याला गादीवर बसविलें त्याचा बाप.

हैदर अल्ली सन १७८२ मध्यें निवर्तला. त्याच्या पश्चात हा चामगज राजा तेरा वर्षें जिवंत होता. परंतु त्याचा सारा जन्म वाड्यांत कैदेंत गेला. शेवटीं तो सन १७९५ मध्यें मेला. तेव्हां त्याचा मुलगा त्याच्यासारखा नामधारी, नुसता टिळ्याचा अधिकारी तरी असावा असलें रिकामें सोंग कशाला पाहिजे, असें म्हणून हैदराचा मुलगा टिपूसुलतान यानें राजवाड्यांत शिरून लूट केली. तो पाषाण हृदय मुसलमान महा निर्दय आणि अत्यंत लोभी खरा ! त्या दुष्टानें त्या दोन वर्षांच्या बच्चाच्या, त्याच्या आईच्या, व कांहीं आप्त मंडळी होती, त्यांच्या अंगावरील चटसारे दागिने भराभर काढून घेतले, आणि त्यांनां वाड्यांतून काढून शेजारीं एक भिकार खोपट होतें, त्यांत जाऊन रहावयास सांगितलें. पुढें सन १७९९ मध्यें इंग्रजांनीं टिपूवरावर शेवटची लढाई करून त्याला ठार मारलें, तेव्हां सर ऑर्थर वेलेस्ली म्हैसूरचा राजा तो कोठें आहे, म्हणून शोधूं लागले तो शोधतां शोधतां त्या खोपटांत सांपडला.

हैदर आणि त्याचा मुलगा टिपू हे मेले, तेव्हां म्हैसूरच्या राजवंशाचा भाग्योदय आला. टिपू पराजित होऊन मेला तेव्हां म्हैसूरचें सारें राज्य इंग्रजांच्या हातीं गेलें. परंतु त्यांणीं तें बुडविलें नाहीं ; त्या पैकीं बराच मुलुख निजामास देऊन आपण ही बराच घेतला, आणि बाकी ४९ लक्षांचा कायम राखून म्हैसूरची गादी चालविली, व तीवर तें खोपटांत सांपडलेलें मूल नेऊन बसविलें. त्याचा बाप मोठ्या राजकुलांतील किंवा मोठा गुणी होता असें नाहींच, परंतु हैदराची लहर तशी लागल्यानें राजा झाला होता ; तथापि त्याच्या अदृष्टांत राजलक्ष्मीचा उपभोग घडावा, असें नव्हतें म्हणून तो कैदेंतच राहून अखेर मेला. त्या प्रमाणेंच या मुलाचें होतें असें त्याच्या आईला वाटणें कांहीं गैर नव्हतें, परंतु त्याचें नशीब बलवत्तर होतें, तें लौकर उदयास आलें. टिपूला मारून सारें राज्य हातीं आलें खरें, परंतु आतां याची व्यवस्थां काय करावी, हा लॉर्ड वेलेस्ली साहेबांस मोठा गहन विचार पडला. थोडा बहुत मुलुख टिपूच्या मुलांस नेमून देऊन हैदराचा वंश चालवावा तर न जाणो, तो शुराच्या वंशांकूर, तेवढें मूळ घट्ट धरून बळावेल आणि कालांतरानें बाप आजा प्रमाणें प्रबळ होऊन बसला म्हणजे

इंग्रजांनां त्यापासून पुनः उपद्रव होऊं लागेल ; त्या पेक्षां आजच त्याचें समूलोत्पाटन करावें हें बरें, असा त्याच्या मनाचा निश्चय झाला. आतां सगळें राज्य आपण घ्यावें तर निजाम व पेशवे, जे या कामांत आपल्यास अत्यंत साह्य करणारे, त्यांनां सहजच राग येऊन कदाचित ते एक होऊन आतांच आपल्याशीं लढण्यास उभे रहातील असें भय वाटलें, सबब तसें ही करतां येईना ; बरें त्यांणीं व आपण मिळूनच समसमान विभाग करून घ्यावे तर आपला हेतु फुकट जाऊन शिवाय ते थोडें तरी प्रबळ होणार, तेव्हां तसें करणें ही नीट वाटेना. ह्मणून मग त्याणें अशी युक्ति काढली कीं थोडासा मुलुख घेऊन तो त्रिवर्गांनीं वांटून घ्यावा, ह्मणजे त्या दोघांचीं समजूत झाली, आणि बाकीच्या विषयीं आपण अगदीं निर्लोभता दाखवून तूर्त त्या षड्वर्षात्मक बालकास गादीवर बसवावें आणि त्यास आपला मांडलिक करून टाकावें, ह्मणजे रंकाला राजा केल्याबद्दल आपली सहज दिगंत कीर्ति होऊन शिवाय इष्ट हेतु ही सिद्धीस जाईल. वेलेस्ली साहेबाचें हें राजकारण फार शहाणपणाचें व धूर्तपणाचें होतें, यांत कांहीं संशय नाहीं ; या बद्दल त्याची स्तुति करावी तितकी थोडीच आहे.

या प्रमाणें चामराजाच्या मुलाचें नशीब उघडून वेलेस्लीनें त्याला खोपटांतून नेऊन सिंहासनावर बसविलें. त्याचें नांव कृष्णराव वडेर. तो अगदीं अल्पवयस्क ह्मणून सरकारानें सर्व राज्यकारभार पहाण्या करितां टिपूच्या वेळचा पूर्ण्या ह्मणून एक ब्राम्हण उत्तम कारभारी नांवांजलेला होता, त्यासच नेमिलें आणि सर वारिक्लोज ह्मणून त्या वेळच्या पोलिटिकल कामदारांत उत्तमां पैकींच होता, त्यास रेसिडेंट नेमिलें व कर्नल ऑर्थर वेलेस्ली यास फौजेचा मुख्य अधिकारी नेमिलें. या प्रमाणें नवीन व्यवस्था होऊन राज्य चालूं लागलें. तें कसें काय चाललें याची हकीगत सन १८७२ च्या म्हैसूरच्या राज्य व्यवस्थे बद्दलच्या रिपोर्टांतून घेतलेली पुढें देतो. हा रिपोर्ट लिहिणारानें कृष्णराजाच्या कारकीर्दीची हकीगत थोडक्यांत व मुद्देसूद अशी फार चांगली लिहिली आहे. परंतु ती वाचून सकृद्दर्शनीं असें वाटणार आहे कीं, नेटिव्ह राजाकडून राजकारभार करविण्याची सरकारची खटपट व्यर्थ आहे. परंतु असा मनाचा भलताच ग्रह होऊं देऊं नये. विद्यमान राजाला जसें उत्तम शिक्षण मिळालें आहे, तसें कृष्णराजाला किंवा त्याच्या आधींच्या कोणत्याही पुरुषाला मिळालें नव्हतें हें पक्कें लक्षांत

ठेवावें.

कृष्णराव अल्पवयस्क असल्यामुळें सन १७९९ पासून सन १८१० पर्यंत पूर्णय्याच खरा राजा असल्या सारखा होता. परंतु तो जुलमी होता. त्याणें अकरा वर्षें कारभार करून राजाचा भांडारखाना असा भरला, कीं सन १८११ मध्यें ७५ लक्ष होन रोख शिल्लक होते. त्याणें हें आपल्या मतें राजाचें हित करून ठेविलें, परंतु तेणें करून जर प्रजा अगदीं निस्त्राण होऊन गेली असली तर तें नुकसानच नव्हे काय ! पूर्णय्या अगदीं जुन्या चालीचा कारभारी होता, त्या मुळें कृष्णराज वयांत आला, आणि आपला कारभार आपण पहाणार अशी इच्छा दर्शवूं लागला, तेव्हां त्याला तें अगदीं असह्य झालें. तें पाहून राजा संतप्त झाला. त्याच्या सभोंती खुषामत करणारी मंडळी होतीच, ती सारा दिवस " महाराज कसें ही करून आपल्या हातीं कारभार घेतला पाहिजे " असें वरचेवर अहोरात्र ह्मणत असे. शेवटीं सन १८११ मध्यें राजानें आतां मीच राज्य चालविणार असें रेसिडेंटास कळविलें. रेसिडेंटानें बरें आहे ह्मणून त्याजकडे अधिकार सोंपविण्याची तजवीज केली, व पूर्णय्या बहिष्कृत माणूस, तेव्हां तो ही कारभारांत असावा अशी खटपट चालविली. परंतु आजपर्यंत मुकत्यारीनें हवें तसें वागून आतां अगदीं ताबेदारींत रहावें लागणार ह्मणून त्याला तें न रूचून त्याणें काम नको म्हटलें. तो राजीनामा देऊन श्रीरंगपट्टणास जाऊन राहिला आणि तेथेंच पुढें थोड्याच दिवसांनीं वारला.

कृष्णराव स्वत: राज्याधिकार चालवूं लागला तेव्हां त्याच्यावर इंग्रज सरकारची कृपा व जामदारखाना ओतप्रोत भरलेला, अशी सर्व गोष्टींची त्याला मोठी अनुकूलता होती, परंतु त्याची तारूण्यावस्था आणि हाताखालीं कोणी हुशार कारभारी मिळाला नाहीं ही मोठी प्रतिकूलता होती. त्यामुळें यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्वमविवेकता ॥ एकैकमप्यनर्थाय किमुतत्रचतुष्टयम् ॥ या कविवचनाची सार्थकता होण्याची वेळ आली. कृष्णराज विषयसुखलंपट होताच आणि कामांत जरी हुशार व नजरबाज होता तरी सर्व कांहीं आपणच करावें हा त्याला हव्यास असल्यानें तें अगदीं शक्तीबाहेरचें काम त्याच्यानें उरकत नव्हतें. तो उदार ह्मणजे इतका होता कीं तो गुण दोषरूप झाला; व त्याची देवस्थानांकडे ही देणगी विशेष होती. अशी स्थिति झाल्यावर राज्यव्यवस्था ह्मणून उरूंच नये यांत कांहीं आश्चर्य नाहीं. महाराजां-

च्या हातांत अधिकार देऊन दोन वर्षें लोटलीं नाहींत तोंच पूर्णय्यानें सांठ-
वून ठेवलेल्या पाऊण कोट होनांचा फडशा उडाला हो उडाला असा रेसिडें
टाला सरकारास रिपोर्ट करावा लागला. असें करूं नये कांहीं तरी विचारा
नें वागावें, असें त्याणें राजाला पुष्कळ समजून सांगितलें परंतु तें सर्व व्य-
र्थ झालें. त्याचा उत्तरोत्तर एक एक पाऊल पुढें जाण्याचा क्रम चालू हो-
ता. राज्यांतील सर्व मोठमोठीं कामें मक्त्यानें, जो सर्वांत अधिक रक्कम बोले
ल त्याला देण्याची वहिवाट सुरू होतीच, त्यामुळें प्रजा अगदीं धुळीस मि-
ळून गेली. शर्तीनें महाल देण्याची वहिटाट मथम पूर्णय्याच्या कारकीर्दीत
सुरू झाली. अमूक एका महालाबद्दल मी सरकारांत इतकी जमाबंदी वसूल
करून देईन, त्यांत तूट पडेल तर पदरच्या पैशानें भर करून देईन व जा-
स्ती वसूल येईल तर तो सरकारांत देईन असा अम्मलदार करारनामा करू
न देत त्याला शर्ती ह्मणत. ह्या शर्ती प्रतिसाल होत असून मागच्या पेक्षां
पुढच्यावर्षीं चढ होत असे. शर्ती बद्दल जे मुचलके होत त्यांत आम्ही रय-
तेवर जुलूम करणार नाहीं, नवीन, कर किंवा पट्टी बसविणार नाहीं, अथवा
बागवगीच्यांत जो सरकारचा हिस्सा असेल तो विकत घेण्यास रयत लोकांस
सक्ती करणार नाहीं; असे करार अम्मलदार लिहून देत, परंतु ते कागदांत
रहात; ते मोडल्याबद्दल फिर्याद करून किती ओरडलें तरी कोणी दाद घे-
त नसे त्यामुळें सहजच असा परिणाम झाला कीं रयत लोक अगदीं भि-
कार होऊन गेले, वसूल येईनासा झाला, आणि अम्मलदारांनां कित्येक वे-
ळ पैसा अंगावर भरावा लागला. अशी सर्व वेदाद झाली, सरकारचें जें
खरें कर्तव्य तें मुळींच कोणी करीनासें झालें आणि जो उठला तो शर्तीदा-
र, फौजदार, अम्मलदार, पैसा काढण्यासाठीं हवातसा जुलूम करी, त्यामुळें
रयतेचे हाल अनिवार होऊं लागले.

अशी जेव्हां अगदीं दुःस्सह स्थिति झाली, तेव्हां नगर प्रांतांतील
कांहीं भागच्या रहिवाशांनीं बंड केलें. हा प्रांत पहिला म्हैसूरच्या ताब्यांती-
ल नव्हता ; हैदराच्या कारकीर्दीत काबीज झालेला होता, त्यामुळें त्यांत रा-
जाचा अम्मल इतर ठिकाणां सारखा चालत नसेच. त्यांतील कितीएक पा-
ळेगारांनीं स्वतंत्र होऊन हैदरानें जो तेथचा राजा पदच्युत केला होता, त्या
चा वंशज ह्मणून एक तोतया उभा केला. तेव्हां त्या बंडखोरांचें पारिपत्य
करण्या करितां राजाची फौज रवाना झाली. तिला जरी बऱ्याच लढायांत

जय आला तरी बंड निखालस मोडेना, ह्मणून त्याला इंग्रजांची फौज मदतीस मागावी लागली. मग मात्र तें साफ मोडलें.

म्हैसूरची राजस्थिति जेव्हां बिघडत चालली, तेव्हांच हिंदुस्थान सरकारचें लक्ष तिकडे थोडथोडें जाऊं लागलें होतें, आणि पुढें बंड होऊन तें जेव्हां प्रबळ झालें, तेव्हां आतां याची चौकशी चांगली केली पाहिजे, असें सरकारास वाटलें. मग तें उद्भवलें कसें, फैलावलें कसें आणि शेवटीं मोडलें कसें, त्याची चौकशी करण्याकरितां ह्मणून गव्हरनर जनरलानें एक कमिटी नेमली. तिणें चौकशी करून रिपोर्ट केला, त्यावरून असें दिसून आलें कीं महाराजांची राज्यपद्धति अगदीं वाईट असल्यामुळें मुलुख भर सारी प्रजा अगदीं नाखुष होऊन गेली आहे, वसूल फार जलद तुटला आणि सर्व खात्यांत येथून तेथून सारी अव्यवस्था माजली आहे. तेव्हां गव्हरनर जनरलानें अशा ठराव केला, कीं राजाबराबर जो कुमकेबद्दल तहनामा आहे, त्यांतील चौथें व पांचवें कलम आतां अमलांत आणलें पाहिजे लॉर्ड उइलियम बेंटिंक हे तेव्हां गव्हरनर जनरल होते ; त्यांणीं राजाला भलें चरचरीत, एक लांबलचक पत्र लिहिलें. त्यांत त्याला कोणत्या स्थितींत गादीवर बसविलें, मदतीसंबंधीं तह करण्याचा उद्देश काय, त्याणें राज्याची सारी अव्यवस्था कशी केली आणि लोकांवर जुलूम जबरी कोणत्या प्रकारची चालली होती, तें सर्व तपशीलवार लिहून लॉर्ड साहेबांनीं पुढें आणखी असें लिहिलें — यामुळें वर जे तहनाम्यांतील करार दाखल केले आहेत, ते मनांत आणून व म्हैसूरच्या राज्याचें संरक्षण करण्याचें जोखीम सरकारानें आपल्यावर घेतलें आहे, ह्मणून तें करण्याकरितां व अनेक बाबतींत जें नुकसान होणार आहे तें या पुढें तरी होऊं नये, ह्मणून आतां आपल्या कामांत आम्हांस हात घातल्या वांचून रहातां येत नाहीं. आपल्या राज्याचें संरक्षण चांगल्या रीतीनें झालें पाहिजे याजकरितां आपल्या मुलखाचा सर्व कामकारभार इंग्रज अम्मलदारांच्या हातीं देणें आम्हास जरूर दिसतें, सबब तो हातीं घेण्याकरितां आम्ही कमिशनरांच्या नेमणुका करण्याचें ठरविलें आहे; त्या प्रमाणें ते म्हैसुराकडे तावडतोब रवाना होत आहेत. याजकरितां आतां आम्ही आपल्यास ही रीती प्रमाणें शेवटची सूचना देत आहों. या पत्राचा अर्थ आपण तसाच समजावा, ह्मणजे हाल्लीं प्रमाणें प्रसंग आलों असतां सरकारानें राज्यकारभार आपल्या हातीं घेण्याचें ठरवून कोणती तज-

वीज करण्याचें मनांत आणलें आहे, त्याची आपल्यास सूचना द्यावी असा जो तहनाम्यांत ठराव अहे, त्या प्रमाणें आपल्यास ही नोटीस देण्यांत येत आहे असें समजावें. या करितां महाराजांस आमची अशी विनंती आहे, कीं हें पत्र आपल्या हातांत पडल्या पासून दहा दिवसांचे आंत आपल्या कामदार व अम्मलदार मंडळीस योग्य हुकूम व जाहिरनामे देऊन इकडून जे ब्रिटिश कमिशनर रवाना होत आहेत, त्यांजकडे सर्व मुलखाचा अम्मल कबजा देववावा. त्यांस इकडून जसे हुकूम झाले आहेत किंवा पुढें होतील त्यां प्रमाणें राज्य स्वाधीन करून घेऊन काम कारभार चालवितां येई अशी तजवीज व्हावी.

तहनाम्यांत ठराव असल्या प्रमाणें राजास खासगी खर्चा करितां दरसाल एक लाख होन द्यावे असें ठरलें. गव्हरनर जनरलाचें जें आज्ञापत्र आलें तें मुक्काम्यानें मान्य करून राजा राज्य सोडून म्हैसूर येथील. राजवाड्यांत जाऊन राहूं लागला. गव्हरनर जनरलानें सर्व अधिकार दोघां कमिशनरांकडे सोंपविला, त्यां पैकीं पहिल्याची नेमणूक त्यांणींच केली, व दुसऱ्याची मद्रास सरकारानें केली. त्या ज्येष्ट (सीनियर) कमिशनरास एकमत जादा [कास्टिंग व्होट] देण्याचा अधिकार होता, त्यामुळें कनिष्ठ कमिशनराचें मत हरएक कामांत रद्द होऊं लागलें, आणि तो राजाप्रमाणेंच निर्माल्यवत् होऊन बसला. शिवाय जमाबंदीसंबंधीं काम पहाण्याकरितां दिवाणाची नेमणूक होतीच. ती जागा सन १८३४ पर्यंत कायम होती, पुढें मोडली. सन १८३२ च्या जून महिन्यापर्यंत हे कमिशनर मद्रास सरकारच्या हाता खालीं होते, परंतु त्या महिन्यांत तो संबंध तोडून हिंदुस्थान सरकारानें त्यांनां आपल्या नजरेखालीं घेतलें. पुढें लौकरच सरकारचे दृष्टीस असें आलें, कीं दोन कमिशनर दोन तऱ्हांचीं मतें देणारे असल्यामुळें काम नीट चालत नाहीं, उगाच बखेडा मात्र होतो, याजकरितां त्यांतील एक कमीच करावा, त्या प्रमाणें सन १८३४ च्या एप्रिल मध्यें कर्नल मॉरिसन या एकाच्याची नेमणूक होऊन सर्व राज्यावर त्याचा अधिकार चालूं लागला.

पुढें थोड्याच काळानें राज्यव्यवस्थेंत आणखी पुष्कळ फेरफार केले पाहिजेत असें स्पष्ट दिसूं लागलें. प्रथम राज्य ताब्यांत घेतेवेळीं गव्हरनर जनरलानें मद्रास सरकारास असा हुकूम केला होता कीं कमिशनरांच्या

हाताखालचे झाडून सारे कामदार नेटिव्ह असावे आणि खरोखर चालू अस लेलीं सर्व कामें मामुल वहिवाटीप्रमाणें चालवावीं. पुढें कोर्ट ऑफ डायरेक्टरांस हेंच मत पसंत पडून त्यांणीं जें सन १८३५ मध्यें पत्र पाठविलें त्यांत ही असें लिहिलें होतें कीं राज्यकारभारांत होईल तितकी देशी पद्धत चालू ठेवावी; पुढें नेटिव्हांनां चालवितां येऊं नये असली तऱ्हा सुरूच करूं नये अशी आमची इछा आहे. या हुकमाप्रमाणें कमिशनरांनीं पहिल्या पहिल्यानें साधलें तितकें वर्तन केलें, परंतु पुढें कांहीं काळानें असें नजरेस आलें कीं सारी व्यवस्था बिघडून अगदीं मुळापर्यंत कुजून गेलेली आहे. तिचा एक मासला सांगतों--अपराध्यांची चौकशी करण्याकरितां न्यायाधीश नेमलेले होते, परंतु त्यांणीं आरोपी अपराधी किंवा अनपराधी इतकेंच कायतें ठरवावें, याच्या पलिकडे त्यांनां कांहीं अधिकार नव्हता. शिक्षा देण्याचा अधिकार राजानें फक्त आपल्या हातांत ठेविला होता; परंतु तो आळशी पडल्यानें त्याच्या हातून काम मुळींच होत नव्हतें. त्यामुळें आरोपींच्या हातून यःकश्चित गुन्हे घडलेले असले तरी ते आणि खरे मोठे अपराधी होते ते, असे सारेच कित्येक वर्षें अडकून राहून तुरुंग भरून गेले होते. अमुक अम्मलदाराला अमुक अधिकार अशी कांहींच यत्ता नव्हती, त्या मुळें त्यांवरच्या अजांस ही निर्बंध नव्हता. अशी सारी बेबंदी असल्यामुळें ती स्थिति सुधारण्याचें काम एका कमिशनराच्या हातून नुसत्या तेवढ्या नेटिव्ह कामदारांच्या मदतीनें होणें अगदीं अशक्य होतें. ह्मणून नेटिव्ह फौजदारांच्या बदला चार युरोपियन सुपरिंटेंडंट ठेवावे असें ठरलें. हुजूर अदालत हें साऱ्याराज्यांत मुख्य कोर्ट, व तींतील नेटिव्ह न्यायाधीश होते तसेच कायम राहिले, परंतु त्यांणीं ठरविलेल्या शिक्षा कमिशनराचे मंजुरीनें अमलांत याव्या असें ठरलें आणि पुढें थोड्क्याच दिवसांनीं जुडीशिअल कमिशनराची नेमणूक झाली. रेसिडेंटाची जागा सन १८४३ मध्यें मोडली.

सन १८३४ च्या जून मध्यें कर्नल मॉरिसनच्या जागीं जनरल कब्बान् (पुढें सर मार्क) याची नेमणूक झाली, तेव्हां राज्यव्यवस्था या प्रकारची होती कब्बान साहेब सन १८६१ पर्यंत कमिशनर होते, तितक्या काळांत त्यांणीं प्रजेला दास्यत्वांतून मुक्त करून सुखी केलें, आणि सरकारचा खजिना मोकळा पडून अगदीं दैन्य आलें होतें तें नाहींसें करून राज्य संपन्न करून सोडलें. त्यांच्या कारकीर्दीचा म्हैसूरचा इतिहास पाहि-

ला ह्मणजे एतद्देशीय अमलापेक्षां इंग्रजांचा अम्मल चांगला असें ह्मणणारे जे लोक आहेत त्यांच्या मतास चांगलें पुष्टीकरण येतें. म्हैसूरचा वसूल उत्तरोत्तर थोडा थोडा वाढत गेला. त्या राज्यांत लहान मोठे ७६९ प्रकारचे एकंदर कर होते ते सर्व बंद झाले. हें खरें वाटण्यासारखें देखील नाहीं. परंतु या संख्येची भरती लग्न केलें असतां कर, व्यभिचार केला असतां कर, मूल झालें कीं त्यावर कर, त्याच्या नामकरणावर कर, चूडाकरणावर कर, अशा विलक्षण तऱ्हेच्या करांनीं केलेली होती. एका गांवांत मागें एका पाळेगाराचा घोडा पळून गेला होता तो सांपडला नाहीं ह्मणून तेथल्या लोकांवर कर बसला होता तो त्यांच्या नातू पणतूंनां ही द्यावा लागत होता; तसेंच नगरमध्यें एक स्थळ होतें त्याच्या जवळून जातांनां जो कोणीं आपले हात अंगासरसे धरणार नाहीं त्यावर कर होता! हे सर्व कर उत्पन्नाच्या द्वाबी ह्मणून सरकारच्या जमाबंदीपटास दाखल होते, परंतु सर मार्क कब्बान याणें ते सर्व सोडले; तसेंच जमिनीचा सारा वसूल करण्याच्या बाबतींत पूर्णय्याच्या कारकीर्दीपासून पुष्कळ गैर चाली सुरू झालेल्या होत्या त्या सर्व त्याणें बंद केल्या; रयत लोकांनां वसूल देण्यास जड पडूं नये ह्मणून पिकांचे हंगामाच्या मानानें पांच हप्ते ठरविले; बटाईनें ह्मणजे ऐनजिनशी वसूल घेण्याची चहिवाट होती, तींत रयतेवर अनेक प्रकारचे जुलूम होत, सबब ती पुष्कळ अंशीं बंद केली आणि पुष्कळ ठिकाणीं जामिनीचे दर ही कमी केले.

आतां राजकीय प्रकरणीं थोडी हकीगत सांगून पुरे करूं. राजा म्हैसुरांत रहात असे तो सन १८६८ मध्यें मरेपर्यंत तेथेंच रहात होता. त्याला राजकीय कामांत अधिकार मुळींच नव्हता, परंतु खासगी खर्चा बद्दल उत्पन्नापैकीं एक पंचमांश नेमणूक होती, तींतून दानधर्म, देहेनगी, वगैरे पुष्कळ खर्च करतां येई. दातृत्व हा त्याच्या अंगीं एक मोठाच गुण होता. त्याला आपला वृद्धापकाळ आला असें वाटूं लागलें, तेव्हां सन १८६५ मध्यें त्याणें आपल्या भाईबंदांपैकीं एका थोर घराण्यांतील मुलगा दत्तक घेतला. सरकार हा दत्तक मंजूर करतें किंवा नाहीं, या विषयीं बरेच दिवस मोठा संशय होता. परंतु सन १८६७ मध्यें विलायत सरकारानें कृपा करून एप्रिल मध्यें तो मंजूर केला. त्याचें नांव चामराजेंद्र वडेर. कृष्णराज महाराज वारल्यानंतर सहा महिन्यांनीं म्हणजे तारीख २३ सेप्टेंबर सन

१८६७ रोजीं चामराजेंद्र महाराजांस सिंहासनाधिष्ठित करण्याचा समारंभ झाला. त्या वेळीं त्यास सहावें सरून सातवें वर्ष लागलेलें होतें.

महाराज कृष्णराज वडेर बहादूर मरण पावले, तेव्हां गव्हरनर जनरल साहेबांनीं जाहिरनामा प्रसिद्ध करून म्हैसूरचे सरदार, जाहागीरदार, व सर्व लोक, यांस असें कळविलें, कीं महाराजांचा व सरकारचा स्नेह पन्नास वर्षां वरच चालत आलेला असल्यामुळें त्यांचे मरणानें सरकारास दुःख वाटतें. महाराजांचे दत्तक पुत्र चामराजेंद्र यांस सरकारानें मान्य केलें आहे, ते त्यांचे गादीवर बसतील. परंतु ते अल्पवयस्क आहेत, सबब त्यांचे नांवें इंग्रज सरकार आजपर्यंत ज्या तऱ्हेनें व ज्या कायद्यांनीं राज्य चालवीत आलें, त्या प्रमाणेंच पुढें चालवील. महाराज जेव्हां वयांत येतील. ह्मणजे अठरा वर्षांचें होतील, तेव्हां येवढा मोठा अधिकार संभाळण्यास ते योग्य आहेत, असें दिसेल तर त्या वेळीं जसे करार करून घेणें योग्य वाटेल तसे करून घेऊन त्या मुलखाचा राज्याधिकार त्यांचे स्वाधीन करण्यांत येईल.

महाराज कृष्णराज बहादूर कोणत्या योग्यतेचे राज्यकर्ते होते, हें पूर्व वृत्तांताबरून दिसून येतच आहे; तरी सरकारानें त्यांस पहिल्या प्रतीचा चांद ह्मणजे नाइट ग्र्याँड कमाँडर ऑफ धि मोस्ट एक्झाल्टेड ऑरडर ऑफ धि स्टार ऑफ इंडिया हा लांबलचक किताब दिला होता.

महाराज चामराजेंद्र यांच्या विद्याध्ययनास सातव्या वर्षींच आरंभ झाला. त्यांच्या पदरचे सरदार व मोठमोठे कामदार मंडळीचीं मुलें त्यांचे सहाध्यायी होऊन एका इंग्रज गुरूचे देखरेखीखालीं राजवाड्यांतच शाळा ठेऊन अभ्यास चालला होता. तो पूर्ण होऊन महाराज वयांत आले, तेव्हां सरकारानें म्हैसूरचें राज्य त्यांचे स्वाधीन केलें, तें ते चांगलें चालवीत आहेत व पुढें ही असेंच उत्तम प्रकारें चालवितील अशी सर्व हिंदू लोकांस फार आशा आहे.

रंगाचार्लू ह्मणून एक मोठे हुशार मद्रासी गृहस्थ होते, त्यांस महाराजांनीं आपले दिवाण नेमिलें होतें. त्यांणीं राजकारभार उत्तम चालविला होता, परंतु प्रजेच्या दुर्दैवानें सन १८८३ मध्यें त्यांजवर मृत्यूनें अकस्मात् झडप घातली. हा मोठा मुत्सद्दी गेल्यानें महाराजांस मोठीच मदत नाहींशी झाली.

म्हैसूरचें राज्य स्कॉटलंड देशायेवढें आहे. त्यांतील प्रजा ९० ल-

क्षावर आहे. मुलुख उंचु सखल मोठें मैदान आहे ; आणि त्यांत कोठे मध्यें मध्येंच कांहीं डोंगर आहेत.

भाग ३

त्राव्हणकोर

त्राव्हणकोरच्या उत्तरेस कोचीन व कोइंबतूर जिल्हा आहे, पूर्वेस मदुरा व तिनिवेल्ली प्रांत आहेत, आणि दक्षिणेस व पश्चिमेस समुद्र आहे.

दक्षिण प्रदेशीं समुद्राच्या आणि पर्वताच्या मध्यें जो सुपीक मुलुख आहे, तो महापराक्रमी श्रीपरशुरामानें समुद्रास मागें हटवून त्यापासून घेऊन ब्राम्हणांस रहावयास दिला अशी पौराणिकी कथा आहे. ती कशी ही असो, परंतु इतकें खरें आहे, कीं फार प्राचीन कालापासून हें राज्य हिंदूंचें आहे, त्यांत कायदे कानू हिंदूंचे चालत आहेत, व नंबुरी नामक ब्राम्हण मंडळी फार प्राचीन काळीं तेथें वसाहत करून राहिली ती अद्याप आहे. त्यांच्या वतनी इनामी जमीनदाऱ्या फार मोठमोठ्या अनादी असल्या सारख्या आहेत ; त्यांवर फाळा, पट्टी, कर, वगैरे राजाचा कोणता ही हक्क नाहीं. आणखी अशी ही दंतकथा आहे कीं ब्राम्हणांनीं क्षत्रियांस बोलाऊन आणून एक एकास बारा बारा वर्षें राज्य करावयास सांगितलें ; त्या प्रमाणें राज्य करतां करतां शेवटीं तेच क्षत्रिय कायम व स्वतंत्र होऊन बसले. त्यांत चेरुमन पेरुमल हा शेवटचा राजा झाला. तो प्रथम चोलदेशच्या राजाचा प्रतिनिधि होणून केरलदेशावर राज्य करीत होता, परंतु पुढें स्वतंत्र राजाच झाला. त्याजकडे प्रथम समुद्रतीरच्या सुपीक प्रदेशाचा पट्टाच होता, तो त्याणें आपल्या पुत्रास विभागून दिला. या गोष्टीस १२०० वर्षें झालीं म्हणतात. विद्यमान राजघराणें इतकें प्राचीन असण्याचा संभव आहे.

तिकडे मल्याळ शक चालतो, तो इसवी सन ८२५ पासून सुरू झालेला आहे. तेव्हांपासून जितके राजे झाले तितक्यांचीं नांवें पांक्तवार येथें लिहून ठेविलेलीं आहेत, परंतु खरा विश्वसनीय इतिहास पाहूं गेलें तर दोनशें वर्षांचा मात्र मिळतो.

या राज्यांत इंग्रज लोक सन १६४८ मध्यें अंजणगो येथें एक व-खार घालण्याची परवानगी घेऊन राहिले. ते राजाच्या फौजेस कपडा, दा-रूगोळा, हत्यार, वगैरे लागेल तें सामान पुरवीत, आणि मिरीं वगैरे त्या मुलुखाचा मौल्यावान माल आपल्या तिकडे पाठवीत. त्यावेळीं पोर्चुगीस, डच, इटालियन वगैरे लोक राजाचे सैन्यास युरोपियन धरतीची कवाईत शिकवीत असत व मुख्य सेनापति ही तेच असत.

सन १७४० पूर्वी राज्यभर लहान लहान सरदार व जाहागीरदार फार होते, ते वरचेवर पुंडावा करून स्वतंत्र होऊं पहात, परंतु मस्तंद वर्म नामक जो राजा तेव्हां गादीवर होता त्याणें डी लॅनॉय नामक एक फ्रेंमिश अम्मलदार चाकरीस ठेऊन त्याजकडून युरोपियन तऱ्हेची कवायती फौज तयार करविली आणि तिचे साहाय्यानें १८ वर्षांत पुष्कळ लहान लहान सरदार जिंकून संस्थानें काढून घेतलीं. तो सन १७५८ मध्यें वारला आ णि बनजी बौला पेरुमल गादीवर बसला त्याणें डी लानॉय यास कायम रा खून मस्तंद राजानें आरंभिलेलें काम तसेंच पुढें चालविलें, आणि बाकी रा-हिलेल्या संस्थानिकांस जिंकलें.

या राजाच्या दुर्दैवानें त्याचें व टिपूसुलतानाचें वांसूं लागलें. त्याणें सन १७७८ मध्यें आपल्या राज्यांतून इंग्रजाच्या फौजेला महीवर हल्ला कर ण्याकरितां खुशाल जाऊं दिलें म्हणून हैदर व टिपू यांनां त्याचा मोठा राग आला होता. पुढें त्याला वश करून घ्यावें म्हणून त्याजकडे त्यांणीं बोलणें लाविले होतें परंतु तो वळला नाहीं. दक्षिण हिंदुस्थानांतला तेवढा एकच राजा धैर्य धरून इंग्रजांशीं मित्रत्वानें राहिला. सन १७८३ च्या नवंबर मध्यें पानियानी येथें इंग्रजांस जय आला त्यामुळें त्यानां पुष्कळ प्रकारें फायदा झाला; त्या लढाईंत बनजी राजाच्या फौजेनें चांगली मदत केली. या प्रमाणें त्याणें मनापासून साहाय्य केल्यानें त्याला मित्रत्वाचा हक्क प्राप्त झाला होता, तो मानणें सरकारास भाग होतें, म्हणून सन १७८४ मध्यें टिपूबरावर जो त ह झाला त्यांत त्याचें नांव दाखल झालें.

पुढें टिपूनें सारा मलबार व कानडा प्रांत जिंकून घेतला, तेव्हां ब्राह्-मणकोरच्या स्वतंत्र राज्या सभोंता सारा त्याचा अम्मल झाला. तें राज्य त्या-च्या मनांत तेव्हांच तोंडांत टाकावयाचें होतें. परंतु सन १७८४ चा तह-नामा गुंतला होता, त्यामुळें त्याचा इलाज चालेना, परंतु तो हरएक प्रसंगीं

कांहीं तरी निमित्त काढून त्राव्हणकोरचा राजा जो अगदीं तटस्थ वसला हो-ता, त्याला खिजवून अंगांवर आणण्यास सारखा झटत होता. त्या हेतूनें एक-दां त्याणें आपलें सैन्य सरहद्दीवर नेलें, तेव्हां राजा अगदीं घाबरून गेला, आणि स्वसंरक्षणाकरितां चांगली सहा पलटणें फौज तयार कराची असें मनां-त आणून सन १७८८ च्या जूनमध्यें त्याणें मद्रास सरकाराजवळ ४ अ-म्मलदार व १२ सार्जंट मागितले. त्यावर सरकारानें असें उत्तर दिलें, कीं जें सैन्य आम्ही पगार देऊन ठेविलेलें नाहीं, त्यावर हुकमत चालवण्याला आपले कामदार देणें ही गोष्ट आमचे वहिवाटीस सुटून आहे. तथापि तुम-चे मुलखावर शत्रूचा हल्ला होऊं नये, ह्मणून संरक्षण करण्याकरितां तुम्हास सबंद पलटणें पाहिजे असतील तर एक, दोन, तीन, किती लागतील ति-तकीं मागितलीं असतां त्याबद्दल विचार करूं. असें उत्तर आलें, तेव्हां रा-जानें दोन पलटणें ठेवण्याचें कबूल केलें. त्यांच्या पगाराबद्दल लढाई नसेल तेव्हां म्हणजे तीं बैठीं असतां प्रत्येकीं दरमहा १७९९ दोन म्हणजे सुमार ७००० रुपये रोख किंवा तितक्या किमतीचें मिरीं द्यावें असा ठराव झा-ला.

हीं पलटणें राजाच्या मुलखांत जाण्याकरितां रवाना होऊन वायपेन बेटावर जाऊन दाखल होतात, इतक्या अवकाशांत टिपूला खुरापत काढ-ण्यास सवड सांपडली. राजानें डचलोकांपासून कंगनूर शहर विकत घेतलें, तें कोचीनच्या राजाच्या मुलखांत होतें, आणि तो राजा टिपूच्या पदरीं मां-डलिक होता ; येवढ्या संबंधानें तें शहर घेण्याचा तुम्हांस. अधिकार काय, असें ह्मणून इंग्रजांचा व राजाचा परस्परांस संकटसमयीं मदत करण्याचा तहनाम्यांत ठराव होता, तरी तें मनांत न आणतां तारीख १९ दिसेंबर सन १७८९ रोजीं सकाळींच त्याणें त्राव्हणकोरच्या तटावर हल्ला केला. परंतु राजाचे सैन्यानें असा मार दिला, कीं त्याला पक्की आठवण रहावी. त्याला पळतां भूय थोडी होऊन पालखी, शिक्के, मोर्तबें, अंगावरचे दागिने वगैरे त्यांच्यापुढें फेंकून देऊन अगदीं सडा होऊन प्राण घेऊन जातों कसा असें झालें. परंतु तेवढ्या संकटांतून मुक्त होतांच त्याणें सूड उगवण्याचा निश्च य केला. आपला हेतु इंग्रजांस अगदीं न कळूं देतां त्यांच्या डोळ्यांत ध-ती टाकून त्याणें युद्धाची चांगलीच तयारी केली, आणि तारीख ७ माह नम से १७९० रोजीं एकाएकीं हल्ला केला. तो डाव चांगलाच साधन

त्याणें सारा मुलुख अगदीं उजाड करून सोडला आणि पुढें त्यांत ठाणीं घालून तो हातचा जाऊं ही दिला नसता. परंतु इतक्यांत राजा आपला मित्र असून त्याच्याशीं त्याणें शत्रुत्व मांडलें होतें, ह्मणून इंग्रजांनीं त्याच्या मुलखावर चाल केली, त्यामुळें त्याला तिकडे धांवत जाणें भाग पडलें.

टिपूबराबर लढाई करून इंग्रजांनीं त्याचें अर्धें राज्य• घेतलें, तेव्हां राजाचा जेवढा मुलुख त्याणें घेतलेला होता तेवढा परत देविला.

त्याच्या पुढच्या वर्षीं म्हणजे सन १७९३ च्या जानेवारी मध्यें राजाचा व इंग्रजांचा व्यापारसंबंधीं तह झाला ; त्यांत त्याणें मुंबई सरकारा पासून बनात, हत्यारें व इतर कांहीं जिन्नस घेऊन त्यां बदला पुष्कळ मिरीं देण्याचा करार केला. त्याच वर्षीं त्याणें इंग्रजांचीं तीन पलटणें, तोफखान्याकडील एक गोरी कंपनी व कांहीं लष्कर आपल्या चाकरीस ठेंऊन घ्यावें, व ही सारी फौज त्याच्या मुलखांत किंवा त्याच्या सरहद्दीवर लगतच किंवा खालसा इलाख्यांत तो सांगेल तेथें रहावी असें बोलणें सुरू झालें, आणि तें नियमांत येऊन सन १७९५ मध्यें त्या प्रमाणें तहनामा झाला.

पुढें सन १७९९ मध्यें वनजीवावल मेरुमल वारला, आणि राजा रामवर्म पेरुमल गादीवर बसला. तो सिंहासनावर येऊन फार काळ झाला नाहीं, इतक्यांत एक गोष्ट घडली तिच्या योगानें इंग्रज सरकारविषयीं त्याच्या मनांतील स्नेहबुद्धि जाऊन अगदीं औदासिन्य उत्पन्न झालें. टिपूमुलतानाबराबर सन १७९९ च्या मे महिन्यांत शेवटचा घोर संग्राम होऊन श्रीरंगपट्टणाच्या तटावर त्याच्या प्राणाचा वळी गेला, त्या युद्धांत त्राव्हणकोरच्या राजानें इंग्रजांस साहाय्य केलें होतें ; असें असतां त्या प्रबळ शत्रूचें निर्दलन होतांच इंग्रज त्याचें स्वातंत्र्य हरण करण्यास प्रवृत्त झाले. राजानें त्यांचीं पलटणें चाकरीस ठेऊन घेऊन त्यांचा खर्च देण्याचा करार पूर्वीच केला होता, परंतु सन १८०५ च्या जानेवारींत कंपनी सरकार आणखी एका पलटणाचा खर्च वर्षास देईन असा त्याजजवळ करार करून मागूं लागलें,आणि त्या बदला त्याला जी फौज चाकरीस ठेवावी लागत असे ती नको ह्मणूं लागलें. सरकारानें आणखी असें बोलणें लाविलें, कीं कांहीं विशेष प्रसंगीं राज्यांतील सर्व खात्यांचीं व्यवस्था पहाण्याचा अधिकार आम्हांस असावा व तीं चालविण्याकरितां आम्ही आपल्या तर्फे गोरे अम्मलदार नेमूं ;

अशा प्रसंगीं तुम्हांस वर्षास दोन लाखांत कमी उत्पन्न होणार नाहीं, अशी आह्मी हमी घेतों, शिवाय ऐकंदर उत्पन्नाचा पंचमांश वर देऊं ; तुम्ही आमच्या सह्यामसलतीप्रमाणें वागावें, कोणत्याच पर राज्याशीं संबंध ठेऊं नये, व आमच्या परवानगीवाचून इतर कोणा युरोपियनास आपल्या चाकरीस ठेऊं नये किंवा मुलखांत येऊं देऊं नये.

ह्या तहनाम्यानें त्राव्हणकोरास वस्तुतः अगदीं पारतंत्र्य येऊन तें केवळ इंग्रजांच्या कृपेनें चालणार असें झालें.

परंतु ही स्थिति त्राव्हणकोरांतील बऱ्याच लोकांनां अगदीं न आवडणारी होती; यामुळें त्यांच्यांत असंतोष उत्पन्न होऊन तो फार त्वरित पसरत चालला आणि लोक बिथरले. त्या तहानें दिवाणाचा अधिकार समूळ बुडाला, मग तो स्वस्थ कसा बसेल ? त्याला जरी यश येईल अशी फारशी आशा नव्हती, तरी तो त्या लोकांत मिसळून अगदीं प्रमुख झाला. मग ऐकंदर ३०००० लोक जमून त्यांणीं बंडच केलें आणि त्या चाकरीस ठेवलेल्या फौजेस जाऊन वेढलें. त्या प्रसंगीं ते जर चांगली हिम्मत धरते तर त्यांचा खचित जय होत होता. परंतु तें यशाचें आदिकारण त्यांच्या जवळ नव्हतें, यामुळें त्यांणीं जरी पुष्कळ लढाया मारल्या तरी शेवटीं त्यांचा पराजय होऊन तें बंडं मोडलें. मग राजाला कोणी विश्वास टाकण्या सारखा योग्य मनुष्य मिळेना आणि आपल्या अंगांत राज्य करण्याची योग्यता आहे असें वाटेना, तेव्हां आतां हा सारा राज्याधिकार रेसिडेंट साहेबाच्या स्वाधीन करावा असें वाटूं लागलें; परंतु तितक्यांत त्याला मृत्यूनें गांठून त्या विचारांतून सोडविलें. तदनंतर लक्ष्मीराणी गादीवर बसली; तिला पुत्र होईपर्यंत तिणें राज्य करावें असा ठराव झाला. ती गादीवर येतांच सर्व राज्यकारभार ब्रिटिश रेसिडेंटाचे हातीं गेला. हा फेरफार प्रजेला मोठा हितावह झाला हें कबूल केलें पाहिजे. त्रावणकोरांत सन १४९६ पासून एक कायदा चालत होता, त्यावरून सामान्य अपराधाबद्दल मोठी शिक्षा होत असे आणि ज्या गुन्ह्यांला उग्र दंड करणें अवश्य ते करणारे अपराधी स्वल्प शिक्षेनें मोकळे होत. तो प्राचीन पासून चालत आलेला कायदा आतां रद्द होऊन चांगल्या तत्वांवर रचलेला नवा सुरू झाला. जमाबंदीच्या व वसुलाच्या कामांत ही पुष्कळ फेरफार आणि सुधारणा झाली.

लक्ष्मीराणीला सन १८१३ मध्यें एप्रिलच्या १८ व्या तारखेस पुत्र

होऊन तो गादीचा मालक झाला, तेव्हां ती त्याचें पालनकर्ती ह्मणून अधिकार चालवूं लागली, परंतु पुढच्या वर्षी दुसरा पुत्र प्रसवून ती वारली. तेव्हां तिची बहीण तत्स्थानापन्न झाली. मग त्याच वर्षी ह्मणजे सन १८१४ च्या अखेरीस रेसिडेंट साहेबानें राज्यकारभार चालविण्याचें काम तिजकडे सोंपविलें. तें त्या बाईनें त्याच्या मसलतीनें मोठ्या हुशारीनें फार चांगलें चालविलें. पुढें सन १८२९ मध्यें तो मुलगा १६ वर्षांचा झाला तेव्हां त्याला रीतीप्रमाणें गादीवर बसविण्याचा समारंभ होऊन तो सर्व अधिकार चालवूं लागला. त्या नंतर तीन वर्षांनीं नवीन राज्यव्यवस्था सुसूत्र चालूं लागली असें पाहून सरकारानें आपली चाकरीस ठेविलेली फौज काढून नेली.

तो राजा सन १८४६ मध्यें वारला तेव्हां त्याचा भाऊ मस्तंद राजा गादीवर बसला. त्याची कारकीर्द १४ वर्षें झाली, परंतु तींत सांगण्यासारखी कांहीं मोठी गोष्ट घडली नाहीं. तो सन १८६० मध्यें वारून त्याचा पुतण्या राजा रामवर्म गादीवर बसला.

ह्या राज्यांत दायभागप्रकरणीं अशी वहिवाट आहे, कीं गादीस वारस कन्यावंश. उदाहरण असें समजा कीं राजाला दोन पुत्र आणि एक कन्या आहे. आतां तो वारला तर त्या कन्येचा पुत्र सिंहासनारूढ होतो. त्याला औरस कन्यावंश नसेल तर गादी पुढें चालण्याकरितां स्वकुलांतील दोन किंवा अधिक ही कन्या पाहून त्या दत्तक घेऊन ठेविल्या पाहिजेत, अशा कन्यांस तुंबरण म्हणतात. सन १७८८ मध्यें अशा प्रकारचें दत्तविधान करण्याचा प्रसंग आला होता, तेव्हां दोन बहिणी दत्तक झाल्या. त्या उभयतांस ही कन्या झाल्या ; पैकीं कनिष्ठ होती, ती त्या कन्येसह निंवर्तली. कैलासवासी महाराज हे त्या थोरलीचे दौहित्र होत विद्यमान महाराज रामवर्म हे त्यांचे भागिनेय होत. सन १८५७ मध्यें पुनः कन्यावंश नष्ट झाला, तेव्हां महाराजांनीं स्वकुलवृद्ध्यर्थ इंग्रज सरकारचे अनुमतीनें आप्तवर्गांतीलच दोन स्त्रिया दत्तक घेतल्या. राजास दत्तक घेण्याचा अधिकार मिळाला आहे.

विद्यमान महाराज विचारसंपन्न व बहुगुणी आहेत. त्यांणीं प्रवास करून बहुत देशावलोकन ही केलेलें आहे. हिंदुस्थानांत हाल्लीं जे मोठें हुशार आणि उत्तम राजे आहेत त्यांतच त्यांची गणना आहे. ते इंग्लिश

भाषा शुद्ध व अस्खलित बोलतात. त्यांचा बहुतेक पत्रव्यवहार इंग्रजींतच चालतो. त्यांची जन्मभाषा मल्ल्याळी असून हिंदी, मराठी, तामिळ, व तेलगी इतक्या त्यांस बोलतां येतात. महाराजांस विद्येची व गायनाची खरी अभिरुचि असून ते मर्मज्ञ आहेत.

दक्षिण हिंदुस्थानांत त्राव्हणकोर प्रदेश फार सुंदर आहे. पूर्व बाजूस इंग्लिश अमलांतील कॉरोमांडेल किनाऱ्याच्या आणि या राज्याच्या दरम्यान जे पर्वत आहेत त्यांत कित्येक शिखरें समुद्राच्या सपाटीपासून ८००० फूट उंच गेलेलीं असून तीं सुद्धां सारी रांगच्यारांग निबिड अरण्यानें भरून गेलेलीं आहे, आणि खालीं समुद्राच्या लांगेपासून सुमार दहा मैल रुंदीचा अगदीं सपाट प्रदेश नारळीपोफळींनीं ठेंचून भरून गेलेला आहे, तें एक हिरवें गार कडें घातल्या सारखें दिसतें. जंगलांत सागवान. अबनूस, शिसवा इत्यादि उंची झाडें आहेत. व्यापाराच्या जिनसांत मिरीं, वेलदोडा, जायफळ, लवंग, हे जिन्नस मुख्य आहेत.

भाग ४

कोचीं

ह्या लहानशा संस्थानाची उत्तरसीमा मलबार प्रांत, दक्षिणसीमा त्राव्हणकोर, पूर्वसीमा दिंदिगल आणि नैर्ऋत्यसीमा आरबी समुद्र आहे. चेरुमन पेरुमल ह्मणून चोल राजांचा प्रतिनिधि गोकर्णापासून तहत कन्याकुमारीपर्यंत, त्राव्हणकोर मलबार सुद्धां सर्व केरलदेशावर नवव्या शतकाच्या सुमारास राज्य करीत होता, तो पुढें स्वतंत्र राजा बनला ; त्याचे आह्मी वंशज अशी कोचीनचे राजे आपली पूर्व पीठिका सांगतात. परंतु इतक्या प्राचीन काळचा त्यांचा इतिहास मिळणें कठीण आहे. तथापि बऱ्याच काळापूर्वी पोर्चुगीस लोकांनीं त्यांनां पादाक्रांत केलें, अशा विषयीं सप्रमाण लेख आहेत. पोर्चुगीस लोकांनीं कोचीन येथें किल्ला ही बांधला. त्या वर सन १६६२ मध्यें डच लोकांनीं हल्ला करून तो शहर सुद्धां घेतला. त्यांच्या उत्तम व्यवस्थेनें कोचीनमध्यें सोन्याचा धूर निघूं लागला. त्यांणीं

बाकीचा मुलुख घेण्याचा कांहीं यत्न केला नाहीं ; तो राजाकडे तसाच राहून त्यांत त्याचा अम्मल पुरा चालत होता. परंतु सन १७५९ मध्यें मलबारच्या झामोरिनानें त्यावर हल्ला करून तो घेतला, तेव्हां तो राजा त्राव्हणकोरच्या राजास शरण गेला. ला समयीं त्याणें साहाय्य करून झामोरिनास हांकून लाविलें म्हणून राजानें त्याचे उपकार मानून आपल्या राज्या पैकीं कांहीं मुलुख त्यास बक्षीस दिला.

सन १७७६ पर्यंत हा राजा अगदीं स्वतंत्र होता, परंतु त्या वर्षी हैदर अल्लीनें स्वारी करून राज्य जिंकलें, आणि त्यावर खंडणी बसविली. ती सन १७९० पर्यंत त्यास द्यावी लागत होती.

पुढच्या वर्षी राजा वेरुमल तुंवरण हा इंग्रजांच्या पाठीशीं पडून टिपूस मोजीनासा झाला. परंतु सन १७९२ मध्यें त्याचा व इंग्रजांच्या तह ठरला तेव्हां त्याणें कोचीनच्या राज्यावरील आपले सर्व हक्क इंग्रजांस दिलें. कंपनी सरकारानें तें राज्य यथापूर्व सर्व अधिकारांसह राजास परत दिलें आणि टिपूनें घेतलेले प्रांत व किल्ले प्रथम लढाई करून सोडवून घेण्यास खर्च लागला होता म्हणून राजानें एक लक्ष रुपये वर्षास खंडणी द्यावी असें ठरविलें. त्याला पूर्वी हैदराला इतकीच द्यावी लागत होती.

इकडे इतका प्रकार झाला तरी मुख्य कोचीन शहर उच्च लोकांच्याच ताब्यांत होतें. परंतु पुढे त्यांची व इंग्रजांची लढाई सुरू होतांच तें त्यांणीं काढून घेतलें. तेथें इंग्रजांचा अम्मल सुरू झाला परंतु त्याणीं उच्च लोकांनीं जे कायदे सुरू केले होते ते तसेच राखले. म्हैसुरांत जों पर्यंत हैदराचा वंश गादीवर आहे तों पर्यंत आपल्याला भय आहेच असें राजाला पक्कें वाटत होतें, म्हणून तो अगदीं मनापासून इंग्रजांचा आश्रय करून होता. परंतु सन १७९९ मध्यें टिपूचा वध झाला तेव्हां तो अगदीं निर्धास्त झाला आणि मग हा इंग्लिशांचा संबंध आपल्याला जाचक आहे असें हळुहळु त्याच्या मनांत येऊं लागलें. होतां होतां सन १८०९ मध्यें यांच्या जाचांतून मुक्त व्हावें असा पक्का निश्चय करून त्याणें त्राव्हणकोरच्या दिवाणाशीं संधान बांधलें. मग उभयतांचे विचारें फौज तयार होऊन इंग्रजांवर अकस्मात हल्ला झाला. तत्पूर्वी रेसिडेंटाचा खून करण्याचा प्रयत्न झाला होता, परंतु तो साधला नाही. इंग्रजांनीं तें बंड हां हां म्हणतां मोडलें आणि राजाला नवा तह कबूल करण्यास लाविलें. त्यांत त्याणें शिपायांचें एक पलटण

चाकरीस ठेऊन ध्यावें. त्याच्या खर्चाबद्दल अर्काट चलनी १७६०३७ रुप. ये प्रतिसाल द्यावे; युरोपियन किंवा इतर कोणी परमुलखी लोक इंग्रज सरकारच्या परवानगीवांचून चाकरीस ठेऊं नये व सरकारास तसा प्रसंग वाटल्यास सर्व अधिकार त्यांचे स्वाधीन करावा व आपण योग्य पोटगी घेऊन रहावें वगैरे करार मान्य केले.

या वेळीं कोचीनच्या राज्याचा वसूल सारा ४८०००० रुपये असून त्यापैकीं अर्ध्यावर रक्कम सरकारास जाऊं लागली तेव्हां राजास खर्चाची फार टंचाई पडूं लागली. त्यामुळें बखेडा फारच वाढला, तेव्हां रेसिडेंट साहेबास स्वत: दिवाण होऊन बसावें लागलें. परंतु त्याच्यानें देखील जमेच्या व खर्चाच्या तोंडाची मिळवणी चालणें होईना; म्हणून त्याणें प्रथम सरकारानें उत्पन्नापैकीं बराबर निम्मे म्हणजे फक्त २४०००० रुपये घेऊन बाकी रकम सोडावी अशी एक तजवीज केली पुढें आणखी ४०००० ची सूट मिळून फक्त दोन लाख वर्षास द्यावे असें ठरलें व तेवढीच रकम हाल्ली पोंचते. रेसिडेंटानें जमाबंदी, शेती, व्यापार वगैरे खात्यांत पुष्कळ सुधारणा केली, तिचें फळ ही चांगलें आलें. तें असें कीं आतां दहा लक्षांवर वसूल येतो.

कोचीन शहरांत डच लोकांचे कांहीं हक्क राहिले होते, ते सारे अखेर सन १८१४ मध्यें त्याणीं सोडून इंग्रजांस दिले. त्या शहरांत त्यांचा अम्मल १५० वर्षांवर चालत होता, त्यामुळें तेथें त्यांच्याच प्रजेची वस्ती फार झालेली आहे.

सन १८४९ मध्यें गादीवर जो राजा होता, त्याच्या दुर्वर्तनामुळें सरकारचे रेसिडेंटास राज्यकारभार आपल्या हातीं घेणें भाग पडलें. त्या पासून परिणाम फार चांगला झाला. विद्यमान महाराज रामवर्म सन १८५३ मध्यें गादीवर बसले, तेव्हांपासून मुलखाची उत्तरोत्तर आबादानी आहे. कालवे, रस्ते, पूल व इतर लोकोपयोगीं कामें होऊन पुष्कळ सुधारणा झाली आहे, तरी ही तिजोरींत पैसा शिल्लक आहे. कित्येक विनाकारण कर होते, ते रद्द होऊन व्यापारास उत्तेजन पुष्कळ मिळाल्यानें तो वाढला आहे. खालसा मुलखांतील बंदरांप्रमाणेंच कोचीन बंदराची व्यवस्था असल्यानें तें ही वाढलें आहे.

त्रावणकोर व कोचीन हीं दोन ही राज्यें एकाच ब्रिटिश रेसिडेंटा-

चे नजरेखालीं आहेत. विद्यमान मुता तुंबरण क्षणजे राजे रामवर्म हे उत्तम संस्कृतज्ञ आहेत. त्यांचा ना. क. आ. धि. मो॰ ए. आ. आ. धि. स्टा. आ. इंडिया हा किताब आहे.

ब्राम्हणकोरप्रमाणें येथल्या ही गादीस कन्यावंश वारस होत. असतो.

पांचवें खंड समाप्त

खंड ६

उत्तर हिंदुस्थान

सतलजच्या आलीकडील [डाव्यातीरचीं]

संस्थानें

१ पतियाळा

नभा प्रांतामध्यें चौधरीफूल नामक एका शेतकऱ्यानें एक गांव वसविला. पुढें त्याचे सहा पुत्र कर्ते निघाले ; त्यांतील द्वितीय रामा याणें ह्या राज्याचा पाया घातला, व बाकीच्यांनीं आणखी लहान मोठीं संस्थानें स्थापिलीं. असें हें फुलांचें घराणें भरारत गेलें, तेव्हां त्यास त्या मूळपुरुषावरून फुलकी असें नांव पडलें. हे सरदार जातीचे जाट, परंतु पतियाळाचे महाराज हे शीकपंथानुयायी आहेत.

पतियाळा सन १७५२ मध्यें स्वतंत्र झालें असें कळतें, परंतु त्याच्या आरंभापासूनचा सविस्तर वृत्तांत मिळत नाहीं. सन १८०६ मध्यें जो राजा गादिवर होता, तो एकीकडे रणजितसिंग व दुसरीकडे इंग्रज असे प्रबळ शत्रु असतां त्यांच्या मध्यें आपली गादी संभाळून होता. तो त्या दोघांतून एकाला ही नमून नव्हता, परंतु त्याच्यावर रणजितसिंगाचा डोळा होता. मार्किस ऑफ वेलेस्ली गेल्यावर त्या प्रदेशांत अगदीं शांतता होती, तेव्हां रणजितसिंगाच्या मनांत सतलजनदीच्या डाव्या तीरचीं संस्थानें जिंकून घ्यावीं असें आलें, व हें आपलें कृत्य इंग्रजांच्या लक्षांत येणार नाहीं, अथवा आलेंच तरी ते आपल्यास प्रतिबंध करण्यास उभे रहाणार नाहींत असें वाटलें. त्यावेळीं त्याचें नशीब ही त्याला चांगलें अनुकूल होतें, त्यामुळें त्याला हवा होता तसा योग घडून आला. पतियाळाच्या आणि नभाच्या राजांमध्यें फार मोठा कलह सुरू झाला ; त्यांत नभाच्या राजानें आपण किंचित अशक्त आणि शत्रु प्रबळ असें पाहून रणजितसिंगाकडे जाऊन या-

ची मदत मागितली. मग त्याचा हर्ष काय विचारावा ! त्याणें तत्काळ त्यास साहाय्य करण्याचें कबूल करून सन १८०६ च्या आक्टोबर मध्यें आपलें सैन्य सतलजनदी उतरून आलीकडे आणलें आणि त्या उभयतां प्रतिस्पर्धी राजांस आपलें सांगणें ऐकावयास लाविलें. या प्रमाणें कृतकार्य होऊन तो स्वदेशास निघून गेला. आपला हेतु सिद्धीस नेण्याकरितां त्याच कामाच्या पाठीस लागण्या पूर्वी आपलें हें वर्तन इंग्रजांस कितपत रुचतें तें पहावें असा त्याचा उद्देश होता, तो ही या स्वारींत साधला. इंग्रज सरकार त्याला आडवें आलें नाहीं, त्यावरून आपली शिकार साधते असें त्यास वाटलें.

नंतर पुढच्या म्हणजे १८०७ ह्या वर्षी पतियाळाच्या राजाचें आणि राणीचें वैमनस्य आलें, तेव्हां राणीनें बोलावल्यावरून रणजितसिंगास त्या राज्यांत पुनः जावयास सांपडलें. परंतु तो नदी उतरून येतो असें समजतांच त्या प्रांतींचे सर्व राजे रजवाडे गडबडले, आणि त्यांणीं कलकत्यास गव्हरनर जनरलाकडे असें सांगून पाठविलें, कीं आम्ही इंग्रज सरकारचे सेवक आहों, आमचें संरक्षण झालें पाहिजे. त्यांनां तिकडून उत्तर येई तों इकडे त्या राजदंपत्याचा कलह मिटला ; त्यामुळें रणजिताला त्या मुलखांत रहाण्यास कारण उरलें नाहीं. त्या स्त्रीपुरुषांनीं रणजितसिंगास एक हिऱ्याची आंगठी व एक पितळेची तोफ बक्षीस देऊन त्याची पाठवणी केली. या प्रमाणें मान सन्मान झाला खरा, परंतु आपला अंतस्थ हेतु कांहींच साधला नाहीं, म्हणून क्रुद्ध होऊन त्याणें कित्येक लहान सहान राजांचे किल्ले व जमीनजुमले बळकाविले. पुढें आपल्या कृत्यास प्रतिबंध होण्या सारखी दिल्लीस तयारी चालली आहे, असें वर्तमान त्यास कळलें, तेव्हां त्याणें गव्हरनर जनरलास असें पत्र पाठविलें, कीं इंग्रजांचीं ठाणीं पडलीं आहेत तेवढीं शिवाय करून बाकी सर्व मुलुख माझा आहे.

रणजितसिंगाच्या ह्या बोलण्यास इंग्रज सरकार कांहीं तत्क्षणींच आडवें गेलें नाहीं, परंतु तुझें हें म्हणणें थोडें फाजीलपणाचें आहे, असें बोलण्यास त्याजकडे त्यांणीं आपला वकील पाठवून दिला. ह्या सामोपचाराचा परिणाम भलताच झाला. इंग्रज मला भ्याले असें समजून रणजितसिंग गर्वानें फुगला, आणि मुद्दाम सतलज उतरून येऊन अंबाला शहर घेऊन बसला. तेव्हां आतां शेवटचा उपाय योजला पाहिजे, असें समजून सरकार फौ

ज जमा करूं लागलें. तें पाहून मग रणजितसिंग पहिलें बोलणें सोडून देऊन तहास सिद्ध झाला.

त्या प्रमाणें सन १८०९ च्या एप्रिल महिन्यांत तह झाला. त्यांत असें ठरलें कीं सतलजनदीच्या डाव्या बाजूकडील संस्थानिकांच्या मुलखास किंवा हक्कास रणजितसिंगानें स्वतः किंवा दुसऱ्या कोणास प्रेघून उपसर्ग लाऊ नये. मग मे महिन्यांत सरकारानें जाहिरनामा लाऊन असें प्रसिद्ध केलें, कीं सरहिंद व माळवा प्रांतांतील सर्व संस्थानिकांचें आम्ही संरक्षण करूं, त्याजवदल त्यांजकडून खंडणी घेणार नाहीं, फक्त लढाईच्या प्रसंगीं त्यांणीं आमची चाकरी करावी. या प्रमाणें आश्रय दिलेल्या त्या संस्थानांचा सार्वभौम सरकाराशीं संबंध कोणत्या प्रकारचा असावा, त्याचा खुलासा त्याच्च जाहिरनाम्यांत केलेला होता.

ह्या सन १८०९ च्या तहनाम्याचा सारांश पाहूं गेलें असतां इंग्रज सरकारचा आश्रय मिळण्यापूर्वीं त्या सरदारांकडे जीं संस्थानें होतीं तीं कायम राखावीं असा होता. तीं संस्थानें तेव्हां दहा होतीं; त्यांच्या मालकांस सरकारचा आश्रय मिळाल्यानें त्यांनां पहिल्या प्रबळ शत्रूचें भय नाहींसें झालें खरें, परंतु मग आपसांत एक मेकांशींच लढण्याची दुर्बुद्धि उत्पन्न झाली. हें भविष्य सरकारच्या लक्षांत प्रथम आलें नव्हतें, परंतु मग बळी तो कानपिळी असा त्यांच्यांत प्रकार सुरू झालेला पाहून सन १८११ मध्यें त्यांणीं दुसरा जाहिरनामा लाऊन मध्यंतरीं कोणी जे एकमेकांचे मुलुख घेतले होते ते परत द्यावे व पुढें कोणी कोणास उपद्रव देऊं नये असा हुकूम फर्माविला.

पुढें तीन वर्षांनीं इंग्रजांची व नेपाळवाल्यांची लढाई सुरू झाली, तेव्हां सन १८०९ च्या तहनाम्यांतील कराराप्रमाणें सरकारानें पतियाळाच्या राजाजवळ मदतीस फौज मागितली; ती आनंदानें देऊन तो चांगलाच उपयोगीं पडला, ह्मणून सरकारानें त्याचें गौरव करून कैंतळ व बघत ह्या संस्थानां पैकीं आपण घेतलेल्या मुलखांतील ३५००० रुपये वसुलाचा प्रदेश त्यास देऊन त्याच्या सनदा करून दिल्या. राजानें त्या बदला सरकारास २८००० रुपये दिलें.

सन १८३० मध्यें सरकारानें बेखली प्रांतापैकीं तीन गांव राजास देऊन त्याजपासून सिमला हा हवाशीर पर्वत प्रदेश बदला घेतला.

पुढें सन १८४५ मध्यें लाहोर संस्थानाबरावर लढाई सुरू होई पर्यंत कांहीं विशेष गोष्ट घडली नाहीं. त्या स्मरण रहाण्यासारख्या युद्धप्रसंगी पतियाळाचा राजा इंग्रजांस पूर्ण अनुकूल होता. नभाच्या राजाचें मन शत्रूकडे फार ओढत होतें परंतु शेवटीं त्यास त्या बद्दल प्रयाश्चित्त भोगावें लागलें. सरकारानें त्याच्याशीं युद्ध करून त्याचा मुलुख घेतला व त्यापैकीं कांहीं पतियाळाच्या महाराजांस त्यांच्या राजभक्ती बद्दल बक्षीस दिला. सरकारानें त्याचवेळीं महाराजांस अशी सनद करून दिली कीं आपला प्राचीनचा व आलीकडे आम्ही नवीन दिलेला हा सर्व मुलूख तत्संबंधीं सर्व हक्कांसह आपल्याकडे व आपल्या वारसांकडे वंशपरंपरा सतत निर्बंध चालेल. पुढें महाराजांनीं आपल्या मुलुखांतून जाणाऱ्या येणाऱ्या मालावर दस्तुरी व रहदारी जकात घेण्याचा हक्क सोडला म्हणून सरकानें लाहोर दरबारापासून घेतलेला १०००० रुपये जमाबंदीचा मुलूख आणखी बक्षीस दिला.

सन १८५७ च्या भयंकर प्रसंगीं पतियाळाचे महाराज सरकारच्या असे उपयोगीं पडलें, कीं त्याबद्दल त्यांची स्तुति करावी तितकी थोडीच आहे. ते आणि झिंदचे व नभाचे राजे या त्रिवर्गांनीं त्यावेळीं जी झटपट केलं, तिच्या योगानें पंजाबांत बंदोबस्त राहिला, आणि इंग्रज सरकारचे सैन्यास दिल्लीवर जाण्यास सांपडलें. त्या प्रसंगीं म्हणजे बंडाच्या आरंभी सतलजच्या या तीरचे राजेरजवाडे इंग्रजांवर उठते किंवा त्यांनां मदत न करतां जरी नुसते स्वस्थ बसते तरी देखील इंग्रजांच्या राज्याला चांगलाच धक्का बसला असता असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. असें असतां त्यांणीं मनःपूर्वक झटून त्यांस मदत केली. याजकरितां त्यांचे उपकार मानावे तितके थोडेच आहेत.

पतियाळाचे महाराज इंग्रजांस इतर राजांप्रमाणें नुसती फौजफाट्याची मदत करून राहिले नाहींत ; ते त्यांजपेक्षां फार जास्त उपयोगीं पडले. त्यांची फौज रणांगणीं उपयोगीं पडतच होती, व जाण्या येण्यास रस्ते खुले राखण्याचा बंदोबस्त ही करीत होती, आणि महारांजांनीं इंग्रजांनां आपला पैसा निःशंकपणें दिला. त्या वेळची धामधूम मनांत आणली म्हणजे त्यांचें हें कृत्य किती थोरपणाचें होतें, व ते उपकार केवढें होते तें चांगलें लक्षांत येतें.

महाराजांचीं आपल्यावर अशी भक्ति आणि निष्ठा पाहून सरकारानें खुष होऊन खालसा केलेला बराच मुलुख त्यांनां बक्षीस दिला, त्याणें त्यांचें उत्पन्न बरेंच वाढलें. तसेंच सन १८६० मध्यें सरकारानें त्यांस सनद करून दिली, तींत तुमच्या पूर्वार्जित व नूतन संपादन केलेल्या सर्व मुलखावर तुम्ही व तुमच्या वंशजांनीं पूर्ण अधिकार चालवावा, आपल्या पदरच्या व करभार देणाऱ्या सर्व लहान थोर संस्थानिकांकडून यथापूर्व नोकरी घ्यावी ; जमाबंदीसंबंधानें किंवा नोकरीबद्दल म्हणून अथवा अन्य कोणत्याही निमित्तानें आम्ही तुम्हांकडे कधीं खंडणी मागणार नाहीं, असें लिहून दिलें. ह्या सनदेंत आणखी ही कांहीं करार आहेत. ते महाराजांस अनुकूल असेच आहेत. महाराजांनीं सरकारास पूर्वी पैसा दिला होता, तें रद्दकर्ज होणेंच होतें, म्हणून त्याच्या फेडीकरितां कांहीं मुलुख देऊन पुढें त्याच्या ही सनदा करून दिल्या. हे महाराज नरेंद्रसिंग यांस तारीख १ नाव्हेंबर सन १८६१ रोजीं सरकारानें ना. क. ऑ. धि. मो. ए. ऑ. ऑ. धि. स्टा. ऑ. इंडिया हा किताब दिला.

ह्या महाराजां विषयीं अर्ल क्यानिंग म्हणतात — यांनीं सन १८५७ । ५८ च्या बंडामध्यें जें धैर्य आणि स्थैर्य प्रकट केलें, त्यांच्या पुढें त्यांच्या पूर्वजांचीं शूरत्वाचीं कृत्यें फिक्कीं दिसतात ; त्यांची स्वामिभक्ति दृढ आणि सुव्यक्त आहे. हे महाराज सन १८६२ मध्यें नोव्हेंबरच्या १२ व्या तारखेस अकस्मात मृत्यु पावले. नंतर त्यांचे चिरंजीव महाराज महेंद्रसिंग गादीवर बसले.

महेंद्रसिंग अल्पवयस्क, तेरा वर्षांचे असतां गादीवर आले. पुढें सन १८६४ मध्यें नभाच्या राजाच्या मरणाचें कारण शोधून काढण्याविषयीं चौकशी सुरू झाली, तेव्हां हे त्या मंडळींत नेमलेले होते. तो वृत्तांत पुढें येईल. महेंद्रसिंग अल्पकाळपर्यंतच राजश्रीचा उपभोग घेऊन तारुण्याच्या भरांत असतांच सन १८७७ मध्यें मृत्यु पावले.

२ झिंद

येथीलराजे पतियाळाच्या घराण्यापैकींच भाईबंद आहेत. झिंदची गादी सन १७६३ मध्यें गजपतसिंग याणें स्थापिली. पुढें १७६८ मध्यें दि

ह्यांच्या बादशहानें त्याला सरदार असें म्हटलें. ह्या संस्थानाचा इंग्रजसरकारा शीं संबंध पतियाळाच्या पूर्वी जडला. सन १८०५ मध्यें लॉर्ड लेक होळकराच्या पाठीस लागला होता, तेव्हां तेथील गादीवर बाघसिंग नामक राजा होता, तो रणजितसिंगाचा मामा; त्याणें लेक साहेबाला यश यावें अशी फार उत्कंठा दाखविली, आणि तसें होऊन ती लढाई पुरी होतांच त्याणें इंग्रजांचा आश्रय धरला. लॉर्ड लेक त्याला फार मानीत असे.

सतलजच्या या तीरचीं संस्थानें जिंकून घेण्याचा हेतु धरून रणजितसिंग नदी उतरून आला होता, तेव्हां झिंदचाराजा आपला भाईबंद पतियाळचा राजा यासच सामील झाला. त्या प्रसंगींचा व पुढें सन १८४५। ४६ मध्यें शीक लोकां बराबर लढाई झाली तेव्हांचा ह्या दोन्ही राज्यांचा इतिहास अगदीं एक आहे. पतियाळच्या राजाप्रमाणें या राजास ही तितकाच मुलुख व नक्त पैसा बक्षीस मिळाला.

सन १८५७ मध्यें दिल्लीशहर बंडवाले बळकाऊन बसले असतां त्यांच्यावर प्रथम चाल करून गेला तो झिंदचा राजा सरूपसिंग. तो आपलें सैन्य घेऊन इंग्रजांच्या फौजेच्या विनीवर होता. दिल्लीच्या हल्ल्यांत त्याचें सैन्य होतेंच आणि तें शहर पुनः हस्तगत होईपर्यंत तो त्याला वेढा देऊन बसलेला होता. सरूपसिंग असा उपयोगीं पडला ह्मणून इंग्रजसरकारानें त्या सालिना ११६८१३ रुपये वसुलाचा मुलुख बक्षीस दिला. या बदला त्याणें लढाईच्या वेळीं सरकारची चाकरी फौजेनिशीं करावी असा ठराव आहे. सन १८६०मध्यें पतियाळच्या राजाला जशी सनद मिळाली तशीच त्याचवेळीं याला ही मिळाली. हा सरूपसिंग सन १८६४ मध्यें वारला.

विद्यमान राजा संगतसिंग हा जो नजिकचा भाईबंद ह्मणून सरूपसिंगाचे पश्चात गादीवर बसला तो ही पुष्कळ दूरचाच आहे. ह्मणून मूळ गादी स्थापन करणाऱ्या पुरुषाच्या वंशजांनीं जितकें राज्य काबीज केलें होतें तितकें सर्व कांहीं त्यास मिळालें नाहीं. त्यापैकीं सुमार अर्धें राज्य खालसा होऊन बाकीचें अर्धें, त्या घराण्याकडे प्राचीन पासून चालत आलेलें तें, व आलीकडे इंग्रजसरकारची जी नवीन देहेनगी होती तें, इतकें त्यास मिळालें. तें तो अनुभवीत आहे.

३ नभा

नभा शहर सन १७९९ मध्यें हमीरसिंग यानें स्थापिलें, आणि पुढें राज्य वरेंच वाढविलें. तो पूर्वोक्त दोन राजघराण्यांपैकींच भाईबंद होता. सन १८४९ पर्यंतचा या घराण्याचा आणि पतियाळच्या राजघराण्याचा वृत्तांत कांहीं फारसा निराळा नाहीं. त्या वर्षीं देवेंद्रसिंग ह्मणून जो गादीवर राजा होता, तो शीख लोकांस सामील झाला, ह्मणून शिखांचें व इंग्रजांचें युद्ध चाललें होतें तें पुरें होतांच इंग्रज सरकारानें त्यास पदच्युत करून ५०००० रुपये नेमणूक ठरवून दिली. त्याच्या राज्यापैकीं चौथाई मुलुख इंग्रज सरकारानें खालसा करून तो पतियाळाच्या व फरीदकोटच्या राजांस वांटून दिला, आणि त्याचा पुत्र भरपूरसिंग यास गादीवर बसवून बाकीचा त्याच्या स्वाधीन केला.

पुढें सन १८५७ चें भयंकर बंड उद्भवलें, तेव्हां भरपूरासिंगानें वापरें जेवढें घालविलें होतें, तेवढें राज्य नवीन संपादिलें. पतियाळाच्या व झिंदच्या राजाप्रमाणें तो ही इंग्रज सरकारच्या फार उपयोगीं पडला, ह्मणून सरकारानें त्यास झुझरप्रांतापैकीं १०६००० रुपये वार्षिक वसुलाचा मुलुख बक्षीस दिला. पतियाळाच्या राजाला जशी सनद मिळाली तशीच सन १८६० मध्यें त्याला ही मिळाली, आणि त्याच्या प्रमाणें त्याणें ही सरकारास कर्ज दिलें होतें, त्याचे फेडीस आणखी मुलुख मिळाला.

हा राजा भरपूरसिंग सन १८६३ च्या नवंबर मध्यें वारला. तो अपुत्रिक होता, ह्मणून त्याचा बंधु भगवानसिंग गादीवर बसला. या गोष्टीस फार दिवस लोटले नाहींत तों दरबारच्या मंडळीनें विषप्रयोग केल्यामळें भरपूरासिंग मेला अशी बदंता उठली, व एक थोर कुलांतील बाई होती, तिचा खून त्याच मंडळीनें करविला अशी दुसरी बातमी उठली. ह्या अफवा फार जलद अतिशय दाट पसरल्या, तेव्हां सरकारानें त्यांच्या सत्यासत्येविषयीं चौकशी करण्याचें ठरवून एक गोरा अम्मलदार अध्यक्ष व पतियाळाचे महाराज आणि झिंदचे राजे हे सभासद मिळून तीन असामींची कमिटी नेमली.

झाल्या चौकशीअंतीं असें दिसून आलें, कीं राजास विषप्रयोग व-

गैरे कांहीं झालें नसून तो आपमरणानेंच मेला. त्या बाईचा खून अमूक मनुष्यानें केला असावा, असा प्रथम संशय आला होता, परंतु तो खोटा ठरून पुढें दुसऱ्याच एकाचें तें कृत्य असल्याविषयींची शाबिदी झाली ; आणि गुरबक्षसिंग म्हणून एक थोर मनुष्य. कामदारच होता, त्याचें हा गुन्ह्यांत अंग असावें असें दिसून आलें. तेव्हां त्या गुन्ह्याबद्दल त्याची चौकशी सुरू होऊन जो साक्षी पुरावा झाला, तो विश्वसनीय न वाटल्यामुळें तो जरी दोषमुक्त झाला, तरी तो व आणखी दोन घातकी मनुष्य होते ते या त्रिवर्गांनीं आजमितीपासून नभा संस्थानाच्या हद्दींत राहूं नये असा ठराव झाला.

४ कालसिया

ह्या संस्थानाच्या इतिहासांत सांगण्या सारखी विशेष गोष्ट कांहीं नाहीं. मझा प्रांतांत कालसिया म्हणून एक खेडें आहे, तें या घराण्याचें मूळ वास्तव्यस्थान. येथील राजानें प्रथम थोडें कांकूं करून शेवटीं सन १८०९ मध्यें इंग्रज सरकारचा आश्रय स्वीकारला आणि तेव्हां पासून उभयतांचें सख्य आहे. त्या राज्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या मालावरची जकात बंद झाल्यामुळें जें नुकसान झालें, तें भरून यावें, म्हणून इंग्रज सरकारानें त्यास दरसाल २८९१ रुपये प्रमाणें सतत रक्कम देण्याचें कबूल केलें ; त्या प्रमाणें पोंचत असते. येथील राजा आपल्या संस्थानांत पूर्ण अधिकारी आहे, परंतु देहांतशासनास इंग्रज सरकारची मंजुरी लागत असते.

५ मलेरकोटला

ह्या छोट्याशा संस्थानाचें मालक पठाण मुसलमान आहेत. ते प्रथम काबूलांतून येऊन मोगल बादशहांच्या पदरीं नोकरीस राहून सरहिंदमध्यें कामगिरी बजावीत होते. ह्या घराण्याचा इंग्रजांशीं प्रथम संबंध सन १८०५ मध्यें जडला. त्या वेळीं जो नबाब गादीवर होता, तो लॉर्ड लेक यास मिळाला, आणि पुढें त्यास सन १८०९ मध्यें इंग्रज सरकारचा आश्रय मिळाला. नबाबाचे भाईबंद आहेत, त्यांस संस्थानांत हिस्से मिळालेले

आहेत, व आपआपल्या हद्दींत ते पूर्ण अम्मल चालवितात. परंतु नवाब हे सर्वांचे वरिष्ट अधिकारी आहेत.

६ फरीदकोट

येथील राजघराणें बुरर जाटकुलोत्पन्न असून प्राचीन आहे. यांतील मल्हण ह्मणून सरदार अकबर बादशाहाच्या वेळीं गादीवर होता, तो त्याच्या चांगला उपयोगीं पडला ; तेव्हां पासून त्याचें बादशाहाशीं वरेंच वजन पडूं लागलें. त्याच्या पुतण्यानें कोटकपूरानामक किल्ला बांधला, आणि मग तो स्वतंत्रपणानें वागूं लागला. चालू शतकाच्या आरंभीं लाहोरचा मुख्य दिवाण मोकमचंद याणें कोटकपूराप्रांत बळकाविला, तो सन १८४५ । ४६ मध्यें शीक लोकांबरावरची लढाई संपेपर्यंत त्याच्याच घराण्याकडे होता ; परंतु त्या वर्षीं तो इंग्रज सरकारानें घेतला, आणि मूळच्या मालकास परत दिला. त्या लढाईंत येथचा राजा पहारसिंग सरकारच्या पुष्कळ उपयोगीं पडला ह्मणून सरकारानें खुष होऊन त्यास राजा हा किताब व नभाच्या राजापासून घेतलेल्या मुलखा पैकीं अर्धा मुल्लुख बक्षीस दिला. पुढें शिकांबरबर दुसरी लढाई झाली, तेव्हां व सन १८५७ च्या बंडांत राजा वजीरसिंग याणें सरकारास चांगली मदत केली, ह्मणून सरकारानें त्याला येनें बक्षीस दिलें.

भाग २

काश्मीर

या राज्याविषयीं दंतकथा अशी आहे, कीं इसवी सना पूर्वीं २६६६ वर्षां खालीं हिंदुलोकांनीं तेथें जाऊन वसाहत केली, आणि तेव्हां पासून तेथें हिंदूंचें राज्य चालत आहे. परंतु आणखी असें खचित दिसतें कीं तितक्या प्राचीन काळीं ही तार्तर व इतर सरदार त्यांच्यावर हल्ले करीत होते. तसा क्रम चालतां चालतां इसवी सनापूर्वी १५० पासून १००

पर्यंत पन्नास वर्षांत तीन तार्तर राजे झाले असा लेख आहे. तेव्हांपासून पुढें महंमदगिझनवी याणें स्वारी केली, तेथपर्यंतचा इतिहास अगदीं अपुर्ता व विश्वसनीयसा नाहीं ; तथापि इतकें स्पष्ट दिसतें, कीं जरी परकीय राजांनीं अशा स्वाऱ्या करून मुलखास उपद्रव दिला तरी एकंदरींत काश्मिरांत हिंदूंचीच राजसत्ता चालत होती नाहीं.

महंमद गिझनवी याणें इसवी सन १०११ व १०१२ ह्या वर्षीं काश्मिरावर स्वाऱ्या केल्या, परंतु दुसऱ्या खेपेस त्याचें सैन्य चुकून भलत्याच वाटेनें गेलें, त्यामुळें त्याचा फार नाश झाला. पुढें सन १०१७ मध्यें तो त्या घांटांनीं गेला, परंतु मुलखांत शिरला.

महंमदाची फेरी होऊन गेल्यावर मग चौदाव्या शतका पर्यंत काश्मिरांत बरीच शांतता होती, परंतु मग एका चग कुलोत्पन्न तार्तर राजानें स्वारी करून तें पुरें जिंकलें. मग त्याचे वंशज सन १९८७ पर्यंत तेथें राज्य करीत होते. मध्यंतरी त्यांनां दोन तीन वेळ विघ्न आलें, नाहीं असें नाहीं. त्या वर्षीं अकबर बादशहानें स्वारी करून राज्य जिंकलें आणि तेथें जो राजा होता, त्यास बहार प्रांतांत जाहागीर देऊन आपल्या पदरीं दिल्लीस एक सरदार करून ठेविलें. काश्मीर जिंकून घेतल्यावर मग अकबराच्या तिकडे तीनच खेपा झाल्या ; परंतु त्याचे वंशज उष्णकाळांत तेथें वारंवार जाऊन राहूं लागले. त्यांनां तो प्रदेश प्रिय झाला होता.

काश्मीर सन १७३९ पर्यंत मोंगलांच्या ताब्यांत होतें. परंतु त्यावर जेव्हां नादिरशहाची स्वारी झाली तेव्हां तें त्यांच्या हातून गेलें. नादिरशहानें तें घेऊन काबूलमध्यें सामील केलें, तें सन १८०९ पर्यंत अमीराकडेच चालत होतें. अमीरानें महंमद अजीमखान ह्मणून तेथें जो सुभेदार नेमलेला होता तो त्या वर्षीं बंड करून आपल्यास स्वतंत्र म्हणवूं लागला. पुढें सात वर्षांनीं त्याच्यापासून काश्मीर जिंकून परत घेण्याकरितां ह्मणून काबुलांतून फौज रवाना झाली; परंतु तींत एक विश्वासघातकी फितूर होता, त्यामुळें तिचा पुष्कळ नाश होऊन तिला परत जावें लागलें. पुढें सन १८१९ मध्यें रणजितसिंगानें काश्मीरशहर व त्या लगतचा कांहीं प्रदेश जिंकून घेतला; परंतु महंमद अजीमखानानें बाकीचा केवळ सहज सोडला नाहीं; तो हातचा जाऊं नये ह्मणून त्याणें आपल्याकडून झाली तितकी खटपट केली. त्याणें सन १८२० मध्यें दिल्लीस दोन वकील पाठविले आणि त्यांच्या द्वारें

मनोहर, विचित्र देखावे पहाण्याकरितां प्रतिसाल पुष्कळ युरोपियन लोक जातात. त्यांतील खोरीं मोठीं सुपीक आहेत. इमारती लांकूड, केंशर, अत्तर, टाकणखार, चामडीं, कागद, रुप्याचीं भांडीं वगैरे जिनसांचा व्यापार येथें पुष्कळ चालतो. कांश्मिरी शाल तर जगप्रसिद्धच आहे. त्या व्यापाराचा तेथें मक्ता आहे.

भाग ३

सतलजच्या पलीकडचीं छोटीं संस्थानें

१ कपूरथळा

येथील राजे राणा कपूर ह्मणून जसलमीर येथील एक पुरुष फिरत गेलेला होता तो आपला कूटस्थ असें म्हणतात. नादिरशहा व अहमदशहा दुराणी यांणीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या त्या वेळेस जी धांदल उडाली त्या संधीस हें घराणें राजकीयसबधानें उदयास आलें आणि गेल्या शतकाच्या अखेरीस जी गडबड उडाली तींत जुसासिंग याणें कांहीं मुलुख स्वपराक्रमानें व कांहीं रणजितसिंगापासून बक्षीस मिळविला; मिळून सतलज नदीच्या उभयतीरच्या प्रदेशीं त्याचें राज्य झालें. सन १८०९ मध्यें रणजितसिंगाचा आणि इंग्लिशांचा जो तह झाला त्यांत सतलजच्या आलीकडील मलखाबद्दल कपूरथळ्याच्या सरदारावर इंग्रजांचें स्वामित्व झालें. त्या मुलखांतून इंग्रजांची फौज जाऊं लागली किंवा त्यांतच छावणीस राहिली असतां या सरदारानें तिला सामान सुमान पुरविलें पाहिजे असा ठराव झाला. पुढच्या मे महिन्यांत इंग्रजांनीं त्या साऱ्या संस्थानांत जो जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यावरून त्याणें लढाईच्या वेळीं आपलें सैन्य मदतीस घेऊन आलें पाहिजे असा ही ठराव झाला.

सन १८२६ मध्यें रणजितसिंगानें कपूरथळ्यास उपराळा केला तेव्हां आपलें संरक्षण करावें अशी तेथील सरदारानें इंग्रजसरकारास विनंती

केली. ती सरकारानें मनाम आणली तेव्हां रणजित उपद्रव देईनासा झाला. तथापि सन १८४५ । ४६ मध्यें शिखांबराबर लढाई सुरू झाली तेव्हां तो सरदार त्यांस सामील झाला.

त्याणें असें वैर मांडताच सतलजच्या डाव्या बाजूकडील त्याचा मुलुख सरकारानें खालसा केला, व उजव्या बाजूकडील त्याच्या व त्याच्या वंशाकडे चालविला ; परंतु त्याजपासून असे करार करून घेतले, कीं पूर्वी लाहोर सरकारांत त्याला जो नोकरी करावी लागत असे तिजबद्दल त्याणें इंग्रज सरकारास नक्त पैसा द्यावा, सरकाराशीं प्रामाणिकपणानें वागावें, आपलें राज्य चांगलें चालवावें, मालावर दस्तुरी किंवा जकात कांहीं बसवूं नये आणि थोरले रस्ते हमेष दुरुस्त राखावे. सैन्याच्या नोकरीबद्दल त्याणें दरसाल १३८००० रुपये द्यावे असा प्रथम ठराव झाला होता, परंतु पुढें त्यांत ७००० सूट मिळाली. आतां १३१००० रुपये द्यावे लागतात.

इंग्रज सरकारानें पंजाब प्रांत खालसा केल्यावर सन १८४९ मध्यें न्यहालसिंग यास राजा असा किताब दिला. तो सन १८५२ मध्यें वारला, तेव्हां त्याचा पुत्र रणधीरसिंग गादीवर बसला. हा राजा सन १८५७ । ५८ च्या भयंकर प्रसंगीं पंजाब व अयोध्या ह्या दोन्हीं प्रांतीं सरकारच्या फार उपयोगीं पडला. ह्मणून सरकारानें पूर्वी त्याच्या बापाला बरी दोआबांत जी जाहागीर दिली होती, आणि तो मेला तेव्हां परत घेतली होती, ती वंशपरंपरा चालविण्याचे ठरावानें पुनः दिली ; शिवाय अयोध्ये मध्यें दोन मिरासदाऱ्या निमे सारा माफीनें चालविण्याचा ठराव करून दिल्या.

हा राजा रणधीरसिंग सन १८६९ च्या अखेरीस इंग्लंडचा प्रवास करावयास निघाला असतां वाटेंत एडन येथें दुखणें लागून माघारा फिरला तो सन १८७० मध्यें मुंबईस येऊन पोहोंचण्यापूर्वीं वाटेंतच मृत्यु पावला. नंतर त्यांचा पुत्र खरकासिंग गादीवर बसला.

२ मंदी

हें रजपूत संस्थान प्राचीन आहे. येथील पहिला राजा बाहुसेन या

इंग्रजसरकाराकडे तहाचें बोलणें लाऊन त्यांचा आश्रय मिळावा ह्मणून पुष्कळ यत्न केला; परंतु त्यावेळीं सरकारानें त्याची विनंती मनास आणली नाहीं, आणि रणजितसिंगानें हळु हळु स्वस्थपणें सारें राज्य जिंकून आपल्या कबजांत घेतलें.

रणजितसिंगानें गुलाबसिंग नामक आपल्या एका सरदाराची या प्रांतावर नेमणूक केली होती. तो धूर्त आणि सदा दक्ष असे. आपल्या आसमंतांत कोठें काय चाललें आहे इकडे त्याची नेहेमी नजर असे, आणि अंगावर बाजू येण्यासारख्या प्रकरणांत न पडतां जेवढा सहज लाग साधण्यासारखा दिसेल तेवढा हात मारण्यास तो टपून बसलेला असे. हा भाग्यवान पुरुष प्रथम रणजितसिंगाच्या पदरच्या एका सरदाराजवळ शिलेदारी पत्करून राहिला होता आणि पुढें थोडक्याच दिवसांत प्रसिद्धीस येऊन स्वतंत्र सरदार बनला. त्यानें राजोरी येथील राजाशीं युद्ध करून त्याला कैद केलें तेव्हां त्याची मोठी कीर्ति झाली आणि रणजितसिंगानें त्यावर खुष होऊन त्याला जम्मूप्रांत वंशपरंपरा जाहागीर करून दिला. नंतर गुलाबसिंगानें तेथें जाऊन राहूं लागून आसपासचे रजपूत सरदार हळु हळु जिंकण्याचा क्रम सुरू केला आणि शेवटीं लडाखप्रांत ही काबीज केला. शिखांबराबर लढाई सुरू होण्यापूर्वी जी मोठी उलटा पालट झाली तींत खालसा प्रांताचा दिवाण ह्मणून त्याची नेमणूक झाली. सोब्रानच्या लढाई नंतर तहाची बाटाघाट सुरू झाली तेव्हां त्या कामांत तो प्रमुख होता. त्याचें वजनविशेष पडल्यामुळें तो इंग्रजांबराबरचा सख्यसंबंध पुनः सुरू झाला.

पुढें शिकांबराबर दुसरी लढाई सुरू झाली, तेव्हां ही गुलाबसिंगाचें बर्तन पूर्वनिर्दिष्ट प्रकारचें शहाणपणाचेंच होतें. जम्मू येथें आपल्या त्या उच्च निर्भयस्थानीं बसून खालीं चाललेला युद्धप्रकार तो स्वस्थपणें पहात होता. जयश्री इंग्रजांस प्राप्त होईल असें त्यानें प्रथमच भविष्य केलें होतें, आणि चिलियनवाला येथील संग्रामांत उभय पक्ष तुल्यबल ठरून विजयी कोणास ह्मणावें हें ठरविणें कठीण पडल्यामुळें त्याचें मन तेव्हां जरी किंचित साशंकित झालें असलें तरी जेव्हां मुसलमानांस इंग्रजांनीं पादाक्रांत केलें, तेव्हां त्याचें भविष्य खरें झालेंच आणि पुढें गुजराथची लढाई झाली, तेव्हां तर कांहींच संदेह उरला नाहीं.

रणजितसिंगानें नेमणूक केल्या तागायत त्याच्या पश्चात ही सन

१८४६ पर्यंत गुलाबसिंग काश्मिरावर अम्मल चालवीतच होता. परंतु त्या वर्षी शिकांवरावरचें युद्ध संपून इंग्रजांचा आणि ह्यांचा मार्च -महिन्यांत लाहोर येथें तह झाला, तेव्हां जम्मू, काश्मीर, व लडख इतका प्रदेश इंग्रजांच्या ताब्यांत द्यावा, असें कलम त्या ठरावांत नमूद झालें. परंतु इतका दूरचा एवढा मोठा तो प्रदेश ताब्यांत घेऊन मग तो संभाळण्याची काळजी वहात बसणें हें गव्हरनर जनरल साहेबांस बरें वाटलें नाहीं ; कारण शीक लोक त्या लढाईंत जरी जेरीस आले होते, तरी ते सर्वथा परास्त झाले अशी कांहीं गोष्ट नव्हती, ह्मणून त्यांजवर सतत नजर ठेऊन. वसणें भाग होतें. तशांत गुलाबसिंग अक्कलवान मनुष्य होता, ह्मणून त्याच्याशीं सतत वैर करणें बरें नव्हे, त्याचा स्नेह संपादावा हेंच इष्ट आहे. असें मनांत आणून गव्हरनर जनरलानें त्याजपासून एक कोट रुपये घेऊन तो मुलुख त्यास परत द्यावा असें ठरविलें. त्या प्रमाणें त्याच्याशीं स्वतंत्र तह होऊन काश्मीर त्याच्या तावींत झालें. तहनाम्यांत असा ठराव झाला, कीं गुलाबसिंगानें इंग्रज सरकारचें सार्वभौमत्व मान्य करावें व परराजांशीं आपले तंटे असतील ते त्यांच्या मार्फत तोडून घ्यावे ; त्यांणीं त्याला स्वतंत्र राजा मानावें.

या प्रमाणें प्राप्त झालेलें राजपद अनुभवींत सन १८५७ मध्यें गुलाबसिंग मरण पावला, आणि त्याचा पुत्र रणबीरसिंग गादीवर बसला. त्याच वर्षीं शिपायांचें बंड झालें, तेव्हां तो सरकारच्या फार उपयोगीं पडला. त्याणें त्यांच्या मदतीस आपलें सैन्य लागलेंच दिल्लीस पाठविलें ; तें चांगलें लढून उत्तम प्रकारें वागलें. हें त्याचें मित्रत्व पाहून सरकारानें त्यास नाइट क. आ. धि. मो. ए. ऑ. ऑ. धि. स्टा. ऑ. इंडिया हा किताब दिला. सन १८६७ मध्यें रणबीरसिंगानें आपल्या मुलखांतून जाणाऱ्या मालावरील रहदारी जकात कमी करून मालाच्या किमती प्रमाणें शेंकडा पांच रुपये कायम ठेविली. ह्या व दुसऱ्या अशाच कामांत सरकारच्या इच्छे प्रमाणें वागण्याचें त्याणें उदारपणानें कबूल केलें.

रणवीरसिंगानें पंजाब युनिव्हरसिटी कालेजास ९३४७८ रुपये बक्षीस दिले, व बंगाल्यांतील दुष्काळसमयीं लोकोपजीविनाकरितां पुष्कळ वर्गणी दिली. याकंडकडे सरकारचीं जीं अनेक मिशनें (नेमलेल्या मंडळ्या) गेलीं त्यांस त्याणें फार चांगलीं मदत केली.

काश्मीर प्रदेश अगदीं पर्वतमय आहे. तेथील सृष्टिसौंदर्याचे फार

णें सन १९२७ मध्यें मंदी शहर वसविलें. सन १८१० मध्यें तें रणजितसिंगाचें अंकित होतें. परंतु शिखांबराबरची पहिली लढाई संपल्यावर सन १८४६ मध्यें बलबीरसेन याणें इंग्रज सरकारचें आधिपत्य यथाविधि मान्य केलें. राजास सरकारांत एक लाख रुपये खंडणी द्यावी लागते. या संस्थानांत ३६० दुर्ग होते, अशी आख्यायिका आहे. परंतु सांप्रत त्यां पैकीं दहा आहेत ; त्यांत कमळगड हा फार प्रसिद्ध आहे. गमा व दिरंग येथें मिठाच्या खाणी आहेत.

३ चंबा

हें डोंगराळ संस्थान सन १८४६ मध्यें इंग्रजसरकारचे हातीं गेलें व त्याचा कांहीं भाग जम्मू येथील गुलाबसिंग महाराजांस देण्यांत आला. परंतु पुढच्याच वर्षी गुलाबसिंगा बराबर कांहीं ठराव होऊन तो भाग सरकारांत परत आला. तेव्हां सरकारानें कृपा करून तें सर्व संस्थान राजा श्रीसिंग यास वंशपरंपरा उपभोगण्यास दिलें. सरकार राजा कडून वर्षास १०००० रुपये खंडणी घेतें. या संस्थानांत चिनाव नदीच्या कांठीं पंगी येथें व रावीच्या कांठीं बारमोर येथें जीं अरण्यें आहेत त्यांतील इमारती लांकूड उत्तम अशी प्रसिद्धि आहे.

४ सुकेत

इसवी सन १२०० पर्यंत मंदी व सुकेत हीं संस्थानें अगदीं एक असल्या सारखीं होतीं. बहुतेक गोष्टींत उभयतांचें नफा नुकसान सारखेंच असे, तरी तीं कांहीं अंशीं एकमेकांपासून अगदीं स्वतंत्र असत. मंदीपासून पांच कोसांवर जें बाल झणून खोरें लागतें तें अगदीं सुकेत शहरापर्यंत जाऊन ठेपलें आहे. त्या बद्दल उभय संस्थानांचा तंटा चालून अनेक युद्धप्रसंग झाले. त्यांचें वर्णन मंदी येथील कवींनीं केलें आहे तें ऐकून त्या लोकांस अद्याप वीरश्रीनें स्फुरण येतें. लाहोरच्या तहांत सुकेत प्रांत इंग्रजसरकाराकडे आला. परंतु सन १८४६ मध्यें तो सर्व पूर्वीच्या राजघराण्याकडे वंशपरंपरा चालवावा असें ठरून परत देण्यांत आला. तेथील सरदारा बरा

वर जे करार झाले त्यांत एक असा आहे कीं त्याणें गुलामगिरी बंद करावी आणि महारोग्यांस जिवंत जाळण्याची व बुडाविण्याची वहिवाट असलेली बंद करावी.

५ सिरमूर

जसलमीर येथील उग्रसेन रावळ हा सन १०९५ मध्यें श्रीभागीरथीचे महायात्रेस चालला असतां सिरमूर जवळ गेला, तेव्हां तेथील राजा नदीच्या पुरांत बुडाला असें वर्तमान त्यास कळलें. त्या बराबर त्याणें तें संस्थान बळकाविलें ; तेव्हां पासून तें त्याच्या वंशाकडे चालत आहे. सन १८०३ मध्यें तो मुलुख गुरखे लोकांनीं जिंकला होता. परंतु सन १८१५ मध्यें त्यांस तो सोडून द्यावा लागला. त्या वेळीं कर्मप्रकाश झणून जो गादीचा मालक होता, तो अगदीं उधळ्या, व्यसनी व राज्याधिकार चालविण्यास अयोग्य असल्यामुळें त्याला काढून त्याचा वडील पुत्र फत्तेप्रकाश यास त्या स्थानीं नेमावें लागलें. त्याच वर्षी सप्टंबर महिन्यांत जो तहनामा झाला, त्यावरून त्या बाराण्याकडे पूर्वी जो मुलुख चालत होता, तो हल्लेक त्याजकडे वंशपरंपरेनें चालविण्याचा ठराव करून सरकारानें परत दिला.

भाग ४

भावलपूर

भावलपूर हा मुलुख एक लांब पट्टी आहे. त्याच्या वायव्येस सिंध व पंजाब आणि पूर्वेस, आग्नेयीस, व दक्षिणेकडील कांहीं भागास, बिकानीर, जसलमीर व भाटियाना हीं संस्थानें आहेत.

भावलपूरचा नवाब हा जाउदपुत्र कुलाचा अधिपति आहे. सिंध प्रांतांत शिकारपूर येथें दाउदखान नामक एक प्रतिष्ठित मनुष्य होता, त्याला त्याचा प्रभु कंदाहारचा राजा याणें तेथून घालवून लाविलें, तेव्हां तो